ॐ

सामवेद

(मराठी अर्थ व स्पष्टीकरण सहित)

लेखक

ब्रह्मर्षि म. म. पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर

साहित्य-वाचस्पति, गीतालंकार, विद्यामार्तण्ड

ॐ तत्सत्

हा ग्रंथ श्रीमान् दत्तात्रेय डहाणूकर धर्मादाय निधिनें दिलेल्या १००००) दहा हजार रुपयांच्या उदार देणगीच्या सहाय्यानें छापून प्रसिद्ध केला आहे.

स्वाध्याय-मण्डळ, पारडी (जि. सूरत)

■ **प्रकाशक :**

स्वाध्याय मंडळ
पं. सातवळेकरजी मार्ग
पोस्ट - ' स्वाध्याय मंडळ (पारडी) '
पारडी
जि. बलसाड, पिन :- ३९६ १२५ (गुजरात)

■ **मुद्रक :**

संवाद ट्रेडप्रिंटस् प्रा. लि.
१००५ सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.
(दूरध्वनी : ४८५६३२)

■ **द्वितीय आवृत्ती :**

नारळी पौर्णिमा, श्रावण शके १९२०
(७ ऑगस्ट १९९८)

■ **प्रमुख वितरक**

भारतीय विचार साधना
' मोतीबाग, ' ३०९ शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०३०.
(दूरध्वनी : ४९० ४५४)

■ **मूल्य :** Rs 800

प्रकाशकाचे मनोगत ...

संस्कृत, वेद आणि वैदिक साहित्याचे ज्ञाते, अभ्यासक आणि संशोधक वेदमूर्ती पं. श्रीपाद दा. सातवळेकर यांनी लिहिलेल्या 'सामवेद भाष्य ' या ग्रंथाचे पुनर्प्रकाशन करताना संस्थेला आनंद होत आहे.

पं. सातवळेकर यांनी लिहिलेल्या ' वैदिक राष्ट्रगीता' वर ब्रिटिश सरकारने १९०७ साली प्रतिबंध घातला. वेदांच्या एका छोट्या मंत्रात जर ब्रिटिश राजवटीला हादरवून टाकण्याचे सामर्थ्य असेल तर वेदांचा समग्र अभ्यासच का करू नये, अशा विचाराने त्यांनी वेदांचा प्रचार - प्रसार हेच पुढे आपल्या जीवनाचे ध्येय बनवले.

वेदवाङ्मय व अन्य संस्कृत साहित्याच्या आधारे पंडितजींनी ४०९ ग्रंथ - पुस्तके लिहिली. यातील अनेक ग्रंथ - पुस्तके सध्या उपलब्ध नसल्याने पंडितजींच्या साहित्याचे पुनर्प्रकाशन करण्याचे काम सुरू आहे.

विविध संस्था , व्यक्ती यांनी अर्थसाहाय्य केल्यामुळेच या दुर्मिळ ग्रंथांच्या पुनर्प्रकाशनाचे काम शक्य झाले. प्रस्तुत ग्रंथासाठी गुरुदेव कॉर्पोरेशनचे श्री. शिवजीभाई पटेल, लातूर, वैशाली कन्स्ट्रक्शन्स्‌चे श्री. उत्तमराव पाटील , लातूर , श्री. भानुदास रामप्रसाद किराड,पुणे , श्री. चिंतामणी श्रीपाद चितळे , पुणे यांनी केलेल्या अर्थसहाय्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

वेदांच्या अभ्यासकांसाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

प्रकाशक

सामवेदाचा सुबोध अनुवाद

भूमिका

वेद चार आहेत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद हे ते चार वेद आहेत. ऋग्वेदामध्यें देवतांच्या गुणांचें वर्णन आहे. यजुर्वेदामध्यें नाना प्रकारचे यज्ञ कसे करावे, तें सांगितलें आहे. सामवेदामध्यें अनेक मंत्रांचें उत्तम स्वरांत गायन कसें करावें, तें आहे व अथर्ववेदामध्यें ब्रह्मज्ञान आहे. चार वेदांची विषयव्यवस्था अशी आहे.

वेदत्रयी व वेदचतुष्टयी

" वेद-त्रयी " आहे असेंहि म्हणतात. ही त्रयी म्हणजे पद्य, गद्य व गायन आहे. " पादबद्धव्यवस्था " असलेले जे मंत्र आहेत तो ऋग्वेद, " गद्य भाग " जो आहे तो यजुर्वेद व पादबद्ध मंत्रांचें जें " गायन " होतें, तो गायनाचा सामवेद आहे. ही वेदत्रयी आहे. अथर्ववेदाचे मंत्र पादबद्ध असल्यामुळें ते ऋग्वेदामध्यें अन्तर्भूत होतात. वेदग्रंथ चार असले तरीहि चारही वेदांचे मंत्र (१) पद्य, (२) गद्य, व (३) गायन या तीन विभागांत समाविष्ट होऊं शकतात. यामुळें " वेद-त्रयी " म्हटलें काय, अथवा " वेद-चतुष्टयी " म्हटलें काय मंत्रसंख्येमध्यें कांहीं फरक होत नाहीं. वेदत्रयी म्हटलें तर अथर्ववेद पाठीमागून आला असें समजण्याचें कारण नाहीं. कारण यज्ञांमधील " ब्रह्मा " अथर्ववेदीच असतो व " ब्रह्मा " हा यज्ञांमध्यें पाहिजेच आहे. तेव्हां अथर्ववेद मागून झाला असें म्हणतां येणार नाहीं.

वेदत्रयीची गणना " पद्य, गद्य व गान " ही आहे, व कोणतेंही वाङ्मय या तीन विभागांमध्येंच विभागलेलें असतें, हें पाहिलें म्हणजे वेद-त्रयी व वेद-चतुष्टयी यांत कांहीं फरक नाहीं, हें तेव्हांच लक्ष्यांत येईल व कित्येकांनीं आपली जी गैर-समजूत करून घेतली आहे ती चुकीची आहे हें समजून येईल.

यजुर्वेदाच्या सर्व संहितांमध्यें जे पादबद्धमंत्र ऋग्वेद व अथर्ववेदामधून घेतले आहेत, ते पादबद्धमंत्र म्हणण्याच्या पद्धतिनें म्हटले जात नाहींत, तर ते गद्य जसें म्हणावयाचें असतें, तसे ते मंत्र म्हटले जातात. अर्थात् तेच मंत्र ऋग्वेद, सामवेद व अथर्ववेदामध्यें त्या त्या छन्दाप्रमाणें उच्चारले जातात व तेच मंत्र यजुर्वेदामध्यें म्हणावयाच्या वेळीं त्यांच्या पादबद्धतेचा त्याग करून, ते गद्य म्हणतात; तसे म्हणण्याची परिपाटी सनातन चालू आहे.

वेद-त्रयी व वेद-चतुष्टयी या गणनेमध्यें मंत्र संख्येमध्यें कांहीं फरक नाहीं. वेदत्रयीमध्यें भाषेची रचना मुख्य मानली जाते व वेद चतुष्टयीमध्यें प्रतिपाद्य विषय मुख्य मानला जातो, हें स्पष्ट करण्यासाठीं पुनः तोच विषय खालीं देतों.

१ वेद-त्रयी- पद्यमंत्र, गद्यमंत्र व गायनाचे मंत्र.

२ वेद-चतुष्टयी- गुण वर्णनाचे मंत्र, यज्ञकर्माचे मंत्र, गाण्याचे मंत्र व ब्रह्मज्ञानाचे मंत्र.

या दोनही गणनांमध्यें चारही वेदांची मंत्रसंख्या सारखी समानच असते. म्हणून वेदत्रयी ही पूर्वीं होती व वेदचतुष्टयी मागाहून बनवली व अथर्ववेद हा मागून वेदांमध्यें घातला, असें जें कित्येक म्हणतात, तें निराधार आहे, हें यावरून समजून येईल.

सामवेदाचें विभूतिमत्त्व

श्रीमान् भगवान् वासुदेव श्रीकृष्णांनीं श्रीमद्भगवद्गीतेमध्यें भगवन्ताच्या विभूतीचें वर्णन करीत असतांना " वेदानां सामवेदोऽस्मि " (भ. गीता. १०।२२) चारही वेदांमध्यें " सामवेद " ही भगवानांची विभूति आहे, असें सांगितलें आहे. " पद्य, गद्य, गायन " यांमध्यें " गायन " हें विशेष परिणाम मनावर घडवतें, याचा अनुभव सर्वांस आहे, हेंच सामगानाचें विभूतिमत्त्व आहे. भाषेच्या तीन प्रकारांमध्यें गायन हा प्रकार मनावर परिणाम अधिक करूं शकतो. साधारण माणसाच्या मनावर उत्तम आनन्दाचा ठसा गायनानें बसतो. रोगी माणसाच्या मनावर गायनाचा इष्ट परिणाम होऊन त्यास लवकर आरोग्य प्राप्त होतें. गायनाचा परिणाम शेती, बागायत व झाडें यांवरहि उत्तम होतो. शेतावर गायन चालविलें तर शेतामध्यें धान्य अधिक पिकतें, रोगीलोकांच्या दवाखान्यामध्यें जर गाण्याच्या प्लेटी (रिकॉर्ड्स) लावल्या तर त्यामुळें रोग्यांस लवकर आरोग्य प्राप्त होतें. दुभत्या गाईंना गाणें एकविलें तर गाई अधिक दूध देतात. असा गायनाचा उत्तम परिणाम होतो.

या सामगाण्यामध्यें व दुसऱ्या मुसलमानी पद्धतिच्या गाण्यामध्यें थोडा फरक आहे. त्याचाहि येथें विचार करणें अत्यन्त आवश्यक आहे. सामगानामध्यें वरच्या उच्च स्वरावरून खालच्या स्वराचे आलाप घेतले जातात. यामुळें मनाला शान्ति मिळणें सुगम होतें. म्हणून भडकलेलें मन सामगायन ऐकल्यानें शान्त होतें. अशी सामगायनानें शान्ति प्राप्त होऊं शकते.

मुसलमानी तऱ्हेच्या गाण्यामध्यें उच्च व नीच तानांची सरमिसळ होत असल्यानें या गाण्यानें मन शान्त होण्याऐवजीं तें अधिक विकारवश होतें. हा या दोन प्रकारच्या गाण्यांमध्यें फरक आहे. यासाठीं मन शान्त करण्यासाठीं सामगायनाचा प्रयोग करावा व मन विकारवश करावयाचें असेल तर मुसलमानी पद्धतिचें गायन करावें.

हें सामवेदाचें जें विभूतिमत्त्व आहे असें गीतेमध्यें सांगितलें आहे, तें हें आहे. उच्छृंखल मनाला शान्त करण्याचें काम हें सामगायन करूं शकतें.

महाभारताच्या अनुशासनपर्वामध्येंही असेंच सांगितलें आहे—

सामवेदश्च वेदानां यजुषां शतरुद्रियम् ।
(म. भा. १४।३।७)

चारही वेदांमध्यें " सामवेद " व यजुर्वेदामध्यें " शतरुद्रिय " विशेष महत्त्वाचे ग्रंथ आहेत. श्री भगवद्गीतेमध्यें —

प्रणवः सर्ववेदेषु ॥ (गी. ७।८)

तसेंच अनुगीतेमध्यें —

ओंकारः सर्ववेदानाम् ॥ (म. भ. अश्वमेध. ४४।६)

या वचनांनीं ओंकाराचें सर्वांहून श्रेष्ठत्व आहे, असें प्रतिपादन केलेलें आहे, तरी या ओंकार प्रशंसेनें सामवेदाचें महत्त्व कमी होत आहे असें म्हणतां येणार नाहीं; कारण "ओंकार" व " उद्गीथ " हे समानार्थक आहेत व उद्गीथ सामवेदाचें सार आहे. छान्दोग्य-उपनिषदामध्यें या कारणानेंच असें म्हटलें आहे—

साम्नः उद्गीथो रसः ॥ (छां. उ. १।१।२)

" सामाचा रस उद्गीथ आहे " असें सामवेदाचें महत्त्व वर्णन केलेलें आहे. असा सामवेद महत्त्वाचा आहे असें कां बरें समजलें जातें ? सामवेद ही भगवंतांची विभूति आहे असें या सामवेदामध्यें कोणतें महत्व आहे ? याचा विचार करणें योग्य आहे. तें आतां पाहूं या—

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम् ॥
(गी. १०।४१)

विभूतिचें हें लक्षण गीतेमध्यें सांगितलें आहे. जेथें जेथें विशेष विभूतिचें तत्त्व असेल, श्रीमत्व दिसेल, ऊर्जित भावना अनुभवास येईल, तेथें तेथें भगवंताचें विभूतिमत्त्व आहे असें समजावें. या लक्षणानें सामवेद हा सर्व वेदांमध्यें परमेश्वराची खरोखर विभूति आहे असें निःसन्देह म्हणावें लागतें. सामवेद हा गायनस्वरूपी असल्यामुळें " शब्द-ब्रह्म " ची ही गायनरूपी विभूतिच आहे. तानांच्या मिश्रणानें म्हणजे आलापांच्या मिश्रणानें या सामवेदाची शोभा दिसूं लागते, हेंच याचें श्रीमत्व म्हणजे शोभायुक्तत्व आहे. तसेंच या सामवेदाचें समूर्जितत्व विकार - विश्लेषण विकर्षण - अभ्यास - विराम - स्तोभ यांच्या गानामधील योजनेनें श्रोत्यांच्या अनुभवास येत असतें. साधारण गद्यवाक्यांपेक्षां छन्द, छन्दांपेक्षां काव्य, काव्यांपेक्षां गायन, गायनामध्यें तानांचे आलाप यांचें विशेष महत्त्व अनुभवास येतें. याच कारणामुळें सामवेदाचें विशेष महत्त्व सिद्ध होतें. हेंच छान्दोग्य-उपनिषदामध्यें सांगितलें आहे—

वाचः ऋग्रसः, ऋचः सामरसः ।
साम्न उद्गीथो रसः ॥ (छा. उ. १।१।२)

" वाणीचा ऋचा हा रस आहे. ऋचांचा साम हा रस

आहे व सामाचा उद्गीथ हा रस आहे. " या कारणामुळें सामवेदाचें विभूतिमत्त्व सिद्ध होतें, म्हणून म्हटलें आहे—

सामवेद एव पुष्पम् । (छा. उ. ३।३।१)

" जसें वृक्षावरील फांद्या, पानें, फुलें यांत फूल हें विशेष सौन्दर्य दाखवतें, त्याप्रमाणें वेदवृक्षाचें सामवेद हा गायनरूप असल्यामुळें फूलच आहे म्हणजे सर्व वेदांमध्यें सामवेद हें वेदवृक्षाचें फूल आहे.

सामवेद म्हणजे काय ?

सामवेद म्हणजे कोणता वेद व त्याचें स्वरूप काय हें आतां आपण पाहूं. सामवेद म्हणजे केवल मंत्रसंग्रहच आहे कीं गायनरूप सामवेद आहे, हें येथें पहावयाचें आहे. छान्दोग्य उपनिषदामध्यें—

या ऋक् तत्साम । (छा. उ. १।३।४)

असें सांगितलें आहे कीं " ऋचांचा संग्रहच वेद " आहे. तसेंच आणखी पहा—

ऋचि अध्यूढं साम । (छा. उ. १।६।१)

ऋचेवर आधारलेलें साम असतें. सामाला ऋचेचा आश्रय असतो. दुसऱ्या कशावर साम आश्रित राहूं शकत नाहीं. ऋग्वेद व सामवेद हे दोन मिळून " स्त्री - पुरुषांचें " जोडपें होतें, असेंहि सांगितलें आहे—

अमोऽहमस्मि सा त्वं, सामाहमस्मि ऋक् त्वं ।
द्यौरहं पृथिवी त्वं । ताविह संभवाव, प्रजामाजनयावहै ।

(अथर्व. १४।२।७१; ऐत. ब्रा. ८।२७; बृ. उ. ६।४।२०)

" मी पति " अम " आहें, तूं " ऋचा " रूपी स्त्री आहेस, " साम " मी आहें व " ऋचा " तूं आहेस, " द्यौ " मी आहें व " पृथिवी " तूं आहेस, आम्हीं दोघे मिळून येथें उत्पन्न होत राहूं, प्रजा उत्पन्न करूं. "

यांत साम शब्दाची व्युत्पत्ति दिली आहे. " सा+अमः " = सामः । " सा " म्हणजे " ऋचा " व " अम " म्हणजे " आलाप ", गायनाचे स्वर अर्थात् " साम (साम+अम) " म्हणजे ऋचेवर केलेलें गायन, हें पादबद्धमंत्रांचें होतें. यजुर्वेद गद्य आहे, म्हणून यजुर्वेदमंत्राचें गायन होत नाहीं.

पादबद्धमंत्रांचें गायन

ऋग्वेद व अथर्ववेद यांत पादबद्ध मंत्र आहेत, त्यांचें गायन होतें. " ऋचा " म्हणजे पादबद्ध मंत्र, त्यावर आलापांची मांडणी केली कीं त्याचें गायन होतें. ऋचा ही स्त्री आहे व सामगान हा पुरुष आहे. या दोघांचा विवाह झालेला आहे. " नवरा–बायको " प्रमाणें " साम+ऋचेचा " सम्बन्ध आहे. या सम्बन्धाप्रमाणें उपनिषदांनीं आणखीही सम्बन्ध दाखविला आहे, तो असा आहे—

वाक् च प्राणश्च, ऋक् च साम च ।

(छां. उ. १।१।५)

वागेव सा प्राणोऽमस्तत्साम ॥ (छां. उ. १।७।१)

" वाणी व प्राण हे क्रमानें ऋक् व साम आहेत. वाणी ही ऋचा आहे साम प्राण आहे. " वाणी–प्राण यांचा जसा सम्बन्ध आहे, त्याप्रमाणें ऋचा व साम यांचा सम्बन्ध आहे.

स्वर–मण्डल

ऋचा म्हणजे चरण असलेला मंत्र. चरण असलेला मंत्र गाइला जातो. त्याला " साम " असें म्हणतात. " साम " म्हणजे (सा–अम) ऋचा व आलाप. " अम " म्हणजे षड्ज, मध्यम आदि तानांचे आलाप. हे आलापच गायन आहे. म्हणून म्हटलें आहे—

गीतिषु सामाख्या ॥ (जै. सू. २।१।३६)

" वेदमंत्राच्या गायनाला साम अशी संज्ञा आहे. " केवळ मंत्रपाठाला " साम " संज्ञा नाहीं व केवळ " गाण्याला "च " साम " ही संज्ञा नाहीं, तर वेदमंत्रांच्या गाण्याला " साम " ही संज्ञा आहे, असें जैमिनी मुनींनीं सांगितलें आहे. शालावत्य दाल्भ्य संवादामध्यें असें सांगितलें आहे—

का साम्नो गतिरिति ? स्वर इति होवाच ।

(छां. उ. १।८।४)

" सामाची गति काय असते ? स्वर - आलाप - ही सामाची गति आहे. " स्वराशिवाय आलापाशिवाय साम होत नाहीं, तसेंच—

तस्य हैतस्य साम्नो यः स्वं वेद, भवति हास्यं स्वं,
तस्य स्वर एव स्वम् । (बृ. उ. १।३।२५)

हें वचनही तेंच सांगत आहे. सामाचें स्वतचें रूप " स्वर " म्हणजे " आलाप " हें आहे. या सामाच्या स्वरांचें मण्डल कसें असतें तें नारदीय - शिक्षेमध्यें नारदांनीं असें दाखवलें आहे—

सप्तस्वराः त्रयो ग्रामाः मूर्छनास्त्वेकविंशतिः ।
ताना एकोनपंचाशत् इत्येतत्स्वरमण्डलम् ॥

(नारदीय - शिक्षा)

आणखी सांगितले आहे—

यः सामगानां प्रथमः स वेणोर्मध्यमः स्वरः ।
यो द्वितीयः सः गांधारः, तृतीयस्त्वृषभः स्मृतः ।
चतुर्थः षड्ज इत्याहुः पंचमो धैवतो भवेत् ।
षष्ठो निषादो विज्ञेयः, सप्तमः पंचमः स्मृतः ॥
(नारदीय-शिक्षा)

या नारदीय-शिक्षेमध्यें धैवत व निषाद यांच्या स्थानांचा बदल झालेला दिसत आहे त्याचा विचार सामगायन जाणणारांनीं करावा. हे सामस्वर सामांकानुसार असे होतात—

अतिक्रुष्टः		पंचमः । प ।
१ प्रथमः	(वेणोः)	मध्यमः । म ।
२ द्वितीयः		गांधारः । ग ।
३ तृतीयः		ऋषभः । रे ।
४ चतुर्थः		षड्जः । स ।
५ पंचमः	(मन्द्रः)	निषादः । नि ।
६ षष्ठः	(अतिस्वार्थः)	धैवतः । ध ।
७ सप्तमः		पंचमः । प ।

(क्रुष्टः) तद्योसौ क्रुष्टतम इव साम्नः स्वरस्तं देवा उपजीवन्ति । । प ।
१ योऽवरेषां प्रथमस्तं मनुष्या उपजीवन्ति । म ।
२ यो द्वितीयस्तं गन्धर्वाप्सरसः उपजीवन्ति । ग ।
३ यस्तृतीयस्तं पशवः (वृषभः, ऋषभः) उपजीवन्ति । रे ।
४ यश्चतुर्थस्तं पितरो ये चाण्डेषु शेरते । स ।
५ यः पंचमस्तमसुररक्षांसि (निषादः) उपजीवन्ति । नि ।
(अन्त्यः) योऽन्त्यस्तमोषधयो वनस्पतयश्चान्यज्जगत् (सामविधान ब्राह्मणे) । ध ।

सामगायनाचें हें स्वरमण्डल आहे. उद्गाते या स्वरमंडलामध्यें आपलें सामगायन करतात. आतां सहा सामविकार होतात ते हे आहेत. विकार, विश्लेषण, विकर्षण, अभ्यास, विराम, स्तोभ हे सहा विकार आहेत.

१ विकार- " अग्ने " याचें " ओग्नायि " असें होतें.
२ विश्लेषण- " वीतये " याचें " वोयि तोया २यि " होतें.
३ विकर्षण- " ये " याचें " या२३यि " असें होतें.
४ अभ्यास- म्हणजे पुनः पुनः उच्चारण, जसें " तोया२यि । तोया२यि " असें.
५ विराम- जसें " गृणानो हव्यदातये " याचें " गृणानोह् । व्यदातये " असें होतें. येथें " गृणानोह् व्यदातये " हें पद नसतांहि गायनाच्या सौकर्यासाठीं शब्दाच्या मध्येंच तें तोडलें जातें. याला " विराम " असें म्हणतात.
६ स्तोभ- ऋचेमध्यें नसलेलीं अक्षरें उच्चारणें जसें " औ होवा । हाऊ " इत्यादि ।

या सामविकारांनीं वाढवलेलें सामगायन पूर्वी सांगितलेल्या स्वरमंडलामध्यें गाईलें जातें. यासाठीं सामवेद हा गायनमय आहे, केवळ मंत्रमय नाहीं, असें समजलें जातें.

सामवेद हा गानरूप आहे हें खरें आहे. पण या पुस्तकाच्या रूपानें अनुवाद व स्पष्टीकरणासह जो सामवेद वाचकांच्या पुढें ठेवला जात आहे तो केवळ ऋचांचा संग्रहरूपच आहे. यांत एकही सामगान नाहीं. ज्या मंत्रांवरून सामगानें होतात ते हे गानयोनि मंत्र आहेत. " गान-योनि-मंत्र " म्हणजे ज्या मंत्रांवरून सामगानें बनतात, ते मंत्र होत. अर्थात् सामवेदाचे हे मंत्र गावयाचे नाहींत. या मंत्रांवरून जीं सामगानें बनवलीं आहेत, तीं गावयाचीं आहेत. किंवा जर कोणी तीं गानें यांपेक्षां अधिक बनवलीं, तर तींहि गाइलीं जातील. पूर्वीच्या ऋषिनीं या योनिमंत्रांवरून हजारों गानें बनवलीं आहेत. तीं सध्यां सामगानें म्हणून गाइलीं जातात.

सामवेदाचे १८७५ मंत्र आहेत. त्या मंत्रांवरून सरासरी ४००० सामगानें बनवलेलीं प्रसिद्ध आहेत. " कौथुमी " शाखेचा सामवेद हा आहे व याचीं हीं सामगानें चार हजार आहेत. दुसरी सामवेदाची शाखा ' राणायणी. " या शाखेचा सामवेद दुसरा आहे व त्याचींहि अशींच ४००० सामगानें निराळीं आहेत. असे सामवेद अनेक आहेत व त्यांचीं सामगानेंही अनेक आहेत. हीं सामगानें ज्या ऋषींनीं बनवलीं त्यांच्या नांवांनींच तीं आजपर्यंत प्रसिद्ध आहेत. जसें " गोतमस्य पर्क, कश्यपस्य बार्हिषं " इत्यादि. हीं सर्व " ग्रामगान, आरण्यकगान, ऊहगान, उह्यगान " आदि प्रकरणांच्या नांवांनीं सर्वांस माहित आहेत.

ऋग्वेदाचेच मंत्र सामवेदामध्यें संग्रहीत केलेले असतात. " या ऋक् तत्साम (छां. उ. १।३।४) यांत स्पष्टपणानें सांगितलें आहे कीं " जी ऋचा आहे तेंच साम आहे. " ऋचा म्हणजे पादबद्ध-चरणयुक्त-मंत्र. त्यांचाच संग्रह सामवेदामध्यें केलेला आहे. ऋग्वेदामध्यें सर्व मंत्र पादबद्धच आहेत, म्हणून त्यांना ऋक्-ऋचा-असें म्हणतात. हेच मंत्र सामवेदामध्यें एकत्रित केलेले आहेत. या आश्वलायन ऋग्वेदामध्यें

मिळत नाहींत असे सुमारें ६० मंत्र या सामवेदामध्यें आहेत, ते मंत्र शांख्यायन ऋग्वेदामधून घेतलेले आहेत. या सर्व स्पष्टीकरणाचें तात्पर्य हेंच आहे कीं सामवेद हा ऋग्वेदांतील मंत्रांचा संग्रहच आहे. आज सामवेदामध्यें जे मंत्र आहेत, त्यांशिवाय जे ऋग्वेद व अथर्ववेदामध्यें पादबद्ध मंत्र आहेत, तेही सामगानासाठीं घेतां येणें शक्य आहे. अर्थात् जेवढे म्हणून पादबद्ध मंत्र आहेत, त्या सर्व मंत्रांवरून सामगानें बनूं शकतात व ते साममंत्र म्हणून गातां येतात. आजचा सामवेद आहे तेवढाच सामगायनांचा वेद आहे असें म्हणणें योग्य नाहीं.

मंत्र व सामगान

ऋग्वेदाचे मंत्र सामवेदामध्यें संग्रहित केलेले आहेत व यांचीं सामगानें बनलेलीं आहेत. याचें आपण उदाहरण येथें पाहूं—

ऋग्वेदचा मंत्र—

अग्न आयाहि वीतयें गृणानो हव्यदातये ।
नि होता सत्सि बर्हिषि ॥ (ऋ ६।१६।१०)

सामवेदचा मंत्र (सामयोनिः)

२ ३ १ २ ३ १ २ ३ २ ३ १ २
अग्न आ याहि वीतये गृणानो हव्यदातये ।
१ २र ३ २ २
नि होता सत्सि बर्हिषि ॥ (साम. १।१।१।१)

या सामवेदाच्या मंत्रावरून जीं सामगानें झालीं आहेत तीं हीं आहेत—

(१) गोतमस्य पर्कम् ।

ओग्नाइ । आयाहीऽ३ । वोइतोयाऽ२इ ।
तोयाऽ२इ । गृणाना ह । व्यदातोयाऽ२इ ।
तो याऽ२इ । नाइ होतासाऽ२३ । त्साऽ२इ ।
वाऽ२३४ औहो वा । हीऽ२३४षी ॥ १ ॥

(२) कश्यपस्य बार्हिषम्—

अग्न आयाहि वी । तयाऽ२ । गृणानो हव्यदाताऽ
२३याइ । नि होता सत्सि बर्हाऽ२३इषी । बर्हाऽ२
इषाऽ२३४ औ होवा । बर्हीऽ३षीऽ२३४५ ॥२॥

(३) गोतमस्य पर्कम् ।

अग्न आयाहि । वाऽ५इतयाइ । गृणानो हव्य-
दाऽ१ ताऽ३ये । नि होताऽ२३४सा । त्साऽ
२३४ इवाऽ३ । हाऽ२३४ इषोऽ६हा ३ ।

येथें प्रथम ऋग्वेदाचा एक मंत्र दिला आहे. तोच मंत्र सामवेदामध्यें गाण्यासाठीं घेतलेला आहे. येथें सामवेदामध्यें अक्षरांवर जे अंक आहेत ते अंक उदात्त, अनुदात्त आदि स्वर भेद दाखवणारे आहेत. ऋग्वेदामध्यें जे स्वर खालीं व वर आहेत. तेच स्वर दाखवण्यासाठीं सामवेदामध्यें अंक दिलेले आहेत. हे अंक उदात्तानुदात्त स्वराचे बोधक आहेत. हे गाण्याचे स्वर दाखवणारे अंक नाहींत. जेथें ऋग्वेदामध्यें अक्षराच्या खालीं स्वर आहे, तो अनुदात्त स्वर दाखवतो, त्यासाठीं सामवेदामध्यें ३ हा अंक उपयोगांत आणलेला आहे. तसेंच ऋग्वेदामध्यें अनुदात्ताच्या पुढें उदात्त स्वर येतो, त्याला ऋग्वेदामध्यें कांहीं चिन्ह नाहीं, तो १ या अंकानें सामवेदामध्यें दाखवला जातो. ऋग्वेदामध्यें तिसऱ्या स्वरित स्वराचें उभी रेषा हें चिन्ह आहे. तें सामवेदामध्यें २ या अंकानें दाखवलें जातें. पहा—

अग्न आ याहि वीतये
२ ३ १ २ ३ १ २
अग्न आ याहि वीतये
उ अ उ स्व प्र अ उ स

" उ "– उदात्त, " अ "– अनुदात्त, " स्व "– स्वरित, " प्र "– प्रचय " स "– सन्नतर हे स्वर आहेत व हे वर खालीं रेषा देऊन ऋग्वेदामध्यें दाखवतात व सामवेदामध्यें तेच स्वर अंकांनीं दाखवतात. चिन्हांमध्यें फरक असला तरी उच्चारणामध्यें कांहीं फरक नाहीं. सामवेदांतील अंक गायनस्वरांचे अंक नव्हेत हें येथें लक्ष्यांत ठेवणें योग्य आहे. सामगानांमधील अंक मात्र गायनांतील सप्त स्वरांचे बोधक आहेत.

वर गौतमाचीं दोन व कश्यपाचें एक अशीं तीन सामगानें दिलीं आहेत. हीं सामगानें तान आलाप वगैरे गानस्वरांमध्यें गाइलीं जातात. अर्थात् हा सामवेद गानांची उत्पत्ति करणाऱ्या मंत्रांचा संग्रह आहे. यावरून बनलेल्या सामगानांचा संग्रह याहून दुसरा आहे. या सामयोनिमंत्रांचा अर्थ, भावार्थ व स्पष्टीकरण होऊं शकतें. गानांचें अर्थ, भावार्थ व स्पष्टीकरण वगैरे कांहीं होणें शक्य नाहीं हें सर्व या विवरणावरून वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल.

सामगायनाचे अनेक भेद

" सहस्रवर्त्मा सामवेदः " असें पतंजलीनें आपल्या व्याकरण महाभाष्यांत सांगितलें आहे. हे गायनाचे हजारों प्रकार आहेत. गाणारा उत्तम गायक झाल्यानंतर आपला गायनाचा थाट नवा तयार करतो, आपली पद्धति नवी तयार करतो. असे अनेक उत्तम गायक झाले तर त्यांचे अनेक मार्ग बनतात. ते मार्ग " सहस्रवर्त्मा " शब्दानें दाखवले आहेत. गाण्याचे हे मार्ग आहेत. हे मार्ग वर दिलेल्या " गोतमस्य पर्क, कश्यपस्य बार्हिषं " आदि नांवांनीं दाखवले आहेत. गोतमाची सामगानाची पद्धति निराळी व कश्यपाची निराळी. असे जितके ऋषि असतील तितक्या गायनांच्या पद्धति निरनिराळ्या होऊं शकतील.

सामवेदाच्या शाखा

सामगानाचे प्रकार अनेक असल्यामुळें त्याच्या शाखाहि पुष्कळ आहेत आणि अति प्राचीनकाळापासून या अनंत शाखांचें प्रचलन होत आलें आहे. चरणव्यूहांत शाखांसंबंधीं असें लिहिलें आहे—

१ तत्र सामवेदस्य शाखासहस्रं आसीत्।

२ राणायणीयः, सात्यमुख्याः, कालापः, महाकालापः, कौथुमाः, लांगलिकाश्चेति । कौथुमानां षड् भेदाः भवन्ति-सारायणीयाः, वातरायणीयाः, वैधृताः, प्राचीनाः, तैजसा, अनिष्टकाश्चेति ।

अशारीतीनें सामगानाचे प्रथम हजार प्रकार होते, पण ते सर्व हळूहळू नष्ट होत गेले आणि आतां केवळ त्याचे २-३ च प्रकार उपलब्ध आहेत आणि उत्तम सामगान करणारे तर हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आहेत. दक्षिण भारतांत विशेषतः म्हैसूरच्या बाजूला थोडेसे राहिले आहेत.

सामवेदाच्या तेरा शाखा आहेत, असें " साम-तर्पण विधि " मध्यें सांगितलें आहे. त्या तेरा शाखांचीं नावें हीं आहेत—

१ राणायण, २ शाट्यमुग्य्य, ३ व्यास, ४ भागुरि, ५ औलुण्डी, ६ गौल्गुलवी, ७ भानुमान-औपमन्यव, ८ काराटि, ९ मशक गार्ग्य, १० वार्षगव्य, ११ कुथुम, १२ शालिहोत्र, १३ जैमिनी ।

या तेरा शाखांपैकीं सध्यां " राणायणी, कौथुमी व जैमिनीय " या तीन शाखाच उपलब्ध आहेत. चरणव्यूहामध्यें सामवेदाच्या हजार शाखा आहेत असें जें म्हटलें आहे, तें माननीय नाहीं असें बंगालचे महाविद्वान् सत्यव्रत सामश्रमी यांनीं सिद्ध करून दाखवलें आहे. पुराणांमध्यें आणखी कांहीं सामशाखांचीं नावें सांपडतात, त्यांचा विचार संशोधकांनीं करणें योग्य आहे.

या शाखांमध्यें गानांमध्यें पुष्कळ भेद आहेत, जसें—

कौथुमी	राणायणी
हाउ	हावु
राइ	रायि
वाजेषु नो	वाजेषु णो

असे पाठभेद या शाखांच्या सामगानांमध्यें आढळतात. पण मूळ संहितापाठामध्यें फारसा पाठभेद नाहीं.

सामवेदामध्यें वालखिल्य मंत्रांपैकीं कांहीं मंत्र आलेले आहेत, त्यावरून असें दिसतें कीं, वालखिल्य मंत्रांचा समावेश ऋग्वेदामध्यें झाल्यानंतर या सामवेदाचा मंत्रसंग्रह झाला आहे. " वेदानां सामवेदोऽस्मि " या श्रीमद्भगवद्गीतेच्या वचनावरून असें म्हणावें लागतें कीं, सामवेदाचें असें विभूतिमत्त्व गीता महाभारतांत संग्रहित होण्यापूर्वी थोरांनीं स्वीकारलें होतें. या सामवेदामध्यें जवळ जवळ १०५ मंत्र असे आहेत कीं जे या ऋग्वेदाच्या शाकल संहितेमध्यें मिळत नाहींत, ते ऋग्वेदीय शांख्यायन संहितेंत आहेत असें पुष्कळांनीं मानलें आहे, तें संशोधनपूर्वक पाहिलें पाहिजे.

ऋग्वेदामध्यें सामाचा उल्लेख

ऋग्वेदामध्यें सामाचा अनेकवेळां उल्लेख आलेला आहे, पहा—

१ अंगिरसां सामभिः स्तूयमानाः (देवाः) ।
(ऋ. १।१०७।२)

२ अंगिरसो न सामभिः । (ऋ. १०।७८।५)

३ उभौ वाचौ वदति सामगा इव गायत्रं च त्रैष्टुभं चानुराजति ।

४ उद्गातेव शकुने साम गायसि ब्रह्मपुत्र इव सवनेषु शंससि । (ऋ. २।४३।१-२)

" तो पक्षी साम गाणाऱ्याप्रमाणें गायत्री व त्रिष्टुप् या दोनही वृत्तांतील सामें गातो व त्यामुळें तो शोभतो. हे शकुनी पक्ष्या ! तूं उद्गात्याप्रमाणें साम गायन करतोस. तूं ब्रह्मपुत्राप्रमाणें यज्ञाच्या सवनांमध्यें गातोस. " या मंत्रांत शकुनि हा पक्षी सामगायकाप्रमाणें गातो, असें म्हटलें आहे.

५ यो जागार तमु सामानि यन्ति ।
(ऋ. ५।४४।१४)

" जो जागृत असतो त्याच्याजवळ सामें येतात." तसेंच—

६ तमेव ऋषिं तमु ब्रह्माणमाहुः यज्ञन्यं सामगां उक्थशासम् । (ऋ. १०।१०७।६)

" त्यालाच ऋषि, त्यालाच ब्रह्मा, त्यालाच यज्ञ करणारा, सामगायक व स्तोत्रें म्हणणारा म्हणतात. "

७ उपगासिषत् श्रवत्साम गीयमानम् । (ऋ. ८।८१।५)

८ यूयं ऋषिं अवथ सामविप्रम् । (ऋ. ५।५४।१४)

" सामगायन करा, गाइलेलें सामगान तो ऐकू दे. सामगायन करण्यांत जो कुशल ब्राह्मण आहे, त्या ऋषिचें तुम्ही रक्षण करा. "

९ एतो न्विन्द्रं स्तवाम शुद्धं शुद्धेन साम्ना । (ऋ. ८।९५।७)

१० इन्द्राय साम गायत विप्राय बृहते बृहत् । (ऋ. ८।९८।१)

" हे इन्द्रा ! शुद्ध साम गाऊन तुझी आम्ही स्तुति करीत आहों. ज्ञानी मोठ्या इन्द्राला बृहत् नांवाचें साम गाऊन दाखवा. "

११ बृहस्पतिः सामभिः ऋक्वो अर्चतु । (ऋ. १०।३६।५)

१२ अर्चन्त एके महि साम मन्वत । (ऋ. ८।२९।१०)

" सामगायनानें सुपूजित झालेला बृहस्पति पूजिला जावो. कांहीं मोठ्या सामाचें अर्चन करतात. "

१३ आंगूष्यं शवसानाय साम । (ऋ. १।६२।२)

१४ ऋतस्य सामन् रणयन्त देवाः (ऋ. १।१४७।१)

१५ गायत्रेण प्रति मिमीते अर्कं अर्केण साम त्रैष्टुभेन वाकम् । (ऋ. १।१६४।२४)

१६ ये न परः साम्नो विदुः । (ऋ. २।२३।१६)

" महा बलवान् इन्द्रासाठीं आंगूष्य सामाचें गायन करा. यज्ञांतील सामगायन ऐकून देव आनंदित झाले. गायत्रानें अर्क बनवतात, अर्कानें साम व त्रैष्टुभानें वाणी उत्तम होते. ते सामापेक्षां अधिक श्रेष्ठ दुसरें कांहीं आहे असें समजत नाहींत.

१७ त्वष्टाजनत् साम्नः साम्नः कविः । (ऋ. २।२३।१७)

१८ साम कृण्वन् सामन्यो विपश्चित् क्रन्दन्नेति । (ऋ. ९।९६।२२)

१९ परायतो न साम तद्यत्रा रणन्ति धीतयः । (ऋ. ९।१११।२)

२० स हि द्युता विद्युता वेति साम । (ऋ. १०।९९।२)

२१ तस्मात् यज्ञात् सर्वहुतः ऋचः सामानि जज्ञिरे । (ऋ. १०।९०।९)

" त्वष्ट्यानें सामांचा ज्ञानी तुला बनवलें आहे. सामें निर्माण करीत सामगायनामध्यें मोठा ज्ञानी गायन करीत पुढें होतो. सामगायन जसें दुरून ऐकलें जातें, त्याप्रमाणें ज्ञानीलोक स्तोत्रें मोठ्यानें म्हणतात. तो इन्द्र प्रकाशमान् विद्युल्लते-समान आयुध घेऊन साम ऐकण्यासाठीं येतो. त्या सर्वहुत यज्ञापासून ऋचा व सामें झालीं. "

२२ अशीतिभिः तिसृभिः सामगेभिः इष्टापूर्तं अवतुः नः । (अथर्व. २।१२।४)

२३ ऋचं साम यजामहे याभ्यां कर्माणि कुर्वते । (अथर्व. ७।५४।१)

२४ बृहतः परिसामानि षष्ठात् पंचाधि निर्मिता । (अ. ८।९।४)

२५ षड् सामानि षडहं वहन्ति । (अ. ८।९।१६)

२६ सामानि यस्य लोमानि । (अ. ९।६।२)

" ऐंशीच्या तिप्पट सामगायकांसह आमचें इष्टापूर्त आमचें रक्षण करो. ऋचा व साम यांनीं आम्हीं यजन करतों, ज्यांनीं आम्हीं कर्में करीत आहों, सहाव्या बृहत्‌वरून पांच प्रकारचीं सामें आम्ही बनवलीं आहेत. सहा सामें सहा दिवसांच्या यज्ञाला चालवतात. सामें हीं ज्याचे लोम आहेत. "

२७ सपत्नह ऋक्संशितः सामतेजाः । (अ. १०।५।३०)

२८ यत्र ऋषयः प्रथमजा ऋचः साम यजुर्मही । (अ. १०।७।१४)

२९ साम्ना ये साम संविदुः अजस्तद्दृशे क्व । (अ. १०।८।४१)

३० वशा समुद्रे प्रानृत्यत् ऋचः सामानि बिभ्रती । (अ. १०।१०।१४)

३१ ब्रह्मणा परिगृहीता साम्ना पर्यूढा । (अ. ११।३।१५)

" सपत्नांचें हनन करणारा, ऋचांनीं तीक्ष्ण केलेला व सामांनीं तेजस्वी बनवलेला तो आहे. ज्यामध्यें प्रथम जन्मलेले ऋषि, ऋचा, साम, यजु व पृथिवी हे आश्रय करतात. सामानें

जे साम नीटपणानें जाणतात. ते त्या अजन्म्याला कोठें बरें पाहतात ? वशा (गाय) ऋचा व सामें धारण करून भव-समुद्रांत नृत्य करूं लागली. ब्रह्मानें चारहि बाजूंनीं ती पकडलेली व सामांनीं ती घेरली गेली होती. "

३२ ऋक्सामयजुरुच्छिष्ट उद्गीथ प्रस्तुतं स्तुतम् ।
उच्छिष्टे स्वरसाम्नो मेडिश्च तन्मयि ॥
(अ. ११।७।५)

३३ ऋचः सामानि छन्दांसि पुराणं यजुषा सह ।
(अ. ११।७।२४)

३४ शरीरं ब्रह्म प्राविशत् ऋचः सामाथो यजुः ।
(अ. ११।८।२३)

३५ ब्रह्माणो यस्यामर्चन्ति ऋग्भिः साम्ना यजुर्विदः ।
(अथ. १२।१।३८)

३६ तमृचश्च सामानि च यजूंषि च ब्रह्म चानु-व्यचलन् । (अथ. १५।६।८)

३७ ऋचां च वै स साम्नां च यजुषां च ब्रह्मणश्च प्रियं धाम भवति । (अथ. १५।६।९)

" ऋचा, साम, यजु, उद्गीथ, प्रस्ताव, स्तोत्र, स्वर, सामाचे आलाप उच्छिष्टामध्यें असतात, ते माझ्यामध्यें येवोत. ऋचा, साम, छन्द व पुराणें यजुर्वेदासह उच्छिष्टा-पासून उत्पन्न झालीं आहेत. ऋचा, साम व यजु हें ब्रह्मज्ञान शरीरामध्यें प्रविष्ट झालें आहे. ज्या भूमिवर ऋचा सामें व यजु जाणणारे ब्राह्मण यज्ञकर्मे करीत असतात त्यांच्यामागून ऋचा, साम, यजु व ब्रह्म चालले. तो ऋचा, सामें, यजु व ब्रह्म यांचें प्रिय धाम होतो. "

या मंत्रांमध्यें ऋचा, यजु, साम व ब्रह्म हे चार वेदांचे वाचक शब्द आलेले आहेत. यांपैकीं कांहीं मंत्रामध्ये हे वेदांचे वाचक आहेत, तर पुष्कळ मंत्रांमध्यें हे शब्द त्या त्या वेदांच्या मंत्रांचेही वाचक आहेत. आपला प्रस्तुतचा विषय सामवेद व सामगान हा आहे. वरील मंत्रांमध्यें कांहीं ठिकाणीं सामवेद असा अर्थ आहे.

तस्माद्यज्ञात्सर्वहुतः ऋचः सामानि जज्ञिरे ।
(अथ. १९।६।१३; ऋ. १०।९०।९; यजु. ३१।७)

सामानि यस्य लोमानि... स्कंभं तं ब्रूहि ।
(अथ. १०।७।२०)

ऋचः सामानि छन्दांऽसि... उच्छिष्टाज्जज्ञिरे सर्वे।
(अथ. ११।७।२४)

इत्यादि मंत्रांमध्यें " सामानि " हें पद सामवेदाचें वाचक आहे असें दिसतें; व बाकीच्या मंत्रांमध्यें सामगायनाचीं बोधक ' साम किंवा सामानि ' हीं पदें आहेत. या मंत्रां-वरून असें स्पष्ट दिसतें कीं ऋचांच्या आधारानें सामगायन करण्याची पद्धति या वैदिककालामध्यें चालू होती व साम-वेदही बनला होता. यज्ञामध्यें जे ऋग्वेदाचे मंत्र गाइले जात असत त्यांचा संग्रह हा सामवेद होय. सामवेदाच्या अनेक शाखा प्रचलित होत्या व त्यांच्या संहिताही निरनिराळ्या बनल्या होत्या. पण सर्व सामवेदाचे मंत्र ऋग्वेदामधूनच घेतलेले होते. एका शाखेच्या सामवेदाचा क्रम एक असला, तर दुसऱ्या शाखेच्या सामवेदाचा क्रम दुसरा असेल, तरी सर्व मंत्र ऋग्वेदाचेच असत; म्हणून म्हटलें आहे कीं ' या ऋक् तत् साम ' जी ऋचा असते, म्हणजे जो मंत्र चरण-बद्ध असतो त्याचें सामगायन होतें.

ऋग्वेदमंत्रांत सामगायनाचीं नावें " वैरूपं, बृहत्, गौरवीति, रैवतं, अर्कं, गायत्रं, श्लोकं, भद्रं " इत्यादि आलेलीं आहेत. याप्रमाणें अथर्ववेदाच्या मंत्रांतही हीं साम-गायनांचीं नावें आढळतात. यजुर्वेदामध्यें रथन्तरं(वा. यजु. १०।१०); बृहत् (य. १०।११); वैरूपं (य. १०।१२); वैराजं (य. १०।१३); वैखानसं, वामदेव्यं, यज्ञाय-ज्ञियं (य. १२।४); शाक्वरं, रैवतं (य. १०।४); गायत्रं, गौरिवीतं, अभीवर्तं, क्रोशं, सत्रस्यर्धि, प्रजापते-र्हृदयं, श्लोकं, अनुश्लोकं, भद्रं, राजन्, अक्यं, इलान्दं, इत्यादि सामगायनाचीं नावें आलेलीं आहेत.

ऐतरेय ब्राह्मणामध्यें ' बृहत् , रथन्तरं, वैरूपं, वैराजं, शाक्वरं, रैवतं, गायत्रं, श्यैतं, नोधसं, रौरवं, यौधा-जयं, अग्निष्टोमीयं, भासं, विकर्ण " इत्यादि नांवें दिसतात.

हीं नांवें त्या त्या सामगायनाचें विशिष्टत्व दाखवीत आहेत. गानपद्धतिचा विशेष या नांवांनीं दाखविला जातो. ऋग्वेद, यजुर्वेद व अथर्ववेद यांमध्यें हीं नावें आहेत. त्यावरून या सामगायनांनीं देवांची उपासना केली जात होती हें निश्चित होय. यज्ञामध्यें सोमरस काढून, तो पाण्यांत मिसळून गाळून, दुधाशीं मिसळून तो पिण्याजोगा होईपर्यंत सामगायन चालत असें व तें दूरून ऐकूं जाईल इतकें मोठ्यानें चाले. तेव्हां सामगायन उत्तम रीतिनें गाईलें जात असें यांत शंकाच नाहीं. तात्पर्य सामगायन फार अलीकडचें आहे असें जें कित्येकांनीं प्रतिपादन केलें आहे, त्यांत कांहीं तथ्यांश दिसत नाहीं.

सामवेदाची स्वरगणना

सामवेदाची स्वरगणना अत्यंत उत्तम करण्यांत आली आहे. तितकी काळजीपूर्वक गणना कोणीहि इतर ठिकाणीं केली असल्याचें दिसत नाहीं. ही गणना कशी आहे ती पहा—

रेवतीर्नः सधमाद इन्द्रे सन्तु तुविवाजाः ।
क्षुमन्तो याभिर्मदेम ॥ १ ॥ १०८४

आ घ त्वावान् त्मना युक्तः स्तोतृभ्यो धृष्णवीयानः । ऋणोरक्षं न चक्र्योः ॥ २ ॥ १०८५

आ यद् दुवः शतक्रतवा कामं जरितॄणाम् ।
ऋणोरक्षं न शचीभिः ॥ ३ ॥ १०८६

यांत स्वर चिन्हें नसलेलीं अक्षरें हीं आहेत —

१०८४– र्नः । स । स । न्तु ।

१०८५– धृ । ष्ण । वि । र ।

१०८६– य । दु । श । त । क्र । का । ज । रि । र । श ।

४+४+१०= १८ अक्षरें स्वरचिन्हरहित आहेत. हीं " घा १८ " अशीं दाखवलीं आहेत. यांत लक्ष्यांत ठेवावयाचें हें आहे कीं मंत्रांच्या शेवटचीं स्वरचिन्हरहित अक्षरें मोजण्यांत येत नाहींत. प्रथम मंत्राच्या शेवटीं " जाः । म " हीं दोन व तिसऱ्या मंत्राच्या शेवटीं " भि " हें अक्षर अशीं तीन अक्षरें, तीं शेवटीं असल्यामुळें मोजण्यांत आलेलीं नाहींत. तसेंच " म् " हें व्यंजन असल्यामुळें घेतलें नाहीं. तात्पर्य तीन मंत्रांत १८ अक्षरें स्वरचिन्ह नसलेलीं आहेत.

या तीन मंत्रांत उकार चिन्हाचीं अक्षरें दोन आहेत. द्वितीय व तृतीय मंत्रांत ' णो ' हेंच अक्षर दोनदां आलेलें आहे, तें ' उ २ ' याप्रमाणें दाखवलें आहे.

रकाराचे चिन्ह ज्यांच्यावर आहे अशीं चार अक्षरें या तीन मंत्रांत आहेत. तीं ' वः । मं । चीं । ' हीं तीन तिसऱ्या मंत्रांत आहेत व द्वितीय मंत्रांत ' क्र्योः ' हें एक आहे, मिळून चार अक्षरें रकार चिन्हांचीं आहेत. हीं ' स्व० ४ ' या संकेतानें दाखवलीं आहेत.

इतकी सूक्ष्मदृष्टीनें ही स्वर गणना केली असल्यानें सामगायनामध्यें स्वरांचा दोष होणें शक्य नाहीं. ही गणना सामगायकांनीं समजून घ्यावी व ती लक्ष्यांत ठेवावी.

सामवेदाचे गानग्रंथ

सामवेद संहितेमध्यें मूलमंत्र ऋग्वेदामधून घेतलेले संगृहित केलेले आहेत. ऋषिनीं त्या मंत्रांच्या आधारानें जीं सामगानें तयार केलीं त्यांचे गानग्रंथ हे बनले आहेत. (१) ग्रामगेय गान किंवा गेयगान अथवा प्रकृतिगान, (२) आरण्यक (गेय) गान, (३) ऊहगान, (४) उह्यगान किंवा रहस्यगान हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. या गानग्रंथांमध्यें किती मंत्र व किती गानें आहेत तीं पहा—

	कौथुमी शाखामंत्र	जैमिनीयशाखामंत्र
पूर्वार्चिक	५८५	५८७
आरण्यक	५९	५९
उत्तरार्चिक	१२२५	१०४१
	१८६९	१६८७
महानाम्नि	६	६
	१८७५	१६९३

यावरून दिसून येईल कीं प्रत्येक शाखेच्या सामवेदामध्यें मंत्रसंख्या व मंत्रक्रम यांत भिन्नता व न्यूनाधिकता आहे. आतां या मंत्रांवरून जीं गानें बनलीं आहेत, त्यांची संख्या पहा—

	कौथुमीय गानें	जैमिनीय गानें
ग्रामगेयगानें	११९७	१२३२
आरण्यकगेयगानें	२९४	२९१
ऊहगानें	१०२६	१८०२
उह्यगानें	२०५	३५६
	२७२२	३६८१

कौथुमी शाखेच्या सामवेदामध्यें मंत्र १८७५ आहेत, पण गानें २७२२ बनवलीं गेलीं आहेत. जैमिनीय शाखेच्या सामवेदामध्यें मंत्र १६९३ आहेत, पण गानें ३६८१ आहेत. असा प्रत्येक शाखेच्या सामवेद मंत्रसंख्येमध्यें व गानसंख्येमध्यें भेद आहे. हा असा भेद सर्व शाखांच्या संहितामध्यें आहे.

सामवेदाचीं ब्राह्मणें

(१) ताण्ड्य ब्राह्मण, (प्रौढ अथवा पंचविंश ब्राह्मण), (२) षड्विंश ब्राह्मण, (३) सामविधान ब्राह्मण, (४) आर्षेय ब्राह्मण, (५) देवताध्याय

ब्राह्मण, (६) उपनिषद्ब्राह्मण, (संहितोपनिषद् ब्राह्मण अथवा मंत्र ब्राह्मण,) (७) वंश ब्राह्मण इत्यादि ब्राह्मणें सामवेदाचीं प्रसिद्ध आहेत.

षड्विंश ब्राह्मण हें ताण्ड्य ब्राह्मणाचाच २६ वा भाग आहे. यासाठीं पहिला भाग " पंचविंश ब्राह्मण " या नांवानें प्रसिद्ध आहे व उत्तर भाग " षड्विंश ब्राह्मण " या नांवानें प्रसिद्ध आहे. पंचविंश ब्राह्मण, षड्विंश ब्राह्मण व छांदोग्य उपनिषद् मिळून " ताण्ड्य महाब्राह्मण " होतें. षड्विंश ब्राह्मणामध्यें अद्भुत कथांचा संग्रह असल्यामुळें त्याला " अद्भुतब्राह्मण " असेंहि म्हणतात. सामवेदाच्या अन्य ब्राह्मणांना " अनु ब्राह्मण " असेंहि दुसरें नांव आहे. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणामध्यें " केनोपनिषद् " आहे. या जैमिनीय शाखेचें दुसरें नांव " तलवकार शाखा " असें आहे. म्हणून तलवकारीय केनोपनिषद् असें या उपनिषदाला म्हणतात.

सामवेदाचे सूत्रग्रंथ

(१) मशककल्पसूत्र, (२) क्षुद्रसूक्त, (३) लाट्यायन श्रौतसूत्र, (४) गोभिलीय गृह्यसूत्र, राणायनीय शाखेचीं (१) द्राह्यायण श्रौतसूत्र, (२) खादिरगृह्यसूत्र, (३) पुष्पसूत्र हीं सूत्रें आहेत. पुष्पसूत्र हें सामवेदाचें " प्रातिशाख्य " म्हणून प्रसिद्ध आहे.

वेदमंत्रांच्या अर्थासंबंधीं

वेदमंत्रांच्या अर्थासंबंधीं पुष्कळ मतभेद उत्पन्न झाला आहे. वास्तविक वेदाची आपली स्वतःची अशी प्रक्रिया आहे. ती प्रक्रिया ध्यानांत ठेवली असतां मतभेद उत्पन्न होण्याचें कांहीं एक कारण नाहीं. प्रथमतः वेदमंत्रानेंच सांगितलें आहे कीं सत्य वस्तु एक आहे व कवींनीं त्याच वस्तुचे अनेक गुण पाहून त्या एका सत्य वस्तुला अनेक नांवें दिलीं आहेत. पहा —

> इन्द्रं मित्रं वरुणं अग्निमाहुः अथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् । एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति अग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥ (ऋ. १।१६४।४७)

" (एकं सत्) एकच सद्वस्तु आहे, (विप्राः बहुधा वदन्ति) ज्ञानीलोक अनेक नांवें देऊन त्या एका सद्वस्तुचेंच वर्णन अनेक प्रकारें करतात. त्या एका सद्वस्तुलाच ते ज्ञानी इन्द्र, मित्र, वरुण, अग्नि, दिव्य, सुपर्ण, गरुत्मान्, यम, मातरिश्वा आदि नांवें देतात व अनेक प्रकारें वर्णन करतात. "

या मंत्रानें वेदाच्या प्रक्रियेचें अगदीं यथार्थ वर्णन केलें आहे. अर्थात् अग्नि, वायु, इन्द्र, यम आदि नांवें त्या एका परमेश्वराचीं आहेत व त्याचे गुण या नांवांनीं वर्णिले आहेत.

मंत्र अग्निदेवतेचे असोत वा इन्द्र देवतेचे असोत, त्या मंत्रांचा मुख्य भाव परमात्मापरक आहे हें येथें लक्ष्यांत ठेवणें योग्य आहे. अग्निला " विश्ववेदाः " म्हटलेलें आहे. " विश्ववेदाः " म्हणजे " सर्वज्ञ. " अग्नि हा सर्वज्ञ नसून " परमात्मा सर्वज्ञ आहे " हेंच वरील मंत्रानें सांगितलें आहे.

> सर्वे वेदा यत्पदमामनन्ति तपांसि सर्वाणि च यद्वदन्ति । यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत् ते पदं संग्रहेण ब्रवीमि ओम् इत्येतत् ॥
> (कठक उ. २।१५)

" सर्व वेद ज्या पदाचें वर्णन करीत आहेत, सर्व प्रकारचीं तपें ज्याच्यासाठीं केलीं जातात, ब्रह्मचर्य ज्याच्या प्राप्तीच्या इच्छेनें केलें जातें, तें पद कोणतें आहे, तें मी तुला संक्षेपानें सांगतों. ओम् हें तें पद आहे. " म्हणजे ओं पदानें जें सुचविलें जातें, त्या परमात्म्याचें वर्णन सर्व वेद करीत आहेत. सर्व तपश्चर्या त्यासाठीं केल्या जातात व ब्रह्मचर्यही त्यासाठीं आचरण्यांत येतें. हेंच पुढील मंत्रानें प्रतिपादन केलें आहे—

> तदेवाग्निः तदादित्यः तद्वायुः तदु चन्द्रमाः ।
> तदेव शुक्रं तद् ब्रह्म ता आपः स प्रजापतिः ॥
> (यजु. ३२।१)

" (तत् एव अग्निः) तें ब्रह्म अग्नि, आदित्य, वायु, चन्द्रमा, शुक्र, ब्रह्म, आप व प्रजापति पदांनीं वेदमंत्रांमध्यें वर्णिलें आहे. " म्हणजे अग्नि, आदित्य, वायु आदि नांवें जरी निरनिराळीं असलीं, तरी त्या विभिन्न नांवांनीं एका ब्रह्माचेंच वर्णन वेदामध्यें केलेलें आहे. हेंच मैत्रायणी उपनिषदामध्यें अधिक स्पष्ट केलें आहे पहा—

> एष खलु आत्मा ईशानः शंभुर्भवो रुद्रः ।
> प्रजापतिर्विश्वसृड् हिरण्यगर्भः सत्यं प्राणो
> हंसः शान्तो विष्णुः नारायणोऽर्कः सविता
> धाता सम्राड् इन्द्र इन्दुरिति ॥ (मैत्रायणी ५।८)

" हाच आत्मा ईश्वर शम्भु, भव, रुद्र, प्रजापति, विश्वस्रष्टा, हिरण्यगर्भ, सत्य, प्राण, हंस, शान्त, विष्णु, नारायण, अर्क, सविता, धाता, सम्राट्, इन्द्र, इन्दु आदि नांवानें वर्णिला आहे. " या विवेचनावरून स्पष्ट होत आहे कीं अग्नि, इन्द्र

आदि नांवांनीं वेदांमध्यें मुख्यतः एका आत्म्याचें म्हणजे परमेश्वराचें वर्णन केलें आहे. हेंच श्री यास्काचार्य आपल्या निरुक्तामध्यें सांगत आहेत. पहा—

महाभाग्याद्देवतायाः एक आत्मा बहुधा स्तूयते ।
एकस्य आत्मनः अन्ये देवा प्रत्यंगानि भवन्ति ।
...आत्मा एव एषां रथो भवति, आत्मा अश्वः,
आत्मा आयुधं, आत्मा इषवः, आत्मा सर्वं देवस्य
(निरुक्त)

" देवतेच्या मोठ्या भाग्यामुळें, मोठ्या सामर्थ्यामुळें एकच आत्मा अनेक प्रकारांनीं स्तविला जातो. एका आत्म्याचे दुसरे देव हे अंगें होतात. आत्माच यांचा रथ, अश्व, आयुधें, बाण व सर्व आत्माच आहे. "

याप्रमाणें वेदांतील वर्णनाचें तात्पर्य समजलें पाहिजे. वेदमंत्रांमध्यें जें रथ, घोडे वगैरे पदार्थांचें वर्णन आहे, तें सर्व आलंकारिक आहे. आत्म्याची शक्ति फार मोठी आहे व ती त्या त्या रूपामध्यें प्रकट होत आहे असें समजावें.

इन्द्र घोड्यांच्या रथांतून अमुक यज्ञामध्यें गेला असें वर्णन कोठें आढळलें, तर इन्द्र म्हणजे आत्मा तेथें पोंचला हें खरें, पण रथ, घोडे, चाबूक, सारथी हें सर्व त्याच्या शक्तिचें वर्णन आलंकारिक भाषेमध्यें केलेलें आहे असें समजावयाचें आहे. तसेंच आत्मा गेला किंवा आला असें नसून तो सर्वत्र आहेच, यासाठीं तो जातो किंवा येतो हीहि आलंकारिक भाषा आहे.

अध्यात्म, अधिभूत व आधिदैवत

अग्नि, वायु, सूर्य, चन्द्र आदि देव विश्वामध्यें कार्य करीत आहेत. त्यांचें वर्णन वेदमंत्रांमध्यें आहे. हे देव त्या सर्वव्यापक विश्वात्म्याच्या विराट् देहामध्यें त्याचे अवयव बनून राहिलेले आहेत. सूर्य त्याचा डोळा आहे, वायु त्याचा प्राण आहे, पृथिवी त्याचे पाय, अन्तरिक्ष उदर व द्युलोक त्याचें मस्तक आहे. याप्रमाणें हा विराट् पुरुष आहे व त्याचें अवयव अग्नि, वायु, इन्द्र आदि देव आहेत. यावरून लक्ष्यांत येईल कीं वेदमंत्रांमधील अग्नि आदि देवतांचें वर्णन हें निरनिराळ्या देवतांचें वर्णन नसून तें विश्वात्म्या विराट् पुरुषाच्या अवयवांचें वर्णन आहे.

कोणाच्या डोळ्याचें, नाकाचें अथवा छातीचें आपण वर्णन केलें, तर तें त्याच्या एकएका अवयवाचें वर्णन होत नसून, तें त्या पुरुषाचें वर्णन होत असतें. त्याचप्रमाणें अग्नि, वायु, इन्द्र आदि देवतांचें वेदांमधील वर्णन हें त्या त्या देवतेचें पृथक् वर्णन नसून, तें त्या विश्वात्म्या विराट् पुरुषाच्या विराट् शरीराचें वर्णन आहे. यावरून लक्ष्यांत येईल कीं या सर्व देवता त्या विराट् पुरुषाचें एक विराट् शरीरच आहेत. हें विराट् पुरुषाचें वर्णन हें आधिदैवत वर्णन आहे. हें विश्वदेहाचें वर्णन आहे. प्रत्येक देवता या देहांत कोठें विराजत आहे हें समजून घ्यावें व त्या भागाचें तें वर्णन आहे हें जाणावें.

अशा रीतिनें वेदामधील वर्णन आधिदैवत सृष्टीचें वर्णन आहे. आतां या सर्व देवता मानवी देहांतहि अंशरूपानें आहेत—

सर्वा ह्यस्मिन्देवता गावो गोष्ठ इवासते ॥
(अथर्व. ११।८।३२)

" सर्व देवता या मानवी देहामध्यें राहतात, ज्याप्रमाणें गाई गोशालेमध्यें राहतात. " सूर्य नेत्रामध्यें, वायु नाकामध्यें, दिशा कानामध्यें, अग्नि मुखामध्यें, इन्द्र भुजा व छातीमध्यें, चन्द्रमा हृदयामध्यें, अन्तरिक्ष उदरामध्यें, पृथिवी पायांमध्यें, जल शिस्नामध्यें, मृत्यु नाभीमध्यें अशा सर्व देवता मानवशरीरामध्यें अंशरूपानें राहत आहेत व या देवता देहांतील कार्य करीत आहेत. जसें विश्वामध्यें मोठ्या देवतांचें राज्य आहे, अगदीं तसेंच या मानवशरीरामध्यें त्याच देवतांच्या अंशरूप देवांचें राज्य आहे. देव मोठे असोत वा अंशरूप असोत, त्यांच्या देवत्वामध्यें कांहीं फरक होत नाहीं. हें येथें लक्ष्यांत ठेवणें आवश्यक आहे.

दावानल मोठा असतो व त्याची ठिणगी अगदीं लहान असते, पण दोन्हींत अग्निपण सारखेंच असतें. त्याचप्रमाणें अग्नि, इन्द्र आदि विशाल देव विश्वामध्यें आहेत व त्यांचे अंशरूप देवांश शरीरांत आहेत. दोनही ठिकाणीं देवांश सारखेच आहेत. हें समजलें म्हणजे अध्यात्मामध्यें-म्हणजे मानवी शरीरांत तेच देवांश आहेत व अधिदैवतामध्यें तेच देव विशाल-रूपामध्यें आहेत हें कळून येईल व अधिदैवतांतील देवतांचें वर्णन अध्यात्मामध्यें कसें पहावें तें समजून येईल.

व्यक्तिच्या देहामध्यें देवतांचे अंश आहेत. हे गुणरूपानें आपणांस दिसतात. समाज अथवा राष्ट्रांमध्यें तेच गुण मनुष्यांच्या रूपानें दिसतात. हें समजण्यासाठीं खालील कोष्टक दिलें आहे—

अध्यात्मामध्यें	अधिभूतामध्यें	अधिदैवतामध्यें
वाणी	वक्ता	अग्नि
शौर्य	शूर	इन्द्र (विद्युत्)
युद्धेच्छा	सैनिक	मरुत्
प्राण	प्राणी	वायु

अध्यात्मामध्यें	अधिभूतामध्यें	अधिदैवतामध्यें
कारागिरी	कारागीर	त्वष्टा
ज्ञान	ज्ञानी	ब्रह्मणस्पति
चिकित्सा	चिकित्सक व शस्त्रवैद्य	अश्विनौ
पाय	शूद्र	पृथ्वी
रक्तवाहिन्या	नद्या	आप, जलप्रवाह
भाग्य	भाग्यवान्	भग

याप्रमाणें व्यक्तिमध्यें गुणरूपानें, समाजामध्यें गुणीच्या रूपानें व विश्वामध्यें देवतेच्या रूपानें या देवता असतात. त्या तेथें पाहून देवतेचें स्वरूप पाहणें अत्यावश्यक आहे.

वेदमंत्रांमध्यें जें वर्णन आहे तें आधिदेवतामधील वर्णन आहे, हेंच वर्णन अध्यात्मामध्यें - म्हणजे व्यक्तिमध्यें गुणरूपानें पहावयाचें आहे व आधिभौतिकामध्यें अर्थात् समाज, राष्ट्र यांमध्यें गुणी माणसांच्या रूपानें पहावयाचें आहे. हें पाहतां आलें म्हणजे वेदमंत्रांचा अर्थ नीट समजला असें समजतां येईल. हें तीन ठिकाणीं या अर्थाचें स्वरूप कसें पहावयाचें तें विचार करून ठरवावयाचें आहे व मंत्रांतील पदांचे अर्थ या दृष्टीनें पहावयाचे आहेत. उदाहरणार्थ पहा—

इन्द्राचा अर्थ

" इन्द्र " हें पद घ्या. अध्यात्मामध्यें इन्द्र म्हणजे जीवात्मा किंवा आत्मा. या आत्म्याची शक्ति " इन्द्रिय " (इन्द्र+य) इन्द्राची शक्ति दाखवण्यासाठीं हा इन्द्रिय शब्द बनला आहे. " इन्–द्र " या शरीरांत छिद्रें या आत्मशक्तिनें केलीं आहेत. " मी पाहणार " असें यानें म्हणतांच नेत्राच्या ठिकाणीं छिद्र उत्पन्न झालें. मी श्वासोच्छ्वास करणार म्हणतांच नाकाच्या ठिकाणीं छिद्र झालें. अशीं शरीरामध्यें अनेक छिद्रें यानें केलीं. म्हणून " इदं+द्र " हा झाला, त्याचा संक्षेप होऊन " इन्द्र " हें पद बनलें आहे. असा हा इन्द्र अध्यात्मामध्यें आहे. अर्थात् व्यक्तिच्या शरीरांत असलेला इन्द्र होय.

आतां अधिभूतामध्यें म्हणजे समाजामध्यें अथवा राष्ट्रामध्यें इन्द्र हा शूरवीर युद्धासाठीं, राष्ट्राचें स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठीं होत असलेल्या युद्धामध्यें भाग घेणारा अतुल पराक्रमी वीर आहे. हा " इन्–द्र " म्हणजे " शत्रूंचें विदारण करणारा सामर्थ्यशाली वीर " आहे. हा सैन्याला तयार ठेवतो. शत्रुच्या हालचालींवर नजर ठेवतो व त्यांचा नाश करण्यासाठीं जें काय करणें आवश्यक असेल तें तो करतो.

आधिदेवतामध्यें इन्द्र मध्यस्थानाची देवता विद्युत् ही आहे. ही मेघांना फोडते, पाऊस पाडावयास लावते. जेथें वीज पडेल तेथें वज्राघात झाल्यासारखें होतें.

अध्यात्म, अधिभूत व अधिदैवत असे तीन भाव वेदमंत्रांचे समजावे लागतात. अध्यात्म म्हणजे एका मानवीशरीरांतील अर्थ, अधिभूत म्हणजे मानवसमाजांतील अथवा राष्ट्रांतील भाव, येथें " भूत " शब्दाचा अर्थ " प्राणी " असा घ्यावयाचा आहे. " भूत " म्हणजे " पंचमहाभूत " नव्हे. अधिदैवत म्हणजे विश्व - वेदामध्यें विश्वांतील या देवांचें वर्णन आहे व त्या वर्णनावरून इतर दोन भाव समजून घ्यावयाचे आहेत.

सोमदेवता

सोम ही एक वल्ली आहे. तिचा मंत्र असा आहे—

५२७ सोमः पवते जनिता मतीनां
जनिता दिवो जनिता पृथिव्याः ।
जनिताग्नेर्जनिता सूर्यस्य
जनितेन्द्रस्य जनितोत विष्णोः ॥ (ऋ. ९।९६।५)

" सोम शुद्ध केला जात आहे. तो बुद्धींचा जनक, द्युलोकाचा जनक, पृथिवीचा जनक, अग्निचा जनक, सूर्याचा जनक, इन्द्राचा व विष्णुचाही जनक आहे. " यावर यास्क आपल्या निरुक्तामध्यें असें म्हणत आहेत—

अथैतं महान्तमात्मानं एतानि सूक्तानि
एता ऋचोऽनु प्रवदन्ति ।
अथाध्यात्मं । सोम आत्मा अपि एतस्मादेव ।
इन्द्रियाणां जनिता इत्यर्थः ॥. (निरुक्त)

" या महान् आत्म्याचेंच वर्णन हीं सूक्तें करीत आहेत. अध्यात्म प्रकरणामध्यें ' सोम ' हा ' आत्मा ' आहे, तो इन्द्रियांचा जनक आहे. " इत्यादि भाव येथें समजावा. यास्काचार्य आपल्या निरुक्तांत असें स्पष्टीकरण देत आहेत—

महिषो मृगाणामिति अयमपि महान् भवति मृगाणां मार्गणकर्मणामिन्द्रियाणां । श्येनो गृध्राणामिति श्येन आत्मा भवति श्यायतेर्ज्ञानकर्मणः । गृध्राणि इन्द्रियाणि गृध्यतेर्ज्ञानकर्मणः ॥ (निरुक्त)

" मृगांमध्यें महिष मोठा असतो. मृग म्हणजे शोध करणारीं इंद्रियें, त्या इन्द्रियांत मोठा हा आत्मा आहे. श्येन हा गिधाडांमध्यें मोठा असतो. गृध्र म्हणजे ज्ञान साधनें इन्द्रियें होत, त्यांत श्येन आत्मा आहे कारण तो ज्ञान प्राप्त करतो. "

याप्रमाणें मंत्रांचे अर्थ समजावयाचे असतात.

देवतांच्या गुणांचें वर्णन

आतां सामवेदामध्यें देवतांच्या गुणवर्णनामध्यें जे देवतांचे गुण वर्णिले आहेत, ते संक्षेपानें पहा---

इन्द्र देवतेचे गुण

१ प्रचेताः [१४१२]- ज्ञानी [illegible], विशेष चिंतन करणारा.
२ शुक्रः [१४१२]- शुद्ध, निर्दोषी, [illegible].
३ विचर्षणिः [१३८०]- विशेष [illegible].
४ अशस्ति-हा [१६३०]- विपत्ति दूर करणारा.
५ सुगोपाः [१७२०]- उत्तम संरक्षण करणारा.
६ नामश्रुतः [१७१८]- नांवानें सुप्रसिद्ध.
७ ऋत्वियः [१७१८]- ऋतुप्रमाणें उन्नतिचीं कामें करणारा.
८ लोककृत् [१८०१]- जनतेचें कल्याण करणारा.
९ अशत्रुः [१८०२]- जो स्वतः कोणाचें शत्रुत्व करीत नाहीं.
१० गिर्वणः [१४३१]- स्तुत्य, प्रशंसनीय.
११ महान् [१३५५]- मोठा, थोर.
१२ मंहिष्ठः [१३६१]- मोठा.
१३ जनुषा अभ्रातृव्यः [१३८९]- उपजतच शत्रुत्व न करणारा.
१४ यशाः [१४११]- यशस्वी, विजयी.
१५ चर्षणीधृतिः [१४११]- मानवजातीचें धारण पोषण करणारा.
१६ स्वधामः [१४११]- आपल्या शक्तिनें वाढत राहणारा.
१७ वृषभः [१३६१]- बलवान्, बैलाप्रमाणें सशक्त.
१८ वज्रबाहुः [१४२६]- वज्राप्रमाणें सामर्थ्यवान् ज्याचे बाहु आहेत.
१९ भूर्योजाः [१४८४]- पुष्कळ सामर्थ्यवान्.
२० शीर्षः [illegible] [[illegible]]- पराक्रमानें मोठा.
२१ [illegible] [[illegible]]- [illegible].
२२ [illegible] तुविशुष्मः [[illegible]]- [illegible]प्रमाणें [illegible] मोठा शक्तिमान्.
२३ [illegible]पतिः [१५७४]- शक्तिमान्.
२४ वृषः [१३६०]- बलवान्, इच्छित वस्तु भक्तांना देणारा.
२५ अभयंकरः [१३६१]- अभय देणारा.
२६ शवसः पतिः [१४११]- सामर्थ्ययुक्त.
२७ अनुत्तः [१४११]- अपराजित.
२८ असु-रः [१४१२]- बलवान्, शरीरानें हृष्टपुष्ट.
२९ जनानां राजा [१३५६]- लोकांचा राजा.
३० संवननः [१३६१]- सेवा करण्यास योग्य.
३१ मघवा [१४५१]- धनवान्.
३२ अश्ववान्, गोमान्, यवमान् [१४५२]- घोडे, गाई व जव जवळ बाळगणारा.
३३ सत्पतिः गोपतिः [१४८९]- सज्जनांचा पालक, गाईचें पालन करणारा.
३४ हरीणां पतिः [१५१०]- घोडे पाळणारा.
३५ अश्वस्य पोरः [१५८०]- घोड्यांचें उत्तम पोषण करणारा.
३६ गवां पुरुकृत् [१५८०]- गाईचें उत्तम पालन करणारा.
३७ ऋचीषमः [१६४४]- दर्शनीय.
३८ मद्यः [१६५७]- प्रसन्नवृत्ति धारण करणारा.
३९ सत्वा [१६६६]- बलवान्.
४० शग्मी [१६६६]- सामर्थ्यवान्.
४१ सदा[illegible] वीरः [१६८४]- सदा वाढणारा वीर.
४२ शिप्री [१६९६]- शिरस्त्राण धारण करणारा.
४३ तुविशुष्मः [१७७२]- महा बलवान्.
४४ तुविक्रतुः [१७७२]- मोठमोठीं कार्यें करणारा.
४५ शचीवः [१७७२]- शक्तिशाली.
४६ शविष्ठः [१७७१]- शक्तिशाली.
४७ विद्वेषी [१३६१]- शत्रूंचा द्वेष करणारा.
४८ अभयकर्ता [१३६०]- सर्वांना अभय देणारा.
४९ शत्रुः [१३६१]- दुष्टांचा शत्रु.
५० मृधः [illegible]हिः [१४८७]- शत्रूंचा पराभव करणारा.
५१ वीरतरः नहि [१५११]- ज्याच्यापेक्षा मोठा वीर दुसरा नाहीं.
५२ [illegible] [[illegible]]- वज्रधारी, शस्त्रास्त्रधारी.
५३ [illegible]ः [१३६१]- शत्रुसैन्याचा पराभव करणारा.
५४ वृत्रहा[illegible] [[illegible]]- शत्रूंचा नाश करणारा.
५५ अभिभूः [१६३०]- शत्रूंचा पराभव करणारा.
५६ शूरः [१४३६]- वीर.
५७ सहावान् [१४३४]- शत्रूंचा पराभव करण्याचें सामर्थ्य आपणाजवळ बाळगणारा.

५८ अव्रतं दस्युं ओषः [१४३४]- नियमाप्रमाणें न चालणाऱ्या शत्रूंना नाहींसें करणारा.

५९ विश्वासु पृतनासु हव्यः [१४९२]- सर्व युद्धां मध्यें सहाय्यासाठीं बोलावण्यास योग्य.

६० उग्रः [१६०५]- उग्रवीर.

६१ सहस्कृतः [१६०८]- साहसाचीं कामें करणारा.

६२ चर्षणि-प्राः [१७९३]-लोकांचें पोषण करणारा.

६३ अदयः वीरः [१८५५]- शत्रूवर दया न करणारा वीर.

६४ शतमन्युः [१८५५]- शत्रूवर शेंकडों प्रकारचे क्रोध करणारा.

६५ अयुध्यः [१८५५]- ज्याच्याशीं युद्ध करणें कठीण आहे.

६६ दुश्च्यवनः [१८५५]- आपल्या स्थानावरून हालवणें कठीण असा योद्धा.

६७ अप्रतिष्कुतः [१६२२]- ज्याचा प्रतिकार करणें अशक्य असा शूर.

६८ प्रतूर्तिषु विश्वाः स्पृधः अभि असि [१६३७] – युद्धांमध्यें सर्व स्पर्धा करणाऱ्या शत्रूंचा पराभव करणारा.

६९ तरुष्यन् [१६३७]- शत्रूंना दूर करणारा.

७० अनर्वाणः [१६४३]- युद्ध करण्यांत कुशल.

७१ अनपच्युतः [१६४३]- पराभूत न होणारा.

७२ अवार्यक्रतुः नरः [१६४३]- ज्याला कोणी प्रतिबंध करूं शकत नाहीं असा शूर वीर.

७३ दस्यु-हा [१६६८]- दुष्टांचा नाश करणारा.

७४ वज्री [१६९१]- वज्रधारी, शस्त्रधारी.

७५ स्थिरः रणाय संस्कृतः [१६९८]- युद्धांत रणामध्यें स्थिर राहणारा व युद्ध करण्यांतील संस्कारांनीं युक्त.

७६ समूहसि [१३९०]- संगठन करणारा.

७७ ईशानकृत् [१४९३]- शासक निर्माण करणारा.

७८ तुविद्युम्नः [१४९३]- अत्यंत तेजस्वी.

७९ परमज्या [१४९२]- ज्याची धनुष्याची दोरी उत्तम आहे.

८० उभयावी [१३६१]- भौतिक व आध्यात्मिक ऐश्वर्य देणारा.

८१ वृत्रहा अहिं अवधीत् [१४५१]- वृत्रघातक इन्द्रानें अहिचा वध केला.

८२ नवनवतिं पुरः बाह्वोजसा बिभेद [१४५१]- नव्याण्णव शत्रूचीं नगरें आपल्या बाहुबलानें इन्द्रानें तोडलीं.

८३ अप्रतीनि पुरूण्याणि हंसि [१४५१]- बलिष्ठ शत्रूंना मारतो.

८४ चित्राभिः ऊतिभिः अवतात् [१४५१]-आपल्या विलक्षण रक्षणांच्या साधनांनीं इन्द्र रक्षण करतो.

८५ सुम्नेषु नः आयामयः [१४५१]- सुखसमृद्धिमध्यें आम्हांला वाढव.

८६ ओजसा क्रविं युधा अभ्यवत् [१४८८]- इन्द्र आपल्या सामर्थ्यानें शत्रूला युद्धामध्यें जिंकतो.

८७ शतक्रतुः [१४५९]- शेंकडों महत्त्वपूर्ण कार्यें करणारा.

८८ पुरां दर्त्ता [१७१९]- शत्रूचीं नगरें तोडणारा.

८९ दृढा चित् आरुजः [१७१९]- सुदृढ शत्रूंना उखडून टाकणारा.

९० ते शुष्मं तुरयन्तं [१६३८]- तुझें बल शत्रूंचा नाश करतें.

९१ गोत्रभित् वज्रबाहुः अज्मं जयन् ओजसा प्रमृणन्त [१८५४]- शत्रूचे किल्ले तोडणारा वज्रासारखे ज्याचे बाहु आहेत असा युद्धांत विजयी होतो व आपल्या बलानें शत्रु नष्ट करतो.

९२ सत्रा राजा [१७९५]- सर्वांचा एकावेळींच शासक.

९३ अनुत्तमन्युः [१७९५]- ज्याचा क्रोध व्यर्थ होत नाहीं.

९४ राधानां पतिः [१६००]- धनांचा स्वामी.

९५ वसुविदः [१५७९]- निवासाचीं साधनें जवळ बाळगणारा.

९६ इन्द्रे विश्वा भूतानि येमिरे [१५८८]- इन्द्राच्या आश्रयानें सर्व भूतें राहिलीं आहेत.

९७ तुविकूर्मिः [१७७१]- महान् कार्य करणारा.

९८ ऋतीषहः [१७७१]- शत्रूला दूर करणारा, प्रलोभनांमध्यें न फसणारा.

९९ त्विषीमान् [१४८८]- तेजस्वी.

१०० सत्रादावन् [१६२१]- एकदम फळें देणारा.

हे इन्द्राचे गुण वाचकांनीं पहावे. हे गुण असे आहेत कीं ते मनामध्यें आणले असतांच अंगामध्यें शौर्याची भावना उचंबळूं लागते. अभ्यास करणारांनीं हे गुण आपल्या अंगीं आणावे व इन्द्राप्रमाणें शूर व्हावें. आतां अग्निचे गुण पहा—

अग्निचे गुण

१ अग्निः [१३४३]- अग्रणी " अग्निः कस्मात् ? अग्रणीर्भवति " (निरुक्त)

२ पावकः [१३४३]- पवित्र करणारा.
३ होता [१३४३]- हवन करणारा, देवांना बोलावणारा.
४ कविः [१३४६]- ज्ञानी, दूरदर्शी.
५ मधुजिह्वः [१३४९]- मधुरभाषी.
६ प्रियः [१३४९]- सर्वांना आवडणारा.
७ नराशंसः [१३४९]- सर्व मनुष्यांकडून प्रशंसिला जाणारा.
८ मनुर्हितः [१३५०]- मनुष्यांचें हित करणारा.
९ प्रशस्तः [१३७४]- प्रशंसित.
१० दूरे दृक् [१३७४]- दूरून दिसणारा, दूरदर्शी.
११ गृहपतिः [१३७४]- गृहस्वामी.
१२ अथर्व्युः [१३७४]- प्रगतिशील.
१३ सु प्रतिचक्ष्यः [१३७४]- अत्यन्त दर्शनीय.
१४ यविष्ठ्यः [१३७५]- तरुण.
१५ दक्षाय्यः [१३७४]- बल वाढवणारा.
१६ शंतमः [१३८१]- शान्ति सुख देणारा.
१७ अंहसः पातु [१३८१]-पापापासून रक्षण करणारा.
१८ रणे रणे धनंजयः [१३८२]- प्रत्येक युद्धांत विजयी.
१९ भारतः [१३८५]- भरण पोषण करणारा.
२० अजरः [१३८५]- वृद्धावस्था ज्याला येत नाहीं, नित्य तरुण.
२१ दविद्युतत् [१३८५]- तेजस्वी.
२२ द्युमत् [१३८५]- प्रकाशयुक्त.
२३ वृत्राणि जंघनत् [१३९६]- शत्रूंना मारणारा.
२४ सहन्त्यः [१४१७]- शत्रूचा पराभव करणारा.
२५ विश्वचर्षणिः [१४१७]- सर्व जनांचें हित करणारा.
२६ सुभगः [१४१७]- उत्तम भाग्यवान्.
२७ सुदीदितिः [१४१७]- उत्तम तेजस्वी.
२८ श्रेष्ठशोचीः [१४१७]- विशेष प्रकाशमान्.
२९ प्रजावत् ब्रह्म आभर [१३९८]-पुत्रपौत्र होतील असें अन्न भरपूर दे.
३० अपां-न-पात् [१४१४]- जलांना खालीं न पाडणारा.
३१ तनू-न-पात् [१३४६]- शरीराचें पतन न करवणारा.
३२ ऊर्जो-न-पात् [१७१२]- बल कमी न करणारा.
३३ द्विजन्मा [१७७६]- द्विज; दोन अरणींमधून जन्मणारा.
३४ द्रुहंतर [१८१५]- दुष्टांना ठार मारणारा.
३५ मानुषे जने हितः [१४७४]- मानवांचें हित करणारा.
३६ वेधः [१४७६]- विशेष कर्म करणारा.
३७ सुक्रतुः [१४७६]- उत्तम रीतिनें कर्म करणारा.
३८ चित्रभानुः [१४९८]- उत्तम तेजस्वी.
३९ सहस्कृतः [१५०३]- बल वाढवणारा.
४० प्रचेताः [१५१४]- विशेष ज्ञानी.
४१ गातुवित्तमः [१५१६]- उत्तम रीतिनें मार्ग जाणणारा.
४२ आर्यस्य वर्धनः [१५१५]- आर्यांचें संवर्धन करणारा.
४३ पांचजन्यः [१५१९]- पंचजनांचें कल्याण करणारा.
४४ ऋषिः [१५१९]- ज्ञानी, द्रष्टा.
४५ पवमानः [१५१९]- शुद्धता करणारा.
४६ पुरोहितः [१५१९]-पुढारी, पुढें राहणारा, पुढें ठेवलेला.
४७ महागयः [१५१९]- मोठें घर ज्याचें आहे असा.
४८ स्वर्दृक् [१५१९]- आत्मदृष्टि ज्याची आहे, आत्मज्ञानी.
४९ स्वपतिः [१५३३]- स्वयंशासित.
५० वृषणः [१५४०]- बलवान्.
५१ जातवेदाः [१५६६]- ज्याच्यापासून ज्ञान होतें, झालेल्याला जाणणारा.
५२ शुचिः [१५६७]- शुद्ध, पवित्र.
५३ ध्रुवः [१५६७]- स्थिर.
५४ अमृतः [१५६८]- अमर.
५५ जागृविः [१५६८]- जागणारा.
५६ विभुः [१५६८]- व्यापक.
५७ विश्पतिः [१५६८]- प्रजांचें पालन करणारा.
५८ जनानां जामिः मित्रः प्रियः [१५३९]- लोकांचा प्रिय मित्र.
५९ दर्शतः [१५३८]- सुन्दर, दर्शनीय.
६० मन्द्रः [१५४३]- आनंदित, प्रिय.
६१ विभावसुः [१५४३]- तेजस्वी.
६२ रौद्रः [१५४६]- भयंकर.

६३ भद्रः [१५४६]- कल्याण करणारा.
६४ विश्वा साह्वान् अमृक्तः [१५५८]- सर्व शत्रूंचा पराभव करणारा, विजयी, पराभूत न होणारा.
६५ समत्सु सासहिः [१५६०]- युद्धांमध्यें विजयी.
६६ वरेण्यः [१६१९]- श्रेष्ठ, ज्येष्ठ.
६७ अमित्रं अर्दय [१६४८]- शत्रूचा नाश कर.
६८ उरुकृत् [१६४९]- पुष्कळ कर्में करणारा.
६९ जराबोध [१६६३]- स्तुतिनें प्रबुद्ध होणारा.
७० दस्म [१६६०]- सुन्दर, दर्शनीय.
७१ ऋतावा [१७०८]- सत्यनिष्ठ.
७२ वैश्वानरः [१७०८]- सर्वांचें नेतृत्व करणारा,
७३ वशी [१७०९]- सर्वांना आपल्या आधीन ठेवणारा.
७४ पावकशोचिः [१७१२]- ज्याचा प्रकाश पवित्रता करणारा आहे.
७५ भूतस्य भव्यस्य एकः समाट् [१७१२]- भूत व भविष्याचा एक सम्राट्.
७६ स्निहितिषु कृष्टिषु जग्मनासु दाशुषे गयं अरक्षत् [१३८०]- शत्रु चढाई करून आला असतां दात्याच्या घराचें रक्षण करतो.

हे अग्निचे गुणही अत्यंत बोधप्रद आहेत. मनुष्यांनीं हे गुण आपल्यामध्यें वाढवण्यास योग्य आहेत.

सोमाचे गुण

१ जागृविः [१३५७]- जागृत राहणारा.
२ सक्षणिः वृत्राणि परि [१३५७]- साहस करणारा वीर शत्रूंवर चालून जातो.
३ शुक्रः [१३५७]- वीर्य वाढवणारा.
४ दिव्यः [१३५७]- द्युलोकांत होणारा, पर्वतावर उगवणारा.
५ पीयूषः [१३५७]- अमृतस्वरूपी.
६ सोमः आवः [१३५८]- सोम रक्षण करतो.
७ वर्धनः [१३५९]- बल वाढवणारा.
८ दक्षसाधनः [१३८८]- बल वाढवण्याचें साधन.
९ वीरः [१३९५]- शूरवीर.
१० हरिः [१३९५]- दुःखांचें हरण करणारा.
११ प्रियः [१३९५]- सर्वांना प्रिय.
१२ कविः [१४००]- ज्ञानी, दूरदर्शी.
१३ रत्नधा [१४०८]- रत्नांचें धारण करणारा.
१४ शूरग्रामः [१४०९]- शूरांचा समुदाय जसा असावा तसा.
१५ सर्ववीरः [१४०९]- सर्व प्रकारांनीं वीर.
१६ सहावान् [१४०९]- शत्रूंचा पराभव करण्याची शक्ति धारण करणारा.
१७ जेता [१४०९]- युद्ध जिंकणारा.
१८ तिग्मायुधः [१४०९]- तीक्ष्ण आयुधें जवळ बाळगणारा.
१९ क्षिप्रधन्वा [१४०९]- धनुष्य लवकर लवकर चालवणारा.
२० समत्सु अषाळ्हः [१४०९]- युद्धांमध्यें शत्रूंना असह्य होणारा.
२१ पृतनासु शत्रून् साह्वान् [१४०९]- युद्धांमध्यें शत्रूंचा पराभव करणारा.
२२ वृषा [१४१९]- बलवान्.
२३ सुमेधाः [१४२०]- उत्तम बुद्धिमान्.
२४ तेजिष्ठाः [१४२४]- तेजस्वी.
२५ यशसा यशस्तरः [१४०१]- यशानें यशस्वी.
२६ बभ्रुः [१४४४]- भुरकट रंगाचा.
२७ स्वतवाः [१४४४]- आपल्या शक्तिनें शक्तिमान्.
२८ अरुणः [१४४४]- चमकणारा.
२९ मनसः पतिः [१४४४]- मनाचा स्वामी.
३० शुष्मी [१४४४]- बलवान्.
३१ सुमतिः [१४४४]- उत्तम बुद्धिमान्.
३२ रक्षांसि अपघ्नन् [१४३९]- राक्षसांना मारणारा.
३३ अमित्रहा [१४४७]- शत्रूंना मारणारा.
३४ विश्व-चर्षणिः [१४४७]- सर्व लोकांचें हित करणारा.

असा हा सोम आहे. सोमाचे गुण हे सोमरस पिणाऱ्या वीरांमध्यें दिसतात. ते सोम[illegible] वीरांमध्यें उत्पन्न झालेले असतात. यामुळें ते गुण [illegible] आहेत असें समजलें जातें.

अन्य देवतांचीं वर्णनें [illegible] थोडीं थोडीं आहेत. यासाठीं त्यांचा विचार करण्याचें येथें कारण नाहीं. येथें मुख्य गोष्ट ही आहे कीं या देवतांचे जे गुण वेदमंत्रांमध्यें आलेले आहेत, ते उपासकांनीं आपल्यामध्यें वाढवून देवत्व प्राप्त करण्यासाठीं आहेत. हें एवढें वाचकांनीं लक्ष्यांत ठेवावें व त्या उद्देशानें वेदमंत्रांचें पठन करावें व आपली उन्नति करून घ्यावी.

याप्रमाणें सामवेदाची अगदीं थोडीशी माहिती येथें दिली आहे. ही विस्तारानें द्यावयाची झाली तर ती पुष्कळच द्यावी लागेल. याचा विचार करून येथें अत्यावश्यक तेवढी माहिती दिली आहे.

अनुनासिक-सहित मुद्रण

सामवेदाचें मुद्रण अनुनासिकासहित परंपरेनें होत आलें आहे. र, श, ष, स, ह अक्षरांच्या पूर्वी जर अनुस्वार आला तर त्याचें अनुनासिक होतें. जसें —

मंत्रांक	अनुनासिकरहित	अनुनासिकसहित
१५	स्तोमं रुद्राय	स्तोमꣳरुद्राय
२७	अपां रेतांसि	अपाꣳरेतांसि
१७८	शतं शतं	शतꣳशतं
२	यज्ञानां होता	यज्ञानाꣳहोता

अशाप्रकारें अनुनासिकासहित सामवेदाचें मुद्रण झालें पाहिजे.


अशारीतीनें सामवेदाविषयीं थोडासा परिचय येथें दिला आहे. त्याचा विस्तार पुष्कळच होईल; म्हणून या गोष्टीचा विचार करून थोडेसेंच परिचयात्मक विवरण येथें करण्यांत आलें आहे.

या सामवेदाचा मराठी अनुवाद करण्याचा, मुद्रणाचा वगैरे सर्व खर्च **श्री दत्तात्रेय दहाणूकर चॅरिटेबल ट्रस्ट, फोर्ट, मुम्बई** यानीं १००००) दहा हजार रुपये दिला, या बद्दल त्यांचे आभार आम्हीं मानीत आहों. या देणगीनें हें पुस्तक आम्हीं प्रसिद्ध करीत आहों.

निवेदक

श्रीपाद दामोदर सातवळेकर
अध्यक्ष- स्वाध्याय मण्डळ, पारडी





सामवेदाचा सुबोध अनुवाद

पूर्वार्चिकः (छन्द आर्चिकः)

आग्नेयं काण्डम् ।

अथ प्रथमोऽध्यायः ।

अथ प्रथमप्रपाठके प्रथमोऽर्धः ।

[१]

(१–१०) १, २, ४, ७, ९ भारद्वाजो बार्हस्पत्यः; ३ मेधातिथिः काण्वः, ५ उशनाः काव्यः, ६ सुदीतिपुरुमिळ्हा-वाङ्गिरसौ, तयोर्वाऽन्यतरः, ८ वत्सः काण्वः, १० वामदेवः ॥ अग्निः ॥ गायत्री ॥

१ अग्न आ याहि वीतये गृणानो हव्यदातये । नि होता सत्सि बर्हिषि ॥ १ ॥ (ऋ. ६।१६।१०)

२ त्वमग्ने यज्ञानाꣳ होता विश्वेषाꣳ हितः । देवेभिर्मानुषे जने ॥ २ ॥ (ऋ. ६।१६।१)

३ अग्निं दूतं वृणीमहे होतारं विश्ववेदसम् । अस्य यज्ञस्य सुक्रतुम् ॥ ३ ॥ (ऋ. १।१२।१)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१] हे अग्ने ! (वीतये आ याहि) हवि भक्षण करण्यासाठीं तूं ये. देवांनां (हव्य–दातये गृणानः) हव्य देण्यासाठीं ज्याची स्तुति केली जाते, असा तूं (होता) यज्ञांतील होता होऊन (बर्हिषि) आसनावर (नि सत्सि) बैस ॥ १ ॥

(१) वीतिः— गमन, गति; उत्पन्न करणें, उपभोग घेणें, खाणें, स्वच्छ करणें, विभक्त करणें,
(२) हव्यदातिः— देवांना हवि पोंचवणें, हवि देणें, (३) होता— बोलावणारा, देवांना आपणाजवळ आणणारा, (४) बर्हिः— आसन, अन्तरिक्ष, उदक, यज्ञ.

[२] हे अग्ने ! तूं (विश्वेषां यज्ञानां त्वं होता) सर्व यज्ञांमध्यें देवांना बोलावणारा आहेस व (देवेभिः) देवांनींच तुला (मानुषे जने हितः) मानवी जनांमध्यें ठेवला आहे ॥ २ ॥

[३] आम्ही (विश्व–वेदसं) सर्व ज्ञानी (होतारं) देवांना बोलावणारा (अस्य यज्ञस्य सुक्रतुं) या यज्ञाचा उत्तम कर्ता अशा (अग्निं) अग्निला (दूतं वृणीमहे) दूत मानून स्वीकार करीत आहों ॥ ३ ॥

४ अग्निर्वृत्राणि जङ्घनद् द्रविणस्युर्विपन्यया । समिद्धः शुक्र आहुतः ॥ ४ ॥ (ऋ. ६।१६।३४)

५ प्रेष्ठं वो अतिथिं स्तुषे मित्रमिव प्रियम् । अग्ने रथं न वेद्यम् ॥ ५ ॥ (ऋ. ८।८४।१)

६ त्वं नो अग्ने महोभिः पाहि विश्वस्या अरातेः । उत द्विषो मर्त्यस्य ॥ ६ ॥ (ऋ. ८।७१।१)

७ एह्यू षु ब्रवाणि तेऽग्न इत्थेतरा गिरः । एभिर्वर्धास इन्दुभिः ॥ ७ ॥ (ऋ. ६।१६।१६)

८ आ ते वत्सो मनो यमत्परमाच्चित्सधस्थात् । अग्ने त्वां कामये गिरा ॥ ८ ॥ (ऋ. ८।११।७)

९ त्वामग्ने पुष्करादध्यथर्वा निरमन्थत । मूर्ध्नो विश्वस्य वाघतः ॥ ९ ॥ (ऋ. ६।१६।१३)

१० अग्ने विवस्वदा भरास्मभ्यमूतये महे । देवो ह्यसि नो दृशे ॥ १० ॥ (ऋग्वेदे नास्ति)

इति प्रथमा दशतिः ॥ १ ॥ प्रथमः खण्डः ॥ १ ॥ [स्वरिताः ९ । उ० ना० । धा० ३३ । के ॥

[२]

(१-१०) १ आयुङ्क्ष्वाहिः (ऋ. विरूप आंगिरसः) २ वामदेवो गौतमः; ३,८-९ प्रयोगो भार्गवः; ४ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ५, ७ शुनःशेप आजीगर्तिः; ६ मेधातिथिः काण्वः; १० वत्सः काण्वः ॥ अग्निः ॥ गायत्री ॥

११ नमस्ते अग्न ओजसे गृणन्ति देव कृष्टयः । अमैरमित्रमर्दय ॥ १ ॥ (ऋ. ८।७५।१०)

---

[४] (विपन्यया) विशिष्ट प्रकारच्या स्तुतिनें प्रसन्न झालेला (द्रविण-स्युः) उपासकांना धन देण्याची इच्छा करणारा (समिद्धः) प्रदीप्त (शुक्रः) शुद्ध व (आहुतः) सहाय्यार्थ बोलावला गेलेला अग्नि (वृत्राणि जंघनत्) घेरणाऱ्या शत्रूंचा नाश करतो. ॥ ४ ॥

[५] (वः प्रेष्ठं) तुम्हांला अत्यंत प्रिय, (प्रियं मित्रं इव) प्रिय मित्राप्रमाणें आवडणाऱ्या (अतिथिं) अतिथि-प्रमाणें पूज्य अग्निची (वेद्यं रथं न) धन देणाऱ्या रथाची जशी स्तुति होते, त्याप्रमाणें (स्तुषे) मी स्तुति करतों ॥ ५ ॥

[६] हे (अग्ने) अग्नि ! (त्वं) तूं (विश्वस्याः अरातेः) सर्व शत्रूंपासून (उत द्विषः मर्त्यस्य) तसेंच द्वेष करणाऱ्या मानवी शत्रूंपासून (महोभिः) महान साधनांच्या योगानें (नः पाहि) आमचें रक्षण कर ॥ ६ ॥

[७] हे अग्ने ! (एहि उ) ये, (ते) तुझ्यासाठींच (इत्था) अशा प्रकारच्या (इतरा गिरः) इतर स्तुति (सु ब्रवाणि) मी उत्तम रीतिनीं करीत आहें. (एभिः इन्दुभिः वर्धासः) या सोमरसांनीं तूं वाढ, मोठा हो ॥ ७ ॥

[८] हे अग्ने ! (वत्सः) हा वत्स (ते मनः) तुझ्या मनाला (परमात् सधस्थात्) परम उत्कृष्ट स्थानापासून (आ यमत्) वश करीत आहे. हे अग्ने ! (गिरा त्वां कामये) आपल्या वाणीनें तुझ्या प्राप्तिची इच्छा करीत आहे ॥ ८ ॥

[९] हे अग्ने ! (अथर्वा) अथर्व्यानें (त्वां) तुला (विश्वस्य वाघतः मूर्ध्नः) सर्व विश्वाच्या आधार स्थानीं असणाऱ्या श्रेष्ठ (पुष्करात् निरमन्थत) पुष्करापासून मन्थन करून प्रकट केलें ॥ ९ ॥

[१०] हे अग्ने ! (अस्मभ्यं महे ऊतये) आमच्या उत्तम संरक्षणासाठीं (विवस्वत्) निवास करण्यास योग्य असें घर (आ भर) भरून आम्हांस दे. (नः दृशे) आम्हांस मार्ग दाखवणारा (देवः हि असि) असा तूं देव आहेस ॥ १० ॥

॥ येथें पहिला खंड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[११] हे अग्ने ! हे देव ! (कृष्टयः) मनुष्य (ते ओजसे) तुला बलासाठीं (नमः गृणन्ति) नमस्कार करतात. तूं (अमैः) आपल्या शक्तींनीं (अमित्रं अर्दय.) शत्रूचा नाश कर ॥ १ ॥

(१) कृष्टिः- मनुष्य, कृषि कर्म करणारा, (२) अम- बल, शक्ति.

१२ दूतं वो विश्ववेदसꣳ हव्यवाहममर्त्यम् । यजिष्ठमृञ्जसे गिरा ॥ २ ॥ (ऋ. ४।८।१)

१३ उप त्वा जामयो गिरो देदिशतीर्हविष्कृतः । वायोरनीके अस्थिरन् ॥३॥ (ऋ. ८।१०२।१३)

१४ उप त्वाग्ने दिवेदिवे दोषावस्तर्धिया वयम् । नमो भरन्त एमसि ॥ ४ ॥ (ऋ. १।१।७)

१५ जराबोध तद्विविड्ढि विशेविशे यज्ञियाय । स्तोमꣳरुद्राय दृशीकम् ॥५॥ (ऋ. १।२७।१०)

१६ प्रति त्यं चारुमध्वरं गोपीथाय प्र हूयसे । मरुद्भिरग्न आ गहि ॥ ६ ॥ (ऋ. १।१९।१)

१७ अश्वं न त्वा वारवन्तं वन्दध्या अग्निं नमोभिः । सम्राजन्तमध्वराणाम् ॥७॥ (ऋ. १।२७।१)

१८ और्वभृगुवच्छुचिमप्नवानवदा हुवे । अग्निꣳसमुद्रवाससम् ॥ ८ ॥ (ऋ. ८।१०२।४)

१९ अग्निमिन्धानो मनसा धियꣳसचेत मर्त्यः । अग्निमिन्धे विवस्वभिः ॥९॥ (ऋ. ८।१०२।२२)

२० आदित्प्रत्नस्य रेतसो ज्योतिः पश्यन्ति वासरम् । परो यदिध्यते दिवि ॥१०॥(ऋ. ८।६।३०)

इति द्वितीया दशतिः ॥ २ ॥ द्वितीयः खण्डः ॥ २ ॥ [स्व० ६ । उ० २ । धा० ५२ । खा ॥]

---

[१२] हे अग्ने ! (विश्व-वेदसं) सर्व धनांचा स्वामी (हव्य-वाहं) हविला वाहून नेणारा, (अमर्त्यं) अमर, (दूतं) दूत (यजिष्ठं) यज्ञ करणाऱ्या अशा अग्निला (वः) तुम्हांसाठीं मी (गिरा ऋञ्जसे) आपल्या प्रार्थनेनें अनुकूल बनवतों ॥ २ ॥

[१३] हे अग्ने ! (हविष्कृतः) हवन करणाऱ्याच्या (जामयः गिरः) बहिणी समान स्तुती (देदिशतिः) तुझ्या गुणांना प्रकट करीत तुला (वायोः अनीके) वायुच्या जवळ (उप अस्थिरन्) नेऊन ठेवतात ॥ ३ ॥

[१४] हे अग्ने ! (दिवे दिवे) प्रति दिवशीं (दोषावस्तः) रात्रीं व दिवसा (वयं) आम्हीं (धिया नमो भरन्तः) बुद्धिपूर्वक नमस्कार करीत (त्वा उप एमसि) तुझ्याजवळ येत असतों ॥ ४ ॥

[१५] हे (जरा-बोध) स्तुतिनें ज्याचें ज्ञान होतें अशा अग्ने ! (विशे विशे) प्रत्येक प्रजाजनाच्या हिता-साठीं (यज्ञियाय) पूज्य (रुद्राय) दुष्टांना रडवणाऱ्या अशा तुझें (दृशीकं स्तोमं) सुन्दर स्तोत्र गाईलें जात आहे. (तत् विविड्ढि) तें तूं जाण ॥ ५ ॥

(१) जरा– स्तुति, (२) जरा-बोध– स्तुतिनें ज्याच्या गुणांचें ज्ञान होतें, (३) यज्ञिय– पूज्य, (४) रुद्र– शत्रूंना रडवणारा, (५) दृशीक– दर्शनीय, सुन्दर.

[१६] हे अग्ने ! (त्यं चारुं अध्वरं प्रति) त्या सुंदर हिंसारहित यज्ञामध्यें (गोपीथाय प्रहूयसे) संरक्षणा-साठीं तुला बोलावलें जातें. हे अग्ने ! तू (मरुद्भिः आ गहि) मरुतांसह ये ॥ ६ ॥

[१७] (वारवन्तं अश्वं न) आयाळ असलेल्या घोड्याप्रमाणें जो (अ-ध्वराणां सम्राजन्तं) हिंसारहित यज्ञ कर्मांचा जणूं काय सम्राट अशा (त्वा अग्निं) तुज अग्निला (नमोभिः वन्दध्यै) नमस्कारांनीं आम्ही वन्दन करतों ॥७॥

[१८] (समुद्रवाससं) समुद्रामध्यें वसणाऱ्या (शुचिं अग्निं) शुद्ध अग्निची (और्व भृगुवत्) और्व भृगु-प्रमाणें व (अप्नवानवत्) अप्नवानाप्रमाणें (आ हुवे) स्तुति करतों ॥ ८ ॥

[१९] (मनसा अग्निं इन्धानः) मनःपूर्वक अग्निला प्रदीप्त करणारा (मर्त्यः) मनुष्य (धियं सचेत) आपली श्रद्धा प्रदीप्त करतो व (विवस्वभिः अग्निं इन्धे) सूर्यकिरणांसह अग्निलाही प्रज्वलित करतो ॥ ९ ॥

[२०] (परो दिवि) द्युलोकाच्या वर (यत् इध्यते) जें प्रकाशतें (आत् इत्) तेंच (प्रत्नस्य रेतसः) प्राचीन बलानें युक्त (वासरं ज्योतिः) दिवसाचें तेज (पश्यन्ति) लोक पाहतात ॥ १० ॥

* ॥ येथें दुसरा खंड समाप्त झाला ॥

[३]

(१-१४) १ प्रयोगो भार्गवः; २,५ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ३, १० वामदेवो गौतमः; ४, ६ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ७ विरूप आङ्गिरसः; ८ शुनःशेप आजीगर्तिः; ९ गोपवन आत्रेयः; ११ प्रस्कण्वः काण्वः; १२ मेधातिथिः काण्वः; १३ सिन्धुद्वीप आम्बरीषः, त्रित आप्त्यो वा ; १४ उशना काव्यः ॥ अग्निः ॥ गायत्री ॥

२१ अग्निं वो वृधन्तमध्वराणां पुरूतमम् । अच्छा नप्त्रे सहस्वते ॥ १ ॥ (ऋ. ८।१०२।७)

२२ अग्निस्तिग्मेन शोचिषा यꣳसद्विश्वं न्य३त्रिणम् । अग्निर्नो वꣳसते रयिम् ॥२॥ (ऋ. ६।१६।२८)

२३ अग्ने मृड महाꣳ अस्यय आ देवयुं जनम् । इयेथ बर्हिरासदम् ॥ ३ ॥ (ऋ. ४।९।१)

२४ अग्ने रक्षा णो अꣳहसः प्रति स्म देव रीषतः । तपिष्ठैरजरो दह ॥ ४ ॥ (ऋ. ७।१५।१३)

२५ अग्ने युङ्क्ष्वा हि ये तवाश्वासो देव साधवः । अरं वहन्त्याशवः ॥ ५ ॥ (ऋ. ६।१६।४३)

२६ नि त्वा नक्ष्य विश्पते द्युमन्तं धीमहे वयम् । सुवीरमग्न आहुत ॥ ६ ॥ (ऋ. ७।१५।७)

---

[३] तृतीयः खण्डः ।

[२१] (वः) आपल्या (अध्वराणां) अहिंसापूर्ण यज्ञांचें (नप्त्रे) पतन न करणारा (पुरूतमं) अतिश्रेष्ठ (सहस्वते) बलवान् (वृधन्तं) सर्वांचें संवर्धन करणारा जो आहे (अग्निं अच्छा) त्या अग्निजवळ [सेवा करण्यासाठीं] जा ॥ १ ॥

(१) अ-ध्वरः- हिंसारहित यज्ञ, (२) नप्ता (न-प्ता)- पतन न करणारा, संरक्षक,
(३) सहस्वान्- शत्रुचा पराभव करणारा.

[२२] (अग्निः) अग्नि (तिग्मेन शोचिषा) आपल्या तीक्ष्ण तेजानें (विश्वं अत्रिणं) सर्व खादाड शत्रूला (नि यंसत्) नष्ट करून टांकतो. तो अग्नि (नः रयिं वंसते) आम्हांला धन देतो ॥ २ ॥

(१) अत्रिः (अद्)— खाऊन टांकणारा, खादाड शत्रु.

[२३] हे अग्ने ! (मृड) आम्हांस सुखी कर. (महान् असि) तूं महान् आहेस. (देव-युं जनं आ अयः) ईश्वराची उपासना करणाऱ्या मनुष्याजवळ जा आणि (बर्हिः आसदं) आसनावर बसण्यासाठीं (इयेथ) ये ॥ ३ ॥

(१) देवयुः (देव-युः)— ईश्वराची उपासना करणारा, ईश्वराशीं आपला संबध जोडणारा.

[२४] हे अग्नि देवा ! (नः) आमचें (अंहसः) पापी व (रीषतः) हिंसक शत्रूंपासून (रक्ष) रक्षण कर व (अ-जरः) जरारहित असा तूं (तपिष्ठैः प्रति दह स्म) आपल्या तेजांनीं [शत्रूंचें] भस्म करून टांक ॥ ४ ॥

(१) अंहः- पाप, पापी, दुष्ट, (२) रीषत्- हिंसक शत्रु, घातपात करणारे शत्रु, (२) अजरः- जरारहित तरुण.

[२५] हे अग्नि देव ! (ये) जे (तव साधवः अश्वासः) तुझे उत्तम घोडे आहेत, (आशवः अरं वहन्ति) जे वेगानें पूर्णपणें तुला नेतात, त्यांना (युङ्क्ष्व हि) जोड ॥ ५ ॥

(१) आशुः— वेगानें जाणारा घोडा.

[२६] हे (नक्ष्य) शरण जाण्यास योग्य ! (विश्-पते) प्रजापालक, (आहुत) व सर्वांनीं सहाय्यासाठीं बोलावलेल्या (अग्ने) अग्नि देवा ! (वयं) आम्ही (द्युमन्तं सुवीरं) प्रकाशमान, उत्तम वीर अशा तुझें (धीमहि) ध्यान करतों ॥ ६ ॥

(१) नक्ष्य- (नक्ष्)— जवळ जाणें, जवळ जाण्यास योग्य, (२) द्युमान्- प्रकाशमान्, (३) सुवीरः- उत्तम वीर.

२७ अग्निर्मूर्धा दिवः ककुत्पतिः पृथिव्या अयम् । अपाँ रेताँसि जिन्वति ॥७॥ (ऋ. ८।४४।१६)
२८ इममू षु त्वमस्माकँ सनिं गायत्रं नव्याँसम् । अग्ने देवेषु प्र वोचः ॥८॥ (ऋ. १।२७।४)
२९ तं त्वा गोपवनो गिरा जनिष्ठदग्ने अङ्गिरः । स पावक श्रुधी हवम् ॥९॥ (ऋ. ८।७४।११)
३० परि वाजपतिः कविरग्निर्हव्यान्यक्रमीत् । दधद्रत्नानि दाशुषे ॥१०॥ (ऋ. ४।१५।३)
३१ उदु त्यं जातवेदसं देवं वहन्ति केतवः । दृशे विश्वाय सूर्यम् ॥११॥ (ऋ. १।५०।१; यजु. ७।४१)
३२ कविमग्निमुप स्तुहि सत्यधर्माणमध्वरे । देवममीवचातनम् ॥१२॥ (ऋ. १।१२।७)
३३ शं नो देवीरभिष्टये शं नो भवन्तु पीतये । शं योरभि स्रवन्तु नः ॥१३॥ (ऋ. १०।९।४; यजु. ३६।१२)

---

[२७] (अयं अग्निः) हा अग्नि (मूर्धा) शिरस्थानीं विराजणारा आहे, तो (दिवः ककुत्) द्युलोकाचा उच्च भाग आहे, (पृथिव्याः पतिः) व पृथिवीचा पालक आहे. तोच (अपां रेतांसि जिन्वति) कर्मांच्या फलांना देऊन सर्वांना प्रसन्न करतो ॥ ७ ॥

(१) आप्— जल, कर्म, जीवन, (२) जिन्व्— संतुष्ट करणें.

[२८] हे अग्ने ! (त्वं) तूं (इमं अस्माकं नव्यासं) या आमच्या नवीन (सनिं) अन्नाला व (गायत्रं) गायत्री छंदानें केलेल्या स्तोत्राला (देवेषु सु प्रवोचः) देवांमध्यें पोंचव ॥ ८ ॥

(१) सनिः— अन्न, सनु-दाने, (२) गायत्रं— गायत्री छंदांतील सामगान.

[२९] हे अग्ने ! (तं त्वा) त्या तुला (गोपवनः) गोपवन ऋषिनें (गिरा जनिष्ठत्) आपल्या स्तुतिसह उत्पन्न केलें. हे (अंगिरः) अंगांमध्यें रसरूपानें वर्तमान असणाऱ्या (पावक) पवित्र करणाऱ्या अग्ने ! (सः) तो तूं (हवं श्रुधि) आमची प्रार्थना ऐक ॥ ९ ॥

(१) अंगिराः— एक ऋषि, अंगांत रसरूपानें असलेली शक्ति (अंगि-रस्), (२) पावक— पावनकर्ता.

[३०] (वाजपतिः कविः) अन्नांचा स्वामी ज्ञानी अग्नि (हव्यानि परि अक्रमीत्) हवनीय पदार्थांना स्वीकारतो आणि (दाशुषे रत्नानि दधत्) दात्याला रत्नें देतो ॥ १० ॥

[३१] (विश्वाय सूर्यं दृशे) विश्वाला सूर्य दाखवण्यासाठीं त्याचे (केतवः) किरण (जातवेदसं देवं ज्यापासून वेद झाले त्या देवाला (उत् उ वहन्ति) वर धारण करतात ॥ ११ ॥

(१) जात-वेदाः— ज्यापासून ज्ञान होतें, ज्यापासून वेद झाले. किरण सूर्याला आकाशांत एवढ्यासाठीं धारण करतात कीं तो सर्वांना दिसावा.

[३२] (अध्वरे) अहिंसायुक्त यज्ञकर्मामध्यें (सत्यधर्माणं) सत्यधर्मानें युक्त (कविं अग्निं) ज्ञानी अग्निची (उपस्तुहि) स्तुति कर. तो (देवं) देव (अमीव-चातनं) रोग दूर करणारा आहे ॥ १२ ॥

(१) अमीव-चातनः— आमानें उत्पन्न होणाऱ्या रोगांचा नाश करणारा.

[३३] (नः) आम्हांला (अभिष्टये) इष्ट सुख मिळावें म्हणून (देवीः शं) दिव्य जल कल्याण करणारें होवो. (नः पीतये शं) आम्हांला पिण्यासाठीं जल सुखदायक होवो. (नः) आम्हांला (शं योः अभिस्रवन्तु) सुख व शान्ति देत जलप्रवाह वाहोत ॥ १३ ॥

(१) अभिष्टि- इष्ट सुख, (२) पीति- पाणी पिणें, जलपान.

३४ कस्य नूनं परीणसि धियो जिन्वसि सत्पते । गोषाता यस्य ते गिरः ॥ १४ ॥ (ऋ. ८।८४।७)

इति तृतीया दशतिः ॥ ३ ॥ तृतीयः खण्डः ॥ ३ ॥ [स्व० ९ । उ० २ । धा० ५७ । थे ॥]

[४]

(१-१०) १,३,७ शंयुर्बार्हस्पत्यः (७ तृणपाणिः); २,५,८-९ भर्गः प्रागाथः; ४ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ६ प्रस्कण्वः काण्वः; १० सोभरिः काण्वः ॥ अग्निः ॥ बृहती ॥

३५ यज्ञायज्ञा वो अग्नये गिरागिरा च दक्षसे ।
प्रप्र वयममृतं जातवेदसं प्रियं मित्रं न शꣳसिषम् ॥ १ ॥ (ऋ. ६।४८।१)

३६ पाहि नो अग्न एकया पाह्यू३त द्वितीयया ।
पाहि गीर्भिस्तिसृभिरूर्जां पते पाहि चतसृभिर्वसो ॥ २ ॥ (ऋ. ८।६०।९)

३७ बृहद्भिरग्ने अर्चिभिः शुक्रेण देव शोचिषा ।
भरद्वाजे समिधानो यविष्ठ्य रेवत्पावक दीदिहि ॥ ३ ॥ (ऋ. ६।४८।७)

३८ त्वे अग्ने स्वाहुत प्रियासः सन्तु सूरयः ।
यन्तारो ये मघवानो जनानामूर्वं दयन्त गोनाम् ॥ ४ ॥ (ऋ. ७।१६।७)

---

[३४] हे (**सत्पते**) सत्यपालका ! (**नूनं कस्य धियः**) खरोखर कोणाच्या बुद्धिशीं (**परिणसि जिन्वसि**) संमिलित होऊन तूं आनंदित होत आहेस ? (**यस्य ते गिरः**) ज्या तुझी स्तुति (**गो-षाता**) ज्ञानाचें दर्शन करणारी आहे ॥ १४ ॥

(१) **गो-षाता**- गाईचें पालन, इंद्रियांचें पालन, ज्ञानाचें दर्शन.

॥ येथें तिसरा खंड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[३५] (**वः**) तुम्ही (**यज्ञा यज्ञा**) प्रत्येक यज्ञामध्यें व (**गिरा गिरा**) प्रत्येक स्तोत्रामध्यें (**दक्षसे अग्नये**) बलवान अग्निची प्रशंसा करा. (**वयं**) आम्ही (**जातवेदसं अमृतं**) सर्वज्ञ अमर अग्निची (**प्रियं मित्रं न**) प्रिय मित्राप्रमाणें (**प्रशंसिषम्**) प्रशंसा करीत आहों ॥ १ ॥

[३६] हे अग्ने ! (**एकया नः पाहि**) एका प्रार्थनेनें आमचें संरक्षण कर, (**उत द्वितीयया पाहि**) व दुसऱ्या प्रार्थनेनें आमचें संरक्षण कर. हे (**ऊर्जां पते**) अन्नाच्या स्वामी ! (**तिसृभिः गीर्भिः पाहि**) तीन प्रार्थनांनीं आमचें संरक्षण कर. हे (**वसो**) निवासका ! (**चतसृभिः पाहि**) चारही प्रार्थनांनीं आमचें पालन कर ॥ २ ॥

[३७] हे अग्नि देवा ! (**बृहद्भिः अर्चिभिः**) विशेष मोठ्या किरणांनीं तूं प्रकाशित हो. (**शुक्रेण शोचिषा**) शुद्ध तेजानें तूं प्रकाशित हो. हे (**यविष्ठ्य रेवत् पावक**) तरुणा, धनवाना व शुद्धता करणाऱ्या अग्नि देवा ! (**भरद्वाजे समिधानः**) भरद्वाजासाठीं प्रदीप्त होऊन तूं (**दीदिहि**) प्रकाशूं लाग ॥ ३ ॥

[३८] हे अग्ने ! (**त्वे**) तुझ्यामध्यें (**स्वाहुतः**) उत्तम रीतिनें हवन करणारे (**सूरयः**) विद्वान (**प्रियासः सन्तु**) तुला प्रिय होवोत. (**ये मघवानः**) जे धनवान (**जनानां यन्तारः**) प्रजाजनांचें शासन करतात, ते (**गोनां ऊर्वं दयन्तः**) गाईंच्या समूहाचें पालन करतात ॥ ४ ॥

३९ अग्ने जरितर्विश्पतिस्तपानो देव रक्षसः ।
अप्रोषिवान् गृहपते महा२ असि दिवस्पायुर्दुरोणयुः ॥ ५ ॥ (ऋ. ८।६०।१९)

४० अग्ने विवस्वदुषसश्चित्र२ राधो अमर्त्य ।
आ दाशुषे जातवेदो वहा त्वमद्या देवा२ उषर्बुधः ॥ ६ ॥ (ऋ. १।४४।१)

४१ त्वं नश्चित्र ऊत्या वसो राधा२सि चोदय ।
अस्य रायस्त्वमग्ने रथीरसि विदा गाधं तुचे तु नः ॥ ७ ॥ (ऋ. ६।४८।९)

४२ त्वमित्सप्रथा अस्यग्ने त्रातर्ऋतः कविः ।
त्वां विप्रासः समिधान दीदिव आ विवासन्ति वेधसः ॥ ८ ॥ (ऋ. ८।६०।५)

४३ आ नो अग्ने वयोवृध२ रयिं पावक श२स्यम् ।
रास्वा च न उपमाते पुरुस्पृह२ सुनीती सुयशस्तरम् ॥ ९ ॥ (ऋ. ८।६०।११)

---

[३९] हे (जरितः अग्ने देव) ज्ञानी अग्नि देवा ! तूं (विश्पतिः) प्रजेचा पालक आहेस. (रक्षसः तपानः) राक्षसांना संताप देणारा आहेस. हे (गृहपते) गृहस्वामी ! तूं (अ-प्रोषिवान्) बाहेर कोठेंहि न जातां (दुरोणयुः) घरींच राहणारा (महान् असि) मोठा वीर आहेस व (दिवस्पायुः) द्युलोकाचें रक्षण करणारा आहेस ॥ ५ ॥

[४०] हे (अमर्त्य अग्ने) अमर अग्ने ! तूं (उषसः विवस्वत्) उषेकडून मिळणारें (चित्रं राधः) विलक्षण धन (दाशुषे आ वह) दात्याला दे. हे (जातवेदः) सर्वज्ञा ! (त्वं अद्य) तूं आज (उषर्बुधः देवान्) सकाळीं उठणाऱ्या देवांना (आ वह) घेऊन ये ॥ ६ ॥

[४१] हे (वसो अग्ने) सर्वांचा निवास करणाऱ्या अग्नि ! (त्वं) तूं (चित्रः) विलक्षण शक्तिसंपन्न आहेस. (ऊत्या राधांसि) तूं आपल्या संरक्षण सामर्थ्यानें धन (नः चोदय) आमच्याजवळ पाठव. (त्वं) तूं (अस्य रायः) या धनाला (रथीः असि) रथांतून आणणारा आहेस. तू (नः तुचे) आमच्या संतानासाठीं (गाधं तु विदाः) प्रतिष्ठा दे ॥ ७ ॥

[४२] हे अग्ने ! हे (त्रातः) रक्षण करणाऱ्या ! (त्वं इत्) तूं खरोखर (स प्रथाः) अति प्रसिद्ध आहेस. तसेंच तूं (ऋतः) सत्य व (कविः) ज्ञानी आहेस. हे (दीदिवः) तेजस्वी अग्ने ! (त्वां समिधानं) तूं प्रदीप्त झाल्यानंतर (वेधसः विप्रासः) ज्ञानी विप्र (आ विवासन्ति) तुझी सेवा करतात ॥ ८ ॥

[४३] हे अग्ने ! हे (पावक) पवित्र करणाऱ्या ! (नः) आम्हाला (शंस्यं वयोवृधं रयिं रास्व) प्रशंसनीय, आयुष्य वाढवणारें धन दे. हे (उपमाते) ज्ञानसंपन्न ! (सुनीती) उत्तम नीतिच्या मार्गानें (पुरु-स्पृहं) पुष्कळ ज्याची प्रशंसा करतात व (सुयशस्तरं) जें उत्तम यश देणारें आहे असें यश व धन (नः) आम्हांला दे ॥ ९ ॥

४४ यो विश्वा दयते वसु होता मन्द्रो जनानाम् ।
मधोर्न पात्रा प्रथमान्यस्मै प्र स्तोमा यन्त्वग्नये ॥ १० ॥ (ऋ. ८।१०३।६)

इति चतुर्थी दशतिः ॥ ४॥ चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥ [स्व० ९ । उ० ३ । धा० ८३ । दी ॥]

[५]

(१–१०) १ वसिष्ठो मैत्रावरुणिः; २ भर्गः प्रागाथः, ३, ७ सौभरिः काण्वः; ४ मनुर्वैवस्वतः; ५ सुदीतिपुरुमीळ्हावांगिरसौ; ६ प्रस्कण्वः काण्वः; ८ मेधातिथिमेध्यातिथी काण्वौ; ९ विश्वामित्रो गाथिनः; १० कण्वो घौरः

॥ अग्निः, ८ इन्द्रः ॥ बृहती ॥

४५ एना वो अग्निं नमसोर्जो नपातमा हुवे ।
प्रियं चेतिष्ठमरतिं स्वध्वरं विश्वस्य दूतममृतम् ॥ १ ॥ (ऋ. ७।१६।१)

४६ शेषे वनेषु मातृषु सं त्वा मर्तास इन्धते ।
अतन्द्रो हव्यं वहसि हविष्कृत आदिद्देवेषु राजसि ॥ २ ॥ (ऋ. ८।६०।१५)

४७ अदर्शि गातुवित्तमो यस्मिन्व्रतान्यादधुः ।
उपो षु जातमार्यस्य वर्धनमग्निं नक्षन्तु नो गिरः ॥ ३ ॥ (ऋ. ८।१०३।१)

---

[४४] (यः) जो (विश्वा वसु दयते) सर्व धन देतो, जो (जनानां) मनुष्यांमध्यें (होता मन्द्रः) देवांना बोलावून त्यांना आनंद देणारा आहे. (अस्मै अग्नये) या अग्निला (मधोः प्रथमानि पात्रा न) मधाचीं प्रथम देण्यासारखीं पात्रें (स्तोमाः यन्तु) व स्तोत्रें प्रथम दिलीं जावोत ॥ १० ॥

॥ येथें चौथा खंड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[४५] (एना) ह्या (नमसा) अन्नानें (ऊर्जो–न–पातं) बल कमी न करणान्या (प्रियं चेतिष्ठं) प्रिय व चेतना देणान्या (अरतिं स्वध्वरं) मुख्य, उत्तम हिंसारहित यज्ञ करणान्या (विश्वस्य दूतं) सर्वांना ज्ञान देणान्या (अमृतं अग्निं) अमर अग्निला (आहुवे) मी बोलावतों, प्रार्थना करतों ॥ १ ॥

[४६] हे अग्ने ! तूं (वनेषु) जंगलांमध्यें व (मातृषु) अरणीरूपी मातांच्या गर्भांमध्यें (शेषे) गुप्त रूपानें राहत आहेस. (मर्तासः त्वा सं इन्धते) मनुष्य तुला उत्तम रीतिनें प्रदीप्त करतात. (अ–तन्द्रः) आलस्य सोडून (हविष्कृतः हव्यं वहसि) हवन करणान्याचें हविर्द्रव्य तूं देवांकडे पोंचवतोस. (आत् इत्) आणि (देवेषु राजसि) देवांमध्यें तूं प्रकाशित होत असतोस ॥ २ ॥

[४७] (गातु–वित्तमः) धर्ममार्गांना उत्तम रीतिनें जाणणारा अग्नि (अदर्शि) दिसूं लागला आहे. (यस्मिन् व्रतानि आदधुः) ज्यामध्यें सर्व व्रतें केलीं जातात. (सुजातं) उत्तम रीतिनें प्रकट झालेल्या (आर्यस्य वर्धनं) आर्यांना वाढवणान्या (अग्निं) अग्निला (नः गिरः नक्षन्तु) आमची स्तुति प्राप्त होवो ॥ ३ ॥

४८ अग्निरुक्थे पुरोहितो ग्रावाणो बर्हिरध्वरे ।
ऋचा यामि मरुतो ब्रह्मणस्पते देवा अवो वरेण्यम् ॥ ४ ॥ (ऋ. ८।२७।१)

४९ अग्निमीडिष्वावसे गाथाभिः शीरशोचिषम् ।
अग्नि२ राये पुरुमीढ श्रुतं नरोऽग्निः सुदीतये छर्दिः ॥ ५ ॥ (ऋ. ८।७१।१४)

५० श्रुधि श्रुत्कर्ण वह्निभिर्देवैरग्ने सयावभिः ।
आ सीदतु बर्हिषि मित्रो अर्यमा प्रातर्यावभिरध्वरे ॥ ६ ॥ (ऋ. १।४४।१३)

५१ प्र दैवोदासो अग्निर्देव इन्द्रो न मज्मना ।
अनु मातरं पृथिवीं वि वावृते तस्थौ नाकस्य शर्मणि ॥ ७ ॥ (ऋ. ८।१०३।२)

५२ अध ज्मो अध वा दिवो बृहतो रोचनादधि ।
अया वर्धस्व तन्वा गिरा ममा जाता सुक्रतो पृण ॥ ८ ॥ (ऋ. ८।१।

५३ कायमानो वना त्वं यन्मातॄरजगन्नपः ।
न तत्ते अग्ने प्रमृषे निवर्तनं यद्दूरे सन्निहाभुवः ॥ ९ ॥ (ऋ. ३।

[४८] (उक्थे अग्निः पुरोहितः) उक्थ यज्ञामध्यें अग्नि प्रथम स्थापन केला जातो. (अध्वरे) हिंसारहित यज्ञ-मध्यें (ग्रावाणः) सोम कुटण्याचे दगड असतात, तसेंच (बर्हिः) आसनही पसरलें जातें. (मरुतः) हे मरुत हो ! हे ब्रह्मणस्पते ! हे (देवाः) देव हो ! (ऋचा) वेदमंत्रांनीं मी (वरेण्यं अवः यामि) श्रेष्ठ संरक्षण तुमच्या[illegible] मागतों. ॥ ४ ॥

[४९] (शीर-शोचिषं) ज्याचा प्रकाश प्रज्वलित झाला आहे अशा (अग्निं) अग्निची (अवसे) आपल्या रक्षणा-साठीं (गाथाभिः ईडिष्व) अनेक स्तोत्रांनीं स्तुति कर. (पुरु-मीढः) पुरुमीढ-स्तोता (अग्निं) अग्निची (राये) धन प्राप्त व्हावें म्हणून प्रार्थना करितो. (श्रुतं अग्निं) या प्रसिद्ध अग्निला (नरः) लोक (सुदीतये छर्दिः) उत्तम प्रकाशयुक्त घर मिळावें म्हणून प्रार्थित असतात. ॥ ५ ॥

[५०] हे (श्रुत्कर्ण) प्रार्थना ऐकणाऱ्या अग्ने ! (श्रुधि) आमची प्रार्थना ऐक. (सयावभिः) समान गतिनीं युक्त (देवैः वह्निभिः) दिव्य अग्निसह मित्र व अर्यमा (प्रातर्यावभिः) सकाळीं येणाऱ्या देवांसह (अध्वरे बर्हिषि आसीदतु) यज्ञामध्यें आसनावर येऊन बसोत. ॥ ६ ॥

[५१] (दैवोदासः अग्निः देवः) दिवोदासाचा अग्नि देव (मज्मना इन्द्रः न) शक्तिनें इन्द्रासारखा (मातरं पृथिवीं) भूमातेवर (अनु प्र वि वावृते) अनुकूलतेप्रमाणें प्रकाशित झाला व नंतर तो श्रेष्ठपणानें (नाकस्य शर्मणि तस्थौ) स्वर्गाच्या आश्रयानें राहूं लागला. ॥ ७ ॥

[५२] हे अग्ने ! (अध ज्मः) पृथिवीवर (अधवा) अथवा (बृहतः रोचनात् दिवः अधि) अत्यंत तेजस्वी द्युलोकावर (अया तन्वा वर्धस्व) आपल्या स्वरूपानें तूं वाढत रहा. हे (सु-क्रतो) उत्तम यज्ञ करणाऱ्या अग्ने ! (गिरा) आपल्या वाणीनें (ममा जाता पृण) माझ्या जनांचें पोषण कर. ॥ ८ ॥

[५३] हे अग्ने ! (त्वं) तूं (वना कायमानः) वनांची इच्छा करणारा आहेस. तूं जेव्हां (यत् मातॄः अपः) मातृस्वरूप जलाकडे गेलास, (तत् ते निवर्तनं) तें तुझें जाणें आम्हांस (न प्रमृषे) सहन झालें नाहीं. कारण (य[illegible] दूरे सन्) तूं दूर असतांहि (इह आभुवः) येथेंही आहेस. ॥ ९ ॥

५४ नि त्वामग्ने मनुर्दधे ज्योतिर्जनाय शश्वते ।
दीदेथ कण्व ऋतजात उक्षितो यं नमस्यन्ति कृष्टयः ॥ १० ॥ (ऋ. १।३६।१९)

इति पञ्चमी दशतिः ॥ ५ ॥ पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥ (स्व० ३० ६ । धा० ७१ । (घा) ॥)

इति प्रथमप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ १ ॥

[६]

(१-८) १, ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः; २,३,५ कण्वो घौरः; ४ सोभरिः काण्वः; ६ उत्कीलः कात्यः; ८ विश्वामित्रो गाथिनः ॥ अग्निः; २ ब्रह्मणस्पतिः, ३ यूपः ॥ बृहती ॥

अथ प्रथमप्रपाठकस्य द्वितीयोऽर्धः ॥ २ ॥

५५ देवो वो द्रविणोदाः पूर्णां विवष्ट्वासिचम् ।
उद्वा सिञ्चध्वमुप वा पृणध्वमादिद्वो देव ओहते ॥ १ ॥ (ऋ. ७।१६।११)

५६ प्रैतु ब्रह्मणस्पतिः प्र देव्येतु सूनृता ।
अच्छा वीरं नर्यं पङ्क्तिराधसं देवा यज्ञं नयन्तु नः ॥ २ ॥ (ऋ. १।४०।३)

५७ ऊर्ध्व ऊ षु ण ऊतये तिष्ठा देवो न सविता ।
ऊर्ध्वो वाजस्य सनिता यदञ्जिभिर्वाघद्भिर्विह्वयामहे ॥ ३ ॥ (ऋ. १।३६।१३)

---

[५४] हे अग्ने ! (मनुः त्वां नि दधे) मननशील मनुष्य तुला धारण करीत असतो. (शश्वते जनाय ज्योतिः) शाश्वत प्रजाजनांना तुझी ज्योति प्रकाशित असते. (कण्वे दिदेथ) ज्ञानी ऋषिच्या आश्रमांत तूं प्रकाशित होत असतोस. (ऋत्-जातः उक्षितः) यज्ञासाठी उत्पन्न झाल्यावर अधिक प्रदीप्त केला जातोस. (यं कृष्टयः नमस्यन्ति) ज्याला प्रजाजन नमस्कार करीत असतात. ॥ १० ॥

॥ येथें पांचवा खंड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[५५] (वः देवः) तुमचा देव (द्रविणो-दाः) धन देणारा आहे. तो (पूर्णां आसिचं विवष्टु) भरलेल्या स्रुचेचा–पळीचा–स्वीकार करो. अथवा (उत् सिंचध्वं) वरून घृताचें सिंचन करा. (वा उप पृणध्वं) अथवा पुनः भरून आहुति द्या. (आत् इत्) असें केल्यानें (देवः वः ओहते) तो देव तुम्हांला उन्नतिला नेईल. ॥ १ ॥

[५६] (ब्रह्मणस्पतिः) ज्ञानाचा स्वामी (प्र एतु) आमच्याकडे येवो. (सूनृता देवी प्र एतु) सत्य स्वरूपी सरस्वती देवी आमच्याकडे येवो. (नः यज्ञं) आमच्या यज्ञामध्यें (देवाः) [illegible] (नर्यं पंक्ति-राधसं वीरं) मानवजातीचें हित करणाऱ्या, पंक्तिला [illegible] करणाऱ्या वीराला (अच्छा नयन्तु) सरळपणानें आणोत. ॥ २ ॥

[५७] हे अग्ने ! (नः ऊतये) आमचें संरक्षण करण्यासाठीं (ऊर्ध्वः सुतिष्ठ) उन्नत स्थितिमध्यें उत्तम रीतिनें उभा रहा. (सविता देवः न) सूर्य देवाप्रमाणे (ऊर्ध्वः) उच्च स्थितिमध्यें (वाजस्य सनिता) अन्नाचें दान देणारा हो. (यत् अञ्जिभिः) जेव्हां स्तोत्रांनीं (वाघद्भिः विह्वयामहे) स्तुति करीत आम्ही तुला बोलावीत आहों. ॥३॥

५८ प्र यो राये निनीषति मर्तो यस्ते वसो दाशत् ।
स वीरं धत्ते अग्न उक्थशंसिनं त्मना सहस्रपोषिणम् ॥ ४ ॥ (ऋ. ८।१०३।४)

५९ प्र वो यह्वं पुरूणां विशां देवयतीनाम् ।
अग्निं सूक्तेभिर्वचोभिर्वृणीमहे यं समिदन्य इन्धते ॥ ५ ॥ (ऋ. १।३६।१)

६० अयमग्निः सुवीर्यस्येशे हि सौभगस्य ।
राय ईशे स्वपत्यस्य गोमत ईशे वृत्रहथानाम् ॥ ६ ॥ (ऋ. ३।१६।१)

६१ त्वमग्ने गृहपतिस्त्वं होता नो अध्वरे ।
त्वं पोता विश्ववार प्रचेता यक्षि यासि च वार्यम् ॥ ७ ॥ (ऋ. ७।१६।५)

६२ सखायस्त्वा ववृमहे देवं मर्तास ऊतये ।
अपां नपातं सुभगं सुदंससं सुप्रतूर्तिमनेहसम् ॥ ८ ॥ (ऋ. ३।९।१)

इति षष्ठी दशतिः ॥ ६ ॥ षष्ठः खण्डः ॥ ६ ॥ [स्व० ११ । उ० २ । धा० ५७ । (ख) ॥]

---

[५८] हे (वसो) निवासका अग्नि देवा ! (यः मर्तः) जो मनुष्य (राये निनीषति) धन प्राप्त व्हावें यासाठीं तुझी उपासना करतो, (यः ते दाशत्) जो तुला हवि समर्पण करतो, (सः) तो (उक्थशंसिनं) स्तोत्रें म्हणणाऱ्या (सहस्रपोषिणं) हजारों माणसांचें पोषण करणाऱ्या (वीरं) वीर पुत्राला (त्मना धत्ते) आपल्या सामर्थ्यानें उत्पन्न करतो. ॥ ४ ॥

[५९] (यं अन्ये सं-इन्धते) ज्या अग्निला दुसरे पुरुषसुद्धां प्रदीप्त करतात, त्या (देवयतीनां पुरूणां विशां) देवत्व प्राप्त करणाऱ्या नागरिक प्रजांच्या (यह्वं) महान् अग्निचें (सूक्तेभिः वचोभिः) सूक्तांच्या वाक्यांनीं (वृणीमहे) आम्ही वर्णन करतों. ॥ ५ ॥

[६०] (अयं अग्निः) हा अग्नि (सुवीर्यस्य) उत्तम पराक्रमाचा व (सौभगस्य) उत्तम भाग्याचा (हि ईशे) स्वामी आहे. (रायः ईशे) तो धनाचा स्वामी आहे. (स्वपत्यस्य गोमत ईशे) तो आपल्या पुत्रपौत्रांचा व गाईंचा अधिपति आहे. (वृत्रहथानां) घेरणाऱ्या शत्रूंना मारणाऱ्यांचाहि तो स्वामी आहे. ॥ ६ ॥

[६१] हे अग्ने ! (त्वं गृहपतिः) तूं घराचा स्वामी आहेस. (नः अध्वरे त्वं होता) आमच्या हिंसारहित यज्ञामध्यें तूं होता आहेस. हे (विश्ववार) सर्वांनीं स्वीकार करण्यास योग्य ! (त्वं पोता) तूं पवित्रता करणारा आहेस. (प्रचेताः) तूं उत्तम ज्ञानी आहेस. (वार्यं यक्षि) तूं स्वीकार करण्यास योग्य धन देतोस. (यासि च) आणि तें धन प्राप्तही करतोस. ॥ ७ ॥

[६२] हे अग्ने ! (सखायः मर्तासः) आम्ही सर्व समान विचार करणारे मनुष्य (ऊतये) स्वसंरक्षणासाठीं (सु-भगं) उत्तम भाग्यवान् (सु-दंससं) उत्तम कर्म करणाऱ्या, (सु-प्रतूर्तिं) पाप्यांचा नाश करणाऱ्या, (अनेहसं) निष्पाप (अपां-न-पातं) पाण्याला न पाडणाऱ्या (त्वा देवं) तुज देवाला (ववृमहे) प्राप्त करूं इच्छित आहों. ॥ ८ ॥

अपां-न-पातः- पाण्याला न खालीं पाडणारा, मेघांतील अग्नि ज्यामुळें मेघ वितळून पाऊस पडत नाहीं. (अपां-नपातं) पाण्याचा नातु, पाण्याचे पुत्र वृक्ष व त्यांपासून उत्पन्न होणारा अग्नि.

॥ येथें सहावा खंड समाप्त झाला ॥

[७]

(१–१०) १ श्यावाश्वो वामदेवो वा; २ उमस्तुतो वार्हिष्टव्यः; ३ बृहदुक्थो वामदेव्यः; ४ कुत्स आंगिरसः;
५–६ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ७ वामदेवो गौतमः; ८, १० वसिष्ठो मैत्रावरुणिः, ९ त्रिशिरास्त्वाष्ट्रः ॥
१,३,५,९ त्रिष्टुप; २, ४ जगती; १० त्रिपाद्विराड्गायत्री ॥

६३ आ जुहोता हविषा मर्जयध्वं नि होतारं गृहपतिं दधिध्वम् ।
इडस्पदे नमसा रातहव्यꣳ सपर्यता यजतं पस्त्यानाम् ॥ १ ॥ (ऋग्वेदे नास्ति)

६४ चित्र इच्छिशोस्तरुणस्य वक्षथो न यो मातरावन्वेति धातवे ।
अनूधा यदजीजनदधा चिदा ववक्षत्सद्यो महि दूत्यां३ चरन् ॥ २ ॥ (ऋ. १०।११५।१)

६५ इदं त एकं पर उ त एकं तृतीयेन ज्योतिषा सं विशस्व ।
संवेशनस्तन्वे३ चारुरेधि प्रियो देवानां परमे जनित्रे ॥ ३ ॥ (ऋ. १०।५६।१)

६६ इमꣳ स्तोममर्हते जातवेदसे रथमिव सं महेमा मनीषया ।
भद्रा हि नः प्रमतिरस्य सꣳसद्यग्ने सख्ये मा रिषामा वयं तव ॥ ४ ॥ (ऋ. १।९४।१)

---

[७] सप्तमः खण्डः ।

[६३] (हविषा आ जुहोत) हविर्द्रव्यानें हवन करा. (मर्जयध्वं) शुद्धता करा. (होतारं गृहपतिं हवन करणाऱ्या गृहपति अग्निला (नि दधिध्वं) स्थानापन्न करा. (इडः पदे) पृथिवीवरील यज्ञस्थानांमध्यें (पस्त्यानां रातहव्यं) चाललेल्या यज्ञामध्यें हवनीय पदार्थ देण्याबरोबर (नमसा सपर्यत) नमस्कारपूर्वक अग्निचा सत्कार करा. ॥ १ ॥

[६४] (शिशोः तरुणस्य) या तरुण मुलाचा–अग्निचा (वक्षथः चित्रः) जीवनक्रम मोठा विचित्र आहे (यः) जो (धातवे) स्तनपानासाठीं (मातरौ अपि न एति) दोनही आयांजवळ जात नाहीं. (अन्–ऊधः) दुग्धाशय नसलेल्या आयांनीं (यदि अजीजनत्) जर याची उत्पत्ति केली असली, तर हें ठीकच आहे. (अध च) उत्पत्तिच्या नंतर (महि दूत्यं चरन्) मोठें दूतकर्म हा करतो व (ववक्ष) हवि देवांनां पोंचवतो. ॥ २ ॥

दोन अरणींपासून अग्निची उत्पत्ति होते, पण उत्पत्ति होतांच हा या आयांजवळ दुग्धपान करण्यासाठीं जात नाहीं, कारण त्या आयांना दुग्धाशयच नाहीं. पण हा उत्पन्न होतांच देवांना हवि पोंचवण्याचें दूतकर्म करूं लागतो, हें आश्चर्य आहे !

[६५] (ते इदं एकं) तुझें हें एक अग्निरूप शरीर आहे. (ते परः एकं) तुझें दुसरें वायुरूप शरीर आहे. (तृतीयेन ज्योतिषा) तिसऱ्या सूर्यरूप तेजाशीं (सं विशस्व) तूं मिळून जा. (तन्वः संवेशने) शरीराचें असें मीलन झाल्यावर (चारुः एधि) तूं उत्तम होऊन जा. (परमे जनित्रे देवानां प्रियः) परम श्रेष्ठ उत्पत्ति स्थानामध्यें तूं देवांनां प्रिय होऊन रहा. ॥ ३ ॥

मरणोत्तर मृताची काय व्यवस्था होते तें येथें सांगितलें आहे. याचें एक स्थूल शरीर अग्निशीं मिळून जातें. दुसरें शरीर वायुशीं मिळून जातें. हें प्राण शरीर होय. तिसरें शरीर सूर्याशीं मिळून जातें. येथें सूर्यामध्यें पोंचून हा कल्याणरूप स्थितिमध्यें राहतो. या श्रेष्ठ स्थानामध्यें हा देवांना प्रिय होऊन राहतो. ही आनंदमय स्थिति होय.

[६६] (अर्हते जातवेदसे) पूजनीय जातवेदा अग्निसाठीं (इमं स्तोमं) या स्तोत्ररूपी यज्ञाला (रथं इव) रथाप्रमाणें (मनीषया) बुद्धिपूर्वक (सं महेम) उत्तम रीतिनें तयार करीत आहों. (अस्य संसदि) या अग्निच्या स्थानामध्यें (नः भद्रा प्रमतिः) आमची कल्याणमय बुद्धि कार्य करीत राहो. (वयं तव सख्ये) आम्ही तुझ्या मित्र-भावामध्यें (मा रिषाम) नष्ट होऊं नये. ॥ ४ ॥

६७ मूर्धानं दिवो अरतिं पृथिव्या वैश्वानरमृत आ जातमग्निम् ।
कवि२ँ सम्राजमतिथिं जनानामासन्नः पात्रं जनयन्त देवाः ॥ ५ ॥ (ऋ. ६।७।१)

६८ वि त्वदापो न पर्वतस्य पृष्ठादुक्थेभिरग्ने जनयन्त देवाः ।
तं त्वा गिरः सुष्टुतयो वाजयन्त्याजिं न गिर्ववाहो जिग्युरश्वाः ॥ ६ ॥ (ऋ. ६।२४।६)

६९ आ वो राजानमध्वरस्य रुद्र२ँ होतार२ँ सत्ययज२ँ रोदस्योः ।
अग्निं पुरा तनयित्नोरचित्ताद्धिरण्यरूपमवसे कृणुध्वम् ॥ ७ ॥ (ऋ. ४।३।१)

७० इन्धे राजा समर्यो नमोभिर्यस्य प्रतीकमाहुतं घृतेन ।
नरो हव्येभिरीडते सबाध आग्निरग्रमुषसामशोचि ॥ ८ ॥ (ऋ. ७।८।१)

७१ प्र केतुना बृहता यात्यग्निरा रोदसी वृषभो रोरवीति ।
दिवश्चिदन्तादुपमामुदानडपामुपस्थे महिषो ववर्ध ॥ ९ ॥ (ऋ. १०।८।१)

---

[६७] (दिवः मूर्धानं) द्युलोकाचा शिरोभाग (पृथिव्या अरतिं) पृथिवीचा स्वामी अशा (ऋते आजातं) यज्ञामध्यें उत्पन्न झालेला (वैश्वानरं) सर्व विश्वाचा नेता (कविं सम्राजं) ज्ञानी व प्रकाशमान (जनानां अतिथिं) मनुष्यांमध्यें अतिथिसमान पूज्य (आसन्) मुखाप्रमाणें मुख्य, (पात्रं) योग्य अशा (अग्निं) अग्निला (देवाः जनयन्त) देवांनीं उत्पन्न केला आहे. ॥ ५ ॥

[६८] हे अग्ने ! (पर्वतस्य पृष्ठात् आपः न) पर्वताच्या पृष्ठभागावरून जलधारा वाहतात, त्याप्रमाणें (देवाः उक्थेभिः) यज्ञकर्ते विद्वान स्तोत्रांनीं (वि जनयन्त) नाना प्रकारांनीं तुला उत्पन्न करतात. हे (गिर्ववाहः) वाणीनें-स्तुतिनें जाणण्यास योग्य अग्ने ! (अश्वाः आजिं न) घोडे जसे संग्रामामध्यें जातात व (जिग्युः) विजय मिळवतात, त्याप्रमाणें (सुष्टुतयः गिरः) उत्तम स्तुतिच्या आमच्या वाणी (त्वं त्वा वाजयन्ति) त्या तुला बलवान बनवीत आहेत. ॥ ६ ॥

[६९] (अ-ध्वरस्य राजानं) हिंसारहित यज्ञाचा राजा (रुद्रं) घोषणा करून (रोदस्योः सत्ययजं) द्यावापृथिवींमध्यें सत्यरूप यज्ञ करणाऱ्या (होतारं हिरण्यरूपं अग्निं) होत्या सुवर्णरूप अग्निला (अचित्तात्) स्वाभाविक (स्तनयित्नोः) विद्युत् अग्निपासून (पुरा अवसे कृणुध्वं) पूर्वी स्वसंरक्षणासाठीं उत्पन्न केलें. ॥ ७ ॥

पूर्वी विद्युत् अग्निपासून या अग्निला उत्पन्न केलें.

[७०] (राजा अर्यः अग्निः) हा राजा श्रेष्ठ अग्नि (नमोभिः सं इन्धे) अन्नांनीं प्रदीप्त केला जात असतो. (यस्य प्रतीकं) ज्याचें रूप (घृतेन आहुतं) घृताच्या हवनानें वाढवलें जातें. (नरः सबाधः हव्येभिः ईळते) मानव मिळून हवनानें याची पूजा करतात. (अग्निः उषसां अग्रे अशोचि) असा हा अग्नि उषःकालाच्या पूर्वी प्रज्वलित झाला आहे. ॥ ८ ॥

[७१] अग्नि (बृहता केतुना) मोठ्या प्रकाशानें (प्रयाति) प्रकट होतो. (रोदसी) द्यावापृथिवींमध्यें (वृषभः रोरवीति) हा बलवान अग्नि गर्जना करीत आहे. (दिवः अन्तात् चित्) अन्तरिक्ष लोकाच्या एका (उपमां उदानट्) समीप भागीं तो प्रथम प्रकट झाला व (अपां उपस्थे) जलांच्या मध्यें-मेघांमध्यें- (महिषः ववर्ध) तो सामर्थ्यवान् अग्नि वाढूं लागला. ॥ ९ ॥

७२ अग्निं नरो दीधितिभिररण्योर्हस्तच्युतं जनयत प्रशस्तम् ।
दूरेदृशं गृहपतिमथव्युम् ॥ १० ॥ (ऋ. ७।१।१)

इति सप्तमी दशतिः ॥ ७ ॥ सप्तमः खण्डः ॥ ७ ॥ [स्व० १५ । उ० ८ । धा० १०४ । (वी) ॥]

[८]

(१-८) १ बुधगविष्ठिरावात्रेयौ; २, ५ वत्सप्रिर्भालन्दनः; ३ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ४, ७ विश्वामित्रो गाथिनः; ६ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ८ पायुर्भारद्वाजः ॥ अग्निः, ३ पूषा ॥ त्रिष्टुप् ॥

७३ अबोध्यग्निः समिधा जनानां प्रति धेनुमिवायतीमुषासम् ।
यह्वा इव प्र वयामुज्जिहानाः प्र भानवः सस्रते नाकमच्छ ॥ १ ॥ (ऋ. ५।१।१)

७४ प्र भूर्जयन्तं महां विपोधां मूरैरमूरं पुरां दर्माणम् ।
नयन्तं गीर्भिर्वना धियं धा हरिश्मश्रुं न वर्मणा धनर्चिम् ॥ २ ॥ (ऋ. १०।४६।२)

---

[७२] (नरः) यज्ञ करणाऱ्या नेत्या लोकांनीं (दीधितिभिः) आपल्या अंगुलींनीं (अरण्योः) दोन अरणींमध्यें (हस्तच्युतं) हातांच्या बलानें उत्पन्न झालेल्या (प्रशस्तं दूरेदृशं) प्रशंसित व दूरून दिसणाऱ्या (गृहपतिं) गृहाच्या स्वामी (अथर्व्युं अग्निं जनयन्त) गतिशील अग्निला उत्पन्न केलें. ॥ १० ॥

अरणी एकमेकांवर घांसल्या जातात, हातांनीं हें घर्षण केलें जातें व या घर्षणांनीं अग्नि उत्पन्न होत असतो. हा यज्ञगृहाचा स्वामी प्रशंसित असा होतो.

॥ येथें सातवा खंड समाप्त झाला ॥

[८] अष्टमः खण्डः ।

[७३] (अग्निः) अग्नि (जनानां समिधा) यज्ञकर्त्या मनुष्यांच्या समिधांनीं (अबोधि) प्रज्वलित झाला आहे. (धेनुं इव) [अग्निहोत्रासाठीं ठेवलेल्या] गाईसाठीं ज्याप्रमाणें [प्रातःकाळीं जागे होतात] त्याप्रमाणें, (आयतीं उषासं प्रति) येणाऱ्या उषःकालीं [जागें व्हावें व अग्नि सिद्ध करावा.] त्या अग्निच्या (भानवः) ज्वाला (वयां प्रोज्जिहानाः यह्वाः) शाखांना पसरणाऱ्या मोठ्या वृक्षाप्रमाणें (अच्छ नाकं प्रसस्रते) उत्तम रीतींनीं अन्तरिक्षामध्यें पसरतात. ॥ १ ॥

(१) वयां प्रोज्जिहानाः यह्वाः– शाखांनां पसरवणाऱ्या मोठ्या वृक्षाप्रमाणें,
(२) भानवः अच्छ नाकं प्रसस्रते– अग्निचे किरण अन्तरिक्षांत पसरतात,
(३) अग्निः जनानां समिधा अबोधि– अग्नि अग्निहोत्री जनांच्या समिधांनीं प्रदीप्त झाला आहे,
(४) धेनुं इव आयतीं उषासं प्रति– गाईजवळ जसें सकाळीं जातात तसेंच येणाऱ्या उषःकालीं अग्निजवळ जाऊन तो पेटवावा.

[७४] (जयन्तं) असुरांना [illegible] मोठ्या बुद्धिवानांना धारण करणाऱ्या, (मूरैः पुरां दर्माणं) मूर्खांच्या नगरींचा नाश करणाऱ्या (अमूरं) [illegible] स्तुति करण्यास (प्रभूः) समर्थ हो. (गीर्भिः वना नयन्तं) स्तुतींनीं धनाकडे नेणाऱ्या ([illegible] हरिश्मश्रुं न) कवचाप्रमाणें असणाऱ्या हरित वर्णाच्या ज्वालांनीं युक्त, (धनर्चिं) ज्याचें स्तोत्र केलें जात [illegible] अग्निचें (धियं धाः) स्तुति करा. ॥ २ ॥

७५ शुक्रं ते अन्यद्यजतं ते अन्यद्विषुरूपे अहनी द्यौरिवासि ।
विश्वा हि माया अवसि स्वधावन्भद्रा ते पूषन्निह रातिरस्तु ॥ ३ ॥ (ऋ. ६।५८।१)

७६ इडामग्ने पुरुदꣳसꣳ सनिं गोः शश्वत्तमꣳ हवमानाय साध ।
स्यान्नः सूनुस्तनयो विजावाग्ने सा ते सुमतिर्भूत्वस्मे ॥ ४ ॥ (ऋ. ३।६।११)

७७ प्र होता जातो महान्नभोविन्नृषद्मा सीददपां विवर्ते ।
दधद्यो धायी सुते वयाꣳसि यन्ता वसूनि विधते तनूपाः ॥ ५ ॥ (ऋ. १०।४६।१)

७८ प्र सम्राजमसुरस्य प्रशस्तं पुꣳसः कृष्टीनामनुमाद्यस्य ।
इन्द्रस्येव प्र तवसस्कृतानि वन्दद्वारा वन्दमाना विवष्टु ॥ ६ ॥ (ऋ. ७।६।१)

---

[७५] हे (पूषन्) पूषा देवा ! (ते शुक्रं अन्यत्) तुझा श्वेत वर्णाचा दिवस पृथक् होत असतो, (ते यजतं अन्यत्) तसेंच तुझी कृष्ण वर्ण रात्री पृथक् होत असते. असे (वि-षु-रूपे अहनी) परस्पर पृथक् दिवसाचे भाग तुझ्या महात्म्यानें होत असतात. तूं (द्यौः इव असि हि) द्युलोकाप्रमाणें प्रकाशित होत असतोस. हे (स्व-धावन्) अन्नवान देवा ! (विश्वाः मायाः अवसि) तूं सर्व प्रजांचें संरक्षण करतोस. (ते भद्रा रातिः) तुझें कल्याण करणारें दान (इह अस्तु) येथें आम्हांस प्राप्त होवो. ॥ ३ ॥

(१) पूषा-सूर्य, (२) यजतं- दिवसाशीं संबधित, कृष्णवर्ण,
(३) स्वधा- अन्न, आपली धारणशक्ति; (४) मायाः- कौशल्ययुक्त कर्मे करणारी प्रजा, कपटप्रयोग.

[७६] हे अग्ने ! (पुरु-दंससं) बहुत कामामध्यें उपयोगी पडणारी (गोः सनिं इडां) गाईला देणारी-वाणी (शश्वत्तमं हवं आनाव) निरन्तर हवन करणाऱ्या यजमानासाठीं (साध) दे. (नः सूनुः तनयः स्यात्) आम्हांला पुत्र पौत्र व्हावे अशी जी (ते सुमतिः) तुझी उत्तम बद्धि आहे ती (अस्मे विजावा भूतु) आम्हांसाठीं सफल होवो. ॥ ४ ॥

(१) विजावा- अवन्ध्य, सफल.

[७७] (यः नृषद्मा) जो मानवाच्या घरांमध्यें राहणारा अग्नि (अपां विवर्ते) पाण्यानें भरलेल्या अन्तरिक्षामध्यें विद्युत् रूपानें राहत आहे, तो यावेळीं (होता जातः) हवन करणारा झाला आहे. तो (महान्) मोठा (नभोवित्) अन्तरिक्षाला जाणणारा अग्नि (प्रसीदत्) वेदीमध्यें प्रज्वलित झाला आहे. तो (दधत्) हवींना धारण करणारा (सुधायी) वेदीमध्यें उत्तम रीतिनें राहिला आहे. हे स्तुति करणाऱ्या उपासका ! तो अग्नि (विधते ते) उपासना करणाऱ्या तुम्ह्यासाठीं (वयांसि) अन्न व (वसूनि) धनें (यन्ता) देणारा (तनू-पाः भवतु) व शरीराचें रक्षण करणारा होवो. ॥ ५ ॥

[७८] (असुरस्य पुंसः) बलवान् वीराच्या (कृष्टीनां अनुमाद्यस्य) व लोकांच्या स्तुतिला योग्य अशा (तवसः इन्द्रस्य इव) बलवान इन्द्राप्रमाणें, त्या अग्निच्या (प्रशस्तं सम्राजं) उत्तम स्वरूपाची (प्रस्तौतु) स्तुति करा. (वन्दद्वारा वन्दमाना) स्तुति आदि वन्दनादिक कर्मांनीं (प्र विवष्टु) त्याची उपासना करा. ॥ ६ ॥

७९ अरण्योर्निहितो जातवेदा गर्भ इवेत्सुभृतो गर्भिणीभिः ।
दिवेदिव ईड्यो जागृवद्भिर्हविष्मद्भिर्मनुष्येभिरग्निः ॥ ७ ॥ (ऋ. ३

८० सनादग्ने मृणसि यातुधानान्न त्वा रक्षांसि पृतनासु जिग्युः ।
अनु दह सहमूरान्क्रयादो मा ते हेत्या मुक्षत दैव्यायाः ॥ ८ ॥ (ऋ. १०।८

इति अष्टमी दशतिः ॥ ८ ॥ अष्टमः खण्डः ॥ ८ ॥ [स्व० १३ । उ० १ । धा० ६ । (टो ॥]

[९]

(१–१०) १ गय आत्रेयः, २ वामदेवः; ३, ४ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ५ द्वितो मृक्तवाहा आत्रेयः; ६ वसुश्रुत आत्रेयाः; ७,९ गोपवन आत्रेयः, ८ पूरुरात्रेयः; १० वामदेवः, कश्यपो वा मारीचो, मनुर्वा वैवस्वत उभौ वा ॥ अग्निः ॥ अनुष्टुप् ॥

८१ अग्न ओजिष्ठमा भर द्युम्नमस्मभ्यमध्रिगो ।
प्र नो राये पनीयसे रत्सि वाजाय पन्थाम् ॥ १ ॥ (ऋ. ५।१०।१

८२ यदि वीरो अनु ष्यादग्निमिन्धीत मर्त्यः ।
आजुह्वद्धव्यमानुषक् शर्म भक्षीत दैव्यम् ॥ २ ॥ (ऋग्वेदे नास्ति)

---

[७९] (जातवेदाः अग्निः) सर्व ज्ञानयुक्त हा अग्नि (गर्भिणीभिः सुभृतः गर्भ इव) गर्भधारण करणाऱ्या स्त्रियांनीं उत्तम रीतिनें धारण केल्या गेलेल्या गर्भाप्रमाणें (अरण्योः निहितः) अरणीमध्यें राहिलेला आहे. तो अग्नि (हविष्मद्भिः जागृवद्भिः मनुष्येभिः) हवि तयार करून जागृत असलेल्या याजक मनुष्यांनीं (दिवे दिवे ईड्यः) प्रतिदिवशीं स्तुति करण्यास योग्य असा आहे. ॥ ७ ॥

[८०] हे अग्ने ! (सनात्) सदा (यातुधानात् मृणसि) यातना देणाऱ्या क्रूर शत्रूंना विनष्ट करतोस. (त्वा पृतनासु) तुला संग्रामांमध्यें (रक्षांसि न जिग्युः) राक्षस जिंकीत नाहींत. असा तूं (सहमूरान्) समूल (क्रव्यादः) मांस भक्षक राक्षसांना (अनुदह) जाळून टांक. (ते) तुझ्या (दैव्यायाः हेत्याः) दिव्य आयुधापासून कोणीहि शत्रु (मा मुक्षत) सुटूं नयेत. ॥ ८ ॥

(१) सहमूराः— मुळासह, (२) क्रयादः — मांस भक्षक । क्रव्यादः- मांस खाणारे.

॥ येथें आठवा खंड समाप्त झाला ॥

[९] नवमः खण्डः ।

[८१] हे अग्ने ! (ओजिष्ठं द्युम्नं) बलवर्धक धन (अस्मभ्यं आभर) आम्हांला भरपूर दे. हे (अध्रि-गो) ज्याची गति अप्रतिबंधित अशा अग्ने ! (पनीयसे राये) स्तुत्य धन मिळवण्याचा मार्ग (नः प्र) आम्हांला दाखव. तसेंच (वाजाय) अन्न मिळवण्याचा व बल वाढवण्याचा (पन्थां रत्सि) मार्ग दाखव. ॥ १ ॥

[८२] (यदि वीरः स्यात्) जर वीर पुत्र उत्पन्न होईल तर (मर्त्यः अग्निं इन्धीत) तो मनुष्य अग्निला प्रदीप्त करील व (अनु) नंतर (हव्यं आनुषक् आजुह्वत्) हवनीय पदार्थांचें सतत हवन करील, आणि (दैव्यं शर्म भक्षीत) दिव्य सुख प्राप्त करील. ॥ २ ॥

८३ त्वेषस्ते धूम ऋण्वति दिवि सं च्छुक्र आततः ।
सूरो न हि द्युता त्वं कृपा पावक रोचसे ॥ ३ ॥ (ऋ. ६।२।६)

८४ त्वꣳहि क्षैतवद्यशोऽग्ने मित्रो न पत्यसे ।
त्वं विचर्षणे श्रवो वसो पुष्टिं न पुष्यसि ॥ ४ ॥ (ऋ. ६।२।१)

८५ प्रातरग्निः पुरुप्रियो विश स्तवेतातिथिः ।
विश्वे यस्मिन्नमर्त्ये हव्यं मर्तास इन्धते ॥ ५ ॥ (ऋ. ५।१८।१)

८६ यद्वाहिष्ठं तदग्नये बृहदर्च विभावसो ।
महिषीव त्वद्रयिस्त्वद्वाजा उदीरते ॥ ६ ॥ (ऋ. ५।२५।७)

८७ विशोविशो वो अतिथिं वाजयन्तः पुरुप्रियम् ।
अग्निं वो दुर्यं वचः स्तुषे शूषस्य मन्मभिः ॥ ७ ॥ (ऋ. ८।७४।१)

---

[८३] (त्वेषः ते) प्रज्वलित झाल्यावर तुझा (शुक्रः धूमः) स्वच्छ धूर (दिवि आततः) अन्तरिक्षामध्यें पसरतो व (ऋण्वति) तेथें तो दिसूं लागतो. हे (पावक) पवित्रता करणाऱ्या अग्ने ! (सूरः न) सूर्याच्या समान (कृपा) स्तुतिच्या (द्युता) प्रकाशानें (हि रोचसे) तूं प्रकाशित होतोस. ॥ ३ ॥

[८४] हे अग्ने ! (हि) खरोखर (त्वं) तूं (क्षैतवत् यशः) शुष्क काष्ठरूप अन्न (मित्रः न) सूर्याप्रमाणें (पत्यसे) प्राप्त करतोस. हे (विचर्षणे) पाहणाऱ्या (वसो) निवासका अग्ने ! (त्वं श्रवः) तूं अन्नाला व (पुष्टिं न पुष्यसि) पुष्टीला हि वाढवतोस. ॥ ४ ॥

(१) क्षैत— शुष्क काष्ठ, वाळलेलें लांकूड, (२) यशः— अन्न, यश.

[८५] (पुरु-प्रियः) अनेकांना प्रिय असणाऱ्या (विशः अतिथिः) प्रजाजनांच्या घरीं अतिथिप्रमाणें जाणाऱ्या (अग्निः) अग्निची (प्रातः स्तवेत) प्रातःकालीं स्तुति केली जात आहे. (यस्मिन् अमर्त्ये) ज्या अमर अग्निमध्यें (विश्वे मर्तासः) सर्व मनुष्य (हव्यं इन्धते) हवनीय पदार्थांचें हवन करतात. ॥ ५ ॥

[८६] (वाहिष्ठं यत्) लवकर पोंचणारें असें जें स्तोत्र आहे (तत् अग्नये) तें अग्निसाठीं केलें जातें. (विभावसो) हे तेजस्वी अग्नि ! (बृहत् अर्च) पुष्कळ धन अथवा अन्न आम्हांला दे. (त्वत्) तुझ्यापासून (महिषी रयिः) पुष्कळ धन तसेंच (त्वत्) तुझ्याकडून (वाजा उदीरते) अन्न मिळत असतें. ॥ ६ ॥

[८७] तुम्ही (वाजयन्तः) अन्न व बल यांची इच्छा करून (विशः विशः) सर्व प्रजाजनांना (पुरु-प्रियं) अत्यंत प्रिय व (अतिथिं अग्निं) पूज्य अग्निची स्तुति करा. मी (वः दुर्यं) तुमच्यासाठीं घरांत असणाऱ्या अग्निची (शूषस्य मन्मभिः) सुख देणाऱ्या स्तोत्रांनीं (वचः स्तुषे) आपल्या वाणींनीं स्तुति करतों. ॥ ७ ॥

८८ बृहद्वयो हि भानवेऽर्चा देवायाग्नये ।
यं मित्रं न प्रशस्तये मर्तासो दधिरे पुरः ॥ ८ ॥ (ऋ. ५।१६।१)

८९ अगन्म वृत्रहन्तमं ज्येष्ठमग्निमानवम् ।
य स्म श्रुतर्वन्नार्क्ष्ये बृहदनीक इध्यते ॥ ९ ॥ (ऋ. ८।७४।४)

९० जातः परेण धर्मणा यत्सवृद्भिः सहाभुवः ।
पिता यत्कश्यपस्याग्निः श्रद्धा माता मनुः कविः ॥ १० ॥

इति नवमी दशतिः ॥ ९ ॥ नवमः खण्डः ॥ ९ ॥ [स्व० १४। उ० ७ । धा० ५१ । (थ) ॥]

[१०]

(१–६) १ अग्निस्तापसः; २, ३ वामदेवः कश्यपः, असितो देवलो वा; ४ सोमाहुतिर्भार्गवः; ५ पायुर्भारद्वाजः; ६ प्रस्कण्वः काण्वः ॥ अग्निः; १ विश्वेदेवाः; २ अङ्गिराः ॥ अनुष्टुप् ॥

९१ सोमꣳ राजानं वरुणमग्निमन्वारभामहे ।
आदित्यं विष्णुꣳ सूर्यं ब्रह्माणं च बृहस्पतिम् ॥ १ ॥ (ऋ. १०।१४१।३)

९२ इत एत उदारुहन्दिवः पृष्ठान्या रुहन् ।
प्र भूर्जयो यथा पथोद्यामङ्गिरसो ययुः ॥ २ ॥

---

[८८] (भानवे अग्नये) तेजस्वी अग्निलाच (बृहत् वयः) पुष्कळ हविष्यान्न दिलें जातें. (हि) कारण असें आहे कीं तुम्ही (देवाय अर्च) प्रकाशयुक्त अग्निचीच पूजा करतां. (मर्तासः) मनुष्य (यं मित्रं न) ज्या अग्निला मित्राप्रमाणें (प्रशस्तये पुरः दधिरे) श्रेष्ठ स्तुति करण्यासाठीं अग्रभागीं ठेवतात. ॥ ८ ॥

[८९] (वृत्रहंन्तमं) वृत्राचा नाश करणाऱ्या (ज्येष्ठं आनवं) श्रेष्ठ मानवांच्या हितकारी (अग्निं अगन्म) अग्निला आम्ही प्राप्त करतों. (यः) जो अग्नि (आर्क्षे श्रुतर्वन्) ऋक्षपुत्र श्रुतर्वा याच्यासाठीं (बृहत् अनीकः) मोठा ज्वालारूप (इध्यते स्म) प्रदीप्त केला जात आहे. ॥ ९ ॥

[९०] हे अग्ने ! (परेण धर्मणा जातः) तूं मोठ्या धर्मासह प्रकट झाला आहेस. (यत् सवृद्भिः सह अभुवः) जो धर्म ऋत्विजांच्या द्वारें जो यज्ञ होतो त्यांत झाला आहे. (यत्) जो अग्नि (कश्यपस्य पिता) कश्यपाचा पिता, (श्रद्धा माता) श्रद्धा ही माता व (मनुः कविः) मनु कवि आहे. ॥ १० ॥

॥ येथें नववा खंड समाप्त झाला ॥

[१०] दशमः खण्डः ।

[९१] (राजानं सोमं) सोम राजाला, वरुणाला, अग्निला, आदित्याला, विष्णुला, सूर्याला, ब्रह्माला व बृहस्पतिला (अन्वारभामहे) पुनः पुनः स्मरण करून बोलावतों. ॥ १ ॥

[९२] (एते भूर्जयः आङ्गिरसः) हे यज्ञ करणारे आंगिरस (यथा) जसे (द्यां उत्प्रययुः) द्युलोकावर पोंचले. (पथा इतः उदारुहन्) योग्य मार्गानें येथून वर चढले, व (दिवः पृष्ठानि आरुहन्) द्युलोकाच्या पृष्ठावर जाऊन बसले. ॥ २ ॥

९३ राये अग्ने महे त्वा दानाय समिधीमहि ।
ईडिष्वा हि महे वृषं द्यावा होत्राय पृथिवी ॥ ३ ॥

९४ दधन्वे वा यदीमनु वोचद्ब्रह्मेति वेरु तत् ।
परि विश्वानि काव्या नेमिश्चक्रमिवाभुवत् ॥ ४ ॥ (ऋ. ५।१।६)

९५ प्रत्यग्ने हरसा हरः शृणाहि विश्वतस्परि ।
यातुधानस्य रक्षसो बलं न्युब्जवीर्यम् ॥ ५ ॥ (ऋ. १०।८७।२)

९६ त्वमग्ने वसूँरिह रुद्राँ आदित्याँ उत ।
यजा स्वध्वरं जनं मनुजातं घृतप्रुषम् ॥ ६ ॥ (ऋ. १।४५।१)

इति दशमी दशतिः ॥ १० ॥ दशमः खण्डः ॥ १० ॥ [स्व० ४ । उ० ३ । धा० २० । (दौ) ॥]

इति प्रथमप्रपाठके द्वितीयोऽर्धः प्रथमः प्रपाठकश्च समाप्तः ॥ १ ॥

अथ द्वितीयप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥

(१)

(१-१०) दीर्घतमा औचथ्यः; २, ४ विश्वामित्रो गाथिनः, ३ गोतमो राहूगणः; ५ त्रित आप्त्यः; ६ इरिम्बिठिः काण्वः; ७,८,१० विश्वमना वैयश्वः; ९ ऋजिश्वा भारद्वाजः ॥ अग्निः; ५ पवमानः सोमः; ६ अदितिः; ९ विश्वे देवाः ॥ उष्णिक् ॥

९७ पुरु त्वा दाशिवाँ वोचेऽरिरग्ने तव स्विदा ।
तोदस्येव शरण आ महस्य ॥ १ ॥ (ऋ. १।१५०।१)

[९३] हे अग्ने ! (त्वा) तुला (महे राये दानाय) अधिक धन तूं द्यावेंस यासाठीं आम्ही (समिधीमहि) प्रदीप्त करतों. हे (वृषन्) बलवान् अग्नि ! (महते होत्राय) मोठें हवन होत आहे अशा अग्निसाठीं (द्यावा पृथिवी) द्युलोक व पृथिवी यांची (ईडिष्व) स्तुति कर. ॥ ३ ॥

[९४] (वा) अथवा (ईं अनु दधन्वे) या अग्निला अनुलक्षून अध्वर्यु आदि लोक (ब्रह्म अनुवोचत्) स्तोत्रें म्हणतात. (तत् वेः उ) तें सर्व तो जाणतोच. हा अग्नि (विश्वानि काव्या) सर्व काव्यांना, सर्व कर्मांना (नेमिः चक्रं इव) नाभि चक्राला जसें आपल्या ताब्यांत ठेवते त्याप्रमाणें (परि अभुवत्) सर्वांना हा आपल्या ताब्यांत ठेवतो. ॥ ४ ॥

[९५] हे अग्ने ! तू (हरसा) आपल्या तेजानें (यातुधानस्य हरः बलं) यातना देणाऱ्या राक्षसाचें सुखाचें हरण करणारें बल (विश्वतः) सर्व प्रकारांनीं (परि प्रति शृणीहि) चारही बाजूंनीं विनष्ट कर. (रक्षसः वीर्यं) राक्षसाच्या पराक्रमाला (न्युब्ज) नष्ट कर. ॥ ५ ॥

[९६] हे अग्ने ! (त्वं इह) तूं येथें (वसून् रुद्रान् उत आदित्यान्) वसु, रुद्र व आदित्य या देवांसाठीं (यज) यज्ञ कर. तसेंच (मनुजातं) मनुपासून उत्पन्न झालेल्या (घृत-प्रुषं) घृताचें सिंचन करणाऱ्या (स्वध्वरं जनं यज) उत्तम यज्ञ करणाऱ्या जनाचा सत्कार कर. ॥ ६ ॥

॥ येथें दहावा खंड समाप्त झाला ॥

[११] एकादशः खण्डः ।

[९७] हे अग्ने ! (त्वा पुरु दाशिवान्) तुला पुष्कळ हवि देऊन (वोचे) मी म्हणतों कीं (महस्य तोदस्य इव) मोठ्या श्रीमंताला (शरणे आ) शरण आलेल्या सेवका समान (तव स्विद् आ अरिः) तुझाच हा मी सेवक आहें. ॥ १ ॥

९८ प्र होत्रे पूर्व्यं वचोऽग्नये भरता बृहत् ।
विपां ज्योतींषि बिभ्रते न वेधसे ॥ २ ॥ (३।१०।५)

९९ अग्ने वाजस्य गोमत ईशानः सहसो यहो ।
अस्मे देहि जातवेदो महि श्रवः ॥ ३ ॥ (१।७९।४)

१०० अग्ने यजिष्ठो अध्वरे देवां देवयते यज ।
होता मन्द्रो वि राजस्यति स्रिधः ॥ ४ ॥ (ऋ. ३।१०।७)

१०१ जज्ञानः सप्त मातृभिर्मेधामाशासत श्रिये ।
अयं ध्रुवो रयीणां चिकेतदा ॥ ५ ॥ (ऋ. ९।१०२।४)

१०२ उत स्या नो दिवा मतिरदितिरूत्यागमत् ।
सा शन्ताति मयस्करदप स्रिधः ॥ ६ ॥ (ऋ. ८।१८।७)

१०३ ईडिष्वा हि प्रतीव्या३ यजस्व जातवेदसम् ।
चरिष्णुधूममगृभीतशोचिषम् ॥ ७ ॥ (ऋ ८।२३।१)

---

[९८] (विपां ज्योतींषि बिभ्रते) ज्ञान्यांचें तेज धारण करणाऱ्या (वेधसे होत्रे न) विधात्या व देवांना बोलावणाऱ्या प्रमाणें (अग्नये) अग्निला (बृहत् पूर्व्यं वचः) मोठें प्राचीन स्तोत्र (प्र भरत) म्हणा. ॥ २ ॥

[९९] (सहसो यहो अग्ने) हे बलानें उत्पन्न झालेल्या अग्ने ! (गोमतः वाजस्य ईशानः) गाईपासून होणाऱ्या अन्नाचा स्वामी तूं आहेस. म्हणून हे (जात-वेदः) ज्यापासून ज्ञान प्रसृत झालें अशा अग्ने ! (अस्मे महि श्रवः देहि) आम्हांला पुष्कळ अन्न दे. ॥ ३ ॥

[१००] हे अग्ने ! तूं च (अध्वरे यजिष्ठः) यज्ञांमध्यें पूजनीय आहेस. (देवयते) यज्ञकर्त्याकरितां (देवान् यज) देवांसाठीं यज्ञ कर. तूं (होता मन्द्रः) देवांना बोलाऊन आणणारा आनंदित अग्नि (वि अति स्रिधः) शत्रूंचा पराभव करून (राजसि) शोभत आहेस. ॥ ४ ॥

[१०१] (सप्त मातृभिः जज्ञानः) सात मातांच्या–नद्यांच्या–सहाय्यानें प्रकट होणारा (मेधां श्रिये अशासत) यज्ञ करणाऱ्या सोमाच्या शोभेकरतां यत्न करणारा (अयं ध्रुवः) हा स्थिर अग्नि (रयीणां आचिकेतद्) धनांना उत्तम रीतिनें जाणतो. ॥ ५ ॥

[१०२] (उत स्या मतिः) व ती बुद्धि, (अ-दितिः) अदीन स्थितिमध्यें (ऊत्या) रक्षणसामर्थ्यासह (दिवा नः आगमत्) आजच्या दिवशीं आम्हांला प्राप्त होवो. (सा) ती (शंतातिः) शान्ति व (मयः) सुख (करत्) आम्हांसाठीं प्रदान करो व (स्रिधः अप) शत्रूंना दूर करो. ॥ ६ ॥

[१०३] (प्रतीव्यां ईडिष्व हि) शत्रुचा प्रतिकार करणाऱ्या अग्निची स्तुति करा. (अ-गृभीत-शोचिषं) ज्याचा प्रकाश कोणीहि बंद करूं शकत नाहीं, (चरिष्णु-धूमं) ज्याचा धूर चारही बाजूंना पसरत आहे, अशा (जात-वेदसं) सर्वज्ञानी अग्निचें (यजस्व) यजन करा. ॥ ७ ॥

१०४ न तस्य मायया च न रिपुरीशीत मर्त्यः ।
यो अग्नये ददाश हव्यदातये ॥ ८ ॥ (ऋ. ८।२३।१५)

१०५ अप त्यं वृजिनं रिपुं स्तेनमग्ने दुराध्यम् ।
दविष्ठमस्य सत्पते कृधी सुगम् ॥ ९ ॥ (ऋ. ६।५१।१३)

१०६ श्रुष्ट्यग्ने नवस्य मे स्तोमस्य वीर विश्पते ।
नि मायिनस्तपसा रक्षसो दह ॥ १० ॥ (ऋ. ८।२३।१४)

इति प्रथमा दशतिः ॥ १ ॥ एकादशः खण्डः ॥ ११ ॥ [स्व० ९ । उ० ३ । धा० ४२ । (दा) ॥]

[२]

(१-८) १ प्रयोगो भार्गवः २ (ऋ० सौभरिः काण्वः); २, ३, ५-७ सौभरिः काण्वः; ४ प्रयोगो भार्गवः, सौभरिः काण्वो वा; ८ विश्वमना वैयश्वः ॥ अग्निः ॥ उष्णिक्

१०७ प्र मंहिष्ठाय गायत ऋताव्ने बृहते शुक्रशोचिषे ।
उपस्तुतासो अग्नये ॥ १ ॥ (ऋ. ८।१०३।८)

१०८ प्र सो अग्ने तवोतिभिः सुवीराभिस्तरति वाजकर्मभिः ।
यस्य त्वं सख्यमाविथ ॥ २ ॥ (ऋ. ८।१९।३०)

---

[१०४] (यः) जो (हव्य-दातये) हवनीय पदार्थांचें ग्रहण करणाऱ्या (अग्नये ददाश) अग्निला हवि देतो, (तस्य) त्याच्यावर (मर्त्यः रिपुः) कोणीहि मर्त्य शत्रु (**मायया चन**) कपटानें सुद्धां (न ईशीत) स्वामित्व करण्यास समर्थ होत नाहीं. ॥ ८ ॥

[१०५] हे अग्ने ! (त्यं) त्या (वृजिनं रिपुं) कपटी शत्रु (दुराध्यं स्तेनं) दुराराध्य चोराला (दविष्ठं अपास्य) दूर कर. हे (सत्पते) सत्य पालका ! आमच्यासाठीं (सुगं कृधि) मार्ग सुगम कर. ॥ ९ ॥

[१०६] हे (वीर) वीरा (विश्पते) हे प्रजापालका अग्ने ! या (नवस्य) नवीन (मे स्तोमस्य) माझ्या-स्तोत्राला (श्रुष्टी) ऐकून (मायिनः रक्षसः) कपटी राक्षसांना (तपसा निदह) आपल्या तेजानें जाळून टांक. ॥१०॥

॥ येथें अकरावा खंड समाप्त झाला ॥

[१२] द्वादशः खण्डः ।

[१०७] हे (उपस्तुतासः) स्तुति करणाऱ्या, उपासकांनों ! तुम्हीं (मंहिष्ठाय) महान (ऋताव्ने) सत्य-पालक, यज्ञपालक, (बृहते) मोठ्या (शत्रु-शोचिषे) स्वच्छ प्रकाशानें युक्त (अग्नये) अग्निचीं (प्रगायत) स्तोत्रें गा. ॥ १ ॥

[१०८] हे अग्ने ! (त्वं यस्य सख्यं आविथ) तूं ज्याचाशीं मित्रभाव ठेवतोस, (सः) तो (तव) तुझ्या (सुवीराभिः) उत्तम वीरांनीं युक्त (वाज-कर्मभिः) अन्न देणाऱ्या पुरुषार्थानीं प्राप्त होणाऱ्या (ऊतिभिः) रक्षण साध-नांनीं (प्रतरति) दुःखांतून तरून जातो. ॥ २ ॥

१ २ ३क २र ३ १ २ ३ १ २ ३ १ २
१०९ तं गूर्धया स्वर्णरं देवासो देवमरतिं दधन्विरे ।
३ २ ३ १ २
देवत्रा हव्यमूहिषे ॥ ३ ॥ (ऋ. ८।१९।१)

१ २ ३ १ २ ३ १ २ ३ १ २ ३ २ ३ २
११० मा नो हृणीथा अतिथिं वसुरग्निः पुरुप्रशस्त एषः ।
२ ३ १ २ ३ २
यः सुहोता स्वध्वरः ॥ ४ ॥ (ऋ. ८।१०३।१२)

३ १ २ ३ १ २र ३ २ ३ १ २ ३ १ २ ३ २
१११ भद्रो नो अग्निराहुतो भद्रा रातिः सुभग भद्रो अध्वरः ।
३ २ ३ १ २र
भद्रा उत प्रशस्तयः ॥ ५ ॥ (ऋ. ८।१९।१९)

१ २ ३ १ २ ३ १ २र ३ १ २
११२ यजिष्ठं त्वा ववृमहे देवं देवत्रा होतारममर्त्यम् ।
३ २ ३ १ २ ३ १ २
अस्य यज्ञस्य सुक्रतुम् ॥ ६ ॥ (ऋ. ८।१९।३)

१ २ ३ १ २र३ २ ३ २ ३ १ २ ३ १ २ ३ १ २
११३ तदग्ने द्युम्नमा भर यत्सासाहा सदने कं चिदत्रिणम् ।
३ १ २र ३क २र
मन्युं जनस्य दूढ्यम् ॥ ७ ॥ (ऋ. ८।१९।१५)

---

[१०९] हे उपासका ! (स्वः नरं तं गूर्द्धत) स्वर्गाला हवि पोंचवणाऱ्या अग्निची स्तुति कर. (देवासः) देव-ऋत्विज (देवं) ज्या देवाची (अरतिं दधन्विरे) स्वामी म्हणून उपासना करतात, त्या अग्निच्या सहाय्यानें (देवत्रा) देवांना (हव्यं आ ऊहिषे) हवनीय द्रव्य तूं पोंचवतोस. ॥ ३ ॥

[११०] (नः अतिथिं) आमच्या यज्ञांमधून अतिथि रूप प्रिय अग्निला दूर (मा हृणीथाः) नेऊं नका. (यः सुहोता) जो अग्नि देवांना उत्तम रीतिनें बोलावणारा (स्वध्वरः) उत्तम यज्ञ करणारा असा (एषः) हा (पुरु-प्रशस्तः वसुः) अनेकांकडून प्रशंसित होणारा व सर्वांचा निवास करणारा आहे. ॥ ४ ॥

[१११] (आहुतः) ज्यामध्यें हवन केलें आहे असा (अग्निः) अग्नि (नः भद्रः) आमचें कल्याण करणारा होवो. हे (सुभग) उत्तम भाग्यवाना ! आम्हांस (भद्रा रातिः) हितकर दान प्राप्त होवो. (अध्वरः भद्रः) आमचा यज्ञ कल्याण करणारा होवो. (उत) आणि (प्रशस्तयः भद्राः) स्तुति आमचें कल्याण करणाऱ्या होवोत. ॥ ५ ॥

[११२] हे अग्ने ! (यजिष्ठं) यज्ञाला करणाऱ्या (देवत्रा देवं) देवांतील प्रमुख देव (अमर्त्यं होतारं) अमर होता, (अस्य यज्ञस्य सुक्रतुं) या यज्ञाला उत्तम रीतिनें करणाऱ्या (त्वा ववृमहे) अशा तुला आम्ही भजत आहों. ॥ ६ ॥

[११३] हे अग्ने ! (तत् द्युम्नं आभर) तें तेजस्वी यश आम्हांला दे (यत्) जें (सदने) यज्ञामध्यें अथवा राहण्याच्या ठिकाणीं (कंचित् अत्रिणं) कोणत्याही खादाड शत्रुला (आ सासाहा) पराभूत करूं शकेल. तसेंच (दूढ्यं) दुष्ट व (जनस्य मन्युं) लोकांच्या क्रोधालाहि दूर करूं शकेल. ॥ ७ ॥

११४ यद्वा उ विश्पतिः शितः सुप्रीतो मनुषो विशे ।
विश्वेदग्निः प्रति रक्षांसि सेधति ॥ ८ ॥ (ऋ. ८।२३।१३)

इति द्वितीया दशतिः ॥ २ ॥ द्वादशः खण्डः ॥ १२॥ [स्व० १२ । उ० २ । धा० ४४ । (छी) ॥]

इत्याग्नेयं पर्व काण्डम् वा ॥ इति प्रथमोऽध्यायः ॥ इति प्रथमं पर्व ॥

आग्नेयकाण्डस्य मन्त्रसंख्या ११४

गायत्र्यः	३४	(१–३४)
बृहत्यः	२८	(३५–६२)
त्रिष्टुभः	१८	(६३–८०)
अनुष्टुभः	१६	(८१–९६)
उष्णिहः	१८	(९७–११४)
	११४	

[११४] (यत् वै) जेव्हां (विश्पतिः शितः) यजमानांचें पालन करणारा हवि खाऊन प्रज्वलित होतो तेव्हां तो अग्नि (सुप्रीतः) उत्तम रीतिनें प्रसन्न होऊन (मनुषः विशे) मनुष्यांच्या घरीं येतो, तेव्हां तो अग्नि (विश्वा रक्षांसि इत्) सर्व राक्षसांना (प्रतिषेधति उ) नष्ट करतोच. ॥ ८ ॥

॥ येथें बारावा खंड समाप्त झाला ॥

॥ इति आग्नेयं काण्डं समाप्तम् ॥

अग्निचें स्वरूप

सामवेदामध्यें पहिले ११४ मंत्र ' आग्नेय काण्डा ' चे आहेत. यांमध्यें कांहीं दुसऱ्या देवताही प्रसंगानें आलेल्या आहेत, पण मुख्य देवता ' अग्नि ' आहे. देवतेचें वर्णन वाचावें, त्या देवतेचे गुण मनांत आणावे व ते आपणांमध्यें आणावे व वाढवावे व उपासक मनुष्यानें ' देव ' बनावें. यासाठीं या वैदिक उपासना व स्तुति आहेत. ' देव ' बनण्याची इच्छा प्रत्येक स्तुति करणारामध्यें असावी. मी देवतेची स्तुति करीत आहें, या देवतेच्या गुणांचें वर्णन मी करीत आहे याचा उद्देश हा आहे कीं, या देवतेचे हे गुण माझ्यामध्यें यावेत व या शुभ गुणांनीं मी युक्त व्हावें.

यत् देवा अकुर्वन्, तत् करवाणि । शतपथ ब्राह्मण—

' जें देवांनीं केलें तें मी करावें ' व असें करून आपण देवत्व प्राप्त करावें व देव बनून समाजांत विराजमान व्हावें. याच आग्नेय काण्डामध्यें असें म्हटलें आहे—

देव-युं जनं आ अयः । ऋ. ४।९।१ साम. २३

' हे अग्ने ! तूं देवत्व प्राप्त करूं इच्छिणाऱ्या माणसाला प्राप्त हो. ' तुझी प्राप्ति झाली, म्हणजे त्या उपासकाला देवत्व प्राप्त होईल, अर्थात् त्याचा सर्वतोपरि उद्धार होईल. हें देवत्व प्राप्त करणें, हेंच मुख्य अनुष्ठान वेदामध्यें सांगितलें आहे व तेंच वैदिक धर्मीयांनीं करावयाचें आहे. आज आपण सामवेदाच्या या ' **आग्नेय काण्डाचें आलोचन** ' करणार आहोंत. या काण्डाचा मुख्य विषय ' अग्नि ' आहे. यासाठीं याचें स्वरूप प्रथम आपण येथें पाहूं—

या आग्नेय कांडामध्यें अग्नि देवतेचे हे गुण वर्णिले आहेत—

१ **विश्व-वेदाः**-(विश्व) सर्व (वेदाः) जाणणारा, सर्वज्ञानी, विशेष ज्ञानसंपन्न. (मं. ३) ' सर्व धनयुक्त ' असा हा याचा अर्थ आहे. ' **वेदस् धननामसु पठितं** ' (निघंटु. २।१०।४)

२ जात-वेदाः (मं. ३१)- (जातं वेत्ति)- जें झालें आहे तें सर्व जो जाणतो.

३ कविः (मं. ३०)- ज्ञानी, क्रान्तदर्शी, दूरदर्शी.

४ पुरोहितः (मं. ४८)- अग्रभागीं राहणारा, पुरोहित, प्रथम हित करणारा.

५ प्र-चेताः (मं. ६१)- विशेष बुद्धिमान्, विशेष विचारी.

६ अतिथिः (मं. ५)- अतिथिप्रमाणें पूजनीय, सत्काराला योग्य.

७ जराबोधः (मं. १५)- स्तुतिनें ज्याचें ज्ञान होतें, स्तुति ज्याची होते.

८ रुद्रः (मं. १५)- (रुत्-रः) वक्ता, (रुद्-रः) शत्रूंना रडविणारा.

९ पावकः (मं. २९)- पवित्रता करणारा, शुद्ध करणारा.

१० चेतिष्ठः (मं. ४५)- चेतना देणारा, प्रेरणा करणारा, ज्ञानी.

११ गातु-वित्-तमः (मं. ४७)- मार्ग जाणणाऱ्या मध्यें श्रेष्ठ. उत्तम मार्ग जाणणारा.

१२ आर्यस्य वर्धनः (मं. ४७)- आर्यांचें-श्रेष्ठांचें संवर्धन करणारा.

१३ श्रुत-कर्णः (मं. ५०)- भक्तांच्या प्रार्थना ऐकून त्यांच्या इच्छा पुरवणारा.

१४ पोता (मं. ६१)- स्वच्छता करणारा, एक अध्वर्यु.

१५ विपो-धाः (मं. ७४)- विशेष ज्ञानी, लोकांना आश्रय देणारा. ज्ञान्यांचा आश्रयदाता.

१६ अ-मूरः (मं. ७४)- जो मूढ नाहीं, ज्ञाता.

१७ सु-भगः (मं. ६२)- उत्तम भाग्यवान्.

१८ यज्ञस्य सुक्रतुः (मं. ३)- यज्ञाचें कार्य उत्तम रीतिनें संपादन करणारा.

१९ सत्य-धर्मा (मं. ३२)- सत्याचें पालन करणारा. यज्ञाचें पालन करणारा.

२० सत्पतिः (मं. ३४)- सज्जनांचें पालन करणारा.

२१ विश्पति (मं. ३९)- प्रजांचें उत्तम पालन करणारा

२२ त्राता (मं. ४२)- रक्षण करणारा. उत्तम संरक्षक.

२३ ऋतः (मं. ४२)- सत्य, योग्य, यज्ञ, पूज्य.

२४ वैश्वा-नरः (मं. ६७)- सर्व मनुष्यांचें हित करणारा. सार्वजनिक हित करणारा.

२५ अ-तंद्रः (मं. ४६)- जो आळशी नाहीं, सुस्ती न करणारा, सदा उत्साही.

२६ दक्षाः (मं. ३५)- दक्ष, कर्मामध्यें सदा दक्ष राहणारा.

२७ होता (मं. १,२)- देवांना बोलाऊन आणणारा, सत्पुरुषांना आपल्याबरोबर आणणारा, हवन करणारा.

२८ प्रेष्ठः (मं. ५)- सर्वांना प्रिय, सर्वांना आवडणारा.

२९ प्रियः (मं. ५)- सर्वांना प्रिय, सर्वांना आवडणारा.

३० वाजपतिः (मं. ३७)- अन्न, बल यांचा अधिपति.

३१ विवस्वत् (मं. १०) (विवः) ज्ञानानें (वत्) युक्त, ज्ञानी, वसवणारा.

३२ वृधन् (मं. २१)- वाढविणारा, संवर्धन करणारा.

३३ सुवीरः (मं. २६)- उत्तम वीर, महाशूर,

३४ वृत्राणि जंघ्नत् (मं. ४)- घेरणाऱ्या शत्रूंना मारणारा.

३५ सुवीर्यस्य ईशे (मं. ६०)- उत्तम शौर्याचा स्वामी.

३६ पुरां दर्माणं (मं. ७४)- शत्रूंचीं नगरें फोडणारा.

३७ वृत्र-हन्तमः (मं. ८७)- वृत्रांना मारणारा.

३८ ऊर्जो न-पातः (मं. ४५)- बल कमी न करणारा बल वाढवणारा.

३९ ऊर्जो पति (मं. ३६)- बल व अन्न यांचा पालक.

४० जयन् (मं. ७४)- विजयी.

४१ प्रत्नः (मं. २०)- पुरातन, अनादि.

४२ अमृतः (मं. ३५)- अमर.

४३ वृषभः (मं. ७१)- बलवान्, सामर्थ्यवान्, वृष्टि करणारा.

४४ पुरुप्रिय (मं. ८७)- पुष्कळांना प्रिय, 'प्रियः' (४५)

४५ स्वध्वरः (मं. ४५)- (सु-अ-ध्वरः) हिंसारहित यज्ञ करणारा.

४६ पुरुप्रशस्त (मं. ११०)- पुष्कळांकडून प्रशंसित.

४७ द्रविणस्युः (मं. ४)- धनवान्, बलवान्. (निघंटु २।९।२६ बळ, २।१०।२५ धन)

४८ सौभगस्य ईशे, राय ईशे (मं. ६०)- सौभाग्य व धन यांचा स्वामी.

४९ दाशुषे रत्नानि दधत् (मं.३०)- दान देणारांना रत्नें देतो.

५० द्रविणोदाः (मं. ५५)- धन देणारा.

५१ देवानां प्रियः (मं. ६५)- देवांना प्रिय, विद्वानांना आवडणारा.

५२ देवेषु राजति (मं. ४६)- देवांमध्यें प्रकाशतो, विद्वानांत चमकतो.

५३ **गृहपतिः** (मं. ६१)– गृहस्थ, गृहस्वामी.

५४ **अनेहस्** (मं. ६२)– निष्पाप.

५५ **शुक्रशोचीः** (मं. १०७)– तेजस्वी, प्रकाशित होणारा.

५६ **सहस्वान्** (मं. २१)– बलवान्, शत्रूचा पराभव करणारा.

५७ **अरतिः** (मं. ६७)– प्रगतिशील.

५८ **ऋते जातं** (मं. ६७)– सत्यासाठीं झटणारा, यज्ञासाठीं झालेला.

५९ **अर्यः राजा** (मं. ७०)– श्रेष्ठ राजा.

६० **परेण धर्मणा जातः** (मं. ९०)– श्रेष्ठ धर्मासह उत्पन्न झालेला, श्रेष्ठ धर्माचें पालन करणारा.

६१ **सत्पते सुगं कृधि** (मं. १०५)– हे सज्जनांच्या प्रतिपालका ! आमचा मार्ग सुगम कर. अग्नि मार्ग सुगम करतो.

६२ **अध्वराणां सम्राट्** (मं. १७)– हिंसारहित कर्मांचा सम्राट्.

६३ **सत्ययजः** (मं. ६९)– सत्य यज्ञ करणारा, खरा यज्ञ करणारा.

६४ **अगृभीत-शोचिः** (मं. १०३)– ज्याचें तेज कमी होत नाहीं.

६५ **रिपुः न ईशात** (मं. १०४)– ज्यावर शत्रु स्वामित्व करूं शकत नाहीं. शत्रूंचा पराभव करणारा.

६६ **तनू-पा** (मं. ७७)– शरीराचें संरक्षण करणारा.

६७ **नृषद्मा** (७७)– मानवी शरीरांत राहणारा.

६८ **मानुषे जने देवेभिः हितः** (मं. २)– मानवांच्या शरीरांत देवांनीं ठेवलेला.

६९ **वसुः** (मं. ३६)– वसवणारा, निवास करणारा.

७० **अमीव-चातनः** (मं. ३२)– रोगबीजांना दूर करणारा.

७१ **सहस्रपोषिणं वीरं तमना धत्ते** (मं. ५८)– हजारों माणसांच्या पोषण करणाऱ्या वीराला–वीर पुत्राला स्वतः धारण करतो.

७२ **जनानां सम्राट्** (मं. ६७)– लोकांचा सम्राट्.

७३ **हिरण्यरूपः** (मं. ६९)– सुवर्णाप्रमाणें तेजस्वी. चमकणारा.

अग्निचे हे गुण या सामवेदाच्या आग्नेय काण्डामध्यें वर्णिले आहेत. यांपैकीं कांहीं गुण याच्या ज्ञानाचें वर्णन करीत आहेत, कांहीं बलाचें व शूरत्वाचें वर्णन करीत आहेत. कांहीं धनाचें व कांहीं दातृत्वाचें वर्णन करीत आहेत. हे गुण जर मनुष्यांनीं आपल्या अंगीं वाढवले, तर त्यांची योग्यता वाढेल यांत शंका नाहीं. वाचकांनीं या दृष्टीनें या गुणांचा विचार करावा व जे गुण आपल्या अंगीं आणतां येतील तेवढे गुण आपणामध्यें आणावे व ते वाढवावे. मनुष्यांनीं या शुभगुणांनीं युक्त व्हावें यासाठींच वेदाचे हे मंत्र आहेत.

अग्निचें ओज

अग्निचें ओजःसामर्थ्य फार मोठें आहे. यासाठीं याला '**पुरूतमः**' (२१)– अति श्रेष्ठ असें म्हटलें आहे. सामर्थ्यानें हा अति श्रेष्ठ आहे. याचसाठीं त्याला '**महान् असि**' (२३)– तूं फार मोठा आहेस. तुझी बरोबरी करणारा येथें दुसरा तुझ्यासारखा मोठा कोणीहि नाहीं.

कृष्टयः ओजसे ते नमः गृणन्ति (११)– सर्व लोक सामर्थ्यासाठीं तुला नमस्कार करतात व तुझी त्यासाठीं स्तुति करतात.

असें अग्निचें सामर्थ्य आहे.

आर्याचें संवर्धन

सुजातं आर्यस्य वर्धनं नः गिरः नक्षन्तु (४७)– उत्तम रीतिनें उत्पन्न झालेल्या व आर्यांचें संवर्धन करणाऱ्या अग्निचें आमच्या वाणी वर्णन करोत.

यज्ञामध्यें तीन बाजू आहेत. १ देवपूजा, २ संगतिकरण व ३ दान. यांनीं मानवांचें सामर्थ्य वाढतें. कसें तें पहा. समाजामध्यें जे श्रेष्ठ आहेत, त्यांचा सत्कार झाला म्हणजे समाजांत श्रेष्ठ लोकांची संख्या वाढूं लागते. त्यामुळें समाज श्रेष्ठ बनतो. नंतर संगतिकरण करावयाचें आहे. संगतिकरण म्हणजे संघटण झालें म्हणजे समाजाची शक्ति वाढते व तिसरें कार्य '**दान**' हें आहे. दान म्हणजे नुसतेंच दान देणें नव्हे. ज्याच्याजवळ जें नाहीं तें त्यास देऊन त्याचा उद्धार करणें हें दान होय.

हें दान चार प्रकारचें आहे. (१) विद्यादान, (२) बलदान, (३) धनदान व (४) कर्मदान. राष्ट्रामध्यें या चार प्रकारच्या दानांनीं राष्ट्र वर येत असतें. अज्ञान्यांना विद्यादान दिल्यानें ते साक्षर होऊन उन्नतिला प्राप्त करतात. निर्बल असतील त्यांचें बल वाढून ते बलवान होतील असें करणें हें दुसरें राष्ट्रामधील कार्य आहे. धनाचें दान देऊन देशामध्यें धन उत्पादन करण्याचीं साधनें वाढवणें हें राष्ट्रहिताचें तिसरें महत्वपूर्ण कार्य आहे व चवथें कार्य बेकारांना काम देऊन त्यांना धन मिळेल असें करणें. असें हें चार प्रकारचें दान राष्ट्राचा उद्धार करूं शकतें.

यज्ञाच्या या तीनही बाजू उत्तमरीतिनें राष्ट्राचें हित करणाऱ्या आहेत. यामुळें यज्ञानें राष्ट्राचा व समाजाचा उत्कर्ष होतो असें समजलें जातें, तें अगदीं खरें आहे.

गृहपति

अग्नि हा घरांतील हवनकुण्डांत असतो, पण तो तेथें ' **गृहपति** ' घराचा मालक म्हणून असतो. खरा घराचा मालक यज्ञाचा अग्नि आहे.

गृहपते ! अ-प्रोषितवान् महान् असि (३९)

' हे गृहस्वामी अग्ने ! तूं कोठेंहि दुसरीकडे हिंडत राहत नाहींस, तूं मोठा आहेस. ' (**अ-प्रोषितवान्**) बाहेर इकडे तिकडे उगीच हिंडत नाहींस. घरांत राहून घराचें हित करण्यांत तूं आपला वेळ घालवतोस. यामुळें तूं (**महान् असि**) मोठा आहेस. आपल्या घराचें सर्व प्रकारें कल्याण करावें यांत गृहस्थाचा मोठेपणा आहे. सर्व गृहस्थी लोकांनीं यापासून पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे.

गोपालन

गृहस्थी मनुष्याचें गोपालन करणें हें एक मोठेंच कर्तव्य आहे. घरामध्यें गाई असणें हें अत्यंत आवश्यक आहे. घरांतील मुलामाणसांना गाईचें दूध तूप लोणी दही ताक मिळणें हें भाग्याचें लक्षण आहे. घरांतील माणसें यामुळें दीर्घजीवी होतात.

मघवानः जनानां यन्तारः गोनां ऊर्वं दयतः (३८)-

' जे लोकांचें उत्तम शासन करतात ते धनी लोक गाईंच्या कळपांचें रक्षण करतात. ' ते लोकांना गाई देतात व त्याचेंही सहाय्य करतात.

पुरुदंसं गोःसनिं इडां शश्वत्तमं हूयमानाय साध (७६)-

' स्तुति करणाऱ्याला पुष्कळरीतिनें लाभ देणाऱ्या सर्व अन्न देणाऱ्या गाईचें दान कर. '

गाईचें दान यज्ञ करणाऱ्यांना करावें. गाय ही यज्ञाचें मुख्य साधनच आहे. हवन हें गाईच्या तूपानें व गोदुग्धानें होत असतें. गाईच्या तूपाच्या ज्वाळेनें हा हवेंतील विष नाहींसें करतो व हवा शुद्ध करतो.

ऋतुसंधिषु वै व्याधिर्जायते ।
ऋतुसंधिषु यज्ञाः क्रियन्ते । —गोपथ ब्राह्मण

ऋतूंच्या संधिकालामध्यें हवा बदलते व व्याधि होतात. यासाठीं ऋतुच्या संधिकालामध्यें यज्ञ करतात. या यज्ञामध्यें गाईचें तूप व व्याधिशमनार्थ औषधि द्रव्याचें हवन केलें जातें व त्यामुळें रोग दूर होऊं शकतात.

व्यक्तिचे रोगही असेच दूर होऊं शकतात. जो रोग मनुष्यास झाला असेल त्या रोगाचें शमन करणाऱ्या औषधींच्या चूर्णांचें हवन गाईच्या तूपाबरोबर केल्यानें व हें हवन त्या रोग्याच्या खोलींत केल्यानें, तीं हवन केलेलीं द्रव्यें अग्निमध्यें जळून सूक्ष्म होतात व तीं श्वासावाटें त्याच्या रक्तांत मिसळतात व तीं रोग दूर करतात.

अग्नि हा ' **हव्यवाह** ' आहे. हवन केलेल्या पदार्थांना जेथें पोंचवावयाचें तेथें तो पोंचवून इष्ट कार्य करतो.

अमुक ऋतूंमध्यें अमुक औषधींचें हवन करावें हा विषय फारच मोठा संशोधनीय आहे व तसें जर हवन करतां आलें, तर वैयक्तिक व सामुदायिक आरोग्य सिद्धि होईल यांत संशय नाहीं. संशोधकांनीं या विषयाचें संशोधन करावें असा हा विषय अत्यंत महत्वाचा आहे.

ज्ञानी अग्नि

अग्नि ज्ञानी आहे हें पूर्वी दाखवलेंच आहे. काळोखामध्यें अग्नि पेटवला तर तो अग्नि त्या सर्व जागेचें उत्तम ज्ञान करून देतो. कोणता मार्ग आहे, मार्गावर कांटे दगड वगैरे पडलेले आहेत कीं काय, खळगे वगैरे कोठें कसे आहेत, हें सर्व अग्नि दाखवीत असतो. मनुष्यांना हा अनुभव सर्वदा येत असतो; म्हणून याला ' **विश्ववेदाः** ' (३) ' सर्व जाणणारा ' असें म्हटलें आहे.

वाजपतिः कविः हव्यानि परि अक्रमीत् (३०)

हा अन्नपति अथवा बलपति कवि आहे व तो हवन केलेले पदार्थ चारही बाजूंना पसरवतो. अग्निमध्यें मिरची टांकली तर आजूबाजूला बसलेल्या माणसांना धडाधड शिंका येऊं लागतात; त्याप्रमाणें सुगंधित पदार्थाचें हवन केलें, तर जवळ बसलेल्यांना सुगंध येऊन आनंद वाटतो. यावरून हवन केलेल्या पदार्थांना तो (**पर्यक्रमीत्**) चारही बाजूंना पसरवतो हें खरें आहे, असें दिसेल. याचसाठीं याला—

यज्ञस्य सुक्रतुः (३)- हा यज्ञाला उत्तम रीतिनें संपन्न करणारा असें म्हटलें आहे. जे यज्ञीय पदार्थ याच्यामध्यें हवन करावे त्या पदार्थांना तो चारही बाजूंस हवेंत पसरवितो व त्यांचा उत्तम परिणाम तो सर्व हवेवर करतो. अर्थात हा सुपरिणाम मनुष्यांच्या अनुभवांत येतो. याचसाठीं अमुक पदार्थांचें अग्निमध्यें हवन करावें व अमुक पदार्थांचें हवन अमुक वेळेस करूं नये, हें विचारपूर्वक व संशोधनपूर्वक ठरवलें पाहिजे. कारण—

अयं अग्निः सुवीर्यस्य ईशे (६०)

हा अग्नि उत्तम वीर्याचा ईश आहे. यासाठीं यामध्यें ज्याचें हवन व्हावयाचें त्याचा प्रथम नीट विचार झाला पाहिजे.

एते भूर्णयः आंगिरसाः द्यां उत्प्रययुः, इत उदाहरन्, दिवः पृष्ठानि आरुहन् (९२)

' हे उत्तम यज्ञ करणारे आंगिरस ऋषि द्युलोकावर चढले, येथून उच्च स्थानीं पोंहोचले, द्युलोकाच्या पृष्ठभागावर जाऊन तेथें ते विराजमान झाले. '

हें यज्ञाचें सामर्थ्य आहे. या साठींच यज्ञ हा यथासांग झाला पाहिजे. त्यासाठीं यज्ञ करणाऱ्यांनीं **' आंगिरस '** बनलें पाहिजे. **' अंग-रस '** अंगांत जो जीवनरस आहे तो अंग रस होय. हा अंगप्रत्यंगामध्यें जीवनरस असतो. तो कसा तयार होतो, तो कसा वाढतो व तो कसा निर्दोष ठेवतां येतो, या संबंधाची विद्या जे जाणतात ते **' आंगिरस '** होत. अंगीय जीवनरसांची विद्या जाणणारे जे ऋषि ते आंगिरस ऋषि होत. आंगिरसांनीं या विद्येचा शोध लावला व ती वाढवली आणि विवक्षित हवनानें विवक्षित परिणाम घडतात असें सिद्ध करून दाखवलें. या मुळें हे आंगिरस श्रेष्ठ बनले !!!

देवत्व प्राप्त करणें

सर्व यज्ञांनीं जर कांहीं साध्य करावयाचें असेल तर तें देवत्व प्राप्त करणें हें होय. देवांमध्यें जे गुण आहेत असें वेदमंत्रांत सांगितलें आहे, ते गुण आपणामध्यें आणून ते वाढवणें हें साधन आहे, हें अनुष्ठान आहे. हें अनुष्ठान मनुष्यांनीं करावयाचें आहे.

देवयुं जनं आ अयः (२३)

देवत्व प्राप्त करूं इच्छिणाऱ्या व तें अनुष्ठान करणाऱ्या मनुष्याजवळ अग्नि येतो. अग्नीचे जे गुण अग्निमंत्रांमध्यें वर्णिले आहेत, ते गुण आपणामध्यें वाढवण्याचा प्रयत्न करणारे जे उपासक असतात, त्यांचें तें अनुष्ठान जितकें वाढेल त्या प्रमाणानें आग्निपण त्यांच्यामध्यें येईल, अग्निप्रमाणें ते तेजस्वी होतील.

उषर्बुधः देवान् आ वह (४०)– उषःकालीं जागणाऱ्या देवांनां या यज्ञामध्यें घेऊन ये. **' उषः–बुधः '** उषःकालीं उठणें, झोंपलेल्या स्थितींत पडून न राहणें हें देवत्वाचें एक चिन्ह आहे. पहाटे साडे चार वाजतां उठावें. हें सहज होण्यासारखें आहे. शौच, मुखमार्जन, स्नान, संध्या उपासना करून ७ वाजेपर्यंत आपल्या कामास जो लागतो, त्याला या प्रातःकाळीं उठण्यानें कसा उत्साह आपल्यामध्यें वाढतो तें अनुभवास येतें.

याच्या उलट आठ नऊ वाजेपर्यंत बिछान्यांत पडून राहणारांचा उत्साही प्रातःकाळ कसा फुकट जातो तेंही समजण्या सारखें आहे. **' उषर्बुधः '** उषःकालीं उठून कामाला लागणें हें देवत्वाचें एक लक्षण आहे.

देवेषु राजसि (४६)– देवांमध्यें चमकतो. देवांचे गुण अंगीं आणून पुढें देवांमध्यें चमकावयास लागणें. देवांमध्यें नुसतें बसणें नव्हे, तर देवांमध्यें चमकणें हें त्याहून विशेष महत्त्वाचें आहे. सर्वच देव तेजस्वी आहेत, त्यांमध्यें हा जर विशेष श्रेष्ठ झाला तरच हा देवांत चमकेल. विशेष तेजस्विता प्राप्त करणें हा भाव येथें आहे.

सयावभिः देवैः वन्हिभिः प्रातर्यावभिः अध्वरे बर्हिषि आसीदतु (५०)- समान प्रगतिशील देवांस पुढें नेणाऱ्या व उषःकालीं उठून कामास लागणाऱ्या देवांबरोबर यज्ञामधील आसनावर हा बसो. (स–याव०) समान रीतिनें प्रगति करणाऱ्या, (प्रातः याव०) प्रातःकालीं, उषःकालीं उठून प्रगति करण्याच्या कामास लागणाऱ्या (वह्निः) व पुढें नेणाऱ्या देवांबरोबर यज्ञांतील आसनांवर बसण्याची योग्यता येण्यास तसेच गुण अंगीं असले पाहिजेत. मिळून मिसळून सांघिक रीतिनें प्रगति करणें, प्रातःकाळीं उठून कामास लागणें व प्रगतिच्या मार्गानें जाणें हे तीन गुण अग्निमध्यें आहेत. यज्ञाग्नि प्रातःकाळीं प्रदीप्त होतो, सर्व ऋत्विज संघानें त्याची उपासना करतात व सर्व उन्नतिच्या मार्गानें जातात म्हणजे निर्दोष यज्ञ कर्म करतात. हे गुण अंगीं आणण्यानें सर्व मनुष्यांची उन्नति होऊं शकते. असा हा अग्निदेव मार्गदर्शक आहे. म्हणून म्हटलें आहे—

नः दृशे देवः असि (१०)

' आम्हांला मार्गदर्शन करणारा तूं देव आहेस. ' अग्निदेव हा अशा प्रकारें लोकांना मार्गदर्शक आहे. अंधकारांत अग्नि हा आपल्या प्रकाशानें लोकांस मार्ग दाखवतो हें सर्वांच्या अनुभवाला येणारें आहे. **' अग्निः कस्मात्, अग्रणी भवति '** (**निरुक्त**) याला अग्नि असें कां म्हणतात, तर तो अग्रणी होतो म्हणजे **(अग्र–नी)** अग्रभागी, पुढें नेणारा तो आहे. प्रगतिच्या मार्गानें तो सर्वांस नेतो यासाठीं त्याचें मुळचें नांव **' अग्र–णी '** असें आहे. त्याचें संक्षिप्त रूप **' अग्नि '** होय.

अग्र–नीः– अग्रणी

अग्–निः– अग्नि

हा यज्ञाग्निहि तसाच अग्रणी आहे. कारण तो आपल्या उपासकांना प्रगतिच्या मार्गानें पुढें घेऊन जातो.

प्रियं मित्रं इव (५)– प्रिय मित्राप्रमाणें हात देऊन, आपला आश्रय देऊन तो आपल्या भक्तांनां पुढें घेऊन जातो.

ते मनः परमात् सधस्थात् आयमत् (८)– तुझें मन जो परम उच्च स्थानापासून आपल्याकडे वळवतो, तुझ्या मनाला आपल्याला अनुकूल बनवतो, तो श्रेष्ठ बनतो. देवतेचें मन आपल्याला अनुकूल बनवण्यासाठीं देवतेचे गुण आपल्या

अंगीं आणले पाहिजेत हें उघड आहे. नाहींतर देवतेच्या गुणांच्या विरुद्ध आपलें आचरण झालें तर देवतेचा क्रोध आपल्यावर होईल. यासाठीं देवतेचे गुण कोणते आहेत हें आधीं समजून घ्यावें व ते गुण आपल्या अंगीं मुरवण्याचा यत्न करावा व नंतर देवतेचें मन आपल्यास अनुकूल होईल अशासाठीं त्या देवतेची प्रार्थना करावी.

अग्नि शत्रूंचा नाश करतो

अग्निचे कांहीं गुण आपण पाहिले. आतां या आग्नेय कांडामध्यें अग्निची युद्धकुशलता वर्णिली आहे, तिचा थोडासा विचार करूं—

अग्निः वृत्राणि जंघनत् (४)– अग्नि वृत्रांना मारतो. वृत्र म्हणजे चारही बाजूंनीं घेरणारा शत्रु. वृत्र म्हणजे मेघ, वृत्र म्हणजे सर्व प्रकारचे शत्रु. या शत्रूंना अग्नि नष्ट करून टाकतो.

अयं अग्निः वृत्रहथानां ईशे (६०)– हा अग्नि वृत्राला मारणाऱ्या शूरवीरांचा मुख्य आहे.

वृत्रहन्तमं ज्येष्ठं आनवं अग्निं अगन्म (८९)–घेरणाऱ्या शत्रूंचा नाश करण्यामध्यें जे श्रेष्ठवीर आहेत, त्यांत प्रमुख असणाऱ्या अग्निला मी प्राप्त होतों. त्याची मी उपासना करतों–त्याची मी मित्रता करतों. त्याच्याजवळ जाऊन राहतों, त्याच्या आश्रयानें मी राहतों.

विश्वस्य अरातेः महोभिः पाहि (६)– सर्व शत्रूंपासून आपल्या मोठ्या सामर्थ्यांनीं आमचें रक्षण कर.

मर्त्यस्य द्विषः पाहि (६)– द्वेष करीत राहणाऱ्या मानवांच्या शत्रूंपासून आमचें रक्षण कर.

अग्नेः अमित्रं अर्दय (११)- आपल्या सामर्थ्यांनीं आमच्या शत्रूंना नष्ट करून टाक.

रुद्रः (१५)– तूं शत्रूंना रडवणारा आहेस.

अग्निः तिग्मेन शोचिषा विश्वं अत्रिणं नियंसत् (२१)- अग्नि आपल्या तीक्ष्ण ज्वालेनें सर्व खादाड शत्रूंना नष्ट करतो. '**अत्रिः**'– खादाड शत्रु (**अत्ति इति अत्रिः**)

नः अंहसः रीषतः रक्ष (२४)– आमचें पापी हिंसक शत्रूंपासून संरक्षण कर.

अजरः तपिष्ठैः प्रतिदह (२४)– तूं जरारहित–सदा तरुण असणारा आपल्या तेजांनीं शत्रूंना जाळून टाक.

विश्पतिः रक्षसः तपानः (३९)– प्रजेचें पालन करणारा अग्नि राक्षसांना तापवून नष्ट करणारा आहे.

सनात् यातुधाना जुणासि (८०)– नेहमीं यातना देणाऱ्या शत्रूंना तूं विनष्ट करतोस.

त्वा पृतनासु रक्षांसि न जिग्युः (८०)– तुला युद्धामध्यें राक्षस जिंकूं शकत नाहींत.

सहमूरान् क्रव्यादो अनुदह (८०)– मूर्खांसह राहणारे जे कच्चें मांस खाणारे शत्रु आहेत, त्यांना जाळून टाक.

ते दैव्यायाः हत्याः मा मुक्षत (८०)– ते शत्रु दिव्य शस्त्रांच्या माऱ्यापासून सुटूं नयेत.

हरसा यातुधानस्य हरः बलं विश्वतः परि प्रतिशृणाहि (९५)– आपल्या सामर्थ्यानें दुष्टांचें सर्व संहारक बल सर्व प्रकारें विनष्ट करून टाक.

रक्षसः बलं न्युब्ज (९५)– राक्षसांचें बल नष्ट कर.

स्रिधः अपकरत् (१०२)– शत्रूंना दूर कर.

तस्य मर्त्यः रिपुः मायया चन न ईशते (१०४)– त्याचा मरणारा शत्रु आपल्या कौशल्यानें पुनः सामर्थ्यवान् बनूं नये.

त्यं वृजिनं रिपुं दुराध्यं स्तेनं दविष्ठं अपास्य (१०५)– त्या पापी दुराराध्य चोर शत्रुला दूर फेंकून दे.

मायिनः रक्षकः तपसा निर्दह (१०६)- कपटी राक्षसांना आपल्या तेजानें जाळून टाक.

सदने कंचित् अत्रिणं आ सासह्याम (११३)– आपल्या घरांत अथवा राष्ट्रांत कोणी खादाड शत्रु आला तर त्यास पराभूत करूं या.

विश्वा रक्षांसि प्रतिषेधति (११४)– सर्व राक्षसांचा तो नाश करतो.

याप्रमाणें आपल्या सर्व शत्रूंचा–वैयक्तिक व राष्ट्रीय शत्रूंचा नाश करण्याचा विचार या आग्नेय कांडामध्यें सांगितला आहे. सर्व काळांमध्यें व सर्व स्थानांमध्यें शत्रूंचा नाश करण्यासाठीं अशीच इच्छा प्रकट केली जाते. वाचकांनीं याप्रमाणें आपल्या शत्रूंना दूर करण्यासाठीं प्रयत्न करावे. आपलें सामर्थ्य वाढवावें, आपलें सांघिक बल वाढवावें, आपलें शस्त्रास्त्रांचें बल वाढवावें, आपलें सैन्य वाढवावें, आपलें युक्तिचें बल वाढवावें व आपले अन्तर्बाह्य सर्व शत्रु दूर करावें.

घोडे

अग्नि आपल्या रथास शीघ्रगामी घोडे जोडून नेतो. या विषयीं म्हटलें आहे--

ये तव साधवः आशवः अश्वासः अरं वहन्ति युंक्ष्व हि (२५)–

जे तुझे उत्तम शिक्षित व वेगानें जाणारे घोडे आहेत, जे तुला लवकर ओढून नेतात, ते घोडे तूं जोड व लवकर ये.

येथें घोडे हे अग्निचे किरण आहेत व घोड्यांचें वर्णन हें शुद्ध आलंकारिक वर्णन आहे. कारण अग्नि हा कांहीं घोड्यांच्या रथांत बसून कोठें जात नाहीं.

शरीर रूपी रथांत बसून आत्मा रूपी अग्नि या पृथिवीवर अवतरत असतो व याच्या रथामध्यें सर्व देव अंशरूपानें येत असतात. हें वर्णन अगदीं खरें आहे. या संबंधीं पुढें वर्णन योग्य वेळीं येईल.

येथील अग्निच्या रथाच्या घोड्यांचें वर्णन आलंकारिक आहे.

संरक्षण

अग्नि युद्ध करतो तें भक्तांचें संरक्षण करण्यासाठींच करतो हें उघड आहे. त्याला दुसरें कांहीं एक साधावयाचें नाहीं. भक्तांचे शत्रु दूर व्हावे व सर्व भक्त सुरक्षित रहावे हा त्याचा उद्देश आहे. भक्तांनीं हें लक्ष्यांत घेऊन आपलें सामर्थ्य वाढवावें व व निर्भय होऊन रहावें हें भक्तांना योग्य आहे.

त्वं त्राता सप्रथाः (४२)- हे अग्ने ! तूं आमचा सुप्रसिद्ध संरक्षण करणारा आहेस.

ऋचा वरेण्यं अवः यामि (४८)-- वेद मंत्रांच्या योगानें मी श्रेष्ठ संरक्षण प्राप्त करतों. वेद मंत्रांमध्यें जसें सांगितलें आहे, तसें आपण आपलें बल वाढवावें व आपण आपलें संरक्षण करावें. हेंच ' **वरेण्यं अवः** ' श्रेष्ठ संरक्षण होय.

शीरशोचिषं अग्निं अवसे गाथाभिः ईडिष्व (४९)-- विशेष तेजस्वी अग्निची आपल्या संरक्षणासाठीं वेद मंत्रांनीं स्तुति करा. ही वेदमंत्रांची स्तुति केली असतां अग्निचे गुण कोणते आहेत, त्याची ओळख पटते. ते गुण आपण आपल्या अंगीं आणावे अशी सुबुद्धि उपासकाला होते व त्यासाठीं तो प्रयत्न करतो व श्रेष्ठ बनतो.

अग्ने ! नः ऊतये ऊर्ध्वः सुतिष्ठ (५७)-- हे अग्ने ! आमच्या संरक्षणासाठीं उभा रहा. अग्नि नेहमी (**अग्नेः ऊर्ध्व-ज्वलनं**) अग्निचें जळणें ऊर्ध्व गतिनेंच होत असतें. पाणी खालच्या बाजूनें वाहत असतें. अग्नि कधींहि खालच्या बाजूनें जळत नाहीं. उंच उभें रहावें, सरल उंच उभें रहावें. हें वीरतेचें लक्षण आहे. ' **समं कायशिरोग्रीवं धारयन् अचलं स्थिरः** ' (गीता) आपलें शरीर, आपला पाठीचा कणा, गळा व डोकें हें सम सूत्रामध्यें असावें. असें उभें रहावें, बसावें व चालावें हें वीरतेचें द्योतक आहे व हें दीर्घायु करणारेंहि आहेच.

त्वं यस्य सख्यं आविथ, स तव सुवीराभिः वाज कर्मभिः ऊतिभिः प्रतरति (१०८)- तूं ज्याच्याशीं सख्य करतोस तो तुझ्या उत्तम वीरतायुक्त बलशाली प्रभावांनीं युक्त अशा संरक्षणांनीं दुःखांतून पार होतो. उत्तम वीरता व सामर्थ्याचीं कार्यें करून दुःखांतून पार होतां येतें.

वयं तव सख्ये मा रिषाम (६६)- आम्ही तुझ्या सख्यानें विनष्ट होणार नाहीं.

विश्वाः मायाः अवसि (७५)- शत्रूंचीं सर्व कपट जाळें दूर करून तूं आमचें संरक्षण करतोस.

मतिः अदितिः ऊत्या दिवा नः आगमत्, सा शंतातिः मयः करत् (१०२)- अदीन मनन शक्ति संरक्षण शक्तिसह दिवसा आज आमच्याकडे आली आहे, ती शान्ति व सुख निर्माण करील.

ही संरक्षणाची शक्ति आहे. ' **अ-दिति** ' म्हणजे ' अ-दीनता ' आपली मति दीनतेनें भरलेली नसावी- ती दीनतेनें विरहित परम उत्साहानें युक्त असावी. संरक्षण शक्ति दीनतेनें युक्त असूंच शकत नाहीं अदीनता व संरक्षण क्षमता यांची जोडी सदा असते. ती अदीन संरक्षण क्षमता आम्हांला आजच्या आज दिवसा प्राप्त व्हावी. दिवसा आम्ही उद्योगधंद्यांत लागलेले असतों. त्यावेळीं उत्साहमय संरक्षण शक्ति आमच्याकडे जागरूक असावी. अशी उत्साहमय सुबुद्धि आमचें संरक्षण करील.

' **मतिः अदितिः ऊतिः** '— बुद्धि, अदीनता व संरक्षण शक्ति या तिघांचें सहाय्य उन्नति करणारें असतें.

धन पाहिजे

मनुष्यांना धन पाहिजे असतें. प्रत्येक कार्याला धनाची गरज असते. अग्नि हा धनदाता आहे; म्हणून त्याला ' **द्रविणस्युः** ' (४)- असें म्हणतात. याच्याजवळ उपासक धन मागतात.

अस्मभ्यं महे ऊतये विवस्वत् आ भर (१०)- आम्हांला महान् संरक्षणासाठीं निवासस्थान भरेल असें धन भरपूर दे.

नः रयिं वंसते (२२)- तो अग्नि आम्हांला धन देतो.

दाशुषे रत्नानि दधत् (३०)- तो दात्याला रत्नें देतो.

उषसः विवस्वत् चित्रं राधः दाशुषे आवह (४०)-- उषःकालीं तेजस्वी विलक्षण धन दात्याला दे ।

वसो ! त्वं विभ्रः । ऊत्या राधांसि नः चोद (४१)- हे निवासका ! तूं विलक्षण सामर्थ्यवान् आहेस. आमच्या संरक्षणाबरोबर अनेक प्रकारचीं धनें आमच्याकडे पाठव

त्वं अस्य रायः रथीः असि (४१)- तूं या धनाचा रथी आहेस. या धनाला आणणारा आहेस.

हे पावक ! नः शंस्यं वयोवृधं रयिं रास्व (४३)- हे पवित्रता करणाऱ्या अग्निदेवा ! आम्हांला प्रशंसनीय व वय वाढवणारें अथवा यशस्वी धन दे.

सुनीती पुरुस्पृहं सुयशस्तरं नः रास्व (४३)- उत्तम नीतिच्या मार्गांनीं उत्तम प्रशंसनीय सुयश वाढवणारें धन आम्हांला दे.

विश्वा वसु दीयते (४४)- सर्व प्रकारचें धन तो देतो.

श्रुतं अग्निं नरः सुदीतये छर्दिः (४९)- या सुप्रसिद्ध अग्निजवळ लोक उत्तम प्रकाशयुक्त घर मागतात.

यः मर्तः राये निनीषति (५८)- जो मनुष्य धनासाठीं तुझी उपासना करतो.

अयं अग्निः सौभगस्य राय ईशे (६०)- हा अग्नि उत्तम भाग्य व धन यांचा स्वामी आहे.

स्वपत्यस्य गोमतः ईशे (६१)- उत्तम संतान व गाई यांचा हा स्वामी आहे.

वार्यं यक्षि यासि च (६१)- स्वीकारण्यास योग्य धन देतोस व प्राप्त करतोस.

ते भद्रा रातिः इह अस्तु (७५)- तुझें कल्याण करणारें दान आम्हांस येथें मिळो.

विधते ते वयांसि वसूनि यन्ता तनूपा भवतु (७७)- तुझ्या उपासकाला अन्नें व धनें देणारा व शरीराचें रक्षण करणारा हो.

ओजिष्ठं द्युम्नं अस्मभ्यं आभर (८१)- बलवर्धक तेजस्वी धन आम्हांला भरपूर दे.

बृहदर्च, त्वत् महिषी रयिः त्वद् वाजाः उदीरते (८५)- पुष्कळ धन आम्हांस दे. तुझ्याकडून पुष्कळ अन्न व धन आम्हांस मिळो.

त्वा महे राये समिधीमहि (९३)- तुझी स्तुति अधिक धन मिळण्यासाठीं आम्ही करतों.

अस्मे महि श्रवः देहि (९९)-आम्हांस पुष्कळ यशस्वी धन दे.

भद्रा रातिः (१११)- तुझें दान कल्याण करणारें आहे.

तत् द्युम्नं आभर (११३)- तें तेजस्वी धन आम्हांस दे.

अयं ध्रुवः रयीणां आचिकेतत् (१०१)- हा ध्रुव अग्नि धनांना जाणतो. धन कसें प्राप्त करावें तें हा जाणतो.

धनासाठीं लोक अग्निची उपासना करतात, कारण तो धन कसें प्राप्त करावें त्याचा मार्ग उत्तम रीतिनें जाणतो.

वडवाग्नि

वडवाग्निचें वर्णन या आग्नेय कांडामध्यें आहे तें असें आहे—

समुद्रवाससं अग्निं आहुवे (१८)- समुद्रामध्यें वास करणाऱ्या अग्निची मी स्तुति करतों. समुद्रामध्यें वडवाग्नि असतो.

सूर्य हा अग्नि आहे

सूर्य हा स्वर्गामध्यें असतो, त्याचें आग्नेय रूप आहे. या सामवेदाच्या आग्नेय काण्डामध्यें त्याचें वर्णन असें आलेलें आहे—

परो दिवि यत् इध्यते, आदित् प्रत्नस्य रेतसः वासरं ज्योति पश्यन्ति (२०)- द्युलोकाच्या वर जें आहे तें पुरातन वीर्याचें तेज दिवसाला प्रकाशतें, तें लोक पाहतात. दिवसाला सूर्य उदय झाल्यानंतर जें सूर्याचें तेज चमकतें, तें फार मोठें वीर्यवान् तेज आहे. तेंच सर्व लोक आकाशांत पाहत असतात.

विश्वाय सूर्यं दृशे केतवः जातवेदसं देवं उद्वहन्ति (३१)- सर्वांना सूर्यदर्शन व्हावें यासाठीं प्रकाशाचे किरण ज्ञानी देवाला-सूर्यरूपी अग्निला-आकाशामध्यें धारण करतात.

हा आकाशांत दिसणारा सूर्य हें अग्निचेंच रूप आहे.

अग्निमन्थन

यज्ञामध्यें जो अग्नि वापरला जातो, तो दोन अरणींच्या मंथनापासून उत्पन्न होतो, तोच वापरण्यांत येतो. अधरारणि व उत्तरारणि अशा दोन अरणी असतात. त्यांचें मंथन करून हा अग्नि उत्पन्न करतात व त्याला यज्ञस्थानीं स्थापन करतात व त्यांत सर्व हव्य पदार्थांचें हवन केलें जातें. या मन्थनासंबंधीं या सामवेदाच्या अग्निकाण्डामध्यें असें या मन्थनाचें वर्णन आहे-

अथर्वा त्वां विश्वस्य वाघतः मूर्ध्नः पुष्करात् निर मन्थत (९)— अथर्व्यानें तुज अग्निला सर्व स्तुति करणाऱ्या

ऋत्विजांच्या समूहामध्यें मूर्धा स्थानीं असलेल्या पुष्करापासून मन्थन करून निर्माण केलें आहे. हें पुष्कर म्हणजे अधरारणीचें स्थान होय. मन्थन केल्यानें तेथें अग्नि उत्पन्न होतो. अथर्वा हा यज्ञामधील ' ब्रह्मा ' नामक ऋत्विज होय. याच्या अध्यक्षते खालीं, हें अग्निमंथन होत असतें.

पुष्कर— कमल, तरवारीची धार, बाण, हवा, अन्तरिक्ष, पाणी, संग्राम, हत्तीच्या सोंडेचा अग्रभाग, तलाव, सर्प, सूर्य, मेघ.

वाघतः— यज्ञकर्तागण, स्तुति करणारे.

अग्निं देवा जनयन्त (६७)— अग्निला देवांनीं उत्पन्न केला.

दिवः मूर्धानं पृथिव्याः अरतिं वैश्वानरं ऋत आजातं अग्निं (६७)— द्युलोक हा मूर्धास्थानीं व पृथिवी ही खालच्या स्थानीं, अशा या दोन अरणींपासून यज्ञामध्यें वैश्वानर अग्नि झाला आहे.

नरः दीधितिभिः अरण्योः हस्तच्युतं प्रशस्तं दूरे दृशं गृहपतिं अथर्युं अग्निं जनयन्त (७२)— यज्ञ करणारे ऋत्विज अरणींमधून प्रशंसेला योग्य, दूरून दिसणाऱ्या गृहस्वामीरूप, सतत प्रगतिशील, ज्वालांनीं तेजस्वी दिसणाऱ्या अग्निला उत्पन्न करतात.

अरणीमधून हातांनीं या अग्निला ऋत्विज यज्ञासाठीं उत्पन्न करतात.

जातवेदा अग्निः अरण्योः निहितः दिवे दिवे ईड्यः (७९)— जातवेदा अग्नि अरणींपासून उत्पन्न झाल्यानंतर तो यज्ञकुंडामध्यें ठेवला जातो व प्रति दिवशीं त्यांत हवन केलें जातें.

अग्निः जनानां समिधा अबोधि (७३)— अग्नि ऋत्विजांच्या समिधांनीं प्रदीप्त केला जातो.

अयं अग्निः दिवः ककुत्, पृथिव्या मूर्धा पतिः अपां रेतांसि जिन्वति (२७)— हा अग्नि द्युलोकाचा शिरोभाग, पृथिवीवरील जगताच्या उच्च भागीं राहणारा सर्वांचा पालक आहे व हा कर्मांचें सत्व प्राप्त करतो.

याप्रमाणें अधरारणी व उत्तरारणी-मधून मन्थनानें अग्नि उत्पन्न होतो. ज्यांनीं यज्ञामध्यें अग्नि अरणींपासून कसा उत्पन्न होतो तें पाहिलें असेल त्यांच्या ध्यानांत हें सर्व येईलच.

आतां येथें अरणींविषयीं थोडें अधिक ज्ञान देणें योग्य होईल म्हणून तें येथें संक्षेपानें दाखवलें जात आहे.

अग्नि उत्पन्न करण्याच्या अरणी दोन असतात. एक खालीं असते व दुसरी वर असते. दोघांच्या घर्षणानें अग्नि उत्पन्न होतो.

' पृथिवी ' ही अधरारणी आहे व आकाश- ' द्युलोक ' ही उत्तरारणी आहे. या दोन अरणींमधून सूर्यरूपी अग्निचा उदय होतो. ह्या दोनही अरणींमध्यें गति आहे.

दोन मेघ एके ठिकाणीं आले म्हणजे त्यांतून विद्युत् रूपी अग्नि उत्पन्न होतो. वीज चमकते असें यास आपण म्हणतों.

स्त्री व पुरुष या दोन अरणी आहेत. स्त्री ही अधरारणी आहे व पुरुष हा उत्तरारणी आहे. यांच्या संबंधापासून पुत्ररूपी अग्नि उत्पन्न होतो.

विद्या ही अधरारणी आहे व आचार्य हा उत्तरारणी आहे. यामधून ' ज्ञानी तरुण ' तयार होतो. तो ज्ञानाग्निनें प्रकाशतो.

अशा रीतीनें हे अग्नि उत्पन्न होत असतात व हे सर्व वंदनीय होत असतात. यांना सर्व लोक नमस्कार करीत असतात. यज्ञाग्नि हें या सर्वांचें प्रतीक आहे. या यज्ञाग्निला नमन केलें जातें. याविषयीं खालील मंत्र पाहण्यासारखे आहेत—

अग्निला नमन

दिवे दिवे दोषावस्तः धिया नमो भरन्त एमसि (१४)— प्रतिदिवशीं व रात्रीं व दिवसा बुद्धिपूर्वक नमस्कार करीत आम्हीं तुझ्याजवळ येत असतों.

अध्वराणां सम्राजं अग्निं नमोभिः वन्दध्यै (१७)- यज्ञांचा सम्राट् अग्नि आहे. त्याला आम्ही नमस्कार किंवा अन्नाच्या आहुती देऊन वन्दन करतों. **नमः**- अन्न, नमन.

यं कृष्टयः नमस्यन्ति (५४)— ज्या अग्निला मनुष्य नमस्कार करतात.

अशा प्रकारें अग्निला नमन केलें जातें व त्यांत अन्नाची आहुति दिली जात असते.

प्रकाशाची ज्योति

अग्नि ही प्रकाशाची प्रदीप्त अशी ज्योति आहे. सज्जन या अग्निला प्रदीप्त करतात. पहा—

कण्वे दीदेथ (५४)— कण्वाच्या आश्रमांत हा अग्नि प्रकाशित किंवा प्रदीप्त होत राहतो.

शश्वते जनाय ज्योतिः (५४)— लोकांमध्यें ही शाश्वत ज्योतिच प्रकाशित होत आहे.

ऋतः जातः उक्षितः (५४)— यज्ञासाठीं अग्नि उत्पन्न केला जातो व नंतर तो प्रकाशित होत असतो.

मनुः त्वा दधे (५४)— मननशील मनुष्य तुला सतत धारण करून ठेवीत असतो.

अग्नि प्रदीप्त झाल्यावर त्याला आसन देऊन त्याचा सत्कार केला जातो; कारण तो अतिथि आहे. अतिथिचा सत्कार करणें योग्य आहे.

अतिथिला आसन

अध्वरं बर्हिः (२८)— यज्ञामध्यें आसन पसरलेलें असतें.

बर्हिः आसदं इयेथ (२३)— आसनावर बसण्यासाठीं ये. यज्ञामध्यें अग्निप्रमाणें सर्व देवांसाठीं अशीं आसनें पसरून ठेवलेलीं असतात व देव येऊन त्यांवर ते बसतात.

वीर पुत्र

यदि वीरः स्यात् मर्त्यः अग्निं इन्धीत (८२)— जर वीर म्हणजे पुत्र झाला तर मनुष्य अग्निला प्रदीप्त करतो व त्यांत तो हवन करतो.

अग्निची स्तुति

अरणीमधून अग्नि उत्पन्न केला जातो, त्याला यज्ञकुंडांत स्थापन करून नंतर त्यास इन्धन देऊन प्रदीप्त करतात व त्याची स्तुति ऋत्विज करूं लागतात. या स्तुतिला ' विपन्या ' असें म्हणतात. या स्तुतिविषयीं अग्निकाण्डाच्या या मंत्रांत असें म्हटलें आहे—

प्रेष्ठं अतिथिं स्तुषे (५)— या इष्ट अग्निची स्तुति करतों.

इतरा गिरः सु ब्रवाणि (७)— मी अधिक स्तुति करतों.

त्वां गिरा कामये (८)— आपल्या वाणीनें तुझी प्राप्ति व्हावी असें मी इच्छितों.

यजिष्ठं गिरा ऋञ्जसे (१२)— पूज्य अग्निची आपल्या वाणीनें स्तुति करतोस.

विशे विशे यज्ञियाय रुद्राय दृशीकं स्तोम (१५)- प्रत्येक प्रजाजनाच्या हितासाठीं पूजनीय व शत्रूंना रडविणाऱ्या अग्निच्या स्तुतिचें हें सुंदर स्तोत्र आहे.

कविं सत्यधर्माणं अमीवचातनं देवं उपस्तुहि (३२)— ज्ञानी सत्यपालक व रोग दूर करणाऱ्या अग्नि देवाची स्तुति कर.

वयं जातवेदसं अमृतं, प्रियं मित्रं न, प्रशंसिषम् (३५)— आम्ही ज्ञानी अमर अग्निची, प्रिय मित्राप्रमाणें, स्तुति करीत आहों.

एना नमसा, ऊर्जोनपातं प्रियं चेतिष्ठं अरतिं स्वध्वरं विश्वस्य दूतं अग्निं आहुवे (४५)— नम्रतापूर्वक, बल कमी न करणाऱ्या, प्रिय व ज्ञान देणाऱ्या प्रगतिशील उत्तम यज्ञ करणाऱ्या विश्वाच्या दूत रूप अग्निची मी स्तुति करतों.

यं अन्ये इन्धते, देवयतीनां पुरूणां विशां यज्ञं सूक्तेभिः वचोभिः वृणीमहे (५९)— ज्याला दुसरे ऋत्विजही प्रदीप्त करतात, त्या सर्व देवत्व प्राप्त करणाऱ्या प्रजांना प्रिय अग्निची आम्ही सूक्तांनीं व भाषणांनीं स्तुति करतों.

अर्हते जातवेदसे इमं स्तोमं, रथं इव, मनीषया सं महेम (६६)— पूजनीय अग्निसाठीं हें स्तोत्र, रथाप्रमाणें, आमच्या बुद्धिनें भक्तिनें म्हणतों.

सुष्टुतयः गिरः त्वा वाजयन्ति (६८)— उत्तम स्तुतिचीं वचनें तुला वर्णितात.

प्रशस्तं सम्राजं प्रस्तौतु (७८)— प्रशंसित सम्राट् अग्निची स्तुति करो.

पुरुप्रियः विशः अतिथिः अग्निः प्रातः स्तवेत (८५)— सर्वांना प्रिय व प्रजांना अतिथिप्रमाणें पूज्य अशा अग्निची सकाळीं स्तुति करावी.

वः दुर्यं शूषस्य मन्मभिः वचः स्तुषे (८७)— आपल्या घरांत राहणाऱ्या अग्निची उत्तम सुखकारक स्तोत्रांनीं व भाषणांनीं स्तुति करतों.

विप्रां ज्योतींषि बिभ्रते वेधसे अग्नये बृहत् पूर्व्यं वचः प्र भरत (९८)— ज्ञान्यांची ज्योति धारण करणाऱ्या, यज्ञ करणाऱ्या अग्निसाठीं मोठें अपूर्व स्तोत्र म्हणा.

प्रतीव्यां ईडिष (१०३)— शत्रूचा प्रतिकार करणाऱ्या अग्निची स्तुति करा.

मंहिष्ठाय ऋतावने बृहते शुक्रशोचिषे अग्नये प्रगायत (१०७)— महान यज्ञ करणाऱ्या मोठ्या शुद्ध प्रकाशयुक्त अग्निचीं स्तोत्रें गा.

यजिष्ठं देवत्रा देवं अमर्त्यं होतारं यज्ञस्य सुक्रतुं त्वा ववृमहे (११२)— यज्ञ करणाऱ्या देवांमध्यें असणाऱ्या अमर होत्या, यज्ञाचें कर्म उत्तम रीतिनें करणाऱ्या तुज अग्निची आम्ही स्तुति करतों.

याप्रमाणें अग्निची स्तुति करावी, अशा अर्थाचीं वचनें या अग्निकाण्डांत आहे. व्यक्तिशः व संघशः स्तुति अशा रीतिनें अग्निची केली जाते.

अग्नि दूत आहे

अग्नि मध्यें जें कांहीं हवन केलें जातें तें ठिकठिकाणीं पोंचवण्याचें काम अग्नि करतो. अशा हा अग्नि उत्तम दूत आहे.

दूतं अग्निं वृणीमहे (३)— अग्नि हा दूत म्हणून आम्ही स्वीकारतों.

विश्ववेदसं अमर्त्यं दूतं (१२)— सर्वज्ञ अशा हा अमर दूत आहे.

याच्याजवळ जें दिलें जातें तें सर्व हा जेथें तें पोंचवावयाचें असतें, तेथें तें तो पोंचवतो. या गुणांमुळेंच अग्निमध्यें केलेलें हवन अनेक प्रकारांनीं उपयोगांत येतें. व्यक्तिचा लाभ व समुदायाचा लाभ असे दोनही लाभ यामुळें होत असतात. यज्ञापासून हेच लाभ होतात.

यज्ञ

अग्निमध्यें यज्ञामींत अनेक हवनीय पदार्थांचें हवन केलें जातें हें सर्वांस माहित आहे. ऋतुंच्या संधीमध्यें व्याधि होतात, त्यांचा नाश करण्यासाठीं यज्ञ केले जातात असें गोपथ ब्राह्मणांत सांगितलें आहे. आरोग्यसंवर्धनासाठीं असे यज्ञ केले जातात. या यज्ञांविषयीं या आग्नेयकाण्डांत असें म्हटलें आहे—

अध्वराणां न–सा (२१)— अहिंसापूर्ण कर्मांना करणारा. **न–सा**— पतन न करणारा, उत्थान करणारा. हिंसारहित कर्म करणारा.

नः यज्ञं देवाः नर्यं पंक्तिराधसं वीरं अच्छ नयन्तु (५६)— आमच्या यज्ञांत सर्व देव मानवांचें हित करणाऱ्या, समूहाचें यश वाढवणाऱ्या वीर अग्निला येथें आणोत.

त्वं गृहपतिः, नः अध्वरे त्वं होता, पोता, प्रचेताः (६१)— तूं गृहस्वामी आहेस, आमच्या यज्ञांत तूं देवांना बोलावून आणणारा, पवित्रता करणारा व उत्तम चेतना करणारा आहेस.

शिशोः तरुणस्य वक्षथः चित्रः यः धातवे मातरौ अपि न एति (६४)— या तरुण अग्निरूप मुलाचा विलक्षण जीवनक्रम आहे. हा आपल्या पोषणासाठीं आपल्या मातांजवळ–अरणींजवळ–जात सुद्धां नाहीं.

महि दूत्यं चरन् ववक्ष (६५)— उत्पत्तिनंतर मोठें दूत कर्म करीत हवि देवांना पोंचवण्यास लागतो.

असा हा यज्ञ करणारा आहे. या अग्निमध्यें हवन केलें जातें, त्या संबंधीं मंत्रांत असें म्हटलें आहे—

हवन

यज्ञामध्यें हवन मुख्य आहे. हवन करण्यापूर्वी अग्निची स्तुति केली जाते. या स्तुतिचे मंत्र चालू असतांना अग्नि प्रदीप्त केला जातो व नंतर त्यांत हवन केलें जातें. या हवनासंबंधीं या काण्डांतील मंत्रांत अशीं वचनें आहेत—

वीतये हव्यदातये गृणानः आयाहि (१)— हवि भक्षण करण्यासाठीं व हवि पोंचवण्यासाठीं तुझी–अग्निची–स्तुति केली जाते, असा तू आमच्या जवळ ये.

विश्वेषां यज्ञानां होता (२)– सर्व यज्ञांमध्यें होता तूं आहेस.

देवेभिः मानुषे जने हितः (२)– देवांनीं मानवांमध्यें या अग्निला ठेवलें आहे.

समिद्धः शुक्र आहुतः (४)– प्रदीप्त करून शुद्ध अग्निमध्यें आहुति दिल्या जातात.

हव्यवाहः (१२)– हवि जेथें पोंचवावयाचें तेथें हा पोंचवतो.

मनसा अग्निं इन्धानो मर्त्यः धियं सचेत (१९)– मनः पूर्वक अग्निला प्रदीप्त करणारा मनुष्य आपली श्रद्धा वाढवतो.

स्वाहुतः सूरयः ते प्रियासः सन्तु (३८)– उत्तम आहुति देणारे ज्ञानी तुला प्रिय होवोत.

हे दीदिवः ! त्वां समिधानं वेधसः विप्रासः आविवासन्ति (४२)– हे प्रकाशमान अग्ने ! तुला प्रदीप्त करून ते ज्ञानी विप्र तुझी सेवा करतात.

भद्रः अध्वरः (१११)– यज्ञ कल्याण करणारा आहे.

मर्तासः त्वा समिन्धते (४६)– मनुष्य तुला योग्य रीतिनें प्रदीप्त करतात.

अतन्द्रः हविष्कृतः हव्यं वहसि (४६)– आळस सोडून हवि देणाऱ्यांचें हवनीय द्रव्य तूं योग्य ठिकाणीं पोंचवतोस.

उक्थे अग्निः पुरोहितः (४८)– उक्थ यज्ञामध्यें अग्नि मुख्य स्थानीं स्थापन केला जातो.

अग्ने ! बृहतः रोचनात् अधि अया तन्वा वर्धस्व (५२)– हे अग्ने ! द्युलोकावर या प्रज्वलित शरीरानें वाढत रहा.

हे सुक्रतो ! गिरा मम जाता पृण (५२)– हे उत्तम कर्म करणाऱ्या अग्ने ! आपल्या वाणीनें माझ्या पुत्रपौत्रांचें पोषण कर.

पूर्णा आसिचं विवष्टु (५५)– पूर्ण भरलेल्या स्रुचेचा–या अर्पणाचा–स्वीकार कर.

उत् सिचध्वं, उप पृणध्वं, आदित् देवः वः ओहते (५५)– वरून घृताची आहुति द्या, पुनः भरून आहुति द्या, असें केल्यानें हा अग्निदेव तुम्हांस उन्नतिला नेईल.

हविषा आ जुहोतन (६३)– हविर्द्रव्याचें हवन करा.

इडः पदे पस्त्यानां रातहव्यं नमसा समर्पय (६३) पृथिवी वर यज्ञस्थानामध्यें यज्ञांत हव्य देणाऱ्याबरोबर देवाला नमस्कार ही करा.

अमर्त्ये विश्वे मर्तासः हव्यं इन्धते (८५)– अमर अग्निमध्यें सर्व याजक मनुष्य हवनीय पदार्थांचें हवन करतात.

भानवे अग्नये बृहद् वयः (८८)– तेजस्वी अग्निमध्यें पुष्कळ अन्नाचें हवन केलें जातें.

हव्य-दातये अग्नये ददाश (१०४)– हव्य पदार्थांचें ज्यांत हवन केलें जातें त्या अग्निला अर्पण करा.

स्वर्नरं तं गूर्धय (१०९)– स्वर्गाला हवि पोंचवणाऱ्या अग्निची स्तुति कर.

देवत्रा हव्यं आ ऊहिषे (१०९)– देवांकडे हव्य पोंचवतोस.

सुहोता स्वध्वरः पुरुप्रशस्तः वसुः (११०)– ज्यांत उत्तम हवन होतें, ज्यांत उत्तम यज्ञ होतो, असा पुष्कळ प्रशंसित व निवासक असा हा अग्नि आहे.

आहुतः अग्निः नः भद्रः (१११)– हवन ज्यांत होत आहे असा हा अग्नि आमचें कल्याण करणारा आहे.

या हवन मंत्रांचा नीट विचार झाला, म्हणजे यज्ञ किंवा यज्ञाग्नि हा आमचें (**भद्रः**) कल्याण करणारा कसा आहे तें समजून येईल.

प्रथमतः अग्नि अरणींच्या घर्षणानें उत्पन्न केला जातो. तो स्थंडिलामध्यें ठेऊन तो समिधा घालून व तुपाच्या आहुती देऊन पेटवला जातो. अग्नि पेटला म्हणजे तो जवळची हवा तापवतो. तो तापलेला वायु वर जातो व तेथें भोंवतालचा वायु येऊं लागतो. अशी क्रिया अग्नि पेटत राहतो तेथपर्यंत चालू राहते. यज्ञ जितके दिवस चालेल तितके दिवस जवळची हवा तापून वर जाणें व तेथें दुसरी हवा येणें चालू असतें. हवा शुद्ध होण्याचा हा एक लाभ यज्ञापासून होतो.

पूर्वी प्रत्येक घरीं यज्ञ होत असे. समजा एक तासभर घरचा अग्नि पेटत राहिला तर घरांतील हवा वर जाईल व तेथें बाहेरची हवा येईल. प्रत्येक घरांत अग्नि पेटवला, तर प्रत्येक घराला अशी हवा पालट झालेली अनुभवाला येईल.

चार मार्ग एकठिकाणीं येतात तेथें अथवा शहराच्या मध्य भागीं मोठी यज्ञशाला पूर्वी असे. तेथें मोठा यज्ञ होत असे. यामुळें ही तेथील हवा तापून वर जाणें व तेथें बाहेरची हवा येणें हें चालूच राहत असे. अशा रीतिनें वायु परिवर्तन यज्ञाग्निच्या जळत राहण्याचें होत राहतें व तें लाभदायक असतें.

यज्ञामध्यें नुसताच अग्नि जळत नाहीं, तर त्यांत गाईचें घृत आहुतींच्या द्वारें घातलें जातें. हें गाईचें तूप अग्निमध्यें जळतें व त्याचा जो कोळसा होतो, तो हवेंत पसरतो व त्यामुळें हवेंतील रोगसंवर्धक विष नष्ट होतें. गाईच्या तुपाच्या कोळशामध्यें हवेंतील विष नाश करण्याचा उत्तम गुण आहे. यज्ञाग्नि हा अशा प्रकारें वायुला रोगबीजरहित करणारा आहे.

यज्ञामध्यें याशिवाय ऋतुपरत्वें निरनिराळया हवनीय द्रव्यांचें हवन केलें जातें. ज्या ऋतुमध्यें हवेंत बदल झाल्यामुळें जे रोग होण्याची शक्यता असते, ते रोग दूर करणाऱ्या वनस्पति अथवा त्यांच्या कषायानें तयार केलेलें गाईचें तूप हवन केलें जातें. यामुळें हा यज्ञाग्नि रोग दूर करणारा व आरोग्य पाठवणारा होत असतो.

ऋतुसंधिषु वै व्याधिर्जायते ।
ऋतुसंधिषु यज्ञाः क्रियन्ते । (गोपथ ब्राह्मण)

' ऋतुसंधिमध्यें व्याधि होतात, त्या व्याधींच्या शमनार्थ यज्ञ केले जातात. ' हें गोपथ ब्राह्मणाचें म्हणणें येथें लक्ष्यांत घेणें योग्य आहे. या प्रमाणें यज्ञ हा शास्त्रीय दृष्टीनें फार महत्वाचा व व्यक्तिचें आणि समूहाचें आरोग्य वाढवणारा आहे.

वरील यज्ञविषयक व हवन विषयक मंत्रांमध्यें ' हा अग्नि आमचें सर्वतोपरि कल्याण करणारा आहे,' अशा अर्थाचीं जीं वर्णनें आहेत, तीं केवळ स्तुति करणारींच आहेत असें नसून, ती शास्त्रीय दृष्टीनें सत्य आहेत हें येथें वाचकांनीं लक्ष्यांत ठेवणें योग्य आहे.

या दृष्टींनीं कोणत्या रोग शमनार्थ कोणतें हवन करणें इष्ट आहे हें शास्त्रीय दृष्टीनें तपासून अनुभव घेऊन ठरवणें लाभदायक आहे. संशोधकांनीं या उपयोगाच्या दृष्टीनें हा विषय संशोधावा अशी त्यांस विनंति आहे.

या शिवाय यज्ञामध्यें यज्ञ करणाऱ्या यजमानाची, ऋत्विजांची शुभेच्छा व सद्भावना याच्यापाशीं असते व मंत्रोच्चारानें जी पवित्रता निर्माण होते ती अधिकच असते. ती कांहीं मोजमापानें मोजण्यासारखी नसते.

असो. याप्रमाणें यज्ञ व त्यांतील हवन हें कल्याण करणारें आहे. यासाठीं यज्ञ करूं शकणाऱ्या लोकांनीं याकडे आपलें लक्ष्य द्यावें.

उपमा

१ **मित्रं इव प्रियं** (५)– प्रिय मित्राप्रमाणें (अतिथि अग्निची स्तुति कर.) (मं. ३५)

२ **रथं न वेद्यं** (५)– धन देणाऱ्या रथाची स्तुति होते (त्याप्रमाणें अग्निची स्तुति होते.)

३ **वारवन्तं अश्वं न** (१७)– उत्तम अयाळ (मानेवरचे केंस) असलेल्या घोड्याप्रमाणें (ज्वाला निघत आहेत अशा अग्निला नमस्कार करतों.) घोड्याची अयाळ व अग्निच्या ज्वाला यांचें साम्य दाखवलें आहे.

४ **मधोः प्रथमानि पात्राः न** (४४)- मधाचीं (सोमरसाचीं) प्रथम देण्यासारखीं पात्रें असतात (त्याप्रमाणें स्तुतिस्तोत्रें दिलीं जावीत.)

५ **सविता देवः न** (५७)- सूर्याप्रमाणें (उच्च स्थानीं राहून अन्नाचें दान करणारा हो.)

६ **रथं इव** (६६)- रथाप्रमाणें (बुद्धिपूर्वक स्तोत्र कर.)

७ **पर्वतस्य पृष्ठात् अपः न** (६८)- पर्वतावरून जल प्रवाह वाहतात त्याप्रमाणें (तुम्हीं स्तोत्रें म्हटलीं जावीत.)

८ **अश्वा आजिं न जिग्युः** (६८)- घोडे युद्ध जिंकतात त्याप्रमाणें (तुझ्या स्तुति तुझें वर्णन करून यशस्वी होवोत.)

९ **धेनुः इव** (७३)- गाईप्रमाणें (सकाळीं अग्नि जागृत होतो.)

१० **यह्वा इव प्र वयां उज्जिहानाः** (७३)- मोठे वृक्ष जसे आपल्या शाखांना पसरवतात, (त्याप्रमाणें अग्नि आपल्या ज्वाला पसरवितो.)

११ **द्यौः इव असि** (७५)- द्युलोकाप्रमाणें (अग्नि प्रकाशतो.)

१२ **गर्भिणीभिः सुभृतः गर्भ इव** (७९)- गर्भिणी स्त्रिया ज्याप्रमाणें गर्भाला धारण करतात, (त्याप्रमाणें दोन अरणींमध्यें अग्नि असतो.)

१३ **सूरः न** (८३)- सूर्याप्रमाणें (आपल्या तेजानें अग्नि प्रकाशतो.)

१४ **मित्रः न** (८४)- सूर्याप्रमाणें (अग्नि यश प्राप्त करतो.)

१५ **मित्रं न** (८८)- मित्राप्रमाणें (अग्निला पुढें ठेवतात.)

१६ **नेमिः चक्रं न** (९४)- नाभि चक्राला धारण करते त्याप्रमाणें (सर्व स्तोत्रें अग्निच्या आश्रयानें राहतात.)

१७ **महस्य तोदस्य शरण इव** (९७)- मोठ्या श्रीमंताच्या नोकराप्रमाणें (मी अग्निचा सेवक आहे.)

या उपमा या आग्नेय काण्डांत आल्या आहेत. यांत '**न**' हें उपमार्थक आहे. '**इव**' प्रमाणें त्याचा अर्थ आहे.

आग्नेय काण्डांतील सुभाषितें

४ **समिद्धः शुक्रः वृत्राणि जंघनत्** - प्रदीप्त शुद्ध अग्नि वृत्रांना मारतो. **वृत्र**- व्यापक दोष, रोगोत्पादक कृमि.

६ **हे अग्ने ! विश्वस्य अरातेः, उत द्विषः मर्त्यस्य, महोभिः नः पाहि**— हे अग्ने ! सर्व शत्रूंपासून, तसेंच द्वेष करणाऱ्या मानवी शत्रूंपासून, आपल्या महान् सामर्थ्यानें आमचें रक्षण कर.

❀

९ **अथर्वा त्वां निरमन्थत**— अथर्व्यानें तुला मन्थन करून उत्पन्न केलें.

१० **अस्मभ्यं महे ऊतये विवस्वत् आभर**— आमच्या उत्तम संरक्षणासाठीं निवास करण्यास योग्य असें घर दे.

१० **नः दशे देवः असि**— आम्हांस मार्ग दाखवणारा तूं देव आहेस.

११ **हे अग्ने देव ! कृष्टयः ते ओजसे नमः कृण्वन्ति**- मनुष्य तुझ्या बलासाठीं तुला नमस्कार करतात.

११ **अस्मै अमित्रं अर्दयः**- याच्यासाठीं शत्रूचा नाश कर.

१२ **विश्ववेदसं अमर्त्यं दूतं गिरा ऋञ्जसे**- सर्वज्ञ अथवा सर्व धनवान् अमर अशा अग्नि दूताला स्तुतिनें अनुकूल बनवतों.

१४ **दिवे दिवे दोषावस्तः धिया नमो भरन्तः वयं त्वा उप एमसि**- दररोज रात्रीं व दिवसा बुद्धिपूर्वक नमस्कार करीत तुझ्याजवळ येत आहों.

१५ **जरा-बोध ! विशे विशे यज्ञियाय रुद्राय दृशीकं स्तोमं, तत् विविड्ढि**— हे स्तुतिनें ज्याचें ज्ञान होतें अशा अग्नि! प्रत्येक प्रजाजनांच्या हितासाठीं पूज्य व शत्रूंना रडविणाऱ्या अग्निचें हें स्तोत्र म्हटलें आहे तें तूं जाण.

२२ **अग्निः तिग्मेन तेजसा विश्वं अत्रिणं नियंसत्**- अग्नि आपल्या तीक्ष्ण तेजानें सर्व खादाड शत्रूंना नष्ट करतो. **अत्रि**- खादाड, रोगकृमि.

२२ **नः रयिं वंसते**- आम्हांस धन देतो.

२३ **हे अग्ने ! मृळ**- हे अग्ने ! आम्हांस सुखी कर.

२३ **महान् असि**- तूं मोठा आहेस.

२३ **देवयुं जनं आ अयः**- ईश्वराची उपासना करणाऱ्यांकडे त्यांच्या मदतीसाठीं जा.

२४ हे **अग्ने ! नः अंहसः रीषतः रक्ष**- हे अग्ने ! आमचें पापी व हिंसक शत्रूंपासून रक्षण कर.

२४ **अजरः तपिष्ठैः प्रति दह**- जरारहित असा तूं आपल्या ज्वालांनीं शत्रूंचें भस्म कर.

२६ **नक्ष्य विश्पते अग्ने ! वयं द्युमन्तं सुवीरं धीमहि**- हे शरण जाण्यास योग्य प्रजापालक अग्ने ! आम्ही तेजस्वी व उत्तम वीर अशा तुझें ध्यान करतों.

३० **वाजपतिः कविः दाशुषे रत्नानि दधत्**- अन्नांचा स्वामी व ज्ञानी हा अग्नि दात्याला रत्नें देतो-धनें देतो.

३१ **अध्वरे सत्यधर्माणं कविं अग्निं उपस्तुहि** - अहिंसापूर्ण यज्ञकर्मामध्यें सत्यधर्मप्रचारक ज्ञानी अग्निची स्तुति करा.

३१ देवं अमीव-चातनं– हा अग्निदेव रोग दूर करतो.

३३ नः पीतये शं– पाणी पिण्यासाठीं सुख देणारें होवो.

३३ नः शंयोः अभिस्रवन्तु– आम्हांला शांति व सुख हें जल देवो.

३५ वयं जातवेदसं अमृतं प्रशंसिषम्– आम्ही सर्वज्ञ अमर अग्निची प्रशंसा करतों.

३७ बृहद्भिः अर्चिभिः शुक्रेण शोचिषा दीदिहि– मोठ्या ज्वालांनीं व शुद्ध तेजानें प्रकाशित हो.

३९ विश्पतिः रक्षसः तपानः– तूं प्रजांचा पालक व राक्षसांना संताप देणारा आहेस.

४० हे जातवेद! त्वं अद्य उषर्बुधः देवान् आवह– हे ज्ञानी अग्ने ! तूं आज सकाळीं उठणाऱ्या देवांना घेऊन ये.

४१ त्वं चित्रः, ऊतया राधांसि नः चोदय– तूं विलक्षण शक्तिसंपन्न आहेस. संरक्षणासह धनांना आमच्याकडे प्रेरित कर.

४१ नः तुचे गाधं विदाः– आमच्या संततिसाठीं प्रतिष्ठा दे.

४१ हे त्रातः! त्वं स-प्रथाः ऋतः कविः– हे रक्षक अग्ने ! तूं प्रसिद्ध सत्य ज्ञानी आहेस.

४३ हे पावक! नः शस्यं वयोवृधं रयिं रास्व– हे पवित्र करणाऱ्या अग्ने ! आम्हांला प्रशंसनीय आयुष्य वाढवणारें धन दे.

४३ सुनीति पुरुस्पृहं सुयशस्तरं नः रास्व– उत्तम नीतिच्या मार्गानें मिळणारें, पुष्कळ ज्याची स्तुति करतात, ज्यानें उत्तम यश वाढतें असें धन दे.

४४ यः विश्वा वसु दयते– जो सर्व प्रकारचें धन देतो.

४७ आर्यस्य वर्धनं अग्निं नः गिरः नक्षन्तु– आर्यांचें संवर्धन करणाऱ्या अग्निची स्तुति आमच्या वाणी करतात.

४८ ऋचा वरेण्यं अवः यामि– वेदमंत्रांनीं श्रेष्ठ संरक्षण मागतो.

४९ श्रुतं अग्निं नरः सुदीतये छर्दिः– या प्रसिद्ध अग्नि जवळ लोक उत्तम प्रकाशयुक्त घर मागतात.

५६ देवाः नर्यं पंक्तिराधसं वीरं अच्छा नयन्तु– सर्व देव मानवजातींचें हित करणाऱ्या, समूहाला यशस्वी करणाऱ्या वीराला सरळ उन्नतिकडे नेवोत.

५७ हे अग्ने! ऊर्ध्वः सुतिष्ठ– हे अग्ने ! तूं उच्च स्थितिमध्यें रहा.

५८ यः ते दाशात् स उक्थशंसिनं सहस्रपोषिणं वीरं त्मना धत्ते– जो तुला हवि देतो तो मंत्र म्हणणाऱ्या हजारांचें पोषण करणाऱ्या वीर पुत्राला स्वतः धारण करतो. जन्म देतो.

६० अयं अग्निः सुवीर्यस्य सौभगस्य ईशे– हा अग्नि उत्तम पराक्रम व सौभाग्य यांचा स्वामी आहे.

६० स्वपत्यस्य ईशे– उत्तम संततिचा स्वामी आहे.

६० वृत्र-हथानां ईशे– घेरणाऱ्या शत्रूंना मारणाऱ्या वीरांमध्यें तो मुख्य वीर आहे.

६१ प्रचेताः वार्यं यक्षि– तूं ज्ञानी उत्तम धन देतोस.

६१ ऊतये सुभगं सुदंससं सुप्रतूर्तिं अनेहसं त्वा देवं ववृमहे– आमच्या रक्षणासाठीं उत्तम भाग्यवान्, उत्तम कर्में करणाऱ्या, पाप्यांचा नाश करणाऱ्या, निष्पाप अशा तुज देवाला आम्ही प्राप्त करतों.

६३ हविषा आजुहोत, मर्जयध्वं– हविर्द्रव्यानें हवन करा, शुद्धता करा.

६६ वयं तव सख्ये मा रिषाम– आम्ही तुझ्या मित्रभावामध्यें विनष्ट होणार नाहीं.

६९ अग्निं स्तनयित्नोः पुरा अवसे कृणुध्वं– अग्निला विद्युल्लतेपासून पूर्वी आपल्या रक्षणासाठीं उत्पन्न केलें.

७० अग्निः उषसां अग्रे अशोचि– अग्नि उषःकालापूर्वी प्रदीप्त झाला.

७२ नरः अरण्योः हस्तच्युतं गृहपतिं अग्निं जनयन्त– लोकांनीं अरणींना एकमेकांवर हातांनीं घासून गृहपति अग्निला उत्पन्न केलें.

७५ विश्वाः मायाः अवसि– सर्व प्रजांचें रक्षण करतोस.

७५ ते रातिः भद्रा– तुझें दान कल्याण करणारें आहे.

७६ नः सूनुः तनयः स्यात्, ते सुमतिः अस्मे विजावा भूतु– आम्हांस पुत्रपौत्र व्हावे अशी तुझी उत्तम इच्छा आम्हांसाठीं सफळ होवो.

८० सनात् यातुधानात् मृणसि– सदा तूं यातना देणाऱ्यांचा नाश करतोस.

८० त्वा पृतनासु रक्षांसि न जिग्युः– तुला युद्धांमध्यें राक्षस जिंकूं शकत नाहींत.

८० सह मूरान् क्रव्यादः अनुदह– समूळ कच्चें मांस खाणाऱ्यांना जाळून टाक.

८० ते दैव्याः हेत्याः मा मुक्षत– तुझ्या दिव्य शस्त्रापासून कोणी न सुटो.

८१ ओजिष्ठं द्युम्नं अस्मभ्यं आभर– बलवर्धक तेजस्वी धन आम्हांला भरपूर दे.

८१ पनीयसे राये नः प्र– स्तुत्य धन मिळवण्याचा मार्ग दाखीव.

८१ वाजाय पन्था रासि- अन्न मिळवण्याचा मार्गहि दाखव.

८१ यदि वीरः स्यात् मर्त्यः अग्निं इन्धीत- जर पुत्र झाला तर तो मनुष्य अग्नि प्रदीप्त करील.

८५ अस्मिन् अमर्त्ये विश्वे मर्तासः हव्यं इन्धते- या अमर अग्निमध्यें सर्व मनुष्य हव्य पदार्थांचें हवन करतात.

८९ वृत्रहन्तमं ज्येष्ठं आनवं अग्निं अगन्म- वृत्राला मारणाऱ्या श्रेष्ठ मानवांचें हित करणाऱ्या अग्निजवळ आम्हीं जातों.

९५ हे अग्ने! हरस्वा यातुधानस्य बलं विश्वतः परि प्रति शृणीहि- हे अग्ने! आपल्या तेजानें यातना देणाऱ्या शत्रूंचें बळ चारही बाजूंनीं नष्ट कर.

९५ रक्षसः वीर्यं न्युब्ज- राक्षसाचें सामर्थ्य नष्ट कर.

१०० मन्द्रः वि अतिस्रिधः राजसि- आनंदित अग्नि, तूं शत्रूंचा पराभव करून शोभत आहेस.

१०१ सा शंतातिः मयः करत् स्रिधः अप- ती शान्ति व सुख देणारी आम्हांसाठीं सुख देवो व शत्रूंना दूर करो.

१०३ प्रतीव्यां ईडिष्व- शत्रुचा प्रतीकार करणाऱ्याची स्तुति कर.

१०३ अगृभीत-शोचिषं जातवेदसं यजस्व- ज्याचा प्रकाश कोणीहि बंद करूं शकत नाहीं अशा अग्निमध्यें यज्ञ कर.

१०४ तस्य मर्त्यः रिपुः मायया चन न ईशीत- कोणीहि मर्त्य शत्रु कपटानें सुद्धां स्वामित्व करूं शकत नाहीं.

१०५ त्यं वृजिनं रिपुं, दुराध्यं स्तेनं दविष्ठं अपास्य- त्या कपटी शत्रुला व दुराराध्य चोराला दूर कर.

१०५ सुगं कृधि- आमचा मार्ग सुगम कर.

१०६ हे वीर! मायिनः रक्षसः तपसा निदह- हे वीरा! कपटी राक्षस आपल्या ज्वालेनें जाळून टाक.

१०८ हे अग्ने! त्वं यस्य सख्यं आविथ, सः तव सुवीराभिः ऊतिभिः प्र तरति- हे अग्ने! तूं ज्याचा मित्र होतोस तो तुझ्या उत्तम वीरांनीं युक्त संरक्षणांनीं दुःखांतून पार तरून जातो.

१११ अग्निः नः भद्रः- अग्नि आमचें कल्याण करणारा होवो.

११३ तत् द्युम्नं आभर- तें धन आम्हांस भरपूर दे.

११२ सदने कंचिद् अत्रिणं आ सासह्या- आमच्या घरांत कोणी शत्रु असेल तर त्यास दूर कर.

११३ दूढ्यं जनस्य मन्युं- दुष्ट बुद्धि लोकांचा क्रोधही दूर कर.

११४ सुप्रीतः मनुषः विशे विश्वा रक्षांसि प्रतिषेधति- संतुष्ट झालेला अग्नि मनुष्यांच्या घरांतील सर्व राक्षसांना दूर करतो.

आग्नेय कांडांतील ऋषि-देवता सूची

(१)

मंत्र-संख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषि	देवता	छन्दः
१	६।१६।१०	भरद्वाजो बार्हस्पत्यः	अग्नि	गायत्री
२	६।१६।१	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
३	१।१२।१	मेधातिथिः काण्वः	,,	,,
४	६।१६।३४	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
५	८।८४।१	उशना काव्यः	,,	,,
६	८।७१।१	सुदीति पुरुमीळ्हौ आंगिरसौ	,,	,,
७	६।१६।१६	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
८	८।११।७	वत्सः काण्वः	,,	,,
९	६।१६।१३	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
१०	——	वामदेवः	,,	,,

(२)

११	८।७५।१०	आयुङ्क्ष्वाहिः	,,	,,
१२	४।८।१	वामदेवो गौतमः	,,	,,

मंत्र-संख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषि	देवता	छन्दः
१३	८।१०२।१३	प्रयोगो भार्गवः	,,	गायत्री
१४	१।१।७	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१५	१।२७।१०	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१६	१।१९।१	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१७	१।२७।१	शुनः शेप आजीगर्तिः	,,	,,
१८	८।१०२।४	प्रयोगो भार्गवः	,,	,,
१९	८।१०२।२२	प्रयोगो भार्गवः	,,	,,
२०	८।६।३०	वत्सः काण्वः	,,	,,
		(३)		
२१	८।१०२।७	प्रयोगो भार्गवः	,,	,,
२२	६।१६।२८	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
२३	४।१।१	वामदेवो गौतमः	,,	,,
२४	७।१५।१३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
२५	६।१६।४३	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
२६	७।१५।७	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
२७	८।४४।१६	विरूप आंगिरसः	,,	,,
२८	१।२७।४	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
२९	८।७४।११	गोपवन आत्रेयः	,,	,,
३०	४।१५।३	वामदेवो गौतमः	,,	,,
३१	१।५०।१	प्रस्कण्वः काण्वः	,,	,,
३२	१।१२।७	मेधातिथिः काण्वः	,,	,,
३३	१०।९।४	सिन्धुद्वीप आम्बरीषः त्रित आप्त्यो वा	,,	,,
३४	८।८४।७	उशना काव्यः	,,	,,
		(४)		
३५	६।४८।१	शंयुर्बार्हस्पत्यः	,,	बृहती
३६	८।६०।९	भर्गः प्रागाथः	,,	,,
३७	६।४८।७	शंयुर्बार्हस्पत्यः	,,	,,
३८	७।१६।७	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
३९	८।६०।१९	भर्गः प्रागाथः	,,	,,
४०	१।४४।१	प्रस्कण्वः काण्वः	,,	,,
४१	६।४८।१	शंयुर्बार्हस्पत्यः	,,	,,
४२	८।६०।५	भर्गः प्रागाथः	,,	,,
४३	८।६०।११	भर्गः प्रागाथः	,,	,,
४४	८।१०३।६	सौभरिः काण्वः	,,	,,
		(५)		
४५	७।१६।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
४६	८।६०।१५	भर्गः प्रागाथः	,,	,,

मंत्र-संख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषि	देवता	छन्दः
४७	८।१०३।१	सौभरिः काण्वः	,,	बृहती
४८	८।२७।१	मनुर्वैवस्वतः	,,	,,
४९	८।७१।१४	सुर्दीति पुरुमीळावांगिरसौ	,,	,,
५०	१।४४।१३	प्रस्कण्वः काण्वः	,,	,,
५१	८।१०३।१	सौभरिः काण्वः	,,	,,
५२	८।१।१८	मेधातिथिमेध्यातिथी काण्वौ	इन्द्रः	,,
५३	३।९।२	विश्वामित्रो गाथिनः	अग्निः	,,
५४	१।३६।१९	कण्वो घौरः	,,	,,
		(६)		
५५	७।१६।११	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
५६	१।४०।३	कण्वो घौरः	ब्रह्मणस्पतिः	,,
५७	१।३६।१३	कण्वो घौरः	यूपः	,,
५८	८।१०३।४	सौभरिः काण्वः	अग्निः	,,
५९	१।३६।१	कण्वो घौरः	,,	,,
६०	३।१६।१	उत्कीलः कात्यः	,,	,,
६१	७।१६।५	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
६२	३।२।१	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
		(७)		
६३	——	श्यावाश्वो वामदेवो वा	,,	त्रिष्टुप्
६४	१०।११५।१	उपस्तुतो वार्हिष्टव्यः	,,	जगती
६५	१०।५६।१	बृहदुक्थो वामदेव्यः	,,	त्रिष्टुप्
६६	१।९४।१	कुत्स आंगिरसः	,,	जगती
६७	६।७।१	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	त्रिष्टुप्
६८	६।२४।६	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
६९	४।३।१	वामदेवो गौतमः	,,	,,
७०	७।८।१	वसिष्ठो मैत्रावरुणि	,,	,,
७१	१०।८।१	त्रिशिरास्त्वाष्ट्रः	,,	,,
७२	७।१।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	त्रिपाद् विराड् गायत्री
		(८)		
७३	५।१।१	बुधगविष्ठिरावात्रेयौ	,,	त्रिष्टुप्
७४	१०।४६।५	वत्सप्रिर्भालंदनः	,,	,,
७५	६।५८।१	भरद्वाजो बार्हस्पत्यः	पूषा	,,
७६	३।६।११	विश्वामित्रो गाथिनः	अग्निः	,,
७७	१०।४६।१	वत्सप्रिर्भालंदनः	,,	,,
७८	७।६।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
७९	३।२९।२	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
८०	१०।८७।१९	पायुर्भारद्वाजः	,,	,,

मंत्र-संख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषि	देवता	छन्दः
		(९)		
८१	५।१०।१	गय आत्रेयः	,,	अनुष्टुप्
८२	——	वामदेवः	,,	,,
८३	६।१।६	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
८४	६।१।१	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
८५	५।१८।१	द्वितो मृक्तवाहा आत्रेयः	,,	,,
८६	५।२५।७	वसूयव आत्रेयाः	,,	,,
८७	८।७४।१	गोपवन आत्रेयः	,,	,,
८८	५।१६।१	पूरुरात्रेयः	,,	,,
८९	८।७४।४	गोपवन आत्रेयः	,,	,,
९०	——	वामदेवःकश्यपो वा मारीचो, मनुर्वा वैवस्वतः उभौ वा	,,	,,
		(१०)		
९१	१०।१४१।३	अग्निस्तापसः	विश्वेदेवाः	,,
९२	——	वामदेवः कश्यपः असितो देवलो वा	अंगिराः	,,
९३	——	,, ,,	अग्निः	,,
९४	२।५।३	सोमाहुतिर्भार्गवः	,,	,,
९५	१०।८७।२५	पायुर्भारद्वाजः	,,	,,
९६	१।४५।१	प्रस्कण्वः काण्वः	,,	,,
		(११)		
९७	१।१५०।१	दीर्घतमा औचथ्यः	,,	उष्णिक्
९८	३।१०।५	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
९९	१।७९।४	गोतमो राहूगणः	,,	,,
१००	३।१०।७	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१०१	९।१०२।४	त्रित आप्त्यः	पवमानः सोमः	,,
१०२	८।१८।७	इरिम्बिठिः काण्वः	अदितिः	,,
१०३	८।२३।१	विश्वमना वैयश्वः	अग्निः	,,
१०४	८।२३।१५	विश्वमना वैयश्वः	,,	,,
१०५	६।५१।१३	ऋजिश्वा भरद्वाजः	विश्वेदेवाः	,,
१०६	८।२३।१४	विश्वमना वैयश्वः	अग्निः	,,
		(१२)		
१०७	८।१०३।८	प्रयोगो भार्गवः	,,	,,
१०८	८।१९।३०	सौभरिः काण्वः	,,	,,
१०९	८।१९।१	सौभरिः काण्वः	,,	,,
१००	८।१०३।१२	प्रयोगो भार्गवः	,,	,,
१११	८।१९।१९	सौभरिः काण्वः	,,	,,
११२	८।१९।३	सौभरिः काण्वः	,,	,,
११३	८।१९।१५	सौभरिः काण्वः	,,	,,
११४	८।२३।१३	विश्वमना वैयश्वः	,,	,,

अथ ऐन्द्रं काण्डम् ।

अथ द्वितीयोऽध्यायः ।

[३]

(१-१०) १ शंयुर्बार्हस्पत्यः; २ श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः; ३ हर्यतः प्रागाथः; ४,५ श्रुतकक्षः (ऋ० सुकक्षो वा, ५ सुकक्षः) आंगिरसः; ६ देवजामय इन्द्रमातरः ऋषिकाः; ७, ८ गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ; ९, १० मेधातिथिः काण्वः प्रियमेधश्चांगिरसः ॥ इन्द्रः (ऋ० ३ अग्निर्हवींषि वा) ॥ गायत्री ॥

११५ तद्वो गाय सुते सचा पुरुहूताय सत्वने । शं यद्गवे न शाकिने ॥ १ ॥ (ऋ. ६।४५।२२)

११६ यस्ते नूनं शतक्रतविन्द्र द्युम्नितमो मदः । तेन नूनं मदे मदेः ॥ २ ॥ (ऋ. ८।९२।१६)

११७ गाव उप वदावटे मही यज्ञस्य रप्सुदा । उभा कर्णा हिरण्यया ॥ ३ ॥ (ऋ. ८।७२।१२; वा. यजु. ३३।१९)

११८ अरमश्वाय गायत श्रुतकक्षारं गवे । अरमिन्द्रस्य धाम्ने ॥ ४ ॥ (ऋ. ८।९२।२५)

११९ तमिन्द्रं वाजयामसि महे वृत्राय हन्तवे । स वृषा वृषभो भुवत् ॥ ५ ॥ (ऋ. ८।९३।७)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[११५] हे स्तुति करणाऱ्या उपासकांनों ! (वः सुते) तुमचा सोमरस काढल्यानंतर (पुरु-हूताय सत्वने) अनेक ज्याची स्तुति करतात अशा बलवान् इन्द्रासाठीं (तत् सचा गाय) तें स्तोत्र एकत्रित बसून गा, (यत्) जें स्तोत्र (गवे न) गाईला जसें गवत सुख देतें, तसें तें (शाकिने शं) शक्तिमान इन्द्राला सुख देतें. ॥ १ ॥

१ पुरुहूताय सत्वने सचा गाय— पुष्कळांनीं ज्याची स्तुति केली आहे, अशा सामर्थ्यवान इन्द्राच्या गुणांचें गायन करा.

[११६] हे (शत-क्रतो) शेंकडों प्रकारचीं कर्में करणाऱ्या इन्द्रा ! (द्युम्नि-तमः यः मदः) जो तेजस्वी सोम-रस (नूनं ते) खरोखर तुझ्यासाठीं तयार केला होता, (तेन नूनं) त्या रसानें खरोखर (मदे) तुला आनंद झाला, त्यामुळें आम्हांलाहि (मदेः) धनादि देऊन तू आनंदित कर. ॥ २ ॥

[११७] हे (गावः) गाईनो ! तुम्ही (अवटे) यज्ञाच्या स्थानीं (उपवद) या. तुम्ही (यज्ञस्य मही रप्सुदाः) यज्ञाला पुष्कळ दूधरूपी अन्न देणाऱ्या आहांत. (उभा कर्णा हिरण्यया) तुमचे दोनही कान सुवर्णाच्या आभूषणांनीं शोभत आहेत. ॥ ३ ॥

१ गावः ! अवटे यज्ञस्य महीः रप्सुदाः— हे गाई हो ! तुम्ही यज्ञामध्यें पुष्कळ अन्न देत आहांत.

[११८] हे (श्रुतकक्ष) श्रुतकक्ष ऋषे ! (अश्वाय अरं) घोड्यासाठीं पुरेसें, (गवे अरं) गाईला पुरेसें, (इन्द्रस्य धाम्ने अरं) इन्द्राच्या स्थानासाठीं पुरेसें (गायत) स्तोत्राचें गायन कर. ॥ ४ ॥

[११९] (वृत्राय हन्तवे महे) त्या मोठ्या वृत्राचा नाश करणासाठीं (तं इन्द्रं) त्या इन्द्राला (वाजयामसि) आम्ही वाखाणीत आहों. (वृषा सः) बलवान् असा तो इन्द्र (वृषभः भुवत्) आम्हांला धन देणारा होवो ॥ ५ ॥

१ वृषभः— बलवान, धनाची वृष्टी करणारा, इच्छा पूर्ण करणारा.

२ वृत्राय हन्तवे महे इन्द्रं वाजयामसि— मोठ्या वृत्राचा वध करण्यासाठीं इन्द्राची प्रशंसा करीत आहों.

१२० त्वमिन्द्र बलादधि सहसो जात ओजसः । त्वꣳसन्वृषन्वृषेदसि ॥ ६ ॥ (ऋ. १०।१५३।२)

१२१ यज्ञ इन्द्रमवर्धयद्यद्भूमिं व्यवर्तयत् । चक्राण ओपशं दिवि ॥ ७ ॥ (ऋ. ८।१४।५)

१२२ यदिन्द्राहं यथा त्वमीशीय वस्व एक इत् । स्तोता मे गोसखा स्यात् ॥ ८ ॥ (ऋ. ८।१४।१)

१२३ पन्यंपन्यमित्सोतार आ धावत मद्याय । सोमं वीराय शूराय ॥ ९ ॥ (ऋ. ८।२।२५)

१२४ इदं वसो सुतमन्धः पिबा सुपूर्णमुदरम् । अनाभयिन्ररिमा ते ॥ १० ॥ (ऋ. ८।२।१)

इति तृतीया दशतिः ॥ ३ ॥ प्रथमः खण्डः ॥ १ ॥ [स्व० १० । उ० ४ । धा० ४६ । (भू) ॥]

[४]

(१-१०) १, २ सुकक्षश्रुतकक्षौ (ऋ० सुकक्ष आंगिरसः); ३ भारद्वाजः (ऋ० शंयुर्बार्हस्पत्यः); ४ श्रुतकक्षः (ऋ० सुकक्षो वा आंगिरसः) । ५, ६ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ७, ९, १० त्रिशोकः काण्वः; ८ वसिष्ठो मैत्रावरुणिः ॥ इन्द्रः (९ ऋ० अग्नीन्द्रौ) ॥ गायत्री ॥

१२५ उद्घेदभि श्रुतामघं वृषभं नर्यापसम् । अस्तारमेषि सूर्य ॥ १ ॥ (ऋ. ८।९३।१)

---

[१२०] हे इन्द्र ! (त्वं) तूं (सहसः वलात्) शत्रुचा पराभव करणाऱ्या बलाहून् अधिक श्रेष्ठ अशा (ओजसः अधिजातः) सामर्थ्यानें प्रसिद्ध आहेस. हे (वृषन्) बलवान् इन्द्रा ! (सन्) तूं बलवान असतांही (वृषा इत् असि) इष्ट फल देणारा आहेस. ॥ ६ ॥

१ हे इन्द्र ! त्वं सहसः वलात् ओजसः अधिजातः- हे इन्द्रा ! तूं साहसी बलापेक्षांही सामर्थ्यानें श्रेष्ठ आहेस.

[१२१] (यज्ञः इन्द्रं अवर्धयत्) यज्ञानें इन्द्राचें महात्म्य वाढवलें आहे. (यत्) जें (दिवि) आकाशांत (ओपशं चक्राणः) टांगल्यासारखें करून (भूमिं व्यवर्तयत्) भूमिला त्यानें फिरवीत ठेवलें आहे. ॥ ७ ॥

[१२२] हे इन्द्रा ! (यथा त्वं) जसा तूं (एकः इत्) एकटाच (वस्वः) धनाचा स्वामी आहेस, तसा (अहं) मी (यत् ईशीय) जर ऐश्वर्याचा स्वामी झालों, तर (मे स्तोता) माझी स्तुति करणारा (गो-सखा स्यात्) गाईंचा मित्र होईल. ॥ ८ ॥

[१२३] हे (सोतारः) सोम यज्ञ करणाऱ्या याजकांनों ! (मद्याय) आनंदित (वीराय शूराय) शूरवीर इन्द्रासाठीं (पन्यं पन्यं इत्) प्रशंसा करण्यास योग्य अशा (सोमं आ धावत) सोमरसाचें अर्पण करा. ॥ ९ ॥

१ वीराय शूराय पन्यं सोमं अधावत— शूरवीर इन्द्राला हा प्रशंसनीय सोम द्या.

[१२४] हे (वसो) निवासक इन्द्रा ! (इदं) हें (सुतं अन्धः) सोमरसरूपी अन्न (पिब) पी. ज्यायोगें तुझें (उदरं सुपूर्णं) पोट पूर्णपणें भरून जाईल. हे (अनाभयिन्) निर्भय इन्द्रा ! (ते ररिम) तुला आनंद व्हावा म्हणून हें देत आहों. ॥ १० ॥

१ अनाभयिन् ! ते ररिम— हे निर्भय इन्द्रा ! तुला आनंद व्हावा यासाठीं हें पेय देत आहों.

॥ येथें पहिला खंड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[१२५] हे (सूर्य) सूर्यरूपी इन्द्रा ! तूं (श्रुता-मघं) प्रसिद्ध धनवान् (वृषभं) बलवान् (नर्य-अपसं) मानवांच्या हिताचें कार्य करणारा व (अस्तारं) शत्रूवर शस्त्र फेंकणारा आहेस ! (इदं उदेषि घ) आतां असा तूं उदित होत आहेस. ॥ १ ॥

१ श्रुतामघं वृषभं नर्यापसं अस्तारं— प्रसिद्ध धनवान, बलवान, मानवांचें हित करणारा व शत्रूवर शस्त्र फेंकणारा आहे त्याची प्रशंसा करा.

१२६ यदद्य कच्च वृत्रहन्नुदगा अभि सूर्य । सर्वं तदिन्द्र ते वशे ॥ २ ॥ (ऋ. ८।९३।४)
१२७ य आनयत्परावतः सुनीती तुर्वशं यदुम् । इन्द्रः स नो युवा सखा॥ ३ ॥ (ऋ. ६।४५।१)
१२८ मा न इन्द्राभ्या३ दिशः सूरो अक्तुष्वा यमत् । त्वा युजा वनेम तत् ॥४॥ (ऋ. ८।९२।३१)
१२९ एन्द्र सानसिं रयिं सजित्वानं सदासहम् । वर्षिष्ठमूतये भर ॥ ५ ॥ (ऋ. १।८।१)
१३० इन्द्रं वयं महाधन इन्द्रमर्भे हवामहे । युजं वृत्रेषु वज्रिणम् ॥ ६ ॥ (ऋ. १।७।५)
१३१ अपिबत्कद्रुवः सुतमिन्द्रः सहस्रबाह्वे । तत्राददिष्ट पौंस्यम् ॥ ७ ॥ (ऋ. ८।४५।२६)

---

[१२६] हे (वृत्र-हन्) शत्रुला मारणाऱ्या (सूर्य) सूर्यरूपी इन्द्रा ! (अद्य) आज (अभि उदगाः) समोर तूं उदित झाला आहेस. हे इन्द्रा ! (तत् सर्वं) तें सर्व (ते वशे) तुझ्या आधीन आहे. ॥ २ ॥

१ ते वशे तत् सर्वं— तुझ्या आधीन सर्व आहे.

[१२७] (यः) ज्या इन्द्रानें तुर्वश व यदुला शत्रूंनीं दूर फेंकलें असतांही (सु-नीती) उत्तम नीतिनें (परावतः आनयत्) दूर स्थानांहून त्यांना परत आणलें (युवा सः) असा तो तरुण इन्द्र (नः सखा) आमचा मित्र आहे. ॥३॥

१ यः सुनीती तुर्वशं यदुं परावतः आनयत्, युवा सः नः सखा— ज्या इन्द्रानें तुर्वश व यदुला उत्तम नीतिनें सुखरूप आणलें असा तो तरुण इन्द्र आमचा मित्र आहे.

[१२८] हे इन्द्रा ! (आदिशः) चारही दिशांमधून शस्त्रें फेंकणारा (सूरः) सतत गमन करणारा राक्षस (अक्तुषु) रात्रींमध्यें (नः मा अभ्यायमत्) आमच्यावर हल्ला करण्याच्या इच्छेनें न येवो; व तो आलाच तर (तत् त्वा युजा) तुझ्या सहाय्यानें (वनेम) त्याला आम्ही मारून टाकूं. ॥ ४ ॥

१ आदिशः सूरः अक्तुषु नः मा अभ्यायमत्, तत् त्वा युजा वनेम— चारही दिशांमधून शस्त्रें फेंकीत राक्षस रात्रीच्या वेळीं आमच्यावर हल्ला न करो; व आलाच तर त्यास तुझ्या सहाय्यानें आम्ही मारून टाकूं.

[१२९] हे इन्द्र ! (ऊतये) आमच्या संरक्षणासाठीं (सानसिं) उत्तम उपभोग घेण्यास योग्य (स-जित्वानं) शत्रुवर विजय मिळवून देणाऱ्या (सदा-सहं) नेहेमीं शत्रुचा पराभव करणाऱ्या (वर्षिष्ठं रयिं) श्रेष्ठ धनानें (आभर) आम्हांला भरून टाक. ॥ ५ ॥

(१) ऊतये सानसिं सजित्वानं सदासहं वर्षिष्ठं रयिं आभर— आमच्या संरक्षणासाठीं उपभोगाला योग्य, शत्रुवर विजय मिळवून देणाऱ्या, सदा शत्रुचा पराभव करणाऱ्या, श्रेष्ठ धनानें आम्हांला भरून टाक.

[१३०] (वयं) आम्हीं (महाधने) मोठ्या युद्धांत (इन्द्रं) इन्द्राला बोलावतों. (अर्भे इन्द्रं हवामहे) लहान युद्धामध्यें इन्द्राला बोलावतों, (वृत्रेषु) वृत्रांशीं होणाऱ्या युद्धांमध्येंही (युजं वज्रिणं) मित्र वज्रधारी इन्द्राला बोलावतों. ॥ ६ ॥

(१) वयं महाधने, अर्भे वृत्रेषु युजं वज्रिणं हवामहे— आम्ही मोठ्या युद्धांत, लहान लढाईंत व वृत्राच्या हल्लयांत वज्रधारी मित्र इन्द्राला सहायार्थ बोलावतों.

[१३१] (इन्द्रः) इन्द्रानें (कद्रुवः) कद्रु ऋषिचा (सुतं अपिबत्) सोमरस पिऊन टाकला. (सहस्रबाह्वे) सहस्र बाहु असलेल्या शत्रुला युद्धांत मारलें, (तत्र) त्यामध्यें इन्द्राचें (पौंस्यं आददिष्ट) सामर्थ्य प्रसिद्ध झालें. ॥ ८ ॥

(१) सहस्र-बाहुः— हजारों सैन्य बाळगणारा शत्रु. (२) सहस्रबाह्वे तत्र पौंस्यं आददिष्ट— सहस्र बाहु नामक शत्रुला मारलें त्यांत इन्द्राचें पौरुष प्रसिद्ध झालें.

❀

१३२ वयमिन्द्र त्वायवोऽभि प्र नोनुमो वृषन् । विद्धी त्वा ३ स्य नो वसो ॥ ८ ॥

(ऋ. ७।३१।४)

१३३ आ घा ये अग्निमिन्धते स्तृणन्ति बर्हिरानुषक् । येषामिन्द्रो युवा सखा ॥ ९ ॥

(ऋ. ८।४५।१)

१३४ भिन्धि विश्वा अप द्विषः परि बाधो जही मृधः । वसु स्पार्हं तदा भर ॥१०॥

(ऋ. ८।४५।४०)

इति चतुर्थी दशतिः ॥ ४ ॥ द्वितीयः खण्डः ॥ २ ॥ [स्व० ८ । उ० ३ । धा० ३२ । (डा) ॥]

[५]

(१–१०) १ कण्वो घौरः; २ त्रिशोकः काण्वः; ३ वत्सः काण्वः; ४ कुसीदी काण्वः; ५ मेधातिथिः काण्वः; ६ श्रुतकक्षः (ऋ० सुकक्षः) आंगिरसः ७ श्यावाश्व आत्रेयः; ८ प्रगाथः काण्वः; ९ वत्सः काण्वः; १० इरिंबिठिः काण्वः ॥ इन्द्रः ॥ (ऋ० १ मरुतः; ४ विश्वे देवाः; ५ ब्रह्मणस्पतिः; ७ सविता) ॥ गायत्री ॥

१३५ इहेव शृण्व एषां कशा हस्तेषु यद्वदान् । नि यामं चित्रमृञ्जते ॥ १ ॥ (ऋ. १।३७।३)

१३६ इम उ त्वा वि चक्षते सखाय इन्द्र सोमिनः । पुष्टावन्तो यथा पशुम् ॥ २ ॥

---

[१३२] हे (वृषन् इन्द्र) बलवान इन्द्रा ! (त्वायवः) तुला प्राप्त करूं इछिणारे आम्हीं तुला (अभि नो नुमः) समोरून नमस्कार करीत आहों. हे (वसो) निवासस्थान देणाऱ्या इन्द्रा ! (अस्य नः विद्धि) या आमच्या स्तोत्राचा भाव समजून घे. ॥ ८ ॥

[१३३] (ये) जे ऋत्विज (आ घा) पुढें होऊन (अग्निं इन्धते) अग्निला पेटवितात, (येषां) ज्यांचा (युवा इन्द्रः सखा) तरुण इन्द्र मित्र आहे, ज्यासाठीं ते (आनुषक् बर्हिः स्तृणन्ति) क्रमानें आसनें पसरतात. ॥ ९ ॥

[१३४] (विश्वाः द्विषः) सर्व शत्रूंचा (अप भिन्धि) नाश कर. (बाधः मृधः परि जहि) बाधा करणाऱ्या शत्रूंचा पराभव कर. त्यानंतर (स्पार्हं तत् वसु) स्पृहणीय धन (आ भर) आम्हांला भरपूर दे. ॥ १० ॥

(१) विश्वाः द्विषः अपभिन्धि— सर्व शत्रूंचा नाश कर. (२) बाधः मृधः परि जहि— बाधक शत्रूंचा पराभव कर. (३) स्पार्हं वसु आभर— स्पृहणीय धन भरपूर दे.

॥ येथें दुसरा खंड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[१३५] (एषां हस्तेषु कशाः) या मरुतांच्या हातांत चाबूक आहेत, ते (यद् वदान्) जो ध्वनि करतात, तो मी (इह इव शृण्वे) येथें झाल्याप्रमाणें ऐकत आहें. तो ध्वनि (यामं) युद्धामध्यें (चित्रं न्यृञ्जते) विलक्षण शूरपणा दाखवीत आहे. ॥ १ ॥

१ यामं चित्रं न्यृञ्जते— युद्धामध्यें विलक्षण शूरपणा दाखवते.

[१३६] हे इन्द्र ! (इमे सोमिनः सखायः) हे सोमयाग करणारे मित्र, (पुष्टावन्तः यथा पशुं) पाशधारी शिकारी जसे पशुला पाहतात त्याप्रमाणें, एकाग्रचित्त होऊन (त्वा विचक्षते) तुला विशेषेंकरून पाहतात. ॥ २ ॥

१३७ समस्य मन्यवे विशो विश्वा नमन्त कृष्टयः । समुद्रायेव सिन्धवः ॥ ३ ॥ (ऋ. ८।६।४)

१३८ देवानामिदवो महत्तदा वृणीमहे वयम् । वृष्णामस्मभ्यमूतये ॥ ४ ॥ (ऋ. ८।८३।१)

१३९ सोमानाꣳस्वरणं कृणुहि ब्रह्मणस्पते । कक्षीवन्तं य औशिजः ॥ ५ ॥ (ऋ. १।१८।१)

१४० बोधन्मना इदस्तु नो वृत्रहा भूर्यासुतिः । शृणोतु शक्र आशिषम् ॥ ६ ॥ (ऋ. ८।९३।१८)

१४१ अद्य नो देव सवितः प्रजावत्सावीः सौभगम् । परा दुःष्वप्न्यꣳसुव ॥ ७ ॥ (ऋ. ५।८२।४)

१४२ क्व३स्य वृषभो युवा तुविग्रीवो अनानतः । ब्रह्मा कस्तꣳसपर्यति ॥ ८ ॥ (ऋ. ८।६४।७)

१४३ उपह्वरे गिरीणाꣳसङ्गमे च नदीनाम् । धिया विप्रो अजायत ॥ ९ ॥ (ऋ. ८।६।२८)

---

[१३७] (विश्वाः कृष्टयः विशः) सर्व प्रजाजन (अस्य मन्यवे) याचें स्तोत्र ऐकण्यासाठीं (समुद्राय सिन्धवः इव) समुद्राकडे नद्या जातात त्याप्रमाणें (सं नमन्त) सर्व मिळून नम्र होऊन बसतात. ॥ ३ ॥

मन्यु— क्रोध, स्तोत्र, मननीय वचन.

[१३८] (देवानां अवः इत् महत्) देवांचें हें संरक्षण खरोखर फारच मोठें आहे. (वृष्णां तत्) कामनांची पूर्ति करणाऱ्या आपणांकडून मिळणारें तें संरक्षण (अस्मभ्यं ऊतये) आमच्या संरक्षणासाठीं (वयं आवृणीमहे) आम्हीं स्वीकारींत आहों. ॥ ४ ॥

(१) देवानां अवः महत् इत्— देवांकडून मिळणारें रक्षण खरोखर मोठें आहे.

(२) वृष्णां तत् अस्मभ्यं ऊतये वयं आवृणीमहे— आमच्या इच्छांची पूर्ति करणारें तें रक्षण आमच्या रक्षणासाठीं आम्हीं स्वीकारीत आहों.

[१३९] हे ब्रह्मणस्पते ! (सोमानां कक्षीवन्तं) सोमयाग करणाऱ्या कक्षीवानाला, (यः औशिजः) जो उशिकाचा पुत्र आहे त्याला, (स्वरणं कृणुहि) प्रकाशमान कर. ॥ ५ ॥

[१४०] (वृत्र-हा) वृत्र राक्षसाला मारणारा (भूरि-आसुतिः) ज्याच्यासाठीं पुष्कळ लोक सोमरस तयार करतात तो इन्द्र (नः) आमच्या (बोधत्-मनाः) इच्छा जाणणारा (इह अस्तु) येथें होवो. तो (शक्रः) सामर्थ्यवान् इन्द्र (आशिषं शृणोतु) आमची स्तुति ऐको. ॥ ६ ॥

[१४१] (सवितः देव) हे सूर्य देवा ! (नः) आम्हांला (अद्य) आज (प्रजावत् सौभगं) पुत्रपौत्रांसह असणारें सौभाग्य-धन (सावीः) दे. (दुष्वप्न्यं परा सुव) दुःखदायक स्वप्नें आणणारें दुर्भाग्य आमच्यापासून दूर कर. ॥ ७ ॥

(१) हे सवितः देव ! नः अद्य प्रजावत् सौभगं सावीः—हे सविता देवा ! आम्हांला आज पुत्रपौत्रांसह मिळणारें सौभाग्य दे. (२) दुष्वप्न्यं परा सुव— दुःखकारक स्वप्नें दूर कर.

[१४२] (सः वृषभः) तो सामर्थ्यवान् (युवा) तरुण (तुवि-ग्रीवः) मोठा गळा असलेला (अनानतः) कधींहि कोणापुढें न नमणारा इन्द्र (क) कोठें आहे ? (कः ब्रह्मा) कोण ज्ञानी (तं सपर्यति) त्याची पूजा करीत आहे ? ॥ ८ ॥

(१) स वृषभः युवा तुविग्रीवः अनानतः क ? -- तो तरुण बलवान मोठा गळा असलेला कोणपुढेंही न नमणारा इन्द्र कोठें आहे ? (२) तुविग्रीवः -- गळा मोठा असावा. (३) अनानतः— कोण पुढें वांकूं नये !

[१४३] (गिरीणां उपह्वरे) पर्वतांच्या उतरणींवर (च नदीनां संगमे) आणि नद्यांच्या संगमांवर (धिया) आपल्या बुद्धिनें-आपल्या स्तुति करण्यानें- (विप्रः अजायत) मनुष्य विशेष ज्ञानी होतो ॥ ९ ॥

१४४ प्र संम्राजं चर्षणीनामिन्द्रꣳस्तोता नव्यं गीर्भिः । नरं नृषाहं मꣳहिष्ठम् ॥ १० ॥
(ऋ. ८।१६।१)

इति पञ्चमी दशतिः ॥ ५ ॥ तृतीयः खण्डः ॥ ३ ॥ [स्व० ९ । उ० ना० । धा० ४४ । ली ।]

इति द्वितीयप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ १ ॥

[६]

(१–१०) १ श्रुतकक्षः (ऋ० सुकक्षः) आङ्गिरसः; २ मेधातिथिः (ऋ० शंयुर्बार्हस्पत्यः) काण्वः; ३ गोतमो राहूगणः; ४ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ५ बिन्दुः पूतदक्षो वा आङ्गिरसः; ६, ७ श्रुतकक्षः सुकक्षो वा (ऋ० सुकक्षः) आंगिरसः; ८ वत्सः काण्वः; ९ शुनःशेप आजीगर्तिः; १० शुनःशेपो आजीगर्तिः; वामदेवो वा ॥ इन्द्रः, (ऋ० इन्द्रापूषणौ) ५ मरुतः ॥ गायत्री ॥

१४५ अपादु शिप्र्यन्धसः सुदक्षस्य प्रहोषिणः । इन्दोरिन्द्रो यवाशिरः ॥ १ ॥ (ऋ. ८।९२।४)

१४६ इमा उ त्वा पुरूवसोऽभि प्र नोनुनवुर्गिरः । गावो वत्सं न धेनवः ॥ २ ॥ (ऋ. ६।४५।२५)

१४७ अत्राह गोरमन्वत नाम त्वष्टुरपीच्यम् । इत्था चन्द्रमसो गृहे ॥ ३ ॥ (ऋ. १।८४।१५)

१४८ यदिन्द्रो अनयद्रितो महीरपो वृषन्तमः । तत्र पूषाभवत्सचा ॥ ४ ॥ (ऋ. ६।५७।४)

---

[१४४] (चर्षणीनां सम्राजं) मनुष्यांमध्यें उत्तम रीतिनें प्रकाशमान होणाऱ्या (गीर्भिः नव्यं) स्तोत्रांनीं स्तुति करण्यास योग्य (नृ-षाहं नरं) शत्रूंचा पराभव करणाऱ्या नेत्या (मंहिष्ठं इन्द्रं) महान इन्द्राची (प्रस्तोत) स्तुति करा. ॥ १० ॥

(१) चर्षणीनां सम्राजं नृषाहं नरं मंहिष्ठं इन्द्रं प्रस्तोत— मनुष्यांमध्यें समराट्, शत्रूंचा पराभव करणारा नेता अशा महान् इन्द्राची स्तुति करा.

॥ येथें तिसरा खंड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[१४५] (शिप्री इन्द्रः) शिरस्त्राण धारण करणाऱ्या इन्द्रानें (प्र-होषिणः सुदक्षस्य) विशेष हवन करणाऱ्या सुदक्षाचें (यवाशिरः) जवांचें पीठ मिळवलेल्या (इन्दोः अन्धसः उ) सोमरस रूपी अन्नाचें (अपात्) प्राशन केलें. ॥ १ ॥

[१४६] हे (पुरु-वसो) अधिक धन बाळगणाऱ्या इन्द्रा ! (गावः धेनवः वत्सं न) दुधाळ गाई आपल्या वांसराजवळ येतात त्याप्रमाणें (त्वा) तुला (इमाः गिरः प्रनोनवुः) हीं स्तोत्रें पुनः पुनः प्राप्त होतात, तुझी वारंवार स्तुति करतात. ॥ २ ॥

[१४७] (अत्र अह) ह्या (गोः चन्द्रमसः) गतिशील चन्द्राच्या (गृहे) घरीं, त्याच्या चन्द्रमण्डलामध्यें, (त्वष्टुः) त्वष्टा या आदित्याचें (अ-पीच्यं नाम) रात्रीच्या वेळीं अन्तर्धान पावलेलें प्रसिद्ध तेज आहे (इत्था अमन्वत) असें मानलें जातें. ॥ ३ ॥

[१४८] (यत् वृषन्तमः इन्द्रः) जेव्हां अतिबलवान् इन्द्र (रितः महीः) गमनशील मोठचा प्रवाहानें जाणाऱ्या (अपः) वृष्टीनें आलेल्या जलांना (अनयत्) प्रवाहित करतो, (तत्र) तेव्हां (पूषा सचा भुवत्) पूषा त्याचा सहायक होतो. ॥ ४ ॥

१४९ गौर्धयति मरुताꣳश्रवस्युर्माता मघोनाम् । युक्ता वह्नी रथानाम् ॥ ५ ॥ (ऋ. ८।९४।१)

१५० उप नो हरिभिः सुतं याहि मदानां पते । उप नो हरिभिः सुतम् ॥ ६ ॥ (ऋ.८।९३।३१)

१५१ इष्टा होत्रा असृक्षतेन्द्रं वृधन्तो अध्वरे । अच्छावभृथमोजसा ॥ ७ ॥ (ऋ. ८।९३।२३)

१५२ अहमिद्धि पितुष्परि मेधामृतस्य जग्रह । अहꣳसूर्य इवाजनि ॥ ८ ॥ (ऋ. ८।६।१०)

१५३ रेवतीर्नः सधमाद इन्द्रे सन्तु तुविवाजाः । क्षुमन्तो याभिर्मदेम ॥ ९ ॥ (ऋ. १।३०।१०)

१५४ सोमः पूषा च चेततुर्विश्वासाꣳसुक्षितीनाम् । देवत्रा रथ्योर्हिता ॥ १० ॥

इति षष्ठी दशतिः ॥ ६ ॥ चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥ [स्व० ८ । उ० ५ । धा० ४४। (णी) ॥]

[७]

(१–१०) १, ४ श्रुतकक्षः सुकक्षो वा आङ्गिरसः; २ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ३ मेधातिथिः काण्वः; प्रियमेधश्चांगिरसः; ५ इरिम्बिठिः काण्वः; ६. १० मधुच्छन्दा वैश्वामित्रः ७ त्रिशोकः काण्वः; ८ कुसीदी काण्वः; ९ शुनशेपः आजीगर्तिः ॥ इन्द्रः ॥ गायत्री ॥

१५५ पान्तमा वो अन्धस इन्द्रमभि प्र गायत । विश्वासाहꣳशतक्रतुं मꣳहिष्ठं चर्षणीनाम् ॥ १ ॥ (ऋ. ८।९२।१)

---

[१४९] (मघोनां मरुतां) धनवान् मरुतांची (माता) माता, (रथानां युक्ता वह्निः) रथांना बांधलेली व ओढणारी (गौः) गाय (श्रवस्युः) अन्न देण्याची इच्छा करीत (धयति) दूध देत असते. ॥ ५ ॥

[१५०] हे (मदानां पते) सोमरसांच्या स्वामी इन्द्रा ! (हरिभिः) आपल्या घोड्यांनीं (नः सुतं उप याहि) आमच्या सोमयागमध्यें ये. (हरिभिः) घोड्यांनीं (नः सुतं उपयाहि) आमच्या यज्ञामध्यें ये. ॥ ६ ॥

[१५१] (अध्वरे वृधन्तः) आमच्या यज्ञांत इन्द्राची प्रशंसा करीत (इष्टाः होत्राः) इष्टी करणारे होता गण (अवभृथं अच्छ) अवभृथ स्नान होईपर्यंत (ओजसा) आपल्या बलानें (इन्द्रं असृक्षत) इन्द्राला आहुति देतात. ॥ ७ ॥

[१५२] (अहं इत्) मीच (पितुः ऋतस्य मेधां) पालन करणाऱ्या यज्ञस्वरूपी इन्द्राची बुद्धि (परिजग्रह) आपल्याकडे वळवली आहे. (हि) यामुळें (सूर्यः इव अजनि) सूर्याप्रमाणें तेजस्वी झालों आहें. ॥ ८ ॥

[१५३] (याभिः क्षु-मन्तः मदेम) ज्यांच्या योगानें आम्ही अन्नयुक्त होऊन आनन्दित होतों, (सधमादे इन्द्रे) इन्द्रासह हर्षयुक्त होऊन (नः) आमच्या त्या गाई (रेवतीः) दूध तूप देणाऱ्या होऊन (तुवि-वाजाः सन्तु) अधिक बल देणाऱ्या होवोत. ॥ ९ ॥

[१५४] (देवत्रा) देवांमध्यें (रथ्यः अर्हिता) रथावर बसण्यास योग्य (सोमः) सोम (पूषा च) आणि पूषा (विश्वासां सुक्षितीनां चेततुः) सर्व मानवांना उत्साह देणारा होवो. ॥ १० ॥

॥ येथें चौथा खंड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[१५५] (वः) तुम्ही (विश्वा-साहं) सर्व शत्रूंचा नाश करणाऱ्या (शतक्रतुं) शेंकडों कर्मे करणाऱ्या (चर्षणीनां मंहिष्ठं) मानवांमध्यें मोठ्या सामर्थ्यवान् (अन्धसः आपान्तं) व सोमरस पिणाऱ्या (इन्द्रं अभि प्र गायत) इन्द्राच्या विशेष स्तुतीचें गायन करा. ॥ १ ॥

१ विश्वासाहं शतक्रतुं चर्षणीनां मंहिष्ठं इन्द्रं अभि प्रगायत— सर्व शत्रूंचा नाश करणाऱ्या, शेंकडों कार्यें करणाऱ्या, प्रजेमध्यें मोठ्या सामर्थ्यवान् इन्द्राच्या स्तुतिचें गायन करा.

१५६ प्र व इन्द्राय मादन२ंहर्यश्वाय गायत । सखायः सोमपाव्ने ॥ २ ॥ (ऋ. ७।३१।१)
१५७ वयमु त्वा तदिदर्था इन्द्र त्वायन्तः सखायः । कण्वा उक्थेभिर्जरन्ते ॥ ३ ॥ (ऋ. ८।२।१६)
१५८ इन्द्राय मद्वने सुतं परि ष्टोभन्तु नो गिरः । अर्कमर्चन्तु कारवः ॥ ४ ॥ (ऋ. ८।९२।१९)
१५९ अयं त इन्द्र सोमो निपूतो अधि बर्हिषि । एहीमस्य द्रवा पिब ॥ ५ ॥ (ऋ. ८।१७।११)
१६० सुरूपकृत्नुमूतये सुदुघामिव गोदुहे । जुहूमसि द्यविद्यवि ॥ ६ ॥ (ऋ. १।४।१)
१६१ अभि त्वा वृषभा सुते सुत२ंसृजामि पीतये । तृम्पा व्यश्नुही मदम् ॥ ७ ॥ (ऋ. ८।४५।२२)
१६२ य इन्द्र चमसेष्वा सोमश्चमूषु ते सुतः । पिबेदस्य त्वमीशिषे ॥ ८ ॥ (ऋ. ८।८२।७)

---

[१५६] हे (सखायः) मित्र हो ! (वः) तुम्ही (हर्यश्वाय) हरि नांवाच्या घोड्यांना बाळगणाऱ्या (सोम-पाव्ने) सोम पिणाऱ्या (इन्द्राय) इन्द्राला (मादनं प्रगायत) आनन्द देणारें स्तोत्र गात रहा. ॥ २ ॥

[१५७] हे (इन्द्र) इन्द्रा ! (त्वायन्तः सखायः वयं) तुझी मित्रता करूं इच्छिणारे व तुझे मित्र आम्ही (तत्-इत्-अर्थाः) तुझी स्तुति करण्याचीच इच्छा बाळगणारे (कण्वाः उ) कण्व (उक्थेभिः त्वा जरन्ते) स्तोत्रांनीं तुझी प्रशंसा करीत आहों. ॥ ३ ॥

[१५८] (मद्वने इन्द्राय) आनन्दित स्वभावाच्या इन्द्रासाठीं (सुतं) काढलेल्या सोमरसाची (नः गिरः परि-स्टोभन्तु) आमच्या वाणी स्तुति करोत, (कारवः) स्तुति करणारे (अर्कं अर्चन्तु) या पूज्य सोमाची अर्चना करोत. ॥ ४ ॥

[१५९] हे इन्द्रा ! (अयं सोमः) हा सोमरस (ते) तुझ्यासाठीं (बर्हिषि अधि) वेदीवरील आसनावर (निपूतः) शुद्ध करून ठेवला आहे. (ईं एहि) याच्या जवळ ये, (द्रव) लवकर ये व (पिब) पी. ॥ ५ ॥

[१६०] (ऊतये) आमच्या संरक्षणासाठीं (सु-रूप-कृत्नुं) सुन्दर रूपें बनवणाऱ्या इन्द्राला (द्यवि-द्यवि) प्रति दिवशीं (जुहूमसि) आम्ही बोलावतों, (गोदुहे सुदुघां इव) ज्याप्रमाणें गायीचें दोहन करण्याच्या वेळीं उत्तम दूध देणाऱ्या गाईला बोलावलें जातें. ॥ ६ ॥

१ ऊतये सुरूपकृत्नुं द्यवि द्यवि जुहूमसि— आमच्या संरक्षणासाठीं उत्तम सुन्दर रूप बनवणाऱ्या इन्द्राची प्रति दिवशीं स्तुति करा.

[१६१] (वृषभ) बलवान् इन्द्रा ! (त्वा) तुला (सुते) सोमयागामध्यें (सुतं पीतये) सोमरस पिण्यासाठीं (अभि सृजामि) सोमरसाचें अर्पण करतों, त्यावेळीं (तृप्यं मदं व्यश्नुहि) तृप्त करणाऱ्या या आनंद देणाऱ्या सोम-रसाचा स्वीकार कर. ॥ ७ ॥

[१६२] हे इन्द्रा ! (ते) तुझ्यासाठीं (सुतः सोमः) काढलेला हा सोमरस (चमसेषु चमूषु आ) मोठ्या व लहान पात्रांमध्यें भरून ठेवला आहे. (अस्य त्वं पिब इत्) हा तूं च पी. हे इन्द्रा ! (त्वं ईशिषे) तूंच सामर्थ्य-वान् आहेस. ॥ ८ ॥

१ त्वं ईशिषे— तूं सर्वांचा स्वामी आहेस.

१६३ योगेयोगे तवस्तरं वाजेवाजे हवामहे । सखाय इन्द्रमूतये ॥ ९ ॥ (ऋ. १।३०।७)
१६४ आ त्वेता नि षीदतेन्द्रमभि प्र गायत । सखायः स्तोमवाहसः ॥ १० ॥ (ऋ. १।५।१)

इति सप्तमी दशतिः ॥ ७ ॥ पञ्चमः खण्डः ॥ ५॥ [स्व० ५ । उ० २ । धा० ३९ । (फो) ॥]

[८]

(१-१०) १ विश्वामित्रो गाथिनः, २ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ३ कुसीदी काण्वः; ४ प्रियमेध आंगिरसः; ५, ८ वामदेवो गौतमः; ६, ९ श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः, (९ ऋ० सुकक्ष आंगिरसः); ७ मेधातिथिः काण्वः; १० बिन्दुः पूतदक्षो वा आंगिरसः ॥ इन्द्रः (ऋ० ७ सदसस्पतिः; १० मरुतः) ॥ गायत्री ॥

१६५ इदं ह्यन्वोजसा सुतं राधानां पते । पिबा त्वा३स्य गिर्वणः ॥ १ ॥ (ऋ. ३।५१।१०)
१६६ महाँ इन्द्रः पुरश्च नो महित्वमस्तु वज्रिणे । द्यौर्न प्रथिना शवः ॥ २ ॥ (ऋ. १।८।५)
१६७ आ तू न इन्द्र क्षुमन्तं चित्रं ग्राभं सं गृभाय । महाहस्ती दक्षिणेन ॥ ३ ॥ (ऋ. ८।८१।१)
१६८ अभि प्र गोपतिं गिरेन्द्रमर्च यथा विदे । सूनुं सत्यस्य सत्पतिम् ॥ ४ ॥ (ऋ. ८।६९।४)

---

[१६३] (योगेयोगे) प्रत्येक कार्यामध्यें व (वाजे वाजे) प्रत्येक स्पर्धेमध्यें (ऊतये) आमचें संरक्षण व्हावें यासाठीं (तवस्तरं इन्द्रं) अति बलवान इन्द्राला (सखायः) मित्राप्रमाणें वागणारे आम्ही (हवामहे) बोलावतों. ॥ ९ ॥

१ योगेयोगे वाजेवाजे ऊतये तवस्तरं इन्द्रं हवामहे— प्रत्येक कार्यामध्यें व स्पर्धेमध्यें आपलें रक्षण व्हावें यासाठीं इन्द्राला सहायासाठीं बोलावतों.

[१६४] हे (स्तोम-वाहसः) यज्ञ करणाऱ्यांनों ! (सखायः) हे मित्रांनों ! (आ तु आ इत) लवकर येथें या व (निषीदत) येथें बसा आणि (इन्द्रं अभि प्रगायत) इन्द्राच्या स्तोत्रांचें गायन करा. ॥ १० ॥

॥ येथें पांचवा खंड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[१६५] हे (राधानां पते) धनांच्या स्वामी व हे (गिर्वणः) स्तुतीला योग्य इन्द्रा ! (ओजसा) बलानें काढलेल्या (इदं सुतं) या सोमरसाला (अस्य तु अनु पिब हि) तूं लवकर अनुकूल होऊन पी. ॥ १ ॥

[१६६] (नः इन्द्रः महान्) आमचा हा इन्द्र मोठा आहे व (परः च) श्रेष्ठहि आहे. (वज्रिणे महित्वं अस्तु) वज्रधारी इन्द्राचें महत्व वाढत असो. (द्यौः न) द्युलोकासारखें (शवः प्रथिना) त्याचें बल वाढत राहो. ॥ २ ॥

[१६७] हे इन्द्रा ! (महा-हस्ती) मोठ्या हातांचा तूं (नः तु) आम्हांस देण्यासाठीं (क्षुमन्तं चित्रं ग्राभं) स्तुत्य व अनेक प्रकारचें स्वीकारण्यास योग्य असें धन (दक्षिणेन आ संगृभाय) उजव्या हातानें घे. ॥ ३ ॥

[१६८] (गो-पतिं) गाईंचें पालन करणाऱ्या (सत्यस्य सूनुं) सत्याचा प्रचारक (सत्-पतिं) सत्याचा पालक (इन्द्रं) अशा इन्द्राला (गिरा अभि प्र अर्च) वाणीनें अर्चना कर (यथा विदे) कीं ज्या योगें त्याला या यज्ञाचें ज्ञान होईल. ॥ ४ ॥

१६९ कया नश्चित्र आ भुवदूती सदावृधः सखा । कया शचिष्ठया वृता ॥ ५ ॥ (ऋ. ४।३१।१)

१७० त्यमु वः सत्रासाहं विश्वासु गीर्ष्वायतम् । आ च्यावयस्यूतये ॥ ६ ॥

१७१ सदसस्पतिमद्भुतं प्रियमिन्द्रस्य काम्यम् । सनिं मेधामयासिषम् ॥ ७ ॥ (ऋ. १।१८।६)

१७२ ये ते पन्था अधो दिवो येभिर्व्यश्वमैरयः । उत श्रोषन्तु नो भुवः ॥ ८ ॥

१७३ भद्रंभद्रं न आ भरेषमूर्जं शतक्रतो । यदिन्द्र मृडयासि नः ॥ ९ ॥ (ऋ. ८।९३।२८)

१७४ अस्ति सोमो अयं सुतः पिबन्त्यस्य मरुतः । उत स्वराजो अश्विना ॥ १० ॥ (ऋ. ८।९४।४)

इति अष्टमी दशतिः ॥ ८ ॥ षष्ठः खण्डः ॥ ६ ॥ [स्व० १२ । उ० १ । धा० ४० । (चौ) ॥]

[९]

(१–१०) १ देवजामय इन्द्रमातरः, २ गोधा ऋषिका; ३ दध्यङ्ङाथर्वणः; ४ प्रस्कण्वः काण्वः; ५ गोतमो राहूगणः; ६ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ७ वामदेवो गौतमः; ८ वत्सः काण्वः; ९ शुनःशेप आजीगर्तिः; १० उलो वातायनः ॥ इन्द्रः (ऋ० ४ अश्विनौ; १० वायुः) ॥ गायत्री ॥

१७५ ईङ्खयन्तीरपस्युव इन्द्रं जातमुपासते । वन्वानासः सुवीर्यम् ॥ १ ॥ (ऋ. १०।१५३।१)

---

[१६९] (सदा-वृधः) सदा वृद्धिंगत होणारा (चित्रः सखा) विलक्षण श्रेष्ठ मित्र हा इन्द्र (कया ऊती) कोणत्या संरक्षणाच्या शक्तिनें युक्त होऊन (नः आ भुवत्) आमच्याजवळ येईल बरें ? तसेंच (कया शचिष्ठया वृता) कोणत्या शक्तियुक्त वर्तनानें युक्त होऊन तो आमच्याजवळ येईल बरें ? ॥ ५ ॥

[१७०] (सत्रा-साहं) पुष्कळ शत्रूंचा पराभव करणाऱ्या (वः) तुमच्या (विश्वासु गर्षु आयतं) सर्व स्तुतिमध्यें वाखाणल्या गेलेल्या (त्यं उ) त्या इन्द्राला च (ऊतये) आपल्या संरक्षणासाठीं तुम्ही (आच्यावयसि) आपणाकडे बोलवा. ॥ ६ ॥

[१७१] (मेधां) बुद्धि वाढवण्यासाठीं (अद्भुतं) अपूर्व (इन्द्रस्य प्रियं) इन्द्राला प्रिय (काम्यं) इच्छा करण्यास योग्य धनाचें (सनिं) दान देणाऱ्या अशा (सदसस्पतिं) सदसस्पति देवाला (अयासिषं) मी प्राप्त केलें आहें. ॥ ७ ॥

[१७२] हे इन्द्रा ! (ये ते पन्थाः) जे तुझे मार्ग (दिवः अधः) द्युलोकाच्या खालीं आहेत, (येभिः विश्वं ऐरयः) ज्या मार्गांनीं सर्व विश्वाला तूं चालवतोस, (ते) ते मार्ग (नः भुवः उत श्रोषन्तु) आमच्या यज्ञस्थानांला पोंचोत. त्या मार्गांनीं तूं आमच्या यज्ञस्थानांकडे ये. ॥ ८ ॥

[१७३] हे (शतक्रतो) शेंकडों कार्यें करणाऱ्या इन्द्रा ! (भद्रं भद्रं) अत्यंत कल्याण करणारें (इषं ऊर्जं) अन्न व बलवर्धक धन (नः आ भर) आम्हांला भरपूर दे. (यत्) कारण कीं (नः मृळयासि) आम्हांला तूं सुखी करतोस. ॥ ९ ॥

१ हे शतक्रतो ! भद्रं इषं ऊर्जं नः आभर— हे शेंकडों कर्म करणाऱ्या इन्द्रा ! कल्याण करणारें अन्न व बल आम्हांला भरपूर दे. २ नः मृळयासि— आम्हांला तूं सुखी करतोस.

[१७४] (अयं सोमः सुतः अस्ति) हा सोमरस आम्ही तयार करून ठेवला आहे. (अस्य) याला (स्वराजः मरुतः) तेजस्वी मरुत (पिबन्ति) पीत आहेत. (उत अश्विना) व अश्विनौ देवही पीत आहेत. ॥ १० ॥

॥ येथें सहावा खंड समाप्त झाला ॥

[७] सप्तमः खण्डः ।

[१७५] (सु-वीर्यं वन्वानासः) उत्तम वीर्य प्राप्त करूं इच्छिणाऱ्या (ईङ्खयन्तीः) इन्द्राजवळ जाणाऱ्या व (अपस्युवः) उत्तम कार्य करूं इच्छिणाऱ्या इन्द्राच्या माता (जातं तं उपासते) प्रकट होतांच त्या इन्द्राची सेवा करूं लागतात. ॥ १ ॥

१७६ नकि देवा इनीमसि न क्या योपयामसि । मन्त्रश्रुत्यं चरामसि ॥ २ ॥ (ऋ. १०।१३४।७)
१७७ दोषो आगाद् बृहद्गाय द्युमद्गामन्नाथर्वण । स्तुहि देवꣳसवितारम् ॥ ३ ॥ (अथर्व. ६।१।१)
१७८ एषो उषा अपूर्व्या व्युच्छति प्रिया दिवः । स्तुषे वामश्विना बृहत्॥ ४ ॥ (ऋ. १।४६।१)
१७९ इन्द्रो दधीचो अस्थभिर्वृत्राण्यप्रतिष्कुतः । जघान नवतीर्नव ॥ ५ ॥ (ऋ. १।८४।१३)
१८० इन्द्रेहि मत्स्यन्धसो विश्वेभिः सोमपर्वभिः । महाꣳ अभिष्टिरोजसा॥ ६ ॥ (ऋ. १।९।१)
१८१ आ तू न इन्द्र वृत्रहन्नस्माकमर्धमा गहि । महान्महीभिरूतिभिः ॥ ७ ॥ (ऋ. ४।३२।१)
१८२ ओजस्तदस्य तित्विष उभे यत्समवर्तयत् । इन्द्रश्चर्मेव रोदसी ॥ ८॥ (ऋ. ८।६।५)

---

[१७६] हे (देवाः) देव हो ! (न कि इनीमसि) आम्ही कांहीं हानि करीत नाहीं व (न कि आयोपयामसि) आम्ही कांहीं विरुद्ध कार्यही करीत नाहीं, (मन्त्र-श्रुत्यं चरामसि) वेदमंत्रांनीं जें सांगितलें आहे तसें आम्ही आचरण करीत आहों. ॥ २ ॥

१ न कि इनीमसि— आम्ही हानि करीत नाहीं. २ न कि आयोपयामसि— आम्हीं कांहीं विरुद्ध कार्य करीत नाहीं. ३ मन्त्रश्रुत्यं चरामसि— वेदमंत्रांनीं जें सांगितलें तसें आम्ही आचरण करतों.

[१७७] हे (बृहद्-गाय) बृहत् नामक सामाचें गायन करणाऱ्या, हे (द्युमत्-गामन्) प्रकाशाच्या मार्गानें जाणाऱ्या (आथर्वण) अथर्ववेदी ब्राह्मणा ! (दोषः अगात्) यज्ञकर्मांत जो दोष होईल तो दूर करण्यासाठीं (देवं सवितारं स्तुहि) सविता देवाची स्तुति कर. ॥ ३ ॥

१ दोषः अगात्, देवं सवितारं स्तुहि— दोष झाला तर सविता देवाची स्तुति कर.

[१७८] (एषा प्रिया) ही प्रिय (अपूर्व्या उषा) अपूर्व उषा (दिवः व्युच्छति) द्युलोकांतून प्रकाशित होत आहे. हे (अश्विनौ) अश्वि देवांनो ! (वां बृहत् स्तुषे) तुमची मोठी स्तुति करीत आहें. ॥ ४ ॥

[१७९] (अ-प्रतिष्कुतः) ज्याचा कोणी प्रतिकार करूं शकत नाहीं असा इन्द्र (दधीचः अस्थिभिः) दधीचाच्या अस्थींनीं (नव नवतीः) आठशें दहा (वृत्राणि) वृत्रांना (जघान) मारता झाला. ॥ ५ ॥

नव नवतीः — नऊ वेळ नव्वद. $९० \times ९ = ८१०$.

[१८०] हे इन्द्र ! (एहि) ये. (अन्धसः) अन्न रूपी (विश्वेभिः सोमपर्वभिः) सर्व सोमरसांनीं (मत्सि) तूं आनंदित होत आहेस. आतां (ओजसा) आपल्या सामर्थ्यानें (महान् अभिष्टिः) मोठा शत्रूंचा पराभव करणारा हो. ॥ ६ ॥

१ ओजसः महान् अभिष्टिः— सामर्थ्यानें मोठा शत्रूंचा पराभव करणारा हो.

[१८१] हे (वृत्र-हन्) वृत्ररूपी शत्रूंना ठार करणाऱ्या इन्द्रा ! तूं (नः) आमच्याजवळ (महान् आ तु) महान् होऊन ये. (महीभिः ऊतिभिः) मोठ्या संरक्षणाऱ्या साधनां सह (अस्माकं अर्द्धं आगहि) आमच्या जवळ ये. ॥७॥

१ महीभिः ऊतिभिः अस्माकं अर्द्धं आगहि— मोठ्या संरक्षणाच्या साधनांसह आमच्याकडे ये.

[१८२] (अस्य तत् ओजः) या इन्द्राचें तें सामर्थ्य (तित्विषे) चमकूं लागलें आहे, (यत्) ज्याच्यामुळें हा इन्द्र (उभे रोदसी) द्युलोक व भूलोक यांना (चर्म इव समवर्तयत्) चर्माप्रमाणें पसरत असतो. ॥ ८ ॥

❀

१८३ अयमु ते समतसि कपोत इव गर्भधिम् । वचस्तच्चिन्न ओहसे ॥ ९ ॥ (ऋ. १।३०।४)

१८४ वात आ वातु भेषजꣳशम्भु मयोभु नो हृदे । प्र न आयूꣳषि तारिषत् ॥ १० ॥ (ऋ. १०।१८६।१)

इति नवमी दशतिः ॥ ९ ॥ सप्तमः खण्डः ॥ ७ ॥ [स्व० १० । उ० २ । धा० ४५ । (फु) ॥]

[१०]

(१–९) १ कण्वो घौरः; २, ३, ९ वत्सः (ऋ० २, ९ वशोऽश्व्यः) काण्वः; ४ श्रुतकक्षः सुकक्षो वा आङ्गिरसः; ५ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ६ वामदेवो गौतमः; ७ इरिम्बिठिः काण्वः; ८ सत्यधृतिर्वारुणिः ॥ इन्द्रः (ऋ० १ वरुणमित्रार्यमणः; ८ आदित्यः) गायत्री ॥

१८५ यꣳ रक्षन्ति प्रचेतसो वरुणो मित्रो अर्यमा । न किः स दभ्यते जनः ॥१॥ (ऋ. १।४१।१)

१८६ गव्यो षु णो यथा पुराश्वयोत रथया । वरिवस्या महोनाम् ॥ २ ॥ (ऋ. ८।४६।१०)

१८७ इमास्त इन्द्र पृश्नयो घृतं दुहत आशिरम् । एनामृतस्य पिप्युषीः ॥ ३ ॥ (ऋ. ८।६।१९)

१८८ अया धिया च गव्यया पुरुणामन्पुरुष्टुत । यत्सोमेसोम आभुवः ॥ ४ ॥ (ऋ. ८।९३।१७)

---

[१८३] हे इन्द्रा ! (अयं उ) हा सोमरस खरोखर (ते) तुझ्यासाठीं तयार केला आहे, त्याच्याजवळ (समतासि) तूं जात असतोस. (कपोतः गर्भधिं इव) जसा कबूतर गर्भ धारण करूं शकणाऱ्या कबूतरीजवळ जातो. (तत् चित्) तसें (नः वचः) आमची स्तुति (ओहसे) तूं ऐकतोस. ॥ ९ ॥

[१८४] (वातः) हा वायु (नः हृदे शंभु मयोभु) आमच्या हृदयाला शान्ति व सुख देणारें (भेषजं) औषध (आ वातु) आणून देवो, व तें (नः आयूंषि प्रतारिषत्) आमचें आयुष्य सुदीर्घ करो. ॥ १० ॥

१ वातः नः हृदे शंभु मयोभु भेषजं आ वातु— हा वायु आमच्या हृदयाला सुखकारक व आरोग्य देणारें औषध आणून देवो.

२ नः आयूंषि प्र तारिषत्— आमचें आयुष्य वाढवो.

॥ येथें सातवा खंड समाप्त झाला ॥

[८] अष्टमः खण्डः ।

[१८५] (प्र-चेतसः) ज्ञानी वरुण, मित्र व अर्यमा (यं रक्षन्ति) ज्याचें रक्षण करतात, (सः जनः) तो मनुष्य (न किः दभ्यते) कोणाकडूनहि दबला जात नाहीं. ॥ १ ॥

१ प्रचेतसः यं रक्षन्ति स जनः न किः दभ्यते— ज्ञानी देव ज्याचें रक्षण करतात, त्याला कोणीहि दाबूं शकत नाहीं.

[१८६] हे इन्द्रा ! (यथा पुरा) पूर्वीप्रमाणेंच (नः) आम्हांला (सु गव्या) उत्तम गाई, (उ अश्वया) घोडे (उत रथया) व रथ आणि (महोनां) महत्व वाढवणारें धन देण्याच्या इच्छेनें (वरिवस्य) आमच्याकडे ये. ॥ २ ॥

[१८७] हे इन्द्रा ! (ते इमाः पृश्नयः) तुझ्या या गाई (ऋतस्य पिप्युषीः) यज्ञाला वाढवणाऱ्या आहेत व (घृतं एनां आशिरं) तूप देणाऱ्या दुधाला (दुहते) देतात. ॥ ३ ॥

[१८८] हे (पुरु-नामन्) अनेक नांवें असलेल्या व (पुरु-ष्टुत) अनेकांनीं स्तुति केल्या जाणाऱ्या इन्द्रा ! (सोमे सोमे) प्रत्येक सोमयागामध्यें (यत् आभुवः) जेव्हां तूं येतोस, तेव्हां (अया गव्यया धिया) या गाईंची इच्छा करणाऱ्या स्तुतिनें आम्ही तुझी स्तुति करतों. ॥ ४ ॥

१८९ पावका नः सरस्वती वाजेभिर्वाजिनीवती । यज्ञं वष्टु धियावसुः ॥ ५ ॥ (ऋ. १।३।१०)

१९० क इमं नाहुषीष्वा इन्द्रꣳसोमस्य तर्पयात् । स नो वसून्या भरात् ॥ ६ ॥

१९१ आ याहि सुषुमा हि त इन्द्र सोमं पिबा इमम् । एदं बर्हिः सदो मम ॥७॥ (ऋ. ८।१७।१)

१९२ महि त्रीणामवरस्तु द्युक्षं मित्रस्यार्यम्णः । दुराधर्षं वरुणस्य ॥ ८ ॥ (ऋ. १०।१८५।१)

१९३ त्वावतः पुरूवसो वयमिन्द्र प्रणेतः । स्मसि स्थातर्हरीणाम् ॥ ९ ॥ (ऋ. ८।४६।१)

इति दशमी दशतिः ॥ १० ॥ अष्टमः खण्डः ॥ ८ ॥ [स्व० ६ । उ० ४ । धा० ३५ । (घु) ।]

इति द्वितीयप्रपाठके द्वितीयोऽर्धः; द्वितीयः प्रपाठकश्च समाप्तः ।

अथ तृतीयप्रपाठके प्रथमोऽर्धः ।

[१]

(१-१०) १ प्रगाथः काण्वः; २ विश्वामित्रो गाथिनः; ३, १० वामदेवो गौतमः; ४, ६ श्रुतकक्षः आङ्गिरसः (ऋ० ४ सुकक्षोः वा; ६ सुकक्ष आंगिरसः); ५ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ७ गृत्समदः शौनकः; ८,९ भरद्वाजः (ऋ० -८ शंयुः) बार्हस्पत्यः ॥ इन्द्रः (९ ऋ० इन्द्रापूषणौ) ॥ गायत्री ॥

१९४ उत्त्वा मन्दन्तु सोमाः कृणुष्व राधो अद्रिवः । अव ब्रह्मद्विषो जहि ॥ १ ॥ (ऋ. ८।६४।१)

---

[१८९] (पावका) पवित्रता करणारी (वाजिनीवती) अन्न देणारी (धिया वसुः) बुद्धिच्या योगानें धन देणारी (सरस्वती) विद्या देवी (वाजेभिः) अन्नांनीं (नः यज्ञं वष्टु) आमचा यज्ञ पूर्ण करो. ॥ ५ ॥

[१९०] (नाहुषीषु) प्रजाजनांमध्यें (इमं इन्द्रं) या इन्द्राला (कः तर्पयात्) कोण बरें तृप्त करीत असतो ? असा (सः) तो इन्द्र (नः वसूनि आ भरत्) आम्हांला धनें भरपूर देवो. ॥ ६ ॥

[१९१] हे इन्द्रा ! (आयाहि) तूं ये. आम्ही (ते) तुझ्यासाठीं (सुषुमा हि) सोमरस उत्तम रीतिनें काढला आहे. (इमं सोमं पिब) हा सोमरस तूं पी. (मम) माझ्या (इदं बर्हिः) या आसनावर (आसदः) बैस. ॥ ७ ॥

[१९२] मित्र, अर्यमा व वरुण या (त्रीणां) तिघांकडून मिळणारें (द्युक्षं) तेजस्वी (दुराधर्षं) दुसऱ्यांकडून आक्रमण होण्यास कठिण असें (महि अवः) मोठें संरक्षण (अस्तु) आम्हांसाठीं असो. ॥ ८ ॥

१ द्युक्षं दुराधर्षं महि अवः अस्तु— तेजस्वी, दुसऱ्यांकडून पराभूत न होणारें, असें मोठें संरक्षण आम्हांस मिळो.

[१९३] हे (पुरू-वसो) पुष्कळ धन जवळ बाळगणाऱ्या (प्र-नेतः) उत्तम कर्मं करणाऱ्या (हरीणां स्थातः) घोड्यांवर बसणाऱ्या इन्द्रा ! (त्वावतः वयं स्मसि) तुझ्या कडून संरक्षित होऊन आम्हीं सुरक्षित रहावें. ॥ ९ ॥

॥ येथें आठवा खंड समाप्त झाला ॥

[९] नवमः खण्डः ।

[१९४] हे इन्द्रा ! (त्वा) तुला (सोमाः) सोमरस (उत् मदन्तु) उत्तम आनन्द देवोत. हे (अद्रि-वः) वज्रधारी इन्द्रा ! तूं आम्हांला (राधः कृणुष्व) धन दे व (ब्रह्म-द्विषः) ज्ञानाचा द्वेष करणाऱ्या शत्रूंना (अव जहि) पराभूत कर. ॥ १ ॥

१ राधः कृणुष्व— आम्हांला धन दे. २ ब्रह्मद्विषः अवजहि— ज्ञानाचा द्वेष करणांऱ्याचा पराभव कर.

१९५ गिर्वणः पाहि नः सुतं मधोर्धाराभिरज्यसे । इन्द्र त्वादातमिद्यशः ॥ २ ॥ ऋ. ३।४०।६)

१९६ सदा व इन्द्रश्चर्कृषदा उपो नु स सपर्यन् । न देवो वृतः शूर इन्द्रः ॥ ३ ॥

१९७ आ त्वा विशन्त्विन्दवः समुद्रमिव सिन्धवः । न त्वामिन्द्राति रिच्यते ॥ ४ ॥ (ऋ. ८।९२।२२)

१९८ इन्द्रमिद्गाथिनो बृहदिन्द्रमर्केभिरर्किणः । इन्द्रं वाणीरनूषत ॥ ५ ॥ (ऋ. १।७।१)

१९९ इन्द्र इषे ददातु न ऋभुक्षणमृभुं रयिम् । वाजी ददातु वाजिनम् ॥ ६ ॥ (ऋ. ८।९३।३४)

२०० इन्द्रो अङ्ग महद्भयमभी षदप चुच्यवत् । स हि स्थिरो विचर्षणिः ॥ ७ ॥ (ऋ २।४१।१०)

२०१ इमा उ त्वा सुतेसुते नक्षन्ते गिर्वणो गिरः । गावो वत्सं न धेनवः ॥ ८ ॥ (ऋ. ६।४५।२८)

---

[१९५] हे (गिर्वणः) स्तुतिला योग्य असणाऱ्या इन्द्रा ! (नः सुतं पाहि) आम्ही तयार केलेला सोमरस पी. कारण कीं तुला या (मधोः धाराभिः अज्यसे) मधुर रसाच्या धारांनीं अभिषेकच केला जात आहे. कारण हे इन्द्रा ! (त्वादातं इत् यशः) तुझ्या सहाय्यानेंच यश मिळत असतें. ॥ २ ॥

१ त्वादातं यशः इत्–– तुझ्या सहाय्यानेंच यश मिळतें.

[१९६] (इन्द्रः) हा इन्द्र (सदा उपो नु) सदा तुमच्याजवळ आहे. (सः सपर्यन्) तो सुपूजित होऊन (वः आचर्कृषत्) तुम्हांला यज्ञासाठीं आकर्षित असतो. (नः वृतः इन्द्रः देवः शूरः) आम्ही स्वीकारलेला इन्द्र देव फार शूर आहे. ॥ ३ ॥

१ नः वृतः देवः इन्द्रः शूरः–– आम्ही वरलेला इन्द्र देव शूर आहे.

[१९७] हे इन्द्रा ! (सिन्धवः समुद्रं न) नद्या समुद्रास मिळतात, त्याप्रमाणें हे (इन्दवः) सोमरस (त्वा आविशन्तु) तुझ्यामध्यें प्रविष्ट होवोत. हे (इन्द्र) इन्द्रा ! (त्वां) तुझ्यापेक्षां (न अतिरिच्यते) कोणीहि मोठा नाहीं. ॥ ४ ॥

१ हे इन्द्र ! त्वां न अतिरिच्यते— हे इन्द्रा ! तुझ्याहून मोठा कोणीहि नाहीं.

[१९८] (गाथिनः) सामगान करणारे (इन्द्रं इत्) इन्द्रालाच (बृहत् अनूषत) बृहत् साम गाऊन प्रसन्न करतात. (अर्किणः अर्केभिः) अर्चा करणारे स्त्रोत्रांनीं त्याचीच स्तुति करतात. (वाणीः इन्द्रं अनूषत) आमच्या वाणी इन्द्राचीच स्तुति गातात. ॥ ५ ॥

[१९९] इन्द्र ! (ऋभुक्षणं रयिं) श्रेष्ठ धन आम्हांस देवो. (ऋभुं नः इषे ददातु) कारागिरी आम्हांला अन्न मिळावे म्हणून देवोत. (वाजी वाजिनं ददातु) बलवान् इन्द्र आम्हांस बल देवो. ॥ ६ ॥

१ ऋभु-क्षणं रयिं ददातु— इन्द्र कारागिरांचें पालन करणारें धन आम्हांला देवो.

२ नः इषे ऋभुं ददातु— आम्हांला अन्न मिळावें म्हणून कारागिरी देवो.

३ वाजी वाजिनं ददातु— बलवान इन्द्र बल देवो.

[२००] (स्थिरः विचर्षणिः) चंचल नसणारा हा ज्ञानी इन्द्र (महत् भयं) मोठें भय असलें तरी (अंग हि अभीषत्) तें लवकर दूर करतो तसेंच त्या भयाला (अप-चुच्यवत्) स्थानभ्रष्ट करून टांकतो. ॥ ७ ॥

१ स्थिरः विचर्षणिः महद् भयं अभीषत् अचुच्यवत्— तो युद्धांत स्थिर व ज्ञानी मोठें भय असलें तरी तें दूर करतो व तें दूर करतो.

[२०१] हे (गिर्वणः) स्तुत्य इन्द्रा ! (सुतेसुते) प्रत्येक यज्ञांत (इमा गिरः) या आमच्या स्तुति (त्वां नक्षन्ते) तुलाच प्राप्त होतात, ज्याप्रमाणें (धेनवः गावः वत्सं न) दूध देणाऱ्या गाई वासराला प्राप्त करतात. ॥ ८ ॥

२०२ इन्द्रा नु पूषणा वयꣳसख्याय स्वस्तये । हुवेम वाजसातये ॥ ९ ॥ (ऋ. ६।५७।१)

२०३ न कि इन्द्र त्वदुत्तरं न ज्यायो अस्ति वृत्रहन् । न क्येवं यथा त्वम् ॥ १० ॥

(ऋ. ४।३०।१)

इति प्रथमा दशतिः ॥ १ ॥ नवमः खण्डः ॥ ९ ॥ [स्व० ८ । उ० ७ । धा० ३५ । (ठु) ॥]

[२]

(१-१०) १,४ त्रिशोकः काण्वः; २ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ३ वत्सः काण्वः; (ऋ० वशोऽश्व्यः); ५ सुकक्ष आङ्गिरसः; ६, ९ वामदेवो गौतमः; ७ विश्वामित्रो गाथिनः । ८ गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ; १० श्रुतकक्षः सुकक्षो वा आङ्गिरसः ॥ इन्द्रः ॥ गायत्री ॥

२०४ तरणिं वो जनानां त्रदं वाजस्य गोमतः । समानमु प्र शꣳसिषम् ॥ १ ॥ (ऋ. ८।४५।२८)

२०५ असृग्रमिन्द्र ते गिरः प्रति त्वामुदहासत । सजोषा वृषभं पतिम् ॥ २ ॥ (ऋ. १।९।४)

२०६ सुनीथो घा स मर्त्यो यं मरुतो यमर्यमा । मित्रास्पान्त्यद्रुहः ॥ ३ ॥ (ऋ. ८।४६।४)

२०७ यद्वीडाविन्द्र यत्स्थिरे यत्पर्शाने पराभृतम् । वसु स्पार्हं तदा भर ॥ ४ ॥ (ऋ. ८।४५।४१)

---

[२०२] (इन्द्रा पूषणा) इन्द्र व पूषा या देवतांना (नु वयं) आम्ही (स्वस्तये) आपल्या कल्याणासाठीं, (सख्याय) मित्रत्वासाठीं (वाज-सातये) अन्न प्राप्तीसाठीं (हुवेम) प्रार्थना करून बोलावीत आहों. ॥ ९ ॥

[२०३] हे (वृत्र-हन् इन्द्र) शत्रुला मारणाऱ्या इन्द्रा ! (त्वत् उत्तरः न कि अस्ति) तुझ्यापेक्षां श्रेष्ठ कोणीहि नाहीं व (ज्यायान्) मोठाही कोणी नाहीं. (यथा त्वं) जसा तूं आहेस तसा (न कि एवं) दुसरा कोणीहि नाहीं. ॥ १० ॥

१ हे वृत्रहन् इन्द्र ! त्वत् उत्तरः न कि अस्ति— हे वृत्रनाशका इन्द्रा ! तुझ्यापेक्षां श्रेष्ठ कोणीहि नाहीं.

॥ येथें नववा खंड समाप्त झाला ॥

[१०] दशमः खण्डः ।

[२०४] (वः जनानां तरणिं) लोकांचें तारण करणाऱ्या (त्रदं) शत्रूंना भय दाखवणाऱ्या (गोमतः वाजस्य) गाईपासून मिळणाऱ्या अन्नाचें दान करणाऱ्या इन्द्राची (समानं उ) सदोदित (प्रशंसिषम्) मी स्तुति करतों. ॥ १ ॥

१ जनानां तरणिं, त्रदं, समानं प्रशंसिषम्— सर्व लोकांचा रक्षक व शत्रुला भय दाखवणाऱ्या इन्द्राची आम्ही सदा स्तुति करतों.

[२०५] हे इन्द्रा ! (ते गिरः असृग्रं) तुझ्या स्तुतिचीं स्तोत्रें मी तयार केलीं. तीं (वृषभं पतिं त्वा) बलवान् पालनकर्त्या अशा तुला (प्रति उदहासत) पोंचलीं आहेत व त्यांचें (स-जोषाः) तूं सेवन केलें आहेस. ॥ २ ॥

[२०६] (यं) ज्याचें (अ-द्रुहः) द्रोह न करणारे मरुत् अर्यमा व मित्र हे (पान्ति) रक्षण करतात, (सः मर्त्यः) तो मनुष्य (सु-नीथः घ) खरोखर उत्तम नीतिमान असतोच. ॥ ३ ॥

१ यं अद्रुहः पान्ति स मर्त्यः सुनीथः— ज्याचें द्रोह न करणारे संरक्षण करतात, तो मनुष्य उत्तम नीतिमान असतो.

[२०७] हे इन्द्रा ! (यत्) जें धन (वीडौ) सुदृढ खजिन्यांत ठेवलें आहे, (यत् स्थिरे) जें धन स्थिर स्थानांत ठेवलें असेल (यत् पर्शाने पराभृतं) जें भूमीमध्यें ठेवलेलें असेल (तत् स्पार्हं वसु) तें स्पृहणीय धन (आभर) आम्हांस भरपूर होईल इतकें दे. ॥ ४ ॥

२०८ श्रुतं वो वृत्रहन्तमं प्र शर्धं चर्षणीनाम् । आशिषे राधसे महे ॥ ५ ॥ (ऋ. ८।९३।१६)

२०९ अरं त इन्द्र श्रवसे गमेम शूर त्वावतः । अर२शक्र परेमणि ॥ ६ ॥

२१० धानावन्तं करम्भिणमपूपवन्तमुक्थिनम् । इन्द्र प्रातर्जुषस्व नः ॥ ७ ॥ (३।५२।१)

२११ अपां फेनेन नमुचेः शिर इन्द्रोदवर्तयः । विश्वा यदजय स्पृधः ॥ ८ ॥ (ऋ. ८।१४।१३)

२१२ इमे त इन्द्र सोमाः सुतासो ये च सोत्वाः । तेषां मत्स्व प्रभूवसो ॥ ९ ॥

२१३ तुभ्य२सुतासः सोमाः स्तीर्णं बर्हिर्विभावसो । स्तोतृभ्य इन्द्र मृडय ॥ १० ॥

(ऋ. ८।९३।२५)

इति द्वितीया दशतिः ॥ २ ॥ दशमः खण्डः ॥ १० ॥ [स्व० ८ । उ० २ । धा० ३३ । (ठि) ।]

---

[२०८] (वृत्र-हन्तमं शर्धं) वृत्राला मारणारें इन्द्राचें बल तुम्ही (श्रुतं) ऐकलेंच आहे. (चर्षणीनां) माणसांमध्यें (महे राधसे) मोठी सिद्धि मिळावी म्हणून तें बल (प्र आशिषे) उपभोगासाठीं (वः) तुम्हांला देतों. ॥ ५ ॥

[२०९] हे (शूर इन्द्र) वीर इन्द्रा ! (ते श्रवसे) तुझी कीर्ति ऐकण्यासाठीं (अरं गमेम) पुरेसा अवसर आम्हांस प्राप्त होवो. हे (शक्र) सामर्थ्यवान् इन्द्रा ! (त्वावतः परेमणि) तुझ्यासारख्या श्रेष्ठ देवतेमध्यें (अरं) आम्हांस रममाण होण्यासाठीं भरपूर अवसर प्राप्त होवो. ॥ ६ ॥

[२१०] हे इन्द्रा ! (धानावन्तं) भाजलेल्या धान्याचें पीठ ज्यांत मिळवलें आहे, (करम्भिणं) दही व सातूचें पीठ ज्यांत मिळवलें आहे, (अपूपवन्तं) पुऱ्या ज्याच्या बरोबर आहेत, (उक्थिनं) स्तुतिस्तोत्रें ज्याच्या बरोबर म्हटलीं जात आहेत, अशा (नः) आमच्या सोमरसाला (प्रातः जुषस्व) सकाळीं सेवन कर. ॥ ७ ॥

[२११] (यत्) जेव्हां (विश्वाः स्पृधः अजयः) सर्व शत्रुसेनेचा पराभव केलास तेव्हां (इन्द्रः) इन्द्रानें (अपां फेनेन) जलांच्या फेनानें (नमुचेः शिरः उद्वर्तयः) नमुचीचें डोकें तोडलें. ॥ ८ ॥

१ अपां फेन— पाण्याचा फेण, समुद्र फेण. २ नमुचि— लवकर न बरा होणारा रोग. लवकर बऱ्या न होणाऱ्या रोगावर समुद्र फेणाच्या अनुपानांतून औषध द्यावें.

[२१२] हे (इन्द्र) इन्द्रा ! (ते) तुझ्यासाठीं (इमे सोमाः) हे सोमरस (सुतासः) काढून तयार केले आहेत. (च ये सोत्वाः) व जे रस काढावयाचे आहेत. हे (प्रभू-वसो) पुष्कळ धन जवळ बाळगणाऱ्या इन्द्रा ! (तेषां मत्स्व) त्या सोमरसांनीं आनंदित हो. ॥ ९ ॥

[२१३] हे (विभावसो) तेजस्वी धन जवळ बाळगणाऱ्या इन्द्रा ! (तुभ्यं सोमाः सुतासः) तुझ्यासाठीं हे सोमरस काढून तयार केले आहेत. (बर्हिः स्तीर्णं) आसन पसरून ठेवलें आहे. हे इन्द्रा ! या कुशासनावर बैस व सोम पी. आणि (स्तोतृभ्यः) उपासकांना (मृडय) सुखी कर ॥ १० ॥

॥ येथें दशवा खंड समाप्त झाला ॥

[३]

(१–९) १ शुनःशेप आजीगर्तिः, २ श्रुतकक्ष आंगिरसः (ऋ० सुकक्षो आंगिरसो वा;) ३ त्रिशोकः काण्वः; ४ मेधातिथिः काण्वः; ५ गोतमो राहूगणः; ६ ब्रह्मातिथिः काण्वः; ७ विश्वामित्रो गाथिनो जमदग्निर्वा; ८ प्रस्कण्वः काण्वः (ऋ० कण्वो घौरः); ९ मेधातिथिः काण्वः ॥ इन्द्रः (ऋ० ५ विश्वेदेवाः), ६ अश्विनौ; मित्रावरुणौ; ८ मरुतः; ९ विष्णुः) ॥ गायत्री ॥

२१४ आ व इन्द्रं क्रिविं यथा वाजयन्तः शतक्रतुम् । मंहिष्ठं सिञ्च इन्दुभिः ॥ १ ॥ (ऋ. १।३०।१)

२१५ अतश्चिदिन्द्र न उपा याहि शतवाजया । इषा सहस्रवाजया ॥ २ ॥ (ऋ. ८।९२।१०)

२१६ आ बुन्दं वृत्रहा ददे जातः पृच्छाद्वि मातरम् । क उग्राः के ह शृण्विरे ॥ ३ ॥ (ऋ. ८।४५।४)

२१७ बृबदुक्थं हवामहे सृप्रकरस्नमूतये । साधः कृण्वन्तमवसे ॥ ४ ॥ (ऋ. ८।३२।१०)

२१८ ऋजुनीती नो वरुणो मित्रो नयति विद्वान् । अर्यमा देवैः सजोषाः ॥५॥ (ऋ. १।९०।१)

२१९ दूरादिहेव यत्सतोऽरुणप्सुरशिश्वितत् । वि भानुं विश्वथातनत् ॥६॥ (ऋ. ८।५।१)

---

[११] एकादशः खण्डः ।

[२१४] (वाजयन्तः) अन्न जवळ बाळगणारे आम्ही यजमान (वः) तुमच्या (शतक्रतुं) शेंकडों कामें करणाऱ्या (महिष्ठं इन्द्रं) महान इन्द्राला (क्रिविं यथा) जसें शेतीला पाणी देतात त्याप्रमाणें (इन्दुभिः आ सिञ्चे) सोमरसांनीं भिजवीतों. ॥ १ ॥

[२१५] हे इन्द्रा ! (अतः चित्) या द्युलोकांतून (शत-वाजया) शेंकडों बलें असणाऱ्या, (सहस्र-वाजया) सहस्र प्रकारच्या अन्नांनीं युक्त (इषा) रसासह (नः) आमच्याजवळ (उप याहि) ये. ॥ २ ॥

[२१६] (जातः वृत्रहा) उत्पन्न होतांच ह्या वृत्राला मारणाऱ्या इन्द्रानें (बुन्दं आददे) बाण हातामध्यें घेतला आणि (के के उग्राः इह शृण्विरे) कोण कोण उग्रवीर येथें विख्यात झालेले आहेत, हें आपल्या मातेला (वि पृच्छात्) विशेष उत्सुकतेनें त्यानें विचारलें. ॥ ३ ॥

[२१७] (ऊतये) सर्वांचें संरक्षण व्हावें यासाठीं (सृप्रकरस्नं) ज्यानें आपले बाहू पसरले आहेत, व (अवसे) संरक्षणासाठीं (साधः कृण्वन्तं) साधन अर्पण करणाऱ्या आणि (बृबदुक्थं) ज्याची पुष्कळ स्तुति होत आहे त्या इन्द्राला (हवामहे) आम्ही बोलावतों. ॥ ४ ॥

(२१८) मित्र, वरुण हे (विद्वान्) ज्ञानी देव (नः) आम्हांला (ऋजु-नीती नयति) सरळ नीतिच्या मार्गानें नेत आहेत. (देवैः सजोषाः अर्यमा) देवां बरोबर समान रीतिनें राहणारा अर्यमा ही आम्हांला सरळ मार्गानें उन्नतिला पोंचवो. ॥ ५ ॥

[२१९] (दूरात्) दूरून आकाशाच्या पूर्व भागीं (इह सतः एव) येथेंच आहे असें वाटणारी (अरुणप्सुः) अरुण प्रकाश पसरवणारी उषा (यत् अशिश्वितत्) जेव्हां प्रकाशित होऊं लागली तेव्हां (भानुं) प्रकाशाला (विश्वथा व्यतनत्) चार ही बाजूंना फैलाऊं लागली. ॥ ६ ॥

२२० आ नो मित्रावरुणा घृतैर्गव्यूतिमुक्षतम् । मध्वा रजांऽसि सुक्रतू ॥ ७ ॥ (ऋ. ३।६२।१६)
२२१ उदु त्ये सूनवो गिरः काष्ठा यज्ञेष्वत्नत । वाश्रा अभिज्ञु यातवे ॥ ८ ॥ (ऋ. १।३७।१०)
२२२ इदं विष्णुर्वि चक्रमे त्रेधा नि दधे पदम् । समूढमस्य पांऽसुले ॥ ९ ॥ (ऋ. १।२२।१६)

इति तृतीया दशतिः ॥ ३ ॥ एकादशः खण्डः ॥ ११ ॥ [स्व० ६ । उ० १ । धा० ३९ । (को) ॥]

[४]

(१–१०) १,७,८ मेधातिथिः काण्वः; २ वामदेवो गौतमः; ३, ५ मेधातिथिः काण्वः, प्रियमेधश्चाङ्गिरसः; ४ विश्वामित्रो गाथिनः; ६ दुर्मित्रः (सुमित्रो वा) कौत्सः; ९ विश्वामित्रो गाथिनोऽभीपाद् उदलो वा; १० श्रुतकक्षः (ऋ० सुकक्षो वा) आंगिरसः ॥ इन्द्रः ॥ गायत्री ॥

२२३ अतीहि मन्युषाविणंऽसुषुवांऽसमुपेरय । अस्य रातौ सुतं पिब ॥ १ ॥ (ऋ. ८।३२।२१)
२२४ कदु प्रचेतसे महे वचो देवाय शस्यते । तदिध्यस्य वर्धनम् ॥ २ ॥
२२५ उक्थं च न शस्यमानं नागो रयिरा चिकेत । न गायत्रं गीयमानम् ॥ ३ ॥ (ऋ.८।२।१४)
२२६ इन्द्र उक्थेभिर्मन्दिष्ठो वाजानां च वाजपतिः । हरिवांत्सुतानांऽसखा ॥ ४ ॥

---

[२२०] (सु–क्रतू मित्रा–वरुणा) उत्तम कर्में करणारे मित्र व वरुण (नः गव्यूतिं) आमच्या गोशाळेला (घृतैः आ उक्षतं) तूपानें–किंवा तूप उत्पन्न करणाऱ्या दुधानें सिंचित करोत. अर्थात् आम्हांला पुष्कळ दूध देणाऱ्या गाई देवोत. (रजांसि) रजोलोकाला (मध्वा) मधुर रसानें सिंचित करोत. ॥ ७ ॥

[२२१] (त्ये सूनवः गिरः) ते पुत्र मरुत् गर्जना करीत (यज्ञेषु) यज्ञांमध्यें (काष्ठाः उ उत् अत्नते) दिशांमधून जलांना असें पसरवतात कीं त्यामुळें (वाश्राः) हंबारव करणाऱ्या गाईंना (अभिज्ञु यातवे) गुडघ्या पर्यंतच्या पाण्यांतून जाण्याला भाग पडतें. ॥ ८ ॥

[२२२] (विष्णुः) व्यापक ईश्वरानें (इदं विचक्रमे) या विश्वामध्यें असा पराक्रम केला आहे कीं येथें (त्रेधा पदं निदधे) तीन प्रकारांनीं आपला पाय यानें ठेवला आहे, (अस्य पांसुले) याच्या धूली युक्त एका चरणाच्या ठिकाणीं सर्व जगत् (समूढं) समावलें आहे. ॥ ९ ॥

॥ येथें अकरावा खंड समाप्त झाला ॥

[१२] द्वादशः खण्डः ।

[२२३] हे इन्द्रा ! (मन्यु–षाविणं) क्रोधी होऊन सोमरस काढणाऱ्या यजमानाला (अतीहि) सोडून दे, (सुसुवांसं उपेरय) उत्तम रीतिनें सोमरस काढणाऱ्या जवळ जा व (अस्य रातौ) याच्या यज्ञामध्यें (सुतं पिब) सोमरस पी. ॥ १ ॥

[२१४] (महे प्रचेतसे देवाय) मोठ्या ज्ञानी इन्द्र देवासाठीं (कदु वचः शस्यते) आमचें कमी प्रतीचें स्तोत्र असलें तरी तें प्रशंसित असल्यासारखें होवो; कारण (तत् इत् अस्य वर्धनं) तें ह्या इन्द्राच्या गुणांचें वर्णन करणारेंच आहे. ॥ २ ॥

[२२५] (अ–गोः) स्तुति न करणाऱ्याचा (अयिः) शत्रु इन्द्र (शस्यमानं उक्थं चन) म्हटलें जाणारें स्तोत्रही (न आचिकेत) जाणत नाहीं असें नाहीं, (गीयमानं गायत्रं न) गाइलेलें गायत्र सामही तो लक्ष्यांत घेत नाहीं असें नाहीं. ॥ ३ ॥

[२२६] (वाजानां वाजपतिः) बलिष्ठांमध्यें श्रेष्ठ बलिष्ठ (हरिवान् इन्द्रः) घोडे जवळ बाळगणारा इन्द्र (उक्थेभिः मन्दिष्ठः) स्तोत्रें ऐकून संतुष्ट होऊन (सुतानां सखा) सोमयाग करणारांचा मित्र होतो. ॥ ४ ॥

२२७ आ याह्युप नः सुतं वाजेभिर्मा हृणीयथाः । महा३इव युवजानिः ॥ ५ ॥ (ऋ. ८।२।१९)
२२८ कदा वसो स्तोत्र३ंहर्यत आ अव श्मशा रुधद्वाः । दीर्घ३ंसुतं वाताप्याय ॥ ६ ॥
(ऋ. १०।१०५।१)
२२९ ब्राह्मणादिन्द्र राधसः पिबा सोममृतू३ंरनु । तवेद३ंसख्यमस्तृतम् ॥ ७ ॥ (ऋ. १।१५।५)
२३० वयं घा ते अपि स्मसि स्तोतार इन्द्र गिर्वणः । त्वं नो जिन्व सोमपाः ॥ ८ ॥
(ऋ. ८।३२।७)
२३१ एन्द्र पृक्षु कासु चिन्नृम्णं तनूषु धेहि नः । सत्राजिदुग्र पौं३स्यम् ॥ ९ ॥
२३२ एवा ह्यसि वीरयुरेवा शूर उत स्थिरः । एवा ते राध्यं मनः ॥ १० ॥ (ऋ. ८।९२।२८)

इति चतुर्थी दशतिः ॥ ४ ॥ द्वादशः खण्डः ॥ १२ ॥ [स्व० १२ । उ० ना । धा० ३० । यौ ॥]

इति द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

इत्येकसामि समाप्तम् ॥

---

[२२७] हे इन्द्र ! आमच्या (सुतं उप आ याहि) सोम यागामध्यें ये. (वाजेभिः मा हृणीयथाः) दुसऱ्यांनीं दिलेल्या हविष्यान्नाकडे लक्ष्य देऊं नकोस. (युवजानिः महान् इव) तरुण स्त्री असलेला मोठा तरुण आपल्या स्त्रीकडेच लक्ष्य देतो त्याप्रमाणें कर. ॥ ५ ॥

[२२८] हे (वसो) व्यापक इन्द्रा ! (स्तोत्रं हर्यते) स्तोत्र पाठ ऐकण्याची इच्छा करणाऱ्या तुला (दीर्घं सुतं) विशेष तयार केलेल्या सोमरसामध्यें (वाताप्याय श्मशा) जल मिळवण्यासाठीं जसा कालवा आडवावा, त्या प्रमाणें (कदा अवारुध्यत् वाः) तुला केव्हां आडवावें व केव्हां तुझा स्वीकार करावा. ॥ ६ ॥

[२२९] हे इन्द्रा ! (ब्राह्मणात् राधसः) ब्राह्मणाच्छंसीच्या यज्ञ पात्रांतून (सोमं ऋतून् अनु पिब) सोमरस ऋतूंला अनुसरून पी; कारण (तव इदं सख्यं) तुझा हा मित्रभाव (अस्तृतं) अविच्छिन्न राहणारा आहे. ॥ ७ ॥

१ तव सख्यं अस्तृतं— तुझी मित्रता कायम टिकणारी आहे.

[२३०] हे (गिर्वणः इन्द्र) प्रशंसनीय इन्द्रा ! (ते) तुझे (वयं घ) आम्ही (स्तोतारः स्मसि) स्तुति करणारे आहोंत. हे (सोम-पाः) सोम पिणाऱ्या इन्द्रा ! (त्वं नः जिन्व) तूं आम्हांला संतुष्ट कर. ॥ ८ ॥

[२३१] हे इन्द्रा ! (पृक्षु कासुचित्) संबंधांत आलेल्या कांहीं (नः तनूषु) आमच्या अंगांमध्यें (नृ-मणं आधेहि) बल स्थानपर कर. हे (उग्र) वीर इन्द्रा ! (सत्रा-जित् पौंस्यं) सर्व शत्रूंना एकदम जिंकण्याचें पौरुष आमच्यामध्यें स्थापन कर. ॥ ९ ॥

१ पृक्षु नः तनूषु नृम्णं आधेहि— आमच्या संबंधीं लोकांमध्यें नेतृत्व करणारें बल वाढव.

२ सत्राजित् पौंस्यं आधेहि— सर्व शत्रूंना एकदम जिंकण्याचें सामर्थ्य आम्हांमध्यें येऊं दे.

[२३२] हे इन्द्रा ! (वीर-युः एव असि) शत्रु वीरांबरोबर युद्ध करणारा तूं आहेस. (हि) कारण कीं तूं (शूरः उत स्थिरः) शूर आहेस व युद्धांत स्थिर राहणारा आहेस. या साठीं (ते मनः) तुझें मन (राध्यं) स्तुति करून आराधना करण्यास योग्य आहे. ॥ १० ॥

१ वीरयुः असि— शत्रूं बरोबर युद्ध करणारा तूं आहेस; किंवा वीरांशीं संयोग घडवून आणणारा आहेस.

२ शूरः उत स्थिरः असि — तूं शूर आहेस व युद्धांत स्थिर राहणारा आहेस.

३ ते मनः राध्यं— तुझें मन आराधना करण्यास योग्य आहे.

॥ येथें बारावा खंड समाप्त झाला ॥

अथ तृतीयोऽध्यायः ।

[५]

(१–१०) १, ६, ९ वसिष्ठो मैत्रावरुणिः; २ भरद्वाजः (ऋ० शंयुः) बार्हस्पत्यः; ३ प्रस्कण्वः काण्वः, ४ नोधा गौतमः; ५ कलिः प्रागाथः; । ७ मेधातिथिः काण्वः; ८ भर्गः प्रागाथः; १० प्रगाथो घौरः काण्वः ॥ इन्द्रः, ९ मरुतः ॥ बृहती ॥

२३३ अभि त्वा शूर नोनुमोऽदुग्धा इव धेनवः ।
ईशानमस्य जगतः स्वर्दृशमीशानमिन्द्र तस्थुषः ॥ १ ॥ (ऋ. ७।३२।२२)

२३४ त्वामिद्धि हवामहे सातौ वाजस्य कारवः ।
त्वां वृत्रेष्विन्द्र सत्पतिं नरस्त्वां काष्ठास्वर्वतः ॥ २ ॥ (ऋ. ६।४६।१)

२३५ अभि प्र वः सुराधसमिन्द्रमर्च यथा विदे ।
यो जरितृभ्यो मघवा पुरूवसुः सहस्रेणेव शिक्षति ॥ ३ ॥ (ऋ. ८।४९।१)

२३६ तं वो दस्ममृतीषहं वसोर्मन्दानमन्धसः ।
अभि वत्सं न स्वसरेषु धेनव इन्द्रं गीर्भिर्नवामहे ॥ ४ ॥ (ऋ. ८।८८।१)

[१३ । त्रयोदशः खण्डः ।

[२३३] हे (शूर इन्द्र) शूर इन्द्रा ! (अस्य जगतः तस्थुषः ईशानं) या जंगम व स्थावर जगाच्या स्वामी असणाऱ्या (स्वर्-दृशं त्वा) सर्वांना पाहणाऱ्या तुला (अ-दुग्धा धेनवः इव) दूध न काढलेल्या गाईंप्रमाणें आम्हीं (अभि नोनुमः) प्रणाम करीत आहों. ॥ १ ॥

१ अस्य जगतः तस्थुषः ईशानं स्वर्दृशं त्वा अभिनोनुमः— या जंगम व स्थावर जगाचा तूं स्वामी आहेस. तूं सर्वाचें निरीक्षण करणारा आहेस. अशा तुला आम्ही नमस्कार करीत आहों.

[२३४] (कारवः) स्तुति करणारे आम्ही (वाजस्य सातौ) अन्नाचें दान होण्याच्या वेळीं, हे इन्द्रा ! (त्वां इत् हि हवामहे) तुलाच बोलावीत आहों. (सत्पतिं) सज्जनांचें पालन करणाऱ्या तुला (नरः वृत्रेषु हवन्ते) सर्व मनुष्य वृत्राशीं होणाऱ्या युद्धामध्यें सहाय्यासाठीं बोलावतात. तसेंच (अर्वतः) घोडयांमुळे होणाऱ्या (काष्ठासु) युद्धांमध्येंहि तुलाच सहायासाठीं बोलावीत असतात. ॥ २ ॥

१ सत्पतिं त्वा नरः वृत्रेषु हवन्ते— सज्जनाचें उत्तम पालन करणाऱ्या तुला लोक युद्धांमध्यें सहाय्यासाठीं बोलावतात.

२ काष्ठासु त्वा हवन्ते— अन्य युद्धांमध्येंहि तुलाच सहायार्थ बोलावतात.

[२३५] (यः पुरू-वसुः मघवा) जो पुष्कळ धन आपल्या जवळ बाळगणारा इन्द्र (जरितृभ्यः सहस्रेण इव शिक्षति) स्तुति करणाऱ्या आमच्यासाठीं सहस्र प्रकारचें धन देत असतो. (यथा-विदे) जसें आपणांस माहित असेल त्या प्रमाणें हे याजक हो ! (वः) तुम्ही (सु-राधसं इन्द्रं) उत्तम धन देणाऱ्या इन्द्राची (अभि अर्च) पूजा करा. ॥ ३ ॥

१ पुरुवसुः मघवा सहस्रेण शिक्षति— पुष्कळ धनवान इन्द्र सहस्र प्रकारचें धन देतो.

[२३६] हे यजमान हो ! (दस्म) सुन्दर व (ऋती-षाहं) बाधक होणाऱ्या शत्रूंचा पराभव करणाऱ्या (वसोः अन्धसः मन्दानं) निवासक सोमरस रूप अन्न पिण्यानें आनंदित होणाऱ्या (वः) तुमच्या पूज्य इन्द्राला (स्वसरेषु) गोशालांमध्यें (धेनवः वत्सं न) गाई वासरांजवळ जातात त्याप्रमाणें (गीर्भिः अभिनवामहे) स्तुति करीत आम्ही प्रणाम करीत आहों. ॥ ४ ॥

१ ऋतीषाहं गीर्भिः अभि नवामहे— बाधक शत्रूंचा पराभव करणाऱ्या इन्द्राला आम्ही नमस्कार करतों.

२३७ तरोभिर्वो विदद्वसुमिन्द्र१सबाध ऊतये ।
बृहद्गायन्तः सुतसोमे अध्वरे हुवे भरं न कारिणम् ॥ ५ ॥ (ऋ. ८।६६।१)

२३८ तरणिरित्सिषासति वाजं पुरन्ध्या युजा ।
आ व इन्द्रं पुरुहूतं नमे गिरा नेमिं तष्टेव सुद्रुवम् ॥ ६ ॥ (ऋ. ७।३२।२०)

२३९ पिबा सुतस्य रसिनो मत्स्वा न इन्द्र गोमतः ।
आपिर्नो बोधि सधमाद्ये वृधे३ऽस्मा२अवन्तु ते धियः ॥ ७ ॥ (ऋ. ८।३।१)

२४० त्व१ह्येहि चेरवे विदा भगं वसुत्तये ।
उद्वावृषस्व मघवन् गविष्टय उदिन्द्राश्वमिष्टये ॥ ८ ॥ (ऋ. ८।६१।७)

---

[२३७] हे ऋत्विज हो ! (वः) तुम्ही (तरोभिः) वेगवान घोड्यांनीं युक्त (विदद् वसुं) धनवान (इन्द्रं) इन्द्राची (स-बाधः) शत्रूंपासून (ऊतये) आपलें संरक्षण व्हावें यासाठीं (बृहत् गायन्तः) बृहत्सामगान गाऊन आराधना करा. आम्हीहि (सुत-सोमे अध्वरे) सोमयागामध्यें (भरं कारिणं न) भरपूर पोषण करणाऱ्या (हुवे) इन्द्राला बोलावीत आहों. ॥ ५ ॥

१ विदद्वसुं इन्द्रं ऊतये बृहत् गायन्तः हुवे— धनवान इन्द्राला आमच्या संरक्षणासाठीं बृहत्साम गात सहायार्थ बोलावीत आहों.

[२३८] (तरणिः इत्) युद्धामध्यें तारण करणारा वीर (युजा पुरन्ध्या) उत्तम बुद्धिनें जसें (वाजं सिषासति) अन्न मिळवतो. (सुद्रुवं नेमिं) उत्तम लांकडाच्या बुन्ध्याला (त्वष्टा इव) कारागीर सुतार ज्याप्रमाणें नरम बनवितो त्याप्रमाणें (पुरु-हूतं) अनेकांकडून स्तविल्या जाणाऱ्या (इन्द्रं) इन्द्राला (गिरा वः आ नमे) वाणीनें आपल्या समोर नमस्कार करून अनुकूल बनवतों. ॥ ६ ॥

[२३९] हे इन्द्रा ! (रसिनः गोमतः) सोमरसामध्यें गोदुग्ध मिळवलेला असा हा (नः सुतस्य पिब) आम्ही काढलेला सोमरस पी व (मत्स्व) आनन्दित हो. (सधमाद्ये) एकत्र बसून ज्यामध्यें आनंदित होतात, अशा या यज्ञामध्यें (आपिः) तूं आमचा बन्धु होतोस. म्हणून (नः वृधे बोधि) आमच्या उन्नतिचा मार्ग दाखव. (ते धियः अवन्तु) तुझ्या बुद्धि आम्हां सर्वांचें संरक्षण करोत. ॥ ७ ॥

१ सधमादे आपिः नः वृधे बोधि— एकत्र बसून जेथें कर्म केलें जातें त्या यज्ञ कर्मामध्यें तूं आमचा मित्र हो व आमची उन्नति करण्याचा मार्ग जाण.

२ ते धियः अवन्तु— तुझ्या बुद्धि आमचें संरक्षण करोत.

[२४०] हे इन्द्रा ! (हि त्वं) निश्चयानें तूं (वसुत्तये एहि) धनदान करण्यासाठीं ये व येऊन (चेरवे) सदाचरण करणाऱ्या मला (भगं विदाः) धन दे. हे (मघवन्) धनवान इन्द्रा ! (गविष्टये उत् वावृषस्व) गाईंची इच्छा करणाऱ्या मला गाई दे. हे इन्द्रा ! (इष्टये) इच्छा करणाऱ्या मला (अश्वं उत्) घोडे दे. ॥ ८ ॥

१ त्वं वसुत्तये एहि— तूं धन देण्यासाठीं ये.

२ चेरवे भगं विदाः— सदाचारी माणसाला धन दे.

२४१ न हि वश्चरमं च न वसिष्ठः परिमꣳसते ।
अस्माकमद्य मरुतः सुते सचा विश्वे पिबन्तु कामिनः ॥ ९ ॥ (ऋ. ७।५९।३)

२४२ मा चिदन्यद्वि शꣳसत सखायो मा रिषण्यत ।
इन्द्रमित्स्तोता वृषणꣳसचा सुते मुहुरुक्था च शꣳसत ॥ १० ॥ (ऋ. ८।१।१)

इति पञ्चमी दशतिः ॥ ५ ॥ प्रथमः खण्डः ॥ १॥ [स्व० १२ । उ० ५ । धा० ७३ । (ञि) ॥]

इति तृतीय प्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ १ ॥

[६]

(१–१०) १ पुरुहन्मा आंगिरसः; २, ३ मेधातिथि–मेध्यातिथी काण्वौ; ४ विश्वामित्रो गाथिनः; ५ गोतमो (गौतमो वा) राहूगणः; ६ नृमेधपुरुमेधावांगिरसौ; ७, ८, ९ मेधातिथिर्मेध्यातिथिर्वा (ऋ० मेध्यातिथिः) काण्वः; १० देवातिथीः काण्वः ॥ इन्द्रः ॥ बृहती ॥

२४३ नकिष्टं कर्मणा नशद्यश्चकार सदावृधम् ।
इन्द्रं न यज्ञैर्विश्वगूर्तमृभ्वसमधृष्टं धृष्णुमोजसा ॥ १ ॥ (ऋ. ८।७०।३)

२४४ य ऋते चिदभिश्रिषः पुरा जत्रुभ्य आतृदः ।
सन्धाता सन्धिं मघवा पुरूवसुर्निष्कर्ता विह्रुतं पुनः ॥ २ ॥ (ऋ. ८।१।१२)

---

[२४१] हे (मरुतः) मरुतांनो ! (वसिष्ठः वः) वसिष्ठ तुमच्या पैकीं (चरमं चन) लहानाला (नहि परिशंसते) सोडून स्तुति करीत नाहीं, परंतु सर्वांची स्तुति करीत आहे. (अद्य) आज (अस्माकं सुते) आमच्या यज्ञांत (विश्वे मरुतः) सर्व मरुत् (सचा) एकत्र बसून सोमरस (पिबन्तु) पिवोत. ॥ ९ ॥

[२४२] हे (सखायः) मित्रांनों ! (अन्यत् मा चित् विशंसत) इन्द्राच्या स्तोत्राशिवाय दुसरें स्तोत्र म्हणूं नका. (मा रिषण्यत) व्यर्थ श्रम करूं नका. (सुते) सोमयागामध्यें (वृषणं इन्द्रं इत्) बलवान इन्द्राचीच (सचा स्तोत) एकत्र बसून स्तुति करा. (उक्था च) आणि स्तोत्रें (मुहुः शंसत) वारंवार म्हणा. ॥ १० ॥

१ सचा स्तोत— एकत्र बसून स्तुति करा.

॥ येथें तेरावा खंड समाप्त झाला ॥

[१४] चतुर्दशः खण्डः ।

[२४३] (यः) जो यजमान (सदा–वृधं) नेहमीं वृद्धिंगत होत राहणाऱ्या (विश्व–गूर्तिं) सर्वांकडून स्तविल्या जाणाऱ्या (ऋभ्वसं) मोठ्या (ओजसा अधृष्टं) बलाच्या कारणानें कोणाकडूनही दबला न जाणाऱ्या, (धृष्णुं) शत्रूंना धमकावणाऱ्या (इन्द्रं) इन्द्राला (यज्ञैः न चकार) यज्ञांनीं अनुकूल करतो, (तं) त्या यजमानाला (कर्मणा न किः नशत्) कर्मानें कोणीहि दाबून टाकूं शकत नाहीं. ॥ १ ॥

न— समान, अनुकूल, नाहीं.

[२४४] (यः) जो इन्द्र (अभि–श्रियः) जोडण्याच्या साधनां (ऋते चित्) शिवाय सुद्धां (जत्रुभ्यः आतृदः) बाळयांतील स्नायू मधून रक्त काढल्यावर (पुरा संधिं सन्धाता) पुनः सन्धि जोडून टाकतो, तो (मघवा पुरुवसुः) धनवान पुष्कळ द्रव्य जवळ बाळगणारा इन्द्र (विन्हुतं पुनः निष्कर्ता) कापलेल्या भागांना पुनः जोडत असतो. ॥ २ ॥

१ पुरा संधिं संधाता— पुनः सांधे जोडतो.

२ विन्हुतं पुनः निष्कर्ता— कापलेल्या भागांना जोडतो.

२४५ आ त्वा सहस्रमा शतं युक्ता रथे हिरण्यये ।
ब्रह्मयुजो हरय इन्द्र केशिनो वहन्तु सोमपीतये ॥ ३ ॥ (ऋ. ८।१।२४)

२४६ आ मन्द्रैरिन्द्र हरिभिर्याहि मयूररोमभिः ।
मा त्वा के चिन्नि येमुरिन्न पाशिनोऽति धन्वेव ताँइहि ॥ ४ ॥ (ऋ. ३।४५।१)

२४७ त्वमङ्ग प्र शंसिषो देवः शविष्ठ मर्त्यम् ।
न त्वदन्यो मघवन्नस्ति मर्डितेन्द्र ब्रवीमि ते वचः ॥ ५ ॥ (ऋ. १।८४।१९)

२४८ त्वमिन्द्र यशा अस्यृजीषी शवसस्पतिः ।
त्वं वृत्राणि हंस्यप्रतीन्येक इत्पुर्वनुत्तश्चर्षणीधृतिः ॥ ६ ॥ (ऋ. ८।९०।५)

२४९ इन्द्रमिद्देवतातय इन्द्रं प्रयत्यध्वरे ।
इन्द्रंसमीके वनिनो हवामह इन्द्रं धनस्य सातये ॥ ७ ॥ (ऋ. ८।३।५)

---

[२४५] हे इन्द्रा ! (ब्रह्म-युजः केशिनः) मंत्र बोलतांच जोडले जाणारे, सुन्दर अयाळ असलेले (हिरण्यये रथे) सुवर्णाच्या रथाला (युक्ताः) जोडलेले (आ सहस्रं शतं) सहस्रावधि व शेंकडो (हरयः) घोडे (त्वा) तुला (सोमपीतये) सोम पिण्यासाठीं (आवहन्तु) घेऊन येवोत. ॥ ३ ॥

शतं सहस्रं हरयः— शेंकडों हजारों घोडे, किरण.

[२४६] हे इन्द्रा ! (मन्द्रैः) आनंददायक (मयूर-रोमभिः) मोरासारख्या केंसांनीं युक्त (हरिभिः) घोड्यांनीं यात्री (धन्वा इव) मरुदेशाला ओलांडतो त्याप्रमाणें (तान् अति आयाहि) मधल्या प्रतिबंधांना दूर करून ये. (इत्) मध्यें (पाशिनः न) हातांत पाश धरणारे पारधी पक्ष्यांस पकडतात त्या प्रमाणें (त्वा मा नियेमुः) तुला मध्यें कोणीहि न प्रतिबंध करो. (एहि) तूं ये च. ॥ ४ ॥

[२४७] (अङ्ग शविष्ठ) हे प्रिय आणि बलवान् इन्द्रा ! (देवः) प्रकाशित असणारा तूं (मर्त्यं प्रशंसिषः) उपासक मनुष्याची प्रशंसा करतोस. हे (मघवन् इन्द्र) धनवान् इन्द्रा ! (त्वदन्यः) तुझ्याशिवाय दुसरा कोणीहि (मर्डिता नास्ति) सुख देणारा नाहीं. तुझ्यासाठींच (वचः ब्रवीमि) हें स्तुतिचें भाषण करीत आहें. ॥ ५ ॥

१ त्वद् अन्यः मर्डिता नास्ति— तुझ्याशिवाय दुसरा कोणीहि खरें सुख देणारा नाहीं.

[२४८] (इन्द्र) हे इन्द्रा ! (त्वं) तूं (शवसः पतिः) बलवान (ऋजीषी) सोमरस पिणारा व (यशाः) यशस्वी (असि) आहेस. तूं (अ-प्रतीनि पुरू वृत्राणि) अप्रतिम अशा पुष्कळ वृत्रांना, (अनुत्तः) कोणाच्या प्रेरणेशिवाय (चर्षणी-धृतिः) लोकांच्या रक्षणासाठीं (एकः इत्) एकटाच (हंसि) ठार करतोस. ॥ ६ ॥

१ अप्रतीनि पुरु वृत्राणि अनुत्तः, चर्षणी-धृतिः एक इत् हंसि— अप्रतिम अशा पुष्कळ वृत्रांना, दुसऱ्या कोणाच्या प्रेरणेशिवाय, केवळ सर्व जनांचें हित करण्यासाठीं एकटाच मारतोस.

[२४९] (देवतातये) देवतांसाठीं करावयाच्या यज्ञामध्यें (इन्द्रं इत् हवामहे) इन्द्रालाच आम्ही बोलावतों. (प्रयते अध्वरे इन्द्रं) यज्ञ चालू झाला म्हणजे इन्द्रालाच बोलावतों. (समीके वनिनः इन्द्रं) यज्ञ संपूर्ण होतो तेव्हां आम्ही उपासक इन्द्राला बोलावतों, तसेंच (धनस्य सातये इन्द्रं) धन मिळावें यासाठीं इन्द्राला बोलवतों. ॥ ७ ॥

२५० इमा उ त्वा पुरूवसो गिरो वर्धन्तु या मम ।
पावकवर्णाः शुचयो विपश्चितोऽभिस्तोमैरनूषत ॥ ८ ॥ (ऋ ८।३।३)

२४१ उदु त्ये मधुमत्तमा गिर स्तोमास ईरते ।
सत्राजितो धनसा अक्षितोतयो वाजयन्तो रथा इव ॥ ९ ॥ (ऋ. ८।३।१५)

२५२ यथा गौरो अपा कृतं तृष्यन्नेत्यवेरिणम् ।
आपित्वे नः प्रपित्वे तूयमा गहि कण्वेषु सु सचा पिब ॥ १० ॥ (ऋ ८।४।३)

इति षष्ठी दशतिः ॥ ६ ॥ द्वितीयः खण्डः ॥ २ ॥ [स्व० ११ । उ० ७ । धा० ७२ । (खा) ॥]

[७]

(१-१०) १ भर्गः प्रागाथः; २,८ रेभः काश्यपः; ३ जमदग्निर्भार्गवः; ४, ९ मेधातिथिः काण्वः; (ऋ० मेध्यातिथिः काण्वः); ५, ६ नृमेधपुरुमेधावांगिरसौ; ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः; १० भरद्वाजः (ऋ० शंयुः) बार्हस्पत्यः ॥ इन्द्रः; ३ मित्रावरुणादित्याः ॥ बृहती ॥

२५३ शग्ध्यू३षु शचीपत इन्द्र विश्वाभिरूतिभिः ।
भगं न हि त्वा यशसं वसुविदमनु शूर चरामसि ॥ १ ॥ (ऋ. ८।६१।५)

२५४ या इन्द्र भुज आभरः स्वर्वाँ असुरेभ्यः ।
स्तोतारमिन्मघवन्नस्य वर्धय ये च त्वे वृक्तबर्हिषः ॥ २ ॥ (ऋ. ८।९७।१)

[२५०] हे (पुरू-वसो) पुष्कळ धनवान इन्द्रा ! (मम इमाः याः गिरः) माझ्या ह्या ज्या स्तुति आहेत, त्या (त्वा वर्धन्तु) तुझें यश वाढवोत. (पावक-वर्णाः) अग्नि सारखे तेजस्वी (शुचयः विपश्चितः) शुद्ध विद्वान् तुझी (स्तोमैः अभ्यनूषत) स्तोत्रांनीं स्तुति करीत आहेत. ॥ ८ ॥

[२५१] (सत्रा-जितः) सदा शत्रूंना जिंकणाऱ्या (धन-सा) धन देणाऱ्या (अक्षित-ऊतयः) अक्षय संरक्षण करणाऱ्या (वाजयन्तः) बलवान् (रथा इव) रथां प्रमाणें (त्ये मधुमत्तमाः गिरः) त्या अति मधुर स्तुति व (स्तोमासः) स्तोत्रें (उत् ईरते) उच्चारलीं जात आहेत. ॥ ९ ॥

[२५२] (यथा गौरः) जसा गौर मृग (तृष्यन्) तहानेलेला होऊन (अपा कृतं इरिणं) पाण्यानें भरलेल्या तलावाकडे (अवैति) जातो. त्या प्रमाणें (आपित्वे प्रपित्वे) बंधु भावाला स्मरून हे (इन्द्र) इन्द्रा ! (नः तूयं आगहि) आमच्याकडे सत्वर ये व (कण्वेषु सचा सु पिब) कण्वांच्या यज्ञांत बसून उत्तम रीतिनें सोमरस पी. ॥ १० ॥

॥ येथें चौदावा खंड समाप्त झाला ॥

[१५] पञ्चदशः खण्डः ।

[२५३] हे (शचीपते शूर इन्द्र) शक्तिसंपन्न शूर इन्द्रा ! (विश्वाभिः ऊतिभिः) सर्व संरक्षणाच्या साधनांसह (शग्धि) इच्छित वर आम्हांस दे. (भगं न) भाग्यवानाप्रमाणें (यशसं) यशस्वी व (वसु-विदं) धन देणाऱ्या (त्वा) तुझी (अनुचरामसि) आराधना आम्ही करीत आहों. ॥ १ ॥

[२५४] हे इन्द्रा ! (स्वर्वान्) आत्म शक्तिनें युक्त असा तूं (याः भुजः) जे भोग (असुरेभ्यः आभरः) असुरांकडून आणले आहेत. हे (मघवन्) धनवान इन्द्रा ! (अस्य) या धनानें (स्तोतारं वर्धय) तुझी स्तुति करणारांचें संवर्धन कर. (च) आणि (ये त्वे वृक्त-बर्हिषः) जे तुझ्यासाठीं यज्ञामध्यें आसन पसरून ठेवतात त्यांचेंहि संवर्धन कर. ॥ २ ॥

२५५ प्र मित्राय प्रार्यम्णे सचथ्यमृतावसो ।
वरूथ्ये३वरुणे छन्द्यं वचः स्तोत्रंराजसु गायत ॥ ३ ॥ (ऋ. ८।१०१।५)

२५६ अभि त्वा पूर्वपीतय इन्द्र स्तोमेभिरायवः ।
समीचीनास ऋभवः समस्वरन्रुद्रा गृणन्त पूर्व्यम् ॥ ४ ॥ (ऋ. ८।३।७)

२५७ प्र व इन्द्राय बृहते मरुतो ब्रह्मार्चत ।
वृत्रंहनति वृत्रहा शतक्रतुर्वज्रेण शतपर्वणा ॥ ५ ॥ (ऋ. ८।८९।३)

२५८ बृहदिन्द्राय गायत मरुतो वृत्रहन्तमम् ।
येन ज्योतिरजनयन्नृतावृधो देवं देवाय जागृवि ॥ ६ ॥ (ऋ. ८।८९।१)

२५९ इन्द्र क्रतुं न आ भर पिता पुत्रेभ्यो यथा ।
शिक्षा णो अस्मिन्पुरुहूत यामनि जीवा ज्योतिरशीमहि ॥ ७ ॥ (ऋ. ७।३२।२६)

---

१ स्ववान् याः भुजः असुरेभ्यः आभरः, अस्य स्तोतारं वर्धय— स्वशक्तिनें सुसंपन्न असणाऱ्या तूं जे भोग असुरांकडून आणलेस, त्यांच्या योगानें उपासकांना वाढव.

[२५५] हे (ऋता-वसो) यज्ञासाठीं आपणाजवळ धन बाळगणाऱ्या ! (मित्राय) मित्रासाठीं (अर्यम्णे) अर्यमासाठीं, आणि (वरूथ्ये वरुणे) यज्ञशालेमध्यें बसलेल्या वरुणासाठीं (सचथ्यं छन्द्यं वचः) म्हणण्यास योग्य असें छन्दामध्यें असलेलें स्तोत्र (राजसु प्रगायत) ते विराजमान झाल्यानंतर गायन करा. ॥ ३ ॥

[२५६] हे (इन्द्र) इन्द्रा ! (आयवः) याज्ञिकजन (पूर्व-पीतये) प्रथम सोम पिण्यासाठीं (स्तोमेभिः त्वां अभि) स्तोत्रांनीं तुझी स्तुति करतात. (समीचीनासः ऋभवः) एकत्रित झालेल्या ऋभूंनीं (समस्वरन्) तुझी स्तुति केली. (रुद्राः) रुद्र पुत्र मरुतांनींहि (पूर्व्यं गृणन्त) पुरातन पुरुष अशा तुझी स्तुति केली. ॥ ४ ॥

[२५७] हे (मरुतः) मरुत् हो ! (बृहते) महान् इन्द्रासाठीं (वः) तुम्ही (ब्रह्म अर्चत) स्तोत्र म्हणा. त्यानंतर (वृत्र-हा) वृत्राचा नाश करणारा (शत-क्रतुः) शेंकडों कर्में करणारा इन्द्र (शत-पर्वणा वज्रेण) सेंकडों धारा असलेल्या वज्रानें (वृत्रं हनाति) वृत्राला ठार मारतो. ॥ ५ ॥

१ मरुतः— मरुत् गण, स्तोत्र पाठक, याजक.

२ वृत्रहा शतक्रतुः शतपर्वणा वज्रेण वृत्रं हनति— वृत्राला मारणारा शेंकडों कार्यें करणारा इन्द्र शेंकडों धारा असलेल्या वज्रानें वृत्राला मारतो.

[२५८] हे (मरुतः) याजकांनों ! (इन्द्राय) इन्द्रासाठीं (वृत्र-हन्तमं बृहत् गायत) वृत्रनाशक बृहत् नामक सामाचें गान करा. (ऋता-वृधः) यज्ञाचें संवर्धन करणारे लोक (देवाय) इन्द्रदेवांसाठीं (देवं जागृवि ज्योतिः) दिव्य जागृति करणारी सूर्याची-ज्योति (येन अजनयत्) त्याच्या योगानें उत्पन्न करते झाले. ॥ ६ ॥

[२५९] हे (इन्द्र) इन्द्रा ! (नः क्रतुं आभर) आम्हांला यज्ञ कर्म करण्याचें ज्ञान दे. (यथा पिता पुत्रेभ्यः) त्याप्रमाणें पिता पुत्रांला देतो, तसें (नः शिक्ष) आम्हांला शिक्षण दे. हे (पुरु-हूत) पुष्कळांनीं प्रार्थना केलेल्या इन्द्रा ! (यामनि) यज्ञामध्यें (जीवाः) आम्हां लोकांनीं (ज्योतिः अशीमहि) सूर्याची ज्योती प्रतिदिन पहावी. ॥ ७ ॥

१ नः क्रतुं आभर— आम्हांला सुबुद्धि दे, सत्कर्म करण्याची बुद्धि दे.
२ यथा पुत्रेभ्यः पिता, नः शिक्ष— जसा बाप मुलांना शिक्षण देतो त्याप्रमाणें तूं आम्हाला शिक्षण दे.
३ यामनि जीवाः ज्योतिः अशीमहि— यज्ञामध्यें जीवित राहून आम्ही तेज मिळवावें.

२६० मा न इन्द्र परा वृणग्भवा नः सधमाद्ये ।
त्वं न ऊती त्वमिन्न आप्यं मा न इन्द्र परावृणक् ॥ ८ ॥ (ऋ. ८।९७।७)

२६१ वयं घ त्वा सुतावन्त आपो न वृक्तबर्हिषः ।
पवित्रस्य प्रस्रवणेषु वृत्रहन्परि स्तोतार आसते ॥ ९ ॥ (ऋ. ८।३३।१)

२६२ यदिन्द्र नाहुषीष्वा ओजो नृम्णं च कृष्टिषु ।
यद्वा पञ्चक्षितीनां द्युम्नमा भर सत्रा विश्वानि पौंस्या ॥ १० ॥ (ऋ. ६।४६।७)

इति सप्तमी दशतिः ॥ ७ ॥ तृतीयः खण्डः ॥ ३ ॥ [स्व० १० । उ० १ । धा० ६२ । (पा) ॥]

[८]

(१-१०) १ मेधातिथिः (ऋ० मेध्यातिथिः) काण्वः; २ रेभः काश्यपः; ३ वत्सः (ऋ० वशोऽश्व्यः); ४ भरद्वाजः (शंयुः) बार्हस्पत्यः; ५ नृमेध आंगिरसः; ६ पुरुहन्मा आंगिरसः; ७ नृमेध-पुरुमेधावांगिरसौ; ८ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ९ मेधातिथि-मेध्यातिथी काण्वौ; १० कलिः प्रागाथः ॥ इन्द्रः ॥ बृहती ॥

२६३ सत्यमित्था वृषेदसि वृषजूतिर्नोऽविता ।
वृषा ह्युग्र शृण्विषे परावति वृषो अर्वावति श्रुतः ॥ १ ॥ (ऋ. ८।३३।१०)

---

[२६०] हे इन्द्रा ! (नः मा परावृणक्) आम्हांला दूर करूं नकोस. (नः सधमाद्ये भव) आमच्या यज्ञामध्यें ये. हे इन्द्रा ! (त्वं नः ऊती) तूं आमचा संरक्षक आहेस. (त्वं इत् नः आप्यं) तूंच आमचा बंधु आहेस. हे इन्द्रा ! (नः मा परावृणक्) आम्हांला दूर करूं नकोस. ॥ ८ ॥

१ हे इन्द्र ! नः मा परा वृणक्— हे इन्द्रा ! तूं आम्हांस दूर करूं नकोस.

२ नः सधमाद्ये भव— आमच्या यज्ञांत ये व सर्वांबरोबर बैस.

३ त्वं नः ऊती— तूं आमचा संरक्षक आहेस.

४ त्वं नः आप्यं— तूं आमचा बंधु आहेस.

[२६१] हे (वृत्रहन्) वृत्राला मारणाऱ्या इन्द्रा ! (त्वा) तुला (वयं घ सुतावन्तः) आम्ही सोमयज्ञामध्यें सोमरस काढणारे (आपः न) जलप्रवाहांप्रमाणें प्राप्त होत आहों. (पवित्रस्य प्रस्रवणेषु) पवित्र यज्ञांमध्यें (वृक्तबर्हिषः स्तोतारः) आसन पसरून स्तुति करणारे (परि आसते) एकत्र बसतात, तसे आम्ही बसलों आहों. ॥ ९ ॥

[२६२] हे इन्द्रा ! (नाहुषीषु कृष्टिषु) मानवी प्रजांमध्यें (ओजः नृम्णं च) जें बल व पौरुष आहे (यद् वा) अथवा जें (पंचक्षितीनां द्युम्नं) पंच जनांकडे धन आहे, तसलें धन (आ भर) आम्हांला भरपूर दे, तसेंच (सत्रा) एकीनें बनणारीं (विश्वानि पौंस्या) सर्व बलें आम्हांस दे. ॥ १० ॥

१ सत्रा विश्वानि पौंस्या आभर— एकीनें होणारीं सर्व बलें आम्हांस मिळोत.

२ पंचक्षितीनां द्युम्नं आभर— पंचजनांच्या ऐक्यानें उत्पन्न होणारें तेज आम्हांस मिळो.

॥ येथें पंधरावा खंड समाप्त झाला ॥

[१६] षोडशः खण्डः ।

[२६३] हे (उग्र) वीर इन्द्रा ! तूं (इत्था) या प्रकारें (सत्यं वृषा इत् असि) खरोखरच बलवान् आहेस. (वृष-जूतिः नः अविता) सोमयज्ञ करणाऱ्यांनीं रक्षणार्थ बोलावला असल्यामुळें आमचा तूं संरक्षक आहेस. तूं (वृषा हि शृण्विषे) बलवान् आहेस असें ऐकत आहों. (परावति वृषा) दूरहि तूंच बलवान आहेस. (अर्वावति श्रुतः) जवळही तूंच बलवान आहेस. ॥ १ ॥

२६४ यच्छक्रासि परावति यदर्वावति वृत्रहन् ।
अतस्त्वा गीर्भिर्द्युगदिन्द्र केशिभिः सुतावा२आ विवासति ॥ २ ॥ (ऋ. ८।९७।४)

२६५ अभि वो वीरमन्धसो मदेषु गाय गिरा महा विचेतसम् ।
इन्द्रं नाम श्रुत्यं२शाकिनं वचो यथा ॥ ३ ॥ (ऋ. ८।४६।१४)

२६६ इन्द्र त्रिधातु शरणं त्रिवरूथ२स्वस्तये ।
छर्दिर्यच्छ मघवद्भ्यश्च मह्यं च यावया दिद्युमेभ्यः ॥ ४ ॥ (ऋ. ६।४६।९)

२६७ श्रायन्त इव सूर्यं विश्वेदिन्द्रस्य भक्षत ।
वसूनि जातो जनिमान्योजसा प्रति भागं न दीधिमः ॥ ५ ॥ (ऋ. ८।९९।३)

---

१ वृषा— बलवान, कामनांची पूर्ति करणारा.
२ वृषा शृण्विषे— तूं बलवान् आहेस अशी प्रसिद्धि आहे.
३ परावति अर्वावति वृषा श्रुतः— तूं दूर व जवळ शक्तिमान आहेस.

[२६४] (शक्र) हे सामर्थ्यवान् इन्द्रा ! (यत् परावति असि) जेव्हां दूर देशीं तूं असतोस, हे (वृत्र-हन्) वृत्राला मारणाऱ्या इन्द्रा ! (यत् अर्वावति) जेव्हां तूं जवळच्या स्थानांत असतोस, हे इन्द्रा ! (अतः) या लोकांतून (केशिभिः गीर्भिः) केंसाळ घोडयांप्रमाणें असलेल्या स्तुतिनीं (सुतावान्) सोमयाग करणारा (त्वा आविवासति) तुला बोलावतो. ॥ २ ॥

१ शक्र ! परावति असि, अर्वावति असि— हे इन्द्रा ! जसा तूं दूर आहेस तसा तूं जवळही शक्तिमान् आहेस.

[२६५] हे उद्गाते हो ! (वः) तुम्ही (वः) तुमच्या हितासाठीं (अन्धसः मदेषु) सोमरसाच्या आनंदामध्यें (वीरं नाम) स्वतः वीर असून शत्रुला नम्र करणाऱ्या (विचेतसं श्रुत्यं) ज्ञानी व सुप्रसिद्ध (शाकिनं इन्द्रं) शक्तिशाली इन्द्राचें (महा गिरा वचः यथा) विशेष स्तुतिच्या स्तोत्रांनीं गायन करावें त्याप्रमाणें (गाय) गायन करा. ॥ ३ ॥

[२६६] हे इन्द्रा ! (त्रि-धातु त्रिवरूथं) तीन मजले असलेलें तीन ही ऋतूंमध्यें सुख देणारें (स्वस्तये छर्दिः शरणं) सुखानें राहण्यासारखें उत्तम घर (मघवद्भ्यः) धनवान यजमानांला (मह्यं च) व मलाहि दे. (एभ्यः दिद्युं यावय) यांपासून तेजस्वी शस्त्र दूर कर. ॥ ४ ॥

१ त्रि-धातु त्रिवरूथं छर्दिः शरणं स्वस्तये— तीन मजले असलेलें व तीन ऋतूंमध्यें सुखकारी घर रहावयास मिळो.

[२६७] (सूर्यं श्रायन्तः इव) ज्याप्रमाणें सूर्याचा आश्रय किरणें करतात, त्याप्रमाणें (विश्वं इत्) सर्व जगत् (इन्द्रस्य भक्षत) इन्द्राचाच आश्रय करतें; कारण तो इन्द्र (जाते जनिमानि) उत्पन्न झालेल्या अथवा उत्पन्न होणाऱ्यांनां (ओजसा करोति) बलानें भाग देत असतो. आपल्या (भागं न) पित्याच्या धनामध्यें भाग मिळावा, त्याप्रमाणें (प्रति दीधिमः) आम्ही आपणास भाग मिळावा असें इच्छीत आहोंत. ॥ ५ ॥

१ विश्वं इन्द्रस्य भक्षत— सर्व जगत् इन्द्राच्या आश्रयानें राहतें.

२ जाते जनिमानि ओजसा करोति— झालेल्या व होणाऱ्यांना शक्तिनें तो बनवतो.

*

२६८ न सीमदेव आप तदिषं दीर्घायो मर्त्यः ।
एतग्वा चिद्य एतशो युयोजत इन्द्रो हरी युयोजते ॥ ६ ॥ (ऋ. ८।७०।७)

२६९ आ नो विश्वासु हव्यमिन्द्रं समत्सु भूषत ।
उप ब्रह्माणि सवनानि वृत्रहन्परमज्या ऋचीषम ॥ ७ ॥ (ऋ. ८।९०।१)

२७० तवेदिन्द्रावमं वसु त्वं पुष्यसि मध्यमम् ।
सत्रा विश्वस्य परमस्य राजसि न किष्ट्वा गोषु वृण्वते ॥ ८ ॥ (ऋ. ७।३२।१६)

२७१ क्वेयथ क्वेदसि पुरुत्रा चिद्धि ते मनः ।
अलर्षि युध्म खजकृत्पुरंदर प्र गायत्रा अगासिषुः ॥ ९ ॥ (ऋ. ८।१।७)

---

[२६८] हे (दीर्घायो) दीर्घ आयु असणाऱ्या इन्द्रा ! (अ-देवः मर्त्यः) ईश्वराची उपासना न करणारा मनुष्य (सीं तत्) तें प्रसिद्ध अन्न (न आप) प्राप्त करूं शकत नाहीं. (यः) जो (एतग्वा चित्) तेथें जाण्याची इच्छा करून (यः एतशः युयोजते) जो घोडे जोडतो, तसा (इन्द्रः हरी युयोजते) इन्द्र ही आपले घोडे यज्ञांच्या ठिकाणीं जाण्यासाठीं जोडतो. ॥ ६ ॥

१ अदेवः मर्त्यः सीं न आप— ईश्वराची उपासना न करणारा तें धन प्राप्त करूं शकत नाहीं.

[२६९] (विश्वासु समत्सु) सर्व युद्धांमध्यें (हव्यं इन्द्रं) सहाय्यासाठीं बोलावण्यास योग्य अशा इन्द्राला (नः ब्रह्माणि उप भूषत) आमचीं स्तोत्रें सुशोभित करतात, इन्द्राची स्तुति करतात. हे (वृत्र-हन्) वृत्राला मारणाऱ्या इन्द्रा ! (परम-ज्याः) ज्याची धनुष्याची दोरी उत्तम आहे अशा (ऋची-षम) मंत्रांनीं स्तुति करण्यास योग्य इन्द्रा ! (सवनानि ब्रह्माणि उपभूषत) आमच्या तीन ही सवनांला व स्तोत्रांना अलंकृत कर. ॥ ७ ॥

[२७०] हे इन्द्रा ! (अवमं वसु तव इत्) कनिष्ठ धन तुझेंच आहे. (त्वं मध्यमं पुष्यसि) तूंच मध्यम धनाचें पोषण करतोस. (परमस्य विश्वस्य सत्रा राजसि) तूं सर्व श्रेष्ठ धनांचा एकटाच राजा आहेस. (त्वा) तुला (गोषु नकिः वृण्वते) गाई आदि धन देत असतां कोणीहि प्रतिबंध करूं शकत नाहीं. ॥ ८ ॥

१ हे इन्द्र ! अवमं वसु तव इत्— कनिष्ठ धन तुझें आहे.
२ त्वं मध्यमं पुष्यसि— तूं मध्यम धन वाढवतोस.
३ परमस्य विश्वस्य सत्रा राजसि— तूं श्रेष्ठ धनांचा एकटाच स्वामी आहेस.

[२७१] हे इन्द्रा ! (क इयथ) तूं कोठें गेला होतास ? (क इत् असि) आतां कोठें आहेस ? (पुरु-त्रा चित् हि ते मनः) पुष्कळ ठिकाणीं तुझें मन जात आहे. हे (युध्म) युद्धामध्यें कुशल, (खज-कृत्) युद्ध करणाऱ्या (पुरं-दर) शत्रुच्या नगरींचा नाश करणाऱ्या इन्द्रा (अलर्षि) ये. (गायत्राः प्रागासिषुः) आमचे गायनकुशल लोक स्तोत्रांचें गायन करणार आहेत. ॥ ९ ॥

१ हे युध्म, खजकृत्, पुरंदर, अलर्षि— हे युद्ध कुशल, युद्ध करणाऱ्या, शत्रुचीं नगरें तोडणाऱ्या, ये.

२७२ वयमेनमिदा ह्योऽपीपेमेह वज्रिणम् ।
तस्मा उ अद्य सवने सुतं भरा नूनं भूषत श्रुते ॥ १० ॥ (ऋ. ८।६६।७)

इति अष्टमी दशतिः ॥ ८ ॥ चतुर्थः खण्डः ॥ ४॥ [स्व० १४ । उ० १ । धा० ७४ । (ती) ॥]

[९]

(१–१०) १,६ पुरुहन्मा आंगिरसः; २ भर्गः प्रागाथः; ३ इरिम्बिठिः काण्वः; ४ जमदग्निर्भार्गवः; ५, ७ देवातिथिः काण्वः; ८ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ९ भरद्वाजो बार्हस्पत्यः; १० मेध्यः काण्वः ॥ इन्द्रः (ऋ० ३ वास्तोष्पतिर्वा; ४ सूर्यः; ९ इन्द्राग्नी) ॥ बृहती ॥

२७३ यो राजा चर्षणीनां याता रथेभिरध्रिगुः ।
विश्वासां तरुता पृतनानां ज्येष्ठं यो वृत्रहा गृणे ॥ १ ॥ (ऋ. ८।७०।१)

२७४ यत इन्द्र भयामहे ततो नो अभयं कृधि ।
मघवञ्छग्धि तव तन्न ऊतये वि द्विषो वि मृधो जहि ॥ २ ॥ (ऋ. ८।६१।१३)

२७५ वास्तोष्पते ध्रुवा स्थूणांसत्रं सोम्यानाम् ।
द्रप्सः पुरां भेत्ता शश्वतीनामिन्द्रो मुनीनां सखा ॥ ३ ॥ (ऋ. ८।१७।१४)

---

[२७२] (वयं) आम्ही यजमानांनीं (एनं वज्रिणं) ह्या वज्रधारी इन्द्राला (इदा) ह्यावेळीं (ह्यः) कालच (अपीपेम) सोमरस देऊन तृप्त केलें होतें. (तस्मा उ) यासाठींच (अद्य सवने) आजच्या सवनामध्यें (सुतं भर) सोमरस भरून त्याला द्या. (नूनं श्रुते आभूषत) खरोखर ह्या वेळीं स्तोत्र एकल्यानंतर त्याला सुभूषित करा. ॥ १० ॥

॥ येथें सोळावा खंड समाप्त झाला ॥

[१७] सप्तदशः खण्डः ।

[२७३] (यः चर्षणीनां राजा) जो इन्द्र मानवांचा राजा आहे, (रथेभिः अध्रि-गुः याता) रथांतून शीघ्रतेनें जो जात असतो, (विश्वासां पृतनानां तरुता) सर्व शत्रुसेनांचा जो नाश करतो, (यः वृत्र-हा) जो वृत्राला मारणारा आहे, त्या (ज्येष्ठं गृणे) श्रेष्ठ इन्द्राची मी स्तुति करतों. ॥ १ ॥

[२७४] हे इन्द्र ! (यतः भयामहे) जेथून आम्हांस भय होत असेल, (ततः नः अभयं कृधि) तेथून आम्हांस निर्भय कर. हे (मघवन्) धनवान इन्द्रा ! (शग्धि) तूं समर्थ आहेस. (तत्) म्हणून (तव) तुझ्या सामर्थ्यानें (नः ऊतये) आमच्या संरक्षणासाठीं (द्विषः विजहि) द्वेष्टयांचा पराभव कर व (मृधः विजहि) हिंसकांचा नाश कर. ॥ २ ॥

१ यतः भयामहे ततः नः अभयं कृधि — जेथून आम्हांस भय होत असेल तेथून आम्हांस निर्भय कर.

२ नः ऊतये द्विषः विजहि, मृधः विजहि–– आमच्या संरक्षणासाठीं शत्रूंचा पराभव कर व द्वेष्टयांचा नाश कर.

३ शग्धि–– तूं सामर्थ्यवान् आहेस.

[२७५] हे (वास्तोष्पते) गृहस्वामी ! (स्थूणा ध्रुवा) घराचा खांब टिकाऊ असो. (सोम्यानां अंसत्रं) सोमयाग करणारांमध्यें खांद्यांचें बल उत्तम असो. (द्रप्सः) सोम पिणारा (शश्वतीनां पुरां भेत्ता) असुरांच्या नगरींचा नाश करणारा (इन्द्रः) इन्द्र (मुनीनां सखा) ऋषींचा मित्र आहे. ॥ ३ ॥

१ शश्वतीनां पुरां भेत्ता मुनीनां सखा इन्द्रः— असुरांच्या शाश्वत नगरींना तोडणारा इन्द्र मुनींचा मित्र आहे.

२७६ बण्महाँ असि सूर्य बडादित्य महाँ असि ।
महस्ते सतो महिमा पनिष्टम मह्ना देव महाँ असि ॥ ४ ॥ (ऋ. ८।१०१।११)

२७७ अश्वी रथी सुरूप इद्गोमाँ यदिन्द्र ते सखा ।
श्वात्रभाजा वयसा सचते सदा चन्द्रैर्याति सभामुप ॥ ५ ॥ (ऋ. ८।४।९)

२७८ यद्द्याव इन्द्र ते शतँ शतं भूमीरुत स्युः ।
न त्वा वज्रिन्त्सहस्रँ सूर्या अनु न जातमष्ट रोदसी ॥ ६ ॥ (ऋ. ८।७०।५)

२७९ यदिन्द्र प्रागपागुदग्न्यग्वा हूयसे नृभिः ।
सिमा पुरू नृषूतो अस्यानवेऽसि प्रशर्ध तुर्वशे ॥ ७ ॥ (ऋ ८।४।१)

२८० कस्तमिन्द्र त्वा वसवा मर्त्यो दधर्षति ।
श्रद्धा हि ते मघवन्पार्ये दिवि वाजी वाजँ सिषासति ॥ ८ ॥ (ऋ. ७।३२।१४)

---

[२७६] हे (सूर्य) प्रेरक इन्द्रा ! (महान् असि) तूं मोठा आहेस. (बट्) हें खरें आहे. हे (आदित्य) अदितिच्या पुत्रा ! तूं (महान् असि) मोठा आहेस हें (बट्) खरें आहे. (महः ते सतः महिमा) मोठा असणाऱ्या तुझा महिमा (पनिष्टम) वाखाणला जात आहे. हे (देव) देवा ! तूं (मह्ना महान् असि) आपल्या महिम्यानें मोठा आहेस. ॥ ४ ॥

[२७७] हे इन्द्रा ! (यत् ते सखा) जेव्हां तुझा मित्र एखादा मनुष्य होतो तेव्हां (इत्) तो (अश्वी) घोड्यांनीं युक्त, (रथी) रथ बाळगणारा (सुरूपः) उत्तम रूपवान् (गोमान्) पुष्कळ गाई बाळगणारा (श्वात्र-भाजा) धन बाळगणारा (वयसा सदा सचते) अन्नानें तो सदोदित युक्त होतो. तो सदा (चन्द्रैः सभां उप याति) उत्तम भूषणांनीं युक्त होऊन सभेमध्यें जातो. ॥ ५ ॥

[२७८] हे इन्द्रा ! (यत् द्यावः शतं स्युः) जरी द्युलोक शेंकडो असले तरी ते (त्वा न अनुअष्ट) तुला घेरूं शकत नाहींत. (उत भूमी शतं स्युः) जरी भूमी शेंकडों झाल्या तरी त्या तुला आधार देऊं शकत नाहींत. हे (वज्रिन्) वज्रधारी इन्द्रा ! (सहस्रं सूर्याः) हजारों सूर्य झाले तरी ते (त्वा न) तुला प्रकाशित करूं शकत नाहींत. (अनुजातं न अष्ट) तुझ्या मागून उत्पन्न झालेले हे सर्व तुला व्यापूं शकत नाहींत. ही (रोदसी) द्यावा पृथिवी तुला व्यापूं शकत नाहीं. ॥ ६ ॥

[२७९] हे इन्द्र ! (यत् प्राग्) जर पूर्व दिशेमध्यें (अपाक्) वा पश्चिम दिशेमध्यें (उदक् न्यक्) उत्तर दिशेमध्यें अथवा दक्षिण दिशेमध्यें (नृभिः हूयसे) मनुष्यांकडून तूं सहायासाठीं बोलावला जात असलास, तर हे (सिं) इन्द्रा ! तूं (आनवे पुरु नृषूतः असि) अनुसाठीं पुष्कळ प्रकारांनीं तुझी प्रार्थना होत आहे, हे (प्रशर्ध) शत्रुनाशक इन्द्रा ! (तुर्वशे) तुर्वशासाठींहि तसेंच तुला बोलावलें जात आहे. ॥ ७ ॥

[२८०] (वसो इन्द्र) हे निवासक इन्द्रा ! (तं त्वा कः मर्त्यः आदधर्षति) त्या तुला कोण मनुष्य बरें या जगामध्यें भय दाखवीत आहे ? हे (मघवन्) धनवान् इन्द्रा ! (ते श्रद्धा) तुझ्यावर श्रद्धा ठेवणारा (वाजी) बलवान् होत असतो, व तो (पार्ये दिवि) पार होण्याच्या दिवशीं सुद्धां (वाजं सिषासति) अन्नाचें दान करूं इच्छितो. ॥ ८ ॥

१ ते श्रद्धा वाजी— तुझ्यावर श्रद्धा ठेवणारा बलवान् होतो.

२८१ इन्द्राग्नी अपादियं पूर्वागात्पद्वतीभ्यः ।
हित्वा शिरो जिह्वया रारपच्चरत्त्रिंशत्पदा न्यक्रमीत् ॥ ९ ॥ (ऋ. ६।५९।६)

२८२ इन्द्र नेदीय एदिहि मितमेधाभिरूतिभिः ।
आ शंतम शंतमाभिरभिष्टिभिरा स्वापे स्वापिभिः ॥ १० ॥ (ऋ. ८।५३।५)

इति नवमी दशतिः ॥ ९ ॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥ [स्व० १६ । उ० ५ । धा ७२ । (ञा) ॥]

[१०]

(१–१०) १ नृमेध आंगिरसः; २,३ वसिष्ठो मैत्रावरुणिः, ४ भरद्वाजः (ऋ० शंयुः) बार्हस्पत्यः; ५ परुच्छेपो दैवोदासिः; ६ वामदेवो गौतमः; ७ मेध्यातिथिः काण्वः; ८ भर्गः प्रागाथः; ९, १० मेधातिथि-मेध्यातिथी काण्वौ ॥
इन्द्रः (५ ऋ० आश्विनौ) ॥ बृहती ॥

२८३ इत ऊती वो अजरं प्रहेतारमप्रहितम् ।
आशुं जेतारं हेतारं रथीतममतूर्तं तुग्रियावृधम् ॥ १ ॥ (ऋ. ८।९९।७)

२८४ मो षु त्वा वाघतश्च नारे अस्मन्नि रीरमन् ।
आरात्ताद्वा सधमादं न आ गहीह वा सन्नुप श्रुधि ॥ २ ॥ (ऋ. ७।३२।१)

---

[२८१] हे इन्द्र व अग्नि ! (अ-पाद् इयं) पाय नसलेली ही उषा (पद्वतीभ्यः) पाय असलेल्या निजलेल्या प्रजांच्या (पूर्वा अगात्) पूर्वी आली आहे. (शिरः हित्वा) डोक्याचा त्याग करून (जिह्वया रारपत्) जिव्हेला प्रेरणा करीत ही (चरत्) पुढें जात (त्रिंशत् पदानि अक्रमीत्) तीस पाऊलें– तीस मुहूर्त एक दिवसांत चालते. ॥ ९ ॥

[२८२] हे इन्द्रा ! (नेदीयः) जवळच आमची यज्ञशाला आहे, यासाठीं (आ इत् इहि) ये. (मित-मेधाभिः ऊतिभिः) बुद्धिमान संरक्षण इच्छिणाऱ्यांबरोबर ये. हे (शन्तम) अत्यन्त शान्त स्वभावाच्या इन्द्रा ! (शन्तमाभिः अभिष्टिभिः आ) अत्यंत सुख देणाऱ्या आकांक्षांसह ये. हे (सु-आपे) उत्तम बन्धो ! (स्वापिभिः आ) उत्तम बंधूंबरोबर ये ॥ १० ॥

॥ येथें सतरावा खंड समाप्त झाला ॥

[१८] अष्टादशः खण्डः ।

[२८३] (वः) तुम्ही (अ-जरं) जरारहित (प्र-हेतारं) शत्रुवर प्रहार करणाऱ्या, (अ-प्रहितं) कोणीहि ज्याला प्रेरणा देऊं शकत नाहीं, (आशुं जेतारं) शीघ्र विजय मिळवणाऱ्या (हेतारं) यज्ञामध्यें जाणाऱ्या (रथीतमं) उत्तम रथ ज्याचा आहे अशा (अ-तूर्तं) ज्याला कोणीहि मारूं शकत नाहीं अशा (तुग्रिया-वृधं) जलाची वृद्धि करणाऱ्या इन्द्राला (ऊतये) संरक्षणासाठीं (इतः) इकडे आणा. ॥ १ ॥

[२८४] हे इन्द्रा ! (त्वा) तुला (वाघतः चन) यजमान (अस्मत् आरे) आमच्यापासून दूर (मा उ निरमन्) नेऊन रममाण न करोत. यासाठीं तूं (आरात्तात् वा) जवळ राहून (नः सधमादं) आमच्या यज्ञामध्यें (सु आगहि) उत्तम रीतिनें ये. (वा इह सन्) तसेंच येथें राहून (उपश्रुधि) आमची स्तुति जवळून ऐक. ॥ २ ॥

२८५ सुनोत सोमपाव्ने सोममिन्द्राय वज्रिणे ।
पचता पक्तीरवसे कृणुध्वमित्पृणन्नित्पृणते मयः ॥ ३ ॥ (ऋ. ७।३२।८)

२८६ यः सत्राहा विचर्षणिरिन्द्रं तꣳ हूमहे वयम् ।
सहस्रमन्यो तुविनृम्ण सत्पते भवा समत्सु नो वृधे ॥ ४ ॥ (ऋ ६।४६।३)

२८७ शचीभिर्नः शचीवसू दिवा नक्तं दिशस्यतम् ।
मा वाꣳ रातिरुपदसत्कदाचनास्मद्रातिः कदाचन ॥ ५ ॥ (ऋ.१।१३९।५)

२८८ यदा कदा च मीढुषे स्तोता जरेत मर्त्यः ।
आदिद्वन्देत वरुणं विपा गिरा धर्त्तारं विव्रतानाम् ॥ ६ ॥

२८९ पाहि गा अन्धसो मद इन्द्राय मेध्यातिथे ।
यः संमिश्लो हर्योर्यो हिरण्यय इन्द्रो वज्री हिरण्ययः ॥ ७ ॥ (ऋ. ८।३३।४)

---

[२८५] हे याजक हो ! (वज्रिणे सोमपाव्ने इन्द्राय) वज्रधारी, सोमरस पिणाऱ्या इन्द्रासाठीं (सोमं सुनोत) सोमरस काढा. (अवसे) आपलें रक्षण व्हावें किंवा त्याची प्रीति व्हावी या साठीं (पक्तीः पचत) पुरोडाश शिजवा. (कृणुध्वं इत्) इन्द्राला प्रसन्न करण्यासाठीं यज्ञकर्म करा. कारण कीं इन्द्र (मयः पृणन् इत्) यजमानाला सुख देतच (पृणते) स्वतः हवि ग्रहण करीत असतो. ॥ ३ ॥

[२८६] (यः सत्रा-हा) जो एकदम शत्रूंना मारतो, व (विश्व-चर्षणिः) सर्व मनुष्यांचें हित करतो, (तं इन्द्रं वयं हूमहे) त्या इन्द्राला आम्ही बोलावीत आहों. हे (सहस्र-मन्यो) सहस्रावधी उत्साहांनीं युक्त (तुवि-नृम्ण) पुष्कळ धनवान् (सत्पते) सज्जनांच्या पालक इन्द्रा ! (समत्सु) युद्धांमध्यें (नः वृधे भव) आमच्या ऐश्वर्य वृद्धिसाठीं सहाय्य करणारा हो. ॥ ४ ॥

१ यः सत्राहा विश्व-चर्षणिः तं इन्द्रं वयं हूमहे— जो शत्रूंना एकदम मारतो व सर्व मानवांचें कल्याण करतो, त्या इन्द्राला सहाय्यासाठीं आम्ही बोलावतों.

२ हे सहस्र-मन्यो तुविनृम्ण सत्पते ! समत्सु नः वृधे भव— हे सहस्रावधि उत्साहांनीं युक्त, पुष्कळ धनवान् व सज्जनांच्या पालका ! युद्धामध्यें आमचें मोठेपण वाढेल असें कर.

[२८७] हे (शची-वसू) कर्म करून धन प्राप्त करणाऱ्या अश्विनी कुमारांनों ! तुम्ही (शचीभिः) आपल्या शक्तिनीं (दिवा-नक्तं दिशस्यतं) रात्रं दिवस आम्हांला इष्ट धन द्या. (वां रातिः कदाचन मा उपदसत्) तुमचें दान कधींहि कमी होत नाहीं. (अस्मत् रातिः कदाचन) आमचें दानही कधींहि कमी होऊं नये. ॥ ५ ॥

[२८८] (यदा कदा च) ज्यावेळीं (मीळ्हुषे) यज्ञ करणाऱ्या (मर्त्यः) मनुष्य (स्तोता जरेत) स्तुति करील (आत् इत्) त्यावेळीं तो (विव्रतानां धर्तारं वरुणं) विशेष अनेक कर्मांचें धारण करणाऱ्या वरुणाला (वपा गिरा वन्देत) तो विशेष संरक्षक स्तुति करून वन्दन करो. ॥ ६ ॥

[२८९] हे मेध्यातिथे ! (इन्द्राय) इन्द्राला (अन्धसः मदे) सोमपानानें उत्साह प्राप्त झाल्यानंतर (गाः पाहि) गाईंचें रक्षण कर. (यः इन्द्रः) जो इन्द्र (हर्योः संमिश्लः) दोन घोडे रथाला जोडतो व जो (वज्री) वज्र-धारी आहे व जो (हिरण्ययः) रमणीय अशा (हिरण्ययः) स्वर्णाच्या रथामध्यें बसणारा आहे. ॥ ७ ॥

२९० उभयꣳ शृणवच्च न इन्द्रो अर्वागिदं वचः ।
सत्राच्या मघवान्त्सोमपीतये धिया शविष्ठ आ गमत् ॥ ८ ॥ (ऋ. ८।६१।१)

२९१ महे च न त्वाद्रिवः परा शुल्काय दीयसे ।
न सहस्राय नायुताय वज्रिवो न शताय शतामघ ॥ ९ ॥ (ऋ. ८।१।५)

२९२ वस्याꣳइन्द्रासि मे पितुरुत भ्रातुरभुञ्जतः ।
माता च मे छदयथः समा वसो वसुत्वनाय राधसे ॥ १० ॥ (ऋ. ८।१।६)

इति दशमी दशतिः ॥ १० ॥ षष्ठः खण्डः ॥ ६ ॥ [स्व० १५ । उ० ४ । धा० ७६ । (भू) ॥]

इति तृतीयप्रपाठके द्वितीयोऽर्धः, तृतीयः प्रपाठकश्च समाप्तः ॥

---

[२९०] (नः इदं उभयं वचः) आमचें हें दोनही प्रकारचें स्तोत्र (अर्वाक् इन्द्रः शृणवत्) जवळून इन्द्र ऐको. (च) आणि (सत्राच्या धिया) एकत्र बसून म्हणावयाच्या स्तोत्रांना ऐकून (शविष्ठः मघवान्) बलवान् व धनवान् इन्द्र येथें (सोम-पीतये आगमत्) सोमपानासाठीं येवो. ॥ ८ ॥

[२९१] हे (अद्रि-वः) वज्रधारी इन्द्रा ! (महे च शुल्काय) पुष्कळ धन घेऊन ही (त्वा) तुला (न परा दीयसे) विकणार नाहीं. हे (वज्रिवः) वज्रधारी इन्द्रा ! (सहस्राय न) हजारांनाहि नाहीं विकणार. हे (शता-मघ) पुष्कळ धनानें युक्त इन्द्रा ! (न शताय) शंभरांना नाहीं, (अयुताय न) दहा हजार घेऊनही तुला विकणार नाहीं. ॥ ९ ॥

१ हे अद्रिवः ! महे शुल्काय त्वा न परा दीयसे— हे वज्रधारी इन्द्रा ! पुष्कळ धन मिळालें तरी तुला मी देणार नाहीं.

२ हे वज्रिवः ! सहस्राय न— हजारांनाही मी तुला देणार नाहीं.

३ हे शतामघ ! शताय न— हे धनवाना ! शंभरांनाहि देणार नाहीं.

४ न अयुताय— दहा हजारांनाही मी तुला देणार नाहीं.

[२९२] हे इन्द्रा ! तूं (मे पितुः वस्यान्) माझ्या बापापेक्षां अधिक धनवान् आहेस. (उत अभुञ्जतः भ्रातुः) आणि न जेवण देणाऱ्या भावापेक्षांही अधिक मोठा आहेस. हे (वसो) निवासकर्त्या इन्द्रा ! (मे माता च समा) माझी माता व तूं समान आहेस. तूं (वसुत्वनाय राधसे छदयथः) धनवान् व अन्नवान् होण्याकरतां मला प्रतिष्ठित कर. ॥ १० ॥

१ हे इन्द्र ! मे पितुः वस्यान्— हे इन्द्रा ! माझ्या बापापेक्षां तूं अधिक धनवान् आहेस.

२ अभुञ्जतः भ्रातुः— न जेवणाऱ्या भावापेक्षां तूं मोठा आहेस.

३ मे माता समा— माझी आई तुझ्यासारखी आहे.

४ वसुत्वनाय राधसे छदयथः— धनवान् व अन्नवान् होण्यासाठीं मला मोठा बनव.

॥ येथें अठरावा खंड समाप्त झाला ॥

अथ चतुर्थप्रपाठके प्रथमोऽर्धः ।

[१]

(१-१०) १ वसिष्ठो मैत्रावरुणिः; २, ६, ७ वामदेवो गौतमः; ३ मेधातिथि-मेध्यातिथी काण्वौ, विश्वामित्र इत्येके; ४ नोधा गौतमः; ५मेधातिथिः (ऋ० मेध्यातिथिः) काण्वः; ८ श्रुष्टिगुः काण्वः; ९ मेध्यातिथिः (मेधातिथिर्वा) काण्वः; १० नृमेध आंगिरसः ॥ इन्द्रः; ७ बहुः ॥ बृहती ॥

२९३ इम इन्द्राय सुन्विरे सोमासो दध्याशिरः ।
ता२ँआ मदाय वज्रहस्त पीतये हरिभ्यां याह्योक आ ॥ १ ॥ (ऋ. ७।३२।४)

२९४ इम इन्द्र मदाय ते सोमाश्चिकित्र उक्थिनः ।
मधोः पपान उप नो गिरः शृणु रास्व स्तोत्राय गिर्वणः ॥ २ ॥

२९५ आ त्वा३द्य सबर्दुघा२ँहुवे गायत्रवेपसम् ।
इन्द्रं धेनु२ँसुदुघामन्यामिषमुरुधारामरङ्कृतम् ॥ ३ ॥ (ऋ. ८।१।१०)

२९६ न त्वा बृहन्तो अद्रयो वरन्त इन्द्र वीडवः ।
याच्छिक्षसि स्तुवते मावते वसु न किष्टदा मिनाति ते ॥ ४ ॥ (ऋ. ८।८८।३)

२९७ क ईं वेद सुते सचा पिबन्तं कद्वयो दधे ।
अयं यः पुरो विभिनत्त्योजसा मन्दानः शिप्र्यन्धसः ॥ ५ ॥ (ऋ. ८।३३।७)

---

[१९] एकोनविंशः खण्डः ।

[२९३] हे (वज्र-हस्त) वज्र हातांत धरणाऱ्या इन्द्रा ! (दध्याशिरः इमे सोमासः) दहीं मिळवलेले हे सोमरस तुज (इन्द्राय) इन्द्रासाठीं (सुन्विरे) तयार केले आहेत. (मदाय) आनंद प्राप्त व्हावा म्हणून (तान्) त्या सोमरसांना (पीतये) पिण्यासाठी (ओकः आ) यज्ञमंडपामध्यें (हरिभ्यां आ याहि) घोडे जोडून ये. ॥ १ ॥

[२९४] हे इन्द्रा ! (ते मदाय) तुला आनंद मिळावा म्हणून (उक्थिनः) याजक लोकांनीं (इमे सोमाः चिकित्र) हे सोमरस बुद्धिपूर्वक तयार केले आहेत. (मधोः पपानः) या मधुर सोमरसांना पीत असतां (नः गिरः उपशृणु) आमच्या स्तुति जवळून ऐक. हे (गिर्वणः) प्रशंसित इन्द्रा ! (स्तोत्राय रास्व) स्तुति करणाऱ्याला धन दे. ॥ २ ॥

[२९५] हे इन्द्रा ! (अद्य) आज (सबर्दुघां) अधिक दूध देणाऱ्या (गायत्र-वेपसं) प्रशंसनीय वेगवान् (सु-दुघां) उत्तम सुखानें दूध देणाऱ्या (अन्यां ऊरुधारां) विलक्षण रीतिनें पुष्कळ दूध देणाऱ्या (इषं धेनुं) जवळ बाळगण्याची इच्छा करण्यास योग्य गायीसारख्या (अरं कृतं तु आहुवे) अलंकृत इन्द्राला मी बोलावतों. ॥ ३ ॥

[२९६] हे इन्द्रा ! (बृहन्तः वीडवः अद्रयः) मोठे सुदृढ पर्वतही (त्वा न वरन्ते) तुला स्वकर्तव्यापासून निवृत्त करूं शकत नाहींत. (स्तुवते मावते) स्तुति करणाऱ्या माझ्यासारख्या पुरुषाला (यत् वसु शिक्षसि) तूं जें धन देतोस, (ते तत्) त्या तुझ्या दानाला (न किः आ मिनाति) कोणीहि प्रतिबंध करूं शकत नाहीं. ॥ ४ ॥

[२९७] (सुते) सोमयागामध्यें (सचा पिबन्तं ईं) एकत्र बसून सोमरस पिणाऱ्या या इन्द्राला (कः वेद) कोण बरें जाणतो ? (कत् वयः दधे) तो किती अन्न धारण करतो. (यः अयं शिप्री) जो हा इन्द्र शिरस्त्राण धारण करून (अन्धसः मन्दानः) सोमानें उत्साहित होऊन (ओजसा पुरः विभिनत्ति) आपल्या सामर्थ्यानें शत्रूंचीं नगरें तोडतो. ॥ ५ ॥

२९८ यदिन्द्र शासो अव्रतं च्यावया सदसस्परि ।
अस्माकमंशुं मघवन्पुरुस्पृहं वसव्ये अधि बर्हय ॥ ६ ॥

२९९ त्वष्टा नो दैव्यं वचः पर्जन्यो ब्रह्मणस्पतिः ।
पुत्रैर्भ्रातृभिरदितिर्नु पातु नो दुष्टरं त्रामणं वचः ॥ ७ ॥

३०० कदा चन स्तरीरसि नेन्द्र सश्चसि दाशुषे ।
उपोपेन्नु मघवन्भूय इन्नु ते दानं देवस्य पृच्यते ॥ ८ ॥ (ऋ. ८।५१।७)

३०१ युङ्क्ष्वा हि वृत्रहन्तम हरी इन्द्र परावतः ।
अर्वाचीनो मघवन्त्सोमपीतय उग्र ऋष्वेभिरा गहि ॥ ९ ॥ (ऋ. ८।३।१७)

३०२ त्वामिदा ह्यो नरोऽपीप्यन्वज्रिन्भूर्णयः ।
स इन्द्र स्तोमवाहस इह श्रुध्युप स्वसरमा गहि ॥ १० ॥ (ऋ. ८।९९।१)

इति प्रथमा दशतिः ॥ १ ॥ इति सप्तमः खण्डः ॥ ७ ॥ [स्व० १३ । उ० २ । धा ८२ । (ठि) ॥]

---

[२९८] हे इन्द्रा ! (यत् शासः) ज्या अर्थी अपराध्यांस तूं दण्ड देतोस, त्यासाठीं (सदसः परि अव्रतं च्यावय) आमच्या यज्ञस्थानाच्या चारही बाजूस असणाऱ्या यज्ञ न करणाऱ्यांना दूर कर. हे (मघवन्) धनवान् इन्द्रा ! (पुरु-स्पृहं अस्माकं अंशुं) प्रशंसनीय अशा आमच्या सोमरसाला (वसव्ये अधि बर्हय) यज्ञ स्थानामध्यें वाढव. ॥ ६ ॥

[२९९] (त्वष्टा) देवांचा कारागीर त्वष्टा देव, (पर्जन्यः) वृष्टीचा देव, (ब्रह्मणस्पतिः) ब्रह्मणस्पति (पुत्रैः भ्रातृभिः अदितिः) पुत्रांसह व आपल्या भावांसह अदिति–देव माता या सर्व देवता (नः) आमच्या (दुस्तरं त्रामणं वचः) दुस्तर व रक्षक स्तुतिनें संतुष्ट होऊन (नु पातु) निश्चयानें आमचें रक्षण करोत. ॥ ७ ॥

[३००] हे इन्द्रा ! तूं (कदाचन) कधींहि (स्तरीः न असि) वन्ध्या गाईप्रमाणें होत नाहींस. (दाशुषे सश्चसि) हवि देणाऱ्या यजमानाशीं मिळून असतोस. हे (मघवन्) धनवान् इन्द्रा ! (देवस्य ते) प्रकाश स्वरूप अशा तुझें (भूयः दानं) पुष्कळसें दान (उपोपेत् पृच्यते) आमच्याजवळ येऊन पोंचतें. ॥ ८ ॥

[३०१] हे (वृत्र–हन्तम) वृत्राचा नाश करण्यांत कुशल इन्द्रा ! (हि हरी युंक्ष्व) निश्चयपूर्वक आपले घोडे रथाला जोड. हे (मघवन्) धनवन्ता इन्द्रा ! (उग्रः अर्वाचीनः) बलवान् असा तूं आमच्यासमोर (परावतः) दूरच्या देशांतून (ऋष्वेभिः मरुद्भिः) सुंदर मरुतांसह (आ गहि) ये. ॥ ९ ॥

[३०२] हे (वज्रिन्) वज्रधारी इन्द्रा ! (त्वां) तुला (भूर्णयः नरः) यज्ञकर्त्या यजमानांनीं (इदा ह्यः अपीप्यन्) आजच्या पहिल्याच दिवशीं सोमरस प्यावयास दिला होता. हे इन्द्रा ! (सः) तो तूं (इह) या यज्ञामध्यें (स्तोमवाहसः श्रुधि) स्तोत्रें म्हणणाऱ्या याज्ञिकांचीं स्तोत्रें ऐक व यासाठीं (स्वसरं उप आ गहि) यज्ञगृहांत ये. ॥ १० ॥

॥ येथें एकोणीसावा खंड समाप्त झाला ॥

❀

[२]

(१–१०) १,२,७,८ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ३ अश्विनौ वैवस्वतौ; ४ प्रस्कण्वः काण्वः; ५ मेधातिथि–मेध्यातिथी काण्वौ; ६ देवातिथिः काण्वः; ९ नृमेध आंगिरसः; १० नोधाः गौतमः ॥ इन्द्रः; १ उषा; २,३ (ऋ० ४) अश्विनौ ॥ बृहती ॥

३०३ प्रत्यु अदर्श्यायत्यू३च्छन्ती दुहिता दिवः ।
अपो मही वृणुते चक्षुषा तमो ज्योतिष्कृणोति सूनरी ॥ १ ॥

३०४ इमा उ वां दिविष्टय उस्रा हवन्ते अश्विना ।
अयं वामह्वेऽवसे शचीवसू विशंविश१ हि गच्छथः ॥ २ ॥ (ऋ. ७।७४।१)

३०५ कुष्ठः को वामश्विना तपानो देवा मर्त्यः ।
घ्नता वामश्मया क्षयमाणो१ंशुनेत्थमु आद्वन्यथा ॥ ३ ॥

३०६ अयं वां मधुमत्तमः सुतः सोमो दिविष्टिषु ।
तमश्विना पिबतं तिरोअह्न्यं धत्त१रत्नानि दाशुषे ॥ ४ ॥ (ऋ. १।४७।१)

३०७ आ त्वा सोमस्य गल्दया सदा याचन्नहं ज्या ।
भूर्णिं मृगं न सवनेषु चुक्रुधं क ईशानं न याचिषत् ॥ ५ ॥ (ऋ. ८।१।२०)

---

[२०] विंशः खण्डः ।

[३०३] (आयती उच्छन्ती) येणारी व प्रकाशणारी (दिवः दुहिता) सूर्याची पुत्री (प्रति अदर्शि उ) उषा दिसूं लागली. (चक्षुषा) आपल्या दर्शनानें (मही अप वृणुते) ती रात्रीचा मोठा अन्धकार दूर करते. (सूनरी) ती सुन्दर उषा (ज्योतिः कृणोति) प्रकाश करते. ॥ १ ॥

[३०४] (इमाः दिविष्टयः) ह्या प्रकाशाची इच्छा करणाऱ्या प्रजा, हे (अश्विना) अश्विनी कुमारांनो ! (उस्रा) हे निवासक अश्विदेव हो ! (वां हवन्ते) तुम्हांला बोलावतात. (अयं) हा मी (शची–वसू वां) शक्तिनें धन प्राप्त होते असें मानणाऱ्या तुम्हांला (अवसे अह्वे) आपल्या संरक्षणासाठीं बोलवीत आहें. (हि) कारण कीं तुम्हीं (विशं विशं गच्छथः) प्रत्येक मनुष्याकडे जात असतां. ॥ २ ॥

[३०५] हे (देवा अश्विना) प्रकाशमान् अश्विनी कुमार हो ! (कु–ष्ठः, कु–स्थः) या पृथिवीवर राहणारा (कः मनुष्यः) कोण बरें माणूस (वां तपानः) आपल्याला प्रकाशित करण्यास समर्थ आहे ? (वां) तुमच्यासाठीं (अश्मया घ्नता अंशुना) दगडांनीं सोम कुटल्यामुळें (क्षयमाणः) थकलेला यजमान (यथा आद्वन्) यथेच्छ अन्न खाणाऱ्या राजाप्रमाणें (इत्थं उ) असाच सामर्थ्यवान् होत असतो ॥ ३ ॥

[३०६] हे (अश्विना) अश्विनी कुमारांनो ! (वां दिविष्टिषु) तुमच्यासाठीं होत असलेल्या यज्ञांमध्यें (मधु-मत्तमः अयं सुतः) अत्यंत मधुर असा हा सोम रस तयार केला आहे. (तिरो अन्ह्यं पिबतं) एक दिवस पूर्वी तयार केलेला सोमरस तुम्हीं प्या. व (दाशुषे रत्नानि धत्तं) हवि देणाऱ्या यजमानाला रत्नें द्या, धन द्या. ॥ ४ ॥

[३०७] हे इन्द्रा ! (भूर्णिं मृगं न) भरणपोषण करणाऱ्या सिंहाप्रमाणें (त्वा) तुला (सवनेषु) यज्ञामध्यें (सोमस्य गल्दया) सोमाच्या रसानें (ज्या) जयशाली स्तुति करून (अहं सदा याचन्) मी तुझ्याजवळ सर्वोचित याचना करून (आ चुक्रुधं) क्रोधित केलें काय ? (कः ईशानं न याचिषत्) कोण बरें आपल्या स्वामीजवळ मागत नाहीं ? ॥ ५ ॥

३०८ अध्वर्यो द्रावया त्वꣳ सोममिन्द्रः पिपासति ।
उपो नूनं युयुजे वृषणा हरी आ च जगाम वृत्रहा ॥ ६ ॥ (ऋ. ८।४।११)

३०९ अभीषतस्तदा भरेन्द्र ज्यायः कनीयसः ।
पुरूवसुर्हि मघवन्बभूविथ भरेभरे च हव्यः ॥ ७ ॥ (ऋ. ७।३२।२४)

३१० यदिन्द्र यावतस्त्वमेतावदहमीशीय ।
स्तोतारमिद्दधिषे रदावसो न पापत्वाय रꣳसिषम् ॥ ८ ॥ (ऋ. ७।३२।१८)

३११ त्वमिन्द्र प्रतूर्तिष्वभि विश्वा असि स्पृधः ।
अशस्तिहा जनिता वृत्रतूरसि त्वं तूर्य तरुष्यतः ॥ ९ ॥ (ऋ. ८।९९।५)

३१२ प्र यो रिरिक्ष ओजसा दिवः सदोभ्यस्परि ।
न त्वा विव्याच रज इन्द्र पार्थिवमति विश्वं ववक्षिथ ॥ १० ॥ (ऋ. ८।८८।१)

इति द्वितीया दशतिः ॥ २ ॥ अष्टमः खण्डः ॥ ८ ॥ [स्व० १० । उ० ३ । धा० ७७ । (वे) ॥]
इति बृहती समाप्ता ।

---

[३०८] हे अध्वर्यू ! (त्वं) तूं (सोमं द्रावय) सोमाचा रस काढ. कारण कीं (इन्द्रः पिपासति) इन्द्र सोमरस पिऊं इच्छित आहे. (वृषणा हरी नूनं उप उ युयुजे) बलवान् घोड्यांना जोडलें आहे, व (वृत्र-हा आ जगाम) वृत्राचा वध करणारा इन्द्र आला आहे. ॥ ६ ॥

[३०९] हे (ज्यायः इन्द्र) मोठ्या इन्द्रा ! (ईषतः तत्) इच्छा केलेलें तें धन (कनीयसः अभि आभर) माझ्यासारख्या लहानाला भरपूर दे. हे (मघवन्) धनवान् इन्द्रा ! तूं (पुरु-वसुः बभूविथ) पुष्कळ धनवान् आहेस. तूं (भरे भरे हव्यः) प्रत्येक युद्धामध्यें सहायासाठीं जवळ बोलावण्यास योग्य आहेस. ॥ ७ ॥

[३१०] हे इन्द्रा ! (यत् त्वं यावतः ईशिषे) ज्या कारणानें तूं जेवढ्या धनाचा स्वामी आहेस, (एतावत् अहं ईशीय) तेवढ्या धनाचा मी स्वामी होईन. हे (रदा-वसो) धन देणाऱ्या इन्द्रा ! (स्तोतारं इत् दधिषे) स्तुति करणाऱ्याला मी धन देऊन आधार देऊं इच्छीत आहें, (पापत्वाय न रंसिषं) त्याला पापी होऊं देण्यास मी तयार नाहीं. ॥ ८ ॥

[३११] हे इन्द्रा ! (त्वं प्रतूर्तिषु) तूं युद्धांमध्यें (विश्वाः स्पृधः अभि असि) सर्व शत्रूंचा नाश करतोस. हे (तूर्य) शत्रुनाशक इन्द्रा ! (त्वं अशस्ति-हा) तूं अप्रशस्तांचा नाश करतोस. तसेंच (जनिता) शत्रूंच्या आपत्तिचा जनक आहेस. तूं (तरुष्यतः वृत्रतूः असि) विघ्न करणाऱ्यांचा नाश करणारा आहेस. ॥ ९ ॥

[३१२] हे इन्द्रा ! तूं (दिवः सदोभ्यः) दिव्य लोकांतील स्थानांमधून (ओजसा प्ररिरिक्षे) आपल्या सामर्थ्यानें श्रेष्ठ होतोस. (पार्थिवं रजः) पृथिवीवरील धूळ (त्वा) तुला (न विव्याच) घेरूं शकत नाहीं. (विश्वं अति ववक्षिथ) विश्वाला तूंच व्यापूं शकतोस. ॥ १० ॥

॥ येथें विसावा खंड समाप्त झाला ॥

[२]

(१-१०) १,२,६ वसिष्ठो मैत्रावरुणिः, ३ गातुरात्रेयः; ४ पृथुर्वैन्यः; ५ सप्तगुरांगिरसः; ७ गौरिवीतिः शाक्त्यः;
८ वेनो भार्गवः; ९ बृहस्पतिर्नकुलो वा; १० सुहोत्रो भारद्वाजः ॥ इन्द्रः; (ऋ० ५ इन्द्रो वैकुण्ठः)
८ वेनः ॥ त्रिष्टुप् ॥

३१३ असावि देवं गोऋजीकमन्धो न्यस्मिन्निन्द्रो जनुषेमुवोच ।
बोधामसि त्वा हर्यश्व यज्ञैर्बोधा न स्तोममन्धसो मदेषु ॥ १ ॥ (ऋ. ७।२१।१)

३१४ योनिष्ट इन्द्र सदने अकारि तमा नृभिः पुरुहूत प्र याहि ।
असो यथा नोऽविता वृधश्चिद्ददो वसूनि ममदश्च सोमैः ॥ २ ॥ (ऋ. ७।२४।१)

३१५ अदर्दरुत्समसृजो वि खानि त्वमर्णवान्बद्बधानाँ अरम्णाः ।
महान्तमिन्द्र पर्वतं वि यद्वः सृजद्धारा अव यद्दानवान्हन् ॥ ३ ॥ (ऋ. ५।३२।१)

३१६ सुष्वाणास इन्द्र स्तुमसि त्वा सनिष्यन्तश्चित्तुविनृम्ण वाजम् ।
आ नो भर सुवितं यस्य कोना तना त्मना सह्याम त्वोताः ॥ ४ ॥ (ऋ. १०।१४८।१)

---

[२१] एकविंशः खण्डः ।

[३१३] (देवं गो-ऋजीकं अन्धः) दिव्य तेजस्वी गोदुग्ध मिश्रित सोमरस रूपी अन्न (असावि) तयार केलें आहे. (ईं इन्द्रः) हा इन्द्र (अस्मिन् जनुषा नी उवोच) या सोमरसामध्यें स्वभावतःच अत्यंत प्रेम ठेवीत असतो. हे (हरी-अश्व) घोडे जवळ बाळगणाऱ्या इन्द्रा ! (त्वा यज्ञैः बोधामसि) तुला या यज्ञांनीं सांगतों किं (अन्धसः मदेषु) सोमरसाच्या आनंदांमध्यें (नः स्तोमं बोध) आमच्या स्तुतिकडे लक्ष्य दे. ॥ १ ॥

[३१४] (ते सदने योनिः अकारि) तुला बसण्यासाठीं स्थान बनवलें आहे. हे (पुरु-हूत) पुष्कळांकडून प्रशंसित इन्द्रा ! (तं नृभिः आ प्र याहि) त्या स्थानाजवळ आपल्या अनुयायांसह जा. व (नः यथा अविता) आमचा संरक्षक हो आणि (वृधे च असः) आमचें संवर्धन करण्यासाठीं सिद्ध रहा. आम्हांस (वसूनि च ददः) अनेक प्रकारचें धन दे आणि (सोमैः ममदः च) सोमरसांनीं आनंदित हो. ॥ २ ॥

[३१५] हे इन्द्र ! (त्वं उत्सं अदर्दः) तूं मेघाला फोडलेंस. (खानि वि असृजः) व पाणी निघण्याच्या द्वारांना मोकळें केलेंस. (बद्बधानान् अर्णवान् अरम्णाः) खवळणाऱ्या मोठ्या समुद्राला आनंदित केलेंस आणि (महान्तं पर्वतं) मोठ्या मेघाला विदीर्ण केलेंस. (धाराः व्यसृजत्) व जलाच्या धारांना वाहूं दिलेंस. (यत् दानवान् अवहन्) तेव्हां तूं दानवांना विनष्ट केलेंस. ॥ ३ ॥

[३१६] हे इन्द्रा ! (सुष्वाणासः) सोमरस काढणारे याजक आम्ही (त्वा स्तुमसि) तुझी स्तुति करीत आहों. हे (तुवि-नृम्ण) पुष्कळ धन बाळगणाऱ्या इन्द्रा ! (वाजं सनिष्यन्तः) पुरोडाश तयार करणारे आम्ही तुझी स्तुति करीत आहों, म्हणून (नः सुवितं आ भर) आम्हांला उत्तम धन भरपूर दे. (यस्य कोना) ज्या धनाची इच्छा केली जाते तें धन आम्हांस दे. (त्वा ऊताः) तूं सुरक्षित केलेले आम्हीं (तना) पुष्कळ धन (त्मना सह्याम) आपल्या प्रयत्नांनीं प्राप्त करीत आहों. ॥ ४ ॥

३१७ जगृह्मा ते दक्षिणमिन्द्र हस्तं वसूयवो वसुपते वसूनाम् ।
विद्मा हि त्वा गोपतिꣳशूर गोनामस्मभ्यं चित्रं वृषणꣳरयिं दाः ॥ ५ ॥ (ऋ. १०।४७।१)

३१८ इन्द्रं नरो नेमधिता हवन्ते यत्पार्या युनजते धियस्ताः ।
शूरो नृषाता श्रवसश्च काम आ गोमति व्रजे भजा त्वं नः ॥ ६ ॥ (ऋ. ७।२७।१)

३१९ वयः सुपर्णा उप सेदुरिन्द्रं प्रियमेधा ऋषयो नाधमानाः ।
अप ध्वान्तमूर्णुहि पूर्धि चक्षुर्मुमुग्ध्या३स्मान्निधयेव बद्धान् ॥ ७ ॥ (ऋ. १०।७३।११)

३२० नाके सुपर्णमुप यत्पतन्तꣳहृदा वेनन्तो अभ्यचक्षत त्वा ।
हिरण्यपक्षं वरुणस्य दूतं यमस्य योनौ शकुनं भुरण्युम् ॥ ८ ॥ (ऋ. १०।१२३।६)

३२१ ब्रह्म जज्ञानं प्रथमं पुरस्ताद्वि सीमतः सुरुचो वेन आवः ।
स बुध्न्या उपमा अस्य विष्ठाः सतश्च योनिमसतश्च विवः ॥ ९ ॥

अथर्व. ५।६।१; यजु. १३।३

---

[३१७] हे (वसूनां वसुपते इन्द्र) पुष्कळ धनांच्या स्वामी इन्द्रा ! (ते दक्षिणं हस्तं) तुझ्या उजव्या हाताला (वसूयवः जगृह्मा) धनाची इच्छा करणारे आम्ही पकडतों. हे (शूर) वीर इन्द्रा ! आम्ही (त्वा) तुला (गोनां गोपतिं विद्म) गाईंचा गोपालक आहेस असें जाणतों. यासाठीं (चित्रं वृषणं रयिं अस्मभ्यं दाः) अनेक प्रकारचें बल वाढवणारें धन तूं आम्हांला दे. ॥ ५ ॥

[३१८] (यत्) जेव्हां (ताः पार्याः धियः युनजते) संकटांतून वांचण्यासाठीं बुद्धिपूर्वक कर्में केलीं जातात, तेव्हां (नरः नेमधिता) नेता लोक युद्धाच्या वेळीं (इन्द्रं हवन्ते) इन्द्राला आपल्या सहायासाठीं बोलावतात. असा (त्वं शूरः नृषाता) तूं शूर व मनुष्यांना धन देणारा आहेस, (श्रवसः चकानः) बल वाढवण्याची इच्छा करणारा (त्वं) तूं (गोमति व्रजे) गाईंच्या गोठ्यांत (नः आ भज) आम्हांला पोंचव. ॥ ६ ॥

[३१९] (सुपर्णाः वयः) उत्तम पंखयुक्त पक्ष्यांप्रमाणें (प्रिय-मेधाः, ऋषयः नाधमानाः) यज्ञाशीं प्रेम करणारे, सर्वदर्शी, प्रज्ञाबुद्धी प्राप्त व्हावी असें इच्छिणारे किरण (इन्द्रं उपसेदुः) इन्द्राला प्राप्त झाले. आतां हे इन्द्रा ! तूं (ध्वान्तं अपोर्णुहि) अन्धकार दूर कर. (चक्षुः पूर्धि) तेजानें डोळे भरून टाक, (निधया बद्धान् इव) पाशानें बांधलेल्या (अस्मान् मुमुग्धि) आम्हांला मुक्त कर. ॥ ७ ॥

१ निधया बद्धान् अस्मान् मुमुग्धि— पाशानें बांधलेल्या आम्हांस मुक्त कर.

[३२०] (सुपर्णं पतन्तं) उत्तम पंखानें युक्त व आकाशांत चांगल्या प्रकारें फिरणाऱ्या (हिरण्यपक्षं) सोनेरी पंख असलेल्या (वरुणस्य दूतं) वरुणाचा दूत अशा (यमस्य योनौ) अग्निच्या उत्पत्तिस्थानीं–अन्तरिक्षामध्यें (शकुनं) पक्षीरूपानें असणाऱ्या (भुरण्युं) सर्वांचें पोषण करणाऱ्या (त्वा) तुला (हृदा वेनन्ताः) लोक अन्तःकरणानें जाणतात, तेव्हां ते (नाके अभ्यचक्षत) अन्तरिक्षांत तुला पाहतात. ॥ ८ ॥

[३२१] (वेनः) वेनानें (पुरस्तात् जज्ञानं ब्रह्म) आपल्या प्रथमच उत्पन्न होणाऱ्या ब्रह्म तेजानें (प्रथमं विसीं) प्रथमपासून उपदेश करीत (अतः सुरुचः आवः) आपल्या उत्तम तेजानें सर्वांचें रक्षण करीत, सर्वांना कान्ति-युक्त केलें. (सः बुध्न्या) तो अन्तरिक्षामध्यें (अस्य उपमाः) याची उपमा देण्यास योग्य कान्ति (विष्ठाः) स्थापन करतो. (सतः असतः च योनिं) असलेल्या व होणाऱ्या विश्वाच्या उत्पत्ति करणाऱ्याला तोच (वि वः) उत्पन्न करतो. ॥ ९ ॥

३२२ अपूर्व्या पुरुतमान्यस्मै महे वीराय तवसे तुराय ।
विरप्शिने वज्रिणे शन्तमानि वचांस्यस्मै स्थविराय तक्षुः ॥ १० ॥ (ऋ. ६।३२।१)

इति तृतीया दशतिः ॥ ३ ॥ इति नवमः खण्डः ॥ ९ ॥ [स्व० १३ । उ० ६ । धा० ९१ । ट ॥]

[४]

(१-९) १, २, ४ द्युतानो मारुतः (ऋ० तिरश्चीराङ्गिरसः); ३ बृहदुक्थो वामदेव्यः; ५ वामदेवो गोतमः; ६, ८ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ७ विश्वामित्रो गाथिनः; ९ गोरिवीतिः शाक्त्यः ॥ इन्द्रः ॥ त्रिष्टुप्, (६ ऋ० विराट्) ॥

३२३ अव द्रप्सो अंशुमतीमतिष्ठदीयानः कृष्णो दशभिः सहस्रैः ।
आवत्तमिन्द्रः शच्या धमन्तमप स्नीहितिं नृमणा अधद्राः ॥ १ ॥ (ऋ. ८।९६।१३)
३२४ वृत्रस्य त्वा श्वसथादीषमाणा विश्वे देवा अजहुर्ये सखायः ।
मरुद्भिरिन्द्र सख्यं ते अस्त्वथेमा विश्वाः पृतना जयासि ॥ २ ॥ (ऋ. ८।९६।७)
३२५ विधुं दद्राणं समने बहूनां युवानं सन्तं पलितो जगार ।
देवस्य पश्य काव्यं महित्वाद्या ममार स ह्यः समानः ॥ ३ ॥ (ऋ. १०।५५।५)

---

[३२२] (महे वीराय) मोठा वीर (तवसे तुराय) बलवान् व त्वरित कार्य करणाऱ्या (विरप्शिने वज्रिणे) स्तुत्य व वज्रधारी (स्थविराय अस्मै) वृद्ध अशा या इन्द्रासाठीं (अपूर्व्या) अपूर्व व (पुरुतमानि) पुष्कळ (शंतमानि वचांसि) स्तुति करणारीं स्तोत्रें (तक्षुः) उच्चारण केलीं. ॥ १० ॥

॥ येथें एकविसावा खंड समाप्त झाला ॥

[२२] द्वाविंशः खण्डः ।

[३२३] (द्रप्सः) शीघ्र चालून येणारा (दशभिः सहस्रैः इयानः) दहा हजार सैनिकांसह आक्रमण करणारा (कृष्णः) कृष्ण नांवाचा असुर (अंशुमतीं अवातिष्ठत्) अंशुमती नदीवर येऊन पोंचला. (शच्या धमन्तं तं) आपल्या बलानें जगाला त्रास देणाऱ्या त्या असुरावर (इन्द्रः आवत्) इन्द्र चालून गेला. (अथ) नंतर (नृ-मणाः) लोकांचीं मनें ज्यानें आपल्याकडे आकर्षून घेतलीं आहेत, अशा इन्द्रानें (स्नीहितिं अधद्राः) त्या हिंसक सेनेला मारलें, ॥ १ ॥

[३२४] हे इन्द्रा ! (ये विश्वे देवाः) जे सर्व देव तुझे (सखायः) मित्र होते, ते सर्व देव (वृत्रस्य श्वसथात्) वृत्रासुराच्या श्वासाला भिऊन (ईषमाणाः त्वा अजहुः) चारही बाजूंस पळाले व त्यांनीं तुला सोडलें. हे इन्द्रा ! आतां (मरुद्भिः ते सख्यं अस्तु) मरुतांबरोबर तुझें सख्य होवो. (अथ) या नंतर तूं (इमाः विश्वाः पृतनाः जयासि) या सर्व शत्रूंच्या सेनांवर विजय मिळवशील. ॥ २ ॥

[३२५] (समने विधुं) युद्धामध्यें कार्य करणाऱ्या (बहूनां दद्राणं) पुष्कळ शत्रूंच्या सैनिकांना पळवून लावणाऱ्या (युवानं) तरुण इन्द्राच्या कृपेनें (पलितः जगार) पांढरे केंस झालेला वृद्धही आपल्या कर्तव्यास जागूं लागतो. (देवस्य महित्वा) या इन्द्राचें महत्वाच्या पराक्रमांनीं भरलेलें (काव्यं पश्य) काव्य पहा. जो (अद्य ममार) आज मरतो (सः ह्यः समानः) तोच उद्यां समान रीतिनें संसारांत येऊन कार्य करूं लागतो. ॥ ३ ॥

३२६ त्व१ँह त्यत्सप्तभ्यो जायमानोऽशत्रुभ्यो अभवः शत्रुरिन्द्र ।
गूढे द्यावापृथिवी अन्वविन्दो विभुमद्भ्यो भुवनेभ्यो रणं धाः ॥ ४ ॥ (ऋ. ८।९६।१६)

३२७ मेडिं न त्वा वज्रिणं भृष्टिमन्तं पुरुधस्मानं वृषभ१ँस्थिरप्स्नुम् ।
करोष्यर्यस्तरुषीर्दुवस्युरिन्द्र द्युक्षं वृत्रहणं गृणीषे ॥ ५ ॥

३२८ प्र वो महे महे वृधे भरध्वं प्रचेतसे प्र सुमतिं कृणुध्वम् ।
विशः पूर्वीः प्र चर चर्षणिप्राः ॥ ६ ॥ (ऋ. ७।३१।१०)

३२९ शुनᳬहुवेम मघवानमिन्द्रमस्मिन्भरे नृतमं वाजसातौ ।
शृण्वन्तमुग्रमूतये समत्सु घ्नन्तं वृत्राणि सञ्जितं धनानि ॥ ७ ॥ (ऋ ३।३०।२२)

३३० उदु ब्रह्माण्यैरत श्रवस्येन्द्र१ँसमर्ये महया वसिष्ठ !
आ यो विश्वानि श्रवसा ततानोपश्रोता म ईवतो वचा१ँसि ॥ ८ ॥ (ऋ. ७।२३।१)

---

[३२६] हे इन्द्रा ! (त्वं त्यत् जायमानः) तूं उत्पन्न होतांच (अ-शत्रुभ्यः सप्तभ्यः) ज्यांना शत्रु उरले नाहींत, अशा कृष्ण-वृत्र-नमुचि-शंबर आदि सात असुरांचा (शत्रुः अभवः) शत्रु झालास. हे इन्द्रा ! तूं (गूढे द्यावा पृथिवी) अंधारांत पडलेल्या द्यु व पृथिवी यांना (अन्वविन्दः) प्रकाशांत आणलेंस. आणि (विभुमद्भ्यः भुवनेभ्यः) वैभवशाली भुवनांमध्यें (रणं धाः) रमणीयतेची स्थापना केलीस. या लोकांस रमणीय बनवलेंस. ॥ ४ ॥

[३२७] हे इन्द्रा ! (दुवस्युः) प्रशंसनीय (अर्यः) शत्रुनाशक असा तूं आम्हांला (तरुषीः) विजयी करतोस. (मेडिं न) प्रशंसनीयाची स्तुति करतात त्याप्रमाणें मी (वृत्र-हणं) वृत्राला मारणाऱ्या (द्यु-क्षं) द्युलोकांत राहणाऱ्या (पुरु-धस्मानं) अनेक शत्रूंचा नाश करणाऱ्या (वृषभं) बलवान (स्थिर-प्स्नुं) युद्धांत स्थिर राहणाऱ्या (वज्रिणं) वज्रधारी (भृष्टि-मन्तं) शत्रुनाशक (त्वा गृणीषे) अशा तुझी स्तुति करतों. ॥ ५ ॥

[३२८] हे मनुष्य हो ! (वः) तुम्ही (महे वृधे महे प्रभरध्वं) मोठें कार्य करणाऱ्या महान् इन्द्राला भरपूर सोम द्या. (प्रचेतसे सुमतिं प्रकृणुध्वं) विशेष ज्ञानी इन्द्राची उत्तम स्तुति करा. हे इन्द्रा ! (चर्षणि-प्राः) प्रजाजनांच्या इच्छा पूर्ण करणारा असा तूं (पूर्वीः विशः प्रचर) हवि पुरवणाऱ्या आम्हां प्रजाजनांना सहाय कर. ॥ ६ ॥

[३२९] (वाज-सातौ अस्मिन् भरे) अन्न देणाऱ्या या युद्धामध्यें (शुनं) उत्साही (मघवानं नृतमं इन्द्रं) धनवान्, वीरांमध्यें श्रेष्ठ इन्द्राला (हुवेम) आम्ही आमच्या सहाय्यासाठीं बोलावतों. तो इन्द्र (शृण्वन्तं) गाऱ्हाणें ऐकणारा (उग्रं) शूर वीर (समत्सु वृत्राणि घ्नन्तं) युद्धांमध्यें घेरणाऱ्या शत्रूंना मारणारा (धनानि संजितं) धनें जिंकणारा आहे, त्याला (ऊतये) आमच्या संरक्षणासाठीं बोलावतों. ॥ ७ ॥

[३३०] (श्रवस्या) अन्न प्राप्तीच्या इच्छेनें (ब्रह्माणि उत् ऐरत) स्तोत्रें म्हणा. हे (वसिष्ठ) जितेन्द्रिय ऋषे ! (समर्ये इन्द्रं महय) यज्ञामध्यें इन्द्राचा मोठेपणा वर्णन कर. (यः विश्वानि) जो सर्व लोकांना (श्रवसा आततान) अन्नानें अथवा यशानें वाढवतो व जो (ईवतः मे) उपासना करणाऱ्या माझें (वचांसि उप श्रोता) म्हणणें ऐकतो. ॥ ८ ॥

३३१ चक्रं यदस्याप्स्वा निषत्तमुतो तदस्मै मध्विच्चच्छद्यात् ।
पृथिव्यामतिषितं यदूधः पयो गोष्वदधा ओषधीषु ॥ ९ ॥ (ऋ. १०।७३।९)

इति चतुर्थी दशतिः ॥ ४ ॥ दशमः खण्डः ॥ १० ॥ [स्व० १६ । उ० ६ । धा० ७३ । कि ॥]

[५]

(१-१०) १ अरिष्टनेमिस्ताक्ष्यः; २ भरद्वाजः (ऋ० गर्गो भारद्वाजः); ३ विमद ऐन्द्रः, वसुकृद्वा वासुक्रः (ऋ० प्राजापत्यो वा) ४-६, ९ वामदेवो गौतमः (९ ऋ० यमी वैवस्वती) ७ विश्वामित्रो गाथिनः; ८ रेणु-वैश्वामित्रः; १० गोतमो राहूगणः ॥ इन्द्रः; (ऋ० १ तार्क्ष्यः; ७ पर्वतेन्द्रौ; ९ यमो वैवस्वतः)॥ त्रिष्टुप् ॥

३३२ त्यमू षु वाजिनं देवजूतꣳ सहोवानं तरुतारꣳरथानाम् ।
अरिष्टनेमिं पृतनाजमाशुꣳस्वस्तये तार्क्ष्यमिहा हुवेम ॥ १ ॥ (ऋ. १०।१७८।१०)

३३३ त्रातारमिन्द्रमवितारमिन्द्रꣳ हवेहवे सुहवꣳ शूरमिन्द्रम् ।
हुवे नु शक्रं पुरुहूतमिन्द्रमिदꣳ हविर्मघवा वेत्विन्द्रः ॥ २ ॥ (ऋ. ६।४७।११)

३३४ यजामह इन्द्रं वज्रदक्षिणꣳहरीणाꣳरथ्या३ंविव्रतानाम् ।
प्र श्मश्रुभिर्दोधुवदूर्ध्वधा भुवद्वि सेनाभिर्भयमानो वि राधसा ॥ ३ ॥ (ऋ. १०।२३।१)

---

[३३१] (अस्य चक्रं) या इन्द्राचें वज्र (अप्सु आ निषत्तं) अन्तरिक्षामध्यें चमकत आहे. (उत उ) आणि तो (अस्मै मधु इत् चच्छद्यात्) या उपासकांसाठीं मधुर जल पाठवतो. तसेंच (पृथिव्यां अतिषितं यत् ऊधः) पृथिवीवर जें जल येतें (गोषुः पयः आदधाः) तें गाईंमध्यें दुधाच्या रूपानें तो ठेवतो. (ओषधीषु) औषधीमध्यें रसाच्या रूपानें ठेवतो. ॥ ९ ॥

॥ येथें बावीसावा खंड समाप्त झाला ॥

[२३] त्रयोविंशः खण्डः ।

[३३२] (त्यं वाजिनं) त्या बलवान् (देव-जूतं सहोवानं) देवांनीं सेवा केलेल्या शक्तिमान् (रथानां तरुतारं) रथांचें संग्रामामध्यें तारण करणाऱ्या (अ-रिष्ट-नेमिं) तीक्ष्ण आयुध ज्याच्याजवळ आहे, (पृतनाजं) शत्रूंच्या सेनेवर विजय प्राप्त करणाऱ्या (आशुं तार्क्ष्यं) शीघ्रगामी सुपर्णाला (स्वस्तये इह हुवेम) आमचें कल्याण व्हावें यासाठीं येथें बोलवीत आहों. ॥ १ ॥

[३३३] (त्रातारं इन्द्रं हुवे) संरक्षण करणाऱ्या इन्द्राला मी सहाय्यासाठीं बोलावतों. (अवितारं इन्द्रं) सहाय्यक इन्द्राला मी बोलावतों. (हवे हवे सुहवं) प्रत्येक युद्धांत बोलावण्यास योग्य (शूरं शक्रं पुरु-हूतं इन्द्रं) शूर सामर्थ्यवान्, व अनेक ज्याला बोलावतात अशा इन्द्राला सहाय्यासाठीं बोलावतों. (मघवा इन्द्रः) धनवान् इन्द्र (इदं हविः वेतु) हें हविष्यान्न भक्षण करो. ॥ २ ॥

[३३४] (वज्र-दक्षिणं) आपल्या उजव्या हातांत वज्र धारण करणाऱ्या (विव्रतानां हरीणां रथ्यां) जलद धांवणाऱ्या घोड्यांच्या रथांत बसणाऱ्या (इन्द्रं यजामहे) इन्द्रासाठीं आम्ही यज्ञ करीत आहों. तो इन्द्र (श्मश्रुभिः दोधुवत्) आपल्या दाढी व मिशा हालवीत आहे. तो (ऊर्ध्वधा विभुवत्) सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे. (सेनाभिः भयमानः) आपल्या सैन्यांनीं शत्रूंना भयभीत करीत तो (राधसा वि) उपासकांना धन देत असतो. ॥ ३ ॥

३२५ सत्राहणं दाधृषिं तुम्रमिन्द्रं महामपारं वृषभꣳसुवज्रम् ।
हन्ता यो वृत्रꣳ सनितोत वाजं दाता मघानि मघवा सुराधाः ॥ ४ ॥ (ऋ. ४।१७।८)

३२६ यो नो वनुष्यन्नभिदाति मर्त उगणा वा मन्यमानस्तुरो वा ।
क्षिधी युधा शवसा वा तमिन्द्राभी ष्याम वृषमणस्त्वोताः ॥ ५ ॥

३२७ यं वृत्रेषु क्षितय स्पर्धमाना यं युक्तेषु तुरयन्तो हवन्ते ।
यꣳ शूरसातौ यमपामुपज्मन्यं विप्रासो वाजयन्ते स इन्द्रः ॥ ६ ॥

३२८ इन्द्रापर्वता बृहता रथेन वामीरिष आ वहतꣳसुवीराः ।
वीतꣳहव्यान्यध्वरेषु देवा वर्धेथां गीर्भिरिडया मदन्ता ॥ ७ ॥ (ऋ. ३।५३।१)

३२९ इन्द्राय गिरो अनिशितसर्गा अपः प्रैरयत्सगरस्य बुध्नात् ।
यो अक्षेणेव चक्रियौ शचीभिर्विष्वक्तस्तम्भ पृथिवीमुत द्याम् ॥ ८ ॥ (ऋ. १०।८९।४)

---

[३२५] आम्ही (सत्रा-हणं) एकदम अनेक शत्रूंना मारणाऱ्या (दाधृषिं) शत्रूला भयभीत करणाऱ्या (तुम्रं) शत्रूला पळावयास लावणाऱ्या (महां अपारं वृषभं) मोठ्या अपार बलवान् (सु-वज्रं इन्द्रं) उत्तम वज्रधारी इन्द्राची स्तुति करीत आहों, (यः वृत्रं हन्ता) जो वृत्राचा वध करतो, (उत वाजं सनिता) व अन्न देतो, तसेंच (सु-राधाः मघवा) उत्तम धन जवळ बाळगणारा हा इन्द्र (मघानि दाता) भक्तांना धन देत असतो. ॥ ४ ॥

[३२६] (यः मर्तः) जो मानवी शत्रु (नः वनुष्यन्) आम्हांला ठार मारण्याची इच्छा करून (अभि दाति) चढाई करून येत आहे आणि जो (मन्यमानः) घमेंडखोर (क्षिधी युधा शवसा) विनाशक आयुध घेऊन मोठ्या वेगानें (उगणाः तुरः) सैन्यासह त्वरेनें आमच्यावर चढाई करून येत आहे, त्याला आम्ही (त्वा ऊताः) तुझ्या संरक्षणानें सुरक्षित झालेले (वृष-मणः) बलवान् मनानें युक्त होऊन (अभिष्याम) पराभूत करूं. ॥ ५ ॥

[३२७] (वृत्रेषु स्पर्धमानाः क्षितयः) शत्रु बरोबर स्पर्धा करणारे प्रजाजन (यं हवन्ते) ज्याला सहाय्यासाठीं बोलावतात, (युक्तेषु तुरयन्तः यं) शस्त्रें घेऊन त्वरेनें कापाकापी करणारे वीर ज्याला बोलावतात, (शूर-सातौ यं) शूरांच्या युद्धांत ज्याला बोलावतात, (अपां यं) पाण्यासाठीं ज्याला हांक मारतात, (उपज्मन् यं) वृष्टि पाडावी म्हणून ज्याची प्रार्थना करतात, (विप्रासः वाजयन्ते) ज्ञानी याजक ज्याला हवि अर्पण करतात (सः इन्द्रः) तो इन्द्र आहे ॥ ६ ॥

[३२८] हे (इन्द्रा-पर्वता) इन्द्रा व पर्वता ! (बृहता रथेन) मोठ्या रथानें येऊन (वामीः सुवीराः) प्रार्थना करण्यास योग्य असे उत्तम वीर तुम्ही (इषः आवहत) अन्न आणून आम्हांस द्या. हे (देवाः) देव हो ! (अध्वरेषु हव्यानि वीत) आमच्या यज्ञामध्यें हव्य अन्न भक्षण करा. (इडया मदन्ता) आम्ही दिलेल्या अन्नानें आनंदित होऊन (गीर्भिः वर्धेथां) आमच्या स्तुतिनें तुमच्या यशाचें संवर्धन होवो ॥ ७ ॥

[३२९] (इन्द्राय अनिशित-सर्गाः गिरः) इन्द्राची उच्च स्वरानें स्तुति केली, तर ती (सगरस्य बुध्नात् अपः प्रैरयत्) अन्तरिक्षाच्या स्थानापासून पाण्याला प्रवाहित करते. (यः) जो इन्द्र (शचीभिः) आपल्या शक्तिनी (पृथिवीं उत द्यां विष्वक् तस्तम्भ) पृथिवी व द्युलोकाला चार ही बाजूंनीं धारण करतो, (चक्रियौ अक्षेण इव) ज्याप्रमाणें चक्रें आंसावर आधारलेलीं असतात. ॥ ८ ॥

३४० आ त्वा सखायः सख्या ववृत्युस्तिरः पुरू चिदर्णवां जगम्याः ।
पितुर्नपातमा दधीत वेधा अस्मिन्क्षये प्रतरां दीद्यानः ॥ ९ ॥ (ऋ. १०।१०।१)

३४१ को अद्य युङ्क्ते धुरि गा ऋतस्य शिमीवतो भामिनो दुर्हृणायून् ।
आसन्नेषामप्सुवाहो मयोभून्य एषां भृत्यामृणधत्स जीवात् ॥ १० ॥

इति पञ्चमी दशतिः ॥ ५ ॥ एकादशः खण्डः ॥ ११ ॥ [स्व० १८ । उ० ४ । धा ८६ । (ढू) ॥]
इति त्रिष्टुप् समाप्ता ॥ इति चतुर्थप्रपाठकस्य प्रथमोऽर्धः ॥ १ ॥

[६]

(१–१०) १ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; २ जेता माधुच्छन्दसः; ३, ६ गोतमो राहूगणः; ४ अत्रिर्भौमः; ५, ८ तिरश्चीरांगिरसः; ७ नीपातिथिः काण्वः; ९ विश्वामित्रो गाथिनः; १० तिरश्चीरांगिरसः शंयुर्बार्हस्पत्यो वा ॥

॥ इन्द्रः ॥ अनुष्टुप् ॥

३४२ गायन्ति त्वा गायत्रिणोऽर्चन्त्यर्कमर्किणः ।
ब्रह्माणस्त्वा शतक्रत उद्वंशमिव येमिरे ॥ १ ॥ (ऋ. १।१०।१)

३४३ इन्द्रं विश्वा अवीवृधन्त्समुद्रव्यचसं गिरः ।
रथीतमं रथीनां वाजानां सत्पतिं पतिम् ॥ २ ॥ (ऋ. १।११।१)

---

[३४०] हे इन्द्रा ! (सखायः) मित्रजन (सख्या त्वा आववृत्युः) प्रिय स्तोत्रांनीं तुला आपल्या सन्मुख बोलावतात. तूं (तिरः पुरु अर्णवं जगम्याः) वर जाऊन विस्तृत अन्तरिक्षामध्यें पोंचलास. (अस्मिन् क्षये) या यज्ञामध्यें (प्र तरां दीद्यानाः) पुष्कळ प्रकाशित होऊन (वेधाः) निर्माण करणाऱ्या इन्द्रानें (पितुः नपातं आदधीत) पित्याच्या नातवाला, माझ्या मुलाला पुत्र उत्पन्न होईल असें करावें. ॥ ९ ॥

[३४१] (अद्य) आज (ऋतस्य धुरिः) यज्ञामध्यें जाणाऱ्या इन्द्राच्या रथाच्या धुरेला (गाः) गतिमान् (शिमीवतः भामिनः) वीर व तेजस्वी (दु-र्हृणायून्) शत्रूवर फार क्रोध करणाऱ्या (मयोभून्) सुखदायक घोड्यांना (आसन्) तोंडानें म्हटल्या जाणाऱ्या स्तोत्रांच्या योगानें (कः युंक्ते) कोण बरें जोडतो ? (यः एषां भृत्यां ऋणधत्) जो यांचें भरणपोषण कार्य करतो (सः जीवात्) तोच जिवंत राहतो. ॥ १० ॥

॥ येथें तेवीसावा खंड समाप्त झाला ॥

[२४] चतुर्विंशः खण्डः ।

[३४२] हे (शत-क्रतो) शेंकडों कार्यें करणाऱ्या इन्द्रा ! (त्वा गायत्रिणः गायन्ति) उद्गाते तुझें वर्णन करतात. (अर्किणः अर्कं अर्चन्ति) स्तुति करणारे पूज्य इन्द्राची प्रशंसा करतात. (ब्रह्माणः) ब्राह्मण (त्वा उत् येमिरे) तुला वर उचलून धरतात– तुझी प्रशंसा करतात, (वंशं इव) ज्या प्रमाणें नाचणारे वेळू वर उचलून धरतात. ॥ १ ॥

[३४३] (विश्वाः गिरः) सर्व स्तुति (समुद्रव्यचसं) समुद्राप्रमाणें गंभीर (रथीनां रथीतमं) रथांत बसणाऱ्या वीरांमध्यें श्रेष्ठ वीर (वाजानां पतिं) बलांचा व अन्नांचा स्वामी (सत्पतिं इन्द्रं अवीवृधन्) अशा सज्जनांच्या पालनकर्त्या इन्द्राचें महात्म्य वाढवतात. ॥ २ ॥

३४४ इममिन्द्र सुतं पिब ज्येष्ठममर्त्यं मदम् ।
शुक्रस्य त्वाभ्यक्षरन्धारा ऋतस्य सादने ॥ ३ ॥ (ऋ. १।८४।४)

३४५ यदिन्द्र चित्र म इह नास्ति त्वादातमद्रिवः ।
राधस्तन्नो विदद्वस उभयाहस्त्या भर ॥ ४ ॥ (ऋ. ५।३९।१)

३४६ श्रुधी हवं तिरश्च्या इन्द्र यस्त्वा सपर्यति ।
सुवीर्यस्य गोमतो रायस्पूर्धि महाँ२असि ॥ ५ ॥ (ऋ. ८।९५।४)

३४७ असावि सोम इन्द्र ते शविष्ठ धृष्णवा गहि ।
आ त्वा पृणक्त्विन्द्रियँ२रजः सूर्यो न रश्मिभिः ॥ ६ ॥ (ऋ. १।८४।१)

३४८ एन्द्र याहि हरिभिरुप कण्वस्य सुष्टुतिम् ।
दिवो अमुष्य शासतो दिवं यय दिवावसो ॥ ७ ॥ (ऋ. ८।३४।१)

३४९ आ त्वा गिरो रथीरिवास्थुः सुतेषु गिर्वणः ।
अभि त्वा समनूषत गावो वत्सं न धेनवः ॥ ८ ॥ (ऋ. ८।९५।१)

---

[३४४] हे इन्द्रा ! (इमं ज्येष्ठं मदं) या श्रेष्ठ आनंद वाढवणाऱ्या (अमर्त्यं सुतं पिब) अमर सोमरसाचें पान कर. (ऋतस्य सादने) यज्ञाच्या मण्डपामध्यें (शुक्रस्य धाराः) शुद्ध सोमरसाच्या धारा (त्वा अभ्यक्षरन्) तुझ्याकडे चालल्या आहेत. ॥ ३ ॥

[३४५] हे (चित्रः अद्रिवः) विलक्षण वज्रधारी (विदद्वसो इन्द्र) धनवान् इन्द्रा ! (यत् त्वा दातं राधः) जें तूं देण्यास योग्य असें धन (इह मे नास्ति) येथें मजकडे नाहीं, (तत् नः) तें आम्हांला (उभया हस्त्या आभर) दोनही हातांनीं भरपूर दे. ॥ ४ ॥

[३४६] हे इन्द्रा ! (यः त्वा सपर्यति) जो तुझी आराधना करतो, त्या (तिरश्च्याः हवं श्रुधि) तिरश्चि ऋषिची प्रार्थना ऐक ! व तूं (सुवीर्यस्य गोमतः रायः) उत्तम वीर्ययुक्त गाई असलेलें धन देऊन (पूर्धि) आम्हांला पूर्ण कर, (महान् असि) तूं मोठा आहेस. ॥ ५ ॥

[३४७] हे इन्द्रा ! (ते सोमः असावि) तुझ्यासाठीं सोमरस काढला आहे. हे (शविष्ठ) बलवाना (धृष्णो:) हे शत्रूंचा पराभव करणाऱ्या इन्द्रा ! (आ गहि) ये. (इन्द्रियं त्वा आ पृणक्तु) सोमपानानें शक्ति तुझ्यामध्यें भरून वाढो, (सूर्यः रश्मिभिः रजः न) ज्याप्रमाणें सूर्य आपल्या किरणांनीं अन्तरिक्ष भरून टाकतो तशी. ॥ ६ ॥

[३४८] हे इन्द्रा ! (कण्वस्य सुष्टुतिं) कण्वाच्या उत्तम स्तुति जवळ (हरिभिः उप याहि) घोड्यांच्या सहाय्यानें ये. (अमुष्य) याच्या (दिवः शासतः) द्युलोकाच्या शासनामध्यें आम्हांला सुख मिळतें; म्हणून हे (दिवावसो) तेजस्वितेसह राहणाऱ्या इन्द्रा ! (दिवं यय) द्युलोकावर जा. ॥ ७ ॥

[३४९] हे (गिर्वणः) स्तुतिला योग्य इन्द्रा ! (सुतेषु) सोमयागांमध्यें (गिरः) आमच्या स्तुति, (रथीः इव) रथांत बसणारे वीर जसे योग्य ठिकाणीं जाऊन पोंचतात, त्या प्रमाणें (त्वा अस्थुः) तुझ्याजवळ जाऊन पोंचतात. हे इन्द्रा ! (वत्सं धेनवः गावः न) वासराजवळ जशा दुधाळ गाई जातात, त्याप्रमाणें आमच्या स्तुति (त्वा अभि समनूषत) तुझ्याजवळ पोंचतात. ॥ ८ ॥

३५० एतो न्विन्द्रꣳस्तवाम शुद्धꣳशुद्धेन साम्ना ।
शुद्धैरुक्थैर्वावृध्वाꣳसꣳशुद्धैराशीर्वान्ममत्तु ॥ ९ ॥ (ऋ. ८।९५।७)

३५१ यो रयिं वो रयिन्तमो यो द्युम्नैर्द्युम्नवत्तमः ।
सोमः सुतः स इन्द्र तेऽस्ति स्वधापते मदः ॥ १० ॥ (ऋ. ६।४४।१)

इति षष्ठी दशतिः ॥ ६ ॥ द्वादशः खण्डः ॥ १२ ॥ [स्व० ४ । उ० ४ । धा० ५४ । (धी) ॥]

इति तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

अथ चतुर्थोऽध्यायः ।

[७]

(१-१०) १ भरद्वाजो बार्हस्पत्यः; २ वामदेवो गौतमः, शाकपूतो वा; ३ प्रियमेध आंगिरसः; ४ प्रगाथः काण्वः; ५ श्यावाश्व आत्रेयः; ६ शंयुर्बार्हस्पत्यः; ७ वामदेवो गौतमः; जेता माधुच्छन्दसः ॥ इन्द्रः; ५ मरुतः; ७ दधिक्रा वा ॥ अनुष्टुप् ॥

३५२ प्रत्यस्मै पिपीषते विश्वानि विदुषे भर । अरङ्गमाय जग्मयेऽपश्चादध्वने नरः ॥ १ ॥
(ऋ. ६।४२।१)

३५३ आ नो वयो वयःशयं महान्तं गह्वरेष्ठां महान्तं पूर्विणेष्ठाम् । उग्रं वचो अपावधीः ॥ २ ॥

---

[३५०] (नु एत उ) लवकर ये. (शुद्धेन साम्ना) शुद्ध सामगानानें, (शुद्धैः उक्थैः) शुद्ध मंत्रांनीं (शुद्धं इन्द्रं स्तवाम) शुद्ध इन्द्राची स्तुति करूं या. (वावृध्वांसं) शक्तिनें वाढणाऱ्या इन्द्राला (शुद्धैः) उत्तम शुद्ध मंत्रांनीं तयार केलेला (आशीर्वान् ममत्तु) गोदुग्धादि मिश्रित सोम आनंद देवो. ॥ ९ ॥

[३५१] हे इन्द्रा ! (यः रयिंतमः) जो अत्यंत शोभायुक्त आहे, व (यः द्युम्नैः द्युम्नवत्तमः) जो तेजांनीं अत्यंत तेजस्वी आहे (सः सोमः) तो सोम (वः) तुझ्या उपासकांना (रयिं) धन देतो. हे (स्वधापते) आपल्या धारणशक्तिनें युक्त इन्द्रा ! (सुतः ते मदः अस्ति) हा सोमरस तुला आनंददायक होवो. ॥ १० ॥

॥ येथें चोवीसावा खंड समाप्त झाला ॥

[२५] पंचविंशः खण्डः ।

[३५२] हे याजकहो ! (नरः) तुम्हीं यज्ञाचें नेतृत्व करणारे याजक लोक (अस्मै पिपीषते) या सोम पिण्याची इच्छा करणाऱ्या (विश्वानि विदुषे) सर्व जाणणाऱ्या (अरं गमाय) योग्यवेळीं योग्य ठिकाणीं पोंचणाऱ्या (जग्मये) यज्ञांत जाणाऱ्या (अ-पश्चात्-अध्वने) सर्वांच्या पूर्वी पोंचणाऱ्या (प्रति भर) इन्द्राला भरपूर सोम द्या. ॥ १ ॥

[३५३] (महान्तं गह्वरेष्ठां वयः शयं) महान् पर्वतांवर असणाऱ्या सर्वत्र मिळणाऱ्या (वयः) सोमरूपी अन्नाला (नः) आमच्यासाठीं (आ भर) भरपूर आण. (महान्तं पूर्विणेष्ठां) मोठ्या प्रचलित असणाऱ्या (उग्रं वचः अपावधीः) उग्र भाषणाला दूर कर. वाईट भाषण आमच्याकडे न येईल असें कर. ॥ २ ॥

३५४ आ त्वा रथं यथोतये सुम्नाय वर्तयामसि ।
तुविकूर्मिमृतीषहमिन्द्र२ँशविष्ठ सत्पतिम् ॥ ३ ॥ (ऋ. ८।६८।१)

३५५ स पूर्व्यो महोनां वेनः क्रतुभिरानजे ।
यस्य द्वारा मनुः पिता देवेषु धिय आनजे ॥ ४ ॥ (ऋ. ८।६३।१)

३५६ यदी वहन्त्याशवो भ्राजमाना रथेष्वा ।
पिबन्तो मदिरं मधु तत्र श्रवा२ँसि कृण्वते ॥ ५ ॥

३५७ त्यमु वो अप्रहणं गृणीषे शवसस्पतिम् ।
इन्द्रं विश्वासाहं नर२ँ शचिष्ठं विश्ववेदसम् ॥ ६ ॥ (ऋ. ६।४४।४)

३५८ दधिक्राव्णो अकारिषं जिष्णोरश्वस्य वाजिनः ।
सुरभि नो मुखा करत्प्र ण आयू२ँषि तारिषत् ॥ ७ ॥ (ऋ. ४।३९।६)

---

[३५४] हे (शविष्ठ) बलवान् इन्द्रा ! (ऊतये सुम्नाय) संरक्षण व सुख मिळावें या साठीं (रथं यथा) जसा रथाला फिरवितात त्याप्रमाणें (तुवि-कूर्मिं) अति पराक्रमी (ऋती-षहं) शत्रूंचा पराभव करणाऱ्या (सत्पतिं त्वा इन्द्रं) सज्जनांचें पालन करणाऱ्या तुज इन्द्राला (वर्तयामसि) आम्ही आणतों. ॥ ३ ॥

१ तुवि-कूर्मिं ऋती-षहं सत्पतिं त्वा इन्द्रं वर्तयामसि— अत्यंत पराक्रमी शत्रूंचा पराभव करणाऱ्या, सज्जनांचें पालन करणाऱ्या इन्द्राला आम्ही जवळ आणतों.

[३५५] (सः पूर्व्यः) तो इन्द्र मुख्य आहे, (महोनां क्रतुभिः) मोठ्या यजमानांच्या यज्ञांच्या योगानें (वेनः आनजे) हविष्यान्नाची इच्छा करून तो इन्द्र यज्ञामध्यें येत असतो (यस्य द्वारा) ज्याच्या योगानें (धियः) कर्में करून (देवेषु पिता मनुः आनजे) देवांमध्यें सर्वांचें पालन करणारा मननशील असा तो प्रकट होतो. ॥ ४ ॥

[३५६] (यदि) जेथें ज्या यज्ञामध्यें (भ्राजमानाः आशवः) तेजस्वी व लवकर जाणारे मरुत् (आवहन्ति) तुला पोंचवतात, (तत्र) त्या यज्ञामध्यें ते (मदिरं मधु पिबन्तः) आनन्द वाढवणाऱ्या मधुर सोम रसाला पितात व (श्रवांसि कृण्वते) अन्नें उत्पन्न करतात. पाऊस पाडून अन्नें उत्पन्न करतात. ॥ ५ ॥

[३५७] (वः) तुमच्या हितासाठीं (त्यं उ अप्रहणं) त्या उपकार करणाऱ्या–हनन न करणाऱ्या, (श्रवसः पतिं) बलाचा स्वामी, अन्नाचा स्वामी, (विश्वा-साहं) सर्व शत्रूंचा पराभव करणाऱ्या (नरं शोचिष्ठं) नेता व शक्तिमान् अशा (विश्ववेदसं) सर्वज्ञ इन्द्राची (गृणीषे) मी स्तुति करतों. ॥ ६ ॥

[३५८] (जिष्णोः) विजयी (अश्वस्य वाजिनः) अश्वरूपी वेगवान् (दधिक्राव्णः) दधिक्राव्याची स्तुति (अकारिषं) मी केली. हा (नः मुखा सुरभि करत्) आमच्या मुखादि अवयवांना शक्तिसंपन्न करतो, (नः आयूंषि प्रतारिषत्) व आमचीं आयुष्यें वाढवतो. ॥ ७ ॥

३५९ पुरां भिन्दुर्युवा कविरमितौजा अजायत ।
इन्द्रो विश्वस्य कर्मणो धर्ता वज्री पुरुष्टुतः ॥ ८ ॥ (ऋ. १।११।४)

इति सप्तमी दशतिः ॥ ७ ॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥ [स्व० ५ । उ० २ । धा० ४५ । (पु) ॥]

[८]

(१–१०) १, ३, ५ प्रियमेध आंगिरसः; २, १० वामदेवो गौतमः; ४ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ६ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ७ अत्रिर्भौमः; ८ प्रस्कण्वः काण्वः; ९ त्रित आप्त्यः (ऋ० आंगिरसो वा) ॥ इन्द्रः; (६ ऋ० अग्निः) ८ उषाः; ९ विश्वेदेवाः ॥ अनुष्टुप् ॥

३६० प्रप्र वस्त्रिष्टुभमिषं वन्दद्वीरायेन्दवे ।
धिया वो मेधसातये पुरन्ध्या विवासति ॥ १ ॥ (ऋ. ८।६९।१)

३६१ कश्यपस्य स्वर्विदो यावाहुः सयुजाविति ।
ययोर्विश्वमपि व्रतं यज्ञं धीरा निचाय्य ॥ २ ॥

३६२ अर्चत प्रार्चत नरः प्रियमेधासो अर्चत ।
अर्चन्तु पुत्रका उत पुरमिद् धृष्ण्वर्चत ॥ ३ ॥ (ऋ. ८।६९।८)

३६३ उक्थमिन्द्राय शंस्यं वर्धनं पुरुनिःषिधे ।
शक्रो यथा सुतेषु नो रारणत्सख्येषु च ॥ ४ ॥ (ऋ. १।१०।५)

---

[३५९] (पुरां भिन्दुः) शत्रूंच्या नगरांना तोडणारा (युवा कविः) तरुण ज्ञानी (अ-मित-ओजाः) अपरिमित बलवान् (विश्वस्य कर्मणः धर्ता) सर्व शुभ कर्मांचें धारण करणारा (पुरु-स्तुतः इन्द्रः अजायत) अनेक ज्याची स्तुति करतात असा इन्द्र आहे. ॥ ८ ॥

॥ येथें पंचवीसावा खंड समाप्त झाला ॥

[२६] षड्विंशः खण्डः ।

[३६०] हे याजकांनों ! (वः) तुम्ही (त्रिष्टुभं इषं) तीन स्तोत्रांनीं तयार केलेलें अन्न (वन्दद् वीराय इन्दवे) प्रशंसनीय वीर इन्द्राजवळ (प्र प्र) पोंचवा. तो इन्द्र (वः) तुम्हांला (मेधसातये) यज्ञाच्या अनुष्ठानासाठीं (पुरंध्या धिया) विशेष बुद्धिनें केलेल्या कर्मानें (आ विवासति) इष्ट फल देऊन तुमचा सत्कार करील. ॥ १ ॥

[३६१] (कश्यपस्य) सर्वद्रष्टच्या इन्द्राचे (यौ) जे दोन घोडे आहेत, (ययोः) ज्यांचें (विश्वं अपि व्रतं) सर्व कार्य (यज्ञं इति) यज्ञ हेंच आहे, असा (निचाय्य) निश्चय करून (सयुजौ) दोनही घोडे जोडले जातात. असें (स्वर्विदः धीराः आहुः) ज्ञानी बुद्धिमान् म्हणतात. ॥ २ ॥

[३६२] हे (नरः) लोक हो ! तुम्ही (अर्चत) इन्द्राचा सत्कार करा. (प्र-अर्चत) विशेष सत्कार करा. हे (प्रिय-मेधासः) यज्ञावर प्रेम करणाऱ्यांनों ! (अर्चत) सत्कार करा. हे (पुत्रकाः) मुलांनों ! (पुरं इत् धृष्णुं) भक्तांच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या, शत्रूचा पराभव करणाऱ्या इन्द्राचा (अर्चन्तु, अर्चत) लोक सत्कार करोत, व तुम्हीं सत्कार करा. ॥ ३ ॥

[३६३] (पुरु-निः षिधे इन्द्राय) पुष्कळ शत्रूंचा नाश करणाऱ्या इन्द्रासाठीं (वर्धनं उक्थं) त्याचा महिमा वाढवणारें स्तोत्र (शंस्यं) म्हणावें तो (शक्रः) सामर्थ्यवान् इन्द्र (नः) आमच्या (सुतेषु च सख्येषु) पुत्रांमध्यें व मित्रांमध्यें (यथा रारणत्) ज्या रीतिनें उत्तम बोलेल, असें त्याचें स्तोत्र म्हणा. ॥ ४ ॥

३६४ विश्वानरस्य वस्पतिमनानतस्य शवसः ।
एवैश्च चर्षणीनामूती हुवे रथानाम् ॥ ५ ॥ (ऋ. ८।६८।४)

३६५ स घा यस्ते दिवो नरो धिया मर्तस्य शमतः ।
ऊती स बृहतो दिवो द्विषो अंहो न तरति ॥ ६ ॥ (ऋ. ६।२।४)

३६६ विभोष्ट इन्द्र राधसो विभ्वी रातिः शतक्रतो ।
अथा नो विश्वचर्षणे द्युम्नंसुदत्र मंहय ॥ ७ ॥ (ऋ. ९।३८।१)

३६७ वयश्चित्ते पतत्रिणो द्विपाच्चतुष्पादर्जुनि ।
उषः प्रारन्नृतूंरनु दिवो अन्तेभ्यस्परि ॥ ८ ॥ (ऋ. १।४९।३)

३६८ अमी ये देवा स्थन मध्य आ रोचने दिवः ।
कद्व ऋतं कदमृतं का प्रत्ना व आहुतिः ॥ ९ ॥ (ऋ. १।१०५।५)

---

[३६४] (विश्वानरस्य) सर्व शत्रूंच्या सैन्यांवर आक्रमण करणाऱ्या अथवा विश्वाचा जो नेता आहे त्या, (अनानतस्य) शत्रूंपुढें कधींहि जो नमत नाहीं, (शवसः पतिं) सामर्थ्याचा स्वामी आहे त्या इन्द्राला, हे मरुतांनों ! (वः) तुमच्या (चर्षणीनां एवैः) सैनिकांच्या आक्रमणासाठीं होणाऱ्या हल्ल्याच्या वेळीं (रथानां ऊती हुवे) रथांच्या संरक्षणासाठीं आम्ही बोलावतों. ॥ ५ ॥

[३६५] (यः शमतः मर्तस्य) शान्त मनुष्याच्या (दिवः ते धिया) तेजस्वी दिसणाऱ्या त्या स्तुति केल्यानें (नरः सखा) मनुष्य मित्र होत असतो. (सः) तो मनुष्य (बृहतः दिवः ऊती) जो मोठ्या दिव्य रक्षणांनीं युक्त झाल्यानंतर (अंहः न) पापांपासून सुरक्षित राहण्याप्रमाणें (द्विषः तरति) शत्रूंपासून सुरक्षित होतो. ॥ ६ ॥

१ सः बृहतः दिवः ऊती, अंहः न, द्विषः तरति — जो मनुष्य या विशाल दिव्य रक्षण सामर्थ्यानें युक्त होतो, तो जसा पापांपासून आपला बचाव करतो, त्याचप्रमाणें शत्रूंपासूनही सुरक्षित होतो.

[३६६] (शतक्रतो इन्द्र) हे शेंकडों पराक्रम करणाऱ्या इन्द्रा ! (विभोः राधसः) पुष्कळ धनाचें (ते रातिः विभ्वी) तुझें दान मोठें आहे. (अथ) यानंतर (विश्व-चर्षणे सु-दत्र) सर्व द्रष्ट्या व उत्तम दान देणाऱ्या इन्द्रा ! (नः द्युम्नं मंहय) आम्हांला धन देऊन मोठें कर. ॥ ७ ॥

[३६७] हे (अर्जुनि उषः) शुभ्र वर्णाच्या उषे ! (ते ऋतून् अनु) तुझ्या आगमनानंतर (द्विपाद् चतुष्पाद्) मनुष्य व पशु (पतत्रिणः वयः चित्) पंख असलेले पक्षीही (दिवः अन्तेभ्यः) आकाशाच्या अन्तापर्यंत (परिप्रारन्) वर यथेच्छ फिरूं लागतात. ॥ ८ ॥

[३६८] हे (देवाः) देव हो ! (ये अमी) जे हे (दिवः आरोचने) दिवसाचा प्रकाश झाल्यावर (मध्ये स्थन) तुम्ही त्या आकाशामध्यें असतां, (वः ऋतं कद्) तुम्हांला तेथें यज्ञ प्राप्त होतो काय ? (अमृतं कद्) यज्ञ नाहीं असें कांहीं प्राप्त होतें काय ? (वः प्रत्ना आहुतिः का) तेथें तुम्हांला पूर्वीप्रमाणें कोणती आहुति मिळते बरें ? ॥ ९ ॥

३६९ ऋचं साम यजामहे याभ्यां कर्माणि कृण्वते ।
वि ते सदसि राजतो यज्ञं देवेषु वक्षतः ॥ १० ॥

इति अष्टमी दशतिः ॥ ८ ॥ द्वितीयः खण्डः ॥ २ ॥ इत्यनुष्टुभः ॥ [स्व० ७ । उ० ३ । धा० ५४ । जी ॥]

[९]

(१–११) १ रेभः काश्यपः; २ सुवेदाः शैलूषिः; ३ वामदेवो गौतमः; ४, ७, ८ सव्य आङ्गिरसः; ५ विश्वामित्रो गाथिनः; ६ कृष्ण आङ्गिरसः; ९ भरद्वाजो बार्हस्पत्यः; १० मेधातिथिः काण्वः (ऋ० मान्धाता यौवनाश्वः), ११ कुत्स आङ्गिरसः ॥ इन्द्रः; ९ द्यावापृथिवी ॥ जगती; १ अति जगती; १० महापङ्क्तिः ॥

३७० विश्वाः पृतना अभिभूतरं नरः सजूस्ततक्षुरिन्द्रं जजनुश्च राजसे ।
क्रत्वे वरे स्थेमन्यामुरीमुतोग्रमोजिष्ठं तरसं तरस्विनम् ॥ १ ॥ (ऋ ८।९७।१०)

३७१ श्रत्ते दधामि प्रथमाय मन्यवेऽहन्यद्दस्युं नर्यं विवेरपः ।
उभे यत्वा रोदसी धावतामनु भ्यसाते शुष्मात्पृथिवी चिदद्रिवः ॥ २ ॥ (ऋ. १०।१४७।१)

३७२ समेत विश्वा ओजसा पतिं दिवो य एक इद्भूरतिथिर्जनानाम् ।
स पूर्व्यो नूतनमाजिगीषं तं वर्तनीरनु वावृत एक इत् ॥ ३ ॥

---

[३६९] (याभ्यां कर्माणि कृण्वते) ज्यांच्या योगानें यज्ञादिक कर्में केलीं जातात (ऋचं साम यजामहे) त्या ऋचा व सामें म्हणून आम्ही यज्ञ करीत आहों. (ते) ते ऋग्मंत्र व साममंत्र (सदसि विराजतः) यज्ञमंडपांत विराजत असतात व तेच (देवेषु यज्ञं वक्षतः) देवांना यज्ञ पोंचवतात. ॥ १० ॥

॥ येथें सव्वीसावा खंड समाप्त झाला ॥

[२७] सप्तविंशः खण्डः ।

[३७०] (विश्वाः पृतनाः नरः) सर्व शत्रुसैन्याचे नेते वीर सैन्यासह (सजूः) एकत्रित झाल्यानंतर ते (अभि-भू-तरं इन्द्रं ततक्षुः) शत्रूचा अत्यंत पराभव करणाऱ्या इन्द्राला शस्त्रास्त्रसंपन्न करतात, (च राजसे जजनुः) आणि अधिक प्रकाशित करतात. (उत) आणि (क्रत्वे वरे स्थेमनि) यज्ञांतील श्रेष्ठ स्थानामध्यें ऋत्विज बसून (आमुरीं) शत्रूला मारणाऱ्या (उग्रं ओजिष्ठं तरसं तरस्विनं) उग्रवीर सामर्थ्यवान् प्रतापी आणि त्वरेनें कार्य करणाऱ्या इन्द्राची प्रार्थना करतात. ॥ १ ॥

[३७१] हे (अद्रि-वः) वज्रधारी इन्द्रा ! (ते प्रथमाय मन्यवे) तुझ्या मुख्य क्रोधावर मी (श्रत् दधामि) श्रद्धा ठेवतों. (यत् दस्युं अहन्) कारण तो क्रोध दुष्टांचा वध करतो व (नर्यं अपः विवेः) मानवांचें हित करणारें पाणी प्रवाहित करतो. (उभे रोदसी) दोनही द्यु व पृथिवी (यत् त्वा अनु धावतां) तेव्हां तुझ्या अनुकूल होऊन गति करतात व (पृथिवी चित्) पृथिवी तर (ते शुष्मात् भ्यसाते) तुझ्या बलामुळें कांपूं लागते. ॥ २ ॥

[३७२] हे (विश्वाः) सर्व प्रजाजन हो ! (ओजसा दिवः पतिं) आपल्या शक्तिनें द्युलोकाचा स्वामी इन्द्र आहे, त्याला (समेत) सर्व मिळून एकत्रित होऊन भजा. (यः एक इत्) जो एकटाच (जनानां अतिथिः भूः) लोकांना अतिथिप्रमाणें पूज्य झाला आहे. (पूर्व्यः सः) तो पुराण पुरुष इन्द्र (आजिगीषं तं नूतनं) आपल्या शत्रूला जिंकूं इच्छिणाऱ्या नवीन वीरांला (एकः इत्) एकटाच (वर्तनीः अनुवावृते) विजयाच्या मार्गानें पुढें नेतो. ॥ ३ ॥

३७३ इमे त इन्द्र ते वयं पुरुष्टुत ये त्वारभ्य चरामसि प्रभूवसो ।
न हि त्वदन्यो गिर्वणो गिरः सघत्क्षोणीरिव प्रति तद्धर्य नो वचः ॥ ४ ॥ (ऋ. १।५७।४)

३७४ चर्षणीधृतं मघवानमुक्थ्या३मिन्द्रं गिरो बृहतीरभ्यनूषत ।
वावृधानं पुरुहूतꣳ सुवृक्तिभिरमर्त्यं जरमाणं दिवेदिवे ॥ ५ ॥ (ऋ. ३।५१।१)

३७५ अच्छा व इन्द्रं मतयः स्वर्युवः सध्रीचीर्विश्वा उशतीरनूषत ।
परि ष्वजन्त जनयो यथा पतिं मर्यं न शुन्ध्युं मघवानमूतये ॥ ६ ॥ (ऋ. १०।४३।१)

३७६ अभि त्यं मेषं पुरुहूतमृग्मियमिन्द्रं गीर्भिर्मदता वस्वो अर्णवम् ।
यस्य द्यावो न विचरन्ति मानुषं भुजे मꣳहिष्ठमभि विप्रमर्चत ॥ ७ ॥ (ऋ. १।५१।१)

३७७ त्यꣳसु मेषं महया स्वर्विदꣳशतं यस्य सुभुवः साकमीरते ।
अत्यं न वाजꣳ हवनस्यदꣳ रथमिन्द्रं ववृत्यामवसे सुवृक्तिभिः ॥ ८ ॥ (ऋ. १।५२।१)

---

[३७३] (प्रभूवसो पुरुष्टुत इन्द्र) हे पुष्कळ धनवान् व पुष्कळ ज्याची प्रशंसा गातात अशा इन्द्रा ! (ये) जे आम्ही (त्वा आरभ्य चरामसि) तुझा आश्रय करूनच कार्यामध्ये प्रवृत्त होत आहोंत, (ते इमे वयं ते) ते हे आम्ही तुझेच आहों. हे (गिर्वणः) स्तुत्य इन्द्रा ! (त्वद्-अन्यः) तुझ्याहून दुसरा कोणीही (गिरः न हि सघत्) स्तुतिला पात्र होत नाहीं. (तत्) म्हणून (नः वचः) आमच्या स्तुतीचा, (क्षोणीः इव) पृथिवी जशी सर्वांचा स्वीकार करते, त्याप्रमाणें (प्रति हर्य) स्वीकार कर. ॥ ४ ॥

[३७४] (बृहती गिरः) आमच्या पुष्कळ स्तुति (चर्षणी-धृतं) सर्व मानवांचें धारणपोषण करणाऱ्या, (मघवानं उक्थ्यं) धनवान् व प्रशंसनीय, (वावृधानं पुरुहूतं) सर्व भक्तांना वाढविणाऱ्या व पुष्कळांनीं प्रशंसित (अमर्त्यं) अमर व (सुवृक्तिभिः दिवे दिवे) उत्तम स्तोत्रांनीं प्रतिदिवशीं (जरमाणं) स्तविलेल्या (इन्द्रं) इन्द्राची (अभि अनूषत) प्रशंसा करोत. ॥ ५ ॥

[३७५] (यथा जनयः मर्यं पतिं न) जशा स्त्रिया मानवी पतिला (परिष्वजन्त) आलिंगन देतात, त्याप्रमाणें (ऊतये) आपल्या संरक्षणसाठीं (शुन्ध्युं मघवानं इन्द्रं) शुद्ध धनवान् इन्द्राची (स्वर्-युवः) आत्मशक्ति वाढवणाऱ्या (सध्रीचीः) एकत्रित झालेल्या (विश्वाः उशतीः मतयः) सर्व उन्नतिची इच्छा करणाऱ्या आमच्या स्तुति (अच्छा अनूषत) प्रशंसा करतात. ॥ ६ ॥

[३७६] (त्यं मेषं) त्या शत्रूंचा पराभव करणाऱ्या (पुरु-हूतं ऋग्मियं) पुष्कळांनी स्तविलेल्या, वेदमंत्रांनीं ज्याची स्तुति केली जाते अशा, (वस्वः अर्णवं) धनाचा समुद्र अशा (इन्द्रं) इन्द्राला (गीर्भिः अभि मदत) स्तुतिनीं आनंदित करा. (यस्य मानुषं) ज्याचें मानवाचें हित करणारें कार्य (द्यावः न) द्युलोकाप्रमाणें (विचरन्ति) चारही बाजूंना प्रभावी होत आहे. यासाठीं (भुजे) भोग मिळावे म्हणून (मंहिष्ठं विप्रं) मोठ्या ज्ञानी इन्द्राला (अभि अर्चत) सुपूजित करा. ॥ ७ ॥

[३७७] (यस्य सुभुवः) ज्याचीं उत्तम स्थानें (शतं साकं ईरते) शेंकडों एका वेळींच उन्नति करतात, (त्यं मेषं स्वर्विदं रथं) त्या शत्रूंशीं स्पर्धा करणाऱ्या, धन देणाऱ्या रथाप्रमाणें अभीष्ट स्थानीं पोंचवणाऱ्या (अत्यं वाजं न) वेगानें धावणाऱ्या घोड्याप्रमाणें (हवन-स्यदं) यज्ञाच्या ठिकाणीं जाणाऱ्या (इन्द्रं) इन्द्राचें (अवसे) आपल्या संरक्षणासाठीं (सु-वृक्तिभिः महय) उत्तम स्तोत्रांनीं महत्त्व प्रकट करा. (शतं आववृत्यां) स्तुति शेंकडो वेळां म्हणा. ॥ ८ ॥

*

३७८ घृतवती भुवनानामभिश्रियोर्वी पृथ्वी मधुदुघे सुपेशसा ।
द्यावापृथिवी वरुणस्य धर्मणा विष्कभिते अजरे भूरिरेतसा ॥ ९ ॥ (ऋ. ६।७०।१)

३७९ उभे यदिन्द्र रोदसी आपप्राथोषा इव ।
महान्तं त्वा महीना॰ सम्राजं चर्षणीनाम् ।
देवी जनित्र्यजीजनद्भद्रा जनित्र्यजीजनत् ॥ १० ॥ (ऋ. १०।१३४।१)

३८० प्र मन्दिने पितुमदर्चता वचो यः कृष्णगर्भा निरहन्नृजिश्वना ।
अवस्यवो वृषणं वज्रदक्षिणं मरुत्वन्त॰ सख्याय हुवेमहि ॥ ११ ॥ (ऋ १।१०१।१)

इति नवमी दशतिः ॥ ९ ॥ तृतीयः खण्डः ॥ ३ ॥ | स्व० १४ । उ० ७ । धा० ९३ । थि ॥ |

॥ इति जगत्यः ॥

[१०]

(१-१०) १ नारदः काण्वः; २,३ गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ; ४ पर्वतः काण्वः; ५-७, १० विश्वमना वैयश्वः; ८ नृमेध आङ्गिरसः; ९ गोतमो राहूगणः ॥ इन्द्रः ॥ उष्णिक् ॥

३८१ इन्द्र सुतेषु सोमेषु क्रतुं पुनीष उक्थ्यम् ।
विदे वृधस्य दक्षस्य महा॰हि षः ॥ १ ॥ (ऋ. ८।१३।१)

---

[३७८] (द्यावापृथिवी) द्युलोक व पृथिवी ह्या (घृतवती) जल असलेल्या (भुवनानां अभिश्रिया) प्राणिमात्रांना आश्रय देणाऱ्या (उर्वी पृथ्वी) मोठ्या विस्तीर्ण (मधु दुघे) मधुर जल देणाऱ्या (सु-पेशसा) उत्तम रूपानें युक्त (वरुणस्य धर्मणा विष्कभिते) ईश्वराच्या धारकशक्तिनें राहणाऱ्या (अजरे भूरि रेतसा) जरारहित-नित्य - व पुष्कळ वीर्यसंपन्न अशा आहेत. ॥ ९ ॥

[३७९] हे इन्द्रा ! (उभे रोदसी) द्यु व पृथिवी या दोघींना (यत्) जो तूं (उषा इव) उषेप्रमाणें आपल्या तेजानें (आ पप्राथ) भरून टाकतोस, अशा (महीनां महान्तं) मोठ्यांत अति मोठ्या, (चर्षणीनां सम्राजं) मानवांतील सम्राट् अशा (त्वा इन्द्रं) तुज इन्द्राला (देवी जनित्री) देवमाता अदिति देवी (अजीजनत्) उत्पन्न करती झाली. (भद्रा जनित्री अजीजनत्) कल्याण करणारी देवी उत्पन्न करती झाली. ॥ १० ॥

[३८०] हे ऋत्विजांनो ! (मन्दिने) प्रशंसनीय इन्द्राची (पितुमत् वचः प्र अर्चत) हविष्यान्न जिच्याबरोबर दिलें जात आहे अशी स्तुति करा. (यः) ज्या इन्द्रानें (ऋजिश्वना) ऋजिश्व्याला बरोबर घेऊन (कृष्ण-गर्भाः) कृष्ण नामक असुराच्या गर्भवती स्त्रियांना कृष्णासह (निरहन्) ठार मारलें. त्या (वज्र-दक्षिणं) उजव्या हातांत वज्र धारण करणाऱ्या (मरुत्वन्तं) मरुतांच्या सेनेसह असणाऱ्या (वृषणं) बलवान् इन्द्राला (अवस्यवः) आपल्या संरक्षणाची इच्छा करणारे आम्ही (सख्याय हुवेम) मैत्रीसाठीं बोलावीत आहों. ॥ ११ ॥

॥ येथें सत्तावीसावा खंड समाप्त झाला ॥

[२८] अष्टाविंशः खण्डः

[३८१] हे इन्द्रा ! (सोमेषु सुतेषु) सोमाचा रस काढल्यानंतर (वृधस्य दक्षस्य विदे) वाढणाऱ्या बलाच्या लाभासाठीं (क्रतुं उक्थ्यं पुनीषे) यज्ञ व सामगायन ऐकून तें तूं पवित्र करतोस कारण कीं, हे इन्द्रा ! (सः महान् हि) तो तूं मोठा आहेस. ॥ १ ॥

३८२ तमु अभि प्र गायत पुरुहूतं पुरुष्टुतम् ।
इन्द्रं गीर्भिस्तविषमा विवासत ॥ २ ॥ (ऋ. ८।१५।१)

३८३ तं ते मदं गृणीमसि वृषणं पृक्षु सासहिम् ।
उ लोककृत्नुमद्रिवो हरिश्रियम् ॥ ३ ॥ (ऋ. ८।१५।४)

३८४ यत्सोममिन्द्र विष्णवि यद्वा घ त्रित आप्त्ये ।
यद्वा मरुत्सु मन्दसे समिन्दुभिः ॥ ४ ॥ (ऋ. ८।१२।१६)

३८५ एदु मधोर्मदिन्तरं सिञ्चाध्वर्यो अन्धसः ।
एवा हि वीरस्तवते सदावृधः ॥ ५ ॥ (ऋ. ८।२४।१६)

३८६ एन्दुमिन्द्राय सिञ्चत पिबाति सोम्यं मधु ।
प्र राधांसि चोदयते महित्वना ॥ ६ ॥ (ऋ. ८।२४।१३)

३८७ एतो न्विन्द्रं स्तवाम सखायः स्तोम्यं नरम् ।
कृष्टीर्यो विश्वा अभ्यस्त्येक इत् ॥ ७ ॥ (ऋ. ८।२४।१९)

---

[३८२] हे स्तुति करणाऱ्यांनों ! (पुरु-हूतं) अनेक ज्याला बोलावतात (पुरु-स्तुतं) व अनेक ज्याची स्तुति करतात (तं उ अभि प्रगायत) त्या इन्द्राचीच वारंवार स्तुति करा. (तविषं इन्द्रं) मोठ्या या इन्द्राची (गीर्भिः आ विवासत) मंत्रांनीं आराधना करा. ॥ २ ॥

[३८३] हे (अद्रि-वः) वज्रधारी इन्द्रा ! (ते) तुझ्या (तं) त्या (वृषणं) बलवान् (पृक्षु सासहिं) संग्रामामध्यें शत्रूंचा पराभव करणाऱ्या (लोक-कृत्नुं) लोकांच्या हिताचीं कामें करणाऱ्या (हरि-श्रियं उ) घोडे ज्याच्या जवळ शोभा देत आहेत (मदं) अशा सोमपानानें झालेल्या या हर्षाची (गृणीमसि) प्रशंसा करतों. ॥ ३ ॥

[३८४] हे इन्द्रा ! (विष्णवि) विष्णु आल्यानंतर होणाऱ्या यज्ञामध्यें (यत् सोमं) जो सोमरस तूं प्यालास, (यद् वा) अथवा (आप्त्ये त्रिते) आप्त्य त्रिताच्या यज्ञांत (यद्वा मरुत्सु) किंवा मरुतां बरोबर, अथवा (मन्दसे) अन्य यज्ञांत सोम पिऊन आनन्दित झाला असशील, तथापि तूं (इन्दुभिः सं) आमच्या सोमरसांना पिऊन प्रसन्न हो. ॥ ४ ॥

[३८५] हे (अध्वर्यो) ऋत्विज हो ! (मधोः अन्धसः) मधुर सोमरसाच्या या (मदिं-तरं इत्) आनंद देणाऱ्या रसालाच (आ सिंच) इन्द्राला अर्पण करा. कारण तो (वीरः सदा-वृधः) पराक्रमी व वाढणारा इन्द्र (एव हि स्तवते) च स्तोत्रपाठकांकडून प्रशंसित होत आहे. ॥ ५ ॥

[३८६] हे ऋत्विज हो ! (इन्द्राय इन्दुं सिंचत) इन्द्राला सोमरस द्या. त्यानंतर (सोम्यं मधु पिबाति) मधुर सोमरस तो पितो व तो आपल्या (महित्वना) मोठेपणास योग्य असें (राधांसि प्र चोदयते) धन देतो. ॥ ६ ॥

[३८७] हे (सखायः) मित्र हो ! (नु एत) लवकर या. (तं स्तोम्यं नरं स्तवाम) त्या प्रशंसनीय नेत्या इन्द्राची स्तुति करूं या. (यः एकः इत्) तो एकटाच (विश्वाः कृष्टीः अभि अस्ति) सर्व शत्रुसैन्याचा पराभव करतो. ॥ ७ ॥

---

३८८ इन्द्राय साम गायत विप्राय बृहते बृहत् ।
ब्रह्मकृते विपश्चिते पनस्यवे ॥ ८ ॥ (ऋ. ८।९८।१)

३८९ य एक इद्विदयते वसु मर्ताय दाशुषे ।
ईशानो अप्रतिष्कुत इन्द्रो अङ्ग ॥ ९ ॥ (ऋ. १।८४।७)

३९० सखाय आ शिषामहे ब्रह्मेन्द्राय वज्रिणे ।
स्तुष ऊ षु वो नृतमाय धृष्णवे ॥ १० ॥ (ऋ ८।२४।१)

इति दशमी दशतिः ॥ १० ॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥ [स्व० १० । उ० ४ । धा० ६२ । ला ॥]

इति चतुर्थप्रपाठके द्वितीयोऽर्धः, चतुर्थः प्रपाठकश्च समाप्तः ॥

अथ पञ्चमः प्रपाठकः ।

[१]

(१–८) १ प्रगाथो घौरः काण्वः; २ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ३ नृमेध आङ्गिरसः; ४ पर्वतः काण्वः; ५, ७ इरिम्बिठिः काण्वः; ६ विश्वमना वैयश्वः; ८ वसिष्ठो मैत्रावरुणिः ॥ इन्द्रः; ५, ७ आदित्याः ॥ उष्णिक्; ८ विराडुष्णिक् ॥

३९१ गृणे तदिन्द्र ते शव उपमां देवतातये ।
यद्धꣳसि वृत्रमोजसा शचीपते ॥ १ ॥ (ऋ. ८।६२।८)

३९२ यस्य त्यच्छम्बरं मदे दिवोदासाय रन्धयन् ।
अयꣳस सोम इन्द्र ते सुतः पिब ॥ २ ॥ (ऋ. ६।४३।१)

---

[३८८] हे उद्गाते हो ! (विप्राय) ज्ञानी (बृहते ब्रह्मकृते) मोठ्या स्तुति ज्याच्यासाठीं केल्या जात असतात (विपश्चिते) अशा विद्वान् व (पनस्यते) स्तुतिला योग्य अशा (इन्द्राय) इन्द्रासाठीं (बृहत् साम गायत) बृहत् नांवाचें सोमगान करा. ॥ ८ ॥

[३८९] (यः एकः इत्) जो एकटाच (दाशुषे मर्ताय) दात्या मनुष्याला (वसु विदयते) धन देत असतो. (अ–प्रतिष्कुतः इन्द्रः) ज्याचा प्रतिकार कोणीहि करूं शकत नाहींत, असा हा इन्द्र (अङ्ग ईशानः) हे प्रिया ! सर्वांचा ईश्वर आहे. ॥ ९ ॥

[३९०] हे (सखायः) मित्र हो ! (वज्रिणे) वज्रधारी इन्द्रासाठीं (ब्रह्म आशिषामहे) स्तोत्रानें प्रार्थना करून त्याचा आशीर्वाद आम्ही मागतों. (वः) तुम्हां सर्वांसाठीं (नृतमाय धृष्णवे सुस्तुषे) श्रेष्ठ वीर व शत्रूंचा पराभव करणाऱ्या इन्द्राची मी स्तुति करतों. ॥ १० ॥

॥ येथें अठ्ठावीसावा खंड समाप्त झाला ॥

[२९] एकोनत्रिंशः खण्डः ।

[३९१] हे इन्द्रा ! (ते तत् शवः) त्या तुझ्या सामर्थ्याची (उपमां देवतातये गृणे) जवळून यज्ञामध्यें स्तुति करतों. हे (शचीपते) इन्द्रा ! तूं (ओजसा वृत्रं हंसि) आपल्या सामर्थ्यानें वृत्राला मारतोस. ॥ १ ॥

[३९२] हे इन्द्रा ! (यस्य मदे) ज्या सोमरसपानानें उत्साह प्राप्त झाल्यानंतर (दिवोदासाय) दिवोदासासाठीं (त्यत् शम्बरं) त्या शंबरासुराला (अरन्धयन्) ठार मारलेंस, (सः अयं) तो हा (सोमः) सोमरस (ते सुतः पिब) तुझ्यासाठीं काढला आहे, तो तूं पी. ॥ २ ॥

३९३ एन्द्र नो गधि प्रिय सत्राजिदगोह्य ।
गिरिर्न विश्वतः पृथुः पतिर्दिवः ॥ ३ ॥ (ऋ. ८।९८।४)

३९४ य इन्द्र सोमपातमो मदः शविष्ठ चेतति ।
येना हंसि न्यात्रिणं तमीमहे ॥ ४ ॥ (ऋ. ८।१२।१)

३९५ तुचे तुनाय तत्सु नो द्राघीय आयुर्जीवसे ।
आदित्यासः सुमहसः कृणोतन ॥ ५ ॥ (ऋ. ८।१८।१८)

३९६ वेत्था हि निर्ऋतीनां वज्रहस्त परिवृजम् ।
अहरहः शुन्ध्युः परिपदामिव ॥ ६ ॥ (ऋ. ८।२४।२४)

३९७ अपामीवामप स्रिधमप सेधत दुर्मतिम् ।
आदित्यासो युयोतना नो अंहसः ॥ ७ ॥ (ऋ. ८।१८।१०)

३९८ पिबा सोममिन्द्र मन्दतु त्वा यं ते सुषाव हर्यश्वाद्रिः ।
सोतुर्बाहुभ्यां सुयतो नार्वा ॥ ८ ॥ (ऋ. ७।२२।१)

इति प्रथमा दशतिः ॥ १ ॥ पञ्चमः खण्डः ॥ ५॥ इत्युष्णिहः । [स्व० ५ । उ० २ । धा० ५१ । फ ॥]

---

[३९३] (प्रिय) हे सर्वांना प्रिय (सत्राजित्) एकदम शत्रूंना जिंकणाऱ्या (अ-गोह्य) ज्याचा कोणीहि पराभव करूं शकत नाहीं अशा इन्द्रा ! (गिरिः न) पर्वताप्रमाणें (विश्वतः पृथु) चारही बाजूंनी विशाल अशा (दिवः पतिः) द्युलोकाचा स्वामी तूं (नः आगहि) आमच्याजवळ ये. ॥ ३ ॥

[३९४] हे इन्द्रा (यः सोमपा-तमः) अधिक सोम पिणारा व (शविष्ठः) बलवान् असा तूं आहेस. त्या तुझा (यः मदः) उत्साह तुला (चेतति) चेतना देत असतो,(येन) ज्या उत्साहानें (अत्रिणं नि हंसि) खादाड राक्षसांना तूं मारतोस (तं ईमहे) त्या तुझी आम्ही प्रार्थना करीत आहों. ॥४ ॥

[३९५] हे (सुमहसः आदित्यासः) मोठ्या आदित्यांनों ! (नः तुचे) आमच्या पुत्रांना (तुनाय) पौत्रांना (जीवसे) दीर्घजीवन प्राप्त व्हावें यासाठीं (तत् द्राघीय आयुः) तें दीर्घ आयुष्य (सु कृणोतन) उत्तम प्रकारें प्राप्त होईल असें करा. ॥ ५ ॥

[३९६] हे (वज्र-हस्त) वज्रधारी इन्द्रा ! (निर्ऋतीनां परिवृजं) विघ्नें करणाऱ्याना दूर करणारे मार्ग तूं (वेत्था हि) जाणतोस. तसेंच (अहः अहः शुन्ध्युः) प्रतिदिवशीं आपली शुद्धता करणारा ज्याप्रमाणें (परि-पदां इव) आपत्तींना-रोगादिकांना-दूर करतो त्या प्रमाणें तूं विपत्तींना दूर करतोस. ॥ ६ ॥

[३९७] हे (आदित्यासः) आदित्य हो ! (अमीवां अप सेधत) रोगांना दूर करा. (स्रिधं अप) शत्रूंना दूर करा. (दुर्मतिं अप) दुष्ट बुद्धिला दूर करा. (नः अंहसः युयोतन) आम्हांला पापांपासून दूर ठेवा. ॥ ७ ॥

[३९८] हे इन्द्रा ! (सोमं पिब) सोमरस पी. तो सोमरस (त्वा मदन्तु) तुला आनंद देवो. हे (हरि-अश्व) घोडे बाळगणाऱ्या इन्द्रा ! (ते सोतुः) तुझ्यासाठीं सोमरस काढणाऱ्याचा (बाहुभ्यां अर्वा न सुयतः) घोड्याप्रमाणें दोरीनें नीट धरलेला (अयं अद्रिः) हा दगड तुझ्यासाठीं (सुषाव) सोमरस काढीत आहे. ॥ ८ ॥

॥ येथें एकोणतीसावा खण्ड समाप्त झाला ॥

[२]

(१-१०) सौभरिः काण्वः; ७, ८ नृमेध आंगिरसः ॥ इन्द्रः; ३, ६ मरुतः ॥ ककुप् ॥

३९९ अभ्रातृव्यो अना त्वमनापिरिन्द्र जनुषा सनादसि । युधेदापित्वमिच्छसे ॥ १ ॥
(ऋ. ८।२१।१३)

४०० यो न इदमिदं पुरा प्र वस्य आनिनाय तमु व स्तुषे । सखाय इन्द्रमूतये ॥ २ ॥
(ऋ. ८।२१।९)

४०१ आ गन्ता मा रिषण्यत प्रस्थावानो माप स्थात समन्यवः । दृढा चिद्यमयिष्णवः ॥ ३ ॥
(ऋ. ८।२०।१)

४०२ आ याह्ययमिन्दवेऽश्वपते गोपत उर्वरापते । सोमं सोमपते पिब ॥ ४ ॥ (ऋ. ८।२१।३)

४०३ त्वया ह स्विद्युजा वयं प्रति श्वसन्तं वृषभ ब्रुवीमहि । संस्थे जनस्य गोमतः ॥ ५ ॥
(ऋ. ८।२१।११)

४०४ गावश्चिद्धा समन्यवः सजात्येन मरुतः सबन्धवः । रिहते ककुभो मिथः ॥ ६ ॥
(ऋ. ८।२०।२१)

---

[३०] त्रिंशः खण्डः ।

[३९९] हे इन्द्रा ! (त्वं जनुषा अभ्रातृव्यः) तूं जन्मानेंच शत्रुरहित आहेस, (अ-ना) तुला नियंत्रण करणारा कोणीहि नाहीं. (सनात् अनापिः) नेहेमीं बांधवरहित आहेस. (युधा इत्) युद्धानें तूं (आपित्वं इच्छसे) बांधव मिळावा असें इच्छितोस, भक्त असावा असें इच्छितोस. ॥ १ ॥

१ अ-भ्रातृव्यः— भाऊबंदकीच्या भांडणांतून मुक्त.

२ अनापिः— एकटा, ज्याला सहाय्यासाठीं बंधु नाहीं.

[४००] हे (सखायः) मित्र हो ! (यः) ज्या इन्द्रानें (पुरा) पूर्वी (इदं वस्यः) हें धन (नः प्र आनिनाय) आम्हांला दिलें, (तं उ इन्द्रं) त्याच इन्द्राची (वः ऊतये स्तुषे) तुमच्या संरक्षणासाठीं स्तुति करतों. ॥ २ ॥

[४०१] हे (प्रस्थावानः) गतिमान् मरुतांनों ! (आगन्त) आमच्याजवळ या. (मा रिषण्यत) आम्हांला हानि पोंचवूं नका. (स-मन्यवः) हे उत्साही वीर हो ! (दृढा चित् यमयिष्णवः) बलवान् शत्रूंना सुद्धां ताब्यांत ठेवणाऱ्या मरुतांनों ! (मा अपस्थात) आमच्यापासून दूर राहूं नका. ॥ ३ ॥

[४०२] हे (अश्व-पते) घोड्यांच्या स्वामी, (गो-पते) गाईंच्या पालका व हे (उर्वरा-पते) भूपते इन्द्रा ! (इन्दवे) सोमरस पिण्यासाठीं (अयं) हा रस काढला आहे. (आयाहि) ये व हे (सोम-पते) सोमरस पिणाऱ्या इन्द्रा ! (सोमं पिब) सोमरस पी. ॥ ४ ॥

[४०३] हे (वृषभ) बलवान् इन्द्रा ! (गोमतः जनस्य संस्थे) गाई पालन करणाऱ्या लोकांच्या संस्थेमध्यें (श्वसन्तं) श्वास लागण्या इतकें क्रूर कर्म करणाऱ्या शत्रूला (त्वया युजा) तुझ्या मैत्रीच्या सहाय्यानें (ह स्वित्) च (प्रति ब्रुवीमहि) योग्य उत्तर देऊन त्यास हटवून दूर करूं. ॥ ५ ॥

[४०४] हे (समन्यवः) समान रीतिनें उत्साहित मरुतांनों ! (गावः चित् ह) या गाईही (स-जात्येन सबन्धवः) सजातीय होण्याच्या कारणानें परस्पर बहिणी आहेत. त्या (ककुभः) नाना दिशांमध्यें हिंडत असतांना (मिथः रिहते) परस्पर एक दुसऱ्यांना चाटत असतात. ॥ ६ ॥

१ गावः सजात्येन सबन्धवः ककुभः मिथः रिहते— गाई सजातीय असल्यामुळें एकमेकांच्या बहिणी आहेत. त्या नाना देशांत हिंडत असल्या तरी परस्परांना चाटतात. त्याप्रमाणें मांणसांनीं एकमेकांवर प्रेम करावें.

४०५ त्वं न इन्द्रा भर ओजो नृम्णꣳशतक्रतो विचर्षणे । आ वीरं पृतनासहम् ॥ ७ ॥
(ऋ. ८।९८।१०)

४०६ अधा हीन्द्र गिर्वण उप त्वा काम ईमहे ससृग्महे । उदेव ग्मन्त उदभिः ॥ ८ ॥
(ऋ. ८।९८।७)

४०७ सीदन्तस्ते वयो यथा गोश्रीते मधौ मदिरे विवक्षणे । अभि त्वामिन्द्र नोनुमः ॥ ९ ॥
(ऋ. ८।२१।५)

४०८ वयमु त्वामपूर्व्य स्थूरं न कच्चिद्भरन्तोऽवस्यवः । वज्रिं चित्रꣳहवामहे ॥ १० ॥
(ऋ. ८।२१।१)

इति द्वितीया दशतिः ॥ २ ॥ षष्ठः खण्डः ॥ ६ ॥ इति ककुभः ॥ [स्व० २ । उ० २ । धा० ४१ । छ ॥]

[३]

(१–१०) १–८ गोतमो (सम्मदो वा) राहूगणः; ९ त्रितः आप्त्यः (ऋ० कुत्स आंगिरसो वा)
१० अवस्युरात्रेयः ॥ इन्द्रः; ९ विश्वेदेवाः; १० अश्विनौ ॥ पंक्तिः ।

४०९ स्वादोरित्था विषूवतो मधोः पिबन्ति गौर्यः ।
या इन्द्रेण सयावरीर्वृष्णा मदन्ति शोभथा वस्वीरनु स्वराज्यम् ॥ १ ॥ (ऋ. १।८४।१०)

---

[४०५] हे (शत-क्रतो वि-चर्षणे इन्द्र) शेंकडों कार्यें करणाऱ्या विशेष ज्ञानी इन्द्रा ! (त्वं नः) तूं आम्हांला (ओजः नृम्णं) बल व धन (आ भर) भरपूर दे. तसेंच (पृतना-सहं वीरं आ) शत्रूसेनेचा पराभव करणारा वीर पुत्रही दे. ॥ ७ ॥

१ त्वं नः ओजः नृम्णं पृतना-सहं वीरं आ भर— तूं आम्हांला सामर्थ्य, मानसिक बल व शत्रूसेनेचा पराभव करणारें वीरांचें सामर्थ्य भरपूर दे.

[४०६] हे (गिर्वण इन्द्र) स्तुत्य इन्द्रा ! (अधा हि त्वा) आतां तुझ्याजवळ (कामः ईमहे) आमच्या कामना पूर्ण कर अशी प्रार्थना करीत आहों व (उप ससृग्महे) जवळून स्तुति करीत आहों. ज्याप्रमाणें (उदा ग्मन्तः उदभिः इव) पाणी घेऊन जाणारे मित्र मित्रत्वामुळें पाण्यानें खेळतात, त्याप्रमाणें आम्ही तुझ्याशीं मैत्री करीत आहों. ॥ ८ ॥

[४०७] हे इन्द्रा ! (गोश्रीते) गाईचें दूध ज्यांत मिळविलें आहे अशा (मदिरे विवक्षणे) उत्साह वाढवणाऱ्या. प्रयत्न करणाऱ्या (ते मधौ) तुझ्यासाठीं काढलेल्या मधुर सोमरसाजवळ (वयो यथा) पक्षी जमतात, त्याप्रमाणें आम्ही (त्वां अभि नोनुमः) तुझ्याजवळ येऊन तुला नमन करीत आहों. ॥ ९ ॥

[४०८] हे (अ-पूर्व्य वज्रिन्) अपूर्व वज्रधारी इन्द्रा ! (त्वां उ) तुलाच (चित्रं भरन्तः) हा विलक्षण सोमरस भरपूर देत आहों व (अवस्यवः) आमच्या रक्षणाची इच्छा करीत (हवामहे) तुझी प्रार्थना करीत आहों. ज्याप्रमाणें (कच्चित् स्थूरं न) एखाद्या गुणांनीं मोठ्या असलेल्या माणसाकडे इतर जातात, त्याप्रमाणें आम्ही तुझ्याजवळ येत आहों. ॥ १० ॥

॥ येथें तीसावा खण्ड समाप्त झाला ॥

[३१] एकत्रिंशः खण्डः ।

[४०९] (स्वादोः) स्वादिष्ट (इत्था विषूवतः) अशा सर्व यज्ञांमध्यें होणाऱ्या या (मधोः) मधुर सोमरसाला (गौर्यः पिबन्ति) श्वेतवर्णाच्या गाई पितात. (याः) या गाई (वृष्णा सयावरीः) भक्तांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या इन्द्राबरोबर असणाऱ्या (मदन्ति) आनंदानें राहत असतात व (शोभथाः) सुशोभितही दिसतात. (वस्वीः) त्या उत्तम दूध देणाऱ्या असून (स्वराज्यं अनु) स्वराज्याला अनुकूल असें कार्य करतात. ॥ १ ॥

४१० इत्था हि सोम इन्मदो ब्रह्म चकार वर्धनम् ।
शविष्ठ वज्रिन्नोजसा पृथिव्या निः शशा अहिमर्चन्ननु स्वराज्यम् ॥ २ ॥ (ऋ. १।८०।१)

४११ इन्द्रो मदाय वावृधे शवसे वृत्रहा नृभिः ।
तमिन्महत्स्वाजिषूतिमर्भे हवामहे स वाजेषु प्र नोऽविषत् ॥ ३ ॥ (ऋ. १।८१।१)

४१२ इन्द्र तुभ्यमिदद्रिवोनुत्तं वज्रिन्वीर्यम् ।
यद्ध त्यं मायिनं मृगं तव त्यन्माययावधीरर्चन्ननु स्वराज्यम् ॥ ४ ॥ (ऋ १।८०।७)

४१३ प्रेह्यभीहि धृष्णुहि न ते वज्रो नि यंसते ।
इन्द्र नृम्णं हि ते शवो हनो वृत्रं जया अपोऽर्चन्ननु स्वराज्यम् ॥ ५ ॥ (ऋ. १।८०।३)

४१४ यदुदीरत आजयो धृष्णवे धीयते धनम् ।
युङ्क्ष्वा मदच्युता हरी कंहनः कं वसौ दधोऽस्माँ इन्द्र वसौ दधः ॥ ६ ॥ (ऋ. १।८१।३)

[४१०] हे (शविष्ठ वज्रिन्) बलवान् वज्रधारी इन्द्रा ! (इत्था हि) याप्रमाणें (सोमे मदः) सोमरसामध्यें उत्साह वाढवणारा गुण आहे. यासाठीं त्याचें (वर्धनं ब्रह्म चकार) गुणवर्णन करणारें हें स्तोत्र केलें आहे. (स्वराज्यं अनु अर्चन्) स्वराज्याला अनुलक्षून (पृथिव्याः अ-हिं) पृथिवी वरील कमी न होणारा हा शत्रू (निः शशाः) निःशेष होईल असें कर. ॥ २ ॥

[४११] (वृत्र-हा इन्द्रः) वृत्राचा नाश करणाऱ्या इन्द्राचें (मदाय शवसे) आनंद, उत्साह व बल प्राप्त व्हावें यासाठीं (नृभिः वावृधे) मनुष्यांकडून महात्म्य वाढवलें जातें. यासाठीं (तं ऊतिं इत्) त्या रक्षण करणाऱ्या इन्द्राची (महत्सु आजिषु) मोठ्या युद्धांमध्यें तसेंच (अर्भे) लहान युद्धांमध्यें (हवामहे) आम्हीं प्रार्थना करीत आहों. (सः वाजेषु नः प्राविषत्) तो युद्धांमध्यें आमचें संरक्षण करो. ॥ ३ ॥

[४१२] (अद्रि-वः वज्रिन् इन्द्र) पर्वतावर राहणाऱ्या वज्रधारी इन्द्रा ! (तुभ्यं इत् वीर्यं अनुत्तं) तुझेंच वीर्य शत्रूंकडून पराजित न होणारें आहे. (यत् ह) जें खरोखर (स्वराज्यं अर्चन् अनु) स्वराज्याची अर्चना करतांना उपयोगी पडतें, त्या सामर्थ्यानें (मायिनं मृगं त्यं वृत्रं) कपटानें लढणाऱ्या त्या शोधून मारण्यास योग्य अशा वृत्राला तूं (तव मायया अवधीः) आपल्या कपटप्रयोगांच्या युद्धानें ठार मारलेंस. ॥ ४ ॥

[४१३] हे इन्द्रा ! (प्रेहि) शत्रूवर चढाई कर, (अभीहि) चारही बाजूंनीं हल्ला कर, (धृष्णुहि) शत्रूंचा नाश कर. (ते वज्रः न नियंसते) तुझें वज्र कमी शक्तिमान् नाहीं. (ते शवः नृम्णं) तुझें बल शत्रूंना नमवणारें आहे. (हि स्व-राज्यं अनु अर्चन्) स्वराज्याची अर्चना अनुकूलतेनें करीत (वृत्रं हनः) वृत्राला ठार मार व (अपः जय) जलांना विजय करून प्राप्त कर. ॥ ५ ॥

[४१४](यत् आजयः उदीरते) जेव्हां युद्धें सुरू होतात, त्यावेळीं (धृष्णवे धनं धीयते) शत्रूला जिंकणाऱ्याला धन मिळतें. हे इन्द्रा ! असें युद्ध सुरू झालें असतां (मद-च्युता हरी युङ्क्ष्व) मद स्रवणाऱ्या आपल्या घोड्यांना जोड. (कं हनः) कोणाला मारतोस, (कं वसौ दधः) कोणाला धन देतोस हें तुझ्या आधीन आहे, यासाठीं हे इन्द्रा ! (अस्मान् वसौ दधः) आम्हांला धनामध्यें ठेव, आम्हांला पुष्कळ धन दे. ॥ ६ ॥

१ यत् आजयः उदीरते, धृष्णवे धनं धीयते— जेव्हां युद्ध सुरू होतें तेव्हां शत्रूला पादाक्रांत करणाऱ्याला धन मिळतें.

४१५ अक्षन्नमीमदन्त ह्यव प्रिया अधूषत ।
अस्तोषत स्वभानवो विप्रा नविष्ठया मती योजा न्विन्द्र ते हरी ॥ ७ ॥ (ऋ. १।८२।२)

४१६ उपो षु शृणुही गिरो मघवन्मातथा इव ।
कदा नः सूनृतावतः कर इदर्थयास इद्योजा न्विन्द्र ते हरी ॥ ८ ॥ (ऋ. १।८२।१)

४१७ चन्द्रमा अप्स्वाऽऽन्तरा सुपर्णो धावते दिवि ।
न वो हिरण्यनेमयः पदं विन्दन्ति विद्युतो वित्तं मे अस्य रोदसी ॥ ९ ॥ (ऋ. १।१०५।१)

४१८ प्रति प्रियतमꣳरथं वृषणं वसुवाहनम् ।
स्तोता वामश्विनावृषि स्तोमेभिर्भूषति प्रति माध्वी मम श्रुतꣳहवम् ॥ १० ॥ (ऋ. ५।७५।१)

इति तृतीया दशतिः ॥ ३ ॥ सप्तमः खण्डः ॥ ७ ॥ [स्व० १३ । उ० ५ । धा० ७५ । णु ॥]

[४]

(१–८) १, ७ वसुश्रुत आत्रेयः; २, ४ विमद ऐन्द्रः (ऋ० प्राजापत्यो वा, वसुकृद्वा वासुकः); ३ सत्यश्रवा आत्रेयः; ५, ६ गोतमो राहूगणः; ८ अंहोमुग्वामदेव्यः; (ऋ० कुल्मलबर्हिषः शैलूषिर्वा;)॥ अग्निः; ३ उषाः; ४ सोमः; ५, ६ इन्द्रः; ८ विश्वेदेवाः ॥ पंक्तिः; ८ बृहती ॥

४१९ आ ते अग्न इधीमहि द्युमन्तं देवाजरम् ।
यद्ध स्या ते पनीयसी समिद्दीदयति द्यवीषꣳ स्तोतृभ्य आ भर ॥ १ ॥ (ऋ. ५।६।४)

---

[४१५] हे (इन्द्र) इन्द्रा ! यजमानांनीं (अक्षन्) अन्न खाल्लें व (हि अमीमदन्त) ते तृप्त झाले. (प्रियाः अव अधूषत) आनंदित होऊन त्यांनीं आपलीं डोकीं आनंदानें हालविलीं. त्यानंतर (स्व-भानवः विप्राः) स्वतःच तेजस्वी दिसणाऱ्या त्या ब्राह्मणांनीं (नविष्ठया मती अस्तोषत) नवीन स्तोत्रांनीं स्तुति केली. अशा यज्ञांत जाण्यासाठीं (ते हरी नु योज) आपले घोडे जोड. ॥ ७ ॥

[४१६] हे (मघवन् इन्द्र) धनवान् इन्द्रा ! (गिरः उप उ सु शृणुहि) आमचीं स्तोत्रें जवळून ऐक. (अ-तथा इव मा) पूर्वींच्या विरुद्ध न वाग. (नः सूनृतावतः कदा करः) आम्हांला सत्य भाषण करणारे केव्हां करशील ? तूं (अर्थयसे इत्) आमच्या स्तुति जाणूं इच्छितोस, यासाठींच (ते हरी नु योज) तूं आपले घोडे जोड. ॥ ८ ॥

[४१७] (अप्सु अन्तः) अन्तरिक्षामध्यें असणारा (सु-पर्णः चन्द्रमाः) उत्तम किरणांचा चन्द्रमा (दिवि आधावते) आकाशांत धावत आहे. (हिरण्यनेमयः विद्युतः) हे सुवर्णाप्रमाणें चमकणाऱ्या विद्युतरूपी तेजानों ! (वः पदं) तुमच्या चरणासारख्या किरणांना माझीं इन्द्रियें (न विन्दन्ति) पाहूं शकत नाहींत. हे (रोदसी) द्यावा-पृथिवी हो ! (मे अस्य वित्तं माझ्या या स्तुतिला तुम्हीं जाणा. ॥ ९ ॥

[४१८] हे (अश्विनौ) अश्विनौदेव हो ! (वां प्रियतमं) तुमच्या अत्यंत प्रिय (वृषणं वसु-वाहनं) बलवान् व धन वाहून नेणाऱ्या (रथं) रथाला (स्तोता ऋषिः) स्तुति करणारा ऋषि (स्तोमेभिः प्रति भूषति) स्तोत्रांनीं सुशोभित करीत आहे. हे (माध्वी) मधुविद्या जाणणाऱ्या अश्विनौदेव हो ! (मम हवं श्रुतं) ह्या माझ्या प्रार्थनेला ऐका. ॥ १० ॥

॥ येथें एकतीसावा खण्ड समाप्त झाला ॥

[३२] द्वात्रिंशः खण्डः ।

[४१९] हे (अग्ने देव) अग्निदेवा ! (द्युमन्तं अजरं ते) तेजस्वी व जरारहित अशा तुला (आ इधीमहि) आम्ही प्रदीप्त करीत आहों. (यत् ह) खरोखरच (ते स्या पनीयसी समित्) तुझी ती प्रशंसनीय दीप्ति (द्यावि दीदयति) द्युलोकांत चमकत आहे. आतां तूं आम्हां (स्तोतृभ्यः इषं आ भर) स्तुति करणाऱ्यांना अन्न भरपूर दे. ॥ १ ॥

*

४२० आग्निं न स्ववृक्तिभिर्होतारं त्वा वृणीमहे ।
शीरं पावकशोचिषं वि वो मदे यज्ञेषु स्तीर्णबर्हिषं विवक्षसे ॥ २ ॥ (ऋ. १०।२१।१)

४२१ महे नो अद्य बोधयोषो राये दिवित्मती ।
यथा चिन्नो अबोधयः सत्यश्रवसि वाय्ये सुजाते अश्वसूनृते ॥ ३ ॥ (ऋ. ५।७९।१)

४२२ भद्रं नो अपि वातय मनो दक्षमुत क्रतुम् ।
अथा ते सख्ये अन्धसो वि वो मदे रणा गावो न यवसे विवक्षसे ॥ ४ ॥ (ऋ. १०।२५।१)

४२३ क्रत्वा महाँ अनुष्वधं भीम आ वावृते शवः ।
श्रिय ऋष्व उपाकयोर्नि शिप्री हरिवां दधे हस्तयोर्वज्रमायसम् ॥ ५ ॥ (ऋ. १।८१।४)

४२४ स घा तं वृषणँ रथमधि तिष्ठाति गोविदम् ।
यः पात्रँ हारियोजनं पूर्णमिन्द्र चिकेतति योजा न्विन्द्र ते हरी ॥ ६ ॥ (ऋ. १।८२।४)

---

[४२०] (न) यावेळीं (सु-वृक्तिभिः) उत्तम स्तुतींनीं (होतारं) हवन करणाऱ्या (वः यज्ञेषु) तुमच्या यज्ञांमध्यें ज्याच्यासाठीं (स्तीर्ण-बर्हिषं) आसनें पसरलीं आहेत अशा (शीरं पावक-शोचिषं) व्यापक व शुद्ध करणारें ज्याचें तेज आहे अशा (त्वा आग्निं) तुज अग्निची (वि-मदे आवृणीमहे) विशेष आनन्द प्राप्त व्हावा म्हणून आम्ही आराधना करीत आहों. (विवक्षसे) तूं महान् आहेस. ॥ २ ॥

[४२१] (उषः) हे उषादेवी ! (अद्य) आज (दिवित्मती) तूं प्रकाशित होऊन (नः महे राये बोधय) आम्हांला धन प्राप्त व्हावें म्हणून जागृत कर. (यथा चित् नः अबोधयः) जसें तूं आम्हांला पूर्वी जागें केलें होतेंस. हे (सुजाते) उत्तम रीतिनें प्रकट झालेल्या उषे ! (अश्व-सूनृते) हे सत्यप्रिय उषे ! (वाय्ये सत्यश्रवसि) मी वयाचा मुलगा सत्यश्रवा आहें त्या माझ्यावर अनुग्रह कर. ॥ ३ ॥

[४२२] हे सोमा ! (विवक्षसे) महान् होण्यासाठीं (अन्धसः विमदे) सोमरसाच्या आनन्दामध्यें (नः मनः) आमचें मन (दक्षं उत क्रतुं) बल व कर्म करण्याच्या (भद्रं वातय) कल्याण करणाऱ्या शक्तिला प्राप्त करील अशी प्रेरणा कर. (अथ ते सख्ये) आणि तुझें सख्य प्राप्त व्हावें असें कर (यवसे रणाः गावः न) ज्याप्रमाणें गवताला रमणीय गाई प्राप्त करतात त्याप्रमाणें आम्ही तुझ्या मैत्रीला प्राप्त व्हावें. ॥ ४ ॥

[४२३] (क्रत्वा) पुरुषार्थानें (महान् भीमः) मोठा भयंकर झालेला इन्द्र (अनु-ष्वधं शवः आ वावृते) सोमरस पिऊन आपलें बल वाढवतो. त्यानंतर तो (ऋष्वः) सुन्दर (शिप्री) उत्तम शिरस्त्राण धारण करणारा (हरि-वान्) रथाला घोडे जोडणारा (उपाकयोः हस्तयोः) जवळच्या हातांनीं (आयसं वज्रं) पोलादी वज्र (श्रिये निदधे) शोभेसाठीं धारण करतो. ॥ ५ ॥

[४२४] (सः घा) तो मित्र इन्द्र (वृषणं गोविदं रथं अधि तिष्ठाति) बलवान्, गाई बरोबर असणाऱ्या रथावर चढून बसतो. (यः) जो रथ (हारि-योजनं पूर्णं पात्रं) लाह्या व सोमानें भरलेलें पात्र (चिकेतति) धारण करतो. यासाठीं (ते हरी नु योज) तुझे घोडे तूं आपल्या रथाला जोड. ॥ ६ ॥

४२५ अग्निं तं मन्ये यो वसुरस्तं यं यन्ति धेनवः ।
अस्तमर्वन्त आशवोऽस्तं नित्यासो वाजिन इषꣳ स्तोतृभ्य आ भर ॥ ७ ॥ (ऋ. ५।६।१)

४२६ न तमꣳहो न दुरितं देवासो अष्ट मर्त्यम् ।
सजोषसो यमर्यमा मित्रो नयति वरुणो अति द्विषः ॥ ८ ॥ (ऋ. १०।१२६।१)

इति चतुर्थी दशतिः ॥ ४ ॥ अष्टमः खण्डः ॥ ८ ॥ [स्व० ७ । उ० ३ । धा० ५७ । जे ॥]

इति पंक्तयः ॥

[५]

(१–१०) ऋण त्रसदस्यू; (१, ३–५, १० अग्नेयो धिष्ण्या ऐश्वराः; २, ६ त्र्यरुणस्त्रैवृष्णः, त्रसदस्युः पौरुकुत्सः) ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ८ वामदेवो गौतमः ॥ पवमानः सोमः; ७ मरुतः; ८ अग्निः; ९ वाजिनः ॥
द्विपदा विराट्; ८ पदपंक्तिः; ९ पुरउष्णिक्; २, ६ त्रिपदा अनुष्टुप्पिपीलिकामध्या ॥

४२७ परि प्र धन्वेन्द्राय सोम स्वादुर्मित्राय पूष्णे भगाय ॥ १ ॥ (ऋ. ९।१०९।१)

४२८ पर्यू षु प्र धन्व वाजसातये परि वृत्राणि सक्षणिः ।
द्विषस्तरध्या ऋणया न ईरसे ॥ २ ॥ (ऋ. ९।११०।१)

४२९ पवस्व सोम महान्त्समुद्रः पिता देवानां विश्वाभि धाम ॥ ३ ॥ (ऋ. ९।१०९।४)

---

[४२५] (यः वसुः अस्तं) जो धनरूपी अग्नि घरांत आहे, (यं धेनवः यन्ति) ज्या अग्निच्याजवळ गाई जातात. (अस्तं आशवः अर्वन्तः) ज्या यज्ञाच्या घराकडे वेगवान् घोडे येतात, (अस्तं नित्यासः वाजिनः) नित्य अन्न बाळगणारे यजमान जातात (तं अग्निं मन्ये) त्या अग्निची मी स्तुति करतों, तूं (स्तोतृभ्यः इषं आ भर) स्तोत्यांना भरपूर अन्न दे. ॥ ७ ॥

[४२६] (देवासः) हे देव हो ! (स-जोषसः) एका विचारानें राहणारे (अर्यमा, मित्रः, वरुणः) अर्यमा, मित्र व वरुण हे (अति-द्विषः) शत्रूंना दूर करून (यं नयति) ज्याला उन्नतिकडे नेतात, (तं मर्त्यं) त्या मानवाला (अंहः न) पाप लागत नाहीं व (दुरितं न अष्ट) दुर्गति त्याला शिवत नाहीं. ॥ ८ ॥

॥ येथें बत्तीसावा खण्ड समाप्त झाला ॥

[३३] त्रयस्त्रिंशः खण्डः ।

[४२७] हे सोमा ! (स्वादुः) स्वादयुक्त तूं (इन्द्राय) इन्द्रासाठीं (मित्राय पूष्णे) मित्र व पूषा यांसाठीं आणि (भगाय) भगासाठीं (परि प्र धन्व) पात्रांमध्यें भरून रहा. ॥ १ ॥

[४२८] हे सोमा ! तूं (वाज-सातये) अन्नासाठीं (सु परि प्रधन्व) उत्तम रीतिनें पात्रांमध्यें भरून रहा. (सक्षणिः वृत्राणि परि) सामर्थ्यवान् असा तूं शत्रूंवर चढाई करून जा. (नः ऋणया) आमच्या ऋणांचा नाश करणारा तूं (द्विषः तरध्यै) शत्रूंना पार करण्यासाठीं (ईरसे) त्या शत्रूंवर चढाई करून जातोस. ॥ २ ॥

[४२९] हे सोमा ! (महान् समुद्रः) मोठ्या समुद्राप्रमाणें (पिता) पालन करणारा तूं (देवानां विश्वा धाम) देवांच्या सर्व स्थानांमध्यें - पात्रांमध्यें - (अभि पवस्व) भरून रहा. ॥ ३ ॥

४३० पवस्व सोम महे दक्षायाश्वो न निक्तो वाजी धनाय ॥ ४ ॥ (ऋ. ९।१०९।१०)

४३१ इन्दुः पविष्ट चारुर्मदायापामुपस्थे कविर्भगाय ॥ ५ ॥ (ऋ. ९।१०९।१३)

४३२ अनु हि त्वा सुतꣳ सोम मदामसि महे समर्यराज्ये ।
वाजाꣳ अभि पवमान प्र गाहसे ॥ ६ ॥ (ऋ. ९।११०।२)

४३३ क ईं व्यक्ता नरः सनीडा रुद्रस्य मर्या अथा स्वश्वाः ॥ ७ ॥ (ऋ. ७।५६।१)

४३४ अग्ने तमद्याश्वं न स्तोमैः क्रतुं न भद्रꣳ हृदिस्पृशम् ।
ऋध्यामा त ओहैः ॥ ८ ॥ (ऋ. ४।१०।१)

४३५ आविर्मर्या आ वाजं वाजिनो अग्मं देवस्य सवितुः सवम् । स्वर्गाꣳ अर्वन्तो जयत ॥ ९ ॥

४३६ पवस्व सोम द्युम्नी सुधारो महाꣳ अवीनामनुपूर्व्यः ॥ १० ॥ (ऋ. (९।१०९।७)

इति पञ्चमी दशतिः ॥ ५ ॥ इति नवमः खण्डः ॥ ९ ॥ [स्व० ८ । उ० २ । धा ३५ । ठु ॥]

इति पञ्चमप्रपाठकस्य प्रथमोऽर्धः ॥ १ ॥

---

[४३०] हे सोमा ! (अश्वः न) घोड्याप्रमाणें (निक्तः) पाण्यानें स्वच्छ केलेला (वाजी) बल वाढवणारा तूं (महे दक्षाय) मोठें बल व (धनाय) धन प्राप्त व्हावें म्हणून (पवस्व) पात्रांमध्यें भरून रहा. ॥ ४ ॥

[४३१] (चारुः कविः) सुंदर ज्ञानी (इन्दुः) हा सोम (अपां उपस्थे) पाण्याच्याजवळ (भगाय मदाय) ऐश्वर्ययुक्त आनंदासाठीं (पविष्ट) पोंचत आहे, पाण्यांत मिळविला जात आहे. ॥ ५ ॥

[४३२] हे सोमा ! (सुतं त्वा) सोमरस काढल्यानंतर तुला (अनु मदामसि हि) आम्ही उत्तम प्रकारें स्तवितों. हे (पवमान) पवित्र सोमा ! (महे समर्य-राज्ये) मोठ्या श्रेष्ठ राज्याच्या रक्षणासाठीं (वाजान् अभि प्रगाहसे) आपल्या बलानें शत्रूसेनेवर तूं चढाई करून जातोस. ॥ ६ ॥

[४३३] (व्यक्ताः नरः) हे प्रसिद्ध नेतागण (स-नीडाः मर्याः) एका घरामध्यें राहणारे मनुष्य (अथा स्वश्वाः) उत्तम घोडे बाळगणारे (ईं रुद्रस्य के) या रुद्राचे कोण बरें आहेत ? ॥ ७ ॥

वीर मरुत् हे या रुद्राचे पुत्र आहेत.

[४३४] हे अग्ने ! (अद्य) आज आम्ही या यज्ञाचे ऋत्विज (ओहैः स्तोमैः) ऊहनामक स्तोत्रांनीं (अश्वं न) घोड्याप्रमाणें व (क्रतुं न) यज्ञकर्त्याप्रमाणें (भद्रं हृदि-स्पृशं) कल्याण करणाऱ्या अत्यंत प्रिय अशा (ते ऋध्याम) तुझें यश वाढेल असें स्तवन करतों. ॥ ८ ॥

१ अश्वं न— घोडा यज्ञस्थानाजवळ पोंचवतो त्याप्रमाणें तूं उच्च स्थानाला पोंचवतोस.

२ क्रतुं न— यज्ञकर्ता जसे उपकार करतात त्याप्रमाणें तूं उपकार करतोस.

[४३५] (मर्याः) मानवांचें हित करणाऱ्या (आविः वाजिनः) प्रकट झालेल्या या बलवान् देवता (सवितुः सवं वाजं) सवितादेवासाठीं तयार केलेल्या सोमरसरूपी अन्नाला (अग्मं) प्राप्त झाल्या आहेत, म्हणन हे यजमान हो ! तुम्ही (स्वर्ग) स्वर्गाला व (अर्वन्तः जयत) घोड्यांना विजय मिळवून प्राप्त करा. ॥ ९ ॥

[४३६] हे सोमा ! (द्युम्नी) तूं तेजस्वी (सु-धारः) उत्तम धारेनें भांड्यांत पडणारा (अनु-पूर्व्यः महान्) पूर्वीप्रमाणेंच मोठा असणारा (अवीनां अनु पवस्व) रक्षण करणाऱ्या पात्रांमध्यें अनुक्रमानें भरला जा. भांड्यांत सोमरस भरला जावो. ॥ १० ॥

॥ येथें तेहत्तीसावा खण्ड समाप्त झाला ॥

[६]

(१-१०) त्रसदस्युः; ७ संवर्त आंगिरसः ॥ इन्द्रः; ६ विश्वेदेवाः; ७ उषाः ॥

द्विपदा विराट् ॥

४३७ विश्वतोदावन्विश्वतो न आ भर यं त्वा शविष्ठमीमहे ॥ १ ॥

४३८ एष ब्रह्मा य ऋत्विय इन्द्रो नाम श्रुतो गृणे ॥ २ ॥

४३९ ब्रह्माण इन्द्रं महयन्तो अर्कैरवर्धयन्नहये हन्तवा उ ॥ ३ ॥ (ऋ. ५।३१।४)

४४० अनवस्ते रथमश्वाय तक्षुस्त्वष्टा वज्रं पुरुहूत द्युमन्तम् ॥ ४ ॥ (ऋ. ५।३१।४)

४४१ शं पदं मघं रयीषिणो न काममव्रतो हिनोति न स्पृशद्रयिम् ॥ ५ ॥

४४२ सदा गावः शुचयो विश्वधायसः सदा देवा अरेपसः ॥ ६ ॥

४४३ आ याहि वनसा सह गावः सचन्त वर्तनिं यदूधभिः ॥ ७ ॥ (ऋ. १०।१७२।१)

---

[३४] चतुस्त्रिंशः खण्डः ।

[४३७] हे (विश्वतो दावन्) सर्व बाजूंनीं शत्रूंचा उच्छेद करणाऱ्या इन्द्रा ! (विश्वतः नः आ भर) तूं सर्व बाजूंनीं आम्हांला इच्छित धन भरपूर दे. (यं शविष्ठं त्वा ईमहे) ज्या अत्यंत बलवान् अशा तुझी आम्ही प्रार्थना करीत आहों. ॥ १ ॥

[४३८] (ऋत्वियः यः इन्द्रः) ऋतूंच्या अनुकूल कार्य करणारा जो हा इन्द्र (नाम श्रुतः) या नावानें सुप्रसिद्ध आहे, (एषः ब्रह्मा) हा महाज्ञानी आहे त्याची मीं (गृणे) स्तुति करतों. ॥ २ ॥

[४३९] (अहये हन्तवै) अहि असुराला मारण्यासाठीं (अर्कैः महयन्तः ब्रह्माणः) स्तोत्रांनीं वर्णन करणारे ज्ञानी (इन्द्रं अवर्धयन्) इन्द्राचें महत्त्व वाढवतात. ॥ ३ ॥

[४४०] हे इन्द्रा ! (अनवः) मनुष्यरूपी ऋभुदेवता यांनीं (ते अश्वाय) तुझ्या घोड्यासाठीं (रथं तक्षुः) रथ तयार केला. हे (पुरु-हूत) अनेकांनीं प्रार्थिलेल्या इन्द्रा ! (त्वष्टा) त्वष्ट्यानें (द्युमन्तं वज्रं) तेजस्वी वज्र तुझ्यासाठीं तयार केलें. ॥ ४ ॥

१ अनवः अश्वाय रथं तक्षुः— मनुष्यरूपी ऋभुदेवता या कारागिरांनीं इन्द्राच्या घोड्यांसाठीं योग्य रथ तयार केला.

२ त्वष्टा द्युमन्तं वज्रं— त्वष्ट्यानें तेजस्वी वज्र तयार केलें.

[४४१] (रयीषिणः) धनाचें अर्पण करणारे यज्ञकर्तालोक (शं पदं मघं) सुख, उत्तम स्थान व धन प्राप्त करतात. (अ-व्रतः) यज्ञ न करणारा (न हिनोति) कांहींच प्राप्त करीत नाहीं, व (कामं रयिं न स्पृशत्) आपल्या इष्ट धनाला तो स्पर्शही करूं शकत नाहीं. ॥ ५ ॥

१ रयीषिणः शं पदं मघं— धनाचें अर्पण करणारे याजक शक्ति, उत्तम स्थान व धन प्राप्त करतात.

२ अ-व्रतः न हिनोति— जो व्रताचरण करीत नाहीं त्याला कांहींच मिळत नाहीं.

[४४२] (गावः) गाई (सदा शुचयः) सर्वदा शुद्ध असतात, (विश्व-धायसः) सर्वांचें पोषण करणाऱ्या व (सदा देवा अ-रेपसः) सर्वोचित दिव्य व निष्पाप असतात. ॥ ६ ॥

[४४३] हे उषे ! (वनसा सह आयाहि) इष्ट तेजासह ये. (यत् ऊधभिः) ज्या भरलेल्या दुग्धाशयासह आहेत, त्या (गावः) गाई (वर्तनिं सचन्ते) तुझ्या अनुकूल मार्गावर जातात. ॥ ७ ॥

उषःकाळीं गाईंचें दूध काढलें जातें.

४४४ उप प्रक्ष मधुमति क्षियन्तः पुष्येम रयिं धीमहे त इन्द्र ॥ ८ ॥
४४५ अर्चन्त्यर्कं मरुतः स्वर्का आ स्तोभति श्रुतो युवा स इन्द्रः ॥ ९ ॥
४४६ प्र व इन्द्राय वृत्रहन्तमाय विप्राय गाथं गायत यं जुजोषते ॥ १० ॥

इति षष्ठी दशतिः ॥ ६ ॥ दशमः खण्डः ॥ १० ॥ [स्व० ७ । उ० २ । धा० ४२ । छा ॥]

[७]

(१-१०) १ पृषध्रः काण्वः; २, ३, ४ बन्धुः सुबन्धुः श्रुतबन्धुर्विप्रबन्धुश्च क्रमेण गोपायना लौपायना वा; ५ संवर्त आंगिरसः; ६ भुवन आप्त्यः; साधनो वा भौवनः; ७ कवष ऐलूषः; ८ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ९ आत्रेयः; १० वसिष्ठो मैत्रावरुणिः ॥ अग्निः; ५ उषाः; ६, ७, ९ विश्वेदेवाः; ३, ४, ८, १० इन्द्रः ॥ द्विपदा विराट्; १० एकपदा ॥

४४७ अचेत्यग्निश्चिकितिर्हव्यवाट् न सुमद्रथः ॥ १ ॥ (ऋ. ८।५६।५)
४४८ अग्ने त्वं नो अन्तम उत त्राता शिवो भुवा वरूथ्यः ॥ २ ॥ (ऋ. ५।२४।१; यजु. ३।२५)
४४९ भगो न चित्रो अग्निर्महोनां दधाति रत्नम् ॥ ३ ॥
४५० विश्वस्य प्र स्तोभ पुरो वा सन्यदि वेह नूनम् ॥ ४ ॥

---

[४४४] (मधुमति प्रक्षे) मधुर रस असलेल्या चमच्यामध्यें हव्य ठेऊन (ते क्षियन्तः) तुझ्याजवळ बसणारे आम्ही, हे इन्द्रा ! (रयिं पुष्येम) धन प्राप्त करूं व तुझें (धीमहे) ध्यान करीत राहूं. ॥ ८ ॥

[४४५] (स्वर्काः मरुतः) उत्तम तेजस्वी मरुत् (अर्कं अर्चन्ति) पूजनीय इन्द्राची अर्चना करतात. (सः) तो (युवा) तरुण (श्रुतः) प्रसिद्ध (इन्द्रः) इन्द्र (आ स्तोभति) सर्व शत्रूंना मारतो. ॥ ९ ॥

१ युवा श्रुतः आ स्तोभति — तरुण प्रसिद्ध वीर सर्व शत्रूंना मारतो.

[४४६] हे ज्ञानीलोक हो ! (वृत्र-हन्तमाय विप्राय इन्द्राय) वृत्राला मारण्यांत प्रवीण अशा इन्द्रासाठीं (गाथं) स्तोत्राचें (प्रगायत) गायन करा. (यं जुजोषते) जें तो आनंदानें ऐकत असतो. ॥ १० ॥

॥ येथें चौतीसावा खण्ड समाप्त झाला ॥

[३५] पंचत्रिंशः खण्डः ।

[४४७] (हव्य-वाट्) हवि देवतांकडे पोंचवणारा (चिकितिः) विशेष बुद्धिमान् (सुमद्) उत्तम हवींनीं ज्याचा रथ भरलेला आहे, तो (रथः न) रथासारखा इष्टस्थानीं पोंचवणारा (अग्निः अचेति) अग्नि सर्व जाणत आहे. ॥ १ ॥

[४४८] हे (अग्ने) अग्नि ! (वरूथ्यः) सेवा करण्यास योग्य असा (त्वं) तूं (नः अन्तमः) आमच्याजवळचा (उत शिवः त्राता) व कल्याण करणारा संरक्षक (भुव) झाला आहेस. ॥ २ ॥

[४४९] (महोनां भगः न) मोठ्यांमध्यें सूर्याप्रमाणें (चित्रः अग्निः) पूज्य अग्नि याजकांना (रत्नं दधाति) धन देत असतो. ॥ ३ ॥

[४५०] (विश्वस्य प्रस्तोभ) सर्व शत्रूंचा नाश तो करतो. (यदि वा इह नूनं) आणि या यज्ञामध्यें खरोखरच (पुरो वा सन्) पूर्ण रीतिनें निवास करतो. ॥ ४ ॥

४५१ उषा अप स्वसुष्टमः सं वर्तयति वर्तनिं सुजातता ॥ ५ ॥ (ऋ. १०।१७२।४)

४५२ इमा नु कं भुवना सीषधेमेन्द्रश्च विश्वे च देवाः ॥ ६ ॥ (ऋ. १०।१५७।१)

४५३ वि स्रुतयो यथा पथा इन्द्र त्वद्यन्तु रातयः ॥ ७ ॥

४५४ अया वाजं देवहितं सनेम मदेम शतहिमाः सुवीराः ॥ ८ ॥ (ऋ ६।१७।१५)

४५५ ऊर्जा मित्रो वरुणः पिन्वतेडाः पीवरीमिषं कृणुही न इन्द्र ॥ ९ ॥

४५६ इन्द्रो विश्वस्य राजति ॥ १० ॥ (वा. य. ३६।८)

इति सप्तमी दशतिः ॥ ७ ॥ एकादशः खण्डः ॥ ११ ॥ [स्व० ५ । उ० ४ । धा० ४१ । भ ॥]

[८]

(१–१०) १, १० गृत्समदः शौनकः; २ गौरांगिरसः; ३, ५, ९ परुच्छेपो दैवोदासिः; ४ रेभः काश्यपः; ६ एवयामरुदात्रेयः; ७ अनानतः पारुच्छेपिः; ८ नकुलः ॥ १, ३, ४, १० इन्द्रः; २ सूर्यः; ५ विश्वेदेवाः; ६ मरुतः; ७ पवमानः सोमः; ८ सविता; ९ अग्निः ॥ १, १० अष्टिः (१० अतिशक्वरी वा); ३, ५, ७–९ अत्यष्टिः; २, ४, ६ अतिजगती (अष्टिर्वा ?) ॥

४५७ त्रिकद्रुकेषु महिषो यवाशिरं तुविशुष्मस्तृम्पत्सोममपिबद्विष्णुना सुतं यथावशम् ।
स ईं ममाद महि कर्म कर्तवे महामुरुं सैनं सश्चद्देवो देवं सत्य इन्दुः सत्यमिन्द्रम् ॥ १ ॥
(ऋ. २।२२।१)

---

[४५१] (उषाः) उषा (स्वसुः तमः) आपली बहिण जी रात्री आहे तिच्या अन्धकाराचा (अप सं वर्तयति) नाश करते व (सु–जातता) आपल्या उत्तम प्रकाशानें (वर्तनिं) आपल्या मार्गाला प्रकाशित करते. ॥ ५ ॥

[४५२] (इमाः भुवनाः) या सर्व भुवनांना (नु कं) निश्चयानें सुख मिळावें म्हणून (सीषधेम) मी नियमांनीं चालवतों. (इन्द्रः च विश्वेदेवाः च) इन्द्र व सर्व इतर देव या कार्यामध्यें सहाय्य करतात. ॥ ६ ॥

[४५३] हे इन्द्रा ! (त्वत् रातयः) तुझ्यापासून मिळणारीं दानें (पथा स्रुतयः यथा) मोठ्या राजमार्गाला जसे लहान मार्ग लागून असतात, त्याप्रमाणें (वि यन्तु) सर्वांना प्राप्त होवोत. ॥ ७ ॥

[४५४] (अया देवहितं वाजं सनेम) या स्तुतिनें देवांनीं दिलेलें अन्न अथवा बल प्राप्त करूं, आणि (सु–वीराः शत–हिमाः मदेम) उत्तम वीर पुत्रांनीं युक्त होऊन शंभर वर्षंपर्यंत आनंदानें राहूं. ॥ ८ ॥

१ सु-वीराः शतहिमाः मदेम— उत्तम वीर पुत्रांनीं युक्त होऊन आम्ही शंभर वर्षं आनंदानें राहूं.

[४५५] हे इन्द्रा ! (मित्रः वरुणः) मित्र व वरुणदेव (ऊर्जाः इडाः पिन्वत) बल वाढवणारें अन्न आम्हांला देवोत. तूं (नः इषं) आमच्या अन्नाला (पीवरीं कृणुहि) अधिक पुष्ट करणारें कर. ॥ ९ ॥

१ नः इषं पीवरीं कृणुहि— आमच्या अन्नाला अधिक पोषण करणारें बनव.

[४५६] (इन्द्रः) इन्द्र (विश्वस्य राजति) सर्व लोकांवर प्रभुत्व करतो. ॥ १० ॥

॥ येथें पस्तीसावा खण्ड समाप्त झाला ॥

[३६] षट्त्रिंशः खण्डः ।

[४५७] (महिषः तुवि–शुष्मः) बलवान् व अत्यंत सामर्थ्यवान् अशा (तृंपत्) तृप्त होणाऱ्या इन्द्रानें (त्रिकद्रुकेषु सुतं) तीन पात्रांमध्यें ठेवलेल्या सोमरसामध्यें (यवाशिरं) सत्तु मिळवून (सोमं) त्या सोमरसाचें (विष्णुना) विष्णु बरोबर (यथा–वशं) यथेच्छ (अपिबत्) पान केलें. (सः) त्या सोमानें (महि कर्म कर्तवे) मोठें कर्म करण्यासाठीं (महां उरुं ईं) मोठ्या श्रेष्ठ इन्द्राला (ममाद) उत्साहित केलें. (सत्यः इन्दुः देवः सः) खरा तो सोमरूपी प्रकाशमान् रस (सत्यं एनं देवं इन्द्रं) खऱ्या या इन्द्रदेवाला (सश्चत्) प्राप्त झाला. ॥ १ ॥

४५८ अय꣡ꣳ सहस्रमानवो दृशः कवीनां मतिर्ज्योतिर्विधर्म ।
ब्रध्नः समीचीरुषसः समैरयदरेपसः सचेतसः स्वसरे मन्युमन्तश्चिता गोः ॥ २ ॥

४५९ एन्द्र याह्युप नः परावतो नायमच्छा विदथानीव सत्पतिरस्ता राजेव सत्पतिः ।
हवामहे त्वा प्रयस्वन्तः सुतेष्वा पुत्रासो न पितरं वाजसातये मꣳहिष्ठं वाजसातये ॥ ३ ॥
(ऋ. १।१३०।१)

४६० तमिन्द्रं जोहवीमि मघवानमुग्रꣳ सत्रा दधानमप्रतिष्कुतꣳ श्रवाꣳसि भूरि ।
मꣳहिष्ठो गीर्भिरा च यज्ञियो ववर्त राये नो विश्वा सुपथा कृणोतु वज्री ॥ ४ ॥
(ऋ. ८।९७।१३)

४६१ अस्तु श्रौषट् पुरो अग्निं धिया दध आ नु त्यच्छर्धो दिव्यं वृणीमह इन्द्रवायू वृणीमहे ।
यद्ध क्राणा विवस्वते नाभा सन्दाय नव्यसे ।
अध प्र नूनमुप यन्ति धीतयो देवाꣳअच्छा न धीतयः ॥ ५ ॥ (ऋ. १।१३९।१)

---

[४५८] (सहस्र-मानवः) सहस्रावधि मानवांचें हित करणारा (दृशः) दर्शनीय (कवीनां मतिः) बुद्धिमानांना संमाननीय, (विधर्म-ज्योतिः) विशेष धर्मानें युक्त व तेजःस्वरूप (अयं ब्रध्नः) हा सूर्य (समीचीः अ-रेपसः) निर्मळ व अन्धकाररहित (सचेतसः उषसः) तेजस्वी उषांना (समैरयत्) प्रेरित करतो. त्यानंतर (स्वसरे) दिवसाला (मन्युमन्तः) तेजस्वी दिसणारे चन्द्र आदिक (गोः) सूर्याच्या तेजानें (चिताः) तेजोहीन होतात. ॥ २ ॥

[४५९] हे इन्द्रा ! (परावतः नः अच्छा उप आयाहि) दूरदेशांतून तूं आमच्याजवळ ये. (अयं न) जसा हा अग्नि (सत्पतिः) सज्जनांचें पालन करणारा (विदथानि इव) यज्ञशाळेंत येतो (अस्ता सत्पतिः राजा इव) शत्रूवर शस्त्रें फेंकणारा असा आपल्या घरीं उत्तम पालक राजा येतो, त्याप्रमाणें ये. (प्रयस्वन्तः सुतेषु त्वा हवामहे) हविष्यान्न घेऊन आम्ही सोमयागामध्यें तुला बोलावीत आहों. (पुत्रासः वाजसातये पितरं न) पुत्र अन्न प्राप्त व्हावें म्हणून जसे पित्याला बोलावतात; अथवा (मंहिष्ठं वाज-सातये) मोठ्या वीराला महायुद्धांत बोलावतात त्याप्रमाणें तुला बोलावीत आहों. ॥ ३ ॥

[४६०] (मघवानं) धनवान् (उग्रं) वीर (सत्रा भूरि श्रवांसि दधानं) एकदम पुष्कळ बलांना धारण करणाऱ्या (अ-प्रतिष्कुतं तं इन्द्रं) शत्रूंकडून कधींहि पराजित न होणाऱ्या त्या इन्द्राला (जोहवीमि) सहाय्यार्थ बोलावीत आहों. (मंहिष्ठः यज्ञियः) पूज्य व यज्ञामध्यें सत्कार ज्याचा होतो अशा इन्द्राची (गीर्भिः आ ववर्त) स्तोत्रांनीं स्तुति केली जात आहे. असा तो इन्द्र (वज्री) वज्रधारी (राये) धन मिळावें म्हणून (नः विश्वा सुपथा कृणोतु) सर्व मार्ग सुगम करो. ॥ ४ ॥

[४६१] (पुरः अग्निं) उत्तरवेदीमधील अग्निला (धिया आदधे) ज्ञानपूर्वक मी धारण केला आहे. (त्यत् दिव्यं शर्धः) त्या दिव्य बलवान् अग्निची (आ वृणीमहे) आम्ही आराधना करीत आहों. (इन्द्र-वायू) इन्द्र व वायूची (वृणीमहे) आम्ही प्रार्थना करीत आहों, (यत् ह) जे (वि-वस्वते नव्यसे) धनवान् नवीन यजमानाला (नाभा) यज्ञस्थानाच्या मुख्यस्थानीं (सन्दाय क्राणा) एकत्र येऊन मनोरथाची सिद्धि करतात. (श्रौषट् अस्तु) त्या स्तुतिचें श्रवण होवो. (अध) नंतर (नः धीतयः) आमच्या स्तुति (प्र नूनं उपयन्ति) निश्चयपूर्वक तुझ्याकडे येतील. (देवान् अच्छा न) देवांकडे पोंचण्यासाठींच आमचीं (धीतयः) हीं कर्में चालू आहेत. ॥ ५ ॥

४६२ प्र वो महे मतयो यन्तु विष्णवे मरुत्वते गिरिजा एवयामरुत् ।
प्र शर्धाय प्र यज्यवे सुखादये तवसे भन्ददिष्टये धुनिव्रताय शवसे ॥ ६ ॥ (ऋ. ५।८७।१)

४६३ अया रुचा हरिण्या पुनानो विश्वा द्वेषाꣳसि तरति सयुग्वभिः सूरो न सयुग्वभिः ।
धारा पृष्ठस्य रोचते पुनानो अरुषो हरिः ।
विश्वा यद्रूपा परियास्यृक्वभिः सप्तास्येभिर्ऋक्वभिः ॥ ७ ॥ (ऋ. ९।१११।१)

४६४ अभि त्यं देवꣳसवितारमोण्योः कविक्रतुमर्चामि सत्यसवꣳ रत्नधामभि प्रियं मतिम् ।
ऊर्ध्वा यस्यामतिर्भा अदिद्युतत्सवीमनि हिरण्यपाणिरमिमीत सुक्रतुः कृपा स्वः ॥ ८ ॥
(वा.य. ४।२५)

४६५ अग्निꣳहोतारं मन्ये दास्वन्तं वसोः सूनुꣳ सहसो जातवेदसं विप्रं न जातवेदसम् ।
य ऊर्ध्वया स्वध्वरो देवो देवाच्या कृपा ।
घृतस्य विभ्राष्टिमनु शुक्रशोचिष आजुह्वानस्य सर्पिषः ॥ ९ ॥ (ऋ. १।१२७।१)

---

[४६२] (एवया मरुत्) एवया मरुत् नांवाच्या ऋषिनें आपल्या (गिरिजाः मतयः) वाणीनें केलेली स्तुति (मरुत्वते विष्णवे) मरुतांबरोबर असणाऱ्या विष्णुला व (महे वः प्रयन्तु) मोठ्या अशा तुज इन्द्राला प्राप्त होवो. तसेंच (प्र-यज्यवे) विशेष यज्ञ करणाऱ्या (सु-खादये) उत्तम आभूषणें घालणाऱ्या (तवसे) बलवान् (भन्ददिष्टये) स्तुतिरूप यज्ञ करणाऱ्या (धुनि-व्रताय) शत्रूला दूर करण्याचें व्रत आहे अशा (शवसे शर्धाय) त्या प्रगतिशील मरुतांच्या बलाला (प्र) प्राप्त होवो. ॥ ६ ॥

[४६३] (पुनानः) चाळणीनें गाळला जाणारा सोमरस (हरिण्या अया रुचा) हिरवट रंगाच्या या आपल्या तेजानें (विश्वा द्वेषांसि तरति) सर्व शत्रूंनां दूर करतो. (सूरः सयुग्वभिः न) सूर्य आपल्या किरणांनीं जसा अन्धकाराला विनष्ट करतो. (पृष्ठस्य धारा रोचते) वर दिसणारी या सोमरसाची धार प्रकाशत आहे. (पुनानः हरिः अरुषः) गाळला जाणारा हा हिरव्या रंगाचा सोमरस चमकत आहे. (यत्) जो (सप्तास्येभिः ऋक्वभिः) तेजाच्या सात मुखांनीं, सात स्तोत्यांनीं व (ऋक्वभिः) तेजांनीं (विश्वा रूपाणि परियासि) अनेक रूपें धारण करतो. ॥ ७ ॥

[४६४] (कवि-क्रतुं) ज्ञानपूर्वक कर्म करणाऱ्या (सत्य-सवं) सत्याची प्रेरणा देणाऱ्या (रत्न-धां) धन देणाऱ्या (अभि-प्रियं) अत्यन्त प्रिय (मतिं त्यं सवितारं देवं) बुद्धिमान् अशा त्या सवितादेवाची (अर्चामि) मी आराधना करीत आहें. (यस्य भाः) ज्याचा प्रकाश (ऊर्ध्वा ओण्योः अदिद्युतत्) उच्चगतिनें या द्युलोक व पृथिवी यांच्यामध्यें प्रसृत होत आहे. (सवीमनि अमतिः) उत्पन्न झाल्यानंतर त्याचा प्रकाश पसरतो. (सु-क्रतुः हिरण्य-पाणिः) उत्तम कर्मे करणारा सुवर्णाप्रमाणें चमकणारा सविता (कृपा स्वः अमिमीत) कृपा प्रसादानें स्वतःचा प्रकाश पसरवतो. ॥ ८ ॥

[४६५] (अग्निं होतारं) अग्नि ज्यांत हवन होत आहे अशा (दास्वन्तं) धन देणाऱ्या (वसोः सहसः) निवासक बलाचा (सूनुं) पुत्र अर्थात् बल वाढवणाऱ्या (जात-वेदसं विप्रं न) विद्वान् ब्राह्मणाप्रमाणें (जातवेदसं अग्निं मन्ये) परम पूज्य अशा अग्निची मी स्तुति करतो. (यः देवः) जो अग्निदेव (सु-अध्वरः) ज्यांत उत्तम यज्ञ केले जात आहेत, (ऊर्ध्वया देवाच्या कृपा) उच्च देवांचा कृपाप्रसाद होईल अशा इच्छेनें (शुक्र-शोचिषः) शुद्ध तेजस्वी अशा (आजुह्वानस्य) या अग्निमध्यें हवन केलें जात आहे अशा त्या (सर्पिषः) तुपाच्या (विभ्राष्टिं अनु) आहुतीनंतर प्रसन्न होतो. ॥ ९ ॥

*

४६६ तव त्यन्नर्यं नृतोऽप इन्द्र प्रथमं पूर्व्यं दिवि प्रवाच्यं कृतम् ।
यो देवस्य शवसा प्रारिणा असु रिणन्नपः ।
भुवो विश्वमभ्यदेवमोजसा विदेदूर्ज्ञं शतक्रतुर्विदेदिषम् ॥ १० ॥ (ऋ २।२२।४)

इति अष्टमी दशतिः ॥ ८ ॥ द्वादशः खण्डः ॥ १२ ॥ इत्यैन्द्रं पर्व काण्डं वा समाप्तम् ॥ इति चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

ऐन्द्रकाण्डे ।

गायत्र्यः १९५-२३२ (११८)
तत्र १५५ ' पान्तं ' इत्यनुष्टुप् ।
बृहत्यः २३३-३१२ (८०)
त्रिष्टुभः ३१३-३४१ (२९)
तत्र ३२८ ' प्र वो ' इति त्रिपाद्विराट् ।
अनुष्टुभः ३४२-३६९ (२८)
जगत्यः ३७०-३८० (११)
तत्र ३७९ ' उभे यदिन्द्रे ' ति महापंक्तिः ।
उष्णिहः ३८१-३९८ (१८)
तत्र ३९८ ' पिबे ' ति विराट् ।
ककुभः ३९९-४०८ (१०)
पंक्तयः ४०९-४२६ (१८)
तत्र ४२६ ' नतमि ' त्युपरिष्टाद्बृहती ।
द्विपदाः ४२७-४५५ (२९)
[४२८; ४३२; ४३४; ४३५ अनुष्टुबादयस्तत्रैवोक्ताः]
अत्यष्टयः ४५६-४६६ (११)
तत्र ४५६ ' इन्द्रो विश्वस्ये ' त्येकपदा ।
३५२

ऐन्द्रकाण्डस्य मन्त्रसंख्या ३५२
आग्नेयकाण्डस्य मन्त्रसंख्या ११४
सर्वयोगः ४६६

[४६६] (नृतः इन्द्र) हे सर्वांस नाचवणाऱ्या इन्द्रा ! (नर्यं) सर्व मानवांचें हित करणारें (प्रथमं पूर्व्यं) पहिलें पूर्वीचें (तव त्यत् अपः) तुझें तें कर्म (दिवि प्रवाच्यं कृतं) द्युलोकामध्यें प्रशंसनीय झालें आहे. तें बल हें आहे कीं (देवस्य असुः) राक्षसांचे प्राण (शवसा रिणन्) आपल्या बलानें तूं नष्ट केलेस व (अपः अरिणः) जलांना प्रवाहित केलेस. तो तूं (विश्वं अदेवं) सर्व असुरांनां (ओजसा अभिभुवः) आपल्या बलानें पराजित केलेंस. यासाठीं (शतक्रतुः) शेंकडों कर्मे करणारा इन्द्र (ऊर्जं इषं विदेत्) बलवान् होवो व त्यास हविष्यान्न प्राप्त होवो. ॥ १० ॥

॥ येथें छत्तीसावा खण्ड समाप्त झाला ॥

॥ ऐन्द्र काण्ड समाप्त ॥

ऐन्द्र काण्ड

सामवेदाच्या ह्या ऐन्द्रकाण्डामध्यें ३५२ मंत्र आहेत. हें काण्ड जरी " ऐन्द्र-काण्ड " या नांवानें प्रसिद्ध असलें तरी त्यांत " अग्नि, मरुत् " आदि अन्य देवताही आल्या आहेत. हें देवता-सूचीवरून कळून येईल. अधिक मंत्र इन्द्र देवतेचे असल्यामुळें याचें नांव " ऐन्द्र-काण्ड " असें ठेवलें आहे. यामध्यें मुख्यतः इन्द्राचेंच वर्णन असल्यानें या इन्द्र-देवतेच्या गुणांचा अभ्यास आपण प्रथम करूं या व त्यावरून आपणांस कोणता बोध मिळतो तें पाहूं—

इन्द्राचे गुण

इन्द्र हा शूर वीर आहे तसा तो ज्ञानीहि आहे. याचें ज्ञान व विद्वत्ता दाखवणारे हे गुण या काण्डांत आहेत—

१ **युवा कविः** (३५९)– हा इन्द्र तरुण कवि आहे. ' कवि ' चा अर्थ क्रान्तदर्शी असा आहे. दूरचें पाहणारा, दूरदर्शी, ज्ञानी.

२ **एषः ब्रह्मा** (४३८)–हा ज्ञानी आहे, ब्रह्मज्ञानी आहे.

३ **विप्रः** (३८८)– विशेष प्राज्ञ, विशेष ज्ञानी.

४ **विपश्चित्, बृहत् ब्रह्मकृत्** (३८८)– ज्ञानी, ब्रह्मज्ञानाचा प्रसार करणारा.

५ **श्रुतः इन्द्रः** (४४५)–ज्ञानासाठीं विशेष प्रसिद्ध.

६ **नाम श्रुतः** (४३८)– नावानें ज्ञानाविषयीं सुप्रसिद्ध.

७ **कश्यपः (पश्यकः)** (३६१)– पाहणारा, खरी स्थिति जाणणारा.

८ **विश्वानि विदुषे** (३५२)–सर्व ज्ञान जाणणारा.

९ **विद्वत्सु चित्रः** (३४५)– विद्वानांमध्यें विलक्षण श्रेष्ठ ज्ञानी.

१० **वि-चेताः** (२६५)– विशेष बुद्धिमान्, विचारी.

११ **विचर्षणिः** (१९९)– विशेष ज्ञानी.

१२ **मुनीनां सखा** (२७५)– ऋषि-मुनि यांचा मित्र, हितकर्ता.

१३ **देवस्य महित्वा काव्यं पश्य** (३२५)– या इन्द्रदेवाचें महत्त्वाचें काव्य पहा.

१४ **कच्चित् स्थूरं न अवस्यवः त्वां हवामहे** (४०८)–एखाद्या वृद्ध माणसाकडे त्याच्याकडून शहाणपणाची सल्लामसलत विचारण्यासाठीं जावें, त्याप्रमाणें आपल्या संरक्षणासाठीं इन्द्राकडे आम्ही जातों.

१५ **सुरूप-कृत्नुः** (१६०)– उत्तम सुन्दर रूप इन्द्र बनवतो. तो उत्तम कारागीर आहे.

१६ **युवा** (१२७)– तो तरुणाप्रमाणें उत्साही व विचारी आहे.

१७ **सखा, मित्रः** (१२७)–तो बरोबरीचा मित्र असावा तसा आहे.

१८ **चित्रः सखा** (१६९)– विलक्षण हितकर्ता मित्र आहे.

१९ **पतिः** (२०५)– उत्तम पालक, उत्तम अधिकारी, स्वामी.

२० **सत्पतिः** (१६८)– सज्जनांचें उत्तम पालन करणारा.

२१ **गोपतिः** (१६८)– गाईचें उत्तम पालन करणारा.

२२ **सत्यस्य सूनुः** (१६८)– सत्याचा प्रचारक.

२३ **ऋष्वः** (४२३)– महान्, सुन्दर.

२४ **शिप्री** (१४५)– डोक्यावर शिरस्त्राण घालणारा.

२५ **वः अचर्कृषत्** (१९६)– आपल्या ज्ञानानें व चातुर्यानें तुम्हांला आपणाजवळ आकर्षित करतो.

२६ **इन्द्रः सदा उपो नु** (१९६)– इन्द्र सदोदित जवळ असल्यासारखा असतो. सर्वांचें जवळून उत्तम निरीक्षण करतो.

२७ **त्वं नः ऊती** (२६०)– तूं आमचा उत्तम संरक्षक आहेस.

२८ **त्वं नः आप्यः** (२६०)– तूं आमचा बन्धु आहेस.

२९ **नः सधमादे भव** (२६०)– आमच्या एकत्र बसण्याच्या जागीं येऊन बैस.

३० **न परा वृणक्** (२६०)– आम्हांस दूर सोडून देऊं नकोस.

असे इन्द्राचे गुण ज्ञानी व आकर्षक होण्यासंबंधींचे आहेत. याचें सार्वजनिक हित करण्याच्या तत्परतेसंबंधीं पहा—

१ **सु-नीती** (१२७)– इन्द्र उत्तम नीतिनें चालणारा आहे व लोकांसही तो उत्तम नीतिनें चालवितो.

२ **नर्य-अपस्** (१२५)– सर्व लोकांचें हित करण्याचीं कार्यं करणारा.

३ **यस्य मानुषं द्यावः न विचरन्ति** (३७६)–ज्याच्या सार्वजनिक हित करण्याच्या कार्यामध्यें कोणीहि अडथळा करूं शकत नाहीं.

४ **चर्षणीनां सम्राट्** (१४४)– जनांचा हा खरा सम्राट् आहे.

५ **शत-क्रतुः** (११६)– शेंकडों प्रकारचीं कार्यें करणारा, शेंकडों प्रकारच्या बुद्धि व युक्त्या ज्याच्याजवळ आहेत व त्यांच्या योगानें तो जनतेचें उत्तम हित करूं शकतो.

इन्द्राचें बल

इन्द्र हा विद्वान् आहे तसाच तो बलवान्ही आहे. पहा—

१ **सत्वा** (११५)– सत्ववान्, बलवान्.

२ **शाकिन्** (११५)– शक्तिमान्.

३ **शक्रः** (१४०)– सामर्थ्यवान्.

४ **वृषन्तमः** (१४८)– अत्यन्त सामर्थ्यवान्, सर्वांपेक्षां बलवान्.

५ वृषभः, वृषा (११९)- बलवान्, पाऊस पाडणारा.

६ तुवि-ग्रीवः (१४२)- मोठा गळा ज्याचा आहे असा. गळा मोठा असला म्हणजे डोकें कांपत नाहीं.

७ मंहिष्ठः (१४४)- मोठा, शक्तिनें मोठा.

८ इन्द्रः महान् परः (१६६)-इन्द्र मोठा श्रेष्ठ आहे.

९ वज्रिणे महत्वं अस्तु (१६६)-वज्रधारी इन्द्राला मोठेंपण आहे.

१० महा-हस्ती (१६७)- इन्द्राचे हात मोठे सशक्त आहेत.

११ त्वत्तः उत्तरः ज्यायान् न किं अस्ति (२०३) -तुझ्याहून अधिक बलवान् कोणीहि नाहीं.

१२ यथा त्वं एवं न कि (२०३)- जसा तूं आहेस तसा दुसरा कोणीहि नाहीं.

१३ अमित-ओजाः (३५९)-अपरिमित सामर्थ्यानें युक्त.

१४ शची-पतिः (२५३)- शक्तिचा स्वामी, सामर्थ्यवान्.

१५ स्वर्वान् (२५४)- आत्मशक्तिनें युक्त.

१६ शविष्ठः धृष्णः (३४७)- बलवान् व शत्रूवर आक्रमण करणारा.

१७ इन्द्रियं त्वा आपृणक्तु (३४७)- इन्द्रियांच्या उत्तम शक्ति तुझ्याकडे भरपूर असोत.

१८ सहसः बलात् ओजसा अधिजातः (१२०)- साहस, बल व सामर्थ्य यांनीं जन्मापासून प्रसिद्धीस आलेला.

१९ सर्वं ते वशे (१२६)- तुझ्या आधीन सर्व आहे.

२० ऊतये तवस्तरं इन्द्रं हवामहे (१६३) -आत्म-संरक्षणासाठीं आम्ही महाबलवान् इन्द्राला सहाय्यासाठीं बोलावतों.

२१ शवः प्रथिना (१६६)- त्याचें बल वाढतच असतें.

२२ त्वां न अतिरिच्यते (१९७)- तुझ्याहून बला-मध्यें कोणीहि मोठा नाहीं.

२३ वन्दद्वीरः (३६०)- ज्याला वीर पुरुष नेहमीं वन्दन करतात, असा अप्रतिम शूर इन्द्र आहे.

२४ वाजी वाजिनं ददातु (१९९)- बलवान् इन्द्र आम्हांस बल देवो, आम्हांस बलवान् करो. आम्हांस बलवान् वीरांचें सहाय्य देवो.

२५ सत्रा विश्वानि पौंस्या आ भर (२६२)- सर्व सामर्थ्यें एकाच वेळीं आम्हांस प्राप्त होवोत.

२६ अस्य तत् ओजः तित्विषे यत् उभे रोदसी चर्म इव समवर्तयत् (१८२)- याचें तें सामर्थ्य चमकत आहे कीं ज्याच्या योगानें दोनही द्यावा-पृथिवी यानें चामड्या-प्रमाणें गुंडाळून ठेवल्या आहेत.

२७ त्वावतः परे मणिः अरं गमेम (२०९)- तुझ्या सहाय्यानें सुरक्षित होऊं व तुझ्या आश्रयानें राहून कृतकृत्य होऊं.

२८ शग्धि (२७४)- तूं सामर्थ्यवान् आहेस.

२९ वीरं नाम श्रुत्यं शाकिनं इन्द्रं गाय (२६५)- इन्द्र वीर आहे, शत्रूला नमवणारा आहे, प्रसिद्ध बलवान् आहे म्हणून त्याचें गुणवर्णन करा. गुणांचें गायन करा.

३० परावति वृषा, अर्वावति वृषा, वृषा हि श्रृण्विषे, सत्यं वृषा असि, वृषजूतिः नः अविता (२६३)- तूं दूर बलवान् आहेस, जवळही बलवान् आहे, तुझी बलवान् म्हणून कीर्ति ऐकत आहों, खरोखर तूं बलवान् आहेस. बलानें तूं आमचें संरक्षण करतोस.

वृषा- याचा दूसरा अर्थ कामनांचें वर्षण करणारा, कामनांची पूर्ति करणारा असाही आहे.

३१ अ-देवः मर्त्यः सीं तं न आप (२६८)- ईश्वरा-ची उपासना न करणारा तें अन्न प्राप्त करूं शकत नाहीं. अर्थात् इन्द्राची उपासना करणारा हवें तें योग्य अन्न प्राप्त करतो.

३२ विश्वासु समत्सु हव्यः (२६९)- सर्व युद्धां-मध्यें सहाय्यासाठीं बोलावण्यास इन्द्र योग्य आहे. असा तो शक्तिमान् आहे.

३३ युध्मः, खज-कृत्, पुरन्दरः अलर्षि (२७१)- इन्द्र युद्धकरण्यांत कुशल, युद्ध करणारा, शत्रूचीं नगरें तोड-णारा आहे, तो आमच्या सहायाला येवो.

३४ शश्वतीनां पुरां भेत्ता (२७५)- शाश्वत टिक-णाऱ्या नगरांना तोडणारा इन्द्र आहे.

३५ चर्षणीनां राजा, रथेभिः अध्रिगुः, याता, विश्वासां पृतनानां तरुता, वृत्रहा, ज्येष्ठः गृणे (२७३)- सर्व मानवांचा हित करणारा राजा, रथांनीं पुढें जाणारा, सर्वांपुढें जाणारा, शत्रूवर आक्रमण करणारा, सर्व शत्रुसैन्या-चा नाश करणारा, वृत्रला मारणारा असा श्रेष्ठ इन्द्र आहे, त्याची मी प्रशंसा करतों.

३६ द्यावा-पृथिवी शतं स्युः, भूमीः शतं स्युः, सहस्रं सूर्याः, न त्वा अनु अष्ट, अनु जातं न अनु अष्ट, रोदसी न अनु अष्ट (२७८)- द्यावा-पृथिवी,

भूमि या शेंकडों असोत, सहस्रावधि सूर्य होवोत, ते सर्व तुझी बरोबरी करूं शकत नाहींत, पाठीमागून झालेले पदार्थ बरोबरी करूं शकत नाहींत.

३७ यतः इन्द्र भयामहे, ततः नः अभयं कृधि (२७४)- हे इन्द्रा ! जेथून आम्हांस भय होईल, तेथून तूं आम्हांस निर्भय कर.

३८ नः ऊतये द्विषः विजाहि, मृधः विजाहि (२७४) - आमच्या संरक्षणासाठीं द्वेष करणाऱ्या शत्रूंना जिंक, दुष्टांचा पराभव कर.

३९ ते सखा अश्वी, रथी, गोमान्, सुरूपः, श्वात्रभाजा वयसा सदा सचते । चन्द्रैः सभां उपयाति (२७७)- तुझा मित्र इन्द्र घोडे बाळगणारा, रथांत बसणारा, गाई बाळगणारा, सुरूप, लवकर कार्य करण्याच्या वयानें-तारुण्यानें युक्त असतो. तो आभूषणें धारण करून सभेमध्यें जातो.

४० इन्द्र हरी युयोजते (२६८)- इन्द्र घोडे आपल्या रथाला जोडतो.

४१ इन्द्रः हर्योः संमिश्लः, वज्री हिरण्ययः (२८९)- इन्द्र घोडे बाळगतो, वज्र धारण करतो व तेजस्वी आहे.

४२ सत्रा-हा विश्व-चर्षणिः तं वयं हूमहे (२८६)- इन्द्र सर्व शत्रूंना एकदम ठार करतो, सर्व मानवांचें कल्याण करतो, म्हणून त्याला आम्ही मदतीला बोलावतों.

४३ प्रशर्धः (२७९)- शत्रूनाशक बलानें युक्त इन्द्र आहे.

४४ अनवे पुरु नृषूतः असि (२७९)- मानवांच्या हितासाठीं सर्व मानव तुझी पुष्कळ प्रार्थना करतात.

४५ त्वा कः मर्त्यः आदधर्षति (२८०)- तुला कोण मनुष्य भय दाखवूं शकतो बरें ? (कोणीहि इन्द्राला भय दाखवूं शकत नाहीं.)

४६ ते श्रद्धा वाजी पार्ये दिवि वाजं सिषासति (२८०)- तुझ्यावर श्रद्धा ठेवणारा बलवान् होतो व शेवटच्या दिवशीं सुद्धां धनदान करूं शकतो.

४७ अ-जरं, प्रहेतारं, अ-प्रहितं, आशुजेतारं, होतारं, रथीतमं, अ-तूर्तं, ऊतये इतः (२८३)- जरारहित, प्रेरणा देणाऱ्या, मार्गे न फिरणाऱ्या, शत्रूला शीघ्र जिंकणाऱ्या, दान देणाऱ्या, रथांत बसणाऱ्या, कोणाकडूनहि पराजित न होणाऱ्या इन्द्राला इकडे आपणाकडे बोलवा, सहाय्यासाठीं त्याला आपल्याकडे आणा.

४८ सु आपे ! स्वापिभिः आ (२८२)- हे उत्तम मित्रा इन्द्रा ! आपल्या उत्तम मित्रांसह इकडे ये. आमच्याकडे आमच्या सहाय्यासाठीं ये.

४९ सहस्रमन्यो तुविनृम्ण, सत्पते ! समत्सु नः वृधे भव (२८६)- हे सहस्र उत्साहयुक्त, बहुत बलिष्ठा, सज्जनांच्या पालका, युद्धांमध्यें आमचा उत्कर्ष करणारा हो.

५० त्वा वाघतः अस्मत् आरे मा निरमत् (२८४)- तुझी स्तुति करणारे भक्त तुला आमच्यापासून दूर न रममाण करोत.

५१ आरात्तात् नः सधमादे सु आगहि (२८४)- आमच्याजवळ यज्ञामध्यें ये.

५२ महे शुल्काय त्वा न परा देयां, न शताय न सहस्राय न अयुताय परा देयां (२९१)- मोठें धन मिळालें तरी मी तुला दूर करणार नाहीं, शंभर, हजार अथवा दहा हजार मिळाले तरी मी तुला देणार नाहीं.

इन्द्राचें बल असें वर्णिलें आहे. आतां त्याचें शौर्य पहा--

इन्द्राचें शौर्य

१ मद्यः शूरः वीरः (१२३)- आनन्द देणारा, शूर व वीर इन्द्र आहे.

२ अनाभयिन् (१२४) - निर्भय, भयरहित.

३ अनानतः (१४२) - कोणापुढें न नमणारा.

४ अस्ता (१२५)- दाता, शत्रूवर शस्त्र फेंकणारा.

५ नरः (१४४), **प्रनेता** (१९३)- नेता, विशेष शूर नेता.

६ त्वं ईशिषे (१६२)- तूं सर्वांचा ईश्वर आहेस.

७ अ-प्रति-ष्कुतः (१७९)- ज्याचा विरोध कोणी करूं शकत नाहीं.

८ सदा-वृध (१६९)- नेहमीं वृद्धिगत होणारा.

९ स्थिरः (२००)- युद्धामध्यें स्थिर राहणारा.

१० विश्वा-साहं चर्षणीनां मंहिष्ठं इन्द्रं अभि प्रगायत (१५५)- सर्व शत्रूंचा पराभव करणारा, सर्व लोकांमध्यें श्रेष्ठ असलेल्या इन्द्राचें वर्णन करा.

११ महद् भयं अभीषत् अप चुच्युवत् (२००)- मोठें भय आलें तर तें दूर करतो.

१२ वृत्रहणं, पुरु धस्मानं, वृषभं, स्थिरप्सुं, वज्रिणं, भृष्टिमन्तं गृणे (३२७)- वृत्राला मारणाऱ्या, पुष्कळांनीं पूजलेला, बलवान्, नित्य दुष्टनाशक, वज्रधारी, शत्रूनाशक इन्द्राची मी स्तुति करतों.

१३ त्यत् जायमानः, अ-शत्रुभ्यः सप्तभ्यः शत्रुः त्वं अभवः (३२६)- तूं उत्पन्न होतांच ज्यांना शत्रू उरले

नव्हते त्या सात राक्षसांचा तूंच एकटा शत्रू झालास.

१४ बहूनां दद्राणं युवानं पलितः जगार (३२५)- पुष्कळांना फाडणाऱ्या तरुण शत्रूला सफेत केसांचा वृद्ध वीर ही पराभूत करतो. (जर इन्द्र त्याच्या सहाय्याला येईल.)

१५ वाजसातौ अस्मिन् भरे नृतमं इन्द्रं हुवेम (३२९)- बलानें होणाऱ्या युद्धामध्यें नरश्रेष्ठ इन्द्राला सहाय्यासाठीं बोलावतों.

१६ शृण्वन्तं उग्रं समत्सु वृत्राणि घ्नन्तं इन्द्रं हुवे (३२९)- भक्तांची प्रार्थना ऐकणाऱ्या उग्रवीर व युद्धांमध्यें वृत्रांना मारणाऱ्या इन्द्राला मी सहाय्याला बोलावतों.

१७ त्रातारं अवितारं हवे हवे सुहवं शक्रं इन्द्रं हुवे (३३२)- रक्षण करणाऱ्या व संरक्षक आणि प्रत्येक युद्धांत सहाय्यासाठीं बोलवल्या जाणाऱ्या सामर्थ्यवान् इन्द्राला मी बोलावतों.

१८ वज्र-दक्षिणं विव्रतानां हरीणां रथ्यं इन्द्रं यजामहे (३३४)- आपल्या उजव्या हातांत वज्र धारण करणाऱ्या, वेगवान् घोडयांच्या रथांत बसणाऱ्या इन्द्राचें यजन करीत आहों.

१९ सत्रासाहं दाधृषिं तुम्रं महां अपारं वृषभं सुवज्रं (३३५)- शत्रूंचा एकदम नाश करणाऱ्या, शत्रूला भयभीत करणाऱ्या, शत्रूला दूर करणाऱ्या, मोठ्या अपार भक्तिच्या वज्रधारी इन्द्राची प्रशंसा करतों.

२० इन्द्रा-पर्वता वामी सु-वीरा (३३८)- इन्द्र व पर्वत हे प्रशंसनीय असे उत्तम वीर आहेत.

२१ अयं शिप्री ओजसा पुरः विभिनत्ति (२९७)- हा शिरस्त्राण घालणारा इन्द्र आपल्या बलानें शत्रूंच्या नगरांना तोडतो.

२२ महे वीराय तवसे तुराय विरप्शिने वज्रिणे स्थविराय असै अपूर्व्या पुरुतमानि शंतमानि वचांसि तक्षुः (३२२)- मोठा वीर, बलवान्, त्वरेनें कार्य करणारा, थोर, वज्रधारी, वृद्ध अशा या इन्द्राला अपूर्व, पुष्कळ शान्ति वाढवणारीं स्तोत्रें म्हटलीं जात आहेत.

२३ इमाः विश्वाः पृतनाः जयासि (३२४)- या सर्व शत्रूसेनांवर तूं विजय मिळवतोस.

२४ द्रप्सः दशभिः सहस्रैः इयानः कृष्णः अंशुमतीं अवातिष्ठत्, शच्या धमन्तं तं इन्द्रः आवत् नृमणाः स्निहातिं अधद्राः (३२३)- आक्रमण करणारा कृष्ण असुर आपल्या दहा हजार सैनिकांसह अंशुमती नदीवर येऊन पोंचला. आपल्या आक्रमणानें श्वास लागलेल्या त्या असुराला घेरून, मानवांचें हित करण्याच्या इच्छेनें इन्द्रानें त्या हिंसक सेनेला नष्ट करून टाकलें.

२५ यत् पार्या धियः युनजते, नरः नेमधिता इन्द्रं हवन्ते (३१८)- जेव्हां संकटांतून पार होण्याची बुद्धि होते तेव्हां संग्रामांत सांपडलेले लोक इन्द्राला आपल्या सहाय्याला बोलावतात.

नेमधिता संग्राम.

२६ यत् शासः सदसः परि अव्रतं च्यावय (२९८)- तूं शासक आहेस यासाठीं आमच्या मंडळीमधून व्रत न पाळणाऱ्या अधार्मिकाला दूर कर.

२७ भरे भरे हव्यः (३०९)- प्रत्येक युद्धामध्यें सहाय्यासाठीं इन्द्र बोलावण्यास योग्य आहे.

२८ दिवः सदोभ्यः ओजसा प्र रिरिक्षे (३१२)- दिव्यस्थानांतहि तूं श्रेष्ठ आहेस.

२९ नः अविता वृधे च असः (३१४)- आमचा रक्षक व आमची वृद्धि करणारा तूं आहेस.

३० त्वं यावतः ईशिषे एतावत् अहं ईशीय (३१०)- तूं जेवढ्यावर अधिकार करीत आहेस, तेवढ्यावर माझा अधिकार असावा.

३१ न पापत्वाय रंसिषम् (३१०)- पापांमध्यें आम्ही रमूं नये, असें कर.

या प्रमाणें इन्द्राचें वर्णन सामवेदामध्यें आलेलें आहे. हे गुण मनुष्यांनीं पहावे व आपणामध्यें हे गुण वाढतील असें करावें. " यद्देवाः अकुर्वन्स्तत्करवाणि " जसें देवांनीं आचरण केलें तसें मी आचरण करावें. हा नियम मनुष्यांनीं लक्ष्यांत ठेवून त्या प्रमाणें करावयाचें आहे. इन्द्राचे हे गुण येथें या मंत्रसंग्रहामध्यें एवढ्यासाठीं सांगितले आहेत कीं, मनुष्यांनीं इन्द्राप्रमाणें शूर, वीर, उत्साही, सततपरिश्रमी, युद्धामध्यें कुशल, उदार, जनतेचा तारक व संरक्षक बनावें.

इन्द्राचे चार दोन मंत्रही जरी लक्ष्यांत ठेवले व त्यांत वर्णिलेले इन्द्राचे गुण आपल्या अंगीं आणण्याचा प्रयत्न केला तरी तेवढ्यानें मनुष्याची उत्कृष्ट उन्नति झाल्याशिवाय राहणार नाहीं असे हे गुण आहेत.

आतां आपण इन्द्राच्या युद्धनैपुण्याबद्दलचें जें वर्णन आहे त्याचा विचार करूं—

इन्द्राचें युद्धनैपुण्य

इन्द्र हा विश्वराज्यामधील संरक्षणमंत्री किंवा युद्धमंत्री आहे. या कार्यासाठीं त्याला वारंवार शत्रूंबरोबर युद्ध करावेंच लागतें. तेव्हां हें आवश्यक असलेलें युद्ध तो कसें करतो, त्याच्या अंगीं युद्धकुशलता कशी आहे तें आतां आपण पाहूं—

१ नृ-षाहः (१४४)-शत्रूच्या वीरांचा पराभव करणारा.

२ अद्रिवः (१९४)- वज्र हातांत धरून लढणारा, (अद्रि-वः) पर्वताच्या किल्ल्यांत राहणारा, अथवा किल्ल्यांत राहून लढणारा.

३ पृतनासहः वीरः (४०५)- शत्रूच्या सैन्याचा पराभव करणारा वीर.

४ स्वराज्यं अनु अर्चन्, त्यं मायिनं मृगं वृत्रं मायया अवधीः (४१२)- स्वराज्याची अर्चना करण्यासाठीं त्या मायावी वृत्रासुराचा मायवीपणानेंच वध केला. वृत्रासुर हा कपटानें लढत असे. त्याला इन्द्रानेंहि कपट प्रयोग करून ठार मारलें. कपटी शत्रूंशीं कपटानें वागावें हा बोध येथें मिळतो. तसेंच स्वराज्याचें रक्षण करण्यासाठीं म्हणजे स्वराज्यांतील प्रजेचें संरक्षण करण्यासाठीं सर्व कपटी शत्रूंचा नाश करावा लागतो हाही उपदेश येथें मिळतो.

५ यः एकः इत् विश्वाः कृष्टीः अभ्यस्यति (३८७)- हा एकटाच इन्द्र शत्रूच्या सर्व सैनिकांचा पराभव करतो. इतकें याचें सामर्थ्य व युद्धकौशल्य आहे.

६ विश्वतोदावन् (४३७)- सर्व शत्रूंचा उच्छेद करतो.

७ विश्वस्य प्रस्तोभः (४५०)- सर्व शत्रूंचा विध्वंस इन्द्र करतो.

८ यः कृष्णगर्भाः निरहन् (३८०)- कृष्ण नांवाच्या असुराच्या गर्भवती स्त्रियांचाहि यानें नाश केला. कृष्ण नांवाचा असुर होता. तो लोकांना फारच त्रास देत असे. दहा दहा हजार राक्षसांचें सैन्य घेऊन तो आक्रमण करीत असे. सर्व सैन्यासह त्याला तर इन्द्रानें ठार केलेंच, पण त्याचा वंश पुढें राहूं नये यासाठीं त्याच्या गर्भवती स्त्रियांनाही मारून टाकलें.

९ वृत्रहन्तमं शर्धं श्रुतं, चर्षणीनां महे राधसे प्र आशिषे (२०८)- वृत्र नांवाच्या असुराचा नाश करण्यामध्यें इन्द्राचें जें बल प्रसिद्ध झालें तें सर्वांनीं ऐकलेंच आहे. हें सर्व इन्द्रानें एवढ्यासाठीं केलें कीं यामुळें प्रजाजनांचें मोठें कल्याण व्हावें. वृत्रासुर जनतेला त्रास देत असे, तो त्रास दूर व्हावा यासाठीं त्याला इन्द्रानें ठार मारलें व त्यामुळें प्रजाजनांची मोठी उन्नति, प्रजाजनां ची उत्तम सांपत्तिक स्थिति झाली व प्रजाजनांचें सुख वाढलें.

१० पृक्षु-सासहिं लोककृत्नुं मदं हरिश्रियं गृणीमसि (३८३)- युद्धांमध्यें शत्रूंचा पराभव करणाऱ्या, लोकांचें कल्याण करून त्यांस आनंदित करणाऱ्या व लोकांची संपत्ति वाढवणाऱ्या इन्द्राची प्रशंसा आम्ही करतों. 'हरि' पदाचा अर्थ 'मनुष्य' असा आहे. 'हरिरिति मनुष्य नाम' (निघंटु २।३।१०) लोकांची श्री वाढवणारा इन्द्र आहे.

११ तं महत्सु आजिषु अर्भे चित् ऊतिं हवामहे (४११)- त्या इन्द्राला मोठ्या युद्धांत व लहान लढाईंत आमच्या संरक्षणासाठीं आम्ही बोलावतों.

१२ सः वाजेषु नः प्राविषत् (४११)- तो इन्द्र युद्धांमध्यें आमचें उत्तम संरक्षण करतो. असा पराक्रमी तो आहे.

१३ ते शवः नृम्णं (४१३)- तुझें बल शत्रूंना नमवणारें आहे.

त्वं नः नृम्णं ओजः आभर- तूं आम्हांला शत्रूंना नमवणारें बल भरपूर दे.

१४ उपाकयोः हस्तयोः आयसं वज्रं श्रिये निदधे (४२३)- आपल्या हातांत पोलादी वज्र कल्याण व्हावें यासाठीं तूं धारण करतोस.

१५ प्रेहि, अभीहि, धृष्णुहि, न ते वज्रो नियंसते (४१३)- शत्रूवर आक्रमण कर, चारही बाजूंनीं आक्रमण कर, शत्रूचा नाश कर, तुझें वज्र पराभूत होणारें नाहीं. याठिकाणीं 'प्रेहि, अभीहि, धृष्णुहि' हे तीन शब्द युद्धाच्या कलेंचें वर्णन करीत आहेत. 'प्रेहि' म्हणजे शत्रूसेनेवर हल्ला चढवणें, 'अभीहि' म्हणजे चारहि बाजूंनीं शत्रूला घेरून शत्रूची मध्यें कोंडी करून त्यावर हल्ला करणें व 'धृष्णुहि' म्हणजे शत्रूचें धर्षण करणें, शत्रूला ठार मारणें व अन्य रीतिनें त्याचा नाश करणें इन्द्र या सर्व युद्धाच्या प्रकारांमध्यें कुशल होता.

१६ अरंगमाय जग्मये अपश्चादध्वने (३५२)- इन्द्र पूर्णरीतिनें शत्रूवर हल्ला करीत असतो, शत्रूवर चाल करून जातो व चालून जाण्यांत उशीर करीत नाहीं, वेळेवर जावयाचें तेथें पोंचतो. हे तीनही गुण वीरामध्यें आवश्यक आहेत. शत्रूवर चालून जाणें, शत्रूचा पूर्णपणें मोड करणें व योग्य वेळेवर हल्ला करणें हें आवश्यकच आहे.

१७ पुरां भिन्दुः, युवा कविः, अमितौजाः, विश्वस्य कर्मणः धर्त्ता, अजायत (३५९)- शत्रूच्या नगरांचा पाडाव करणारा, तरुण ज्ञानी, अपरिमित सामर्थ्यवान्, सर्व कर्मांचें धारण करणारा असा इन्द्र झाला आहे. असा हा वीर आहे.

१८ पुरं धृष्णुं अर्चत (३६२)- शत्रूच्या नगराचा नाश करणाऱ्या इन्द्राची अर्चना करा.

१९ इन्द्रो विश्वस्य राजति (३५६)- इन्द्र विश्वाचा राजा आहे. विश्वाचें आधिपत्य इन्द्राच्याजवळ आहे. इतका तो सामर्थ्यवान् आहे.

२० ऊतये सुम्नाय तुवि-कूर्मिं ऋतीषहं सत्पतिं इन्द्रं वर्तयामसि (३५४)- आमचें रक्षण व्हावें यासाठीं सुखदायी, विविध सामर्थ्याचीं कार्यें करणाऱ्या, हिंसक, शत्रूंचा पराभव करणाऱ्या, सज्जनांचें पालन करणाऱ्या इन्द्राला आम्हीं इकडे आणतों.

२१ पुरु-निःषधे इन्द्राय उक्थं शंस्यम् (३६२)- पुष्कळ शत्रूंचा नाश करणाऱ्या इन्द्राची प्रशंसा करणारें स्तोत्र म्हणा.

२२ विश्वानरस्य अनानतस्य शवसः पतिं हुवे (३६४)- विश्वाचा नेता, कोणापुढेंहि आपलें डोके न नमवणारा बलाचा स्वामी इन्द्र आहे, त्याला मी सहाय्यासाठीं बोलावतों.

२३ चर्षणीनां रथानां एवैः ऊती हुवे (३६४)- मानवांच्या व रथांच्या संरक्षणाच्या साधनांनीं आमचें रक्षण व्हावें यासाठीं इन्द्राला सहाय्यासाठीं बोलावतों.

२४ विश्वाः पृतनाः नरः अभिभूतरं आमुरिं उग्रं ओजिष्ठं तरसं तरस्विनं इन्द्रं राजसे ततक्षुः (३७०)- सर्व नेता मनुष्यांनीं दुराचारी शत्रूंचा पराभव करणाऱ्या, शत्रूंना मारणाऱ्या, उग्र, बलवान्, तारक व सामर्थ्यवान् इन्द्राला राजा करण्यासाठीं प्रकट केलें.

२५ यः सदावृधं, विश्वगूर्तं, ऋभ्वपसं, ओजसा अधृष्टं धृष्णुं इन्द्रं यज्ञैः चकार (२४३)- जो सदा वाढणाऱ्या, सर्वांनीं प्रशंसनीय, महाबुद्धिमान्, आपल्या मोठ्या सामर्थ्यामुळें ज्याचा कधींहि पराभव होत नाहीं, व शत्रूंचा पराभव करणाऱ्या इन्द्राची यज्ञानीं भक्ति करतो (तो मोठा होतो).

२६ तं कर्मणा न किः नशत् (२४३)- त्याचा नाश कोणीहि कोणत्याही कर्मानें करूं शकत नाहीं.

२७ पृक्षु नः तनूषु नृम्णं आधेहि, सत्राजित् पौंस्यं आधेहि (२३१)- हे इन्द्रा ! आमच्या प्रजांच्या शरीरांमध्यें पुष्कळ बल ठेव व सर्व शत्रूंना एकदम मारण्याचा पुरुषार्थहि वाढव.

२८ कारवः वाजसातौ त्वां हवामहे (२३४)- आम्ही कर्म करणारे युद्धामध्यें तुलाच सहाय्यासाठीं बोलावतों.

२९ वृत्रेषु सत्पतिं नरः हवन्ते, अर्वतः काष्ठासु त्वा हवन्ते (२३४)- वृत्रादि असुरांबरोबर युद्ध करण्याच्या वेळीं, नेते लोक तूं सज्जनांचा पालक आहेस, यासाठीं सहाय्याकरितां तुलाच बोलावतात. प्रयत्नांची पराकाष्ठा झाल्यानंतर आपल्या सहाय्यासाठीं तुलाच बोलावतात.

३० उभे रोदसी त्वा अनुधावतां (३७१)- दोनही द्यौ व पृथिवी तुझ्या अनुकूल राहूनच धावत आहेत.

३१ पृथिवी ते शुष्माद् अभ्यसाते (३७१)- पृथिवी तुझ्या बलापुढें भीत असते. असें इन्द्राचें बल आहे.

३२ सत्राजितः अक्षित ऊतयः, वाजयन्तः रथाः इव, गिरः उदीरते (२५१)- एकदम सर्व शत्रूंचा पराभव करणारे, ज्यांच्या जवळचीं संरक्षणाचीं साधनें वाढत आहेत, असे तुझे भक्त, बलवान् रथांप्रमाणें, स्तोत्रें म्हणत असतात. तुझें-इन्द्राचें महात्म्य वर्णन करतात.

याप्रमाणें इन्द्राच्या युद्धकौशल्याचें वर्णन सामवेदानें केलेलें आहे. हें पाहिलें म्हणजे इन्द्राची केवढी शक्ति होती त्याची कल्पना करतां येईल.

येथें इन्द्राचें वर्णन करण्याचा उद्देश हा आहे कीं इन्द्रा प्रमाणें आपल्या वीरांनीं आपल्या राष्ट्राची तयारी करावी व आपलें राष्ट्र असें सामर्थ्यसंपन्न करावें.

इन्द्रानें आपणाकडे वज्र ठेवले होतें. तसें शेंकडों धारांचे पोलादी वज्र आपण तयार करावें व वापरावें असा उद्देश येथें नसून, त्याच्याजवळ असें अद्ययावत् तीक्ष्ण वज्र होतें, त्याप्रमाणें आपणाजवळ अद्ययावत् शस्त्रें असावीं हा उपदेश येथें घ्यावयाचा आहे.

याचप्रमाणें इतर उपदेशांविषयीं समजावें. इन्द्र आपल्या शत्रूंचा नाश करतो तसा शत्रूंचा नाश आपण करावयाचा आहे. शत्रूनाशाचीं साधनें वेळाप्रमाणें बदलतील. पूर्वीं धनुष्य व बाण होते, आज अणुशस्त्रें असतील. दोनही वेळीं शत्रूचा समूळ नाश हा मुख्य भाग आहे. तो ज्या साधनांनीं साधेल तीं साधनें त्यावेळीं वापरावीं व शत्रूचा त्रास दूर होईल असें करावें.

शत्रूचा नाश

इन्द्राचें मुख्य कार्य सर्व प्रजेचें उत्तम संरक्षण करणें हें आहे. जे शत्रू येतील त्यांचा समूळ नाश करावा, व प्रजाजनांचें संरक्षण करावें, हें इन्द्र करीत असतो. तेंच वेदमंत्रांनें म्हटलें आहे. पहा---

१ महे वृत्राय हन्तवे इन्द्रं वाजयामसि (११९)- मोठ्या वृत्राचा वध करण्यासाठीं आम्हीं इन्द्राचें स्तोत्र गात असतों. वृत्र म्हणजे (आवृणोति इति वृत्रः) जो चारही बाजूंनीं घेरतो तो वृत्र होय. असा शत्रू आला तर त्यासाठीं इन्द्राला बोलवावा.

२ वृत्र-हा (१२६)- वृत्राचा वध करणारा इन्द्र आहे. इन्द्राचें हें नांवच आहे.

३ वयं महाधने अर्भे इन्द्रं हवामहे (१३०)- आम्ही मोठ्या युद्धांत तसेंच लहान लढाईत आमच्या सहाय्यासाठीं इन्द्राला बोलावतों.

४ वृत्रेषु युजं वज्रिणं हवामहे (१३०)- वृत्रांशीं होणाऱ्या संग्रामांमध्यें वज्रधारी इन्द्राला मित्र म्हणून सहाय्यासाठीं बोलावतों. येथें ' वृत्रेषु ' असा बहुवचनी प्रयोग आहे. अनेक वृत्र आहेत. वृत्र म्हणजे एक शत्रू असा अर्थ नसून, घेरणारे अनेक शत्रू, असा अर्थ आहे. इन्द्रानें अशा सर्व शत्रूंचा नाश केला.

५ तत् त्वा युजा वनेम (१२८)- अशा शत्रूंना तुझ्याबरोबर राहून तुझ्या सहाय्यानें मारून टाकूं. इन्द्र बरोबर असला म्हणजे त्याच्या मदतीनें आमची शक्ति वाढत असते.

६ आदिशः सूरः अक्तुषु नः मा अभ्यायमत् (१२८)- आज्ञा करणारे शक्तिमान् राक्षस अथवा शत्रू रात्रीमध्यें आमच्यावर आक्रमण न करोत. ' आदिश ' आदेश देणारे. असें कर व असें करूं नकोस अशी आज्ञा करणारे शत्रू. ' सूरः ' (सु-उरः) ज्यांची छाती मोठी आहे असे धिप्पाड छातीचे शत्रू रात्रीच्या वेळीं आमच्यावर चाल करून न येवोत. आले तर हे इन्द्रा ! तूं आमचें रक्षण कर.

आदिशः- आदेश देणारे, शस्त्रें फेंकणारे.

सूरः- सतत गमन करणारे, विशाल छाती असलेले.

७ सहस्र-बाहे तत्र पौंस्यं आददिष्ट (१३१) सहस्र सैनिकांना बरोबर घेऊन हल्ला करणाऱ्या शत्रूवर जेव्हां इन्द्र चाल करून गेला तेव्हां त्याचें सामर्थ्य प्रकट झालें.

८ विश्वाः द्विषः अप भिन्धि (१३२)- सर्व शत्रूंना ठार कर.

९ बाधः मृधः परिजहि (१३२) बाधा करणारे जे शत्रू आहेत त्यांचा पराभव कर.

१० इन्द्रः दधीचो अस्थभिः नवनवतीः वृत्राणि जघान (१७९)- इन्द्रानें दधीचाच्या शस्त्रांनीं नऊ वेळां नव्वद वृत्रांना ठार केलें. ९×९०= ८१० वृत्रांचा नाश इन्द्रानें केला.

दधीचः अस्थभिः- दधीचाच्या अस्थि. दधीचानें अस्थि दिल्या व त्याच्यापासून बनलेल्या शस्त्रांनी इतक्या राक्षसांचा नाश केला. ही आलंकारिक कथा आहे.

११ ओजसा महान अभिष्टिः (१८०)- आपल्या सामर्थ्यानें मोठ्या शत्रूचा पराभव करणारा.

१२ ब्रह्मद्विषः अवजहि (१९४)- ज्ञानाचा द्वेष करणाऱ्यांचा पराभव कर.

१३ विश्वाः स्पृधः अजयः, इन्द्रः अपां फेनेन शिरः उदवर्तयः (२११)- सर्व शत्रूंचा पराभव केला व इन्द्रानें पाण्याच्या फेणानें नमुची राक्षसाचें मस्तक फोडलें.

' अपां फेनः '- हा समुद्रफेण आहे. ' न-मुचिः ' लवकर दूर न होणारा रोग. अशा रोगावर समुद्रफेण हें अनुपान आहे. ही कथा आलंकारिक आहे.

१४ अप्रतीनि पुरु-वृत्राणि अनुत्तः, चर्षणीधृतिः, एक इत् हंसि- (२४८)- अप्रतिम असे पुष्कळ वृत्र, स्वतः पराभूत न होतां, सर्व लोकांचें हित व्हावें यासाठीं, एकट्यानेंच ठार केलेस.

१५ वृत्र-हा शतक्रतुः शतपर्वणा वज्रेण वृत्रं हनति (२५२)- वृत्राला मारणाऱ्या शेंकडों कार्यें करणाऱ्या इन्द्रानें शेंकडों धारा असलेल्या वज्रानें वृत्राला ठार मारलें.

१६ इन्द्राय वृत्रहन्तमं बृहत् गायत (२५८)- इन्द्रासाठीं वृत्राला ठार मारण्याचें स्तोत्र बृहत् नांवाचें साम गायन करा.

१७ त्वं प्रतूर्तिषु विश्वाः स्पृधः अभ्यसि (३११)- तूं युद्धांमध्यें सर्व शत्रूंचा नाश करतोस.

१८ तूर्यः (३११)- शत्रूचा विनाश करणारा.

१९ अशस्ति-हा (३११)- अप्रशस्तांचा नाश करणारा.

२० जनिता (३११)-शत्रूंवर आपत्ति आणण्याचा जनक.

२१ तरुष्यतः वृत्र-तूः असि (३११)- विघ्नकरणाऱ्यांचा विनाशक.

२२ ते प्रथमाय मन्यवे श्रत् दधामि, यत् दस्युं अहन् (३७१)- तुझ्या प्रथम आलेल्या उत्साहावर मी श्रद्धा ठेवतों, कारण कीं तूं त्यानें शत्रूला ठार केलेंस.

२३ दिवोदासाय त्यत् शम्बरं अरंधयन् (३९२)- दिवोदासाच्या हितासाठीं तूं त्या शंबर राक्षसाला ठार केलेंस.

*

२४ येन अत्रिणं नि हंसि (३९४)- ज्यानें तूं खादाड शत्रूंना ठार करतोस.

२५ वृत्रेषु स्पर्धमानाः क्षितयः यं हवन्ते (३३७)- युद्धांमध्यें स्पर्धा करणारीं माणसें ज्याला सहाय्यासाठीं बोलावतात.

२६ युक्तेषु तुरयन्तः यं हवन्ते (३३७)- युद्ध सुरू होण्यानंतर युद्ध करणारे ज्याला सहाय्यासाठीं बोलावतात.

२७ शूरसातौ यं हवन्ते (३३७)- शूरांनीं ज्यांत लढावयाचें असतें अशा युद्धांमध्यें लढणारे लोक ज्याला आपल्या सहाय्यासाठीं बोलावतात. (तो श्रेष्ठ इन्द्र होय.)

२८ यः मर्तः नः वनुष्यन्, अभिदाति, मन्यमानः, क्षिधी युधा, शवसा उगणाः, तुरः त्वोताः वृषमणः अभिष्याम (३३६)- जो शत्रूचा मनुष्य आमची हिंसा करण्याच्या इच्छेनें, आमच्यावर चालून येतो, आपणाला बहुत सामर्थ्यवान् समजतो, विनाशक शस्त्रानें हल्ला करीत येतो, त्याच्यावर बलानें सर्वजण मिळून त्वरेनें कार्य करणारे आम्ही तुझ्या संरक्षणानें सुरक्षित झालेले बलवान् मनानें युक्त होऊन त्या सर्वांचा पराभव करूं.

२९ त्वं उत्सं अदर्दः (३१५)- तूं मेघाला फाडलेंस.

३० खानि व्यसृजः (३१५)- पाण्याचीं द्वारें मोकळीं केलींस.

३१ महान्तं पर्वतं धारा असृजत् (३१५)- मोठ्या पर्वतावरून पाण्याच्या धारा सोडल्यास.

३२ बद्बधानान् अर्णवान् अरम्णाः (३१५)- खवळणाऱ्या समुद्रांना आनंदित केलेंस.

३३ यत् दानवान् अवहन् (३१५)- तेव्हां तूं दानवांनां ठार केलेंस.

हें वर्णन मेघांतून पाऊस पाडण्याचें आहे. आलंकारिक रीतीनें मेघ हा राक्षस आहे व त्याला इन्द्रानें मारलें असें वर्णन केलें आहे.

३४ गोमतः जनस्य संस्थे श्वसन्तं त्वा युजा प्रति ब्रुवीमहि (४०३)- गाई बाळगणाऱ्या लोकांच्या संस्थेवर चालकरून येणाऱ्या व मोठ्यानें श्वास करणाऱ्या शत्रूला तुझ्या सहाय्यानें उत्तम उत्तर देऊं.

३५ स्वराज्यं अनु अर्चन् पृथिव्याः अहिं निः शशाः (४१०)- स्वराज्याचें संरक्षण करण्यासाठीं पृथिवीवर आलेल्या अहि नामक शत्रूचें तूं शासन केलेंस.

३६ सक्षणिः वृत्राणि परि, नः ऋणया द्विषः, तरध्यै, ईरसे (४२८)- तूं उत्साहसंपन्न आहेस, यासाठीं तूं शत्रूंना मारण्यासाठीं शत्रूनाशक सामर्थ्यानें द्वेष्टयांना दूर करण्याचा प्रयत्न करतोस.

इन्द्र आपल्या शत्रूंना ठार मारतो व असें करून तो शत्रूरहित होतो. यासाठीं त्याला प्रबल शक्तिसंपन्न व्हावें लागतें. या सर्व गोष्टी या वचनावरून वाचकांच्या ध्यानीं येतील. यासाठीं वाचकांनीं हीं वचनें वाचावीं व आपण कसें शक्तिसंपन्न व्हावें याचा विचार करावा. वाचकांनीं या दृष्टीनें याचें वाचन करावें व योग्य तो बोध प्राप्त करावा. जो वाचील व या रीतिनें अभ्यासील तो इन्द्राप्रमाणें शूरवीर व शत्रूला जिंकणारा होईल.

संरक्षण करणारा इन्द्र

सर्वच देवता मानवांचें संरक्षण करीत असतात, पण त्यांत इन्द्राचें संरक्षण विशेष महत्त्वाचें आहे. या विषयींचे मंत्रभाग पहा—

१ देवानां महत् अवः, ऊतये वयं आ वृणीमहे (१३८)- देवांचें मोठें संरक्षण आम्ही आमच्या रक्षणासाठीं स्वीकारतों.

२ कया ऊती, कया शचिष्ठया वृता, नः आभुवत् (१६९)- कोणत्या संरक्षणाच्या शक्तिसह, व कोणत्या सामर्थ्यानें युक्त होऊन तो इन्द्र आमच्याकडे येईल बरें ?

३ ऊतये सत्रा-साहं, विश्वासु गीर्षु, आयतं, आच्यावयसि (१७०)- आपल्या संरक्षणासाठीं, सर्व शत्रूंना एकदम ठार करणाऱ्या, सर्व स्तुतिनीं वाखाणलेल्या इन्द्राला आपल्याकडे बोलवा.

४ महीभिः ऊतिभिः अस्माकं अर्धं आगहि (१८१) -मोठ्या संरक्षणाच्या साधनांसह तूं आमच्याकडे ये.

५ प्रचेतसः यं रक्षन्ति, सः जनः न किः दभ्यते (१८५)- ज्ञानी ज्याचें संरक्षण करतात, त्या मनुष्याला कोणीहि दाबून टाकूं शकत नाहीं.

६ द्युक्षं दुराधर्षं महि अवः अस्तु (१९२)- तेजस्वी, दुसऱ्यांकडून आक्रमण होण्यास अशक्य असें मोठें संरक्षणाचें साधन आम्हांस प्राप्त होवो.

७ त्वावतः वयं स्मसि (१९३)- तुझ्या संरक्षणानें आम्ही सुरक्षित राहूं.

८ जनानां तरणिं त्रदं गोमतः वाजस्य समानं प्रशंसिषम् (२०४)- लोकांचें तारण करणारा, शत्रूला भय दाखवणारा, गाईपासून मिळणाऱ्या अन्नाचा दाता असा इन्द्र आहे, त्याची मी प्रशंसा करतों.

९ ऊतये सुप्रकरस्नं, अवसे साधः कृण्वन्तं,

बृबदुक्थं हवामहे (२१७)- संरक्षणासाठीं आपले हात पुढें करणाऱ्या, सुरक्षिततेसाठीं साधनें तयार ठेवणाऱ्या, सर्व ज्याची प्रशंसा करतात अशा इन्द्राला आम्ही सहाय्यासाठीं बोलावतों.

१० तरोभिः विदद्वसुं इन्द्रं ऊतये बृहत् गायन्तः (२३७)- अनेक बलांनीं युक्त, सर्व प्रकारचें ज्ञान ज्याला आहे अशा इन्द्राचें बृहत् नांवाचें साम आपल्या रक्षणासाठीं आम्ही गात आहों.

११ ते धियः नः अवन्तु (२३९)- तुझ्या बुद्धि आमचें रक्षण करोत.

१२ विश्वाभिः ऊतिभिः शग्धि (२५३)- सर्व संरक्षणाच्या साधनांनीं तूं सामर्थ्यवान् आहेस.

१३ महिषः तुवि शुष्मः (४५७) - तूं सामर्थ्यवान् व अतिशय बलवान् आहेस.

१४ सत्रा भूरि श्रवांसि दधानं अप्रतिष्कुतं इन्द्रं जोहवीमि (४६०)- एकदम पुष्कळ यश प्राप्त करणाऱ्या, ज्याचा प्रतिकार कोणी करूं शकत नाहीं अशा इन्द्राला आम्हीं आपल्या सहाय्यासाठीं बोलावतों.

१५ वज्री राये विश्वा सुपथा करत् (४६०)- वज्रधारी इन्द्र धन मिळवण्याचे सर्व मार्ग सरळ करो.

याप्रमाणें इन्द्र संरक्षण करतो. या विषयींची उत्तम वचनें विचार करण्यासारखीं आहेत. त्यांचा विचार वाचकांनीं करावा व आपणामध्यें अशी संरक्षणाची शक्ति वाढवावी.

धनवान् व धनदाता इन्द्र

इन्द्र हा धनवान् आहे व तें धन दुसऱ्यांस देऊन त्यांचें सहाय्य करणाराहि आहे. या विषयाचें प्रतिपादन करणारीं वचनें आतां पहा—

१ श्रुता-मघः (१२५)- प्रसिद्ध धनवान्.

२ वसुः (१३२ - निवास करवणारा, धनवान्.

३ राधानां-पतिः (१६४)- अनेक प्रकारच्या धनांचा स्वामी.

४ पुरु-वसुः (१४६)- पुष्कळ धन ज्याच्याकडे आहे.

५ विभा-वसुः (२१३)-तेजस्वी धन ज्याच्याकडे आहे.

६ प्रभु-वसुः (३७३)- प्रभुत्व करणारें धन ज्याच्या जवळ आहे.

७ दिवा-वसुः (३४८)- दिव्य धन ज्याच्याकडे आहे.

८ तुवि-नृम्णः (३१६)- पुष्कळ धनानें युक्त.

९ त्वं एकः इत् वस्वः ईशीयः (१२२)- तूं एकटाच धनाचा स्वामी आहेस.

१० धन-सा (२५९)- धनाचें दान करणारा.

११ धनस्य सातये इन्द्रं हवामहे (२४९)- धनाचें दान करण्यासाठीं इन्द्राला आम्ही बोलावतों.

१२ पंच क्षितीनां द्युम्नं आ भर (३१६)- पांच प्रकारच्या माणसांना तेजस्विता आणणारें धन आम्हांला भरपूर दे.

१३ नः सुवितं आ भर (३१६)- आम्हांला उत्तम धन दे.

१४ धनानि संजितं ऊतये हुवेम (३२५)- धनांना जिंकून आणणाऱ्या इन्द्राला आमच्या संरक्षणासाठीं आम्हीं आमच्याजवळ बोलावीत आहों.

१५ मावते स्तुवते यत् वसु शिक्षसि, तत् न किः आमिनाति (२९६) - माझ्यासारख्या स्तुति करणाऱ्याला जें धन तूं देतोस तें कोणीहि काढून घेऊं शकत नाहीं.

१६ देवस्य ते भूयः दानं उपोपेत् पृच्यते (३००)- तूं इन्द्र देव आहेस, त्या तूं दिलेलें दान जवळ आल्यानंतर तें वाढत जातें.

१७ ज्यायः इन्द्रः, इयतः कनीयसः तत् आ भर (३०९)- हे इन्द्रा ! तूं श्रेष्ठ आहेस. इच्छा करणाऱ्या, तुझ्यापेक्षां धाकटा असणाऱ्या मला तें दान भरपूर दे.

१८ वसूनि ददः (३१४)- अनेक प्रकारचीं धनें दे.

१९ त्वं मेषं ऋग्मियं, वस्वः अर्णवं गीर्भिः अभिष्टुत (३७६)-त्या स्तुत्य, मंत्रांनीं प्रशंसनीय, धनांचा जणुंकाय समुद्र असावा अशा इन्द्राला स्तोत्रांनीं स्तवा.

२० मंहिष्ठं इन्द्रं अभ्यर्चत (३७६)- मोठ्या इन्द्राची अर्चना करा.

२१ मे पितुः वस्यान् (२९२)- माझ्या बापापेक्षां तं धनवान् आहेस.

२२ अभुंजतः भ्रातुः वस्यान् (२९२)- धनाचा उपभोग न करणाऱ्या भावापेक्षां तूं अधिक धनवान् आहेस.

२३ मे माता समा (२९२)- माझी आई तुझ्या सारखी आहे.

२४ वसुत्वनाय राधसे छदयथः (२९२)- धनप्राप्ति व सिद्धि यासाठीं आमचें संरक्षण कर.

२५ त्वोताः तना त्मना सह्याम (३१६)- तुझ्याकडून संरक्षण प्राप्त झाल्यानंतर आम्हीं धनानें सुसंपन्न होऊं.

२६ ऊतये सानसिं सजित्वानं सदासहं वर्षिष्ठं रयिं आ भर (१२९)- आमच्या संरक्षणासाठीं उपभोग घेण्यास योग्य, शत्रूंचा पराजय करणारें, नेहमीं विजय मिळवणारें श्रेष्ठ धन आम्हांस भरपूर दे.

२७ हे शतक्रतो ! भद्रं इषं ऊर्जं नः आ भर (१७३) -हे शेंकडों कर्मे करणाऱ्या इन्द्रा ! कल्याणकारी अन्न व सामर्थ्य आम्हांस भरपूर दे.

२८ ऋभु-क्षणं रयिं ददातु (१९९)- कारागिराचें संरक्षण करणारें धन आम्हांस इन्द्रानें द्यावें.

२९ यत् वीडौ, यत्स्थिरं, यत् पर्शाने पराभृतं तत् स्पार्हं वसु आ भर (२०७)- जें धन मजबूत खजिन्यांत ठेवलेलें असेल, जें धन स्थिर रूपानें ठेव म्हणून ठेवलें असेल व जें धन कठिण ठिकाणीं भूमींत गाडून ठेवलें असेल तें स्पृहणीय धन आम्हांला भरपूर दे.

३० पुरु-वसुः मघवा जरितृभ्यः सहस्रेण शिक्षति (२३५)- पुष्कळ धन जवळ ठेवणारा इन्द्र आपल्या उपासकांनां सहस्र प्रकारचें धन देतो.

३१ हे इन्द्र ! वसुत्तये एहि, चेरवे भागं विदाः, गविष्ठये वावृषस्व (२४०)- हे इन्द्रा ! धन देण्यासाठीं ये, सदाचारी माणसाला धन दे, गाई आपल्याजवळ बाळगूं इच्छिणाऱ्याला गाई देऊन बलवान् कर.

३२ दाशुषे रत्नानि धत्तं (३०६)- जो दान करतो त्याला रत्नें दे, अर्थात् धन दे.

३३ याः भुजः असुरेभ्यः आ भरः, अस्य स्तोतारं वर्धय, ये च त्वे वृक्तबर्हिषः (२५४)- जे भोग मिळतील ते असुरांकडून आण, त्यांच्या योगानें उपासकांना मोठें कर, जे तुझ्यासाठीं आसन तयार करून ठेवतील, त्यांनाही मोठें कर.

३४ अवमं वसु तव, मध्यमं त्वं पुष्यसि, परमस्य विश्वस्य सत्रा राजसि, त्वा गोषु न किः वृण्वते (२७०)- कनिष्ट धन तुझें आहे, मध्यम धनाचें तूंच पोषण करतोस, परमश्रेष्ठ असलेल्या सर्व धनांवर तुझाच अधिकार आहे, गाई देत असतां तुला कोणीहि प्रतीकार करूं शकत नाहीं.

३५ असत् रातिः कदाचन मा उपदसत् (२८७)- आमचें दान कधींहि नष्ट न होवो.

३६ चित्रं वृषणं रयिं दाः (३१७)- विलक्षण व बल वाढवणारें धन आम्हांस दे.

३७ ते दक्षिणं हस्तं वसूयवः जगृह्म (३१७)- धनप्राप्तिची इच्छा करणारे आम्ही तुझ्या उजव्या हाताला पकडतों. (तूं त्याच हातानें धन देतोस.)

३८ त्वा गोनां गोपतिं विद्म (३१७)- तूं गाईंचा स्वामी आहेस हें आम्ही जाणतों यासाठीं तूं गाई दे.

३९ अहं सदा याचन् आचुक्रुधं (३०७)- मीं सदोदित तुझ्याजवळ मागत आहें म्हणून तुला राग तर नाहींनां येत ?

४० कः ईशानं न याचिषत् (३०७)- कोण बरें आपल्या स्वामीजवळ मागत नाहीं ? सर्व आपल्या स्वामीजवळ मागतात, तसाच मीं मागतों. यासाठीं क्रोध न करतां मला धन दे.

४१ सुराधाः मघवा मघानि दाता (३३५)- उत्तम धनसंपन्न इन्द्र धन देतो.

४२ यत् त्वा आदातं राधः, मे नास्ति, तत् नः उभया हस्त्या भर (३४५)- तूं दिलेलें धन, आतां मजकडे राहिलें नाहीं, यासाठीं दोनही हातांनीं तें मला भरपूर होईल इतकें दे.

४३ सुवीर्यस्य गोमतः रायः पूर्धि (३४६)- उत्तम वीर्यानें युक्त गाई ज्यांत आहेत असें धन आम्हांला भरपूर दे.

४४ विश्वचर्षणे सुदत्र ! नः द्युम्नं मंहय (३६६)- हे सर्व लोकांचें हित करणाऱ्या, उत्तम धन देणाऱ्या इन्द्रा ! आम्हांस धन देऊन मोठें कर.

४५ महित्वना राधांसि प्रचोदयते (३८६)- हे इन्द्रा ! तूं आपल्या थोरपणाला अनुरूप अशीं धनें देतोस.

४६ यः पुरा इदं वस्यः नः प्र आ निनाय, तं इन्द्रं ऊतये स्तुवे (४००)- जो इन्द्र पूर्वी हें धन आम्हाला देत असे, त्या इन्द्राला आमच्या संरक्षणासाठीं मीं स्तवीत आहें.

४७ यत् आजयः उदीरते, धृष्णवे धनं दीयते (४१४)- जेव्हां युद्धें सुरू होतात, त्यावेळीं प्रबल वीराला धन मिळत असतें.

४८ कं हनः ? कं वसौ दधः ? अस्मान् वसौ दधः (४१४)- कोणाला ठार मारलेंस ? कोणाला धन दिलेंस ? आम्हांला धन दिलेंस.

इन्द्र धन मिळवितो व तें आपल्या उपासकांना देतो. तें धन घेऊन उपासक उत्तम स्थितींत राहतात. धन म्हणजे गाई, घोडे, रथ, भूमि, सुवर्ण, रत्न व आणखीहि ते पदार्थ किं ज्यांच्या योगानें मनुष्य धन्य होत असतो. शत, सहस्र, अयुत-दहा हजार असे शब्दही प्रयुक्त झालेले वरील मंत्रांत वाचकांना दिसतील. जसें—

४९ मघवा सहस्रेण शिक्षति (२३५)- इन्द्र सहस्र दान देतो.

५० वीडौ, स्थिरं, पर्शाने पराभृतं (२०७)- तिजोरींत, स्थिर ठेव म्हणून ठेवलेलें व भूमींत गाडलेलें असें तीन प्रकारचें धन आहे असें म्हटलें आहे

हें धन मोहोरा, रुपये अशासारखें कांहीं असावेंसें वाटतें. शंभर, हजार, दहा हजार अशा संख्येनें मोजण्यास सोईचें होईल असें असलें पाहिजे. याचा विचार वाचकांनीं करावा.

खजिन्यांत ठेवतां येईल, बँकेंत स्थिररूपानें ठेवलां येईल व भूमींत भांड्यांत घालून गाडून ठेवतां येईल असें तें पाहिजे सोन्याचे निष्क यांसारखें हें कांहीं तरी असावें असें वाटतें.

शंभर, हजार, दहा हजार पर्यंत हल्लीं कागदाच्या नोटा वापरण्यांत येतात, तसें कागदाचें हें चलन नसलेंच पाहिजे. रत्नें वापरण्यांत होतीं. पण तीं हजार दहा हजार अशीं दिलीं जाणें शक्य नाहीं. कारण इतक्या मोठ्या संख्येमध्यें रत्नांनीं व्यापार होणें शक्य नाहीं. यासाठीं हें सुवर्ण, चांदी आदिचें कांहीं किमतीचें नाणें असावें असें वाटतें. याचा विचार वाचकांनीं करावा.

मीं धनवान् झालों तर ?

मीं धनवान् झालों तर माझी प्रतिष्ठा वाढेल असें प्रत्येकाला वाटणें स्वाभाविक आहे. या प्रकारचें एक वाक्य या मंत्रांत आलें आहे तें येथे पहा—

१ अहं यत् वस्वः ईशीय, मे स्तोता गोषखा स्यात् (१२२)– मीं जर धनाचा स्वामी झालों म्हणजे धनवान् झालों तर माझी स्तुति करणारा गाईचा मित्र असेल. यांत मीं धनवान् झालों तर माझी स्तुति होत राहील असें येथें म्हटले आहे. धनवानांची सर्वत्र स्तुति होते. इन्द्र धनवान् आहे म्हणून त्याची सर्व लोक स्तुति करतात. त्याप्रमाणें जो धनवान् होईल त्याची स्तुति इतर लोक करीत राहतील. कारण तशी स्तुति केल्यानें त्यास तो धन देईल. येथील धन 'वसु' हें गाईच्या रूपाचें धन नसेल. हें व्यावहारिक दुसरें धन असावें जें हजार संख्येनें दुसऱ्यांस देतां येईल.

२ स्पार्हं वसु आ भर (१३४)– स्पृहणीय वसु संज्ञक धन मला भरपूर दे.

३ सः नः वसूनि आ भर (१९०)– तो इन्द्र आम्हांस वसु संज्ञक धन देवो.

४ राधः कृणुष्व (१९४)– आम्हांला धन दे.

५ क्षुमन्तं चित्रं ग्राभं दक्षिणेन आ संगृभाय – (१६७) विलक्षण घेण्यास योग्य व शब्द करणारें धन उजव्या हातानें संग्रह करून आम्हांस दे.

यामध्यें 'चित्रं, ग्राभं, क्षुमन्तं' हे तीन शब्द धनाचे विशेषण म्हणून आलेले आहेत. आतां थोडासा विचार करूं—

चित्रं– विलक्षण, चमकणारें, तेजस्वी रंगाचें.

ग्राभं– हातांत धरण्याजोगें.

क्षु-मन्तं– शब्द करणारें, अन्न देणारें.

या तीन शब्दांचा विचार करतां असें दिसतें कि हें धन चमकणारें, अर्थात् सोन्या चांदीचें, हातांत अनेक संख्यांमध्यें राहील असें व शब्द करणारें, ज्याचा आवाज होतो असें असलें पाहिजे. धातूंचे शिक्के अथवा विशिष्ट प्रकारचे तुकडे ही हे होऊं शकतील. 'आ संगृभाय' हा शब्द यांचा संग्रह करतां येत होता असा भाव दाखवीत आहे. अर्थात् याचे लहान लहान तुकडे असावे असें वाटतें.

६ नः सुगव्या अश्व्या रथया महोनां वरिवस्य (१८६)– आम्हांला उत्तम गाई, उत्तम घोडे व उत्तम रथांनीं समृद्ध कर. यांत गाई, घोडे व रथ ही संपत्ति आहे असें म्हटलें आहे. पण ही 'ग्राभं' म्हणजे अनेक संख्येमध्यें हातांत धरतां येतें, 'क्षु-मन्तं' आवाज होतो अशी किंवा 'चित्रं' चमकणारीहि नव्हे. यासाठीं गाई, घोडे व रथ ही संपत्ति निराळी व हजारोंच्या संख्येनें देतां येणारें धन निराळें यांत शंकाच नाहीं.

अर्थात् अशी ही धन संपत्ति वैदिककाळांतील व्यवहारांत होती असें दिसतें. वाचकांनीं याचा अधिक विचार करावा.

रथ व घोडे

इन्द्राचे रथ होते व रथ चालवण्यासाठीं त्याचे उत्तम सुशिक्षित घोडेही त्याच्याजवळ होते. पहा—

१ मन्द्रैः मयूर-रोमभिः हरिभिः आयाहि (२४६)– सुन्दर मोराच्या रंगाप्रमाणें ज्याच्या केंसांचा रंग आहे अशा घोड्यानीं तूं इकडे ये.

२ हरीणां स्थाता (१९३)– घोड्यांच्या रथांत इन्द्र बसत असे.

३ वृषणा हरी उप युयुजे, वृत्रहा आजगाम (३०८) – बलवान् दोन घोडे त्यानें रथाला जोडले व वृत्राला मारणारा इन्द्र आला आहे.

४ ब्रह्मयुजः केशिनः हिरण्यये रथे युक्ताः आ सहस्रं शतं हरयः त्वा आ वहन्तु (२४५)– सूचनेचे शब्द बोलतांक्षणींच उत्तम आयाळ असलेले घोडे सुवर्णाच्या रथाला जोडले जातात, व ते हजारों व शेंकडों घोडे इन्द्राला जेथें जावयाचें असतें तेथें पोंचवतात. या वचनांत इन्द्राचे घोडे कसे उत्तम सुशिक्षित होते तें दाखवलें आहे—

ब्रह्मयुजः– सूचनेचे शब्द उच्चारतांच आपल्या जागीं जाऊन उभे राहणारे, मंत्र बोलतांच रथाला जोडले जाणारे. हें उत्तम सुशिक्षित घोड्यांचें लक्षण आहे. इशारा होतांच

आपआपल्या जागीं स्वतःच जाऊन उभे राहणारे. अत्यंत सुशिक्षित घोडेच असे असूं शकतात.

केशिनः– उत्तम आयाळ असलेलें.

हिरण्यये रथे युक्ताः– सोन्याच्या रथाला जोडले जाणारे.

सहस्रं शतं हरयः– सहस्र अथवा शंभर घोडे.

एका रथाला हजार अथवा शंभर घोडे जोडले जाणें शक्य नाहीं. हे इन्द्राबरोबर दुसरे सरदार असले तर त्यांचे असतील. थोर लोकांच्या रथाबरोबर अनेक घोडेस्वार असतात त्यांचे हे घोडे असतील. अथवा आलंकारिक भाषेनें ' किरण ' असतील कारण अनेक ठिकाणीं ' हरी ' दोन घोडे जोडले असे प्रयोग आहेत. दोन घोडे रथाला जोडणें शक्य आहे. हजार व शंभर हें वर्णन आलंकारिक असेल अथवा किरण वाचक हे शब्द असतील.

गाई

इन्द्राचा संबंध जसा घोड्यांशीं आहे तसा तो गाईशींहि आहे. पहा—

१ यज्ञस्य मही रप्सुदा (११७)– यज्ञासाठीं पुष्कळ दूध देणारी गाय लागत आहे व यज्ञामध्यें इन्द्राला बोलावलें जातें.

२ उभा कर्णा हिरण्यया (११७)– गाईचे दोनही कान सोन्याच्या चिन्हांनीं सुशोभित झालेले असतात.

३ नः रेवतीः तुवि-वाजाः सन्तु (१५३)– आमच्या गाई पुष्कळ दूध देणाऱ्या असोत.

४ श्रवसः च कामः गोमति व्रजे नः आ भज (३१८)– बल अथवा अन्न यांची इच्छा करणारा आम्हांला गाईंच्या गोठ्यांत पहा. गाईंच्या गोठ्यांत आम्ही असावें

५ सबर्दुघां सुदुघां उरुधारां इषं धेनुं इन्द्रं आहुवे (२९५)– दूध देणारी, सुलभ रीतिनें जिचें दोहन होतें, पुष्कळ दूध देणारी अन्नरूपी धेनुसाठीं इन्द्राची मीं प्रार्थना करतो.

६ नः गव्यूतिं घृतैः आ उक्षतं (२२०)– आमच्या गाईंच्या स्थानावर तुपाचा पाऊस पडो आम्हांस पुष्कळ तूप मिळो.

७ धेनवः गावः वत्सं (२०१)– दुधाळ गाई आपल्या वासराकडे जातात.

हें गाईचें वर्णन या ऐन्द्र काण्डांत आहे. पुष्कळ दुधाळ गाई असाव्या, गाईचें दूध व तूप पुष्कळ मिळावें, हा याचा भाव आहे.

इन्द्राच्या माता

१ इन्द्रं त्वा देवी जनित्री अजीजनत् (३७९)– तुज इन्द्राला सर्वांना उत्पन्न करणाऱ्या द्यावापृथिवी या देवींनीं उत्पन्न केलें. या इन्द्राच्या दोन माता आहेत.

२ वन्वानासः ईंखयन्तीः अवस्युवः जातं तं सुवीर्यं उपासते (१७५)– स्तुत्य, गति करणाऱ्या, सतत कार्य करणाऱ्या त्या मातांनां हा उत्तम वीर्यवान् पुत्र झाला, त्याची त्या उपासना करूं लागल्या, त्याच्याजवळ राहून त्याची सेवा करूं लागल्या.

एकत्र बसून स्तुति करणें

एकत्र बसून सर्वांनीं मिळून, सर्वांनीं समूह करून परमेश्वराची, इन्द्राची प्रार्थना आर्य लोक करीत असत. पहा—

१ तत् सचा गाय (११५)– तें स्तोत्र एकत्र बसून गावें.

२ आ इत, निषीदत, इन्द्रं अभि प्र गायत (१६४)– या, बसा व सर्व मिळून इन्द्राचें स्तोत्र गा.

३ इन्द्रं इत् सचा स्तोत, मुहुः शंसत (२४२)– इन्द्रासाठीं एकत्र बसून सोमरस काढा व त्याची वारंवार स्तुति करा.

४ यामनि जीवाः ज्योतिः अशीमहि (२५९)– यज्ञांत एकत्र मिळून स्तोत्र गाऊं व तेज प्राप्त करूं.

५ सत्राच्या धिया मघवान् आगमत् (२९०)– एकत्र बसून म्हणावयाचें स्तोत्र ऐकण्यासाठीं इन्द्र येतो.

६ विश्वा ओजसा दिवः पतिं समेत (३७२)– आपल्या सर्व बलानें द्युलोकाच्या स्वामी इन्द्राची जमून एकत्र बसून स्तुति करा.

७ वयो यथा, त्वा सीदन्तः अभि नोनुमः (४०७)– पक्षी जसे एकत्र जमतात तसे आम्ही एकत्र जमून तुला नमन करतों.

८ सधमाद्ये आपिः नः वृधे भव (२३९)– यज्ञ स्थानामध्यें एकत्र बसून तूं इन्द्र आमचा मित्र हो व आमच्या उन्नति करण्यासाठीं सहायक हो.

यज्ञ जेथें होत असे तेथें सर्व आर्य येत असत, एकत्र

जमून बसत व सर्व मिळून इन्द्राची प्रार्थना, स्तुति किंवा उपासना करीत, यामुळें या एकत्र बसून प्रार्थना करण्यामुळें त्यांचें ऐक्य झालेलें होतें. एकत्र जमण्यानें असा हा लाभ आहे.

ज्ञानी कसा होतो ?

१ कः ब्रह्मा तं इन्द्रं सपर्यति (१४२)- कोणता ज्ञानी त्या इन्द्राची उपासना करतो बरें ? एकत्र बसून त्याची प्रार्थना करण्यानें ज्ञानाची वृद्धि व सामर्थ्य प्राप्त होत असतें.

२ उपह्वरे गिरीणां संगमे च नदीनां धिया विप्रो अजायत (१४३)– पर्वतांच्या उतरणींवर किंवा नद्यांच्या संगमांवर बसून आपली बुद्धि त्या परमेश्वरावर ध्यान करून लावली तर त्या अनुष्ठानानें महाज्ञानी बनतो.

ज्ञानी बनण्यासाठीं अशी तपस्या करावी लागते. पर्वतावर अथवा नदीच्या संगमावर जी मन एकाग्र होण्यासाठीं अनुकूलता लागते ती असते. पण घरीं जरी एकान्त स्थान बनवलें व मन एकाग्र होईल अशासाठीं आवश्यक तयारी करून साधना चालवली, तरी सुद्धां मन एकाग्र होण्यापासून जे लाभ होणें शक्य आहें ते लाभ होणें शक्य आहे. थोडे अधिक कष्ट होतील इतकेंच, पण अवश्य लाभ होईल.

इन्द्रचा रथ व वज्र

१ अनवः (ऋभवः) ते अश्वाय रथं ततक्षुः, त्वष्टा द्युमन्तं वज्रं (४४०)– मानवी कारागीर ऋभूंनीं इन्द्राच्या घोड्यांसाठीं योग्य असा रथ बनवला व त्वष्टा या देवांच्या कारागिरानें इन्द्रासाठीं तेजस्वी वज्र तयार करून दिलें.

अद्ययावत् रथ व वज्र बनवून घेऊन इन्द्र उत्तम रीतिनें सुसज्य झाला होता. ऋभु हे रथ वगैरे बनवीत असत व त्वष्टा पोलादाचें वज्र बनवून इन्द्राला देत असे. अद्ययावत् शस्त्रास्त्रें बनवणें हें युद्ध करणाऱ्या वीरांनां अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा युद्धांमध्यें विजय मिळवणें अत्यंत कठीण होणें स्वाभाविक आहे. इन्द्राजवळ ऋभु व त्वष्टा असे उत्तम कारागीर होते व ते आवश्य तें युद्धामधील शस्त्र निर्माण आदि कार्य उत्तम रीतिनें करीत असत. यामुळें इन्द्र नेहमीं विजयी होत असे.

इन्द्र जखम बरी करीत असे

१ यः आभिश्रिषः ऋते चित् जत्रुभ्यः आतृदः पुरा संधिं संधाता, मघवा पुरू-वसुः विह्रुतं पुनः निष्कर्ता (२४४)- हा इन्द्र कांहीं विशेष जोडण्यांचीं साधनें नसतांना सांधे तुटले, तर त्यांनां तो लवकर जोडतो व धनवान् पुष्कळ ऐश्वर्यवान् हा इन्द्र तुटलेल्या भागांना उत्तम रीतिनें पुनः जोडतो व ती जखम लवकर बरी करतो.

शस्त्रास्त्रांनीं युद्धें करणाऱ्या वीरांनां हें ज्ञान आवश्यक आहे. शस्त्रांच्या जखमा होणारच. त्या झाल्या तर त्या लवकर बऱ्या होतील असें करणें हें आवश्यकच असतें. इन्द्र या विद्येंत उत्तम रीतिनें प्रवीण होता, हें या वचनावरून स्पष्ट दिसतें. अन्य देवांमध्यें अश्विनीकुमार हे या कामांत उत्तम प्रवीण होते. पण ते देवांचे वैद्य होते असे म्हणतां येतें, पण इन्द्र हा वीर असूनही जखमा बऱ्या करण्यामध्यें तो अत्यंत प्रवीण होता. हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

दुःख दूर करणें

इन्द्र दुसऱ्यांचीं दुःखें दूर करतो. या विषयीचे मंत्र पहा-

१ दुष्वप्न्यं परासुव (१४१)- दुष्ट स्वप्नें येण्याचें कारण दूर कर. दुःख देणारीं स्वप्नें येऊं नयेत असें कर.

२ निर्ऋतीनां परिवृजं वेत्थ (३९६)- दुःखांचें परिमार्जन कसें करावें तें तूं जाणतोस.

३ अहः अहः शुन्ध्युः परिपदां इव (३९६)- प्रतिदिवशीं आपली शुद्धता करणारा अनिष्ट अवस्था दूर करतो. त्याप्रमाणें दररोज स्वच्छता केली, म्हणजे विपत्ती दूर होतात.

४ अमीवां अप, दुर्मतिं अप, नः अंहसः अप युयोतन (३९७)- रोग दूर करा, दुष्टबुद्धि दूर करा व आमच्याकडून होणारीं पापें दूर करा. दुष्टबुद्धि दूर झाली म्हणजे पापें दूर होतील व पापें दूर झालीं कीं रोग दूर होतील.

५ यं द्विषः अति नयति, तं मर्त्यं अंहः न, दुरितं न अष्ट (४२६)- ज्याला शत्रूपासून दूर नेलें जातें, त्या माणसाला पाप लागत नाहीं व दुष्टभावही त्याच्याजवळ येत नाहींत.

पापामुळें दुःखें उत्पन्न होतात. यासाठीं आपणाजवळ पापप्रवृत्ति उत्पन्नच होणार नाहीं असें करावें. आपलें शरीर, मन व इंद्रियें शुद्ध करावीं. पापप्रवृत्ती दूर कराव्या. असें झालें म्हणजे आपोआप दुःखें आपणापासून दूर होतील व आपण सुखी होऊं. पापांपासून दूर होण्याचें हें साधन प्रत्येकानें करण्यासारखें आहे.

विरुद्ध आचरण न करणें

आपण विरुद्ध आचरण करूं नये याविषयीं पुढील मंत्र पहा–

१ न कि इनीमसि (१७६)– आम्ही हानि होईल असें कांहीं करीत नाहीं.

२ न कि आयोपयामसि (१७६)– आम्ही कांहीं विरुद्ध कार्य करीत नाहीं.

३ मंत्रश्रुत्यं चरामसि (१७६)– मंत्रांनीं जो उपदेश केला आहे. तसेंच आम्ही आचरण करीत आहों.

४ हे आथर्वण ! दोपः आगात्, सवितारं देवं स्तुहि (१७७)– हे अथर्ववेदाचें अध्ययन करणाऱ्या ! जर आपल्या आचरणांत कांहीं दोष झाला तर जगत् उत्पन्न करणाऱ्या देवाची स्तुति करा.

" सविता वै सर्वस्य प्रसविता " सविता हा सर्व जगाचा उत्पन्न करणारा देव आहे. त्याची स्तुति करण्यानें सर्व दोष दूर होतात.

५ उग्रं वचः अपावधीः (३५३)– रागीट भाषण करूं नका. यापासून फार कष्ट होतात.

६ अव्रतः न हिनोति, कामं रयिं न स्पृशते (४४१) – शुद्ध आचरण न करणारा मनुष्य त्या उच्चस्थानाला प्राप्त करूं शकत नाहीं, पाहिजे असेल तेवढें धन प्राप्त करूं शकत नाहीं.

७ विद्वान् मित्रः नः ऋजुनीती नयति (२१८)– ज्ञानी मित्र आम्हांला सरळ मार्गानें नेतो.

८ यं अद्रुहः पान्ति सः मर्त्यः सुनीथः घ (२०६) ज्याचें संरक्षण द्रोह न करणारे देव करतात, तो मनुष्य सुनीतिनें चालणारा असतो. उत्तम नीतिनें चालणाऱ्या माणसालाच देवांचें संरक्षण मिळतें. यासाठीं सदाचारानें वागावें व हा सदाचार वेदानें सांगितला आहे.

९ वि-व्रतानां धर्तारं वरुणं वपा गिरा वन्देत (२८८)– विशेष शुद्ध नियमांचें पालन करणाऱ्या वरुणाला स्तुति करून वन्दन करावें व त्याप्रमाणें विशेष उत्तम नियमांचें स्वतः पालन करावें.

पुष्ट करणारें अन्न खावें

१ नः इषं पीवरीं कृणुहि (४५५)– आमचें अन्न अधिक पोषण करणारें कर व असें अन्न तूं खा.

भाऊबन्धकी नाहीं

१ त्वं जनुषा अभ्रातृव्यः, अ-ना, सनात् अनापिः, युधा इत् आपित्वं इच्छसे (३९९)– हे इन्द्रा ! तूं शत्रूरहित आहेस. तुझ्यावर प्रभुत्व करणारा कोणीहि नाहीं, तुझा बन्धुहि कोणी नाहीं. युद्धानें तूं बंधुत्व व्हावें असें इच्छितोस.

इन्द्राचा कोणी भाऊ नाहीं. यामुळें भाऊबंधकीचीं भांडणें कोणत्याही कारणानें त्याच्याशीं होत नाहींत. इन्द्रावर स्वामित्व गाजवणाराही दुसरा कोणीहि नाहीं; कारण हाच सर्वांचा सर्वाधिकारी आहे. याला नेहेमीं कोणा मित्राची आवश्यकता नाहीं, कारण हा इतका सामर्थ्यवान् आहे कीं हा एकटाच सर्व शत्रूंचा नाश करूं शकतो. हा युद्ध करतो व सर्व शत्रूंना दूर करतो. यामुळें ज्यांचे शत्रू दूर होतात ते याचे चाहते होतात. असे याचे चाहते मित्र अनेक आहेत व ते याच्या युद्धकौशल्यानेंच याला मिळाले आहेत.

घर कसें असावें

१ त्रिधातु त्रिवरूथं स्वस्तये छर्दिः दिद्युं शरणं मह्यं [देहि] (२६६)– तीन मजली, तीन छप्परें असलेलें, राहणाऱ्यांचें कल्याण करणारें, आश्रय करण्यास योग्य असें प्रकाशयुक्त उत्तम घर मला दे.

घराला तीन मजले असावे, तीन भाग असावे, आंत पुष्कळ प्रकाश यावा, राहणारांचें कल्याण व्हावें, आंत रहावें असें राहणारांस वाटावें असें सुखदायी घर असावें.

दीर्घायु व्हावें

१ वातः नः हृदे शंभुः मयोभुः भेषजं आवातु, नः आयूंषि प्रतारिषत् (१८४)– वायु आमच्या घरांत हृदयाला सुख व आरोग्य देणारें औषध आपल्या बरोबर वाहून आणो व त्यामुळें आमचें आयुष्य अति दीर्घ होवो. घरामध्यें शुद्ध वायु येवो. त्या बरोबर आरोग्य देणारा शुभ गुण आमच्या घरांतील मनुष्यांना लाभो व त्यामुळें आम्ही सर्व दीर्घायु होऊं.

२ नः तुचे तुनाय जीवसे द्राघीयः आयुः सु कृणोतन (३९५)– आमच्या पुत्रपौत्रांना दीर्घजीवन उत्तम रीतिनें प्राप्त होवो.

३ सुवीराः शतहिमाः मदेम (४५४)– उत्तम वीर पुत्र आम्हांस होवोत व ते सर्व शंभर वर्षें पर्यंत आनंदानें जिवंत राहोत.

यश प्राप्त व्हावें

१ त्वादातं इत् यशः (१९५)– तुझ्या सहाय्यानें यश मिळतें.

२ शवसः पतिः यशाः असि (२४८)– तूं बलाचा स्वामी आहेस व यशस्वी आहेस.

यासाठीं आम्ही यशस्वी व्हावें असें कर.

भूमि फिरते

भूमि फिरते या विषयीं पुढील मंत्रभागामध्यें उल्लेख आहे—

१ भूमिं व्यवर्तयत् (१२१)- त्यानें भूमिला फिरवीत ठेवलें आहे.

चन्द्रला सूर्यकिरण प्रकाशित करतात

१ गोः चन्द्रमसः गृहे त्वष्टुः अपीच्यं नाम अमन्वत (१४७)- प्रकाशित होणाऱ्या चन्द्राच्या मंडलामध्यें सूर्याचे गुप्त किरण विलीन होऊन त्याला प्रकाशित करतात असें मानलें जातें.

विद्यादेवी

१ पावका वाजिनीवती धियावसुः सरस्वती (१८९)- पवित्र करणारी, अन्न व बल देणारी, बुद्धि वाढवून धन देणारी सरस्वतीदेवी आहे.

सौभाग्य प्राप्त व्हावें

१ अद्य नः प्रजावत् सौभगं सावीः (१४०)- तो आज आम्हांला उत्तम संतानासह सौभाग्य देवो.

२ नः मृळयासि (१७३)- आम्हांला तूं सुखी करतोस.

३ स्तोतृभ्यः मृळय (२१३)- स्तुति करणारांना सुखी कर.

४ इन्द्रापूषणा वयं स्वस्तये सख्याय वाजसातये हुवेम (२०२)- आम्ही या इन्द्र व पूषा यांना आमचें कल्याण व्हावें, आमच्या बरोबर त्यांचें सख्य व्हावें व अन्न तसेंच आमचें बल वाढावें यासाठीं बोलावीत आहों.

सोमरस

इन्द्राला यज्ञांत बोलावलें जातें. तो येतो व आसनावर बसतो व नंतर त्याला सोमरस देतात. या सोमरसाचें असें वर्णन केलें आहे—

१ अन्धः (१२४)- सोमरस हें अन्न आहे.

२ द्युम्नितमः (११६)- सोमरस तेजस्वी आहे. तो चमकतो.

३ इन्दुः (१४५)- चन्द्राप्रमाणें तो चमकतो.

४ तेन नूनं मदः (११६)- त्यानें उत्साह वाढतो, आनंद मिळतो.

५ यवा शिरः (१४५)- जवांचें पीठ व दूध मिसळून तो पितात.

६ सोमः विश्वासां सुक्षितीनां चेततुः (१५४)- सोम सर्व उत्तम मानवांचा उत्साह वाढवणारा आहे.

७ नि पूतः (१५९)- सोमरस गाळून तो शुद्ध करतात.

८ दध्याशिरः सोमासः (२९३)- सोमरसामध्यें दही मिसळून तो प्याला जातो.

९ आशीर्वान् ममत्तु (३५०)- दूध आदि ज्यांत मिसळलें आहे असा सोम आमचा उत्साह वाढवो.

१० रयिन्तमः द्युम्नवत्तमः सोमः (३५१)- शोभिवन्त व तेजस्वी सोम आहे.

११ पुनानः हरिण्या रुचा विश्वा द्वेषांसि तरति (४६३)- सोमरस छानल्यानंतर हिरवट तेजानें सर्व शत्रूंचा निःपात करतो. तो प्याल्यानंतर इतकें बल अंगांत येतें.

१२ धारा रोचते । पुनानः हरिः अरुषः (४६३)- या सोमरसाची धारा चमकत असते. गाळल्यानंतर हा सोम चमकतो.

१३ रसिनः गोमतः सुतस्य पिब (२३९)- गाईचें दूध ज्यांत मिसळलें आहे तो सोमरस पी.

१४ सोमं सुनोत । पक्तीः पचत (२८५)- सोमरस काढा व वड्या शिजवा.

१५ धानावन्तं करम्भिणं अपूपवन्तं उक्थिनं नः प्रातः जुषस्व (२१०)- धान्याचें पीठ ज्यांत मिसळलें आहे, वडे व घारगे ज्याच्या बरोबर आहेत, स्तोत्रें म्हटलीं जात आहेत असा आमचा सोमरस सकाळीं पी. (धानावन्तं) धान्य भाजून त्याचें पीठ सोमामध्यें मिसळतात, (करम्भ) दह्यांबरोबर सातू मिळवला म्हणजे जें मिश्रमण होतें त्यास करम्भ म्हणतात. (अपूप) वडे घारगे सोमा बरोबर खाल्ले जातात. हा सकाळीं करावयाचा प्रातराश आहे.

१६ अश्मया घ्नता अंशुना क्षपमाणः, यथा आढ्न्, इत्थं उ (३०५)- दगडांनीं सोम कुटल्यामुळें थकलेला यजमान असला तरी तो पुष्कळ अन्न खाणाऱ्या राजाप्रमाणें सामर्थ्यवान् होतो, निर्बळ होत नाहीं.

सोमवल्ली ही एक वनस्पति हिमालयाच्या मौंजवान पर्वतावर उगवते. १०।१२ हजार फूट उंचीवर उगवतो तो उत्तम सोम समजला जातो. यज्ञामध्यें ही सोमवल्ली आणतात. किंवा खेडवळांकडून विकतही घेतात. ही वल्ली दगडांनीं कुटतात व हातांच्या बोटांनीं दाबून तिचा रस काढतात. त्यानंतर बारीक चाळणीनें गाळतात. नंतर त्यांत पाणी मिसळतात. गाईचें दूध अथवा दहीं मिसळतात. मधही घालतात. तेव्हां तो पिण्यासारखा होतो. नुसता रस तिखट किंवा तुरट

*

असतो. त्यांत, पाणी, दही अथवा दूध मिसळून, थोडा मद्य घातला म्हणजे तो पिण्यासारखा होतो.

हा रस काळोखांत चमकतो. याच्या बरोबर अपूप, वडे, घारगे अथवा पुरोडाश खाण्याला देतात. हा रस प्यायल्यानंतर शूर पुरुषांना मोठा उत्साह व हुरूप येतो व त्या उत्साहामध्यें वीर पुरुष मोठमोठीं शौर्याचीं कामें करतात.

इन्द्र तर हा रस आपल्या कुशी भरतील इतका पितो. इतर लोकही असाच पीत असतील. आनंद वाढवणारें, उत्साह वृद्धिंगत करणारें असें हें पेय आहे. यज्ञामध्यें हें पेय तयार करतात. थोडें हवन केल्यानंतर तें पिण्यांत येतें. असें हें सोमरसाचें वर्णन आहे.

इन्द्र स्तुत्य आहे

इन्द्र हा महा पराक्रमी असल्यानें त्याची चहूंकडे स्तुति होत असते. पहा—

१ पुरु-हूतः (११५)- पुष्कळ ज्याची स्तुति करतात.

२ गिर्वणः (१६५)- प्रशंसनीय.

३ त्वदन्यः गिरः न हि सघत् (३७३)- तुझ्याशिवाय-इन्द्राशिवाय-दुसऱ्या कोणाची अशी स्तुति होत नाहीं.

४ ये त्वा आरभ्य चरामसि, ते इमे वयं ते (३७३) जे तुला पाहून स्तुति करावयास प्रारंभ करतात, ते हे आम्ही तुझेच आहोंत. तुझे भक्त आहों.

५ महान् असि (३४६)- हे इन्द्रा ! तू मोठा आहेस.

६ विश्वा गिरः समुद्र-व्यचसं, रथीनां रथीतमं, वाजानां पतिं, सत्पतिं इन्द्रं अवीवृधन् (३४३)- सर्व स्तुति, समुद्राप्रमाणें विस्तीर्ण, रथीवीरांमध्यें मुख्य, बलांचा पति, सज्जनांचा पालनकर्ता इन्द्र आहे त्याचें महात्म्य वृद्धिंगत करतात.

७ वाजानां वाजपतिः, हरिवान् इन्द्रः उक्थेभिः मन्दिष्ठ (२२६) बलांचा वा अन्नांचा स्वामी, घोडे बाळगणारा इन्द्र स्तोत्रांनीं स्तविला जात आहे.

८ तव इदं सख्यं अस्तृतं (२२९)- तुझें हें सख्य अविच्छिन्न आहे.

९ त्वदन्यः मर्डिता न अस्ति (२४७)- तुझ्याशिवाय स्तुतिला योग्य असा दुसरा कोणीहि नाहीं.

१० ऋची-षमः (१६९)- वेदमंत्रांनीं स्तुति ज्याची होते असा इन्द्र आहे.

इन्द्राची स्तुति

१ बोधन्मना शक्रः आशिषं शृणोतु (१४०)- आमच्या मनांतील इच्छा जाणणारा सामर्थ्यवान् इन्द्र आमची स्तुति ऐको.

२ चर्षणीनां सम्राजं, गीर्भिः नव्यं, नृषाहं नरं मंहिष्ठं इन्द्रं प्रस्तोत (१४४)- मानावांचा सम्राट्, स्तोत्रांनीं स्तुति करण्यास योग्य, शत्रूंचा पराभव करणारा, नेता महान् इन्द्र आहे त्याची स्तुति करा.

३ ऊतये सुरूप-कृत्नुं द्यवि द्यवि जुहूमसि (१६०)- आमच्या संरक्षणासाठीं सुरूप करणाऱ्या इन्द्राला दररोज आम्ही बोलावतों.

४ इन्द्रं गिरा अभि प्र अर्च (१६८)- इन्द्राची स्तुति करा.

५ इन्द्रं वाणी अनूषत (१९८)- इन्द्राची आमच्या वाणी स्तुति करतात

६ ते गिरः असृग्रं, वृषभं पतिं त्वा प्रति उदहासत (२०५)- तुझीं स्तोत्रें आम्हीं केलीं, ती बलवान् अशा तुला पोंचलीं आहेत.

७ महे प्रचेतसे देवाय कदु वचः शस्यते, तत् इत् अस्य वर्धनम् (२२४)- मोठ्या ज्ञानी इन्द्र देवाची साधारण स्तुति असली तरी ती त्याचें महत्वच वर्णन करते.

८ यथा विदे सु-राधसं इन्द्रं अभि अर्च (२३५) जशी येईल तशी उत्तम धनवान इन्द्राची आराधना करा.

९ अन्यत् मा चित् विशंसत, मा रिषण्यत, वृषणं इत् स्तोत (२४२)- दुसरें कांहीं करूं नका, व्यर्थ प्रयत्न करूं नका, बलवान् इन्द्राचीच स्तुति करा.

१० इमा गिरः त्वा वर्धन्तु (२५०)- या स्तुति तुझा प्रभाव वाढवोत.

११ पावकवर्णाः शुचयः विपश्चितः स्तोमैः अभ्यनूषत (२५०)- अग्निसारखे तेजस्वी शुद्ध ज्ञानी स्तोत्रांनीं इन्द्राची स्तुति करोत.

१२ बृहते ब्रह्म अर्चत (२५७)- मोठ्या इन्द्रासाठीं स्तोत्र म्हणा.

१३ इन्द्रं नः ब्रह्माणि उप भूषत (२६९)- इन्द्राला आमचीं स्तोत्रें सुभूषित करोत.

१४ गायत्रिणः त्वा गायन्ति, अर्किणः अर्कं अर्चन्ति, ब्रह्माणः त्वा उद्येमिरे (३४२)- गायन करणारे तुझें स्तोत्र गातात, उपासक तुझी उपासना करतात

व ब्राह्मण तुला-इन्द्राला-सर्वांत श्रेष्ठ आहेस असें वर्णन करतात.

१५ **शुद्धेन साम्ना, शुद्धैः उक्थैः, शुद्धं इन्द्रं स्तवाम** (३५०)- शुद्ध सामगायनानें, शुद्ध स्तोत्रांनीं शुद्ध इन्द्राची स्तुति करतों.

१६ **अप्रहणं शवसः पतिं विश्वासाहं नरं शचिष्ठं विश्ववेदसं इन्द्रं गृणीषे** (३५७)- धार्मिकांचें रक्षण करणाऱ्या, बलाचा स्वामी, सर्व शत्रूंचा नाश करण्याऱ्या, नेत्या, सामर्थ्यसंपन्न सर्वज्ञ इन्द्राची स्तुति करा.

१७ **विश्वा ओजसा दिवः पतिं समेत** (३७२)- सर्व सामर्थ्यानें द्युलोकाच्या पालक इन्द्राची एकत्र जमून उपासना करा.

१८ **यः एक इत् जनानां अतिथिः भूः** (३७२)- जो एकटाच इन्द्र लोकांनां अतिथिसारखा पूज्य झाला आहे.

१९ **बृहतीः गिरः चर्षणी-धृतं इन्द्रं अभ्यनूषत** (३७४)- पुष्कळ स्तुति मानवांना पूज्य अशा इन्द्राची स्तुति करतात.

२० **अवसे इन्द्रं सुवृक्तिभिः मंहय** (३७७)- आपल्या संरक्षणासाठीं इन्द्राचें महत्व उत्तम वचनांनीं वाढवा.

२१ **शतं आववृत्याम्** (३७७)- इन्द्राची स्तुति शेंकडों वेळां गा.

अशी इन्द्राची स्तुति केली जावी, हा या वर्णनांचा उद्देश आहे. इन्द्राचे गुण गाणारे, ऐकणारे व इतर लोक जे सभेमध्यें उपस्थित राहतात, त्या सर्वांचा लाभ या स्तुतिच्या श्रवणानें होत असतो. पहा—

" वज्रधारी, शूरवीर, पराभूत न होणारा, सर्वदा विजयी, सर्व शत्रूंना एकदम मारणारा, युद्धांत येणाऱ्या सर्व शत्रूंचा पराभव करणारा, कोणा पुढेंहि न नमणारा असा इन्द्र आहे."

हीच इन्द्राची स्तुति आहे. वारंवार हें वर्णन म्हणत गेलें, वारंवार आपण ऐकलें तर आपल्या मनावर त्याचा परिणाम काय होईल तें वाचकांनीं विचार करून जाणावें. या स्तुतिनें स्तुति करणारामध्यें व ही स्तुति ऐकणारामध्यें माझ्या अंगीं हे गुण यावे असा भाव उत्पन्न होतो व जर तो यत्न करील तर कांहीं दिवसांच्या अनुष्ठानानें त्याच्यामध्यें ते गुण येतील व तो उत्तम शूर बनेल. स्तुतिनें जो लाभ होतो तो असा आहे. देवाचे गुण माझ्यामध्यें यावे अशी बुद्धि झाली म्हणजे उन्नतिला प्रारंभ होतो. त्याच्या पुढें त्यानें ते गुण आपल्यामध्यें आणण्याचा यत्न करावयाचा आहे. हा असा जो प्रयत्न करील तो तसा श्रेष्ठ होईल यांत शंकाच नाहीं.

उपमा

वेदामध्यें उपमा देऊन विषय समजावला जातो त्या उपमा अशा या ऐन्द्र-काण्डांत आहेत—

१ **गवे शं न** (११५)- गाईला जसें गवत आवडतें त्याप्रमाणें हें स्तोत्र (**शाकिने इन्द्राय शं**) शक्तिमान् इन्द्राला संतोष देतें.

२ **पुष्टावन्तः यथा पशुं** (१३६)- पाशधारी शिकारी जसे पशुला शोधतात त्याप्रमाणें आम्ही (**त्वा विचक्षते**) तुला इन्द्रला शोधीत असतों.

३ **सिन्धवः समुद्राय इव** (१३७)- नद्या जशा समुद्राला मिळतात त्याप्रमाणें (**विश्वा कृष्टयः विशः अस्य मन्यवे संनमन्त**) सर्व प्रजाजन या इन्द्राच्या उत्साहापुढें नमून असतात.

४ **गावः धेनवः वत्सं न** (१४६) दुधाळ गाई वासराजवळ जातात, त्याप्रमाणें आमच्या (**इमाः गिरः त्वा अभि प्रनोनुवः**) या स्तुति तुज्या-इन्द्रा-जवळ जातात.

५ **सुदुघां गोदुहे इव** (१६०)- उत्तम दूध देणाऱ्या गाईला ज्याप्रमाणें दूध काढण्याच्या वेळीं बोलावतात, त्याप्रमाणें (**ऊतये सुरूपकृत्नुं द्यवि द्यवि जुहूमसि**) आमच्या संरक्षणासाठीं सुरूप करणाऱ्या इन्द्राला दररोज बोलावतों.

६ **द्यौः न** (१६६)- द्युलोक जसा विस्तीर्ण आहे त्याप्रमाणें (**शवः प्रथिना**) ह्या इन्द्राचें बल विस्तृत आहे.

७ **कपोतः गर्भधिं इव** (१८३)- ज्याप्रमाणें कबूतर कबूतरीकडे जातो त्याप्रमाणें (**अयं ते**) हा तुज्याजवळ येतो.

८ **सिन्धवः समुद्रं न** (१९७)- नद्या ज्याप्रमाणें समुद्राला मिळतात त्याप्रमाणें (**इन्दव त्वा आविशन्तु**) हे सोमरस तुला प्राप्त होवोत.

९ **ऋभुं ऋभुक्षणं रयिं न** (१९९)- कारागिराला ज्याप्रमाणें पोषण करणारें अन्न मिळतें, त्याप्रमाणें (**वाजी वाजिनं ददातु नः**) बलवान् इन्द्र आम्हाला अन्न देवो.

१० **वाजयन्तः कुविं यथा** (२१४)- अन्न उत्पन्न करणारे ज्याप्रमाणें विहिरीच्या पाण्यानें शेताचें सिंचन करतात, त्याप्रमाणें (**मंहिष्ठं इन्दुभिः सिंच**) महान् इन्द्राला सोमरसांनीं सिंचन करा.

११ **युवजानिः महान् इव** (२२७)- तरुण स्त्रीचा पति आपल्या स्त्रीकडे जातो, त्याप्रमाणें (**सुतं उपयाहि**)

या सोमाकडे तूं ये. यांत साम्य चित्ताच्या आकर्षणाचें आहे.

१२ सुतं वाताप्याय इमशा (२२८)- सोमरसामध्यें पाणी मिळवण्यसाठीं ज्याप्रमाणें पाण्याच्या कालव्याकडे जातात, त्याप्रमाणें (दीर्घं सुतं कदा अवारुध्यात) या मोठ्या यज्ञांत तुला आणण्यासाठीं केव्हां तुझ्याजवळ जावें बरें?

१३ अदुग्धाः धेनवः न (२३३)- दूध न काढलेल्या गाईजवळ जातात त्याप्रमाणें (अस्य जगतः तस्थुषः ईशानं स्वर्दृशं त्वा अभिनोनुमः) या जंगम व स्थावर जगाच्या स्वामी व आत्मज्ञानी अशा तुला आम्ही कधीं नम्र होऊन भेटावें बरें ?

१४ स्वसरेषु धेनवः वत्सं न (२३६)- गोशाळे मध्यें दुधाळ गाई आपल्या वासराकडे जातात, त्याप्रमाणें (दस्मं ऋतीषहं इन्द्रं गीर्भिः अभि नवामहे) सुंदर व शत्रूंचा पराभव करणाऱ्या इन्द्राजवळ स्तुति करीत आम्ही जातों.

१५ सुद्रुवं नेमिं त्वष्टा इव (२३८)- उत्तम लांकडाच्या बुंध्याला ज्याप्रमाणें सुतार योग्य बनवतो, त्याप्रमाणें (पुरुहूतं गिरा आ नमे) पुष्कळांनीं स्तविलेल्या इन्द्राला मीं प्रणाम करून अनुकूल बनवतों.

१६ पाशिनः धन्वा इव तान् आति आयाहि (२४६) –पाश हातांत धरणारे पारधी ज्याप्रमाणें वाळवंटाला पार करतात, त्याप्रमाणें तूं दुष्टांना पार करून ये.

१७ पाशिनः न, मा त्वा नियेमुः, एहि (२४६)- पाश धरणारे पारधी ज्याप्रमाणें पक्ष्यांना पकडतात, त्याप्रमाणें तुला कोणीहि मध्यें न पकडो, तूं आमच्याजवळ ये.

१८ वाजयन्तः रथाः इव (२५१)- अन्न घेऊन जाणाऱ्या रथांप्रमाणें (मधुमत्तमाः गिरः त्वा उदीरते) मधुर स्तोत्रें तुझ्यासाठीं उच्चारलीं जात आहेत, तीं तुझ्या पर्यंत पोंचोत.

१९ यथा गौरः (मृगः) तृष्यन् अपाकृतं इरिणं अवैति (२५२)- ज्याप्रमाणें तहानेलेला मृग पाण्यानें भरलेल्या तलावाकडे जातो, तसा तूं (नः तूयं आगहि) आमच्याकडे लवकर ये.

२० भगं न (२५३)- भाग्यवानाप्रमाणें (यशसं वसुविदं त्वा पराचरामि) यशस्वी धनी अशा तुझी आम्ही अराधना करितों.

२१ यथा पुत्रेभ्यः पिता (२५९)- ज्याप्रमाणें पुत्रांना पिता शिक्षण देतो, त्याप्रमाणें (नः शिक्ष) आम्हांला शिक्षण दे.

२२ आपः न (२६१)- पाणी जसें सोमामध्यें मिळतें, त्याप्रमाणें आम्ही तुला प्राप्त करतों.

२३ सूर्यं आयन्तः इव (२६७)- सूर्याचा आश्रय किरणें करतात, त्याप्रमाणें (विश्वेत् इन्द्रस्य भक्षत) सर्व विश्व इन्द्राचा आश्रय करते.

२४ भागं न (२६७)- पित्याच्या धनामध्यें जसा पुत्र भाग मिळावा असें इछितो, त्याप्रमाणें (प्रति दीधिमः) आम्ही आपणास आमच्या परम पित्याच्या धनांतील भाग मिळावा असें इछित आहों.

२५ निधया बद्धान् इव (३१९)- पाशानें बांधलेल्यांना मुक्त करतात, त्याप्रमाणें (अस्मान् मुमुग्धि) आम्हांस मुक्त कर.

२६ चक्रियौ अक्षेण इव (३३९)- चाकें बुंध्यावर राहतात, त्याप्रमाणें (पृथिवीं उत द्यां विष्वक् तस्तंभ) पृथिवी व द्यु या दोनही लोकांना तो थांबवून धरतो.

२७ वंशं इव त्वा उद्येमिरे (३४२)- वेळूला वर उचलतात, त्याप्रमाणें तुला उन्नत करतात, इन्द्राची स्तुति गाऊन इन्द्राचें महत्त्व वाढवतात.

२८ सूर्यः रश्मिभिः रजः न (३४७)- सूर्य आपल्या किरणांनीं अंतरिक्ष भरून टाकतो, त्याप्रमाणें (इन्द्रियं त्वा आ पृणक्तु) तुझी इन्द्रियांची शक्ति तुला भरून टाको.

२९ रथ्यौः इव (३४९)- रथांत बसणारे वीर जसे इष्ट ठिकाणीं जाऊन पोंचतात, त्याप्रमाणें आमच्या (गिरः) स्तुति तुला पोंचोत.

३० वत्सं धेनवः गावः इव (३४९)- वासराजवळ जशा दुधाळ गाई जातात, त्याप्रमाणें (त्वा अभि अनूषत) तुला आमच्या स्तुति पोंचोत.

३१ रथं यथा (३५४)- रथाला जसें आम्ही फिरवतों व इष्टस्थानीं नेतों, त्याप्रमाणें (इन्द्रं आ वर्तयामसि) इन्द्राला आम्ही यज्ञांत आणतों.

३२ अंहः न (३६५)- पापापासून जसा बचाव करतात, त्याप्रमाणें (द्विषः तरति) शत्रूंपासून आपला बचाव करतात.

३३ क्षोणीः इव (३७३)- पृथिवी जशी सर्वांना आधार देते, (नः वचः प्रति हर्य) आमच्या स्तुतिचा स्वीकार कर.

३४ यथा जनयः मर्यं पतिं न परिष्वजन्तः (३७५)– ज्याप्रमाणें स्त्रिया आपल्या पतिला आलिंगन देतात, त्याप्रमाणें

(ऊतये इन्द्रं स्वर्-युवः मतयः अच्छा अनूषत) आमच्या संरक्षणासाठीं इन्द्राला आत्मज्ञानयुक्त आमच्या स्तुति प्राप्त होवोत.

३५ उषा इव (३७९)- उषा ज्याप्रमाणें विश्वाला भरून टाकते, त्याप्रमाणे तूं (उभे रोदसी आ पप्राथ) पृथिवी व द्युलोकाला भरून टाकतोस.

३६ गिरिः न (३९३)- पर्वताप्रमाणें तूं (विश्वतः पृथुः दिवस्पतिः) सर्वात मोठा व द्युलोकाचा स्वामी आहेस.

३७ उदा यन्तः उदभिः इव (४०६)- पाणी घेऊन जाणारे मित्र पाण्यानें खेळतात, त्याप्रमाणें आम्ही (त्वा उप ससृग्महे) तुझ्याजवळ येत आहों.

३८ यवसे रणा गावः न (४२२)- ज्याप्रमाणें गवताला रमणीय गाई प्राप्त करतात, त्याप्रमाणें (ते सख्ये) तुझ्या मित्रतेसाठीं आम्हीं तुझ्याजवळ येत आहों.

३९ पुत्रासः वाज-सातये पितरं न (४५९)- पुत्र अन्न मिळवण्यासाठीं जसे बापाकडे जातात, त्याप्रमाणें आम्ही तुझ्याकडे येत आहों.

४० महिषं वीरं वाज-सातये (४५९)- जसें मोठ्या वीराला युद्धांत बोलावतात, त्याप्रमाणें तुला आमच्या सहाय्यासाठीं बोलावीत आहों.

४१ सूरः सयुग्भिः न (४६३)- सूर्य जशा आपल्या किरणांनीं चमकतो, त्याप्रमाणें सोमरस (पृष्ठस्य धारा रोचते) आपल्या तेजानें चमकत आहे.

४२ नृतः ! नर्यं प्रथमं पूर्व्यं तव तत् अपः दिवि प्रवाच्यं (४६६)- हे इन्द्रा ! मानवांचें हित करणारें तुझें तें अपूर्व कर्म द्युलोकामध्यें प्रशंसनीय झालें आहे.

४३ देवस्य असुः सहसा रिणन् (४६६)- राक्षसांचे प्राण तूं नष्ट करतोस. (देवः= राक्षस)

४४ विश्वं अ-देवं सहसा अभिभुवः (४६६)- सर्व असुरांनां तूं आपल्या सामर्थ्यानें पराजित केलेंस.

सुभाषितें

१ सत्वने सचा गाय (११५)- सत्त्ववान् जो असेल त्याचीच प्रशंसा करा.

२ शाकिने शं (११५)- शक्तिमानाला सुख प्राप्त होतें.

३ हे शतक्रतो ! ते मदः द्युम्नितमः (११६)- हे शेंकडों कर्में करणाऱ्या वीरा ! तुझा आनन्द खरोखर तेजाचें संवर्धन करणारा आहे.

४ त्वं सहसः बलात् ओजसः अधिजातः (१२०) - तूं शत्रूचा पराभव करणाऱ्या बलापेक्षां श्रेष्ठ सामर्थ्यासह उत्पन्न झाला आहेस.

५ भूमिं व्यवर्तयत् (१२१)- त्यानें भूमिला फिरवीत ठेवली आहे.

६ त्वं एक इत् वस्व (१२२)- तूं एकटाच धनाचा खरा स्वामी आहेस.

७ हे अनाभयिन् ! ते ररिम (१२४)- हे निर्भय वीरा ! तुला आम्ही आनंदित करतों.

८ नर्यापसं वृषभं अस्तारं (१२५)- सार्वजनिक हिताचें काम करणाऱ्या बलवान् व शस्त्रें शत्रूवर फेंकणाऱ्या वीराची प्रशंसा करा.

९ हे इन्द्र ! तत् सर्वं ते वशे (१२६)- इन्द्रा ! हें सर्व तुझ्या आधीन आहे.

१० युवा सखा सुनीती आनयत् (१२७)- जो तरुण मित्र असतो तो सुनीतिनें सुखरूप आणतो.

११ आदिशः सूरः अक्तुषु नः मा अभ्यायमत (१२८)- चारही दिशांमधून शस्त्रांचा मारा करणारा शत्रू आमच्यावर रात्रीच्या वेळीं हल्ला न करो.

१२ तत् त्वा युजा वनेम (१२८)- तसा शत्रू आलाच तर तुझ्या मदतीनें त्याला आम्ही दूर करूं.

१३ ऊतये सानसिं सजित्वानं सदासहं वर्षिष्ठं रयिं आभर (१२९)- आमच्या संरक्षणासाठीं उपभोग घेण्यास योग्य, शत्रूवर विजय मिळवणाऱ्या, नेहेमीं शत्रूचा पराभव करणाऱ्या श्रेष्ठपणानें आम्हांला भरपूर भरून टाक.

१४ वयं महाधने अर्भे वृत्रेषु युजं वज्रिणं इन्द्रं हवामहे (१३०)- आम्ही मोठ्या व लहान युद्धांमध्यें व घेरणाऱ्या शत्रूंशीं होणाऱ्या चकमकींत सहाय्यासाठीं इन्द्राला बोलावतों.

१५ सहस्रबाहे पौंस्यं आददिष्ट (१३१)- सहस्रबाहू राक्षसाबरोबर झालेल्या युद्धांत इन्द्राचें बल प्रकट झालें.

१६ विश्वा द्विषः अपभिन्धि (१३४)- सर्व शत्रूंचा नाश कर.

१७ बाधः मृधः परिजहि (१३४)- बाधा करणाऱ्या शत्रूंचा पराभव कर.

१८ स्पार्हं तत् वसु आभर (१३४)- स्पृहणीय धन भरपूर दे.

१९ यामं चित्रं न्यृंजते (१३५)- युद्धांमध्यें विलक्षण शूरपणा तो दाखवतो.

२० विश्वाः कृष्टयः विशः अस्य मन्यवे सं नमन्त (१३७)- सर्व प्रजाजन या इन्द्राच्या क्रोधापुढें नमतात.

२१ देवानां अवः इत् महत् (१३८) देवांकडून मिळणारें संरक्षण खरोखर मोठें आहे.

२२ तत् अस्माकं ऊतये वयं आवृणीमहे (१३८)- तें संरक्षण आमच्या रक्षणासाठीं आम्ही स्वीकारीत आहों.

२३ नः प्रजावत् सौभगं सावीः (१४१) आम्हांला पुत्रपौत्रांसह मिळणारें सौभाग्य देवो.

२४ दुष्वप्न्यं परासुव (१४१)- दुःखकारक स्वप्नें दूर होवोत.

२५ सः वृषभः युवा तुविग्रीवः अनानतः क? (१४२)- तो बलवान् तरुण, मोठा गळा असलेला कोणापुढें न नमणारा इन्द्र कोठें आहे ?

२६ गिरिणां उपह्वरे च नदीनां संगमे धिया विप्रः अजायत (१४३)- पर्वतांच्या उतरणीवर आणि नद्यांच्या संगमावर बसून बुद्धि स्थिर करून मनुष्य ज्ञानी होतो.

२७ चर्षणीनां सम्राजं नृषाहं मंहिष्ठं नरं इन्द्रं प्रस्तोत (१४४)- मनुष्यांमध्यें सम्राटासारख्या, शत्रूंचा पराभव करणाऱ्या, नेत्या श्रेष्ठ इन्द्राची स्तुति करा.

२८ चन्द्रमसः गृहे त्वष्टुः अपीच्यं नाम (१४७)- चन्द्राच्या मंडलामध्यें सूर्याचा प्रकाश पोंचला आहे.

२९ अहं पितुः ऋतस्य मेधां परिजग्रह सूर्यः इव अजनि (१५२)- मीं पितृस्वरूप सत्याची बुद्धि स्वीकारली आहे; त्यामुळें सूर्यासारखा झालों आहे.

३० नः रेवतीः तुवि-वाजाः सन्तु (१५३)- आमच्या गाई पुष्कळ दूध देणाऱ्या होवोत.

३१ विश्वासां सुक्षितीनां चेततुः (१५४)- सर्व उत्तम माणसांना चांगली प्रेरणा होवो.

३२ विश्वा-साहं शतक्रतुं चर्षणीनां मंहिष्ठं इन्द्रं अभि प्र गायत (१५५)- सर्व शत्रूंचा नाश करणाऱ्या, शेंकडों कार्यें करणाऱ्या, सर्व प्रजांमध्यें श्रेष्ठ अशा इन्द्राची स्तुति करा.

३३ ऊतये सुरूपकृत्नुं द्यवि द्यवि जुहूमसि (१६०) – आमच्या संरक्षणासाठीं सुन्दर रूप बनवणाऱ्या इन्द्राला प्रतिदिवशीं आम्ही बोलावतों.

३४ त्वं ईशिषे (१६२)- तूं सर्वांचा स्वामी आहेस.

३५ योगे योगे वाजे वाजे ऊतये तवस्तरं इन्द्रं हवामहे (१६३)- प्रत्येक कार्यामध्यें व प्रत्येक स्पर्धेमध्यें संरक्षण व्हावें यासाठीं इन्द्राची प्रार्थना करतों.

३६ इन्द्रः महान् परः च (१६६) - इन्द्र मोठा आहे व श्रेष्ठ आहे.

३७ वज्रिणे महत्वं अस्तु (१६६)- वज्रधारी इन्द्राला महत्त्व प्राप्त आहे.

३८ द्यौः न शवः प्रथिना (१६६)- द्युलोकाप्रमाणें त्याचें महत्व विस्तारलेलें आहे.

३९ क्षुमन्तं चित्रं ग्राभं दक्षिणेन आ संगृभाय – तेजस्वी विलक्षण स्वीकारण्यास योग्य धन आम्हांला उजव्या हातानें दे.

४० सत्रासाहं ऊतये आच्यावयामसि (१७०)- सर्व शत्रूंना एकदम मारणाऱ्या इन्द्राला आमच्या रक्षणासाठीं आमच्याकडे बोलवा.

४१ हे शतक्रतो ! भद्रं भद्रं इषं ऊर्जं नः आ भर (१७३)- हे शेंकडों कर्मे करणाऱ्या इन्द्रा ! आम्हांला कल्याणकारक अन्न व बल भरपूर दे.

४२ नः मृळयासि (१७३)- आम्हांला तूंच सुखी करतोस.

४३ न कि इनीमसि (१७६)- आम्ही कांहीं हानिकारक कार्य करीत नाहीं.

४४ न कि आयोपयामसि (१७६)- आम्ही कांहीं सुद्धां विरुद्ध कार्य करीत नाहीं.

४५ मंत्रश्रुत्यं चरामसि (१७६)- वेदमंत्रांनीं जें सांगितलें आहे तें आम्ही करीत आहों.

४६ हे आथर्वण ! दोषा अगात् देवं सवितारं स्तुहि (१७७)- हे अथर्वा ! दोष झाला तर सवितादेवाची स्तुति कर.

४७ अप्रतिष्कुतः इन्द्रः दधीचः अस्थभिः नव नवतीः वृत्राणि जघान (१७९)- ज्याचा कोणी प्रतिकार करूं शकत नाहीं त्या इन्द्रानें दधीचीच्या अस्थींनीं ८१० वृत्रांनां मारलें.

४८ ओजसा महान् अभिष्टिः (१८०)- तूं आपल्या सामर्थ्यानें शत्रूंचा पराभव करणारा हो.

४९ महीभिः ऊतिभिः अस्माकं अर्धं आगहि (१८१) – मोठ्या संरक्षणाच्या साधनांसह आमच्याजवळ ये.

५० वातः नः हृदे शंभु मयोभु भेषजं आवातु, नः आयूंषि प्रतारिषत् (१८४)- हा वायु शान्ति व सुखकारक औषध आमच्याजवळ आणो व आमचें आयुष्य वाढवो.

५१ पावका वाजिनीवती धिया वसुः सरस्वती (१८९)- पवित्र करणारी, अन्न देणारी, बुद्धिनें धन देणारी ही विद्यादेवी आहे.

५२ सः नः वसूनि आभरात् (१९०)- तो आम्हांला भरपूर धन देतो.

५३ द्युक्षं दुराधर्षं महि अवः अस्तु (१९२)- तेजस्वी व शत्रूंकडून ज्याच्यावर आक्रमण होऊं शकत नाहीं असें मोठें संरक्षण आम्हांस मिळो.

५४ हे अद्रिवः ! राधः कृणुष्व (१९४)- हे वज्रधारी इन्द्रा ! आम्हांस धन दे.

५५ ब्रह्म-द्विषः अवजहि (१९४)- ज्ञानाचा द्वेष करणाऱ्यांना पराभूत कर.

५६ त्वादातं इत् यशः (१९५)- तुझ्या सहाय्यानेंच यश मिळतें.

५७ नः वृतः देवः इन्द्रः शूरः (१९६)- आम्हीं स्वीकारलेला इन्द्र देव शूर आहे.

५८ हे इन्द्र ! त्वां न अतिरिच्यते (१९७)- हे इन्द्रा ! तुझ्यापेक्षां कोणी मोठा नाहीं.

५९ ऋभुक्षणं रयिं ददातु (१९९)- कारागिरांचें रक्षण करणारें धन देवो.

६० नः इषे ऋभुं ददातु (१९९)- आम्हांला अन्न मिळावें यासाठीं कारागिरी दे.

६१ वाजी वाजिनं ददातु (१९९)- बलवान् इन्द्र आम्हांला बल देवो.

६२ स्थिरः विचर्षणिः महत् भयं अभीषत्, अचुच्युवत् (२००)- जो युद्धांत स्थिर रहातो व जो ज्ञानी असतो, तो मोठें भय आलें तरी तें दूर करतो.

६३ हे वृत्रहन् ! त्वत् उत्तरं न किः अस्ति (२०३) – हे वृत्रनाशक इन्द्रा ! तुझ्याहून मोठा कोणीहि नाहीं.

६४ जनानां तरणिं, त्रदं, समानं प्रशंसिषम् (२०४)- सर्व लोकांचा तारक, शत्रूला त्रास देणाऱ्या, सर्वांशीं समान वागणाऱ्या इन्द्राची स्तुति करतों.

६५ यं अद्रुहः पान्ति, स मर्त्यः सुनीथः (२०६) – ज्याचें द्रोह न करणारे संरक्षण करतात, तो मनुष्य उत्तम नीतिमान् असतो.

६६ विश्वाः स्पृधः अजयः (२११)- सर्व स्पर्धा करणाऱ्यांवर जय मिळवला.

६७ अपां फेनेन नमुचेः शिरः उदवर्तयः (२११) – पाण्याच्या फेनानें नमुचीचें शिर इन्द्रानें फोडलें.

६८ जातः वृत्रहा वुन्दं आददे, के के उग्राः शृण्विरे, मातरं वि पृच्छात् (२१६)- उत्पन्न होतांच इन्द्रानें बाण हातांत धरला व कोण कोण वीर येथें प्रख्यात आहेत असें आपल्या आईस विचारलें.

६९ ऊतये सुप्रकरस्नं, राधः कृण्वन्तं हवामहे (२१७)- आमच्या संरक्षणासाठीं ज्याचे बाहु पसरले आहेत व जो साधनें तयार करतो, त्या इन्द्राला आम्ही सहाय्यासाठीं बोलावतों.

७० तव इत् सख्यं अस्तृतं (२२९)- तुझें खरोखर सख्य अविच्छिन्न आहे.

७१ नः पृक्षु तनूषु नृम्णं आधेहि (२३१)- आमच्या लोकांमध्यें नेतृत्व करणारें बल वाढव.

७२ सत्राजित् पौंस्यं आधेहि (२३१)- सर्व शत्रूंना एकदम जिंकण्याचें सामर्थ्य आम्हांला दे

७३ वीरयुः असि (२३२)- शत्रू बरोबर लढणारा तूं आहेस.

७४ शूरः उत स्थिरः असि (२३२)- तूं शूर व युद्धांत स्थिर राहणारा आहेस.

७५ ते मनः राध्यं (२३२)- तुझें मन आराधना करण्यास योग्य आहे.

७६ अस्य तस्थुषः जगतः ईशानं स्वर्दृशं त्वा अभिनोनुम- (२३३)- या स्थावर जंगम जगाचा ईश व आत्मज्ञानी अशा तुला आम्ही नमस्कार करतों.

७७ सत्पतिं त्वा नरः वृत्रेषु हवन्ते (२३४)- सज्जनांचें उत्तम पालन करणाऱ्या तुला युद्धांमध्यें सहाय्यासाठीं बोलावतात.

७८ काष्ठासु त्वा हवन्ते (२३४)- लहान युद्धांमध्येंहि तुलाच बोलावतात.

७९ पुरुवसुः मघवा सहस्रेण शिक्षति (२३५)- पुष्कळ धनवान् इन्द्र सहस्र प्रकारचें धन देतो.

८० ऋतीषहं गीर्भिः अभि नवामहे (२३६)- बाधक शत्रूंचा पराभव करणाऱ्या इन्द्राला आम्ही नमस्कार करतों.

८१ विदद्वसुं इन्द्रं ऊतये हुवे (२३७)- धनवान् इन्द्राला आमच्या रक्षणासाठीं बोलावतों.

८२ सधमादे आपिः नः वृधे बोधि (२३९)- एकत्र बसून जेथें कर्में केलीं जातात तेथें इन्द्र आमचा मित्र व उन्नति करणारा होवो.

८३ ते धियः अवन्तु (२३९)- तुझ्या बुद्धि आमचें रक्षण करोत.

८४ सचा स्तोत, मुहुः शंसत (२४२)– एकत्र बसून स्तुति करा व वारंवार स्तुति करा.

८५ यः सदावृधं विश्वगूर्तं, ओजसा अवृधं, धृष्णुं इन्द्रं चकार, तं नकिः कर्मणा नशत् (२४३)– जो सदा वाढणाऱ्या, सर्वांकडून स्तुति केल्या जाणाऱ्या, सामर्थ्यामुळें जो कोणाकडूनहि दाबला जात नाहीं, जो शत्रूंचें धर्षण करतो त्या इन्द्राची जो उपासना करतो त्यास कोणीहि दाबून टाकूं शकत नाहीं.

८६ संधिं सन्धाता (२४४)– तुटलेले सांधे जो जोडतो.

८७ विन्हुतं पुनः निष्कर्त्ता (२४४)– कापलेल्या भागांना जो जोडतो.

८८ त्वदन्यः मर्डिता नाऽस्ति (२४७)– तुझ्याशिवाय दुसरा कोणीहि खरें सुख देणारा नाहीं.

८९ अप्रतीनि पुरुवृत्राणि अनुत्तः चर्पणी-धृतिः एक इत् हंसि (२४८)– अप्रतिम अशा पुष्कळ वृत्रांना स्वतःच, केवल सर्व लोकांचें हित करण्यासाठीं एकटाच तूं मारतोस.

९० हे शचीपते शूर इन्द्र ! विश्वाभिः ऊतिभिः शग्धि (२५३)– हे सामर्थ्यवान् शूर इन्द्रा ! सर्व रक्षण-साधनांसह तूं समर्थ आहेस.

९१ भगं यशसं वसुविदं त्वा परिचरामि (२५३)– भाग्यवान्, यशस्वी व धनवान् अशा तुझी आराधना आम्ही करतों.

९२ याः भुजः असुरेभ्यः आ भरः अस्य वर्धय (२५४)– जे भोग तूं असुरांकडून आणलेस, त्यांनीं आमचें संवर्धन कर.

९३ नः क्रतुं आ भर (२५९)– आम्हांस सद्बुद्धि दे.

९४ यथा पुत्रेभ्यः पिता, नः शिक्ष (२५९)– जसा बाप मुलांना शिकवतो तसें तूं आम्हांस शिक्षित कर.

९५ जीवाः ज्योतिः अशीमहि (२५९)– आम्ही जिवंत राहून तेजस्विता प्राप्त करूं.

९६ नः मा परावृणक् (२६०)– आम्हांस दूर नको करूं.

९७ त्वं नः ऊती (२६०)– तूं आमचा संरक्षक आहेस.

९८ त्वं न आप्यः (२६०)– तूं आमचा भाऊ आहेस.

९९ नः सधमाद्ये भव (२६०)– आमच्या बरोबर बैस.

१०० सत्रा विश्वानि पौंस्या आ भर (२६२)– एकीनें होणारीं सर्व बलें आम्हांस दे.

१०१– पंच क्षितीनां द्युम्नं आ भर (२६२)– पंचजनांच्या ऐक्यातें उत्पन्न होणारें तेज आम्हांस मिळो.

१०२ परावति अर्वावति वृधा श्रुतः (२६३)– दूर व जवळ तूंच शक्तिमान् म्हणून प्रसिद्ध आहेस.

१०३ शक्र ! परावति असि, अर्वावति असि (२६४)– हे इन्द्रा ! तूं दूर आहेस तसाच जवळही आहेस.

१०४ त्रिधातु त्रिवरूथं स्वस्तये छर्दिः शरणं मह्यं (२६६)– तीन मजल्यांचें तीनही ऋतुमध्यें सुखकारक, आमच्या कल्याणासाठीं उत्तम आश्रय देणारें घर मला दे.

१०५ विश्वा इन्द्रस्य भक्षत (२६७)– सर्व जगत् इन्द्राच्या आश्रयानें राहतें.

१०६ जातः जनिमानि ओजसा करोति (२६७)– झालेलें व होणारें जें कांहीं आहे तें आपल्या शक्तिनें तो करतो.

१०७ अदेवः मर्त्यः सीं न आप (२६८)– ईश्वराची उपासना न करणारा तें धन प्राप्त करूं शकत नाहीं.

१०८ हे इन्द्रः ! अवमं मध्यमं पुष्यसि, परमस्य विश्वस्य सत्रा राजासि (२७०)– हे इन्द्रा ! कनिष्ठ व मध्यम धन तुझें आहे. श्रेष्ठ धनाचा तूं एकटाच स्वामी आहेस.

१०९ हे युध्म, खजकृत्, पुरन्दर ! अलर्षि (२७१) – हे युद्धकुशल, युद्ध करणाऱ्या व शत्रूंचीं नगरें तोडणाऱ्या वीरा ! इकडे ये.

११० यः चर्पणीनां राजा, रथेभिः अध्रिगुः याता, विश्वासां पृतनानां तरुता, वृत्र-हा ज्येष्ठं गृणे (२७३) – जो सर्व मानवांचा राजा, रथानें लवकर पुढें जाणारा, सर्व शत्रूसेनांचा नाश करणारा व वृत्राला मारणारा आहे, त्या इन्द्राची मीं स्तुति करतों.

१११ यतः भयामहे, ततः नः अभयं कृधि (२७४) – जेथून आम्हांस भय उत्पन्न होत असेल तेथून आम्हांस निर्भय कर.

११२ नः ऊतये द्विषः विजहि, मृधः विजहि (२७४) – आमच्या संरक्षणासाठीं शत्रूंना दूर कर व द्वेष्ट्यांचा नाश कर.

११३ शग्धि (२७४)– तूं सामर्थ्यवान् आहेस.

११४ शश्वतीनां पुरां भेत्ता, मुनीनां सखा इन्द्रः (२७५)– असुरांच्या शाश्वत नगरींचा नाश करणारा व मुनींचा मित्र इन्द्र आहे.

११५ महः सतः ते महिमा पनिष्टम (२७६)- तुझ्यासारख्या महापुरुषाचा महिमा वाखाणला जात आहे.

११६ महा महान् असि (२७६)- तूं आपल्या महिम्यानें मोठा आहेस.

११७ यः अश्वी रथी सुरूपः गोमान्. इन्द्र भाजा वयसा, सदा सचते, चन्द्रैः सभां उपयाति (२७७) – जो घोडे बाळगतो, रथांत बसतो, सुरूप आहे, गायी पाळतो, धनवान् आहे व अन्नानें युक्त असतो, तो आभूषणें घालून सभेमध्यें जाऊन बसतो.

११८ यत् द्यावः शतं स्युः, उत भूमी शतं स्युः, सहस्रं सूर्याः, अनुजातं त्वा न अष्ट (२७८)- शेंकडों द्युलोक, शेंकडों पृथिवी, सहस्रों सूर्य किंवा जें काय पाठीमागून झालें असेल तें सर्व तुझी बरोबरी करूं शकत नाहीं.

११९ वसो इन्द्र ! तं त्वा कः मर्तः आदधर्षति (२८०)- हे निवासक इन्द्रा ! त्या तुला कोणता मनुष्य भय दाखवूं शकत असेल बरें ?

१२० ते श्रद्धा वाजी (२८०)- तुझ्यावर श्रद्धा ठेवणारा बलवान् होतो.

१२१ सु आपे ! स्वापिभिः आ (२८२)- हे उत्तम मित्रा ! उत्तम मित्रांसह ये.

१२२ अ-जरं, प्र-हेतारं अ-प्रहितं आशुं जेतारं हेतारं रथीतमं अतूर्तं ऊतये इत (२८३)- जरारहित, शत्रूवर प्रहार करणाऱ्या, कोणीहि ज्यास विरोध करूं शकत नाहीं, शीघ्र विजय मिळवणाऱ्या, प्रेरणा करणाऱ्या, रथी-वीरांमध्यें श्रेष्ठ, ज्याला कोणीहि मारूं शकत नाहीं अशा इन्द्राला इकडे आणा.

१२३ यः सत्राहा विश्वचर्षणिः, तं इन्द्रं वयं हूमहे (२८६)- जो शत्रूंना एकदम मारतो व सर्वजनांचें हित करतो, त्या इन्द्राला आम्ही सहाय्यासाठीं बोलावीत आहों.

१२४ हे सहस्रमन्यो ! तुविनृम्ण सत्पते ! समत्सु नः वृधे भव (२८६)- हे हजारों उत्साहांनीं कार्य करणाऱ्या, पुष्कळ धनवान् सज्जनांच्या पालका ! युद्धांमध्यें आमचें मोठेपण वाढेल असें कर.

१२५ शचीभिः दिवानक्तं दिशस्यतं (२८७)- तुम्ही दिवस-रात्री आम्हांला धन द्या.

१२६ वां रातिः कदाचन मा उपदसत् (२८७)- तुमचें दान कधींहि कमी न होवो.

१२७ अस्मत् रातिः कदाचन मा उपदसत् (२८७) – आमचें दानही कधीं कमी न होवो.

*

१२८ विव्रतानां धर्तारं वरुणं वपा गिरा वन्देत (२८८)- विशेष अनेक कर्मांचें धारण करणाऱ्या वरुणाला विशेष संरक्षण मिळावें यासाठीं स्तुति करून वंदन करावें.

१२९ गाः पाहि (२८९)- गाईंचें रक्षण कर.

१३० इन्द्रः हर्योः संमिश्लः वज्री हिरण्ययः (२८९) – इन्द्र आपल्या रथाला घोडे जोडतो, वज्र धारण करतो व सोन्याच्या रथामध्यें बसतो.

१३१ हे अद्रिवः ! महे शुल्काय त्वा न परादीयसे (२९१)- हे वज्रधारी इन्द्रा ! पुष्कळ धन मिळालें तरी मीं तुला देऊन टाकणार नाहीं.

१३२ हे वज्रिवः ! न अयुताय, न सहस्राय, न शताय (२९१)- दहा हजार, एक हजार अथवा शंभर मिळाले तरी मीं तुला सोडणार नाहीं.

१३३ हे इन्द्र ! मे पितुः वस्यान् (२९२)- हे इन्द्रा ! माझ्या बापापेक्षां तूं अधिक धनवान् आहेस.

१३४ मे अभुंजतः भ्रातुः वस्यान् (२९२)- माझ्या भोग न भोगणाऱ्या बंधूपेक्षांहि तूं अधिक धनवान् आहेस.

१३५ मे माता समा (२९२)- माझी आई तुझ्यासारखी आहे.

१३६ वसुत्वनाय राधसे छदयथः (२९२)- धन व अन्न यांसाठीं मला मोठा बनव.

१३७ बृहन्तः वीडवः अद्रयः त्वा न वरन्ते (२९६) – मोठे थोरले पर्वतही तुला आपल्या कर्तव्यापासून दूर करूं शकत नाहींत.

१३८ यत् वसु शिक्षसि, तत् न किः आ मिनाति (२९६)- तूं जें धन देऊं इच्छितोस त्या तुझ्या दानाला कोणीहि प्रतिबंध करूं शकत नाहीं.

१३९ यः अयं शिप्री ओजसा पुरः विभिनत्ति (२९७)- हा शिरस्त्राण धारण करणारा इन्द्र आपल्या शक्तिनें शत्रूचीं नगरें तोडतो.

१४० यत् शासः सदसः परि अवतं च्यावय (२९८)- तूं शासन करतोस यासाठीं आमच्या स्थानापासून दुराचाऱ्याला दूर कर.

१४१ कदाचन स्तरीः नः असि (३००)- कधींहि तूं वंध्या गाईप्रमाणें होत नाहींस.

१४२ देवस्य ते दानं भूयः उपोपेत् पृच्यते (३००)- तुझ्यासारख्या दैवाचें दान पुष्कळसें आमच्याकडे येऊन वाढतें.

१४३ शची-वसु (३०४)- आपल्या शक्तिनें धन प्राप्त करणारे.

१४४ दाशुषे रत्नानि धत्तं (३०६)- दात्याला रत्नें द्या, धन द्या.

१४५ अहं सदा याचन् अचुक्रुधं (३०७)- मी सदोदित याचना करून आपणास क्रोध आणला काय ?

१४६ कः ईशानं न याचिषत् (३०७)- कोण बरें आपल्या स्वामीजवळ मागत नाहीं ?

१४७ वृषणा हरी उपयुयुजे, वृत्रहा आ जगाम (३०८)- बलवान् घोडे रथाला जोडले व वृत्राला मारणारा आला आहे.

१४८ ज्यायः इन्द्रः ईषतः तत् कनीयसः अभि आ भर (३०९)- मोठा इन्द्र इच्छा करणाऱ्या लहानाला तें धन भरपूर देवो.

१४९ पुरु-वसुः भरे भरे हव्यः (३०९)- पुष्कळ धनवान् तो इन्द्र प्रत्येक युद्धामध्यें सहाय्यासाठीं बोलावण्यास योग्य आहे.

१५० यत् त्वं यावतः ईशिषे एतावत् अहं ईशीय (३१०)- तूं जेवढ्या धनाचा स्वामी आहेस तेवढें मला मिळावें असें मी इच्छितों.

१५१ पापत्वाय न रंसिषं (३१०)- पापी होण्यास मीं तयार नाहीं.

१५२ त्वं प्रतूर्तिषु विश्वाः स्पृधः अभ्यसि (३११) - तूं युद्धांमध्यें सर्व शत्रूंचा नाश करतोस.

१५३ त्वं अशस्तिहा (३११)- तूं अप्रशस्तांचा नाश करतोस.

१५४ जनिता (३११)- शत्रूंच्या आपत्तिचा उत्पादक आहेस.

१५५ तरुष्यतः वृत्रतूः असि (३११)- तूं विघ्न करणाऱ्यांचा नाश करतोस.

१५६ विश्वं आति ववक्षिथ (३१२)- तूं सर्व विश्वाला व्यापतोस.

१५७ नः अविता वृधे च असः (३१४)- आमचा रक्षक व वाढवणारा आहेस.

१५८ वसूनि ददः- (३१४)- धन दे.

१५९ यत् दानवान् अवहन् (३१५)- जेव्हां तूं दानवांना मारलेंस.

१६० नः सुवित्तं आ भर (३१६)- आम्हांला उत्तम धन दे.

१६१ त्वोताः तना त्मना सह्याम (३१६)- तूं संरक्षण केलेले आम्ही स्वतःच पुष्कळ धन कमाऊं.

१६२ हे वसूनां वसुपते ! वसूयवः ते दक्षिणं हस्तं जगृह्म (३१७)- हे धनपते ! धनाची इच्छा करणारे आम्हीं तुझ्या उजव्या हाताला धरतों.

१६३ हे शूर ! चित्रं वृषणं रयिं दाः (३१७)- हे शूरा ! अनेक प्रकारचें बल वाढवणारें धन दे.

१६४ यत् पार्याः धियः युनजते नरः नेमधिता इन्द्रं हवन्ते (३१८)- जेव्हां संकटांतून सुटण्यासाठीं बुद्धिपूर्वक कर्मे केलीं जातात, तेव्हां युद्धांच्या वेळीं लोक इन्द्राला आपल्या मदतीला बोलावतात.

१६५ त्वं शूरः नृषाता शवसः चकानः (३१८)- तूं शूर मनुष्यांना धन देणारा बल वाढवण्यानें तेजस्वी झाला आहेस.

१६६ निधया बद्धान् अस्मान् मुमुग्धि (३१९)- पाशानें बांधलेल्या आम्हांला मुक्त कर.

१६७ महे वीराय तवसे तुराय विरप्शिने वज्रिणे स्थविराय अस्मै अपूर्व्या वचांसि तक्षुः (३२२)- महान् वीर शक्तिमान् व लवकर कार्य करणाऱ्या वज्रधारी स्थिर अशा या इन्द्रासाठीं अपूर्व स्तुति करा.

१६८ द्रप्सः दशभिः सहस्रैः इयानः कृष्णः अंशुमतीं अवातिष्ठत्, शच्या धमन्तं तं इन्द्रः आवत्, अथ नृमणाः स्नीहितिं अधद्राः (३२३)- आक्रमण करण्यारा दहा हजार सैन्यासह असुर कृष्ण अंशुमती नदीवर आला, आपल्या बलानें जगाला त्रास देत असणाऱ्या त्या असुरावर इन्द्रानें चाल केली व त्या हिंसक सैन्याला ठार मारलें.

१६९ इमाः विश्वाः पृतनाः जयासि (३२४)- या सर्व शत्रू सैन्यावर तूं जय मिळवितोस.

१७० देवस्य महित्वा काव्यं पश्य (३२५)- देवाचें महत्त्व दाखवणारें काव्य पहा.

१७१ अद्य ममार स ह्यः समान (३२५)- आज जो मेला तोच उद्यां पूर्वीसारखा कार्य करूं लागतो.

१७२ त्वं तत् जायमानः अशत्रुभ्यः सप्तभ्यः शत्रुः अभवः (३२६)- तूं उत्पन्न होतांच ज्यांना शत्रू उरले नव्हते, त्या सात असुरांचा शत्रू झालास.

१७३ गूढे द्यावापृथिवी अन्वविन्दः (३२६)- अन्धकारांत पडलेल्या द्यावापृथिवींना प्रकाशांत आणलेंस.

१७४ विभुमद्भ्यः भुवनेभ्यः रणं धाः (३२६)- वैभवशाली भुवनांना अधिक रमणीय केलेंस.

१७५ दुवस्युः अर्यः तरुषीः (३२७)– प्रशंसनीय शत्रूनाशक असा तूं आम्हांला विजयी करतोस.

१७६ वृत्रहणं द्युक्षं पुरु-धस्मानं वृषभं स्थिरप्स्नुं वज्रिणं भृष्टिमन्तं त्वा गृणीषे (३२७)– वृत्राला मारणाऱ्या, तेजस्वी, अनेक शत्रूंचा नाश करणाऱ्या, बलवान्, युद्धांत स्थिर राहणाऱ्या, वज्रधारी, शत्रूनाशक अशा तुज इन्द्राची मीं स्तुति करतों.

१७७ वाजसातौ अस्मिन् भरे शुनं मघवानं इन्द्रं हुवेम (३२९)– धन देणाऱ्या या युद्धामध्यें उत्साही धनवान् इन्द्राला आमच्या मदतीसाठीं बोलावीत आहों.

१७८ शृण्वन्तं उग्रं समत्सु वृत्राणि घ्नन्तं धनानि संजितं ऊतये हुवेम (३२९)– गाऱ्हाणें ऐकणाऱ्या, उग्रवीर, युद्धामध्यें वृत्रांचा नाश करणाऱ्या, धनें जिंकणाऱ्या इन्द्राला आमच्या रक्षणासाठीं आम्ही बोलवीत आहों.

१७९ वाजिनं देवजूतं सहोवानं रथानां तरुतारं अरिष्टनेमिं पृतनाज्यं, आशुं तार्क्ष्यं स्वस्तये हुवेम (३३२)– बलवान्, देवांनीं सेवित, सामर्थ्यवान्, रथांचें संग्रामांमध्यें तारण करणाऱ्या, तीक्ष्ण आयुध जवळ ठेवणाऱ्या, शत्रूसेनेवर विजय मिळवणाऱ्या, शीघ्रगामी सुपर्णाला आमच्या कल्याणासाठीं आम्ही बोलावतों.

१८० त्रातारं अवितारं, हवे हवे सुहवं, शूरं शक्रं इन्द्रं हुवे (३३३)– तारण करणाऱ्या, संरक्षण करणाऱ्या, प्रत्येक युद्धांत बोलावण्यास योग्य अशा शूर समर्थ इन्द्राला बोलावतों.

१८१ वज्र–दक्षिणं. वि व्रतानां हरीणां, रथ्यं इन्द्रं यजामहे (३३४)– ज्यानें वज्र उजव्या हातांत घेतलें आहे, धावणाऱ्या घोड्यांच्या रथामध्यें जो बसतो त्या इन्द्राला आम्ही यज्ञांत बोलावतों.

१८२ श्मश्रुभिः दोधुवत्, ऊर्ध्वया वि भुवत् (३३४)– तो आपल्या दाढी व मिशा हालवीत सर्वांहून श्रेष्ठ झाला आहे.

१८३ सेनाभिः भयमानः राधसा वि (३३४)– आपल्या सैन्यानें शत्रूला भय दाखवीत तो धन देत असतो.

१८४ सत्रासाहं दाधृर्षिं तुम्रं महां अपारं वृषभं सुवज्रं इन्द्रं (३३५)– आम्ही एकदम अनेक शत्रूंना मारणाऱ्या, शत्रूला भयभीत करणाऱ्या, शत्रूला पळावयास लावणाऱ्या, मोठ्या अपार बलवान्, उत्तम वज्रधारी इन्द्राची प्रशंसा करतों.

१८५ यः वृत्रं हन्ता, वाजं सनिता, सुराधाः मघवा, मघानि दाता (३३५)– तो इन्द्र वृत्राला मारणारा, अन्न देणारा, उत्तम धनवान् आहे तो भक्तांना धन देतो.

१८६ यः मर्तः नः वनुष्यन् अभिदाति, मन्यमानः क्षिप्री युधा शवसा उगणाः तुरः, त्वोताः वृष-मणाः अभिष्याम (३३६)– जो शत्रू आम्हांला मारण्याची इच्छा करून आमच्यावर चढाई करून येत आहे, जो घमेंडखोर विनाशक आयुध घेऊन वेगानें सैन्यासह चढाई करून येत आहे, त्याला आम्ही तुझ्या संरक्षणानें सुरक्षित झालेले बलवान् मनानें युक्त होऊन पराभूत करूं.

१८७ विश्वानि विदुषे अरंगमाय जग्मये अपश्चादध्वने प्रति भर (३५२)– सर्वज्ञानी, योग्यवेळीं पोंचणाऱ्या, सर्वांच्या पूर्वी पोंचणाऱ्या इन्द्राला भरपूर सोम द्या.

१८८ उग्रं वचः अपावधीः (३५३)– उग्र भाषण करूं नकोस.

१८९ तुवि-कूर्मिं ऋतीषहं सत्पतिं त्वा इन्द्रं वर्तयामसि (३५४)– अति पराक्रमी, शत्रूंचा पराभव करणाऱ्या सज्जनांचा पालक इन्द्र आहे त्यास आम्ही आणतों.

१९० त्यं अ-प्रहणं श्रवसः पतिं विश्वासाहं शचिष्ठं विश्ववेदसं नरं गृणीषे (३५७)– त्या उपकार करणाऱ्या, बलाच्या स्वामी, सर्व शत्रूंचा पराभव करणाऱ्या, शक्तिमान्, सर्वज्ञ नेत्याची मीं स्तुति करतों.

१९१ पुरां भिन्दुः युवा कविः अमितौजाः विश्वस्य कर्मणः धर्ता, पुरुष्टुतः इन्द्रः अजायत (३५९)– शत्रूचीं नगरें तोडणारा, तरुण, कवि, अपरिमित सामर्थ्यवान्, सर्व कर्मांचें धारण करणारा, पुष्कळांनीं स्तविलेला, असा इन्द्र आहे.

१९२ हे नरः ! अर्चत, प्रार्चत, धृष्णुं अर्चन्तु (३६२)– हे लोक हो ! तुम्ही इन्द्राचा सत्कार करा, विशेष सत्कार करा, शत्रूचा पराभव करणाऱ्याचा सत्कार सर्व लोक करोत.

१९३ पुरु-निःषिधे इन्द्राय वर्धनं उक्थं शंस्यं (३६३)– पुष्कळ शत्रूंचा पराभव करणाऱ्या इन्द्राचें महात्म्य वर्णन करणारें स्तोत्र गावें.

१९४ विश्वानरस्य अनानतस्य शवसः पतिं हुवे (३६४)– सर्व शत्रूंच्या सैन्यावर आक्रमण करणाऱ्या, शत्रू पुढें कधींहि न नमणाऱ्या, सामर्थ्याच्या स्वामीला मीं बोलावतों.

१९५ सः बृहतः दिवः ऊती द्विषः तरति (३६५)–

तो मोठ्या दिव्य संरक्षणांनीं युक्त होऊन सर्व शत्रूंना दूर करतो.

१९६ शतक्रतो! त्रिमोः राधसः ते रातिः त्रिभ्वी (३६६)- हे शेंकडों कामे करणाऱ्या इन्द्रा! पुष्कळ धनाचें तुझें दान फार मोठें विशाल आहे.

१९७ विश्वचर्षणे सुदत्र! नः द्युम्नं मंहय (३६६)- हे सर्व द्रष्टया उत्तम दान देणाऱ्या इन्द्रा! आम्हांला धन देऊन मोठे कर.

१९८ आमुरिं उग्रं ओजिष्ठं तरसं तरस्विनं (३७०) शत्रूला मारणाऱ्या उग्रवीर सामर्थ्यवान् प्रतापी आणि त्वरेनें कार्य करणाऱ्या इन्द्राची स्तुति करतात.

१९९ पूर्व्यः सः आ जिगीषन्तं नूतनं पुरुषः इत् वर्तनीं अनु वावृते (३७२)- तो पुराण पुरुष इन्द्र शत्रूंला जिंकूं इच्छिणाऱ्या नवीन वीराला एकटाच विजयाच्या मार्गानें नेतो.

२०० बृहती गिरः चर्षणीधृतं वावृधानं अमर्त्यं इन्द्रं अभ्यनूषत (३७४)- आमच्या पुष्कळ स्तुति मानवांचें धारण पोषण करणाऱ्या वाढवणाऱ्या अमर इन्द्राची प्रशंसा करोत.

२०१ ऊतये शुन्ध्युं इन्द्रं स्वर्युवः उशतीः मतयः अच्छ अनूषत (३७५)- आमचें संरक्षण व्हावें यासाठीं पवित्र करणाऱ्या इन्द्राची आत्मशक्ति वाढवणाऱ्या उन्नतिची इच्छा करणाऱ्या आमच्या स्तुति प्रशंसा करोत.

२०२ त्यं मेषं वस्वः अर्णवं इन्द्रं गीर्भिः अभि-मदत (३७६)- त्या शत्रूचा पराभव करणाऱ्या धनाचा समुद्र अशा इन्द्राला स्तुतींनीं आनंदित करा.

२०३ यस्य मानुषं द्यावः न विचराति (३७६)- ज्याचें मानवांचें हित करण्याचें कार्य द्युलोकाप्रमाणें सर्वत्र पसरलें आहे.

२०४ भुजे मंहिष्ठं विप्रं अभ्यर्चत (३७६)- भोग मिळावे यासाठीं मोठ्या ज्ञानी इन्द्राची अराधना करा.

२०५ यः कृष्णगर्भाः निरहन् (३८०)- ज्या इन्द्रानें कृष्ण असुराच्या गर्भवती स्त्रियांना ठार केलें.

२०६ वज्रदक्षिणं वृषणं अवस्यवः हुवेमाहि (३८०) – उजव्या हातांत वज्र धारण करणाऱ्या बलवान् इन्द्राला आपलें संरक्षण व्हावें असें इच्छिणारे आम्ही बोलावीत आहों.

२०७ हे वज्रिवः! ते तं वृषणं पृक्षु सासहिं लोकःकृत्नुं मदं गृणीमसि (३८३)- हे वज्रधारी इन्द्रा! तुझ्या त्या बलवान्, युद्धांमध्यें शत्रूंचा पराभव करणाऱ्या, सर्व लोकांचें हित करणाऱ्या आनंदाची मीं प्रशंसा करतों.

२०८ यः एकः इत् विश्या कृष्टीः अभ्यस्यति (३८७)- जो एकटाच इन्द्र सर्व शत्रुसैन्याचा विनाश करतो.

२०९ यः एकः इत् दाशुषे मर्ताय वसु विदयते (३८९)- जो एकटाच दात्या मानवाला धन देतो.

२१० अप्रतिष्कुतः इन्द्रः ईशानः (३८९)- ज्याचा कोणीहि प्रतीकार करूं शकत नाहीं असा इन्द्र सर्वांचा ईश्वर आहे.

२११ नृतमाय धृष्णवे सुस्तुषे (३९०)-श्रेष्ठ वीर व शत्रूंचा पराभव करणाऱ्या इन्द्राची स्तुति करतो.

२१२ ओजसा त्वं वृत्रं हंसि (३९१)- आपल्या-सामर्थ्यानें तूं वृत्राला मारतोस.

२१३ सत्राजित् अगोह्य! विश्वतः पृथु दिवः, पतिः, नः आगहि (३९३)- हे सर्व शत्रूंना जिंकणाऱ्या, ज्याचा कोणीहि पराभव करूं शकत नाहीं अशा इन्द्रा! तूं सर्व बाजूंनीं विशाल, द्युलोकाचा स्वामी आहेस! तूं आमच्या-कडे ये.

२१४ अत्रिणं निहंसि, तं ईमहे (३९४)- खादाड शत्रूंना तूं मारतोस त्या तुझी आम्ही प्रार्थना करीत आहों.

२१५ समहसः आदित्यासः नः तुचे तुनाय जीवसे द्राघीयः आयुः सुकृणोतन (३९५)- मोठे आदित्य आमच्या पुत्रपौत्रांना जगण्यासाठीं दीर्घ आयु करोत.

२१६ वज्रहस्त! निर्ऋतीनां परिव्रजं वेत्थ (३९६) – हे वज्रधारी इन्द्रा! विघ्नें दूर करण्याचे मार्ग तूं जाणतोस.

२१७ अहः अहः शुन्ध्युः परिपदां (३९६)- दर-रोज स्वच्छता ठेवणारा रोग आदिकांना दूर करतो.

२१८ हे आदित्यासः! अमीवां, स्रिधं, दुर्मतिं अंहसः नः अप युयोतन (३९७)- हे आदित्य हो! रोग, शत्रू, दुष्टबुद्धि, पाप यांना आमच्यापासून दूर करा.

२१९ त्वं जनुषा अभ्रातृव्यः, अ-नाः, अनापिः (३९९)- तूं जन्मानेंच शत्रूरहित, तुझा नायक कोणी नाहीं व बांधवही कोणी नाहीं.

२२० युधा इत् आपित्वं इच्छसे (३९९)–तूं युद्धानेंच कोणी बांधव मिळावा असें इच्छितोस.

२२१ यः पुरा वस्यः नः प्र आनिनाय तं इन्द्रं ऊतये स्तुवे (४००)– ज्यानें पूर्वी धन आम्हांला दिलें त्या इन्द्राची स्तुति करतों.

२२२ दृढा चित् यमयिष्णवः मा अवस्थात (४०१) – बलवान् शत्रूंना नमविणाऱ्या वीरांनो ! आमच्यापासून दूर राहूं नका.

२२३ श्वसन्तं त्वया युजा प्रति ब्रुवीमहि (४०३) – क्रूर कर्मे केल्यामुळे श्वास लागलेल्या शत्रूला तुझ्या सहाय्यानें योग्य उत्तर देऊं.

२२४ त्वं नः ओजः नृम्णं आ भर, पृतनासहं वीरं आ भर (४०५) - तूं आम्हांला सामर्थ्य व धन भरपूर दे व शत्रूसेनेचा पराभव करण्याचें वीर्यहि आम्हांला भरपूर दे.

२२५ स्वराज्यं अनु अर्चन् पृथिव्याः अहिं निः शशाः (४१०)– स्वराज्याचें रक्षण करण्याच्या दृष्टीनें पृथिवीच्या अहि नामक शत्रूचें तूं शासन केलेंस.

२२६ तं महत्सु आजिषु अर्भे च ऊतिं हवामहे (४११)– त्याच्याजवळ मोठ्या व लहान युद्धांमध्यें संरक्षण व्हावें असें मागत आहों.

२२७ सः वाजेषु नः प्राविषत् (४११)- तो युद्धांत आमचें रक्षण करतो.

२२८ अद्रिवन् वज्रिन् इन्द्र ! तुभ्यं इत् वीर्यं अनुत्तं (४१२)- हे वज्रधारी इन्द्रा ! तुझा पराक्रम अजिंक्य आहे.

२२९ स्वराज्यं अनु अर्चन् मायिनं मृगं वृत्रं मायया अवधीः (४१२)– स्वराज्याची पालना करण्यासाठीं मायावी वृत्राला कपटानेंच तू मारलेंस.

२३० प्रेहि अभिहि धृष्णुहि (४१३)- शत्रूवर चाल-कर, चारहि बाजूंनी आक्रमण कर व त्यांचा नाश कर.

२३१ ते वज्रः न नियंसते (४१३)– तुझें वज्र कमी शक्तिमान् नाहीं.

२३२ ते शवः नृम्णं (४१३)– तुझें बल शत्रूला नमवणारें आहे.

२३३ स्वराज्यं अनु अर्चन् वृत्रं हनः अपः जय (४१३)- स्वराज्याची अर्चना करण्यासाठीं शत्रूला मार व जल जिंकून आपल्या ताब्यांत घे.

२३४ यत् आजयः उदीरते, धृष्णवे धनं धीयते (४१४)- जेव्हां युद्धें सुरू होतात, त्यावेळीं शत्रूला जिंकणाऱ्या वीराला धन मिळतें.

२३५ कं हनः ? (४१४)– कोणाला मारलेंस ?

२३६ कं वसौ दधः (४१४)- कोणाला धनामध्यें ठेवलेंस - कोणाला धन दिलेंस.

२३७ नः सूनृतावतः कदा करः (४१६)– आम्हांला सत्यभाषण करणारे केव्हां बरें करशील, केव्हां धन देशील ?

२३८ स्तोतृभ्यः इषं आ भर (४१९)- स्तुति करणाऱ्यांना भरपूर धन दे.

२३९ नः मनः दक्षं उत क्रतुं भद्रं वातय (४२२) – आमचें मन बल, कर्म व कल्याण प्राप्त व्हावें यासाठीं प्रेरित कर.

२४० शिप्री उपाकयोः हस्तयोः आयसं वज्रं निदधे (४२३)– शिरस्त्राण धारण करणाऱ्या इन्द्रानें आपल्या दोनही हातांनीं पोलादी वज्र धरलें.

२४१ यं सजोषसः द्विषः अति नयन्ति, तं मर्त्यं अंहः न, दुरितं न अष्ट (४२६)- ज्याला एका विचारानें राहणारे देव शत्रूंना दूर करून उन्नतिकडे नेतात, त्या मनुष्याला पाप लागत नाहीं व दुर्गतिहि त्याला शिवत नाहीं.

२४२ सक्षणिः वृत्राणि परि, नः ऋणया द्विषः तरध्यै ईरसे (४२८)- सामर्थ्यवान् असा तूं शत्रूंवर चढाई करून जा. आमच्या ऋणांचा नाश करणारा तूं, शत्रूंना पार करण्यासाठीं शत्रूंवर चढाई करून जातोस.

२४३ हे विश्वतो दावन् ! विश्वतः नः आ भर (४३७)- हे सर्व बाजूंनीं शत्रूचा उच्छेद करणाऱ्या इन्द्रा ! सर्व बाजूंनीं आम्हांला भरपूर धन दे.

२४४ एष ब्रह्मा (४३८)- हा इन्द्र ज्ञानी आहे.

२४५ त्वष्टा द्युमन्तं वज्रं (४४०)- त्वष्टानें तेजस्वी वज्र तयार केलें.

२४६ रयीषिणः शं पदं मघं (४४१)- धनानें यज्ञ करणारे शान्ति, उत्तम स्थान व धन प्राप्त करतात.

२४७ अ-व्रतः न हिनोति (४४१)- जो व्रताचें पालन करीत नाहीं त्याला कांहींच मिळत नाहीं.

२४८ गावः सदा शुचयः (४४२) - गाई सर्वदा शुद्ध असतात.

२४९ युवा श्रुतः इन्द्रः आ स्तोभति- (४४५)- तरुण प्रसिद्ध इन्द्र सर्व शत्रूंना मारतो.

२५० हे अग्ने ! त्वं नः अन्तमः शिवः त्राता भुवः (४४८)- हे अग्ने ! तूं आमचा जवळचा कल्याण करणारा संरक्षक आहेस.

२५१ विश्वस्य प्रस्तोभः (४५०)– सर्व शत्रूंचा नाश करणारा आहे.

२५२ सु वीराः शतहिमाः मदेम (४५४) उत्तम वीर पुत्रांनीं युक्त होऊन आम्ही शंभर वर्षे आनंदानें राहूं.

२५३ नः इषं पीवरीं कृणुहि (४५५)- आमचें अन्न अधिक पोषक कर.

२५४ इन्द्रः विश्वस्य राजति (४५६) इन्द्र विश्वावर राज्य करतो.

२५५ मघवानं उग्रं सत्रा भूरि श्रवांसि दधानं अप्रतिष्कुतं तं इन्द्रं जोहवीमि (४६०)- धनवान्, उग्रवीर, पुष्कळ बलें धारण करणाऱ्या, शत्रूंकडून कधींहि पराजित न होणाऱ्या त्या इन्द्राला सहाय्यासाठीं बोलावतों.

२५६ वज्री राये विश्वा सुपथा करत् (४६०)- वज्रधारी इन्द्र धनप्राप्तिचे सर्व मार्ग उत्तम सुगम करतो.

याप्रमाणें या ऐन्द्र काण्डामध्यें सुभाषितें आहेत. हीं व्याख्यानांमध्यें, लेखांमध्यें किंवा पुस्तकांमध्यें प्रयोग करण्यासारखीं बोधप्रद आहेत.

ऐन्द्रकाण्डान्तर्गत ऋषि-देवता सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(३)		
११५	६।४५।१२	शंयुर्बार्हस्पत्यः	इन्द्रः	गायत्री
११६	८।९२।१६	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
११७	८।७२।१२	हर्यतः प्रागाथः	इन्द्रः (ऋ. अग्निर्हवींषि वा)	,,
११८	८।९२।२५	श्रुतकक्षः आंगिरसः	इन्द्रः	,,
११९	८।९३।७	श्रुतकक्षः आंगिरसः	,,	,,
१२०	१०।१५३।१	देवजामयः इन्द्रमातरः ऋषिकाः	,,	,,
१२१	८।१४।५	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	,,	,,
१२२	८।१४।१	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	,,	,,
१२३	८।२।२५	मेधातिथिः काण्वः, प्रियमेधश्चांगिरसः	,,	,,
१२४	८।२।१	मेधातिथि काण्वः प्रियमेधश्चांगिरसः	,,	,,
		(४)		
१२५	८।९३।१	सुकक्षश्रुतकक्षौ	,,	,,
१२६	८।९३।४	सुकक्षश्रुतकक्षौ	,,	,,
१२७	६।४५।१	भारद्वाजः	,,	,,
१२८	८।९२।३१	श्रुतकक्षः	,,	,,
१२९	१।८।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१३०	१।७।५	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१३१	८।४५।२६	त्रिशोकः काण्वः	,,	,,
१३२	७।३१।४	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१३३	८।४५।१	त्रिशोकः काण्वः	,,	,,
१३४	८।४५।४०	त्रिशोकः काण्वः	,,	,,
		(५)		
१३५	१।३७।३	कण्वो घौरः	,,	,,
१३६	८।४५।१६	त्रिशोकः काण्वः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१३७	८।६।४	वत्सः काण्वः	इन्द्रः	गायत्री
१३८	८।८३।१	कुसीदी काण्वः	"	"
१३९	१।१८।१	मेधातिथिः काण्वः	"	"
१४०	८।९३।१८	श्रुतकक्षः आंगिरसः	"	"
१४१	५।८२।४	श्यावाश्वः आत्रेयः	"	"
१४२	८।६४।७	प्रगाथः काण्वः	"	"
१४३	८।६।२८	वत्सः काण्वः	"	"
१४४	८।१६।१	इरिम्बिठिः काण्वः	"	"
		(६)		
१४५	८।९२।४	श्रुतकक्षः आंगिरसः	"	"
१४६	६।४५।२५	मेधातिथिः काण्वः	"	"
१४७	१।८४।१५	गोतमो राहूगणः	"	"
१४८	६।५७।४	भरद्वाजो बार्हस्पत्यः	"	"
१४९	८।९४।१	बिन्दुः पूतदक्षो वा आंगिरसः	मरुतः	"
१५०	८।९३।३१	श्रुतकक्षः सुकक्षो वा	इन्द्रः	"
१५१	८।९३।२३	श्रुतकक्षः सुकक्षो वा	"	"
१५२	८।६।१०	वत्सः काण्वः	"	"
१५३	१।३०।१३	शुनःशेप आजीगर्तिः	"	"
१५४	—	शुनःशेप आजीगर्तिः वामदेवो वा	"	"
		(७)		
१५५	८।९२।१	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	"	"
१५६	७।३१।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
१५७	८।२।१६	मेधातिथिः काण्वः प्रियमेधश्चाङ्गिरसः	"	"
१५८	८।९२।१९	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	"	"
१५९	८।१७।११	इरिम्बिठिः काण्वः	"	"
१६०	१।४।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	"	"
१६१	८।४५।२२	त्रिशोकः काण्वः	"	"
१६२	८।८२।७	कुसीदी काण्वः	"	"
१६३	१।३०।७	शुनःशेप आजीगर्तिः	"	"
१६४	१।५।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	"	"
		(८)		
१६५	३।५१।१०	विश्वामित्रो गाथिनः	"	"
१६६	१।८।५	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	"	"
१६७	८।८१।१	कुसीदी काण्वः	"	"
१६८	८।६९।४	प्रियमेध आंगिरसः	"	"
१६९	४।३२।१	वामदेवो गौतमः	"	"
१७०	८।९२।७	श्रुतकक्ष सुकक्षो वा आंगिरसः	"	

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१७१	१।१८।६	मेधातिथिः काण्वः	इन्द्रः	गायत्री
१७२	—	वामदेवो गौतमः	,,	,,
१७३	८।९३।१८	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
१७४	८।९४।४	बिन्दुः पूतदक्षो वा आंगिरसः	,,	,,
		(९)		
१७५	१०।१५३।१	देवजामयः इन्द्रमातरः	,,	,,
१७६	१०।१३४।७	गोधा ऋषिका	,,	,,
१७७	—	दध्यङ्ङाथर्वणः	,,	,,
१७८	१।४६।१	प्रस्कण्वः काण्वः	,,	,,
१७९	१।८४।१३	गोतमो राहूगणः	,,	,,
१८०	१।९।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१८१	४।३१।१	वामदेवो गौतमः	,,	,,
१८२	८।६।५	वत्सः काण्वः	,,	,,
१८३	१।३०।४	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१८४	१०।१८६।१	उलो वातायनः	,,	,,
		(१०)		
१८५	१।४१।१	कण्वो घौरः	,,	,,
१८६	८।४६।१०	वत्सः काण्वः	,,	,,
१८७	८।६।११	वत्सः काण्वः	,,	,,
१८८	८।९३।१७	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
१८९	१।३०।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१९०	—	वामदेवो गौतमः	,,	,,
१९१	८।१७।१	इरिम्बिठिः काण्वः	,,	,,
१९२	१०।१८५।१	सत्यधृतिर्वारुणिः	,,	,,
१९३	८।४६।१	वत्सः काण्वः	,,	,,
		(११)		
१९४	८।६४।१	प्रगाथः काण्वः	,,	,,
१९५	३।४०।६	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१९६	—	वामदेवो गौतमः	,,	,,
१९७	८।९२।२२	श्रुतकक्ष आंगिरसः	,,	,,
१९८	१।७।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१९९	८।९३।३४	श्रुतकक्षः आंगिरसः	,,	,,
२००	२।४१।१०	गृत्समदः शौनकः	,,	,,
२०१	६।४५।१८	भरद्वाजः बार्हस्पत्यः	,,	,,
२०२	६।५७।१	भरद्वाजः बार्हस्पत्यः	,,	,,
२०३	४।३०।१	वामदेवो गौतम :	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१२)		
२०४	८।४५।२८	त्रिशोकः काण्वः	इन्द्रः	गायत्री
२०५	१।९।४	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
२०६	८।४६।४	वत्सः काण्वः	,,	,,
२०७	८।४५।१	त्रिशोकः काण्वः	,,	,,
२०८	८।९३।१६	सुकक्ष आंगिरसः	,,	,,
२०९	—	वामदेवो गौतमः	,,	,,
२१०	३।५२।१	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
२११	८।१४।१३	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	,,	,,
२१२	—	वामदेवो गौतमः	,,	,,
२१३	८।९३।२५	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
		(१३)		
२१४	१।३०।१	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
२१५	८।९२।१०	श्रुतकक्ष आंगिरसः	,,	,,
२१६	८।४५।४	त्रिशोकः काण्वः	,,	,,
२१७	८।३२।१०	मेधातिथिः काण्वः	,,	,,
२१८	१।९०।१	गोतमो राहूगणः	,,	,,
२१९	८।५।१	ब्रह्मातिथिः काण्वः	अश्विनौ मित्रावरुणौ	,,
२२०	३।६२।१६	विश्वामित्रो गाथिनो जमदग्निर्वा	इन्द्रः	,,
२२१	१।३७।१०	प्रस्कण्वः काण्वः	मरुतः	,,
२२२	१।२२।१७	मेधातिथिः काण्वः	विष्णुः	,,
		(१४)		
२२३	८।३२।२१	मेधातिथिः काण्वः	इन्द्रः	,,
२२४	—	वामदेवो गौतमः	,,	,,
२२५	८।२।१४	मेधातिथिः काण्वः प्रियमेधश्चांगिरसः	,,	,,
२२६	—	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
२२७	८।२।१९	मेधातिथिः काण्वः प्रियमेधश्चांगिरसः	,,	,,
२२८	१०।१०५।१	दुर्मित्रः (सुमित्रो वा) कौत्सः	,,	,,
२२९	१।१५।५	मेधातिथिः काण्वः	,,	,,
२३०	८।३२।७	मेधातिथिः काण्वः	,,	,,
२३१	—	विश्वामित्रो गाथिनोऽभीपाद् उदलो वा	,,	,,
२३२	८।९२।२८	श्रुतकक्षः आंगिरसः	,,	,,
		(१५)		
२३३	७।३२।२२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	बृहती
२३४	६।४६।१	भरद्वाजः बार्हस्पत्यः	,,	,,
२३५	८।४९।१	प्रस्कण्वः काण्वः	,,	,,

*

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
२३६	८।८८।१	नोधा गौतमः	इन्द्रः	बृहती
२३७	८।६६।१	कलिः प्रागाथः	,,	,,
२३८	७।३२।२०	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
२३९	८।३।१	मेधातिथिः काण्वः	,,	,,
२४०	८।६१।७	भर्गः प्रागाथः	,,	,,
२४१	७।५९।३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	मरुतः	,,
२४२	८।१।१	प्रगाथो घौरः काण्वः	इन्द्रः	,,
		(१६)		
२४३	८।७०।३	पुरुहन्मा आंगिरसः	,,	,,
२४४	८।१।१२	मेधातिथि-मेध्यातिथी काण्वौ	,,	,,
२४५	८।१।२४	मेधातिथि-मेध्यातिथी काण्वौ	,,	,,
२४६	३।४५।१	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
२४७	१।८४।१९	गोतमो राहूगणः	,,	,,
२४८	८।९०।५	नृमेधपुरुमेधावांगिरसौ	,,	,,
२४९	८।३।५	मेधातिथिर्मेध्यातिथिर्वा काण्वः	,,	,,
२५०	८।३।३	मेधातिथिर्मेध्यातिथिर्वा काण्वः	,,	,,
२५१	८।३।१५	मेधातिथिर्मेध्यातिथिर्वा काण्वः	,,	,,
२५२	८।४।३	देवातिथिः काण्वः	,,	,,
		(१७)		
२५३	८।६१।५	भर्गः प्रागाथः	,,	,,
२५४	८।९७।१	रेभः काश्यपः	,,	,,
२५५	८।१०१।५	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
२५६	८।३।७	मेधातिथिः काण्वः	,,	,,
२५७	८।८९।३	नृमेधपुरुमेधावांगिरसौ	,,	,,
२५८	८।८९।१	नृमेधपुरुमेधावांगिरसौ	,,	,,
२५९	७।३२।२६	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
२६०	८।९७।७	रेभः काश्यपः	,,	,,
२६१	८।३३।१	मेधातिथिः काण्वः	,,	,,
२६२	६।४६।७	भरद्वाजः बार्हस्पत्यः	,,	,,
		(१८)		
२६३	८।३३।१०	मेधातिथिः काण्वः	,,	,,
२६४	८।९७।४	रेभः काश्यपः	,,	,,
२६५	८।४६।१४	वत्सः	,,	,,
२६६	६।४६।९	भरद्वाजः बार्हस्पत्यः	,,	,,
२६७	८।९९।३	नृमेधः आंगिरसः	,,	,,
२६८	८।७०।७	पुरुहन्मा आंगिरसः	,,	,,
२६९	८।९०।१	नृमेधपुरुमेधावांगिरसौ	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१७०	७।३२।२६	वसिष्ठो मैत्रावरुणिः	इन्द्रः	बृहती
१७१	८।१।७	मेधातिथि-मेध्यातिथी काण्वौ	,,	,,
१७२	८।६६।७	कलिः प्रागाथः	,,	,,
		(१९)		
१७३	८।७०।१	पुरुहन्मा आंगिरसः	,,	,,
२७४	८।६१।१३	भर्गः प्रागाथः	,,	,,
१७५	८।१७।१४	इरिम्बिठिः काण्वः	,,	,,
१७६	८।१०१।११	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
१७७	८।४।९	देवातिथिः काण्वः	,,	,,
१७८	८।७०।५	पुरुहन्मा आंगिरसः	,,	,,
१७९	८।४।१	देवातिथिः काण्वः	,,	,,
१८०	७।३२।१४	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१८१	६।५९।६	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
१८२	८।५३।५	मेध्यः काण्वः	,,	,,
		(२०)		
१८३	८।९९।७	नृमेधः आंगिरसः	,,	,,
१८४	७।३२।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१८५	७।३२।८	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१८६	६।४६।३	भरद्वाजः बार्हस्पत्यः	,,	,,
१८७	१।१३९।५	परुच्छेपो दैवोदासिः	,,	,,
१८८	—	वामदेवो गौतमः	,,	,,
१८९	८।३३।४	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
१९०	८।६१।१	भर्गः प्रागाथः	,,	,,
१९१	८।१।५	मेधातिथि-मेध्यातिथी काण्वौ	,,	,,
१९२	८।१।६	मेधातिथि-मेध्यातिथी काण्वौ	,,	,,
		(२१)		
१९३	७।३२।४	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१९४	—	वामदेवो गौतमः	,,	,,
१९५	८।१।१०	मेधातिथि-मेध्यातिथी काण्वौ विश्वामित्र इत्येके	,,	,,
१९६	८।८८।३	नौधा गौतमः	,,	,,
१९७	८।३३।७	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१९८	—	वामदेवो गौतमः	,,	,,
१९९	—	वामदेवो गौतमः	त्वष्टा, पर्जन्यः, ब्रह्मणस्पतिः, अदितिः	,,
३००	८।५१।७	श्रुष्टिगुः काण्वः	इन्द्रः	,,
३०१	८।३।१७	मेधातिथिः काण्वः	,,	,,
३०२	८।९९।१	नृमेधः आंगिरसः		,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(२२)		
३०३	७।८१।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	उषा	बृहती
३०४	७।७४।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	अश्विनौ	"
३०५	—	अश्विनौ वैवस्वतौ	"	"
३०६	१।४७।१	प्रस्कण्वः काण्वः	इन्द्रः	"
३०७	८।१।१०	मेधातिथि-मेध्यातिथी काण्वौ	"	"
३०८	८।४।११	देवातिथिः काण्वः	"	"
३०९	७।३२।२४	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
३१०	७।३२।१८	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
३११	८।९९।५	नृमेध आंगिरसः	"	"
३१२	८।८८।५	नौधाः गौतमः	"	"
		(२३)		
३१३	७।२२।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	त्रिष्टुप्
३१४	७।२४।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
३१५	५।३२।१	गातुरात्रेयः	"	"
३१६	१०।१४८।१	पृथुर्वैन्यः	"	"
३१७	१०।४७।१	सप्तगुरांगिरसः	"	"
३१८	७।२७।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
३१९	१०।७३।११	गोरिवीतिः शाक्त्यः	"	"
३२०	१०।१२३।६	वेनो भार्गवः	वेनः	"
३२१	—	बृहस्पतिर्नकुलो वा	इन्द्रः	"
३२२	६।३२।१	सुहोत्रो भारद्वाजः	"	"
		(२४)		
३२३	८।९६।१३	द्युतानो मारुतः	"	"
३२४	८।९६।७	द्युतानो मारुतः	"	"
३२५	१०।५५।५	बृहदुक्थो वामदेव्यः	"	"
३२६	८।९६।१६	द्युतानो मारुतः	"	"
३२७	—	वामदेवो गौतमः	"	"
३२८	७।३१।१०	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
३२९	३।३०।२२	विश्वामित्रो गाथिनः	"	"
३३०	७।२३।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
३३१	१०।७३।९	गोरिवीतिः शाक्त्यः	"	"
		(२५)		
३३२	१०।१७८।१	अरिष्टनेमिस्तार्क्ष्यः	"	"
३३३	६।४७।११	भरद्वाजः	"	"
३३४	१०।२३।१	विमद ऐन्द्रः, वसुकृद्वा वासुक्रः	"	"
३३५	४।१७।८	वामदेवो गौतमः	"	"

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
३३६	—	वामदेवो गौतमः	इन्द्रः	त्रिष्टुप्
३३७	—	वामदेवो गौतमः	,,	,,
३३८	३।५३।१	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
३३९	१०।८९।४	रेणुर्वैश्वामित्रः	,,	,,
३४०	१०।१०।१	वामदेवो गौतमः	,,	,,
३४१	१।८४।१६	गोतमो राहूगणः	,,	,,
		(२६)		
३४२	१।१०।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	अनुष्टुप्
३४३	१।११।१	जेता माधुच्छन्दसः	,,	,,
३४४	१।८४।४	गोतमो राहूगणः	,,	,,
३४५	५।३९।१	अत्रिर्भौमः	,,	,,
३४६	८।९५।४	तिरश्चीरांगिरसः	,,	,,
३४७	१।८४।१	गोतमो राहूगणः	,,	,,
३४८	८।३४।१	नीपातिथिः काण्वः	,,	,,
३४९	८।९५।१	तिरश्चीरांगिरसः	,,	,,
३५०	८।९५।७	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
३५१	६।४४।१	तिरश्चीरांगिरसः शंयुर्बार्हस्पत्यो वा	,,	,,
		(२७)		
३५२	६।४२।१	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
३५३	—	वामदेवो गौतमः, शाकपूतो वा	,,	,,
३५४	८।६८।१	प्रियमेधः आंगिरसः	,,	,,
३५५	८।६३।१	प्रगाथः काण्वः	,,	,,
३५६	—	श्यावाश्व आत्रेयः	मरुतः	,,
३५७	६।४४।४	शंयुर्बार्हस्पत्यः	इन्द्रः	,,
३५८	४।३९।६	वामदेवो गौतमः	दधिक्रा	,,
३५९	१।११।४	जेता माधुच्छन्दसः	इन्द्रः	,,
		(२८)		
३६०	८।६९।१	प्रियमेधः आंगिरसः	,,	,,
३६१	—	वामदेवो गौतमः	,,	,,
३६२	८।६९।८	प्रियमेधः आंगिरसः	,,	,,
३६३	१।१०।५	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
३६४	८।६८।४	प्रियमेधः आंगिरसः	,,	,,
३६५	६।२।४	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
३६६	५।३८।१	अत्रिर्भौमः	,,	,,
३६७	१।४९।३	प्रस्कण्वः काण्वः	उषा	,,
३६८	१।१०५।५	त्रित आप्त्यः	विश्वेदेवाः	,,
३६९	—	वामदेवो गौतमः	इन्द्रः	,,

*

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(२९)		
३७०	८।९७।१०	रेभः काश्यपः	,,	अति जगती
३७१	१०।१४७।१	सुवेदाः शैलूषिः	,,	जगती
३७२	—	वामदेवो गौतमः	,,	,,
३७३	१।५७।४	सव्य आंगिरसः	,,	,,
३७४	३।५१।१	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
३७५	१०।४३।१	कृष्ण आंगिरसः	,,	,,
३७६	१।५१।१	सव्य आंगिरसः	,,	,,
३७७	१।५२।१	सव्य आंगिरसः	,,	,,
३७८	६।७०।१	भरद्वाजो बार्हस्पत्यः	द्यावापृथिवी	,,
३७९	१०।१३४।१	मेधातिथिः काण्वः	इन्द्रः	महापंक्तिः
३८०	१।१०१।१	कुत्स आंगिरसः	,,	जगती
		(३०)		
३८१	८।१३।१	नारदः काण्वः	,,	उष्णिक्
३८२	८।१५।१	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	,,	,,
३८३	८।१५।४	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	,,	,,
३८४	८।१२।१६	पर्वतः काण्वः	,,	,,
३८५	८।२४।१६	विश्वमना वैयश्वः	,,	,,
३८६	८।२४।१३	विश्वमना वैयश्वः	,,	,,
३८७	८।२४।१९	विश्वमना वैयश्वः	,,	,,
३८८	८।९८।१	नृमेध आंगिरसः	,,	,,
३८९	१।८४।७	गोतमो राहूगणः	,,	,,
३९०	८।२४।१	विश्वमना वैयश्वः	,,	,,
		(३१)		
३९१	८।६२।८	प्रगाथो घौरः काण्वः	,,	,,
३९२	६।४३।१	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
३९३	८।९८।४	नृमेध आंगिरसः	,,	,,
३९४	८।१२।१	पर्वतः काण्वः	,,	,,
३९५	८।१८।१८	इरिम्बिठिः काण्वः	आदित्याः	,,
३९६	८।२४।२४	विश्वमना वैयश्वः	इन्द्रः	,,
३९७	८।१८।१०	इरिम्बिठिः काण्वः	आदित्याः	,,
३९८	७।३२।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	इन्द्रः	विराडुष्णिक्
		(३२)		
३९९	८।२१।१३	सौभरिः काण्वः	,,	ककुप्
४००	८।२१।९	सौभरिः काण्वः	,,	,,
४०१	८।२०।१	सौभरिः काण्वः	मरुतः	,,
४०२	८।२१।३	सौभरिः काण्वः	इन्द्रः	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
४०३	८।२१।११	सौभरिः काण्वः	इन्द्रः	ककुप्
४०४	८।२०।१९	सौभरिः काण्वः	मरुतः	,,
४०५	८।९८।१०	नृमेध आंगिरसः	इन्द्रः	,,
४०६	८।९८।७	नृमेध आंगिरसः	,,	,,
४०७	८।२१।५	सौभरिः काण्वः	,,	,,
४०८	८।२१।१	सौभरिः काण्वः	,,	,,
		(३३)		
४०९	१।८४।१०	गोतमो (सम्मदो वा) राहूगणः	,,	पंक्तिः
४१०	१।८०।१	गोतमो (सम्मदो वा) राहूगणः	,,	,,
४११	१।८१।१	गोतमो (सम्मदो वा) राहूगणः	,,	,,
४१२	१।८०।७	गोतमो (सम्मदो वा) राहूगणः	,,	,,
४१३	१।८०।३	गोतमो (सम्मदो वा) राहूगणः	,,	,,
४१४	१।८१।३	गोतमो (सम्मदो वा) राहूगणः	,,	,,
४१५	१।८२।२	गोतमो (सम्मदो वा) राहूगणः	,,	,,
४१६	१।८२।१	गोतमो (सम्मदो वा) राहूगणः	,,	,,
४१७	१।१०५।१	त्रित आप्त्यः	विश्वेदेवाः	,,
४१८	५।७५।१	अवस्युरात्रेयः	अश्विनौ	,,
		(३४)		
४१९	५।६।४	वसुश्रुत आत्रेयः	अग्निः	,,
४२०	१०।२१।१	विमद ऐन्द्रः	,,	,,
४२१	५।७९।१	सत्यश्रवा आत्रेयः	उषा	,,
४२२	१०।२५।१	विमद ऐन्द्रः	सोमः	,,
४२३	१।८१।४	गोतमो राहूगणः	इन्द्रः	,,
४२४	१।८२।४	गोतमो राहूगणः	,,	,,
४२५	५।६।१	वसुश्रुत आत्रेयः	अग्निः	,,
४२६	१०।१२६।१	अंहोमुग्वामदेव्यः	विश्वेदेवाः	बृहती
		(३५)		
४२७	९।१०९।१	ऋण त्रसदस्यू	पवमानः सोमः	द्विपदा विराट्
४२८	९।११०।१	ऋण त्रसदस्यू	,,	त्रिपदा अनुष्टुप्पिपी-लिकामध्या
४२९	९।१०९।४	ऋण त्रसदस्यू	,,	द्विपदा विराट्
४३०	९।१०९।१०	ऋण त्रसदस्यू	,,	,,
४३१	९।१०९।१३	ऋण त्रसदस्यू	,,	,,
४३२	९।११०।२	ऋण त्रसदस्यू		त्रिपदा अनुष्टुप् पिपीलिका मध्या
४३३	७।५६।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	मरुतः	द्विपदा विराट्
४३४	४।१०।१	वामदेवो गौतमः	अग्निः	पदपंक्तिः
४३५	—	ऋण त्रसदस्यू	वाजिनः	पुर उष्णिक्

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषि:	देवता	छन्दः
४३६	९।११०९।७	ऋण त्रसदस्यू	पवमानः सोमः	द्विपदा विराट्
		(३६)		
४३७	—	त्रसदस्युः	इन्द्रः	द्विपदा विराट्
४३८	—	त्रसदस्युः	,,	,,
४३९	५।३१।४	त्रसदस्युः	,,	,,
४४०	५।३१।४	त्रसदस्युः	,,	,,
४४१	—	त्रसदस्युः	,,	,,
४४२	—	त्रसदस्युः	विश्वेदेवाः	,,
४४३	१०।१७२।१	संवर्त आंगिरसः	उषा	,,
४४४	—	त्रसदस्युः	इन्द्रः	,,
४४५	—	त्रसदस्युः	,,	,,
४४६	—	त्रसदस्युः	,,	,,
		(३७)		
४४७	८।५६।५	पृषध्रः काण्वः	अग्निः	,,
४४८	५।२४।१	बन्धुः सुबन्धुः श्रुतबन्धुः विप्र-बन्धुश्च क्रमेण गोपायना लौपायना वा	,,	,,
४४९	—	बन्धुः सुबन्धुः श्रुतबन्धुर्विप्र-बन्धुश्च क्रमेण गोपायना लौपायना वा	इन्द्रः	,,
४५०	—	बन्धुः सुबन्धुः श्रुतबन्धुर्विप्र-बन्धुश्च क्रमेण गोपायना लौपायना वा	,,	,,
४५१	१०।१७२।४	संवर्त आंगिरसः	उषा	,,
४५२	१०।१५७।१	भुवन आप्त्यः साधनो वा भौवनः	विश्वेदेवाः	,,
४५३	—	कवष ऐलूषः	,,	,,
४५४	६।१७।१५	भरद्वाजो बार्हस्पत्यः	इन्द्रः	,,
४५५	—	आत्रेयः	विश्वेदेवाः	,,
४५६	यजु० ३६।८	वसिष्ठो मैत्रावरुणिः	इन्द्रः	एकपदा
		(३८)		
४५७	२।२२।१	गृत्समदः शौनकः	इन्द्रः	अष्टिः
४५८	—	गौरांगिरसः	सूर्यः	अतिजगती
४५९	१।१३०।१	परुच्छेपो दैवोदासिः	इन्द्रः	अत्यष्टिः
४६०	८।९७।१३	रेभः काश्यपः	,,	अतिजगती
४६१	१।१३९।१	परुच्छेपो दैवोदासिः	विश्वेदेवाः	अत्यष्टिः
४६२	५।९७।१	एवयामरुदात्रेयः	मरुतः	अतिजगती
४६३	९।१११।१	अनानतः पारुच्छेपिः	पवमानः सोमः	अत्यष्टि
४६४	—	नकुलः	सविता	,,
४६५	१।१२७।१	परुच्छेपो दैवोदासिः	अग्निः	,,
४६६	२।२२।४	गृत्समदः शौनकः	इन्द्रः	अष्टिः

अथ पावमानं काण्डम् ।

अथ पञ्चमोऽध्यायः ।

[९]

(१-१०) १, ४ अमहीयुराङ्गिरसः; २ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ३ भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा; ५ त्रित आप्त्यः; ६ कश्यपो मारीचः; ७ जमदग्निर्भार्गवः; ८ दृढच्युत आगस्त्यः; ९, १० असितः काश्यपो देवलो वा ॥
पवमानः सोमः ॥ गायत्री ॥

४६७ उच्चा ते जातमन्धसो दिवि सद्भूम्या ददे । उग्रंशर्म महि श्रवः ॥ १ ॥ (ऋ. ९।६१।१०)
४६८ स्वादिष्ठया मदिष्ठया पवस्व सोम धारया । इन्द्राय पातवे सुतः ॥ २ ॥ (ऋ. ९।१।१)
४६९ वृषा पवस्व धारया मरुत्वते च मत्सरः । विश्वा दधान ओजसा ॥ ३ ॥ (ऋ. ९।६५।१०)
४७० यस्ते मदो वरेण्यस्तेना पवस्वान्धसा । देवावीरघशंसहा ॥ ४ ॥ (ऋ. ९।६१।१९)

[१] प्रथमः खण्डः ।

[४६७] हे सोमा ! (ते अन्धसः) तुझ्या या अन्नरूपी रसाचा (जातं उच्चा) जन्म उच्चस्थानीं (दिवि) द्युलोकामध्यें झाला आहे. (सत् उग्रं शर्म) द्युलोकामध्यें असणारें प्रभावशाली सुख व (महि श्रवः) महान् अन्न (भूम्या ददे) भूमीवर प्राप्त होत आहे. ॥ १ ॥

१ ते जातं दिवि उच्चा— तुझा-सोमाचा-जन्म द्युलोकांत उच्च ठिकाणीं झाला आहे.

२ उग्रं शर्म महि श्रवः भूम्या ददे— तेथून तें मोठें सुख व उत्तम अन्न पृथ्वीवर येऊन आम्हांस प्राप्त होतें.

[४६८] हे (सोम) सोमा ! (इन्द्राय पातवे सुतः) इन्द्राला प्यावयास देण्यासाठीं काढलेला हा रस रूपानें (स्वादिष्ठया) स्वादिष्ट आणि (मदिष्ठया) हर्ष उत्पन्न करणाऱ्या (धारया पवस्व) धारेनें प्रवाहित हो. ॥ २ ॥

१ इन्द्राय पातवे सुतः— इन्द्राला प्यावयास देण्यासाठीं हा रस काढला आहे.

२ स्वादिष्ठया मदिष्ठया धारया पवस्व— तो स्वादिष्ट व हर्ष वाढवणारा आहे.

[४६९] हे सोमा ! (वृषा धारया पवस्व) बलशाली धारेनें कलशांमध्यें ये आणि (मरुत्वते) मरुत् वीर ज्याची सहाय्यता करतात त्या इन्द्रासाठीं (विश्वा ओजसा दधानः) सर्व सामर्थ्यानें युक्त होऊन (मत्सरः) आनन्द वाढवणारा हो. ॥ ३ ॥

१ वृषा धारया पवस्व— जोरदार प्रवाहानें भांड्यांमध्यें रस पडो.

२ मरुत्वते (इन्द्राय)— इन्द्राच्या मदतीला मरुत् वीर येतात.

३ विश्वा ओजसा दधानः— सर्व सामर्थ्यांचें धारण कर.

४ मत्सरः (मद्-सरः)— आनन्द वाढवणारा हो.

सोमरस पिण्यानें सामर्थ्य व आनन्द वाढतो.

[४७०] हे सोमा ! (ते देवावीः) तुझा देवांना आवडणारा (अघ-शंस-हा) पापी दुष्टांचा विनाशक (वरेण्यः मदः) व श्रेष्ठ आनंद देणारा असा (यः रसः) रस आहे, (तेन अन्धसा) त्या अन्नरूप रसासह (पवस्व) कलशामध्यें ये. ॥ ४ ॥

४७१ तिस्रो वाच उदीरते गावो मिमन्ति धेनवः । हरिरेति कनिक्रदत् ॥ ५ ॥ (ऋ. ९।३३।४)
४७२ इन्द्रायेन्दो मरुत्वते पवस्व मधुमत्तमः । अर्कस्य योनिमासदम् ॥ ६ ॥ (ऋ. ९।६४।२२)
४७३ असाव्यंशुर्मदायाप्सु दक्षो गिरिष्ठाः । श्येनो न योनिमासदत् ॥ ७ ॥ (ऋ. ९।६२।४)
४७४ पवस्व दक्षसाधनो देवेभ्यः पीतये हरे । मरुद्भ्यो वायवे मदः ॥ ८ ॥ (ऋ. ९।२५।१)

---

१ देवावीः (देव-आवीः)— देवांना प्रिय, देव ज्याला पितात.

२ अघ-शंस-हा— पापी आहेत अशी ज्यांची निन्दा होते, त्यांचा विनाश करणारा हा रस आहे.

३ वरेण्यः मदः— श्रेष्ठ आनंद देणारा.

४ पवस्व— स्वच्छ होण्यासाठीं भांड्यांत गाळला जातो. स्वच्छ होऊन भांड्यांत पड.

[४७१] (तिस्रः वाचः उदीरते) ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद या तीन वेदांचे मंत्र म्हटले जात आहेत. (धेनवः गावः मिमंति) दुधाळ गाई दोहन व्हावें म्हणून शब्द करीत आहेत. (हरिः कनिक्रदत् एति) हिरव्या रंगाचा सोम शब्द करीत गाळला जात आहे. ॥ ५ ॥

१ तिस्रः वाचः उदीरते— तीन वेदांचे मंत्र म्हटले जात आहेत.

२ धेनवः गावः मिमंति— दूध देणाऱ्या गाई आपलें दूध लवकर काढावें यासाठीं हंबारव करीत आहेत.

३ हरिः कनिक्रदत् एति— हिरव्या रंगाचा सोमरस शब्द करीत गाळला जात आहे.

यज्ञशाळेंत सकाळीं काय होतें त्याचें हें वर्णन आहे.

[४७२] हे (इन्दो) सोमरसा ! (मधुमत्तमः) अत्यंत मधुर असा तूं (अर्कस्य योनिं) यज्ञाच्या स्थानांत (आसदं) बसण्यासाठीं (मरुत्वते इन्द्राय) मरुत् ज्याचें सहाय्य करतात त्या इन्द्रासाठीं (पवस्व) कलशामध्यें उतर. ॥ ६ ॥

१ मधु-मत्-तमः— अत्यंत मधुर.

२ अर्कस्य योनिः— पूज्य असा यज्ञ जेथें होतो. अर्क= पूज्य.

३ पवस्व— रस गाळण्यासाठीं एका भांड्यांतून दुसऱ्या भांड्यांत ओततात.

[४७३] (गिरि-ष्ठाः अंशुः) पर्वतावर असणाऱ्या सोमाचा (मदाय असावि) आनंद प्राप्त व्हावा म्हणून रस काढला आहे. (अप्सु दक्षः) पाण्यांत मिसळून तो वाढवला आहे. (श्येनः न) श्येन पक्ष्याप्रमाणें (योनिं आसदत्) आपल्या स्थानीं तो येऊन बसला आहे. ॥ ७ ॥

१ गिरि-ष्ठाः अंशुः— पर्वतावर सोमवल्ली असते.

२ असावि— तिचा रस काढला आहे.

३ अप्सु दक्षः— पाण्यांत मिसळून तो वाढवला आहे. तो बल वाढवणारा झाला आहे.

४ श्येनः न योनिं आसदत्— श्येन पक्षी जसा पर्वतावरून उडून आपल्या स्थानीं येतो, तसा हा सोम पर्वतावरून येथें यज्ञशाळेंत आला आहे.

[४७४] हे (हरे) हिरव्या रंगाच्या सोमा ! (दक्ष-साधनः) बल वाढवण्याचें साधन असा तूं (मदः) आनंददायक (देवेभ्यः मरुद्भ्यः पीतये) देव व मरुत् यांना पिण्यासाठीं (पवस्व) या भांड्यांत ये. ॥ ८ ॥

१ हरिः— सोम हिरव्या रंगाचा असतो.

२ दक्ष-साधनः— बल वाढवण्याचें हें साधन आहे.

३ मदः— आनन्द वाढवणारा सोमरस आहे, यानें उत्साह वाढतो.

४ देवेभ्यः पीतये— हा रस देवांना पिण्यास देण्यांत येतो.

५ पवस्व— तो गाळला जातो.

४७५ परि स्वानो गिरिष्ठाः पवित्रे सोमो अक्षरत् । मदेषु सर्वधा असि ॥ ९ ॥ (ऋ. ९।१८।१)

४७६ परि प्रिया दिवः कविर्वयांसि नप्त्योर्हितः । स्वानैर्याति कविक्रतुः ॥१०॥ (ऋ. ९।९।१)

इति नवमी दशतिः ॥ ९ ॥ प्रथमः खंडः ॥ १ ॥ [स्व० ६ । उ० ३ धा० । ४२ । गा ॥]

[१०]

(१-१०) १ (कविर्मेधावी) श्यावाश्व आत्रेयः; २ त्रित आप्त्यः; ३, ८ अमहीयुराङ्गिरसः; ४ भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा; ५, ६ कश्यपो मारीचः; ७ निध्रुविः काश्यपः; ९, १० असितः काश्यपो देवलो वा ॥
पवमानः सोमः ॥ गायत्री ॥

४७७ प्र सोमासो मदच्युतः श्रवसे नो मघोनाम् । सुता विदथे अक्रमुः ॥ १ ॥ (ऋ. ९।३२।१)

४७८ प्र सोमासो विपश्चितोऽपो नयन्त ऊर्मयः । वनानि महिषा इव ॥ २ ॥ (ऋ. ९।३३।१)

[४७५] (सोमः पवित्रे पर्यक्षरत्) सोमरस गाळणीमधून खालीं पडत आहे. (गिरि-ष्ठाः स्वानः) हा सोम पर्वतावर असतो तेथून आणून त्याचा रस काढला आहे. (मदेषु सर्वधा असि) आनंद देणाऱ्यांमध्यें तूं सर्वांहून अधिक आहेस.

१ स्वानः— तिचा रस काढला आहे.

२ सोमः पवित्रे परि-अक्षरत्— सोमरस गाळणीमधून गाळला जात असतां तो खालील भांड्यांत पडत आहे.

३ मदेषु सर्व-धा असि— आनंद देणाऱ्या पदार्थांमध्यें तो सर्वांत अधिक आनंद देणारा आहे.

[४७६] (कवि-क्रतुः कविः) बुद्धिवर्धक हा सोम (नप्त्योः हितः) सोमाचा रस काढण्याच्या दोन फळ्यांमध्यें ठेवला आहे. (दिवः प्रिया वयांसि) तो द्युलोकाचे प्रिय पक्षी - अर्थात् पर्वतावरचे दगड (स्वानैः) रस काढण्यासाठीं (परियाति) त्याच्यावर चालतात. सोम दगडांनीं कुटला जातो.

१ कवि-क्रतुः— सोम बुद्धिचा उत्साह वाढवतो व कार्य करण्याची शक्तिहि वाढवतो.

२ नप्त्योः हितः— दोन फळ्यांमध्यें सोम ठेवला जातो. दोन फळ्यांमध्यें दाबून रस काढला जातो.

३ दिवः वयांसि— पर्वतावरचे दगड, द्युलोकांतील पक्षी.

४ स्वानैः परियाति— (स्वानैः-सुवानैः) रस काढणाऱ्या याजकांनीं सोमावर दगड चालवले जातात. सोम कुटला जातो.

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[४७७] (मद-च्युतः सोमासः) आनंद वाढवणारे सोमरस (सुताः) काढले आहेत. (मघोनां नः विदथे) हवि अर्पण करणाऱ्या आमच्या या यज्ञांमध्यें (श्रवसे प्राक्रमुः) अन्न व यशासाठीं ते रस पात्रांमध्यें भरले आहेत. ॥ १ ॥

१ सोमासः मद-च्युताः— सोमरस आनंद वाढवणारे आहेत.

२ मघोनां नः विदथे— हविष्यान्न तयार करून आम्ही यज्ञ करीत आहों.

३ श्रवसे प्राक्रमुः— सोमरसरूपी अन्नरस पिण्यासाठीं ते रस पात्रांमध्यें भरले आहेत.

[४७८] (विपश्चितः सोमासः) बुद्धिवर्धक सोमरस आहेत (अपः ऊर्मयः) पाण्याच्या लाटांशीं ते रस मिसळतात. (महिषाः वनानि इव) रेडे जसे वनांत जातात, त्याप्रमाणें ते सोमरस (प्र नयन्त) पाण्यांत मिसळले जातात. ॥ २ ॥

४७९ पवस्वेन्दो वृषा सुतः कृधी नो यशसो जने । विश्वा अप द्विषो जहि ॥ ३ ॥ (ऋ. ९।६१।२८)

४८० वृषा ह्यसि भानुना द्युमन्तं त्वा हवामहे । पवमान स्वर्दृशम् ॥ ४ ॥ (ऋ. ९।६५।४)

४८१ इन्दुः पविष्ट चेतनः प्रियः कवीनां मतिः । सृजदश्वंरथीरिव ॥ ५ ॥ (ऋ. ९।६४।१०)

४८२ असृक्षत प्र वाजिनो गव्या सोमासो अश्वया । शुक्रासो वीरयाशवः ॥ ६ ॥ (ऋ. ९।६४।४)

---

१ सोमासः विपश्चितः— सोमरस बुद्धि वाढवतात. उत्साह वाढवतात.

२ अपः ऊर्मयः — पाण्याच्या लाटा, पाण्यांत ते रस मिळवले जातात.

३ महिषाः वनानि इव— पशु जसे वनांत जातात, तसे ते रस पाण्यांत जातात. मिसळले जातात.

४ प्र-नयन्त— विशेष रीतिनें नेले जातात. विशेष पद्धतीनें ते पाण्यांत मिसळले जातात.

[४७९] हे (इन्दो) सोमा ! (सुतः) रस काढला आहे. (वृषा) बल वाढवणारा तूं (पवस्व) पवित्र हो. (जने नः यशसः कृधि) लोकांमध्यें आम्हांला यशस्वी कर आणि (विश्वाः द्विषः अप जहि) सर्व शत्रूंना पराभूत कर. ॥ ३ ॥

१ हे इन्दो ! सुतः— हे सोमा ! तुझा रस काढला आहे.

२ वृषा पवस्व— तूं बल वाढवणारा आहेस. आतां या पात्रामध्यें गाळला जा.

३ जने नः यशसः कृधि— लोकांमध्यें आम्हांला यशस्वी कर.

४ विश्वाः द्विषः अप जहि— सर्व शत्रूंना पराभूत कर; दूर कर.

[४८०] हे सोमा ! (हि वृषा असि) निश्चयानें तूं बलवर्धक आहेस. हे (पवमान) पवित्र होणाऱ्या सोमा ! (स्व-र्दृशं) सर्वांना पाहणाऱ्या (भानुना द्युमन्तं) तेजानें चमकणाऱ्या (त्वा हवामहे) तुला आम्ही बोलावीत आहों. ॥ ४ ॥

१ हि वृषा असि— खरोखर तूं बल वाढवणारा आहेस.

२ पवमानः— गाळून पवित्र होणाऱ्या, गाळल्यानंतर तो स्वच्छ होतो.

३ स्वः-दृशं— स्वतः चमकणारा.

४ भानुना द्युमन्तं त्वा हवामहे- तेजानें चमकणाऱ्या तुला आम्ही बोलावीत आहों. तुझें वर्णन करीत आहों.

[४८१] (चेतनः प्रियः इन्दुः) उत्साह वाढवणारा, म्हणून प्रिय सोमरस (कवीनां मतिः) ज्ञानी लोकांच्या स्तुतींसह (पविष्ट) पात्रांमध्यें गाळला जात आहे. (रथीः अश्वं इव) रथाचा स्वामी जसा घोड्याला वळवतो, त्याप्रमाणें (सृजत्) हा पात्रांत भरला जात आहे. ॥ ५ ॥

१ चेतनः प्रियः इन्दुः— उत्साह वाढवणारा म्हणून सर्वांस प्रिय हा सोमरस आहे.

२ कवीनां मतिः पविष्ट— ज्ञानी लोकांनीं स्तोत्रें म्हटलीं जात असतां हा गाळला जातो व पात्रांत भरला जातो.

३ रथीः अश्वं इव सृजत्— रथामध्यें बसणारा ज्याप्रमाणें घोड्याला हांकतो, त्याप्रमाणें हा सोमरस पात्रांमध्यें भरला जातो.

[४८२] (वाजिनः) बल वाढवणारे (आशवः) व उत्साह वाढवणारे (शुक्रासः सोमासः) चमकणारे सोमरस (गव्या अश्वया वीरया) गाय, घोडे व वीर पुत्रांची इच्छा करून (प्रासृक्षत) काढले जतात. ॥ ६ ॥

१ वाजिनः आशवः सोमासः— हे सोमरस बल वाढवणारे व उत्साह वाढवणारे आहेत.

२ गव्या अश्वया वीरया प्रासृक्षत्— गाई, घोडे व वीरपुत्र प्राप्त व्हावे अशा इच्छेनें हे रस काढले जातात.

४८३ पवस्व देव आयुषगिन्द्रं गच्छतु ते मदः । वायुमा रोह धर्मणा ॥ ७ ॥ (ऋ. ९।६३।२२)

४८४ पवमानो अजीजनद्दिवश्चित्रं न तन्यतुम् । ज्योतिर्वैश्वानरं बृहत् ॥ ८ ॥ (ऋ. ९।६१।१६)

४८५ परि स्वानास इन्दवो मदाय बर्हणा गिरा । मधो अर्षन्ति धारया ॥ ९ ॥ (ऋ. ९।१०।४)

४८६ परि प्रासिष्यदत्कविः सिन्धोरूर्मावधि श्रितः । कारुं बिभ्रत्पुरुस्पृहम् ॥ १० ॥ (ऋ. ९।१४।१)

इति दशमी दशतिः ॥ १० ॥ द्वितीयः खण्डः ॥ २ ॥ (स्व० ११ । उ० ना । धा० ४९ । हो ॥)

इति पञ्चमप्रपाठकस्य द्वितीयोऽर्धः, पञ्चमः प्रपाठकश्च समाप्तः ॥ ५ ॥

---

[४८३] हे सोमा ! (देवः पवस्व) तूं चमकणारा आहेस. आतां पात्रांत गाळला जा. (ते मदः) तुझा हा आनंद वाढवणारा रस (आयुषक् इन्द्रं गच्छतु) सर्वांबरोबर इन्द्राजवळ जावो. (धर्मणा) आपल्या धारकशक्तिनें (वायुं आरोह) वायुला मिळो. ॥ ७ ॥

१ देवः पवस्व— तूं चमकत गाळला जाऊन स्वच्छ हो.

२ ते मदः आयुषक् इन्द्रं गच्छतु— तुझा हा आनंद वाढवणारा रस सर्वांबरोबर इन्द्राला प्राप्त होवो.

३ धर्मणा वायुं आरोह— आपल्या धारकशक्तिनें तो वायुला प्राप्त होवो.

सोमरस शुद्ध केल्यानंतर तो इन्द्राला व वायुला दिला जातो.

[४८४] (पवमानः) पवित्र झालेल्या या सोमरसानें (बृहत् वैश्वानरं ज्योतिः) मोठें वैश्वानर तेज (दिवः चित्रं) द्युलोकामध्यें विलक्षण दिसणारें (तन्यतुं न) विजेप्रमाणें (अजीजनत्) उत्पन्न केलें. ॥ ८ ॥

सोमरस गाळून पवित्र व शुद्ध झाल्यानंतर त्याचें तेज चमकूं लागलें. तें पाहून पाहणाऱ्यांना वाटलें कीं ही वीजच चमकत आहे.

[४८५] (स्वानासः इन्दवः) रस काढला जात असतांना (बर्हणा गिरा) मोठ्यानें बोललेल्या स्तोत्रांनीं (मधोः धारया) या मधुर रसाच्या धारेनें (मदाय) आनंद वाढवण्यासाठीं (परि अर्षन्ति) छाननीनें हा गाळला जातो. ॥ ९ ॥

१ स्वानासः-सुवानासः इन्दवः— सोमाचा रस काढतांना (बर्हणा गिरा) मोठ्या आवाजानें स्तोत्रें म्हटलीं जातात व त्याच वेळीं या मधुर रसाची धारा, पिणाऱ्यांचा आनंद वाढावा यासाठीं, भांड्यांत सोडली जाते, त्यावेळीं छाननीनें हा रस गाळला जात असतो.

[४८६] (कविः) ज्ञानवर्धक (सिन्धोः ऊर्मौ) सिंधु नदीचा लाटेमध्यें (अधिश्रितः) मिसळलेला (पुरुस्पृहं कारुं बिभ्रत्) अनेकांनीं प्रशंसनीय अशी स्तुति करणाऱ्या याजकाला धारण करणारा हा सोम (परि प्रासिष्यदत्) पात्रामध्यें टपकत असतो. ॥ १० ॥

१ कविः सिन्धोः ऊर्मौ अधिश्रितः— ज्ञान वाढवणारा सोमरस नदीच्या पाण्यांत मिसळला जातो. यांत पाणी मिसळण्यांत येतें.

२ पुरुस्पृहं कारुं बिभ्रत्— प्रशंसनीय याजकांना एकत्र बसवण्यांत येतें. यज्ञमंडपांत सर्व याजक बसतात.

३ परि प्रासिष्यदत्— व हा सोम छाननीमधून गाळला जातो. गाळणीला ' दशापवित्र ' असें नांव आहे. या दशापवित्रांतून हा रस खालील पात्रांत पडतो.

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

*

[१]

अथ षष्ठप्रपाठकस्य प्रथमोऽर्धः ॥ ६ ॥

(१-१०) १, ८, ९ अमहीयुरांगिरसः; २ बृहन्मतिराङ्गिरसः; ३ जमदग्निर्भार्गवः; ४ प्रभूवसुरांगिरसः; ५ मेध्यातिथिः काण्वः; ६, ७ निध्रुविः काश्यपः; १० उचथ्य आंगिरसः ॥ पवमानः सोमः ॥ गायत्री ॥

४८७ उपो षु जातमप्तुरं गोभिर्भङ्गं परिष्कृतम् । इन्दुं देवा अयासिषुः ॥ १ ॥ (ऋ. ९।६१।१३)

४८८ पुनानो अक्रमीदभि विश्वा मृधो विचर्षणिः । शुम्भन्ति विप्रं धीतिभिः ॥२॥ (ऋ. ९।४०।१)

४८९ आविशन्कलशꣳ सुतो विश्वा अर्षन्नभि श्रियः । इन्दुरिन्द्राय धीयते ॥ ३ ॥ (ऋ. ९।६२।१९)

४९० असर्जि रथ्यो यथा पवित्रे चम्वोः सुतः । कार्ष्मन्वाजी न्यक्रमीत् ॥ ४ ॥ (ऋ. ९।३६।१)

४९१ प्र यद्गावो न भूर्णयस्त्वेषा अयासो अक्रमुः । घ्नन्तः कृष्णामप त्वचम् ॥ ५ ॥

(ऋ. ९।४१।१)

४९२ अपघ्नन्पवसे मृधः क्रतुवित्सोम मत्सरः । नुदस्वादेवयुं जनम् ॥ ६ ॥ (ऋ. ९।६३।२४)

---

[३] तृतीयः खण्डः ।

[४८७] (सु-जातं) उत्तम रीतिनें तयार केलेल्या (अप्तुरं) पाण्यांत मिसळलेल्या, (भङ्गं) शत्रूंना मारणाऱ्या (गोभिः परिष्कृतं) गाईच्या दुधांत मिसळलेल्या (इन्दुं) सोमरसाजवळ (देवाः उप अयासिषुः) देव पोंचले. ॥ १ ॥

सोमरस उत्तम रीतिनें काढला, (अप्-तुरं) त्यांत पाणी मिसळलें, (गोभिः परिष्कृतं) गाईच्या दुधांत तो रस मिसळला, म्हणजे (भङ्गं) शत्रूंना मारण्याचा उत्साह वाढवणारा तो होतो. त्याच्याजवळ सोमरस पिण्याच्या इच्छेनें देव येतात.

[४८८] (विचर्षणिः) ज्ञान वाढवणारा (पुनानः) पवित्र झाल्यानंतर सोमरस (विश्वाः मृधः अभ्यक्रमीत्) सर्व शत्रूंवर आक्रमण करतो. (विप्रं) त्या ज्ञान वाढवणाऱ्या सोमाला (धीतिभिः शुम्भन्ति) स्तोत्रांनीं सुशोभित करतात. ॥ २ ॥

सोमरस प्याल्यावर उत्साह वाढतो. तो रस गाळून स्वच्छ केल्यावर प्याला गेल्यावर सर्व शत्रूंवर आक्रमण करण्याचें बल वाढतें. त्या सोमरस काढण्याच्या वेळीं ' स्तोत्रें ' म्हटलीं जातात. यामुळें तो अधिक शोभूं लागतो.

[४८९] (सुतः) सोमरस काढल्यानंतर (कलशं आविशन्) कलशांत भरण्याच्यावेळीं (विश्वाः श्रियः अभ्यर्षन्) सर्व शोभांना वाढविणारा (इन्दुः इन्द्राय धीयते) हा सोमरस इन्द्रासाठीं ठेवला जात असतो. ॥ ३ ॥

[४९०] (यथा रथ्यः) ज्याप्रमाणें रथाचा घोडा सोडला जातो, त्याप्रमाणें (चम्वोः सुतः) दोनही फळचांमधून काढलेला हा सोमरस (पवित्रे असर्जि) गाळण्याच्या पात्रांत सोडला जातो. असा हा (वाजी) बलवान् सोमरस (कार्ष्मन् न्यक्रमीत्) देवांना आकर्षण करून आणीत भांड्यांत जाऊन बसतो. ॥ ४ ॥

[४९१] (यत् भूर्णयः) जे त्वरा करणारे (त्वेषाः अयासः) तेजस्वी व गमनशील आपली (कृष्णां त्वचं) काळी चामडी (अपघ्नन्तः) दूर करीत सोमरस (प्र अक्रमुः) यज्ञाला प्रवृत्त करतात. (गावः न) गाई ज्याप्रमाणें गोठ्यांत जातात, त्याप्रमाणें सोमरस यज्ञांत जातात व यज्ञ करतात ॥ ५ ॥

सोमरसावर काळ्या त्वचेचे-सोमवल्लीवरच्या त्वचेचे-तुकडे सोम गाळल्यानें दूर होतात व तो सोमरस गाळणींतून खालच्या भांड्यांत गाळला जातो तेथें गेल्यावर तो यज्ञशाळेंत जातो व याजकांना पुढील कार्य करण्यास प्रवृत्त करतो.

[४९२] हे (सोम) सोमा ! (मत्-सरः) आनंद वाढवणारा तूं (मृधः अपघ्नन्) शत्रूंना दूर करीत (क्रतु-वित् पवसे) यज्ञाची पद्धति जाणणारा तूं पवित्र होत आहेस. तूं (अ-देव-युं जनं नुदस्व) देवाची भक्ति न करणाऱ्या माणसाला बाहेर घालव. ॥ ६ ॥

४९३ अया पवस्व धारया यया सूर्यमरोचयः । हिन्वानो मानुषीरपः ॥ ७ ॥ (ऋ. ९।६३।६)

४९४ स पवस्व य आविथेन्द्रं वृत्राय हन्तवे । वव्रिवांसं महीरपः ॥ ८ ॥ (ऋ. ९।६१।२२)

४९५ अया वीती परि स्रव यस्त इन्दो मदेष्वा । अवाहन्नवतीर्नव ॥ ९ ॥ (ऋ. ९।६१।१)

४९६ परि द्युक्षं सनद्रयिं भरद्वाजं नो अन्धसा । स्वानो अर्ष पवित्र आ ॥ १० ॥ (ऋ. ९।५२।१)

इति प्रथमा दशतिः ॥ १ ॥ तृतीयः खण्डः ॥ ३ ॥ [स्व० ९ । उ० ६ । धा० ३५ । तु ॥]

[२]

(१–१४) १ मेधातिथिः काण्वः; २, ७ भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा; ३ उचथ्य आङ्गिरसः; ४ अवत्सारः काश्यपः । निध्रुविः काश्यपः; ६, १० असितः काश्यपो देवलो वा; ८, ९ कश्यपो मारीचः; ११ कविर्भार्गवः; १२ जमदग्निर्भार्गवः; १३ अयास्य आंगिरसः; १४ अमहीयुरांगिरसः ॥ पवमानः सोमः ॥ गायत्री ॥

४९७ अचिक्रदद्वृषा हरिर्महान्मित्रो न दर्शतः । संसूर्येण दिद्युते ॥ १ ॥ (ऋ. ९।२।६)

---

१ अदेवयुं जनं नुदस्व— देवाची भक्ति न करणाऱ्याला दूर कर.

२ मृधः अपघ्नन्—शत्रूंना नष्ट कर.

३ पवसे— तुला शुद्ध केलें जात आहे. गाळलें जात आहे.

[४९३] हे सोमा ! (मानुषीः अपः हिन्वानः) मनुष्यांचें हित करणाऱ्या पाण्याला प्रेरणा करीत, (यथा सूर्यं अरोचयः) ज्याप्रमाणें तूं सूर्याला प्रकाशित केलेंस, (अया पवस्व) त्याच धारेनें खालच्या पात्रांत गाळला जा. ॥ ७ ॥

मनुष्यांचें हित करणारें पाणी आहे. तें पाणी सोमरसामध्यें मिसळलें जातें. तेव्हां तो रस अधिक चमकूं लागतो. सूर्यालाहि तो प्रकाशित करतो असें वाटतें. असा सोमरस खालील पात्रांत गाळला जातो व तें पात्र भरलें जातें.

[४९४] हे सोमा ! (महीः अपः वव्रिवांसं) मोठ्या जलांना आपल्या ताब्यांत ठेवणाऱ्या (वृत्राय हन्तवे) अशा वृत्राला मारण्यासाठीं (इन्द्रं आविथ) इन्द्राला उत्साहित केलेंस (सः पवस्व) असा तूं खालील भांड्यांत गाळला जा. ॥ ८ ॥

वृत्रानें जल प्रवाहांना अडविलें होतें. इन्द्रानें या वृत्राला मारून जलप्रवाह वाहूं दिले. हा इन्द्राचा उत्साह सोमपानानें वाढला होता. वृत्र म्हणजे मेघ. इन्द्र मेघांना फोडतो व जलप्रवाहांना मोकळे करतो. पाऊस पाडतो.

[४९५] हे (इन्दो) सोमा ! (अया वीती परिस्रव) या रीतिनें इन्द्रानें सोमपान करावें यासाठीं कलशामध्यें तूं गाळला जा. (ते यः) तुझा हा रस (मदेषु) संग्रामांमध्यें (नवतीः नव अवाहन्) शत्रूच्या नव्याण्णव नगरींना तोडण्यास इन्द्राला समर्थ करतो. ॥ ९ ॥

[४९६] (द्युक्षं) तेजस्वी (सनद् रयिं) देण्यास योग्य अशा धनाला व (वाजं) बलाला (अन्धसा नः परि भरत्) आपल्या अन्नरूप रसानें आमच्यामध्यें भरपूर वाढव. (स्वानः पवित्रे आ अर्ष) रस काढल्यानंतर भांड्यांत गाळला जा व भरून रहा. ॥ १० ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[४९७] (वृषा हरिः) बलवान् हिरव्या रंगाचा (महान् मित्रः न) मोठ्या मित्राप्रमाणें (दर्शतः) दर्शनीय सोम (अचिक्रदत्) शब्द करीत आहे. (सूर्येण सं दिद्युते) तो सूर्यासारखा प्रकाशतो आहे. ॥ १ ॥

सोमरस चमकतो व त्याचा रस काढतांना शब्द होतो.

४९८ आ ते दक्षं मयोभुवं वह्निमद्या वृणीमहे । पान्तमा पुरुस्पृहम् ॥ २ ॥ (ऋ. ९।६५।२८)

४९९ अध्वर्यो अद्रिभिः सुतꣳ सोमं पवित्र आ नय । पुनाहीन्द्राय पातवे ॥ ३ ॥ (ऋ. ९।५१।१)

५०० तरत्स मन्दी धावति धारा सुतस्यान्धसः । तरत्स मन्दी धावति ॥ ४ ॥ (ऋ. ९।५८।१)

५०१ आ पवस्व सहस्रिणꣳ रयिꣳ सोम सुवीर्यम् । अस्मे श्रवाꣳसि धारय ॥ ५ ॥ (ऋ. ९।६३।१)

५०२ अनु प्रत्नास आयवः पदं नवीयो अक्रमुः । रुचे जनन्त सूर्यम् ॥ ६ ॥ (ऋ. ९।२३।२)

५०३ अर्षा सोम द्युमत्तमोऽभि द्रोणानि रोरुवत् । सीदन्योनौ वनेष्वा ॥ ७ ॥ (ऋ. ९।६५।१९)

५०४ वृषा सोम द्युमाꣳ असि वृषा देव वृषव्रतः । वृषा धर्माणि दध्रिषे ॥ ८ ॥ (ऋ. ९।६४।१)

५०५ इषे पवस्व धारया मृज्यमानो मनीषिभिः । इन्दो रुचाभि गा इहि ॥ ९ ॥ (ऋ. ९।६४।१३)

---

[४९८] हे सोमा ! (ते दक्षं बलं) तुझ्या बलाला आम्ही (अद्य आवृणीमहे) आज धारण करीत आहों. तें बल (मयो-भुवं) सुख देणारें (वह्निं) धन आदि देणारें (पान्तं) शत्रूंपासून संरक्षण करणारें यासाठीं (पुरु-स्पृहं) अनेक लोक जें प्राप्त करण्याची इच्छा करतात, असें आहे. ॥ २ ॥

[४९९] हे (अध्वर्यो) अध्वर्यू ! (अद्रिभिः सुतं) दगडांनीं कुटून काढलेल्या सोमरसाला (पवित्रे आनय) गाळण्याच्या भांड्याजवळ आण. (इन्द्राय पातवे) इन्द्राला पिण्याला देण्यासाठीं (पुनाहि) त्याला गाळून पवित्र कर. ॥ ३ ॥

[५००] (सुतस्य अन्धसः धारा) सोमरसरूपी अन्नरसाची धारा (मन्दी) आनन्द देणारी आहे. (सः तरत्) तो सोम हीन भावापासून दूर असतो व तो (धावति) प्रगति करतो. ॥ ४ ॥

सोमरस प्यालानंतर उत्साह वाढतो व त्यामुळें तो उत्तम कामेंच करूं लागतो.

[५०१] हे (सोम) सोमा ! (सहस्रिणं सुवीर्यं रयिं) सहस्र प्रकारचें उत्तम शक्ति वाढवणारें धन (आ पवस्व) आम्हांस दे. व (अस्मे) आम्हांला (श्रवांसि धारय) अन्नें दे. ॥ ५ ॥

[५०२] (प्रत्नासः आयवः) प्राचीन लोकांनीं (नवीयः पदं) नवीन उत्तम स्थानाला (अनु अक्रमुः) प्राप्त केलें व (रुचे) तेजाची प्राप्ति करण्यासाठीं (सूर्यं) सूर्याप्रमाणें तेजस्वी सोमाला (जनन्त) उत्पन्न केलें. ॥ ६ ॥

सूर्यः— सूर्याप्रमाणें तेजस्वी दिसणारा सोमरस काढला आहे.

[५०३] हे (सोम) सोमा ! (द्युमत्तमः) अत्यन्त तेजस्वी असा तूं (द्रोणानि) भांड्यांत (रोरुवत् अर्ष) शब्द करीत गाळला जा. (वनेषु योनौ आसीदन्) वनांमधील यज्ञशाळेंत रहा. ॥ ७ ॥

सोमरस गाळीत असतांना त्याचा शब्द होतो. तो त्यावेळीं अतिशय चमकत असतो. वनांमध्यें यज्ञशाळा बांधतात, त्यांमध्यें हा सोमरस तयार करतात.

[५०४] हे (सोम) सोमा ! (वृषा द्युमान् असि) तूं बलवान् व तेजस्वी आहेस. हे (देव) सोमदेवा ! तूं (वृषा वृषव्रतः) बलवान् व बल वाढवण्याचें व्रत घेतलेला असा आहेस. (वृषा धर्माणि दध्रिषे) बल वाढवणाऱ्या धर्मांना तूं धारण करीत असतोस. ॥ ८ ॥

[५०५] हे (इन्दो) सोमा ! (मनीषिभिः मृज्यमानः) ज्ञानी ऋत्विजांकडून गाळला जाणारा तूं (इषे धारया पवस्व) अन्नरस मिळावा म्हणून धारेनें गाळला जा. (रुचा) तेजानें (गाः अभि इहि) गाईंना प्राप्त हो. ॥ ९ ॥

ऋत्विज रस काढतात व तो रस गाळतात. नंतर—

१ गाः अभि इहि— गाईंना प्राप्त हो. गाईचें दूध त्यांत मिसळतात. गाईंना प्राप्त होणें याचा अर्थ गाईंच्या दुधांत सोम मिसळणें. (रुचा) हा सोमरस चमकत असतो.

५०६ मन्द्रया सोम धारया वृषा पवस्व देवयुः । अव्या वारेभिरस्मयुः ॥ १० ॥ (ऋ. ९।६।१)

५०७ अया सोम सुकृत्यया महान्त्सन्नभ्यवर्धथाः । मन्दान इद्वृषायसे ॥ ११ ॥ (ऋ. ९।४७।१)

५०८ अयं विचर्षणिर्हितः पवमानः स चेतति । हिन्वान आप्यं बृहत् ॥ १२ ॥ (ऋ. ९।६२।१०)

५०९ प्र न इन्दो महे तुन ऊर्मिं न बिभ्रदर्षसि । अभि देवाँ अयास्यः ॥ १३ ॥ (ऋ. ९।४४।१)

५१० अपघ्नन्पवते मृधोऽप सोमो अराव्णः । गच्छन्निन्द्रस्य निष्कृतम् ॥ १४ ॥ (ऋ. ९।६१।२५)

इति द्वितीया दशतिः ॥ २ ॥ चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥ [स्व० १५ । उ० २ । धा० ५७ । फो ॥]

इति गायत्र्यः ॥

[३]

(१-१२) सप्तर्षयः (१ भरद्वाजो बार्हस्पत्यः, २ कश्यपो मारीचः, ३ गोतमो राहूगणः; ४ अत्रिर्भौमः; ५ विश्वामित्रो गाथिनः; ६ जमदग्निर्भार्गवः; ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः) ॥ पवमानः सोमः ॥ बृहती ॥

५११ पुनानः सोम धारयापो वसानो अर्षसि ।
आ रत्नधा योनिमृतस्य सीदस्युत्सो देवो हिरण्ययः ॥ १ ॥ (ऋ. ९।१०७।४)

---

[५०६] हे (सोम) सोमा ! तूं (वृषा) बल वाढवणारा (देव-युः) देवतांना प्राप्त होणारा, (अस्म-युः) आम्हांला मिळणारा (अव्या) संरक्षण करणारा (वारेभिः) केंसांच्या गाळणींतून (मन्द्रया धारया पवस्व) आनंद देणाऱ्या धारेनें शुद्ध हो. ॥ १० ॥

१ वारेभिः— केंसांची गाळणी, दशापवित्र, या गाळणीमधून सोमरस गाळला जातो.
२ देव-युः— गाळून तो देवांस देतात व
३ अस्मयुः— नंतर ऋत्विजांस तो मिळतो.

[५०७] हे (सोम) सोमा ! (अया सुकृत्यया) या उत्तम कृतिनें तूं (महान् सन्) मोठा माननीय होऊन (अभ्यवर्धथाः) मोठा होत आहेस. (मन्दानः इत्) आनन्द देऊन (वृषायसे) बल वाढवतोस. ॥ ११ ॥

सोम स्वतः संमाननीय आहे व तो दुसऱ्यांस अधिक बलवान् करतो.

[५०८] (वि-चर्षणिः) विशेष ज्ञान वाढवणारा (हितः पवमानः) पात्रांत भरलेला व शुद्ध केलेला (अयं) हा सोमरस (आप्यं) जलाशीं मिश्रित होऊन (बृहत् हिन्वानः) पुष्कळ अन्न देत (सचेतति) प्रसिद्ध होत असतो. ॥ १२ ॥

[५०९] (इन्दो) हे सोमा ! (नः महे तुने) आम्हांस मोठें धन मिळावें यासाठीं (प्र अर्षसि) तूं कलशामध्यें गाळला जात आहेस. (अयास्यः न) अयास्य ऋषिप्रमाणें (ऊर्मिं बिभ्रत्) तुझ्या तरंगांना धारण करून (देवान् अभि) देवांचे यजन करणासाठीं जात आहे. ॥ १३ ॥

अयास्य ऋषिनीं सोमरस गाळला व आतां ते पुढील यज्ञकर्म करण्यासाठीं जात आहेत.

[५१०] (सोमः मृधः अपघ्नन्) सोम शत्रूंना मारतो, (अराव्णः) दान न देणाऱ्यालाहि मारतो व (इन्द्रस्य निष्कृतं गच्छन्) इन्द्राच्या स्थानाजवळ जात असतां (पवते) गाळला जात आहे. ॥ १४ ॥

॥ येथें चौथा खण्ड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[५११] हे (सोम) सोमा ! (पुनानः) गाळला जात असतां (अपः वसानः) पाण्याशीं मिसळला जाऊन (धारया अर्षसि) धारेनें खालच्या पात्रांत पडतोस. तूं (रत्न-धा) रत्नें-धन-देणारा (ऋतस्य योनिं) यज्ञाच्या ठिकाणीं (आसीदसि) जाऊन बसतोस आणि (देवः) प्रकाशित होऊन (हिरण्ययः उत्सः) चमकत राहून वाहत राहतोस. ॥ १ ॥

५१२ परीतो षिञ्चता सुतꣳ सोमो य उत्तमꣳ हविः ।
दधन्वाꣳ यो नर्यो अप्स्वाऽ३न्तरा सुषाव सोममद्रिभिः ॥ २ ॥ (ऋ. ९।१०७।१)

५१३ आ सोम स्वानो अद्रिभिस्तिरो वाराण्यव्यया ।
जनो न पुरि चम्वोर्विशद्धरिः सदो वनेषु दध्रिषे ॥ ३ ॥ (ऋ. ९।१०७।१०)

५१४ प्र सोम देववीतये सिन्धुर्न पिप्ये अर्णसा ।
अꣳशोः पयसा मदिरो न जागृविरच्छा कोशं मधुश्चुतम् ॥ ४ ॥ (ऋ. ९।१०७।१२)

५१५ सोम उ ष्वाणः सोतृभिरधि ष्णुभिरवीनाम् ।
अश्वयेव हरिता याति धारया मन्द्रया याति धारया ॥ ५ ॥ (ऋ. ९।१०७।८)

५१६ तवाहꣳ सोम रारण सख्य इन्दो दिवेदिवे ।
पुरूणि बभ्रो नि चरन्ति मामव परिधीꣳरति ताꣳइहि ॥ ६ ॥ (ऋ. ९।१०७।१९)

---

[५१२] (यः सोमः उत्तमं हविः) जो हा सोमरस आहे तें उत्तम हवि आहे. (नर्यः) तो मानवांचें हित करणारा आहे. (यः अप्सु अन्तः दधन्वान्) जो पाण्यांत मिसळला आहे. (सोमं अद्रिभिः सुषाव) या सोमाचा रस दगडांनीं कुटून काढला आहे, या (सुतं इतः परिषिंचत) सोमरसामध्यें यानंतर थोडें पाणी मिसळलें जातें. ॥ २ ॥

[५१३] हे (सोम) सोमा ! (अद्रिभिः स्वानः) दगडांनीं कुटून काढलेला रस तूं (अव्यया वाराणि तिरः) संरक्षक केसांच्या गाळणींमधून (आ यवसे) खालीं गाळला जात आहेस. (हरिः चम्वोः) हिरव्या रंगाचा हा रस भांडयांत (पुरि जनः न) नगरीमध्यें पुरुषानें प्रवेश करावा त्याप्रमाणें (विशत्) प्रविष्ट होत आहेस व (वनेषु सदः दध्रिषे) लांकडाच्या भांडयांत आपलें स्थान तूं पकडत आहेस. ॥ ३ ॥

१ वन— वन, अरण्य, अरण्यांत होणारें लांकूड, लांकडाचें पात्र.

[५१४] हे (सोम) सोमा ! (त्वं देव-वीतये) तूं देवतांनीं पिण्यासाठीं (सिन्धुः न) सिन्धु नदीप्रमाणें (अर्णसा प्रपिप्ये) पाण्यामध्यें मिसळला जात आहेस. (मदिरः न जागृविः) तूं आनन्ददायक असल्याप्रमाणें जागृति करणाराही आहेस. तूं (अंशोः पयसा) भांडयांतील पाण्यानें (मधुश्चुतं कोशं अच्छ) मधुर रसाला ओतणाऱ्या भाडयांत घेऊन जा. ॥ ४ ॥

[५१५] (सोतृभिः स्वानः) रस काढणाऱ्या याजकांनीं काढलेला (सोमः) सोमरस (अवीनां स्नुभिः) बकऱ्यांच्या केसांच्या चाळणींतून शुद्ध होऊन (अधि याति) खालीं भांडयांत पडत आहे (उ) हें सत्य आहे. (अश्वया इव) घोडीप्रमाणें (हरिता धारया याति) हिरव्या रंगाच्या धारेनें तो भांडयांत जात आहे. (मन्द्रया, धारया याति) आनंददायक धारेनें जात आहे. ॥ ५ ॥

[५१६] हे (इन्दो सोम) सोमरसा ! तुझ्या (सख्ये) मित्रभावामध्यें (दिवे दिवे रराण) प्रत्येक [illegible] (बभ्रो) हे सोमा ! (पुरूणि मां न्यवचरन्ति) पुष्कळ दुष्ट मला त्रास देत आहेत. (तान् [illegible]) त्या दुष्टांना नष्ट कर. ॥ ६ ॥

५१७ मृज्यमानः सुहस्त्या समुद्रे वाचमिन्वसि ।
रयिं पिशङ्गं बहुलं पुरुस्पृहं पवमानाभ्यर्षसि ॥ ७ ॥ (ऋ. ९।१०७।२१)

५१८ अभि सोमास आयवः पवन्ते मद्यं मदम् ।
समुद्रस्याधि विष्टपे मनीषिणो मत्सरासो मदच्युतः ॥ ८ ॥ (ऋ. ९।१०७।१४)

५१९ पुनानः सोम जागृविरव्या वारैः परि प्रियः ।
त्वं विप्रो अभवोऽङ्गिरस्तम मध्वा यज्ञं मिमिक्ष णः ॥ ९ ॥ (ऋ. ९।१०७।६)

५२० इन्द्राय पवते मदः सोमो मरुत्वते सुतः ।
सहस्रधारो अत्यव्यमर्षति तमी मृजन्त्यायवः ॥ १० ॥ (ऋ. ९।१०७।१७)

५२१ पवस्व वाजसातमोऽभि विश्वानि वार्या ।
त्वꣳ समुद्रः प्रथम विधर्मं देवेभ्यः सोम मत्सरः । ॥ ११ ॥ (ऋ. ९।१०७।२३)

---

[५१७] (सु-हस्त्या) उत्तम हातांच्या अंगुलींनीं काढलेल्या सोमा ! (मृज्यमानः) पवित्र करीत असतां तूं (समुद्रे वाचं इन्वसि) खालील पाण्याच्या भांडयांत पडतांना शब्द करीत खालीं पडतोस. हे (पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! तूं (पिशंगं) पिवळया रंगाचें (बहुलं पुरु-स्पृहं रयिं) पुष्कळ स्पृहणीय धन (अभ्यर्षसि) देतोस. ॥ ७ ॥

१ समुद्रः— पाण्यानें थोडें भरलेलें भांडें.

२ पिशंगं रयिं— पिवळया रंगाचें सोनें, सोन्याचें नाणें.

[५१८] (आयवः मनीषिणः) मनुष्यांचें हित करणारे ज्ञान वाढवणारे (मत्सरासः मदच्युतः सोमासः) आनंद देणारे, गाळणींतून खालीं पडणारे सोमरस (समुद्रस्य विष्टपे अधि) पाण्यानें थोडया भरलेल्या कलशामध्यें (मद्यं मदं) आनंद देणाऱ्या आपल्या रसाला (अभि पवन्ते) शुद्ध करून खालीं भांडयांत सोडतात. ॥ ८ ॥

[५१९] (जागृविः प्रियः पुनानः) उत्साही प्रिय व शुद्ध होणारा तूं (अव्याः वारैः परि) मेंढीच्या केसांच्या चाळणीवरून खालीं पडतोस. हे सोमा ! (अंगिरस्तम) तूं अंगिरसांमध्यें श्रेष्ठ (विप्रः) ज्ञानी (अभवः) झाला आहेस. असा तूं आतां (नः यज्ञं) आमच्या यज्ञाला (मध्वा मिमिक्ष) मधुर रसानें पवित्र कर. ॥ ९ ॥

[५२०] (मदः सुतः सोमः) आनंददायक असा हा काढलेला सोमरस (मरुत्वते इन्द्राय पवते) मरुतांबरोबर असणाऱ्या इन्द्रासाठीं शुद्ध होत आहे. नंतर तो (सहस्र-धारः) अनेक धारांनीं (अव्यं अत्यर्षति) मेंढीच्या केंसांच्या चाळणींतून गाळला जात आहे. (तं) त्याला (आयवः मृजन्ति) ऋत्विज शुद्ध करतात. ॥ १० ॥

[५२१] हे (सोम) सोमा ! (विश्वानि वार्या) सर्व स्तोत्रांनीं पवित्र झालेला व (अभि) मुख्यतः (वाज-सातमः) अन्न प्राप्त करणारा तूं (पवस्व) शुद्ध हो. हे सोमा ! (देवेभ्यः मत्सरः) देवतांना आनंद देणारा तूं (समुद्रः) पाण्यामध्यें मिसळून (विधर्मन्) विशेष गुणधर्मांनीं युक्त होऊन (प्रथमे) श्रेष्ठ यज्ञामध्यें तूं पवित्र हो. ॥ ११ ॥

५२२ पवमाना असृक्षत पवित्रमति धारया ।
मरुत्वन्तो मत्सरा इन्द्रिया हया मेधामभि प्रयांसि च ॥ १२ ॥ (ऋ. ९।१०७।२५)

इति तृतीया दशतिः ॥ ३ ॥ पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥ इति बृहत्यः ॥ स्व० १९ । उ० ३ । धा ९१ । द ॥

[४]

(१-१०) १, ९ उशना काव्यः, २ वृषगणो वासिष्ठः; ३, ७ पराशरः शाक्त्यः; ४, ६ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ५, १० प्रतर्दनो दैवोदासिः; ८ प्रस्कण्वः काण्वः ॥ पवमानः सोमः ॥ त्रिष्टुप् ॥

५२३ प्र तु द्रव परि कोशं नि षीद नृभिः पुनानो अभि वाजमर्ष ।
अश्वं न त्वा वाजिनं मर्जयन्तोऽच्छा बर्ही रशनाभिर्नयन्ति ॥ १ ॥ (ऋ ९।८७।१)

५२४ प्र काव्यमुशनेव ब्रुवाणो देवो देवानां जनिमा विवक्ति ।
महिव्रतः शुचिबन्धुः पावकः पदा वराहो अभ्येति रेभन् ॥ २ ॥ (ऋ. ९।९७।७)

५२५ तिस्रो वाच ईरयति प्र वह्निर्ऋतस्य धीतिं ब्रह्मणो मनीषाम् ।
गावो यन्ति गोपतिं पृच्छमानाः सोमं यन्ति मतयो वावशानाः ॥ ३ ॥ (ऋ. ९।९७।३४)

---

[५२२] (मरुत्वन्तः) मरुतांनीं युक्त (मत्सराः) आनन्द देणारे (इन्द्रियाः) इन्द्राला आवडणारे (मेधां प्रयांसि च) स्तुति व अन्न यांना (अभि) समोर ठेवून (हयाः पवमानाः) यज्ञांत जाणारे व शुद्ध होणारे सोमरस (धारया पवित्रं असृक्षत) धारेनें छाननीमधून खालीं गळूं लागले. ॥ १२ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[५२३] हे सोमा ! (तु प्रद्रव) तूं लवकर जा व (कोशं परि निषीद) भांड्यांत जाऊन रहा. (नृभिः पुनानः) याजकांनीं शुद्ध केल्यानंतर (वाजं अभ्यर्ष) अन्न यजमानाला दे. (वाजिनं अश्वं न) बलवान् घोड्याला जसें शुद्ध करतात, (त्वा मर्जयन्तः) तुला शुद्ध करणारे ऋत्विज (रशनाभिः बर्हिं अच्छ नयन्ति) अंगुलींनीं यज्ञस्थानाजवळ तुला नेतात. ॥ १ ॥

[५२४] (उशना इव) उशना ऋषिप्रमाणें (काव्यं ब्रुवाणः) स्तोत्र बोलणारा (देवः) स्तोता (देवानां जनिमा प्र विवक्ति) देवांच्या जन्मवृत्तांताचें वर्णन करीत आहे. (महि-व्रतः शुचि-बन्धुः पावकः) महान् व्रत करणारा शुद्ध तेजानें युक्त व स्वच्छता करणारा (वराहः) उत्तम श्रेष्ठ दिवशीं काढलेला सोमरस (रेभन् पदा अभ्येति) शब्द करीत पात्रामध्यें जात आहे. ॥ २ ॥

[५२५] (वह्निः) हवि नेणारा यजमान (तिस्रः वाचः) ऋक्, यजु व साम यांतील स्तुति (प्रेरयति) बोलत आहे. (ऋतस्य धीतिं यज्ञाला धारण करणारी (ब्रह्मणः मनीषां) ज्ञानानें केलेली स्तुतिच तो बोलत आहे. (गोपतिं गावः यन्ति) बैलाजवळ गाई जातात, त्याप्रमाणें (पृच्छमानाः वावशानाः) पृच्छा करणारे, इच्छा करणारे (मतयः) स्तुति करणारे (सोमं यन्ति) सोमाजवळ जातात. ॥ ३ ॥

१ पृच्छमानाः— चांगलें काय हें विचारणारे.
२ वावशानाः— सुखाची इच्छा करणारे.
३ मतयः— बुद्धिमान्, स्तुतिस्तोत्रें म्हणणारे.
४ सोमं यन्ति— सोमयाग होतो तेथें जातात.

३ २ ३२ ३१ २ ३१ २ ३२ ३२ ३ १२ ३ १२
५२६ अस्य प्रेषा हेमना पूयमानो देवो देवेभिः समपृक्त रसम् ।
३ २ ३२ ३ १२ ३ १२ ३२३ १२ ३२ ३ १२
सुतः पवित्रं पर्येति रेभन् मितेव सद्म पशुमन्ति होता ॥ ४ ॥ (ऋ. ९।९७।१)

१ २ ३ १ २ ३ १ २ ३ २ ३ १ २ ३ १ २ ३ २
५२७ सोमः पवते जनिता मतीनां जनिता दिवो जनिता पृथिव्याः ।
३ १ २र ३ १ २र ३ १ २ ३ १ २र
जनिताग्नेर्जनिता सूर्यस्य जनितेन्द्रस्य जनितोत विष्णोः ॥ ५ ॥ (ऋ. ८।९६।५)

३ १ २ ३१ २र ३ १ २ ३ १ २ ३ १ २
५२८ अभि त्रिपृष्ठं वृषणं वयोधामङ्गोषिणमवावशन्त वाणीः ।
२ ३ १ २ ३ १ २ ३ २उ ३ १ २ ३१ २ ३ १ २
वना वसानो वरुणो न सिन्धुर्वि रत्नधा दयते वार्याणि ॥ ६ ॥ (ऋ. ९।९०।२

१ २ ३ १ २ ३ १ २र ३ १ २ ३ १ २र ३ २
५२९ अक्रांत्समुद्रः प्रथमे विधर्मं जनयन् प्रजा भुवनस्य गोपाः ।
१ २ ३ २ ३ २ ३ २ ३ १ २ ३१ २र ३ १ २र
वृषा पवित्रे अधि सानो अव्ये बृहत्सोमो वावृधे स्वानो अद्रिः ॥ ७ ॥ (ऋ. ९।९७।४०)

---

[५२६] (अस्य प्रेषा) या यज्ञाचा प्रेरक (हेमना पूयमानः) सुवर्णानें पवित्र होत (देवः रसं) दिव्य सोमरस (देवेभिः समपृक्त) देवांना देण्यांत येतो. (सुतः रेभन् पवित्रं पर्येति) काढलेला हा सोमरस गाळणींतून भांड्यांत पडतो. (होता मिता) हवन करणारा व यज्ञ करणारा (पशुमन्ति सद्म इव) गाई असलेल्या यज्ञशालेमध्यें जातो, त्याप्रमाणें हा सोमरस भांड्यांत गाळला जातो. ॥ ४ ॥

१ हिरण्यपाणिः अभिषुणोति— (सा० भा०) सोन्याची आंगठी घातलेल्या हातानें सोमरस काढला जातो.

[५२७] (मतीनां जनिता) बुद्धिला उत्पन्न करणारा, (दिवः जनिता) द्युलोकाला उत्पन्न करणारा (पृथिव्याः जनिता) पृथ्वीला उत्पन्न करणारा, (अग्नेः जनिता) अग्निला उत्पन्न करणारा (सूर्यस्य जनिता) सूर्याला उत्पन्न करणारा, (इन्द्रस्य जनिता) इन्द्राला उत्पन्न करणारा, (उत विष्णोः जनिता) आणि विष्णुला उत्पन्न करणारा (सोमः पवते) सोम पवित्र केला जात आहे. ॥ ५ ॥

सोमयाग सुरू झाला म्हणजे तेथें हे देव येतात. म्हणून सोम हा या देवांना आणणारा, म्हणजे प्रेरणा देणारा, किंवा आलंकारिक भाषेंत उत्पन्न करणारा असें म्हटलें आहे.

[५२८] (त्रि-पृष्ठं) तीन स्थानांत राहणाऱ्या (वृषणं वयो-धां) बलवान् व अन्नदात्या सोमाची (अंगोषिणं) उच्च स्वरानें (वाणीः वावशन्त) स्तोत्यांची वाणी स्तुति करते. (सिन्धुः वरुणः न) पाण्यामध्यें वरुण असतो, त्याप्रमाणें (वना वसानः) पाण्यांत मिसळलेला सोम (रत्न-धाः) रत्नें व (वार्याणि दयते) धनें स्तोत्यांना देतो. ॥ ६ ॥

[५२९] (समुद्रः) जलामध्यें मिश्रित झालेला (गो-पाः) गाईचें पालन करणारा (वृषा) बल वाढवणारा (स्वानः) रस काढलेला सोम (प्रथमे) प्रथमतः (भुवनस्य विधर्मन्) पाण्यांना प्रोत्साहन देत (प्रजाः जनयन्) प्रजाजनांची उन्नति करीत (अक्रान्) सर्वांहून श्रेष्ठ झाला. ॥ ७ ॥

१ गोपाः— गाईचें पालन करणारा. सोमरसामध्यें गोदुग्ध मिसळतात, म्हणून सोम गोपालक आहे.

२ भुवनस्य विधर्मन्— भुवनांतील प्राण्यांचा उत्साह वर्धन करतो.

३ प्रजाः जनयन्— प्रजांमध्यें शक्ति वाढवतो.

*

५३० कनिक्रन्ति हरिरा सृज्यमानः सीदन्वनस्य जठरे पुनानः ।
नृभिर्यतः कृणुते निर्णिजं गामतो मतिं जनयत स्वधाभिः ॥ ८ ॥ (ऋ. ९।९५।१)

५३१ एष स्य ते मधुमाँ इन्द्र सोमो वृषा वृष्णः परि पवित्रे अक्षाः ।
सहस्रदाः शतदा भूरिदावा शश्वत्तमं बर्हिरा वाज्यस्थात् ॥ ९ ॥ (ऋ. ९।८७।४)

५३२ पवस्व सोम मधुमाँ ऋतावापो वसानो अधि सानो अव्ये ।
अव द्रोणानि घृतवन्ति रोह मदिन्तमो मत्सर इन्द्रपानः ॥ १० ॥ (ऋ. ९।९६।१३)

इति चतुर्थी दशतिः ॥ ४ ॥ षष्ठः खण्डः ॥ ६ ॥ ॥ [स्व० १८ । उ० ३ । धा० ८७ । डे ॥]

[५]

(१-१२) १ प्रतर्दनो दैवोदासिः; २, १० पराशरः शाक्त्यः, ३ इन्द्रप्रमतिर्वासिष्ठः; ४ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ५ कर्णश्रुद्वासिष्ठः; ६ नोधा गौतमः; ७ कण्वो घौरः; ८ मन्युर्वासिष्ठः; ९ कुत्स आङ्गिरसः; ११ कश्यपो मारीचः; १२ प्रस्कण्वः काण्वः ॥ पवमानः सोमः ॥ त्रिष्टुप् ॥

५३३ प्र सेनानीः शूरो अग्रे रथानां गव्यन्नेति हर्षते अस्य सेना ।
भद्रान्कृण्वन्निन्द्रहवान्त्सखिभ्य आ सोमो वस्त्रा रभसानि दत्ते ॥ १ ॥ (ऋ. ९।९६।१)

---

[५३०] (आ सृज्यमानः) रस काढला जाणारा (हरिः) हिरव्या रंगाचा सोम (कनिक्रन्ति) शब्द करतो. गाळते वेळीं त्याचा शब्द होतो. (पुनानः) पवित्र केला जातांना (वनस्य जठरे सीदन्) वनांतील लांकडापासून तयार केलेल्या भांड्यांत पडत असतां, (नृभिः यतः) मनुष्यांनीं दाबलेला सोम (गां निर्णिजं कृणुते) गोदुग्धाचें रूप धारण करतो. गोदुग्धांत तो मिळवला जातो. याची (मतिं स्वधाभिः जनयत) स्तुति हविष्यान्नाबरोबर यज्ञकर्ता बोले. ॥ ८ ॥

[५३१] हे इन्द्रा ! (वृष्णः ते) बल वाढवणारा तुझा (एषः स्यः) हा तो सोम (मधुमान् वृषा) मधुर व बलवान् होऊनं (पवित्रे पर्यक्षाः) भांड्यांत टपकत आहे. तसाच तो (सहस्रदाः शतदाः) सहस्रावधि शेंकडों व (भूरिदावा) पुष्कळ धनें देणारा (वाजी) बलवान् असा हा सोम (शश्वत्तमं बर्हिः) शाश्वत यज्ञामध्यें जाऊन (अस्थात्) बसला आहे. ॥ ९॥

[५३२] हे (सोम) सोमा ! (मधुमान्) मधुर असा तूं (अपः वसानः) पाण्यांत मिसळून (अधि सानो अव्ये पवस्व) उच्च ठिकाणीं असणाऱ्या मेंढीच्या केंसांच्या छाननींतून गाळला जा. त्यानंतर (मन्दितमः) आनंददायक असा हा रस (इन्द्र पानः) इन्द्राला पिण्याजोगा (मत्सरः) आनंद देणारा सोम (घृतवन्ति द्रोणानि) जलयुक्त पात्रांमध्यें (अवरोह) जाऊन रहातो. ॥१० ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

[७] सप्तमः खण्डः ।

[५३३] (सेनानीः) सेनेला चालवणारा (शूरः सोमः) शूर सोम (गव्यन्) गाईची इच्छा करून (रथानां अग्रे) रथांच्या पुढें (प्रैति) जातो. (अस्य सेना हर्षते) याची सेना आनंदित होते. (सखिभ्यः) मित्रांसाठीं -याजकांसाठीं (इन्द्र-हवान् भद्रान् कृण्वन्) इन्द्राच्या प्रार्थना कल्याणकारी करण्याची इच्छा करीत, (रभसानि वस्त्रा आदत्ते) तेजस्वी वस्त्रें धारण करतो. ॥ १ ॥

१ सेनानीः— सेना, याजकांचा समूह.

२ सोमः गव्यन्— सोम गाईंची इच्छा करतो. सोम आपल्यामध्यें गाईचें दूध मिसळावें असें इच्छितो.

३ अस्य सेना हर्षते— सर्व याजकांना आनंद होतो.

४ रभसानि वस्त्रा आदत्ते— तेजस्वी वस्त्रें धारण करतो. दूध मिसळल्यामुळें तो तेजस्वी दिसतो.

५३४ प्र ते धारा मधुमतीरसृग्रन्वारं यत्पूतो अत्येष्यव्यम् ।
पवमान पवसे धाम गोनां जनयंत्सूर्यमपिन्वो अर्कैः ॥ २ ॥ (ऋ. ९।९७।३१)

५३५ प्र गायताभ्यर्चाम देवान्त्सोमꣳहिनोत महते धनाय ।
स्वादुः पवतामति वारमव्यमा सीदतु कलशं देव इन्दुः ॥ ३ ॥ (ऋ. ९।९७।४)

५३६ प्र हिन्वानो जनिता रोदस्यो रथो न वाजꣳ सनिषन्नयासीत् ।
इन्द्रं गच्छन्नायुधा सꣳशिशानो विश्वा वसु हस्तयोरादधानः ॥ ४ ॥ (ऋ. ९।९०।१)

५३७ तक्षद्यदी मनसो वेनतो वाग् ज्येष्ठस्य धर्मं द्युक्षोरनीके ।
आदीमायन्वरमा वावशाना जुष्टं पतिं कलशे गाव इन्दुम् ॥ ५ ॥ (ऋ. ९।९७।२२)

५३८ साकमुक्षो मर्जयन्त स्वसारो दश धीरस्य धीतयो धनुत्रीः ।
हरिः पर्यद्रवज्जाः सूर्यस्य द्रोणं ननक्षे अत्यो न वाजी । ॥ ६ ॥ (ऋ. ९।९३।१)

---

[५३४] (यत् पूतः अव्यं वारं अत्येषि) जेव्हां पवित्र होण्यासाठीं मेंढीच्या केंसांच्या चाळणींतून तूं खालीं पडतोस तेव्हां (ते मधुमतीः धाराः प्रासृग्रन्) तुझ्या मधुर धारा वाहत असतात. हे (पवमान) पवित्र सोमा ! (धाम पवसे) दुधामध्यें तूं पवित्र होत आहेस. (जनयन्) उत्पन्न झाल्यानंतर जणूं काय (अर्कैः सूर्यं अपिन्वः) आपल्या तेजानें सूर्याला पूर्ण करतोस. ॥ २ ॥

१ धाम पवसे— स्वस्थानीं पवित्र होत आहेस. दूध हें या सोमाचें स्थान आहे. सोमामध्यें गोदुग्ध मिळवलें जातें.

२ अर्कैः सूर्यं अपिन्वः— तेजानें सूर्याला पूर्ण करतो, सोमरस विशेष चमकूं लागतो.

[५३५] (प्र गायत) सोमाची स्तुति करा. (देवान् अभि अर्चामः) देवतांची आम्ही पूजा करूं या. (महते धनाय सोमं हिनोत) या मोठ्या सोमाला प्रेरित करा. (स्वादुः अव्यं वारं अति पवतां) नंतर हा मधुर रस मेंढीच्या केंसांच्या चाळणींतून गाळला जावो. (देवः इन्दुः) हा तेजस्वी सोमरस (कलशं अति आसीदतु) कलशामध्यें जाऊन तेथें राहो. ॥ ३ ॥

[५३६] (प्र हिन्वानः) ज्याला गति मिळाली आहे असा हा सोम (रोदस्योः जनिता) द्यावापृथिवीचा उत्पादक (इन्द्रं गच्छन्) इन्द्राजवळ जात असतां (वाजं सनिषन्) अन्नाला देत, (आयुधा सं शिशानः) आयुधांना उत्तम रीतिनें तीक्ष्ण करीत, (विश्वा वसु हस्तयोः आदधानाः) सर्व धन आपल्या दोनही हातांत धरून (प्र अयासीत्) आम्हांला देण्यासाठीं आला आहे. ॥ ४ ॥

[५३७] (वेनतः मनसः वाक्) उन्नतिची इच्छा करणाऱ्याच्या मनांतील विचारांनीं चालविलेली स्तुति (यत् तक्षत्) ज्याला तयार करते, त्या (धर्मं ज्येष्ठस्य द्युक्षोः अनीके) यज्ञधर्माच्या श्रेष्ठ सवनाच्याजवळ सोमाची प्रशंसा होते. (आ वरं जुष्टं) यानंतर श्रेष्ठ संसेवीत (पतिं) पालक अशा (कलशे) कलशामध्यें असणाऱ्या (ईं इन्दुं) या सोमाजवळ (वावशानाः गावः आयन्) इच्छा करणाऱ्या गाई येतात. ॥ ५ ॥

यज्ञामध्यें स्तोत्रांचें गायन होतें. सोम कुटून त्याचा रस काढतात, तो कलशामध्यें गाळतात व नंतर त्यांत गाईचें दूध मिसळतात. या विधिचें हें आलंकारिक वर्णन आहे.

[५३८] (साकं उक्षः स्वसारः) एकत्र राहून कार्य करणाऱ्या बहिणी - अंगुली (मर्जयन्तः) सोमाला शुद्ध करतात. या (दश धीतयः) दहा अंगुली (धीरस्य धनुत्रीः) सामर्थ्यवान् सोमाला धरतात व हालवितात. हा (हरिः) हिरव्या रंगाचा सोम (सूर्यस्य जाः पर्यद्रवत्) सूर्यामुळें जन्मलेला दिशांमध्यें फिरवला जातो (अत्यः वाजी न) पळणारा घोडा जातो त्याप्रमाणें सोम (द्रोणं ननक्षे) कलशामध्यें पडतो. ॥ ६ ॥

५३९ अभि यदस्मिन्वाजिनीव शुभः स्पर्धन्ते धियः सूरे न विशः ।
अपो वृणानः पवते कवीयान्व्रजं न पशुवर्धनाय मन्म ॥ ७ ॥ (ऋ. ९।९४।१)
५४० इन्दुर्वाजी पवते गोन्योघा इन्द्रे सोमः सह इन्वन्मदाय ।
हन्ति रक्षो बाधते पर्यरातिं वरिवस्कृण्वन्वृजनस्य राजा ॥ ८ ॥ (ऋ. ९।९७।१०)
५४१ अया पवा पवस्वैना वसूनि मांश्चत्व इन्दो सरसि प्र धन्व ।
ब्रध्नश्चिद्यस्य वातो न जूतिं पुरुमेधाश्चित्तकवे नरं धात् ॥ ९ ॥ (ऋ. ९।९७।५२)

---

[५३९] (अस्मिन् वाजिनि इव शुभः) ज्याप्रमाणें घोडयावर अलंकार घालून त्यास सुशोभित करतात, तसेंच (सूरे विशः न) सूर्याचे किरण त्याची शोभा वाढवतात, (धियः अधि स्पर्धन्ते) त्याप्रमाणें बुद्धिपूर्वक अंगुली रस काढण्याची स्पर्धा करतात, (अपः वृणानः) पाण्याचा स्वीकार करीत (कवीयान् पवते) स्तोत्रपाठ ऐकत सोम गाळला जातो. ज्याप्रमाणें (पशुवर्धनाय मन्म व्रजं न) पशुसंवर्धनासाठीं गाईंचा पालक संमाननीय गोशालेमध्यें जातो. ॥ ७ ॥

१ वाजिनि शुभः— जसे घोडयावर अलंकार घालतात, त्याप्रमाणें सोमामध्यें दूध आदि घालून त्याची शोभा वाढवतात.
२ सूरे विशः— सूर्यामध्यें किरण जसे चमकतात, त्याप्रमाणें सोमाचें तेज चमकतें.
३ धियः अधि स्पर्धते— बुद्धिपूर्वक अंगुली रस काढण्याची स्पर्धा करीत आहेत असें रस काढतांना दिसतें.
४ कवीयान्— रस काढतांना स्तोत्रपाठ चालत असतो.
५ पवते— सोमरस गाळला जातो.
६ पशुवर्धनाय मन्म व्रजं— पशुसंवर्धन करण्यासाठीं जसा गोरक्षक गोठ्यांत जातो, त्याप्रमाणें भांडयांत सोमरस गाळला जातो.

[५४०] (वाजी इन्दुः) बलवान् सोमरस (गोन्योधाः) खालीं ठेवलेल्या भांडयांत गाळला जाणारा (इन्द्रे सहः इन्वन्) इन्द्रामध्यें बल वाढवणारा (वरिवः कृण्वन्) याजकांना धन देत, (वृजनस्य राजा सोमः) बलाचा राजा सोम (मदाय) आनन्द वाढवण्यासाठीं (पवते) गाळला जात आहे. तो (रक्षः हन्ति) राक्षसांना मारतो व (अ-रातिं परि बाधते) दुष्टांना दूर करतो. ॥ ८ ॥

[५४१] हे सोमा ! (अया पवा) या शुद्ध होणाऱ्या धारेनें (एना वसूनि पवस्व) हीं धनें आम्हांस दे. हे (इन्दो) सोमा ! (मांश्चत्वे) सन्मान्यांना प्राप्त करण्याची इच्छा करणाऱ्या (सरसि) पाण्याच्या कलशामध्यें (प्र धन्व) जा. (यस्य ब्रध्नश्चित्) ज्याचा मूलाधार आदित्य (वातः न) वायुला प्रेरित करतो त्याप्रमाणें (नरं जूतिं धात्) नेतृत्वाचा वेग तो सोम धारण करतो आणि तो सोम (पुरु-मेधाः चित्) पुष्कळ बुद्धिमान् इन्द्रालाही (तकवे) प्राप्त करतो. ॥ ९ ॥

१ अया पवा— एका धारेनें सोम गाळला जातो नंतर—
२ सरसि प्र धन्व— पाण्याच्या कलशामध्यें पोंचतो, पाण्यांत मिसळतो, गाळल्यानंतर तो पाण्यांत मिसळला जातो.
३ ब्रध्नः वातः न— सूर्य जसा वायुला प्रेरित करतो, त्याप्रमाणें गाळणारा सोमाला गति देतो व तो (पुरु-मेधाः तकवे) बुद्धिमान् इन्द्राला दिला जातो.
४ मांश्चत्वे सरसि प्र धन्व— सन्मान्यांना प्राप्त करतात त्याप्रमाणें पाणी हें सन्मान्य सोमामध्यें मिसळलें जातें.

५४२ महत्तत्सोमो महिषश्चकारापां यद्गर्भोऽवृणीत देवान् ।
अदधादिन्द्रे पवमान ओजोऽजनयत्सूर्ये ज्योतिरिन्दुः ॥ १० ॥ (ऋ. ९।९७।४१)

५४३ असर्जि वक्वा रथ्ये यथाजौ धिया मनोता प्रथमा मनीषा ।
दश स्वसारो अधि सानो अव्ये मृजन्ति वह्निं सदनेष्वच्छ ॥ ११ ॥ (ऋ. ९।९१।१)

५४४ अपामिवेदूर्मयस्तर्तुराणाः प्र मनीषा ईरते सोममच्छ ।
नमस्यन्तीरुप च यन्ति सं चाच विशन्त्युशतीरुशन्तम् ॥ १२ ॥ (ऋ. ९।९५।३)

इति पञ्चमी दशतिः ॥ ५ ॥ सप्तमः खण्डः ॥ ७ ॥ [स्व० १९ । उ० ३ । धा० ८२ । दा ॥]

इति त्रिष्टुभः ॥ इति षष्ठप्रपाठकस्य प्रथमोऽर्धः ॥ ६ ॥

---

[५४२] (महिषः सोमः) मोठा बलवान् सोम (महत् तत् चकार) तें मोठें कार्य करीत आहे. तें त्याचें कार्य हें आहे -(यत् अपां गर्भः) पाण्याला आपल्या गर्भामध्यें धारण केलें. नंतर (देवान् अवृणीत) देवांना प्राप्त केलें. (पवमानः इन्द्रे ओजः न्यधात्) शुद्ध झालेल्या सोमानें इन्द्रामध्यें सामर्थ्य ठेवलें व (इन्दुः सूर्ये ज्योतिः) सोमानें सूर्यामध्यें तेज (अजनयत्) उत्पन्न केलें. ॥ १० ॥

१ अपां गर्भः— पाण्याला आपल्या गर्भामध्यें ठेवलें. सोमामध्यें पाणी मिसळलें.

२ देवान् अवृणीत— देवांना वरलें. देवांना पिण्यासाठीं सोम दिला.

३ इन्द्रामध्यें सामर्थ्य वाढवलें व सूर्यामध्यें तेज वाढवलें - सोमरस प्यायल्यामुळें देवांचें सामर्थ्य वाढलें.

[५४३] (मन ऊता) सर्वांचीं मनें ज्यांत लागलीं आहेत (प्रथमा मनीषा) प्रथमतः ज्याची स्तुति केली आहे तो (वक्वा) शब्द करणारा सोम (आजौ धिया) यज्ञामध्यें स्तोत्रपाठाबरोबर (रथ्ये यथा) ज्याप्रमाणें संग्रामामध्यें घोडे पाठवले जातात त्याप्रमाणें (असर्जि) पाण्यांत मिसळला आहे. (दश स्वसारः) दहा अंगुली (सदनेषु वह्निं) यज्ञ स्थानांत पोंचणाऱ्या सोमाला (सानो अधि) उच्चस्थानवर (अव्ये अच्छ मृजन्ति) मेंढीच्या केंसांच्या गाळणींतून उत्तम रीतिनें शुद्ध करतात. ॥ ११ ॥

१ मनोता— मन ज्यावर लागलें आहे तो सोम.

२ प्रथमा मनीषा— प्रथम ज्याची स्तुति केली आहे असा सोम.

३ वक्वा — शब्द करणारा सोम, गाळला जात असतांना त्याचा शब्द होतो.

४ आजौ धिया असर्जि— यज्ञामध्यें स्तोत्रपाठ चालू असतां सोमरस पाण्यांत सोडला जातो.

५ अव्ये मृजन्ति— मेंढीच्या केंसांच्या गाळणींतून गाळतात.

[५४४] (अपां ऊर्मयः इव) पाण्याच्या लाटा जशा लवकर येतात त्याप्रमाणें (तर्तुराणाः इत्) त्वरा करणारे ऋत्विज (मनीषाः) स्तुतिंना (सोमं अच्छ प्र ईरते) सोमाजवळ लवकर प्रेरित करतात. (उशतीः नमस्यन्तीः) उन्नतिची इच्छा करणारीं व नमस्कार करणारीं स्तोत्रें (उशन्तं तं उपयन्ति च) इच्छा करणाऱ्या सोमाजवळ पोंचतात, (सं आविशन्ति च) व त्यांत प्रवेश करतात. ॥ १२ ॥

सर्व ऋत्विज सोमाची एकदम स्तुति करतात.

॥ येथें सातवा खण्ड समाप्त झाला ॥

[६]

(१-९) १ अन्धीगुः श्यावाश्विः; २ नहुषो मानवः; ३ ययातिर्नाहुषः; ४ मनुः सांवरणः; ५, ८, अम्बरीषो वार्षागिरः ऋजिश्वा भारद्वाजश्च; ६, ७ रेभसूनू काश्यपौ; ९ प्रजापतिर्वैश्वामित्रो वाच्यो वा ॥ पवमानः सोमः ॥ अनुष्टुप्; ७ बृहती ॥

अथ षष्ठप्रपाठकस्य द्वितीयोऽर्धः ॥ ६ ॥

५४५ पुरोजिती वो अन्धसः सुताय मादयित्नवे ।
अप श्वानꣳश्नथिष्टन सखायो दीर्घजिह्व्यम् ॥ १ ॥ (ऋ. ९।१०१।१)

५४६ अयं पूषा रयिर्भगः सोमः पुनानो अर्षति ।
पतिर्विश्वस्य भूमनो व्यख्यद्रोदसी उभे ॥ २ ॥ (ऋ. ९।१०१।७)

५४७ सुतासो मधुमत्तमाः सोमा इन्द्राय मन्दिनः ।
पवित्रवन्तो अक्षरन् देवान् गच्छन्तु वो मदाः ॥ ३ ॥ (ऋ. ९।१०१।४)

५४८ सोमाः पवन्त इन्दवोऽस्मभ्यं गातुवित्तमाः ।
मित्राः स्वाना अरेपसः स्वाध्यः स्वर्विदः ॥ ४ ॥ (ऋ. ९।१०१।१०)

५४९ अभी नो वाजसातमꣳरयिमर्ष शतस्पृहम् ।
इन्दो सहस्रभर्णसं तुविद्युम्नं विभासहम् ॥ ५ ॥ (ऋ. ९।९८।१)

---

[८] अष्टमः खण्डः ।

[५४५] हे (सखायः) स्तुति करणाऱ्या याजकांनो ! (वः) तुम्ही (पुरोजिती अन्धसः) पुढें ठेवलेल्या सोमरूपी अन्नाच्या (सुताय मादयिष्णवे) आनंद वाढवणाऱ्या या रसाकडे (दीर्घ-जिह्व्यं श्वानं अपश्नथिष्टन) जाऊं इच्छिणाऱ्या मोठ्या जिभेच्या कुत्र्याला दूर हटवा. ॥ १ ॥

कुत्रे सोमरसाला न चाटतील असें करा.

[५४६] (पूषा भगः रयिः अयं सोमः) पोषण करणारा सेवनीय व शोभिवन्त असा हा सोमरस (पुनानः अर्षति) गाळला जात असतां खालील भांड्यांत जातो. (विश्वस्य भूमनः पतिः सोमः) सर्व प्राण्यांचा पालन करणारा हा सोमरस (उभे रोदसी व्यख्यत्) दोनही द्युलोक व पृथिवी यांना आपल्या तेजानें प्रकाशित करतो. ॥ २ ॥

सोमरस चमकत असतो हें म्हणावयाचें आहे, त्यासाठीं दोनही लोकांना तो प्रकाशित करतो असें म्हटलें आहे.

[५४७] (मधुमत्तमाः मन्दिनः) मधुर व आनंद वाढवणारे (सुतासः) हे सोमरस (पवित्रवन्तः) गाळले जाऊन (इन्द्राय क्षरन्) इन्द्रासाठीं तयार होत आहेत. हे सोम हो ! (वः) तुमचे (मदाः देवान् गच्छन्तु) हे आनन्दकारी रस देवांना पोंचोत. ॥ ३ ॥

[५४८] (गातु-वित्-तमाः) मार्ग उत्तम रीतिनें जाणणारे (मित्राः) मित्रासारखे (स्वानाः) रस काढलेले (अ-रेपसः) निष्पाप (स्वाध्यः) उत्तम मन एकाग्र करणारे (स्वः-विदः इन्दवः) आत्मज्ञानी हे (सोमाः) सोमरस (अस्मभ्यं पवन्ते) आम्हांसाठीं पवित्र होत आहेत. गाळले जात आहेत. ॥ ४ ॥

[५४९] हे (इन्दो) सोमा ! (शत-स्पृहं) शेंकडों ज्याची प्रशंसा करतात. (सहस्र-भर्णसं) हजारांचें जें पोषण करतें (तुवि-द्युम्नं) पुष्कळ तेजस्वी (विभा-सहं) विशेष प्रकाशापेक्षांही प्रकाशमान् (वाज सातमं) बल वाढवणारें (रयिं) धन (नः अभ्यर्ष) आम्हांला दे. ॥ ५ ॥

१ विभा-सहं— विशेष तेजस्वी लोकांना श्रेष्ठ आहे असें जें वाटतें तें.

५५० अभी नवन्ते अद्रुहः प्रियमिन्द्रस्य काम्यम् ।
वत्सं न पूर्व आयुनि जातꣳरिहन्ति मातरः ॥ ६ ॥ (ऋ. ९।१००।१)

५५१ आ हर्यताय धृष्णवे धनुष्टन्वन्ति पौꣳस्यम् ।
शुक्रा वि यन्त्यसुराय निर्णिजे विपामग्रे महीयुवः ॥ ७ ॥ (ऋ. ९।९९।१)

५५२ परि त्यꣳहर्यतꣳहरिं बभ्रुं पुनन्ति वारेण ।
यो देवान्विश्वाꣳइत्परि मदेन सह गच्छति ॥ ८ ॥ (ऋ. ९।९८।७)

५५३ प्र सुन्वानायान्धसो मर्तो न वष्ट तद्वचः ।
अप श्वानमराधसꣳहता मखं न भृगवः ॥ ९ ॥ (ऋ. ९।१०१।१३)

इति षष्ठी दशतिः ॥ ६ ॥ अष्टमः खण्डः ॥ ८ ॥ [स्व० १० । उ० ५ । धा० ६१ । म ॥]
इत्यनुष्टुभः (एका बृहती) ॥

---

[५५०] (मातरः) गोमाता (पूर्वे आयुनि जातं वत्सं) पहिल्या पहिल्या आयुष्यांत झालेल्या वांसराला (रिहन्ति न) चाटतात, त्याप्रमाणें (अ-द्रुहः) विरोध न करणारें जल (इन्द्रस्य प्रियं काम्यं) इन्द्राला प्रिय व प्राप्त करण्याजोग्या सोमाला (अभि नवन्ते) प्राप्त होतें. ॥ ६ ॥

१ अ-द्रुहः इन्द्रस्य प्रियं अभि नवन्ते— द्रोह न करणारें जल इन्द्राला प्रिय असणाऱ्या सोमाला प्राप्त होतें. जल सोमरसामध्यें मिसळतें.

[५५१] (हर्यताय) सर्वांनीं पूजनीय व (धृष्णवे) शत्रूंचा पराजय करणाऱ्या सोमासाठीं (पौंस्यं धनुः आतन्वन्ति) पुरुषार्थ प्रकट करणारें धनुष्य घेऊन त्यावर दोरी चढवतात. सोमरसाची धारा गाळण्यासाठीं तयारी करतात. (विपां अग्रे) विद्वानांच्या पुढें (मही-युवः शुक्राः) पृथ्वीवर पूज्य असलेले अध्वर्यु स्वच्छ गाईच्या दुधाला (असुराय निर्णिजे) बलवान् सोमाच्या रूपाला शुद्ध करण्यासाठीं (वयन्ति) आच्छादित करतात. ॥ ७ ॥

१ क्षत्रिय ज्याप्रमाणें धनुष्यावर दोरी चढवून युद्धाची तयारी करतात, त्याप्रमाणें ऋत्विज सोम गाळण्याची तयारी करतात.

२ स्वच्छ गाईच्या दुधानें सोमरस आच्छादित करतात. सोमरसामध्यें गाईचें दूध मिसळतात.

[५५२] (हर्यतं हरिं) स्पृहणीय हिरव्या रंगाच्या (बभ्रुं त्यं) व भुऱ्या रंगाच्या त्या सोमाला (वारेण परि पुनन्ति) लोंकरीच्या गाळणीनें गाळतात. (यः) तो सोम (विश्वान् देवान् इत्) सर्व देवांजवळ (मदेन सह परि गच्छति) आपल्या आनन्ददायक गुणांसह जातो. ॥ ८ ॥

[५५३] (सुन्वानाय अन्धसः) सोमाचा रस काढल्यानंतर त्या अन्नाचें (तत् वचः) तें वर्णन (मर्तः न प्रवष्ट) हव्या त्या माणसानें ऐकूं नये. (अ-राधसं मखं भृगवः न) ज्यांत दान दिलें जात नाहीं, अशा यज्ञाला ज्याप्रमाणें भृगुऋषींनीं बंद केलें होतें त्याचप्रमाणें (श्वानं अप हत) कुत्र्यालाहि दूर करा. ॥ ९ ॥

१ अन्धसः तत् वचः मर्तः न प्रवष्ट— सोमरसाच्या त्या वर्णनाला सर्व माणसें न ऐकोत. केवळ विशेष योग्यता असणारेच तें ऐकोत.

॥ येथें आठवा खण्ड समाप्त झाला ॥

[७]

(१-१२) १-३, ५ कविर्भार्गवः; ४, ६ सिकता निवावरी; ७ रेणुर्वैश्वामित्रः; ८ वेनो भार्गवः; ९ वसुर्भारद्वाजः;
१० वत्सप्रिर्भालन्दः; ११ गृत्समदः शौनकः; १२ पवित्र आङ्गिरसः ॥ पवमानः सोमः ॥ जगती ॥

५५४ अभि प्रियाणि पवते चनोहितो नामानि यह्वो अधि येषु वर्धते ।
आ सूर्यस्य बृहतो बृहन्नधि रथं विष्वञ्चमरुहद्विचक्षणः ॥ १ ॥ (ऋ. ९।७५।१)

५५५ अचोदसो नो धन्वन्त्विन्दवः प्र स्वानासो बृहद्देवेषु हरयः ।
वि चिदश्नाना इषयो अरातयोऽर्यो नः सन्तु सनिषन्तु नो धियः ॥ २ ॥ (ऋ. ९।७९।१)

५५६ एष प्र कोशे मधुमाँ अचिक्रददिन्द्रस्य वज्रो वपुषो वपुष्टमः ।
अभ्यृ३तस्य सदुघा घृतश्चुतो वाश्रा अर्षन्ति पयसा च धेनवः ॥ ३ ॥ (ऋ. ९।७७।१)

५५७ प्रो अयासीदिन्दुरिन्द्रस्य निष्कृतँ सखा सख्युर्न प्र मिनाति सङ्गिरम् ।
मर्य इव युवतिभिः समर्षति सोमः कलशे शतयामना पथा ॥ ४ ॥ (ऋ. ९।७६।६)

---

[९] नवमः खण्डः ।

[५५४] (चनो-हितः) अन्न म्हणून हितकारक सोम (प्रियाणि नामानि अभि पवते) प्रिय जलांमध्यें मिसळून गाळला जातो. (येषु यह्वः अभिवर्धते) त्या जलांमध्यें मिसळला गेल्यामुळें तो वाढतो. त्यानंतर (बृहन्) मोठा झालेला तो सोम (बृहतः सूर्यस्य) मोठ्या सूर्याच्या (विष्वंचं रथं अधि) सर्वत्र गमन करणाऱ्या रथावर (विचक्षणः आरुहत्) विश्वाला पाहणारा सोमदेव चढतो. ॥ १ ॥

[५५५] (अ-चोदसः) अन्य कोणाकडून प्रेरित न झालेले (हरयः स्वानासः) हिरव्या रंगाचे उत्तम रीतिनें काढलेले (इन्दवः) सोमरस (नः बृहद्देवेषु प्र धन्वन्तु) आमच्या यज्ञांत आम्हांला प्राप्त होवोत. (अ-रातयः) दान न करणारे (नः अरयः) आमचे शत्रू (इषयः) अन्नाची इच्छा करीत (अश्नानाः वि चित्) भुकेलेले-अन्न न मिळतांच तसेच (सन्तु) असोत. (नः धिया सनिषन्तु) आमचीं स्तोत्रें देवांना प्राप्त होवोत. ॥ २ ॥

१ अ-रातयः नः अरयः इषयः अश्नानाः वि चित्— आमच्या शत्रूंना खावयास अन्न न मिळो. ते तसेच अन्नाशिवाय भुकेनें व्याकुल होत राहोत.

[५५६] (इन्द्रस्य वज्रः) इन्द्राचें वज्ररूप सामर्थ्य जणूं काय असा (वपुषा वपुष्टमः) बलानें अति सामर्थ्य-वान् (एषः मधुमान्) हा मधुरतायुक्त सोमरस (कोशे प्र अचिक्रदत्) कलशामध्यें शब्द करीत जात आहे. (ऋतस्य) यज्ञासाठीं (सुदुघः घृतश्चुतः) उत्तम रीतिनें दुध देणाऱ्या व तूप ज्यांतून स्रवत आहे (वाश्राः पयसा धेनवः च) अशा हंबरणाऱ्या दुधासह असणाऱ्या गाई (अभि अर्षन्ति) जवळ येत आहेत. ॥ ३ ॥

१ सोमाजवळ दुधाळ गाई येतात -सोमरसामध्यें गाईचें दूध मिसळलें जात आहे.

[५५७] (इन्दुः) हा सोम (इन्द्रस्य निष्कृतं) इन्द्राच्या स्थानांत-पोटांत (प्र उ अयासीत्) जात आहे व तेथें जाऊन (सखा) मित्ररूपी हा सोम (सख्युः संगिरं) मित्ररूपी इन्द्राच्या पोटांत (न प्र मिनाति) कांहीं कष्ट देत नाहीं. (युवतीभिः मर्यः इव) ज्याप्रमाणें तरुण पुरुष अनेक स्त्रियांसह राहतो, त्याप्रमाणें सोम जलांबरोबर (सं अर्षति) मिळून राहतो. हा सोम (शत-यामना पथा) शंभर छिद्रें असलेल्या चाळणीच्या मार्गानें (कलशे) कलशा-मध्यें गाळला जात आहे. ॥ ४ ॥

१ युवतिभिः मर्यः इव सं अर्षति— अनेक स्त्रियांशीं जसा एक पति मिळून राहतो, त्याप्रमाणें सोम जलां-मध्यें मिसळला जातो अर्थात् सोमरस पुष्कळ जलांमध्यें मिसळला जातो.

५५८ धर्ता दिवः पवते कृत्व्यो रसो दक्षो देवानामनुमाद्यो नृभिः ।
हरिः सृजानो अत्यो न सत्वभिर्वृथा पाजांऽसि कृणुषे नदीष्वा ॥ ५ ॥ (ऋ. ९।७६।१)
५५९ वृषा मतीनां पवते विचक्षणः सोमो अह्नां प्रतरीतोषसांऽदिवः ।
प्राणा सिन्धूनांऽकलशांऽ अचिक्रददिन्द्रस्य हार्द्याविशन्मनीषिभिः ॥ ६ ॥ (ऋ. ९।८६।१)
५६० त्रिरस्मै सप्त धेनवो दुदुह्रिरे सत्यामाशिरं परमे व्योमनि ।
चत्वार्यन्या भुवनानि निर्णिजे चारूणि चक्रे यदृतैरवर्धत ॥ ७ ॥ (ऋ. ९।७०।१)
५६१ इन्द्राय सोम सुषुतः परि स्रवापामीवा भवतु रक्षसा सह ।
मा ते रसस्य मत्सत द्वयाविनो द्रविणस्वन्त इह सन्त्विन्दवः ॥ ८ ॥ (ऋ.९।८५।१)
५६२ असावि सोमो अरुषो वृषा हरी राजेव दस्मो अभि गा अचिक्रदत् ।
पुनानो वारमत्येष्यव्ययंऽश्येनो न योनिं घृतवन्तमासदत् ॥ ९ ॥ (ऋ. ९।८२।१)

---

[५५८] (धर्ता कृत्व्यः रसः) धारणशक्तिनें युक्त कर्तृत्ववान् असा हा सोमरस (देवतानां दक्षः) देवतांचें बल वाढवणारा (नृभिः अनुमाद्यः) ऋत्विजांनीं स्तविलेला (हरिः) हिरव्या रंगाचा सोम (दिवः पवते) वरच्या भांड्यांतून गाळला जाऊन खालील कलशामध्यें पडत आहे. (सत्वभिः सृजानः) बलवान् ऋत्विजांच्याकडून काढला गेलेला हा रस (अत्यः न) घोड्याप्रमाणें (वृथा) सहजच (पाजांसि) आपल्या शक्तिनें (नदीषु कृणुते) नदीच्या जलांमध्यें आपलें मिश्रण करतो. ॥ ५ ॥

[५५९] (मतीनां वृषा) स्तुति करणाऱ्यांच्या इच्छा पूर्ण करणारा (वि-चक्षणः) विशेष ज्ञानी (अह्नां उषसां दिवः) दिवस, उषःकाल व सूर्य यांचें सामर्थ्य (प्रतरीता) वाढवणारा (सोमः पवते) सोम गाळला जात आहे. (सिन्धूनां प्राणाः) नद्यांच्या प्राणरूपी जलांमध्यें मिसळलेला (मनीषिभिः) ज्ञानी ऋत्विजांनीं काढलेला हा सोमरस (इन्द्रस्य हार्दि आविशत्) इन्द्राच्या पोटांत प्रविष्ट होण्यासाठीं (कलशान् अभि) कलशांमध्यें (अचिक्रदत्) शब्द करीत प्रविष्ट होत आहे. ॥ ६ ॥

[५६०] (परमे व्योमनि) श्रेष्ठ यज्ञामध्यें असणाऱ्या (अस्मै) या सोमासाठीं (त्रिः सप्त धेनवः) एकवीस गाई (सत्यां आशिरं दुदुह्रिरे) खरोखर दूध देतात व हा सोम (यत् ऋतैः अवर्धत) जेव्हां यज्ञांनीं वाढवला जातो तेव्हां (अन्या चत्वारि भुवना) आणि चार भुवनांमध्यें-जलांच्या चार भांड्यांत (निर्णिजे) गाळून शुद्ध करण्यासाठीं (चारूणि चक्रे) उत्तम कल्याणयुक्त पद्धतिनें परिशोधन केलें जातें. ॥ ७ ॥

१२ महिने, पांच ऋतु, तीन लोक व हा आदित्य मिळून २१ गाई आहेत, असा भाव येथें समजावा.

[५६१] हे (सोम) सोमा ! तूं (सु-षुतः) उत्तम प्रकारें रस काढल्यानंतर (इन्द्राय परिस्रव) इन्द्रासाठीं तूं प्रवाहित हो. (अमीवा रक्षसा सह अप भवतु) रोग राक्षसांसह दूर होवोत. (ते रसस्य) तुझ्या रसाला पिऊन (द्वया विनः) दोनही सत्यासत्य हवें तसें आचरण करणारे दुष्ट (मा मत्सत) आनंदित न होवोत. अशा दुष्टांना सोमरस प्यावयास न मिळो. (इन्दवः) सोमरस (इह) या यज्ञामध्यें (द्रविणस्वन्तः सन्तु) धनयुक्त होवोत. ॥ ८ ॥

[५६२] (अरुषः वृषा) तेजस्वी बलवर्धक (हरिः सोमः) हिरव्या रंगाचा सोमरस (असावि) काढला आहे. हा (राजा इव दस्म) राजाप्रमाणें दर्शनीय आहे. (गाः अभिः) गोदुग्ध मिसळल्यानंतर (अचिक्रदत्) शब्द करीत तो (पुनानः) गाळला जात असतांना (अव्यं वारं अत्येषि) मेंढीच्या केंसांच्या गाळणींमधून गाळला जात आहे. गाळल्यानंतर (श्येनः न) श्येन पक्ष्याप्रमाणें (घृतवन्तं योनिं आ सदत्) जलयुक्त कलशांमध्यें तो जाऊन बसतो. ॥ ९ ॥

*

५६३ प्र देवमच्छा मधुमन्त इन्दवोऽसिष्यदन्त गाव आ न धेनवः ।
बर्हिषदो वचनावन्त ऊधभिः परिस्रुतमुस्रिया निर्णिजं धिरे ॥ १० ॥ (ऋ. ९।६८।१)

५६४ अञ्जते व्यञ्जते समञ्जते क्रतुंरिहन्ति मध्वाभ्यञ्जते ।
सिन्धोरुऽछ्वासे पतयन्तमुक्षणंहिरण्यपावाः पशुमप्सु गृभ्णते ॥ ११ ॥ (ऋ. ९।८६।४३)

५६५ पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते प्रभुर्गात्राणि पर्येषि विश्वतः ।
अतप्ततनूर्न तदामो अश्नुते शृतास इद्वहन्तः सं तदाशत ॥ १२ ॥ (ऋ. ९।८३।१)

इति सप्तमी दशतिः ॥ ७ ॥ नवमः खण्डः ॥ ९ ॥ [स्व० १५ । उ० ११ । धा० १३७ । पे ॥]

इति जगत्यः ॥

[८]

(१-१२) १, ७, ११ अग्निश्चाक्षुषः; २ चक्षुर्मानवः; ३, ४, ९, १० पर्वतनारदौ काण्वौ (३, १० शिखण्डिन्याप्सरसौ काश्यपौ वा); ५ त्रित आप्त्यः; ६ मनुराप्सवः; ८, १२ द्वित आप्त्यः; ॥ पवमानः सोमः ॥ उष्णिक् ॥

५६६ इन्द्रमच्छ सुता इमे वृषणं यन्तु हरयः । श्रुष्टे जातास इन्दवः स्वर्विदः ॥ १ ॥
(ऋ. ९।१०६।१)

---

[५६३] (मधुमन्तः इन्दवः) मधुर सोमरस (देवं अच्छ) इन्द्रदेवाजवळ (प्रासिष्यदन्त) प्रवाहित होत आहेत. पात्रांमध्यें ओतले जात आहेत, (न धेनवः गावः आ) जशा दुधाळ गाई वांसरांजवळ जातात. (बर्हिषदः वचनवन्तः उस्रियाः) यज्ञशालेमध्यें राहणाऱ्या शब्द करणाऱ्या गाई (ऊद्भिः परिश्रुतं निर्णिजं) आपल्या कासेंतून टपकणाऱ्या दुधामध्यें सोमरसाला (धिरे) धारण करतात. सोमरसामध्यें गोदुग्ध मिसळलें जातें. ॥ १० ॥

[५६४] (अंजते) ऋत्विज सोमरसाला गाईच्या दुधामध्यें मिसळतात. (वि अंजते) विशेष रीतिनें मिसळतात. (सं अंजते) योग्य रीतिनें मिसळतात. देव (क्रतुं रिहन्ति) या सोमाचा स्वाद घेतात. (मध्वा अभि अंजते) मध किंवा तूप घालून त्यांत मिसळतात. नंतर (सिन्धोः उच्छ्वासे) नदीच्या पाण्यांत (पतयन्तं उक्षणं) पडणाऱ्या सोमाला (हिरण्यः पावः) सुवर्णानें पवित्र करीत (पशुं गृभ्णते) तेजस्वी स्वरूपांत घेतात. ॥ ११ ॥

१ उक्षा- सोम, पशु- (पश्यति इति), द्रष्टा, पाहणारा, अंधारांत चमकणारा.

२ हिरण्य-पावः— हातांत सोन्याची आंगठी घालून रस काढतात व नंतर त्याच हातांनीं तो रस गाळतात.

[५६५] हे (ब्रह्मणस्पते) ज्ञानपते सोमा ! (ते पवित्रं विततं) तुझें पवित्र अंग सर्वत्र पसरलें आहे. (प्रभुः गात्राणि पर्येषि) तूं सामर्थ्यवान् असल्यानें पिणाऱ्याच्या गात्रांमध्यें स्फुरण वाढवतोस. (विश्वतः) सर्वत्र हा नियम आहे कीं (अ-तप्त तनूः) ज्याचें शरीर तप करून तापलेलें नसतें त्या (आमः) अपरिपक्वाला तें फळ (न अश्नुते) मिळत नाहीं पण (शृतासः इत्) परिपक्व झाल्यानंतर (तत् समासते) तें ते प्राप्त करतात. ॥ १२ ॥

॥ येथें नववा खण्ड समाप्त झाला ॥

[१०] दशमः खण्डः ।

[५६६] (श्रुष्टे) लवकर (जातासः इन्दवः) तयार झालेले (स्वः विदः) आत्मज्ञान वाढवणारे (इमे हरयः सुताः) हे हिरव्या रंगाचे सोमरस (वृषणं) बलवान् इन्द्राजवळ (अच्छ यन्तु) सरळपणानें पोंचोत. ॥ १ ॥

५६७ प्र धन्वा सोम जागृविरिन्द्रायेन्द्रो परि स्रव । द्युमन्तꣳ शुष्ममा भर स्वर्विदम् ॥ २ ॥

(ऋ. ९।१०६।४)

५६८ सखाय आ नि षीदत पुनानाय प्र गायत । शिशुं न यज्ञैः परि भूषत श्रिये ॥ ३ ॥

(ऋ. ९।१०४।१)

५६९ तं वः सखायो मदाय पुनानमभि गायत । शिशुं न हव्यैः स्वदयन्त गूर्तिभिः ॥ ४ ॥

(ऋ. ९।१०५।१)

५७० प्राणा शिशुर्महीनाꣳ हिन्वन्नृतस्य दीधितिम् । विश्वा परि प्रिया भुवदध द्विता ॥ ५ ॥

(ऋ. ९।१०२।१)

५७१ पवस्व देववीतय इन्दो धाराभिरोजसा । आ कलशं मधुमान्त्सोम नः सदः ॥ ६ ॥

(ऋ. ९।१०६।७)

५७२ सोमः पुनान ऊर्मिणाव्यं वारं वि धावति । अग्रे वाचः पवमानः कनिक्रदत् ॥ ७ ॥

(ऋ. ९।१०६।१०)

५७३ प्र पुनानाय वेधसे सोमाय वच उच्यते । भृतिं भरा मतिभिर्जुजोषते ॥ ८ ॥

(ऋ. ९।१०३।१)

---

[५६७] हे (सोम) सोमा ! (जागृविः प्रधन्व) उत्साही असा तूं पात्रामध्यें जा. हे (इन्दो) सोमा ! (इन्द्राय परिस्रव) इन्द्रासाठीं कलशामध्यें जा. (द्युमन्तं स्वर्विदं) तेजस्वी असें ज्ञान प्रसारक (शुष्म आ भर) बल आम्हांला भरपूर दे. ॥ २ ॥

[५६८] हे (सखायः) मित्र हो ! हे ऋत्विज हो ! (आ निषीदत) या बसा. (पुनानाय प्रगायत) सोमाला गाळत असतांना सामगान करा. (शिशुं न) बालकाला ज्याप्रमाणें सुशोभित करतात, त्याप्रमाणें (श्रिये यज्ञैः परि भूषतः) शोभेसाठीं यज्ञसाधनांनीं या सोमाला अलंकृत करा. ॥ ३ ॥

[५६९] हे (सखायः) मित्र हो ! (वः) तुम्ही (मदाय) आनन्दाचें संवर्धन करण्यासाठीं (पुनानं तं अभि गायत) गाळत असतां त्या सोमाची स्तुति करा. (शिशुं न) बालकाला सुशोभित करतात त्याप्रमाणें (हव्यैः) हवनांनीं व (गूर्तेभिः) स्तुतींनीं याला (स्वदयन्त) स्वादिष्ट करा. ॥ ४ ॥

[५७०] (प्राणाः) यज्ञ करणारा यज्ञाचा प्राण (महीनां अपां शिशुः) मोठ्या जलांचा पुत्र असा जो सोम आहे तो (ऋतस्य दीधितिं हिन्वन्) यज्ञाच्या प्रकाशक अशा आपल्या रसाला प्रेरणा करीत आहे. (विश्वा प्रिया परिभुवत्) सर्व प्रिय हविमध्यें तो व्यापत आहे व (द्विता) भू व द्यु या लोकांमध्यें तो राहत आहे. ॥ ५ ॥

[५७१] हे (इन्दो) सोमा ! (देववीतये) देवांना देण्यासाठीं (ओजसा धाराभिः पवस्व) वेगानें व धारांनीं पात्रांमध्यें गाळला जा. हे (सोम) सोमा ! (मधुमान्) आनंद देणारा असा तूं (नः कलशं आ सद) आमच्या कलशामध्यें येऊन रहा. ॥ ६ ॥

[५७२] (पवमानः) शुद्ध होणारा (वाचः अग्रे) स्तोत्रपाठानंतर (कनिक्रदत्) शब्द करीत (पुनानः सोमः) गाळला जाणारा सोम (ऊर्मिणा) धारेनें (अव्यं वारं विधावति) मेंढीच्या केंसांच्या गाळणींमधून धांवत चालला आहे. ॥ ७ ॥

[५७३] (पुनानाय वेधसे सोमाय) पवित्र होणाऱ्या, कर्म करणाऱ्या सोमासाठीं (वचः प्रोच्यते) स्तुति स्तोत्रें म्हटलीं जात आहेत. (मतिभिः जुजोषते) स्तुतींनीं प्रसन्न होणाऱ्यासाठीं (प्र भर) विशेष स्तोत्रें म्हणा.

५७४ गोमन्न इन्दो अश्ववत्सुतः सुदक्ष धनिव । शुचिं च वर्णमधि गोषु धारय ॥ ९ ॥
(ऋ. ९।१०५।४)

५७५ अस्मभ्यं त्वा वसुविदमभि वाणीरनूषत । गोभिष्टे वर्णमभि वासयामसि ॥ १० ॥
(ऋ. ९।१०४।४)

५७६ पवते हर्यतो हरिरति ह्वरांसि रंह्या । अभ्यर्ष स्तोतृभ्यो वीरवद्यशः ॥ ११ ॥
(ऋ. ९।१०६।१३)

५७७ परि कोशं मधुश्चुतं सोमः पुनानो अर्षति । अभि वाणीर्ऋषीणां सप्ता नूषत ॥ १२ ॥
(ऋ. ९।१०३।३)

इत्यष्टमी दशतिः ॥ ८ ॥ दशमः खण्डः ॥ १० ॥ (स्व० ८ । उ० ३ । धा० ४६ । ठ ॥)

[९]

(१-८) १ गौरवीतिः शाक्त्यः; २ उर्ध्वसद्मा आङ्गिरसः; ३, ८ ऋजिश्वा भारद्वाज ; ४ कृतयशा आंगिरसः; ५ ऋणंचयो राजर्षिः; ६ शक्तिर्वासिष्ठः; ७ ऊरुरांगिरसः ॥ पवमानः सोमः ॥ ककुप्, ५ यवमध्या गायत्री ॥

५७८ पवस्व मधुमत्तम इन्द्राय सोम क्रतुवित्तमो मदः । महि द्युक्षतमो मदः ॥ १ ॥
(ऋ. ९।१०८।९)

---

[५७४] (सुदक्ष इन्दो) हे बलवान् सोमा ! (सुतः) रस काढल्यानंतर (नः) आम्हांला (गोमत् अश्ववत् धनिव) गाई व घोडे असलेलें धन दे. त्यानंतर (शुचिं वर्णं) शुद्ध वर्णाला (गोषु अधि धारय) गोदुग्धामध्यें प्राप्त कर. ॥ ९ ॥

गोदुग्धामध्यें सोमरस मिळवीन व त्याचा उत्तम रंग दिसेल असें करीन.

[५७५] हे सोमा ! (वसु-विदं त्वा) धन देणाऱ्या तुझी (अस्मभ्यं वाणीः अभि अनूषत) आम्हांला धन मिळावें यासाठीं आमच्या वाणी पुष्कळ स्तुति करीत आहेत. तसेंच आम्ही (ते वर्णं) तुझ्या रंगाला (गोभिः अभि-वासयामसि) गाईंच्या दुधानें आच्छादित करीत आहोंत. ॥ १० ॥

[५७६] (हर्यतः हरिः) प्रशंसनीय हिरव्या रंगाचा सोम (रंह्या ह्वरांसि अति पवते) उत्तम वेगानें कुटिल भागांना दूर करीत खालीं जात आहे. चोथा दूर करीत गाळला जात आहे. हे सोमा ! तूं (स्तोतृभ्यः) स्तोत्यांना (वीरवत् यशः) पुत्रयुक्त कीर्ति (अभ्यर्ष) दे. ॥ ११ ॥

[५७७] (पुनानः सोमः) गाळला जाणारा सोम (मधुश्चुतं कोशं परि अर्षति) मधुर रसाला कलशामध्यें सोडत आहे. या सोमाची (ऋषिणां सप्त वाणीः) ऋषींची सात छंदांची वाणी (अभि अनूषत) स्तुति करीत आहे. ॥१२।

॥ येथें दहावा खण्ड समाप्त झाला ॥

[११] एकादशः खण्डः ।

[५७८] हे सोमा ! (मधुमत्तमः) अति मधुर (क्रतु वित्तमः) यज्ञासंबंधीं सर्व कांहीं जाणणारा (महि द्युक्षतमः) मोठा तेजस्वी आणि (मदः) हर्ष वाढवणारा तूं (इन्द्राय मदः पवस्व) इन्द्राला आनंद देण्यासाठं पवित्र हो. ॥ १ ॥

५७९ अभि द्युम्नं बृहद्यश इषस्पते दिदीहि देव देवयुम् । वि कोशं मध्यमं युव ॥ २ ॥
(ऋ. ९।१०८।९)

५८० आ सोता परि षिञ्चताश्वं न स्तोममप्तुरꣳरजस्तुरम् । वनप्रक्षमुदप्रुतम् ॥ ३ ॥
(ऋ. ९।१०८।७)

५८१ एतमु त्यं मदच्युतꣳ सहस्रधारं वृषभं दिवोदुहम् । विश्वा वसूनि बिभ्रतम् ॥ ४ ॥
(ऋ. ९।१०८।११)

५८२ स सुन्वे यो वसूनां यो रायामानेता य इडानाम् । सोमो यः सुक्षितीनाम् ॥ ५ ॥
(ऋ. ९।१०८।१३)

५८३ त्वं ह्या३ङ्ग दैव्य पवमान जनिमानि द्युमत्तमः । अमृतत्वाय घोषयन् ॥ ६ ॥
(ऋ. ९।१०८।३)

५८४ एष स्य धारया सुतोऽव्या वारेभिः पवते मदिन्तमः । क्रीडन्नूर्मिरपामिव ॥ ७ ॥
(ऋ. ९।१०८।५)

---

[५७९] हे (इषस्पते) अन्नाच्या स्वामी (देव) प्रकाशमान् देवा सोमा ! (देवयुं) तूं देवतांना प्राप्त होणारा आहेस. तूं आम्हांस (द्युम्नं बृहत् यशः अभि दीदिहि) तेजस्वी श्रेष्ठ यश दे व (मध्यमं कोशं) मधल्या कलशामध्ये (वि युव) जाऊन रहा. ॥ २ ॥

[५८०] हे ऋत्विज हो ! (अश्वं न) घोड्याप्रमाणें वेगवान् (स्तोमं) स्तुतिला योग्य (अप्तुरं) जलाप्रमाणें वेगवान् (रजस्तुरं) प्रकाशाप्रमाणें त्वरा करणाऱ्या (वन-प्रक्षं) उदकाशीं मिश्रित (उद्-प्लुतं) जलाबरोबर मिश्रित सोमाचा (सोत) रस काढा (परि षिंचित) व त्यांत दूध मिसळा. ॥ ३ ॥

[५८१] (दिवः) दिव्य ऋत्विज (मदच्युतं सहस्रधारं) आनंदाचा प्रेरक व सहस्र धारांनीं भांड्यांत पडणाऱ्या (वृषभं) बलवर्धक (विश्वा वसूनि बिभ्रतं) सर्व धनांचें धारण करणाऱ्या (एतं त्यं उ) या त्या सोमाचा (दुहं) रस काढतात. ॥ ४ ॥

[५८२] (यः वसूनां) जो धनांना (यः रायां) जो दूध आदि पदार्थांना, (यः इडानां) जो भूमींना (यः सुक्षितानां) जो उत्तम मनुष्यांनां (आनेता) देणारा आहे (सः) त्या सोमाचा (सुन्वे) रस काढला आहे. ॥ ५ ॥

[५८३] हे (पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! (द्युमत्तमः) अत्यंत तेजस्वी असा (त्वं हि) तूं (दैव्यं जनिमानि) दिव्य जन्मांना जाणतोस व हे (अंग) प्रिया सोम ! तूं (अमृतत्वाय घोषयन्) अमरपणाची घोषणा करतोस. ॥ ६ ॥

[५८४] (मदिन्तमः) अत्यन्त आनंद देणारा (अपां ऊर्मिः इव क्रीडन्) जलांच्या लाटांप्रमाणें क्रीडा करीत (स्यः एषः सुतः) हा सोमरस (अव्याः वारेभिः) मेंढीच्या केंसांच्या गाळणींतून (धारया पवते) धारेनें कलशामध्ये गाळला जातो. ॥ ७ ॥

५८५ य उस्रिया अपि या अन्तरश्मनि निर्गा अकृन्तदोजसा ।
अभि व्रजं तत्निषे गव्यमश्व्यं वर्मीव धृष्णवा रुज । ओ३म् वर्मीव धृष्णवा रुज ॥ ८ ॥
(ऋ. ११।१०८।६)

इति नवमी दशतिः ॥ ९ ॥ एकादशः खण्डः ॥ ११ ॥ [स्व० ७ । उ० १ । धा० ४३ । चि ॥] इत्युष्णिक्ककुभः ॥

इति षष्ठप्रपाठकस्य द्वितीयोऽर्ध, षष्ठप्रपाठकश्च समाप्तः ॥ ६ ॥ इति पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

इति छन्दोगप्रकृतिऋक् समाप्ता ॥ इति सौम्यं पावमानं काण्डं पर्व वा समाप्तम् ॥

॥ इति पूर्वार्चिकः (छन्द आर्चिकः) समाप्तः ॥ पावमानकाण्डस्य मन्त्रसंख्या ११९

तत्र गायत्र्यः ४६७–५१० (४४), बृहत्यः ५११–५२२ (१२), त्रिष्टुभः ५२३—
५४४ (२२), अनुष्टुभः ५४५—५५३ (९), [तत्र ' आहर्यत ' इति ५५१ बृहती],
जगत्यः ५५४—५६५ (१२), उष्णिक्ककुभः ५६६—५८५ (२०), ११९

ऐन्द्रकाण्डस्य मन्त्रसंख्या	३५२
आग्नेयकाण्डस्य मन्त्रसंख्या	११४
सर्वयोगः	५८५

---

[५८५] (यः) जो (उस्रियाः अपि याः) पसरणाऱ्या जलवाहक (अश्मनि अन्तः) मेघांमध्यें (गाः) जलांना (ओजसा निरकृन्तन्) बलानें छिन्नभिन्न करीत तूं (गव्यं अश्व्यं व्रजं) गाई व घोडे यांच्या समूहांना (अभि तत्निषे) चारही बाजूंनीं घेरतोस. हे (धृष्णो) शत्रूंना भयभीत करणाऱ्या सोमा ! (वर्मी इव आरुज) कवच धारण करणाऱ्या वीराप्रमाणें तूं शत्रूंना नष्ट कर. ॥ ८ ॥

॥ येथें अकरावा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति पावमानं काण्डम् ॥

पावमान काण्ड

" पवमान " म्हणजे " शुद्ध होणारें, गाळलें जाणारें, गाळून ज्याचा चोथा बाहेर काढून टाकतात असें. " " पवमान " म्हणजे सोम गाळण्याचें ज्यांत वर्णन आहे तें सूक्त. पवमान सूक्त म्हणजे " सोमरस गाळून स्वच्छ करण्याचें वर्णन करणारें सूक्त होय. " पवमान या पदावरून " पावमान काण्ड " असें नांव या सामवेदाच्या काण्डास पडलें आहे. ऋग्वेदांतील नवम मंडलामध्यें पवमान सूक्तेंच आहेत. त्यांपैकीं कांहीं मंत्र घेऊन सामवेदाचें पावमान काण्ड बनलेलें आहे. या " पावमान काण्डा " मध्यें सोमरस गाळण्याचें व तो रस इंद्रादि देवतांना देण्याचें व नंतर ऋत्विजांनीं पिण्याचें वर्णन करणारे मंत्र आहेत.

" सोम " ही एक वल्ली आहे. तिचा रंग हिरवट आहे. हिचा रस काढावयाचा व तो देवांना देऊन नंतर ऋत्विजांनीं प्यावयाचा आहे.

सोमाचें उत्पत्तिस्थान

सोमवल्लीचें उत्पत्तिस्थान पर्वतावर उंच ठिकाणीं आहे. म्हणून त्यास—

१ गिरि-ष्ठाः अंशुः (४७३)- पर्वतावर राहणारी सोमवल्ली आहे, असें म्हटलेलें आहे.

२ ते अन्धसः जातं उच्चा दिवि [ऋ. ९।३१।१०] (४६७)- " अन्नरूप सोमवल्लीचें स्थान उंच ठिकाणीं द्युलोकांत आहे. ' यावरून पर्वतावर उंच ठिकाणीं सोमवल्ली उगवते असें दिसतें. तेथून ती वल्ली पृथिवीवर आणली गेली. पहा—

१ सत् उग्रं शर्म भूम्या ददे (४६७)- " तें सुख देणारें उग्र अन्न भूमीवर आणण्यांत आलें. " पर्वताच्या उंच भागीं उगवणारी ही सोमवल्ली तेथून यज्ञ करण्यासाठीं भूमीवर आणली गेली. ऋग्वेदामध्यें या सोमाला " मौजवान् " म्हटलें आहे—

सोमस्येव मौजवतस्य भक्षः ॥ (ऋ. १०।३४।१)

" मौजवान् पर्वतावर होणारें सोमरसरूपी अन्न हें जसें अत्यंत प्रिय असतें " या मंत्रावरून " **मौजवान्** " पर्वतावर सोम होतो तो उत्तम सोम आहे, असें म्हणतां येतें. मौजवान् हें एक हिमालयाचें शिखर आहे. त्यावर १२ हजार फूट उंचीवर सोमवल्ली उगवते ती उत्तम होय. वर ' **उच्चा दिवि** ' उंच द्युलोकामध्यें हें सोमरूपी अन्न उत्पन्न होतें असें म्हटलें आहे. द्युलोक हिमालय पर्वतावर १२ हजार फूट उंचीवर आहे असें समजलें जातें. " **त्रिविष्टप्** " या नांवावरून " **तिबेट** " हा शब्द अपभ्रंश होऊन झाला आहे. तें तिबेट हें स्थान १२ हजार फूट उंचीवर हिमालयांत आहे. त्रिविष्टप् हाच द्युलोक होय. स्वर्गही तोच प्रदेश आहे.

गंगा नदीला " **त्रि-पथ-गा** " असें नांव आहे. स्वर्ग, भूलोक व पाताळ या तीन ठिकाणीं ती वाहत आहे. हिमालयाच्या उंच प्रदेशांत गंगेचा उगम, भूमीवर ती वाहते व समुद्र सपाटीच्या प्रदेशांत ती सागरास मिळते. यावरूनही स्वर्ग हा हिमालयाचा उच्च प्रदेश आहे असें दिसतें. हाच द्युलोक व येथेंच सोमवल्ली उगवते ती श्रेष्ठ होय.

यज्ञ करणारे लोक या मुंजवान पर्वतावरची सोमवल्ली आणतात किंवा तेथील लोकांकडून ती विकत घेतात. विकत घेण्यासाठीं गाई देण्यांत येतात. ती सोमवल्ली जुड्यांमध्यें बांधून आणतात. ती लांकडाच्या फळ्यांवर ठेवण्यांत येते—

१ नप्त्योः हितः (४७६)–दोन फळ्यांवर तो सोम ठेवला जातो. या फळ्यांना " **अभिषवण फलक** " असें म्हणतात. याचा अर्थ " सोमरस काढण्याच्या फळ्या " असा आहे. या फळ्या दोन असतात. प्रत्येकीं फळीची लांबी व रुंदी ३६×१८ अंगुली अशी असते, दोन फळ्या जुळवून ठेवल्या म्हणजे ३६ अंगुली सम चौरस फळी होते. या फळ्यांवर कृष्णाजीन ठेवतात. त्यावर सोमवल्ली ठेवतात व नंतर ती दगडांनीं कुटतात.

२ चम्वोः सुतः (४९०)- दोन फळ्यांवर ठेवलेल्या सोमाचा रस काढला व तो दोन भांड्यांत भरून ठेवला.

दगडांनीं कुटतात

रस काढावयासाठीं सोमवल्ली दगडांनीं चांगली कुटावी लागते. त्या दगडांचें असें वर्णन केलेलें आहे —

१ कविक्रतुः, नप्त्योः हितः, दिवः प्रिया वयांसि, स्वानैः परियाति (४७६)- ज्ञानी व कर्मकुशल हा सोम, फळ्यांवर ठेवल्यानंतर द्युलोकांतील प्रिय पक्षी म्हणजे ते कुटण्याचे दगड, रस काढणाऱ्या अध्वर्यूंकडून, फिरवले जातात. अध्वर्यु म्हणजे यज्ञ करणारे त्या दगडांनीं सोमवल्ली कुटतात व तिचा रस काढतात. येथें दगडांना " **प्रिया वयांसि** " प्रिय पक्षी असें म्हटलेलें आहे. पर्वतावरून जशी सोमवल्ली आणतात तसे हे दगडही आणले जात. म्हणून सोमवल्लीवर बसणारे हे पक्षीच आहेत असें आलंकारिक भाषेंत म्हटलें आहे.

स्वानैः (**सुवानैः**)- रस काढणारे अध्वर्यु आदि याजक सोमवल्ली कुटतात व नंतर तिचा रस काढला जातो.

२ सोमं अद्रिभिः सुषाव (५१२)- सोमाचा रस दगडांनीं काढला. या ठिकाणीं " **अद्रिः** " पद पर्वतवाचक आहे. तें पद येथें पर्वतावरील दगडांचें वाचक मानलें आहे. येथें वेदवचनांतील एक प्रक्रिया दिसून येते. ती प्रक्रिया समजण्यासाठीं येथें कांहीं उदाहरणें देतों—

अंशासाठीं पूर्णाचा प्रयोग

दगड हा पर्वताचा अंश आहे. त्या अंशरूपीं दगडासाठीं पूर्ण पर्वताचा प्रयोग केला जातो. " **पर्वत** " म्हणजे पर्वताचा अंश " दगड " होय. अशा प्रयोगाचीं उदाहरणें पहा—

१ अद्रिभिः सुतः (४९९)-

२ अद्रिभिः स्वानः (५१३)- (**अद्रि**) पर्वतांनीं म्हणजे पर्वतावरील दगडांनीं कुटून सोमवल्लीचा रस काढला आहे. हा रस लांकडाच्या भांड्यांत ठेवला जातो. त्याचें वर्णन असें केलें आहे—

३ वनेषु सदः दधिषे (५१३)-

४ आसृज्यमानः हरिः कनिक्रन्ति, वनस्य जठरे

सीदन् (५३०)– वनामध्यें आपलें घर केलें. सोमाचा रस हिरव्या रंगाचा असतो. तो शब्द करीत वनाच्या पोटांत जाऊन बसतो. " वनेषु सद: " व " वनस्य जठरे " या वाक्यांचा अर्थ " वनामध्यें " वृक्ष असतात, त्या वृक्षांमध्यें लांकूड असतें, त्या लांकडांचें पात्र बनतें. म्हणून " पात्र " अंश आहे व " वन किंवा वृक्ष " पूर्ण आहेत. या अंशासाठीं पूर्णाचा प्रयोग येथें झाला आहे. यावरून " वनेषु सद: दधिषे " किंवा " वनस्य जठरे सीदन् " यांचा अर्थ लांकडाच्या भांड्यांत " सोमरस ठेवतात " असा आहे. ही वैदिक वर्णनाची शैली आहे. " वन " म्हणजे " लांकडाचें भांडें " अशी ही वेदाची परिभाषा आहे. ही नीटपणानें समजून घेतली पाहिजे. नाहींतर वेदमंत्रांचा अर्थ नीटपणें ध्यानीं येणार नाहीं व अर्थाचा अनर्थ होण्यासही वेळ लागणार नाहीं. यासाठीं याठिकाणीं आणखीं कांहीं उदाहरणें देतों. तीं अशीं आहेत—

५ कविः सिन्धोः ऊर्मौ अधिश्रितः (४८६)- ज्ञानी सिन्धुच्या लाटेच्या आश्रयानें राहिला. (कविः) ज्ञानी ज्ञानसंवर्धक सोमरस नदीच्या पाण्यांत मिसळला.

६ सोमासः अप ऊर्मयः प्र नयन्त (४७८)- सोमरस पाण्याच्या लाटांजवळ नेले गेले. सोमरस पाण्यांत मिसळले.

७ मृज्यमानः समुद्रे वाचं इन्वसि (५१७)- शुद्ध होत असतां समुद्रामध्यें शब्द करीत जातोस. सोमरस गाळला जात असतां पाण्याच्या भांड्यांत तो शब्द करीत पडतो. खालीं पाण्याचें भांडें असतें, त्याचा निर्देश " समुद्र " या पदानें केला आहे.

८ सोमासः समुद्रस्य विष्टपे अभि पवन्ते (५१८)- सोमरस समुद्राच्या वरच्या भागामध्यें गाळला जात आहे. सोमरस पाण्याच्या भांड्यांत गाळला जात आहे.

९ देवेभ्यः मत्सरः समुद्रः (५२१)- देवांसाठीं आनंद देणारा हा सोमरस समुद्रांत मिसळला आहे, किंवा याचा समुद्र झाला आहे. अर्थात् सोमरस पाण्यांत मिसळला आहे.

१० अत्यः न वृथा पाजांसि नदीषु कृणुते (५५८)- घोडा जसा सहज आपल्या शक्तिनीं नद्यांमध्यें स्नान करतो, त्याप्रमाणें हा सोमरस नद्यांमध्यें स्नान करतो, म्हणजे सोमरस पाण्यांत मिसळला जातो. याठिकाणीं " नदीषु " हें पद बहुवचनीं आहे. अनेक नद्यांमध्यें स्नान करतो. सोमरस पाण्यांत मिसळला जातो असें म्हणण्याऐवजीं " सोम नद्यांमध्यें स्नान करतो " असें वर्णन केलें आहे.

११ सिन्धूनां प्राणाः कलशान् अभि अचिक्रदत् (५५९)- नद्यांचे प्राण भांड्यांत शब्द करीत शिरले. याचा अर्थ नद्यांचें प्राणरूपी पाणी कलशांत भरलें गेलें. भरतांना पाण्याचा आवाज झाला.

१२ सिन्धोः उच्छ्वासे पतयन्तं उक्षणं हिरण्यपावः पशुं गृभ्णते (५६४)- नदीच्या पाण्यांत पडणाऱ्या बैलाला सोन्याच्या आभूषणानें सजविलेल्या हातानें पशु म्हणून घेतात. " उक्षा "- बैल, सोमरस; " पशु "- पशु, पाहणारा, चमकणारा. नदीच्या पाण्यांत सोम मिसळला जातो व तो तेथें चमकूं लागतो व त्यास सोन्याची आंगठी घातलेल्या हातानें गाळण्यांत येते. येथें " सिन्धोः उच्छ्वासे "-नदीच्या डोहांत हे शब्द नदीच्या पाण्यानें भरलेल्या भांड्यांसाठीं प्रयुक्त झाले आहे. " पशु " शब्द " चमकणारा सोमरस " या अर्थी वापरला आहे.

" पश्यति इति पशुः " जो पहातो तो पशु होय. पहाणें हें चमकणें आहे. रस चमकतो, तो आपल्या तेजानें सर्वांस पहात आहे. " उक्षाः "- बैल, बलवर्धन करणारा सोम.

याप्रमाणें " अंशासाठीं पूर्णाचा प्रयोग " वेदामध्यें शेंकडों ठिकाणीं आहे. तो समजून घेणें अत्यावश्यक आहे. याचीं उदाहरणें थोडींशीं आणखीं पहा—

दुधामध्यें सोमरसाचें मिश्रण

दुधामध्यें अर्थात् गाईच्या दुधांत सोमरस मिसळला जातो याचें वर्णन वेदामध्यें असें आढळतें—

१ सुजातं अप्तुरं गोभिः परिष्कृतं इन्दुं (४८७)- उत्तम प्रकारें तयार केलेला सोमरस (अप-तुरं) पाण्यांत त्वरेनें मिसळला व (गोभिः परिष्कृतं) गाईशीं मिसळला आहे. " गाईशीं मिसळला " याचा अर्थ " गाईच्या दुधामध्यें मिसळला " असा आहे. दूध हा गाईचा अंश आहे. त्या अंशासाठीं पूर्ण " गाई " चा प्रयोग केला आहे. तसेंच आणखी पहा—

२ हे इन्दो ! गाः अभि इहि (५०५)- हे सोमरसा ! तूं गाई जवळ जा म्हणजे तुझ्यांत गाईचें दूध मिसळ. याठिकाणीं " गाः " अनेक गाई असा शब्द प्रयोग " गाईच्या दुधासाठीं " केला आहे. तसेंच—

३ नृभिः यतः गाः निर्णिजं कुरुते (५३०)- मनुष्यांनीं

ऋत्विजांनीं दाबून काढलेला सोमरस गाईचें रूप धारण करतो. म्हणजे सोमरस गाईच्या दुधांत मिसळला जातो. " गाः निर्णिजं " गाईचें रूप याचा अर्थ " गाईच्या दूधाचें रूप " असा आहे. गो शब्द गोदुग्धाचा वाचक आहे, अंशासाठीं पूर्णाचा प्रयोग हा असा आहे. तसेंच आणखी पहा—

४ इन्दुं कलशे वावशानाः गावः आयन् (५३७)- सोमाजवळ कलशामध्यें इच्छा करणाऱ्या गाई आल्या. याचा अर्थ कलशामध्यें असणाऱ्या सोमरसामध्यें गाईचें दूध मिसळलें असा आहे. कलशामध्यें गाई जाऊंच शकत नाहींत. त्यांतहि एक गाय नव्हे तर अनेक गाई कलशांत जाणें अगदींच दुरापास्त आहे. पण येथें " दुधासाठीं गाईचा प्रयोग " झाला आहे.

५ शुचिं वर्णं गोषु अधि धारय (५७४)- शुद्ध वर्णाला गाईंमध्यें ठेव. सोमरसाच्या शुद्ध वर्णाला गाईच्या दुधामध्यें मिसळ. सोमरस व गोदुग्ध यांचें मिश्रण कर.

६ ते वर्णं गोभिः अभिवासयामसि (५७५)– तुझ्या-सोमाच्या रंगाला गाईंनीं आच्छादित करीत आहों. सोमरसामध्यें गाईचें दूध मिसळून त्याला दुधाचा पांढरेपणा आम्ही आणीत आहों.

७ रसः हरिः दिवः पवते (५७८)– हिरव्या रंगाचा सोमरस द्युलोकांतून गाळला जातो. वरच्या भांड्यांतील सोमरस गाळणींतून गाळला जात असतो. ' वरचें भांडें ' असें म्हणण्याच्या ऐवजीं " दिवः, द्युलोक " म्हणजे वरचें भांडें असें म्हटलें आहे. द्युलोक हा नेहमीं वरच असतो. यासाठीं वरच्या भांड्याचें ' द्यु ' हें सूचक मानलें गेलें.

या प्रमाणें " अंशासाठीं पूर्णाचा उपयोग " ही वैदिक प्रयोग पद्धति लक्ष्यपूर्वक पाहण्यासारखी आहे. ही विशेषता वेदमंत्रांतील वर्णनामध्येंच आहे.

सोमरसाला सुवर्णाचा स्पर्श

सोमवल्ली दगडांनीं कुटली जाते. हे दगड कुटण्याचें काम करण्यासाठीं वर पकडण्यासाठीं निमुळते केलेले असतात व खालच्या बाजूस कुटतां येण्याजोगे गोल असे केलेले असात. कुटल्यानंतर हाताच्या बोटांनीं नीट दाबून रस भांड्यांत घेतला जातो. यावेळीं हातामध्यें सोन्याची आंगठी असावी लागते. हें सोनें त्या रसाला लागावें म्हणजे रसामध्यें त्यापासून विशेष गुण उत्पन्न होतो म्हणून म्हटलें आहे—

१ हेमना पूयमानः देवः रसः देवेभिः समपृक्त (५२६)– सुवर्णानें पवित्र होणारा हा दिव्यरस देवांना देण्यांत येतो.

*

२ हिरण्य-पावाः (५६४)- सुवर्णानें पवित्र होणारा हा रस आहे.

याप्रमाणें हातांतील सुवर्णाची आंगठी त्या रसाला लागावी लागते, त्यामुळें या सुवर्णस्पर्शानें त्या रसामध्यें कांहीं विशेष गुण येत असणें स्वाभाविक आहे.

या कुटलेल्या सोमवल्लीला हातांच्या बोटांनीं दाबून त्याचा रस काढवा लागतो. त्याचें वर्णन असें आहे—

१ साकं उक्षः स्वसारः मर्जयन्तः, दश धीतयः धीरस्य धनुत्रीः (५३८)- एकत्र राहून कार्य करणाऱ्या बहिणी-हाताच्या अंगुली सोमाला शुद्ध करतात. सोमाला पिळून त्याचा रस काढतात. या दहा अंगुली धैर्यवान् सोमाला धरतात. हाताच्या बोटांनीं दाबून त्याचा रस काढतात. याप्रमाणें सोमवल्लीमधून रस निघतो.

सोमरसामध्यें पाणी मिळविलें जातें

वर लिहिल्याप्रमाणें सोमाचा रस काढल्यानंतर जो चोथा हातामध्यें राहतो त्याला " ऋजीष " असें नांव आहे. हा चोथा एका बाजूस करून रस घेतला जातो; मग हा रस गाळणी मधून गाळतात. या गाळण्यापूर्वीं त्यांत पाणी मिसळतात. या पाणी मिसळण्यासंबंधाचें वर्णन असें आहे—

१ अप्सु दक्षः (४७३)- पाण्यांत मिसळलेला सोमरस बल वाढवणारा होतो.

२ कविः सिन्धोः ऊर्मौ अधिश्रितः (४८६)- हा सोमरस ज्ञान वाढवणारा नदीच्या पाण्यांत मिसळला गेला आहे.

३ मानुषीः अपः हिन्वानः (४९३)- मानवांचें हित करणारें पाणी आहे, त्या पाण्यांत सोम मिसळला आहे.

४ महीः अपः वव्रिवांसं (४९४)- महत्त्वपूर्ण जलामध्यें सोम मिसळला गेला आहे.

५ विचर्षणिः हितः पवमानः अयं आप्यं बृहत् हिन्वानः सचेतति (५०८)- ज्ञानी हितकर शुद्ध केला जाणारा हा सोमरस मोठ्या जलामध्यें मिळाल्यानंतर तो चेतनाशक्ति वाढवणारा होतो. यावरून सोमाच्या दुप्पट अथवा तिप्पट जलामध्यें तो मिसळला जातो असें दिसतें. " बृहत् आप्यं हिन्वानः " अधिक जलामध्यें तो मिसळला जातो.

६ अप्सु अन्तः दधन्वान् (५१२)- पाण्यामध्यें सोमरस मिसळला जातो.

७ सुतं परि षिंचत (५१२)– सोमरसावर पाणी ओता. हें पाणी सोमरसापेक्षां अधिक असावें लागतें.

८ अर्णसा प्रपिप्ये (५१४)- पाण्यामध्यें सोम मिसळतो. " अर्णस " म्हणजे पाण्याचा समुद्र. समुद्रामध्यें मिसळतों याचा अर्थ पुष्कळ पाण्यांत सोमरस मिसळला जातो असा आहे.

९ देवेभ्यः मत्सरः समुद्रः विधर्मन् (५२१)- देवांना देण्यासाठीं हा आनंदवर्धक सोम पाण्यांत मिसळला आहे. असा मिसळल्यानंतर तो विशेष गुणधर्मांनीं युक्त होतो, म्हणजे पिण्याजोगा होतो.

१० वना वसानः रत्न-धा (५२८)- पाण्यांत मिसळलेला सोम रत्नाचें धारण करतो. तो चमकत असतो.

११ मधुमान् अपः वसानः (५३२)- मधुर सोम पाण्यांत मिसळला जातो.

१२ सरसि प्रधन्व (५४१)- पाण्यांत जाऊन मिसळ.

१३ अपां गर्भः सोमः महिषः (५४२)-पाण्यांत मिसळलेला सोम बलवान् आहे. पाण्यांत गर्भाप्रमाणें हा असतो म्हणजे पाणी अधिक व सोमरस थोडा असें हें मिश्रण असतें.

१४ रथ्ये यथा असर्जि (५४३)- युद्धामध्यें जसा घोडा पाठवला जातो त्याप्रमाणें सोम पाण्यांत सोडला जातो. पाणी अधिक व सोम थोडा असें हें मिश्रण असतें.

१५ अ-द्रुहः प्रियं काम्यं अभि नवन्ते (५५०)- द्रोह न करणारें पाणी प्रिय व इच्छा करण्यास योग्य सोमाशीं मिळून जातें. अर्थात् हें मिश्रण मनोहारि व उत्तम होतें.

१६ सिन्धूनां प्राणाः इन्द्रस्य हार्दि आविशन् (५५९)- नद्यांचे प्राण इन्द्राला प्रिय असणाऱ्या सोमामध्यें मिसळून गेले. इन्द्राला मनापासून आवडणारा सोमरस आहे, त्यांत नद्यांचे प्राण म्हणजे जल मिसळलें.

१७ अश्वं न अप्तुरं वनप्रक्षं उदप्रुतं सोत परि षिंचत (५८०)- घोड्याप्रमाणें पाण्यांत जाणारा, उदकाशीं मिश्रित होणारा सोम आहे. त्याचा रस काढा व त्यांत पाणी मिसळा.

१८ मदिन्तमः अपां ऊर्मिः इव क्रीडन् (५८४)- आनंद देणारा सोम पाण्याच्या लाटांबरोबर खेळतो. सोमरस पाण्यांत मिसळला जातो.

१९ समुद्रः गोपाः वृषा स्वानः (५२९)- पाण्यांत मिसळल्यानंतर, गाईच्या दुधांत मिसळल्यानंतर तो बल वाढवणारा होतो.

२० अपः वसानः पुनानः धारया अर्षति (५११)- पाण्यांत मिसळल्यानंतर गाळला जात असतां सोम धारेनें खालील भांड्यांत पडतो.

२१ अंशोः पयसा मधुश्चुतं कोशं अच्छ (५१४)- सोमाचें मिश्रण दुधाशीं झाल्यानंतर मधुररसाच्या भांड्यांत तो सरळ जावो.

याप्रमाणें सोमरसामध्यें पाणी मिसळतात व नंतर तो गाळला जातो असें दिसतें. प्रथम हातांनीं पिळून काढलेला सोमरस जाड असतो. त्यांत पाणी मिसळून तो पातळ होतो. त्यानंतर तो दशापवित्रानें गाळला जातो. हें दशापवित्र म्हणजे मेंढीच्या केंसाचें वस्त्र असतें. त्यांतून हा रस गाळला जातो व यामुळें त्यांतील बारीकसारीक कस्पटें त्यांत राहत नाहींत व तो पिण्यास योग्य असा होतो.

सोमरसाची गाळणी

सोमरस गाळण्याची गाळणी मेंढीच्या केंसांची विणलेली असते. या गाळणीचें वर्णन असें आढळतें —

१ वृषा देवयुः अव्या वारेभिः मंद्रया धारया पवस्व (५०६)- बल वाढवणारा देवांजवळ जाणारा सोमरस मेंढीच्या केंसांच्या गाळणीमधून मन्द धारेनें गाळला जावो.

२ सोतृभिः स्वानः अवीनां स्नुभिः अभियाति (५१५)- ऋत्विजांनीं काढलेला सोमरस मेंढीच्या तंतूमधून खालीं जातो.

३ अव्याः वारैः परि पुनानः (५१९)- मेंढीच्या केंसांतून गाळून रस खालीं पडतो.

४ पुनानः अव्यं वारं अत्येषि (५६२)- गाळला जात असतां तो रस मेंढीच्या केंसांच्या गाळणीमधून खालीं पडतो.

५ पुनानः सोमः ऊर्मिणा अव्यं वारं विधावति (५७२)- गाळला जात असतां सोमरस लाटांनीं मेंढीच्या छाननीमधून धावत जातो. लवकर खालीं गाळला जातो.

६ सुतः अव्या वारेभिः धारया पवते (५८४)- सोमरस काढल्यानंतर तो मेंढीच्या केंसांच्या गाळणीमधून धारेनें शुद्ध होत असतो.

७ सोमः पवित्रे पर्यक्षरत् (४७५)- सोमरस चाळणीमधून खालीं झिरपतो.

८ सहस्रधारः अव्यं अत्यर्षति (५२०)- हजार धारांनीं मेंढीच्या केंसांच्या चाळणीमधून खालीं पडतो.

९ पूतः अव्यं वारं अत्येषि (५३४)- शुद्ध होत असता तूं मेंढीच्या केंसांच्या चाळणीमधून खालीं पडतोस.

१० स्वादु अव्यं वारं अति पवताम् (५३५)- मधुर हा सोमरस मेंढीच्या केंसांच्या चाळणीमधून पडत जावो.

११ हरिं त्यं वारेण परि पुनन्ति (५५२)– हिरव्या रंगाच्या त्या सोमाला चाळणीमधून गाळतात.

१२ हरिः रह्यां ह्वरांसि अति पवते (५७६)– हा सोमरस आपल्यामधील चोथ्याचे कण दूर करीत शुद्ध होत आहे.

या वचनांवरून सोमरस गाळण्याची चांगली कल्पना येईल. मेंढीच्या केंसांची विणून केलेली ही गाळणी असते. ती भांड्यांच्या तोंडावर बांधतात व वरून एका भांड्यांतून बारीक धारेनें त्या गाळणीवर सोमरस पाण्यांत मिसळून ओतात. जीं काय सोमवल्लीचीं कस्पटें त्या रसांत राहिलेलीं असतील तीं या गाळणीवर राहतात व खालच्या भांड्यांत स्वच्छ व निर्दोष असा हा रस गाळलेला जमा होतो. गाळणीनें असा गाळल्याशिवाय हा रस कोणीहि कोणाला देत नाहीं. इन्द्रादि देवांना देण्यासाठीं तर हा फारच सावधपणानें हा गाळण्यांत येतो व त्यांत एकही कस्पट राहूं नये याची खबरदारी घेण्यांत येते. याप्रमाणें हा सोमरस गाळला जातो व त्यानंतर त्यांत दूध वगैरे मिसळण्यांत येतात. यासाठीं आधीं या गाळण्यासबंधानें मंत्रांत काय सांगितलें आहे तें पाहूं—

सोमरस गाळतांना शब्द होतो

कोणताही प्रवाही पदार्थ दुसऱ्या प्रवाही पदार्थांत ओतत असतांना शब्द होतोच. तसाच सोमरस गाळला जात असतांना शब्द होतो. खालील भांड्यांत पाणी असतें, त्यांत गाळणींतून सोम गाळला जातो. यामुळें आवाज होतो. त्याचें वर्णन असें वेदमंत्रांमध्यें केलेलें आढळतें—

१ हरिः कनिक्रदत् एति (४७१)– हिरव्या रंगाचा सोमरस शब्द करीत खालील भांड्यांत येतो.

२ सुतासः श्रवसे प्राक्रमुः (४७७)– सोमरस यशासाठीं भांड्यांत जातात.

३ सोमासः अपः ऊर्मयः प्र नयन्त (४७८)– सोमरस पाण्याच्या लाटांमध्यें नेले जातात. पाण्यांत मिसळले जातात.

४ सुतः वृषा पवस्व (४७९)– रस काढल्यानंतर बलवर्धक होण्यासाठीं गाळला जा.

५ पवमानः (४८०)– गाळला जाणारा सोमरस.

६ स्वानासः इन्दवः मधोः धारया मदाय परि अर्षंति (४८५)– रस काढलेला सोम मधुर धारेनें आनंद वाढवण्यासाठीं गाळला जातो.

७ कविः सिन्धोः ऊर्मौ अधिश्रितः परि प्रासिष्यत् (४८६)- ज्ञानवर्धक सोमरस नदीच्या पाण्यांत मिसळल्यानंतर खालील भांड्यांत उतरतो.

८ सुतः कलशं आविशत् (४८९)– सोमरस कलशामध्यें शिरत आहे.

९ सुतः पवित्रे असर्जि न्यक्रमीत् (४९०)– सोमरस गाळणीमधून गाळला जात आहे.

१० भूर्णयः त्वेषा अयासः कृष्णां त्वचं अपघ्नन्तः प्राक्रमुः (४९१)– त्वरेनें जाणारे तेजस्वी गतिशील आपली काळी साल दूर फेंकून भांड्यांत गाळले जात आहेत.

११ अया पवस्व (४९३)– या धारेनें गाळला जा.

१२ अया वीती पवस्व (४९५)– या रीतिनें शुद्ध हो.

१३ स्वानः पवित्रे आ अर्ष (४९६)– रस काढल्यानंतर गाळणीमधून गाळला जा.

१४ वृषा हरिः कनिक्रदत् (४९७)– बल वाढवणारा हा हिरव्या रंगाचा सोम शब्द करीत गाळला जात आहे.

१५ पवित्रे आनय, इन्द्राय पातवे पुनीहि (४९९) – गाळणीमध्यें सोमरस घाल, इन्द्राला पिण्यासाठीं पवित्र हो. गाळला जा.

१६ द्रोणानि रोरुवत् अर्ष (५०३)– भांड्यांत शब्द करीत जा.

१७ मनीषिभिः मृज्यमानः धारया पवस्व (५०५) – बुद्धिवान् ऋत्विजांकडून शुद्ध होणारा तूं धारेनें गाळला जा.

१८ इन्द्रस्य निष्कृतं गच्छन् पवते (५१०)– इन्द्राच्या स्थानाजवळ पिण्यासाठीं शुद्ध होत आहे.

१९ अव्यया वाराणि तिरः आ पवसे (५१३)– मेंढीच्या केंसांच्या चाळणींतून सोमरस शुद्ध होत आहे.

२० हरिः चम्वोः, पुरि जनः न, विशत् (५१३)– हिरव्या रंगाचा सोमरस भांड्यांत, नगरींत मनुष्य जावा तसा जात आहे.

२१ सुहस्त्या मृज्यमानः समुद्रे वाचं इन्वति (५१७) उत्तम हातांनीं काढलेला व गाळलेला हा सोमरस समुद्रांत शब्द करीत प्रविष्ट होतो. खालच्या भांड्यांतील पाण्यांत मिसळला जात आहे.

२२ धारया पवित्रं असृक्षत (५२२)– धारेनें गाळणींतून खालीं येत आहे.

२३ प्रद्रव कोशं परि निषीद (५२३)– भांड्यांत जा व बैस.

२४ वराहः रेभन् पदा अभ्येति (५२४)- उत्तम दिवशीं शब्द करीत पात्रामध्यें जात आहे.

२५ सुतः रेभन् पवित्रं पर्येति (५२५)- सोमरस शब्द करीत गाळणींतून खालीं येतो.

२६ मधुमान् वृषा पवित्रं पर्यक्षाः (५३१)- मधुर व बल वाढवणारा रस गाळणींतून टपकत आहे.

२७ अधिसानौ अव्ये पवस्व (५३२)- उंच ठिकाणीं असणाऱ्या मेंढीच्या केसांच्या छाननीमधून गाळला जा.

२८ मत्सरः घृतवन्ति द्रोणानि अवरोह (५३२)- आनंद देणारा सोमरस जलयुक्त पात्रांत उतरो.

२९ मधुमतीः धाराः प्रासृग्रत (५३४) - मधुर धारा वाहोत.

३० देवः इन्दुः कलशं अति आसीदतु (५३५)- तेजस्वी सोमरस कलशामध्यें जाऊन बसो.

३१ धियः अधिस्पर्धते (५३९)-अंगुली रस काढण्याची स्पर्धा करीत आहेत.

३२ सोम पुनानः अर्षति (५४६)- सोम गाळला जात असतां भांड्यांत जातो.

३३ स्वानाः स्वर्विदः इन्दवः सोमा पवन्ते (५४८) - रस काढल्यानंतर हे तेजस्वी सोमरस गाळले जात आहेत.

३४ वनोहितः प्रियाणि नामानि अभि पवन्ते (५५४)- अन्नासारखा हितकारक सोम प्रिय जलांमध्यें मिसळून गाळला जात आहे.

३५ येषु यह्वः अभिवर्धते (५५४)- ज्या जलांमध्यें मिसळल्यामुळें सोमरस वाढतो.

३६ एष कोशे प्र अचिक्रदत् (५५६)- हा सोमरस भांड्यांत शब्द करीत शिरतो.

३७ शतयामना पथा कलशे सं अर्षति (५५७)- शंभर छिद्रें असलेल्या गाळणीच्या मार्गानें हा कलशामध्यें जात आहे.

३८ पवमानः कनिक्रदत् (५७२)- सोमरस गाळला जात असतांना शब्द करतो.

३९ पुनानः सोमः मधुश्चुतं कोशं परि अर्षति (५७७)- गाळला जात असतां सोमाचा मधुररस ज्यांत गाळला जातो त्या भांड्यांत जातो.

४० मध्यमं कोशं वि युव (५७९)- मधल्या भांड्यांत मिसळ.

याप्रमाणें सोम गाळला जातो त्याचें वर्णन आहे. वरच्या भांड्यांतील सोमरस मेंढीच्या केसांच्या गाळणींतून खालील पाण्याच्या भांड्यांत गाळला जातो, तेव्हां गाळीत असतांना त्याचा शब्द होत असतो. हें वर्णन वरील मंत्रांत अनेक प्रकारांनीं केलेलें आहे. तें पाहिलें म्हणजे या गाळण्याच्या प्रक्रियेची उत्तम माहिती होईल.

सोमरस दुधांत मिसळतात

सोमरस पाण्यांत मिसळून गाळतात व नंतर तो दुधांत मिसळला जातो. या संबंधाचें वर्णन वेदमंत्रामध्यें असें आहे-

१ सु-जातं अप्तुरं गोभिः परिष्कृतं इन्दुं देवाः उप अयासिषुः (४८७)- उत्तम प्रकारें तयार केलेल्या सोमरसांत पाणी मिसळलें व नंतर गाईच्या दुधांत तो रस मिसळला म्हणजे सर्व देव त्या सोमाकडे जातात. यावरून सर्व प्रक्रिया ध्यानांत येते. प्रथमतः सोमाचा रस काढवा, नंतर त्यांत पाणी मिसळावें, पुढें तो गाळवा व त्यानंतर त्यांत गाईचें दूध मिसळावें, म्हणजे तो पिण्याजोगा होतो.

२ रुचा गाः अभि इहि (५०५)- सोमरस चमकूं लागला म्हणजे मग तो गाईच्या दुधाजवळ जातो, म्हणजे तो गाईच्या दुधांत मिसळला जातो.

३ सोमः गव्यन् (५३३)- सोम गाईच्या दुधांत मिसळतो.

४ हे पवमान ! धाम पवसे (५३४)- हे सोमरसा ! तूं दुधामध्यें मिसळला जात आहेस. आपलें स्थान पवित्र करीत आहेस. दूध मिसळल्यानंतर सोमाचें घर पवित्र होतें.

५ कलशे इन्दुं वावशानाः गावः आयन् (५३७)- सोमरसाजवळ कलशामध्यें इच्छा करणाऱ्या गाई आल्या; म्हणजे सोमरसामध्यें गाईचें दूध मिसळलें.

६ शुक्लाः असुराय निर्णिजे वयन्ति (५५१)- पांढऱ्या रंगाचें गाईचें दूध बलवान् सोमाच्या रूपाला स्वच्छ करण्यासाठीं आच्छादित करतें. दूध सोमांत मिसळलें जातें.

७ सुदुघः घृतश्चुतः वाश्राः पयसा धेनवः अभि अर्षन्ति (५५६)- उत्तम दूध देणाऱ्या तूप ज्यांतून स्रवत आहे अशा हंबारव करणाऱ्या गाई सोमाजवळ येत आहेत, म्हणजे सोमरसामध्यें गाईचें दूध मिसळलें जात आहे.

८ अस्मै त्रिसप्त धेनवः आ शिरं दुदुहिरे (५६०)- या सोमासाठीं २१ गाई दूध देत असतात. हें गाईचें दूध सोमरसामध्यें मिसळलें जात आहे.

९ धेनवः वचनवन्तः उस्रियाः ऊधभिः परिस्नुतं निर्णिजं धिरे (५६३)- गाई हंबरडत आपल्या दुग्धाशया-

मधून टपकणाऱ्या दुधानें सोमाच्या रूपाला धारण करतात, म्हणजे दुधामध्यें सोम मिसळून त्या सोमाचा श्वेत रंग करतात.

१० शुचिं वर्णं गोषु अधिवारय (५७४)- शुद्ध वर्णाला गाईंमध्यें धारण कर. सोमरस गाईंच्या दुधामध्यें मिसळला जाऊन स्वच्छ रंग धारण करो.

११ ते वर्णं गोभिः अभिवासयामसि (५७५)– तुझ्या-सोमाच्या रंगाला आम्ही गाईच्या दुधानें आच्छादित करतों. म्हणजे सोमरसाचा हिरवा रंग गाईच्या दुधानें आच्छादला जाऊन तो सफेद दिसूं लागतो.

याप्रमाणें गाईचें दूध सोमरसामध्यें मिसळल्यावर तो हिरव्या रंगाचा सोम पांढरा दिसूं लागतो व चमकूं लागतो. यानंतर तो प्याला जातो. पिण्याच्या पूर्वीं त्यांत मध घालतात, जवाचा आटा हवा तर मिसळतात. जंव भाजून त्याचें चूर्ण मिसळतात व मग तो पितात.

या स्थितींत तो चमकतो. त्याचें वर्णन असें आहे—

सोमरस चमकूं लागतो

सोमरस पाण्यांत व दुधांत मिसळल्यानंतर चमकूं लागतो. स्वभावतःहि तो चमकतच असतो, यावरून त्यांत फास्फरसा-सारखा पदार्थ असावा असें दिसतें. त्याच्या चमकण्याचा हा गुण फार महत्त्वाचा आहे. त्यामुळेंच त्याला बुद्धिवर्धक, उत्साहवर्धक, आनन्दवर्धक म्हटलें आहे. आतां तो चमकतो याविषयींचें वर्णन पहा—

१ स्वर्दृशं भानुना द्युमन्तं हवामहे (४८०)–स्वतः तेजस्वी व आपल्या तेजानें चमकणाऱ्या सोमरसाला आम्ही बोलावीत आहों. आम्हीं त्याची स्तुति करीत आहों.

२ देवः पवस्व (४८३)- चमकणारा सोम शुद्ध होवो, तूं गाळला जा.

३ पवमानः वैश्वानरं ज्योतिः दिवः चित्रं अजीजनत् (४८४)– गाळला जाणारा हा सोमरस सर्व मनुष्यांचें हित करणारा, तेजस्वी, द्युलोकांत चमकणारा उत्पन्न झाला आहे.

४ आयवः रुचे सूर्यं जनन्त (५०२)- मनुष्यांनीं-ऋत्विजांनीं तेजासाठीं सूर्य-सोम-उत्पन्न केला आहे.

५ द्युमत्तमः (५०३)– सोम अति तेजस्वी आहे.

६ हे देव! वृषा द्युमान् असि (५०४)–हे प्रकाशमान् सोमा ! तूं बल वाढवणारा व तेजस्वी आहेस.

७ हिरण्ययः देवः (५११)- हा सोन्यासारखा चमकणारा आहे.

८ रभसानि वस्त्रा आदत्ते (५३३)– तेजस्वी वस्त्रें धारण करतो. तेजस्वी दिसतो.

९ अर्कैः सूर्यं आपिन्वः (५३४)- तेजानें सूर्याला भरतो. सूर्याला तेज देतो. इतका हा सोमरस तेजस्वी दिसतो.

१० सोमः उभे रोदसी व्यख्यत् (५४६)– सोमरस दोनही लोकांना - द्यावापृथिवींना - तेजस्वी करतो.

११ विचक्षणः सूर्यस्य रथं अधि आरुहत् (५५४)– हा ज्ञानी सोमरस सूर्याच्या रथावर चढला म्हणजे यानें सूर्याचें तेज वाढवलें. अर्थात् हा स्वतः तेजस्वी आहे.

१२ राजा इव दस्मः (५६२)– राजासारखा हा दर्शनीय तेजस्वी दिसतो.

या प्रमाणें सोमरस आपल्या तेजानें चमकतो, याविषयींचें वर्णन वेदमंत्रांत आलेलें आहे. आतां याचे दुसरे गुण आहेत ते पहा—

उत्साह वाढवणारा सोम

सोमरस चमकतो, म्हणजे त्याच्यांत स्वतःचें तेज आहे. असा कांहीं पदार्थ त्याच्यामध्यें आहे ज्यामुळें तो चमकत असतो. त्याच्या चमकण्याच्या गुणामुळेंच तो उत्साह वाढवणारा आहे. पहा—

१ चेतनः प्रियः इन्दुः (४८१)– हा सोमरस चेतना वाढवणारा आहे. यामुळें तो सर्वांस प्रिय होत असतो.

२ वाजिनः आशवः सोमासः प्रासृक्षत (४८२)– बलवर्धक व उत्साहवर्धक सोमरस गाळले जात आहेत.

३ मदिरः जागृविः (५१४)– आनंद वाढवणारा व उत्साह वाढवणारा, जागृत ठेवणारा हा सोम आहे.

४ मदाय पवते (५४०)– आनंद वाढवणारा हा सोम शुद्ध केला जात आहे.

याप्रमाणें सोमरस उत्साह वाढवणारा आहे यासंबंधींचें वर्णन आहे. ज्यामुळें तो चमकतो, त्याच कारणामुळें तो उत्साह वाढवतो. असो. आतां त्याच्या आनंदवर्धक गुणाचें वर्णन पहा—

आनंद वाढवणारा सोम

१ मदेषु सर्वधा असि (४७५)– आनंद देणाऱ्या-मध्यें सोमरस हा सर्वांत अधिक आनंद देणारा आहे.

२ ते मदः इन्द्रं गच्छतु (४८३)- तुझा आनंद वाढवणारा गुण इन्द्राला प्राप्त होवो.

३ मत्सरः क्रतुवित् पवसे (४९२)- आनंद वाढवणारा सोमरस गाळला जात आहे.

४ सुतस्य अन्धसः धारा मन्द्री (५००)- सोमरसरूपी अन्नरसाची धारा आनंद देणारी आहे.

५ मन्दानः वृषायसे (५०७)- हे सोमा ! तूं आनंद वाढवणारा व बल वाढवणारा आहेस.

याप्रमाणें सोमरस हा आनंद वाढवणारा असल्याचें वर्णन आहे.

बुद्धिवर्धक सोम

आतां सोम हा बुद्धिवर्धक असल्याचें वर्णन पहा—

१ कविः (४८६)- ज्ञानी, बुद्धिमान्, क्रान्तदर्शी.

२ कवीनां मतिः (४८१)- ज्ञानी लोकांची बुद्धि वाढवणारा.

३ कविक्रतुः (४७६)- ज्ञानी व कर्म जाणणारा.

४ विप्रः अभवः (५१९)- सोम ज्ञानवर्धक आहे.

५ पुरुमेधाः (५१४)- पुष्कळ बुद्धिमान्.

६ सोमासः विपश्चितः (४७६)- सोमरस बुद्धि वाढवणारा आहे.

७ मनीषिणः सोमासः (५१८)- बुद्धि वाढवणारे सोमरस आहेत.

याप्रमाणें सोमरस बुद्धि वाढणारे आहेत असें वर्णन आहे.

बलवर्धक सोम

सोमरस प्याल्यावर बल वाढतें याविषयींचें वर्णन पहा—

१ दक्षसाधनः (४७४)- सोमरस बल वाढवणारा आहे. बल वाढवण्याचें तें साधन आहे.

२ वृषा असि (४८०)- तूं बलवान् आहेस.

३ वृषा वृषव्रतः (५०४)- सोम बलवान् आहे व त्याचें व्रत बल वाढवणें हें आहे.

४ ते दक्षं बलं आवृणीमहे (४९८)- तुझें सामर्थ्य व बल आम्ही स्वीकारीत आहों.

याप्रमाणें सोम हा बल वाढवणारा आहे असें वर्णन आहे.

स्वादिष्ट व मधुर सोम

सोम हा स्वादिष्ट आहे व हर्ष वाढवणारा आहे असें वर्णन आहे. पहा—

१ स्वादिष्ठया मदिष्ठया धारया पवस्व (४६८)- स्वादिष्ट व उत्साहवर्धक धारेनें सोमरस गाळला जात आहे. यांत सोमरस हा अत्यंत स्वादिष्ट आहे व हर्ष वाढवणारा आहे असें म्हटलें आहे.

२ तेन अन्धसा पवस्व (४७०)- सोमामध्यें अन्न सत्त्व आहे व तें सुखदायक आहे.

३ मधुमत्तमः (४७२)- तो अत्यंत मधुर आहे.

४ एष मधुमान् (५५६)- हा मधुर आहे.

असा हा सोमरस आहे. स्वादिष्ट व मधुर आहे. यामुळें तो लोकप्रिय झाला आहे.

मनुष्याचें कल्याण करणारा सोम

सोम मनुष्याचें कल्याण करतो म्हणून त्याला ५१२ "नर्यः" मानवांचें हित करणारा असें म्हटलें आहे.

दुष्टांचा नाश करणारा सोम

सोम शूरांचा उत्साह वाढवतो, त्यांचें बल व शौर्य वाढवतो. यामुळें शूर सोमरसाचें पान करतात व ते शौर्य-वीर्य-धैर्याचीं कामें करूं शकतात. यामुळें दुष्टांचा नाश होतो. याविषयींचें मंत्र भाग आतां पहा—

१ अघ-शंस-हा (४७०)- पापासाठीं ज्याची प्रसिद्धि आहे त्याचा नाश करणारा सोम आहे. सोमरस प्याल्यानें वीरांमध्यें उत्साह वाढतो व तो उत्साह पापीलोकांचा नाश करतो.

२ अ-राव्णः अपघ्नन् (५१०)- दान न देणारे असतात, जे अनुदार असतात त्यांचा नाश करणारा सोम आहे.

३ विश्वाः द्विषः अप जहि (४७९)- सर्व द्वेष करणारांचा पराभव कर.

४ विश्वाः मृधः अभ्यक्रमीत् (४८८)- सर्व दुष्टांचा नाश कर.

५ मृधः अपघ्नन् (४९२)- शत्रूंना मारतो.

६ अदेवयुं जनं नुदस्व (४९२)- देवांची भक्ति न करणाऱ्या दुष्टांना दूर घालव.

७ ते मदेषु नवतीः नव अवाहन् (४९५)- तुझ्या पानानें उत्साह वाढवल्यानें शत्रूचीं नव्वद व नऊ शहरें पादाक्रांत केलीं.

८ सेनानीः शूरः सोमः रथानां अग्रे प्रैति, अस्य सेना हर्षते (५३३)- सेनासंचालक शूर सोम रथांच्या अग्रभागीं जातो व याच्या सेना हर्षित होतात सोमरस प्याल्यानें असें बल वाढतें.

९ रक्षः हन्ति, अरातीः परि बाधते (५४०)- राक्षसांना मारतो व दुष्टांना पीडा देतो. असा हा सोम आहे.

१० वृत्राय हन्तवे इन्द्रं आविथ (४९४)- वृत्राला मारण्यासाठीं इन्द्राचें बल वाढवलें. सोमरस प्याल्यामुळें वृत्राला मारण्याचें सामर्थ्य इन्द्रामध्यें वाढलें.

सोम प्याल्यामुळें शूर सैनिक अशीं कार्यें करूं शकतात.

इन्द्रासाठीं सोमरस

इन्द्रामध्यें सोमरस पिऊन शौर्य वाढतें व तो राक्षसांचा वध करण्यास समर्थ होतो. म्हणून इन्द्राला सोम देण्याचा परिपाठ आहे. पहा—

१ इन्द्राय पातवे सुतः (४६८)–इन्द्राला पिण्यास देण्यासाठीं हा सोमरस काढला आहे.

२ इन्दु इन्द्राय धीयते (४८९)- सोमरस इन्द्रासाठीं आहे.

३ मधुमत्तमः द्युक्षतमः मदः इन्द्राय पवस्व (४७८)- अत्यंत मधुर तेजस्वी व आनंद वाढवणारा हा सोमरस इन्द्रासाठीं गाळून ठेव.

४ मरुत्वते इन्द्राय पवस्व (४७२)- मरुतांच्या सेनेसह इन्द्राला हा सोमरस गाळून ठेव. इन्द्राला हा प्यावयास दे व त्याबरोबर त्याचे सर्व सैनिकही हा रस पीवूं देत. म्हणजे सर्व उत्साहित होऊन शत्रूंचा नाश करतील.

५ सुतासः पवित्रवन्तः इन्द्राय क्षरन् (५४७)– सोमरस गाळले गेल्यानंतर इन्द्राला दिले जातात.

६ इन्दुः इन्द्रस्य निष्कृतं प्र अयासीत्, सख्युः संगिरं न प्रमिनाति (५५७)–सोमरस इन्द्राच्या पोटांत जातो व तेथें मित्राच्या पोटांत तो कांहीं एक त्रास देत नाहीं, सोमरस प्याला असतां इन्द्राला कांहीं त्रास होत नाहीं.

सोमरस इन्द्रालाच एकटयाला दिला जातो असें नाहीं तो सर्व देवांना दिला जातो. पहा—

७ देवेभ्यः पीतये पवस्व (४७४)– देवांना पिण्यास देण्यासाठीं हा सोमरस गाळ.

८ मदाः देवान् गच्छन्तु (५४७)–सोमरस देवांना द्या.

९ विश्वान् देवान् मदेन सह परि गच्छति (५५२)– सर्व देवांजवळ सोमरस आपल्या आनंदवर्धक गुणासह जातो.

याप्रमाणें सर्व देव सोमरस पितात व त्यामुळें ते उत्साही व आनंदी राहतात.

सोम धन देतो

सोम हा धन देणारा आहे. याविषयीं पुढें दिलेले मंत्रभाग पहा—

१ रत्नधाः (५११)– सोम रत्न देणारा आहे.

२ वार्याणि दयते (५२९)– सोम धनें देतो.

३ सहस्रदाः शतदाः भूरिदावा वाजी (५३१)– सहस्र, शेंकडों अथवा पुष्कळ धन देणारा बलवान् सोम आहे.

४ शतस्पृहं, सहस्रभर्णसं तुविद्युम्नं रयिं न अभ्यर्ष (५४९)- शेंकडोंनीं इच्छा करण्याजोगें, सहस्रांचें पोषण करणारें तेजस्वी धन आम्हांला दे.

५ पिशंगं बहुलं पुरुस्पृहं रयिं अभ्यर्षसि (५१७) पिवळें पुष्कळ पुष्कळांनीं इच्छा करण्याजोगें धन तूं देतोस.

६ सहस्रिणं सुवीर्यं रयिं आ पवस्व (५०१)– सहस्रावधि उत्तम पराक्रम करणारें धन आम्हांला दे.

७ नः महे तुने प्र अर्षसि (५०९)– आम्हांला पुष्कळ धन मिळावें म्हणून तूं गाळला जात आहेस.

सोम धन देतो, याचा अर्थ सोमयाग करणाऱ्या यजमानाला लोकांकडून धन मिळतें. यज्ञयाग हें मोठें पवित्र कार्य आहे, त्याच्या सिद्धतेसाठीं फार खर्च होतो. तो धनरूपानें धनिकांकडून मिळतो.

वेदमंत्रांचें गान

सोमाचा रस काढीत असतांना वेदमंत्रांचें गायन चालत असतें, त्यासंबंधीं निर्देश असे आहेत. ते पहा—

१ तिस्रः वाचः उदीरते (४७१)– तीन वेदांचें पठन होत आहे.

२ पुनानाय प्रगायत (५६८)– सोमरस गाळला जात असतां वेदमंत्रांचें गायन करा.

३ पुनानं तं अभिगायत (५६८)– सोमरस गाळीत असतां वेदमंत्रांचें गायन करा.

४ ऋषीणां सप्तवाणीः अभि अनूषत (५७७)– ऋषींची सात छंदांतील वाणी - वेदपाठ म्हणा.

५ इन्द्रवाहान् भद्रान् कृण्वन् (५३३)– इन्द्राच्या कल्याण करणाऱ्या स्तुतीचें गायन करा.

६ विप्रं धीतिभिः शुम्भन्ते (४८८)– ज्ञानी सोम गाळण्याच्यावेळीं स्तोत्रांनीं शोभा वाढवली जाते.

७ बर्हणा गिरा (४८५)– मोठ्यानें गाइलेल्या स्तोत्रांनीं मंत्र बोलले जातात.

अशा रीतिनें वेदपाठ चालले असतांना सोमरस गाळला जातो.

यज्ञकर्त्यांची संघटना

सोम हा यज्ञकर्त्यांची संघटना करतो, याविषयीं हा मंत्र पहा—

१ पुरुस्पृहं कारूं बिभ्रत् (४८६)- अनेक ज्याची प्रशंसा करतात त्या यज्ञकर्त्यांना हा सोम संगठित करतो. यज्ञ करण्यानें मोठी संघटना होते. यज्ञ हें संगतिकरणाचें एक मोठें साधन होतें.

कुत्र्याला दूर करा

यज्ञांत कुत्र्याला येऊं देऊं नका असें म्हटलें आहे. ते मंत्र पहा—

१ श्वानं अप हत (५५३)- कुत्र्याला दूर करा.

२ सुताय दीर्घजिव्हं श्वानं अपश्नथिष्टन (५४५)- सोमरसाकडे मोठ्या जिभेच्या कुत्र्याला जाऊं देऊं नका.

याप्रमाणें यज्ञमंडपांत कुत्र्यानें सोमरसाजवळ येऊं नये असें स्पष्ट सांगितलें आहे.

उपमा

या पावमान काण्डामध्यें पुढील उपमा आल्या आहेत व त्या उपमांनीं जें ज्ञान दिलें आहे तें त्याच्या दिलेल्या अर्थावरून वाचकांच्या ध्यानीं येईल—

१ श्येनः न गिरिष्ठाः अंशुः योनिं आ सदत् (४७३)- श्येन पक्ष्याप्रमाणें पर्वतावर राहणारा सोम यज्ञशाळेंत येऊन बसतो. श्येन पक्षी पर्वतावर असतो, तसा सोम पर्वतावर असतो. तेथून श्येन पक्षी उडून स्वस्थानीं जातो, तसा सोम यज्ञशाळेंत येतो.

२ महिषा वनानि इव, सोमासः अप ऊर्मयः प्र नयन्त (४७८)- रेडे वनांत जाऊन पाणी पितात, त्याप्रमाणें सोम पाण्यांत मिसळले जातात. रेडे बलवान् असतात तसे सोमरस बलवान् असतात.

३ रथीः अश्वं इव, इन्दुः पविष्ट असृजत् (४८१) - ज्याप्रमाणें रथांत बसणारा घोड्याला हांकतो, त्याप्रमाणें सोम गाळला जात असतां तो खालील भांड्यांत उतरतो.

४ पवमानः दिवः चित्रं ज्योतिः, तन्यतुं न, अजीजनत् (४८४)- गाळला जाणारा सोम, द्युलोकांतील चमकणाऱ्या विजेप्रमाणें, चमक उत्पन्न करतो.

५ यथा रथ्यः, चम्वोः सुतः पवित्रे असर्जि (४९०)- ज्याप्रमाणें रथाचा घोडा सोडतात, त्याप्रमाणें भांड्यांतील रस गाळणींतून खालीं गाळला जातो. खालीं सोडला जातो.

६ त्वेषाः अयासः, गावः न, प्र अक्रमुः (४९१)- तेजस्वी प्रगमनशील सोमरस, गाई गोठ्यांत जातात त्याप्रमाणें, यज्ञमंडपांत जातात.

७ यथा सूर्यं अरोचयः, अपः हिन्वानः (४९३)- ज्याप्रमाणें सूर्याला प्रकाशित केलेंस, त्याप्रमाणें पाण्यांत जाऊन तूं तेजस्वी झालास.

८ महान् मित्रो न दर्शत, सूर्येण सं दिद्युते (४९७)- मोठ्या मित्राप्रमाणें दर्शनीय सोमरस सूर्यासारखा प्रकाशतो.

९ हरि चम्वोः, पुरि जनः न, विशत् (५१३)- हिरव्या रंगाचा सोम भांड्यांत, नगरामध्यें मनुष्य जातो त्याप्रमाणें, जातो.

१० मदिरः न जागृविः (५१४)- आनंदित असल्याप्रमाणें जागृत आहेस.

११ अश्वया इव हरिता धारया याति (५१६)- घोडीप्रमाणें हा सोम हिरव्या रंगाच्या धारेनें भांड्यांत जातो. घोडी जशी एका रेषेनें चालते तसा हा सोमरस धारेनें भांड्यांत पडतो.

१२ हयाः पवमानाः, मत्सराः धारया पवित्रं असृक्षत (५२२)- घोडे जसे धुतले जातात, त्याप्रमाणें सोमरस एका धारेनें गाळून शुद्ध केले जात आहेत.

१३ वाजिनं अश्वं न, त्वा मर्जयन्तः (५२३)- बलवान् घोड्याला धुतात, त्याप्रमाणें सोमाला गाळून स्वच्छ करतात.

१४ अत्यः वाजी न, हरिद्रोणं ननक्षे (५३८)- घोड्यांच्या शर्यतींत पळणाऱ्या घोड्याप्रमाणें, हिरव्या रंगाचा सोम भांड्यांत जातो.

१५ वाजिनि इव शुभः, सूरे विशः, पशुवर्धनाय मन्म वज्रं न (५३९)- घोड्यावर अलंकार घालतात, सूर्यामध्यें किरण चमकतात, पशुवर्धनासाठीं पालनकर्ता विचारपूर्वक गोशालेंत जातो, त्याप्रमाणें सोमरस भांड्यांत गाळला जातो, तेव्हां तो चमकून शोभतो.

१६ मातरः पूर्वे आयुनि जातं वत्सं रिहन्ति न, अद्रुहः इन्द्रस्य काम्यं अभिनवन्ते (५५०)- गाई प्रथम

झालेल्या बांसराला चाटतात, त्याप्रमाणें द्रोह न करणारें जल इन्द्राला प्रिय असलेल्या सोमांत मिसळलें जातें.

१७ अराधसं मखं भृगवः न, श्वानं अप हत (५५३)- ज्यांत दान दिलें जात नाहीं अशा यज्ञाचा त्याग जसा भृगुऋषि करतात, त्याप्रमाणें यज्ञभूमीमधून कुत्र्याला दूर करा.

१८ युवतिभिः मर्यः इव, इन्दुः सं अर्षति (५५७)- अनेक स्त्रियांबरोबर एक पुरुष जसा प्रेमानें मिळून राहतो, त्याप्रमाणें सोमरस जलाबरोबर मिसळला जातो.

१९ अत्यः न, वृथा रसः नदीषु कृणुते (५५८)- शर्यतीचा घोडा जातो त्याप्रमाणें, सहज सोमरस नद्यांच्या पाण्याबरोबर मिळून जातो.

२० श्येनः न, सोमः घृतवन्तं योनिं आ सदत् (५६२)- श्येन पक्ष्याप्रमाणें सोमरस जलानें भरलेल्या भांड्यांत जाऊन बसतो. पाण्यांत मिसळला जातो.

२१ शिशुं न, श्रिये परिभूषत (५६८)- बालकाला भूषणांनीं शोभवतात, त्याप्रमाणें सोमरसाला शोभेसाठीं गाईचें दूध आदिकांनीं शोभवितात.

२२ शिशुं न, हव्यैः गूर्तभिः स्वदयन्त (५६९)- बालकाला भूषणांनीं सुशोभित करतात, त्याप्रमाणें हव्यपदार्थांनीं दूध वगैरे पदार्थांनीं व स्तुतींनीं सोमाला स्वादिष्ट करतात.

२३ भृतिं न, सोमाय वचः प्रोच्यते (५७३)- सेवकाला जसें धन देतात, त्याप्रमाणें सोमाची स्तुति गातात. येथें नोकर वेतन देऊन ठेवले जात असत व त्यांना मासिक अथवा नियमित मुदतीसाठीं वेतन धनाच्या रूपानें दिलें जात असे असें दिसतें.

पावमान कांडांतील सुभाषितें

१ तत् उग्रं शर्म, महि श्रवः भूम्या ददे (४६७)- तें शौर्यानें मिळणारें सुख व मोठें यश अथवा अन्न भूमिवर आम्हांला प्राप्त होवो.

२ विश्वा ओजसा दधानः मत्सरः (४६९)- सर्व सामर्थ्यानें युक्त होऊन आनंद वाढवणारा हो.

३ ते देवावीः अघशंसहा वरेण्यः मदः (४७०)- तुझा देवांजवळ पोंचवणारा, पाप्यांचा नाश करणारा, श्रेष्ठ आनंद आहे.

४ दक्षसाधनः मदः (४७४)- बल वाढवणारा असा तुझा हा आनंद आहे.

५ मदेषु सर्वधा असि (४७५)- आनंद देणाऱ्यांमध्यें तूं सर्वांत अधिक आनंद देणारा आहेस.

६ जने नः यशसः कृधि (४७९)- लोकांमध्यें आम्हांला यशस्वी कर.

७ विश्वा द्विषः अप जहि (४७९)- सर्व शत्रूंचा पराभव कर.

८ स्वर्दृशं भानुना द्युमन्तं त्वा हवामहे (४८०)- निरीक्षण करणाऱ्या व तेजानें प्रकाशित होणाऱ्या तुला आम्ही बोलावीत आहों.

९ चेतनः प्रियः कवीनां मतिः पविष्ट (४८१)- चेतना देणारा प्रिय व कवींनाही बुद्धि देणारा शुद्ध होत असतो.

१० देवः पवस्व (४८३)- तूं तेजस्वी व शुद्ध हो.

११ पवमानः वैश्वानरं ज्योतिः अजीजनत् (४८४) -शुद्ध झाल्यानंतर सर्व मानवांचें हित करणारें तेज प्रकट होतें.

१२ पुरुस्पृहं कारुं बिभ्रत् (४८६)- पुष्कळांनीं प्रशंसिलेल्या कारागिराला धारण करतो. 'कारुं'=कारागीर, याजक.

१३ भंगं देवाः उप अयासिषुः (४८७)- शत्रूचा नाश करणाऱ्या वीराला देव प्राप्त होतात.

१४ विचर्षणिः विश्वाः मृधः अभ्यक्रमीत् (४८८) -विशेष ज्ञानी सर्व शत्रूंचा पराभव करतो.

१५ विश्वाः श्रियः अभ्यर्षन् (४८९)- सर्व शोभा वाढव.

१६ मत्सरः मृधः अपघ्नन् (४९२)- आनंद शत्रूंना दूर करणारा असो.

१७ अ-देव-युं जनं नुदस्व (४९२)- देवाची भक्ति न करणाऱ्या माणसाला दूर कर.

१८ ते यः मदेषु नवतीः नवः अवाहन् (४९५)- तुझा तो उत्साह युद्धामध्यें शत्रूच्या ९९ नगरींना तोडतो.

१९ द्युक्षं सनत् रयिं अन्धसा नः परिभरत् (४९६) - तेजस्वी व देण्यास योग्य धन अन्नासह आम्हांस दे.

२० ते दक्षं बलं अद्य आवृणीमहे (४९८)- तुझें बल व सामर्थ्य आज आम्ही स्वीकारीत आहों.

२१ ते बलं मयोभुवं वह्निं पान्तं पुरुस्पृहं (४९८)- तुझें बल सुखदायी, धन देणारें, रक्षण करणारें व पुष्कळांनीं प्रशंसनीय असें आहे.

२२ सहस्रिणं सुवीर्यं रयिं अस्मे श्रवांसि धारय

*

(५०१)- सहस्र प्रकारचें बल वाढवणारें, उत्तम पराक्रम करवणारें धन दे, व याला अन्न अथवा यश दे.

२३ वृषा द्युमान् असि (५०४)- तूं बलवान् व तेजस्वी आहेस.

२४ वृषतमः धर्माणि दध्रिषे (५०४)- तूं अत्यंत बलवान् आहेस व बल वाढवण्याचे गुणधर्म धारण करतोस.

२५ वृषा देवयुः (५०६)- तूं बलवान् व देवांना प्राप्त करणारा आहेस.

२६ अया सुकृत्यया महान् अभ्यवर्धथाः (५०७)- या उत्तम शुभ कर्मानें तूं मोठा होत आहेस.

२७ मन्दानः वृषायसे (५०७)- तूं आनन्दित होऊन बलवान् होतोस.

२८ विचर्षणिः हितः स चेतति (५०८)- ज्ञानी हितकारक होऊन चेतना देतो.

२९ मृधः अराव्णः अपघ्नन् (५०९)- शत्रूंना व दान न देणाऱ्यांना तो मारतो.

३० रत्नधा ऋतस्य योनिं आसीदसि (५११)- रत्नाचें धारण करून सत्याच्या आधारानें राहतोस.

३१ नर्यः (५१२)- मानवांचें हित करणारा.

३२ मदिरः न जागृविः (५१४)- तूं आनंददायक व जागृत राहणारा आहेस.

३३ पुरूणि मां न्यवचरन्ति, तान् परिधीन् अतीहि (५१६)- पुष्कळ दुष्ट मला त्रास देत आहेत, त्या दुष्टांचा नाश कर.

३४ पिशंगं बहुलं पुरुस्पृहं रयिं अभ्यर्षसि (५१७) - पिवळें सुवर्णाच्या रूपाचें पुष्कळ पुष्कळांनीं वर्णिलेलें धन देतोस.

३५ आयवः मृजन्ति (५२०)- मनुष्य शुद्ध होत आहेत.

३६ देवः देवानां जनिमा प्र विवक्ति (५२४)- देव देवांच्या जन्मांचें वर्णन करतो.

३७ रत्नधाः वार्याणि दयते (५२८)- रत्नाचें धारण करणारा धनांचें धारण करतो.

३८ सहस्रदाः शतदाः भूरिदावा वाजी शश्वत्तमं बर्हिः अस्थात् (५३१)- हजारों, शेंकडों व पुष्कळ धन देणारा सामर्थ्यवान् वीर शाश्वत आसनावर बसतो.

३९ सेनानीः शूरः रथानां अग्रे प्रैति (५३३)- सेना-संचालक शूरवीर रथाच्या पुढें धांवतो.

४० अस्य सेना हर्षते (५३३)- याचें सैन्य आनंदित होतें.

४१ धाम पवसे (५३४)- आपलें घर स्वच्छ ठेवतोस.

४२ देवान् अभि अर्चाम (५३५)- देवांची आम्ही पूजा करतों.

४३ महते हिनोति (५३५)- मोठ्या कार्यासाठीं प्रेरित करतो.

४४ आयुधा संशिशानः (५३६)- शस्त्रें तीक्ष्ण करतो.

४५ विश्वा वसु हस्तयोः आदधानः प्रायासीत् (५३६)- सर्व धन आपल्या दोनही हातांत धरून तो येत आहे.

४६ अरातीः परि बाधते (५४०)- शत्रूंना दूर करतो.

४७ शतस्पृहं सहस्रभर्णसं तुविद्युम्नं विभासहं वाजसातमं रयिं नः अभ्यर्ष (५४१)- शेंकडों ज्याची स्तुति करतात, सहस्रावधी माणसांचें जें पोषण करतें, जें तेजस्वी आहे, विशेष प्रकाशमान जें आहे व जें बल वाढवतें तें धन आम्हांला दे.

४८ अ-रातयः नः अरयः इषयः अश्नन्तः वि चित् सन्तु (५५५)- दान न देणारे आमचे शत्रु अन्न मिळावें अशी इच्छा करीत, भुकेलेल्या स्थितींत तसेच राहोत.

४९ युवतिभिः मर्यः सं अर्षति (५५७)- अनेक स्त्रियांशीं एक पुरुष आनंदानें राहतो.

५० अमीवा रक्षसा सह अप भवतु (५६१)- रोगकृमि राक्षसाबरोबर दूर जावो.

५१ द्वयाविनः मा मत्सत (५६१) दुटप्पीपणानें आचरण करणारे आनंदित न होवोत.

५२ राजा इव दस्म (५६२)- राजासारखा दर्शनीय आहे.

५३ अ-तप्त-तनूः तत् आमः न अश्नुते (५६६) - तप न करणाराला तें सुख प्राप्त होत नाहीं.

५४ शृतासः इत् तत् समाशते (५६६)- परिपक्व जे होतात त्यांस तें सुख मिळतें.

५५ द्युमन्तं स्वर्विदं शुष्म आ भर (५६७)- तेजस्वी ज्ञान वाढवणारें बल आम्हांला दे.

५६ भृतिं न प्रभर (५७२)- नोकराला जसें धन - वेतन - देतात तसें दे.

५७ वीरवत् यशः अभ्यर्ष (५७६)- वीर पुत्रांनीं युक्त यश दे.

५८ ऋषीणां सप्तवाणीः अभि अनूषत (५७७)- ऋषींची सात छंदांतील वाणी उच्चारा. वेदमंत्र म्हणा.

५९ मधुमत्तमः क्रतुवित्तमः महि द्युक्षत्तमः मदः (५७८)- अत्यंत मधुर कर्म करण्याची पद्धति जाणणारा, अधिक तेजस्वी आनंद असावा.

६० देवयुं द्युम्नं बृहद् यशः अभि दिदीहि (५७९) - देवांना प्राप्त करणारें तेजस्वी मोठें यश आम्हांला दे.

पवमानकाण्डान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(३९)		
४६७	९।६१।१०	अहमीयुरांगिरसः	पवमानः सोमः	गायत्री
४६८	९।१।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	”	”
४६९	९।६५।१०	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	”	”
४७०	९।६१।१९	अहमीयुरांगिरसः	”	”
४७१	९।३३।४	त्रित आप्त्यः	”	”
४७२	९।६४।२२	कश्यपो मारीचः	”	”
४७३	९।६२।४	जमदग्निर्भार्गवः	”	”
४७४	९।२५।१	दृढच्युत आगस्त्यः	”	”
४७५	९।१८।१	असितः काश्यपो देवलो वा	”	”
४७६	९।९।१	असितः काश्यपो देवलो वा	”	”
		(४०)		
४७७	९।३२।१	श्यावाश्व आत्रेयः	”	”
४७८	९।३३।१	त्रित आप्त्यः	”	”
४७९	९।६१।१८	अमहीयुरांगिरसः	”	”
४८०	९।६५।४	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	”	”
४८१	९।६४।१०	कश्यपो मारीचः	”	”
४८२	९।६४।४	कश्यपो मारीचः	”	”
४८३	९।६३।२२	निध्रुविः काश्यपः	”	”
४८४	९।६१।१६	अमहीयुरांगिरसः	”	”
४८५	९।२०।४	असितः काश्यपो देवलो वा	”	”
४८६	९।२४।१	असितः काश्यपो देवलो वा	”	”
		(४१)		
४८७	९।६१।१३	अमहीयुरांगिरसः	”	”
४८८	९।४०।१	बृहन्मतिरांगिरसः	”	”
४८९	९।६२।१९	जमदग्निर्भार्गवः	”	”

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
४९०	९।३६।१	प्रभूवसुरांगिरसः	पवमानः सोम	गायत्री
४९१	९।४१।१	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
४९२	९।६३।२४	निध्रुविः काश्यपः	,,	,,
४९३	९।६३।७	निध्रुविः काश्यपः	,,	,,
४९४	९।६१।२२	अमहीयुरांगिरसः	,,	,,
४९५	९।६१।१	अमहीयुरांगिरसः	,,	,,
४९६	९।५२।१	उचथ्य आंगिरसः	,,	,,
		(४२)		
४९७	९।१।६	मेधातिथिः काण्वः	,,	,,
४९८	९।६५।१८	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
४९९	९।५१।१	उचथ्य आंगिरसः	,,	,,
५००	९।५८।१	अवत्सारः काश्यपः	,,	,,
५०१	९।६३।१	निध्रुविः काश्यपः	,,	,,
५०२	९।२३।२	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
५०३	९।६५।१९	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
५०४	९।६४।१	कश्यपो मारीचः	,,	,,
५०५	९।६४।१३	कश्यपो मारीचः	,,	,,
५०६	९।६।१	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
५०७	९।४७।१	कविर्भार्गवः	,,	,,
५०८	९।६२।१०	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
५०९	९।४४।१	अयास्य आंगिरसः	,,	,,
५१०	९।६१।२५	अमहीयुरांगिरसः	,,	,,
		(४३)		
५११	९।१०७।४	सप्तर्षय [१ भरद्वाजो बार्हस्पत्यः; २ कश्यपो मारीचः; ३ गोतमो राहूगणः; ४ अत्रिर्भौमः; ५ विश्वामित्रो गाथिनः; ६ जमदग्निर्भार्गवः ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः]	,,	बृहती
५१२	९।१०७।१	सप्तर्षयः	,,	,,
५१३	९।१०७।१०	सप्तर्षयः	,,	,,
५१४	९।१०७।१२	सप्तर्षयः	,,	,,
५१५	९।१०७।८	सप्तर्षयः	,,	,,
५१६	९।१०७।१९	सप्तर्षयः	,,	,,
५१७	९।१०७।२१	सप्तर्षयः	,,	,,
५१८	९।१०७।१४	सप्तर्षयः	,,	,,
५१९	९।१०७।६	सप्तर्षयः	,,	,,
५२०	९।१०७।१७	सप्तर्षयः	,,	,,
५२१	९।१०७।२३	सप्तर्षयः	,,	,,
५२२	९।१०७।२५	सप्तर्षयः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(४४)		
५२३	९।८७।१	उशना काण्वः	पवमानः सोमः	बृहती
५२४	९।९७।७	वृषगणो वासिष्ठः	"	"
५२५	९।९७।३४	पराशरः शाक्त्यः	"	"
५२६	९।९७।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
५२७	९।९६।५	प्रतर्दनो दैवोदासिः	"	"
५२८	९।९०।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
५२९	९।९७।४०	पराशरः शाक्त्यः	"	"
५३०	९।९५।१	प्रस्कण्वः काण्वः	"	त्रिष्टुप्
५३१	९।८७।४	उशना काव्यः	"	"
५३२	९।९६।१३	प्रतर्दनो दैवोदासिः	"	"
		(४५)		
५३३	९।९६।१	प्रतर्दनो दैवोदासिः	"	"
५३४	९।९७।३१	पराशरः शाक्त्यः	"	"
५३५	९।९७।४	इन्द्रप्रमतिर्वासिष्ठः	"	"
५३६	९।९०।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
५३७	९।९७।२२	कर्णश्रुद्वासिष्ठः	"	"
५३८	९।९३।१	नोधा गौतमः	"	"
५३९	९।९४।१	कण्वो घौरः	"	"
५४०	९।९७।१०	मन्युर्वासिष्ठः	"	"
५४१	९।९७।५२	कुत्स आंगिरसः	"	"
५४२	९।९७।४१	पराशरः शाक्त्यः	"	"
५४३	९।९१।१	कश्यपो मारीचः	"	"
५४४	९।९५।३	प्रस्कण्वः काण्वः	"	"
		(४६)		
५४५	९।१०१।१	अध्रीगुः श्यावाश्विः	"	अनुष्टुप्
५४६	९।१०१।८	नहुषो मानवः	"	"
५४७	९।१०१।४	ययातिर्नाहुषः	"	"
५४८	९।१०१।१०	मनुः सांवरणः	"	"
५४९	९।९८।१	अम्बरीषो वार्षागिरः ऋजिश्वा भारद्वाजश्च	"	"
५५०	९।१००।१	रेभसूनू काश्यपौ	"	"
५५१	९।९९।१	रेभसूनू काश्यपौ	"	बृहती
५५२	९।९८।७	अम्बरीषो वार्षागिरः ऋजिश्वा भारद्वाजश्च	"	अनुष्टुप्
५५३	९।१०१।१३	प्रजापतिर्वैश्वामित्रो वाच्यो वा	"	"
		(४७)		
५५४	९।७५।१	कविर्भार्गवः	"	जगती
५५५	९।७९।१	कविर्भार्गवः	"	"

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
५५६	९।७७।१	कविर्भार्गवः	पवमानः सोमः	जगती
५५७	९।८६।१६	सिकता निवावरी	,,	,,
५५८	९।७६।१	कविर्भार्गवः	,,	,,
५५९	९।८६।१९	सिकता निवावरी	,,	,,
५६०	९।७०।१	रेणुर्वैश्वामित्रः	,,	,,
५६१	९।८५।१	वेनोभार्गवः	,,	,,
५६२	९।८२।१	वसुर्भारद्वाजः	,,	,,
५६३	९।६८।१	वत्सप्रिर्भालन्दः	,,	,,
५६४	९।८६।४३	गृत्समदः शौनकः	,,	,,
५६५	९।८३।१	पवित्र आंगिरसः	,,	,,
		(४८)		
५६६	९।१०६।१	अग्निश्चाक्षुषः	,,	उष्णिक्
५६७	९।१०६।४	चक्षुर्मानवः	,,	,,
५६८	९।१०४।१	पर्वतनारदौ काण्वौ	,,	,,
५६९	९।१०५।१	पर्वतनारदौ काण्वौ	,,	,,
५७०	९।१०२।१	त्रित आप्त्यः	,,	,,
५७१	९।१०६।७	मनुराप्सवः	,,	,,
५७२	९।१०६।१०	अग्निश्चाक्षुषः	,,	,,
५७३	९।१०३।१	द्वित आप्त्यः	,,	,,
५७४	९।१०५।३	पर्वतनारदौ काण्वौ	,,	,,
५७५	९।१०५।४	पर्वतनारदौ काण्वौ	,,	,,
५७६	९।१०६।१३	अग्निश्चाक्षुषः	,,	,,
५७७	९।१०३।३	द्वित आप्त्यः	,,	,,
		(४९)		
५७८	९।१०८।१	गौरवीतिः शाक्त्यः	,,	ककुप्
५७९	९।१०८।३	ऊर्ध्वसद्मा आंगिरसः	,,	,,
५८०	९।१०८।७	ऋजिश्वा भारद्वाजः	,,	,,
५८१	९।१०८।११	कृतयशा आंगिरसः	,,	,,
५८२	९।१०८।१३	ऋणंचयो राजर्षिः	,,	यवमध्या गायत्री
५८३	९।१०८।३	शक्तिर्वासिष्ठः	,,	ककुप्
५८४	९।१०८।५	ऊरुरांगिरसः	,,	,,
५८५	९।१०८।६	ऋजिश्वा भारद्वाजः	,,	,,

अथ आरण्यं काण्डम् ।

अथ षष्ठोऽध्यायः ।

[१]

(१-९) १ शंयुर्बार्हस्पत्यः (भरद्वाजः); २ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ३, ६ वामदेवो गौतमः; ४ शुनःशेप आजीगर्तिः कृत्रिमो देवरातो वैश्वामित्रो वा; ५ कुत्स आंगिरसः (गृत्समदः); ७, ८ अमहीयुरांगिरसः; ९ आत्मा ॥ इन्द्रः; ४ वरुणः; ५, ७, ८ पवमानः सोमः; ६ विश्वे देवाः; ९ अन्नम् ॥ बृहती; २, ४, ५, ९ त्रिष्टुप्; ३, ७-८ गायत्री; ६ एकपाज्जगती ॥

५८६ इन्द्र ज्येष्ठं न आ भर ओजिष्ठं पुपुरि श्रवः ।
यद्दिधृक्षेम वज्रहस्त रोदसी उभे सुशिप्र पप्राः ॥ १ ॥ (ऋ. ६।४६।५)

५८७ इन्द्रो राजा जगतश्चर्षणीनामधिक्षमा विश्वरूपं यदस्य ।
ततो ददाति दाशुषे वसूनि चोदद्राध उपस्तुतं चिदर्वाक् ॥ २ ॥ (ऋ. ७।२७।३)

५८८ यस्येदमा रजोयुजस्तुजे जने वनंस्वः । इन्द्रस्य रन्त्यं बृहत् ॥ ३ ॥ (अथर्व. ६।३३।१)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[५८६] हे (वज्र-हस्त) हातांत वज्र घेणाऱ्या (सु-शिप्र) उत्तम हनुयुक्त इन्द्रा ! (ज्येष्ठं ओजिष्ठं) श्रेष्ठ व बल वाढवणारें (पपुरि श्रवः) इच्छा पूर्ण करणारें अन्न (नः आभर) आम्हांला भरपूर दे. (यत्) जें अन्न आम्ही (दिधृक्षेम) जवळ ठेऊं इच्छित आहों, व जें (उभे रोदसी) दोनही द्यु व पृथिवी यांना (आ पप्राः) पुरेसें आहे तें आम्हांला दे ॥ १ ॥

१ ज्येष्ठं ओजिष्ठं पपुरि श्रवः नः आभर— सर्वांत उत्तम व सामर्थ्य वाढवणारें, इच्छा पूर्ण करणारें असें अन्न आम्हांला भरपूर दे.

२ यत् दिधृक्षेम— जें आम्हीं आपल्याजवळ ठेऊं इच्छितों तें आम्हांला दे.

[५८७] (इन्द्रः) इन्द्र (जगतः चर्षणीनां राजा) चालणाऱ्या पशु आदिकांचा व मनुष्यांचा राजा आहे. तसेंच (अधिक्षमा) या पृथिवीवर (विश्वरूपं यत्) अनेक रूपांचें जें कांहीं आहे, (अस्य) याचाहि तोच राजा आहे. (ततः दाशुषे वसूनि ददाति) म्हणून दात्याला तो धनें देतो. तसेंच (उप-स्तुतं) जवळून उत्तम स्तुति करणाऱ्याला (राधः) धन (अर्वाक् चोदत्) त्याच्याजवळ आणून देवो. ॥ २ ॥

१ इन्द्रः जगतः चर्षणीनां, अधिक्षमा विश्वरूपं यत्, अस्य राजा— इन्द्र हा स्थावर व जंगमाचा, मनुष्यांचा तसेंच पृथ्वीवर जें कांहीं अनेक रूपांचें आहे त्या सर्वांचा एक राजा आहे.

२ दाशुषे वसूनि ददाति— दात्याला तो धन देतो.

३ उपस्तुतं अर्वाक् राधः चोदत्— उत्तम स्तुति करणाऱ्याजवळ तो धन पाठवतो.

[५८८] (यस्य रजो-युजः) ज्या अत्यन्त तेजस्वी इन्द्राचें (इदं) हें दान (स्वः तुजे जने वनं) स्वर्गांत व तसेंच दान देणाऱ्या जनांमध्यें प्रशंसनीय आहे, म्हणून (इन्द्रस्य बृहत् रन्त्यं) इन्द्राचें दान मोठें रमणीय असतें. ॥ ३ ॥

५८९ उदुत्तमं वरुण पाशमस्मदवाधमं वि मध्यमꣳ श्रथाय ।
अथादित्य व्रते वयं तवानागसो अदितये स्याम ॥ ४ ॥ (ऋ. १।२४।१५)

५९० त्वया वयं पवमानेन सोम भरे कृतं वि चिनुयाम शश्वत् ।
तन्नो मित्रो वरुणो मामहन्तामदितिः सिन्धुः पृथिवी उत द्यौः ॥ ५ ॥

५९१ इमं वृषणं कृणुतैकमिन्माम् ॥ ६ ॥

५९२ स न इन्द्राय यज्यवे वरुणाय मरुद्भ्यः वरिवोवित्परिस्रव ॥ ७ ॥
(ऋ. ९।६१।१२; वा. य. २६।२९)

५९३ एना विश्वान्यर्य आ द्युम्नानि मानुषाणाम् । सिषासन्तो वनामहे ॥ ८ ॥
(ऋ. ७९।६१।११; वा. य.२६।१९)

---

[५८९] हे (वरुण) वरिष्ठ देवा ! (उत्तमं पाशं अस्मत् उत् श्रथाय) उच्च स्थानामध्यें असलेला पाश आमच्यापासून दूर कर. (अधमं पाशं अवश्रथाय) अधम पाश शिथिल कर व (मध्यमं पाशं विश्रथाय) मध्यम पाश ढिला कर. (अथ) त्यानंतर हे (आदित्य) अदितिच्या पुत्रा ! वरुणा ! (तव व्रते) तुझ्या कार्यांमध्यें (वयं) आम्ही (अ-दितये) आमचा विनाश होऊं नये यासाठीं (अनागसः स्याम) पापरहित होऊन रहावें. ॥ ४ ॥

१ वरुणः— वरिष्ठ देव, श्रेष्ठ ईश्वर.

२ उत्तम, मध्यम व अधम पाश— बुद्धि, मन व इन्द्रियांचे पाश, यांमधील दोषांमुळें होणारीं विघ्नें दूर कर, (अव-श्रथाय, उच्छ्रथाय, विश्रथाय) ढिले कर.

३ अदितिः— अपराधीनता, स्वतंत्रता, अविनाश.

४ अदितये अनागसः स्याम— मुक्त होण्यासाठीं निष्पाप होऊं.

५ तव व्रते— तुझ्या नियमाप्रमाणें आम्ही राहूं, तुझ्या नियमांचें पालन करूं.

[५९०] हे (सोम) सोमा ! (पवमानेन त्वया) स्वच्छ होणाऱ्या अशा तुझ्या सहाय्यानें (भरे) संग्रामांमध्यें (शश्वत् कृतं) नेहेमीं करावयाचें कर्तव्य (वयं वि चिनुयाम) आम्ही विशेष काळजीनें करूं. (तत्) यासाठीं मित्र, वरुण, अदिति, सिन्धु, पृथिवी (उत द्यौ) आणि द्युलोक हे (मा महन्तां) मला महत्त्व प्राप्त करून देवोत. ॥ ५ ॥

१ भरे शश्वत् कृतं वयं चिनुयाम— युद्धामध्यें करावयाचें जें कर्म असेल तें आम्ही फार काळजीनें करीत राहूं.

२ तत् मा महन्तां— त्याच्या योगानें मला मोठेपण प्राप्त होवो.

[५९१] हे देव हो ! (एकं इमं) या एकाला (वृषणं कृणुत) तुम्ही बलवान् करा. तसेंच (मां) मला बलवान् करा. ॥ ६ ॥

[५९२] हे सोमा ! (सः वरिवोवित्) तो तूं धन आपल्याजवळ ठेवणारा (नः यज्यवे इन्द्राय) आमच्या यज्ञ करण्यास योग्य अशा पूज्य इन्द्रासाठीं (वरुणाय मरुद्भ्यः) वरुण व मरुत् यांच्यासाठीं (परिस्रव) उत्तम रीतिनें गाळला जा. ॥ ७ ॥

[५९३] (एना) या सोमाच्या सहाय्यानें (मानुषाणां) मनुष्यांच्या (विश्वानि द्युम्नानि) सर्व अन्नांच्या (अर्यः) जवळ जाऊन (सिषासन्तः) त्यांना उपभोगूं इच्छिणारे आम्ही (वनामहे) त्या अन्नांना प्राप्त करतों. ॥८ ॥

५९४ अहमस्मि प्रथमजा ऋतस्य पूर्वं देवेभ्यो अमृतस्य नाम ।
यो मा ददाति स इदेवमावदहमन्नमन्नमदन्तमाद्मि ॥ ९ ॥

इति प्रथमा दशतिः ॥ १ ॥ प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

(१-७) श्रुतकक्ष आंगिरसः; २ पवित्र आंगिरसः; ३, ४ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ५ प्रथो वासिष्ठः; ६ गृत्समदः शौनकः; ७ नृमेधपुरुमेधावांगिरसौ ॥ इन्द्रः; २ पवमानः सोमः, ५ विश्वे देवाः; ६ वायुः ॥ गायत्री, जगती, ५ त्रिष्टुप्, ७ अनुष्टुप् ॥

५९५ त्वमेतदधारयः कृष्णासु रोहिणीषु च । परुष्णीषु रुशत्पयः ॥ १ ॥ (ऋ. ८।९३।१३)

५९६ अरूरुचदुषसः पृश्निरग्रिय उक्षा मिमेति भुवनेषु वाजयुः ।
मायाविनो ममिरे अस्य मायया नृचक्षसः पितरो गर्भमादधुः ॥ २ ॥ (ऋ. ९।८३।३)

---

[५९४] (देवभ्यः पूर्वं) देवांच्या पूर्वी (अहं) मीं अन्नरूपी देवता (अमृतस्य ऋतस्य प्रथमजा अस्मि नाम) विनाशरहित यज्ञामध्यें प्रथम उत्पन्न झालों आहें. (यः मां ददाति) जो मला दानामध्यें देतो, (सः इत् एवं आवत्) तो खरोखर या दानानें सर्वांचें रक्षण करतो. (अन्नं अदन्तं) अन्न स्वतः खाणाऱ्या लोभी माणसाला (अहं अन्नं अद्मि) मीं अन्न देवता त्यालाच खाऊन टाकतें. ॥ ९ ॥

१ देवेभ्यः पूर्वं अहं अन्नं— सर्व देवांच्या पूर्वी त्यांना पाहिजे तें अन्न उत्पन्न झालें आहे. प्राण्यांच्या उत्पत्ति पूर्वी त्यांना लागणारें अन्न उत्पन्न झालें आहे.

२ अमृतस्य ऋतस्य प्रथमजा अस्मि— अमर यज्ञाच्या पूर्वी हें अन्न उत्पन्न झालें आहे. त्या अन्नाचा पुढें यज्ञ केला जातो.

३ यः मां ददाति स आवत्— जो अन्नाचें दान करतो, तो या दानानें सर्वांचें संरक्षण करतो.

४ अन्नं अदन्तं अहं अन्नं आद्मि— अन्नाचें दान न करतां जो तें स्वतःच खातो, त्या स्वार्थी माणसाला तें अन्न खाऊन टाकतें, नष्ट करून टाकतें.

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[५९५] हे इन्द्रा ! (कृष्णासु) काळ्या, (रोहिणीषु) लाल, (परुष्णीषु) व अनेक रंगांच्या गाईंमध्यें (रुशत् पतत् पयः) तेजस्वी असें हें पांढऱ्या रंगाचें दूध (अधारयः) तूं ठेवलें आहेस. हें तुझें अद्भुत सामर्थ्य आहे. ॥ १ ॥

[५९६] (उषसः पृश्निः) उषांशीं संबंध असणारा सूर्य (अग्रियः) येथें मुख्य आहे, तोच (अरूरुचत्) चमकत आहे. (उक्षा) पाऊस पाडणारा मेघ आकाशांत (मिमेति) गडगडाटाचा शब्द करतो. (भुवनेषु वाजयुः) प्राण्यांमध्यें अन्नाची इच्छा उत्पन्न करून (मायाविनः) कर्मामध्यें कुशल असणारे देव (अस्य मायया ममिरे) या कौशल्यानें जगत् निर्माण करूं लागले. (नृचक्षसः पितरः) मनुष्यांचें निरीक्षण करणारे पितर मातेच्या उदरांत (गर्भं आदधुः) गर्भ धारण करूं लागले. अशी सृष्टि उत्पन्न झाली. ॥ २ ॥

१ उषसः पृश्निः अग्रियः अरूरुचत्— उषःकालानंतर उगवणारा सूर्य याठिकाणीं मुख्य आहे व तो उदयानंतर प्रकाशूं लागतो.

२ उक्षा मिमेति— जलाचें सिंचन करणारा मेघ आकाशांत गडगडाट करतो.

३ भुवनेषु वाजयुः— प्राण्यामध्यें अन्न खाण्याची इच्छा उत्पन्न होते.

४ मायाविनः अस्य मायया ममिरे— कुशल जे असतात ते याच्या कौशल्यानें सृष्टि निर्माण करूं लागतात.

५ नृचक्षसः पितरः गर्भं आदधुः— मानवांच्या कर्मांचें निरीक्षण करणारे पितर मातांच्या पोटांत गर्भ धारण करतात, ज्यानें सृष्टि उत्पन्न होते.

५९७ इन्द्र इद्धर्योः सचा सम्मिश्ल आ वचोयुजा । इन्द्रो वज्री हिरण्ययः ॥ ३ ॥ (ऋ. १।७।२)

५९८ इन्द्र वाजेषु नोऽव सहस्रप्रधनेषु च । उग्र उग्राभिरूतिभिः ॥ ४ ॥ (ऋ. १।७।४)

५९९ प्रथश्च यस्य सप्रथश्च नामानुष्टुभस्य हविषो हविर्यत् ।
धातुर्द्युतानात्सवितुश्च विष्णो रथन्तरमा जभारा वसिष्ठः ॥ ५ ॥ (ऋ. १०।१८१।१)

६०० नियुत्वान्वायवा गह्ययꣳ शुक्रो अयामि ते । गन्तासि सुन्वतो गृहम् ॥ ६ ॥ (ऋ. २।४१।२)

६०१ यज्जायथा अपूर्व्य मघवन्वृत्रहत्याय । तत्पृथिवीमप्रथयस्तदस्तभ्ना उतो दिवम् ॥ ७ ॥
(ऋ. ८।८९।५)

इति द्वितीया दशतिः ॥ २ ॥ द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

(१-१३) १, ५, ७, १० वामदेवो गौतमः; २, ३, गौतमो राहूगणः; ४ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ६ गृत्समदः शौनकः ८ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ९ ऋजिश्वा भारद्वाजः; ११ हिरण्यस्तूप आंगिरसः; १२, १३ विश्वामित्रो गाथिनः (१२ ब्रह्म)॥
१ प्रजापतिः; २, ३ सोमः; ४, ५, ८, १३ अग्निः; ६ अपांनपात्; ७ रात्रिः; ९ विश्वेदेवाः; १० लिंगोक्ताः;
११ इन्द्रः; १२ आत्मा अग्निर्वा ॥ त्रिष्टुप्; १, ७ अनुष्टुप्; ४ गायत्री; ८, ९ जगती; १० महापंक्तिः ॥

६०२ मयि वर्चो अथो यशोऽथो यज्ञस्य यत्पयः । परमेष्ठी प्रजापतिर्दिवि द्यामिव दृꣳहतु ॥ १ ॥

---

[५९७] (इन्द्र इत्) इन्द्र खरोखर (हर्योः) दोनही घोड्यांना आपल्या रथाला (सचा आ संमिश्लः) एका वेळीं जोडणारा आहे. हे घोडे (वचो-युजा) इशारा होतांच रथाशीं जोडले जाणारे आहेत. असा हा (इन्द्रः वज्री हिरण्ययः) इन्द्र वज्र धारण करणारा व सुवर्णाचीं आभूषणें धारण करणारा आहे. ॥ ३ ॥

[५९८] हे इन्द्रा ! तूं (उग्रः) वीर आहेस, म्हणून (उग्राभिः ऊतिभिः) वीरतेनें होणाऱ्या संरक्षणांनीं (वाजेषु) लहान युद्धांत (सहस्र-प्रधनेषु च) व सहस्र प्रकारचीं धनें ज्यांत मिळतात अशा मोठ्या संग्रामामध्यें (नः अव) आमचें रक्षण कर. ॥ ४ ॥

१ सहस्र प्र-धनं— शत्रूला पराभूत केल्यानंतर त्याची लूट करून सहस्रों प्रकारचीं धनें ज्यांत मिळवतां येतात, तो महासंग्राम.

२ उग्रा ऊतिः— वीरत्वानें केलेलें संरक्षणाचें कार्य.

[५९९] (यस्य प्रथः च स-प्रथः च नाम) ज्याचें प्रथ आणि सप्रथ असें नांव आहे, ज्यांनीं (अनुष्टुभस्य हविषः हवि यत्) अनुष्टुभ छंदांतील मंत्र म्हणून जें हवि अर्पण केलें, त्या (द्युतानात् धातुः) तेजस्वी धाता, सविता व विष्णु यांपासून वसिष्ठानें (रथन्तरं आजभार) रथन्तर हें साम प्राप्त केलें. ॥ ५ ॥

[६००] हे (वायो) वायुदेवा ! तूं (नियुत्वान्) नियुतनामक वाहनांतून (आ गहि) ये (अयं शुक्रः) हा चमकणारा सोमरस (ते अयामि) तुझ्यासाठीं तयार केला आहे. (सुन्वतः गृहं) तूं सोमयाग करणाऱ्याच्या घरीं (गन्ता असि) जात आहेस. ॥ ६ ॥

[६०१] हे (अ-पूर्व्य मघवन्) हे अपूर्व धनवाना इन्द्रा ! (वृत्र-हत्याय) वृत्राचा वध करण्यासाठीं (यत् जायथाः) जेव्हां तूं तयार झालास, (तत् पृथिवीं अप्रथयः) तेव्हां पृथिवीला विस्तीर्ण केलेंस, (उत उ दिवं अस्तभ्नाः) आणि द्युलोकाला वर स्थिर केलेंस. ॥ ७ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[६०२] (परमेष्ठी प्रजापतिः) परम उच्च स्थानीं राहणारा प्रजापालक परमेश्वर (मयि) माझ्यामध्यें (वर्चः) तेज (अथो यशः) व यश (अथो यज्ञस्य यत् पयः) आणि यज्ञामध्यें प्रयुक्त होणारें जें दूध आहे तें (दिवि द्यां इव) द्युलोकामध्यें जसें तेज असतें तसें (दृंहतु) वाढवो. ॥ १ ॥

६०३ सं ते पयांऽसि समु यन्तु वाजाः सं वृष्ण्यान्यभिमातिषाहः ।
आप्यायमानो अमृताय सोम दिवि श्रवांऽस्युत्तमानि धिष्व ॥ २ ॥ (ऋ. १।९१।१८)

६०४ त्वमिमा ओषधीः सोम विश्वास्त्वमपो अजनयस्त्वं गाः ।
त्वमातनोरुर्वा३न्तरिक्षं त्वं ज्योतिषा वि तमो ववर्थ ॥ ३ ॥ (ऋ. १।९१।२२)

६०५ अग्निमीडे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् । होतारंऽरत्नधातमम् ॥ ४ ॥ (ऋ. १।१।१)

६०६ ते मन्वत प्रथमं नाम गोनां त्रिः सप्त परमं नाम जानन् ।
ता जानतीरभ्यनूषत क्षा आविर्भुवन्नरुणीर्यशसा गावः ॥ ५ ॥ (ऋ. ४।१।१६)

परमेश्वर मला तेज, यश व दूध आदि अन्नाचे पदार्थ भरपूर देवो. आकाश जसें तेजस्वी आहे तसें माझें तेज वाढो.

[६०३] हे (सोम) सोमा ! (अभिमाति-षाहः) शत्रूंचा पराभव करणाऱ्या (ते) तुझ्याजवळ (पयांसि सं यन्तु) दूध येवो. तसेंच (वाजाः सं यन्तु) अन्नें तुझ्याजवळ येवोत आणि (वृष्ण्यानि सं) बलें तुला प्राप्त होवोत. (अमृताय आप्यायमानः) अमरत्व प्राप्त करण्यासाठीं वाढत जाऊन (दिवि उत्तमानि श्रवांसि धिष्व) द्युलोकामध्यें उत्तम अन्नें प्राप्त कर. ॥ २ ॥

१ ते पयांसि सं यन्तु— तुझ्याजवळ दूध येवो. तुझ्यांत दूध मिसळलें जावो. सोमरसामध्यें दूध मिसळतात.

[६०४] हे (सोम) सोमा ! (त्वं) तूं (इमाः विश्वाः ओषधीः अजनयः) या सर्व औषधि उत्पन्न केल्या आहेस. (त्वं अपः) तूं जल उत्पन्न केलें आहेस. (त्वं गाः) तूं गाई उत्पन्न केल्या आहेस. (त्वं उरु अन्तरिक्षं आ तनोः) तूं विस्तीर्ण अन्तरिक्ष पसरलें आहेस. (त्वं तमः ज्योतिषा वि ववर्थ) तूं अंधकाराचा तेजानें नाश केलास. ॥ ३ ॥

[६०५] (पुरः-हितं) पुढें असणाऱ्या (यज्ञस्य देवं) यज्ञाचा प्रकाशक (ऋत्विजं) ऋतुप्रमाणें हवन करणाऱ्या (होतारं) देवांना बोलावून आणणाऱ्या (रत्न-धा-तमं) रत्नांचें धारण करणाऱ्या (अग्निं ईडे) अग्नीची मीं स्तुति करतों. ॥ ४ ॥

यज्ञामध्यें अग्नि समोर स्थापन केलेला असतो, त्यांत हवन केलें जातें, ऋतुकालप्रमाणें त्यांत हवन होतें, तो सर्व देवांना यज्ञांत बोलावून आणतो. याजकांना रत्नें शरीरावर धारण करावयास तो देतो, अशा अग्निची आम्ही प्रशंसा गात आहों.

[६०६] (ते) त्या ऋषींना (गोनां नाम) वाणीचे शब्द (प्रथमं अमन्वत) स्तुति करण्यास योग्य आहेत असें प्रथम समजलें. (त्रि सप्त परमं नाम जानन्) तीन गुणे सात अर्थात् २१ छन्दांमध्यें स्तोत्रें होतात, हें त्यांना नंतर कळलें. (ता जानतीः क्षाः अभ्यनूषत) त्या वाणींनीं उषांचीं स्तवनें त्यांनीं केलीं. त्यापासून (यशसा) तेजानें (अरुणीः गावः आविर्भुवन्) अरुण रंगाच्या गाई - किरणें - प्रकट झालीं. ॥ ५ ॥

१ ऋषींना भाषेचे शब्द स्तुति करण्यास योग्य आहेत हें प्रथम समजलें.
२ नंतर एकवीस छंदांत स्तोत्रें होऊं शकतात हें कळलें.
३ त्यांनीं उषादेवतेचीं स्तोत्रें केलीं व तीं गाइलीं.
४ तेव्हां सूर्याचे किरण बाहेर आले. सूर्योदय झाला.

६०७ समन्या यन्त्युपयन्त्यन्याः समानमूर्वं नद्यस्पृणान्ति ।
तमू शुचिँ शुचयो दीदिवाँसमपान्नपातमुप यन्त्यापः ॥ ६ ॥ (ऋ. २।३५।३)

६०८ आ प्रागाद्भद्रा युवतिरह्नः केतूंत्समीर्त्सति ।
अभूद्भद्रा निवेशनी विश्वस्य जगतो रात्री ॥ ७ ॥

६०९ प्रक्षस्य वृष्णो अरुषस्य नू महः प्र नो वचो विदथा जातवेदसे ।
वैश्वानराय मतिर्नव्यसे शुचिः सोम इव पवते चारुरग्नये ॥ ८ ॥ (ऋ. ६।८।१)

६१० विश्वे देवा मम शृण्वन्तु यज्ञमुभे रोदसी अपां नपाच्च मन्म ।
मा वो वचाँसि परिचक्ष्याणि वोचँ सुम्नेष्विद्वो अन्तमा मदेम ॥ ९ ॥ (ऋ. ६।५२।१४)

६११ यशो मा द्यावापृथिवी यशो मेन्द्रबृहस्पती । यशो भगस्य विन्दतु यशो मा प्रतिमुच्यताम् ।
यशसा३स्याः सँसदोऽहं प्रवदिता स्याम् । ॥ १० ॥

---

[६०७] (अन्याः आपः संयन्ति) दुसरें वृष्टीचें पाणी मिळून जातें. (अन्याः उपयन्ति) दुसरें पाणीहीं त्यांत मिसळतें. तें सर्व पाणी (समानं नद्यः) सारखें मिळून नदींच्या रूपानें (ऊर्वं पृणन्ति) वडवानल-सागरांतील अग्निला आनन्दित करतें. (तं उ शुचिं दीदिवांसं अपां-नपातं) त्या शुद्ध तेजस्वी जलाच्या पौत्ररूपी अग्निजवळ (आपः उपयन्ति) सर्व जलप्रवाह पोंचतात. ॥ ६ ॥

१ अपां न-पातः— जलांना खालीं न पाडणारा मेघ. (अपां-नपातः) जलांचा पौत्र.

२ सर्व पाणी मिळून सागराला नद्यांच्या रूपानें मिळतें. तसें सोमरसामध्यें पाणी मिसळलें जातें. दोन प्रकारचें पाणी सोमरसामध्यें मिसळतात.

[६०८] (भद्रा युवतिः) कल्याण करणारी स्त्री (प्रगात्) रात्री आली आहे. (अह्नः केतून्) दिवसाच्या किरणांना (सं ईर्त्सति) प्रतिबन्ध करण्याची ती इच्छा करते. (विश्वस्य जगतः निवेशनी) सर्व जगाला विश्राम देणारी ही (रात्री भद्रा अभूत्) रात्री कल्याण करणारी झाली आहे. ॥ ७ ॥

[६०९] (प्रक्षस्य वृष्णः) व्यापक, बलवान् (अरुषस्य) व तेजस्वी अग्निच्या (महः) तेजाचें (नू) मीं स्तवन करतों. तें (नः वचः) आमचें स्तोत्र (विद्था) यज्ञामध्यें (जातवेदसे) अग्निच्या उद्देशानें (प्र) म्हटलें जातें. (नव्यसे वैश्वानराय अग्नये) नवीन सर्व मनुष्यांचें हित करणाऱ्या अग्निकडे तें (शुचिः चारुः मतिः) शुद्ध सुन्दर स्तोत्र (सोमः इव पवते) सोमाप्रमाणें जातें. ॥ ८ ॥

[६१०] (विश्वे देवाः) सर्व देव (मम यज्ञं मन्म) माझें पूज्य स्तोत्र (शृण्वन्तु) ऐकोत, (उभे रोदसी) दोनही द्युलोक व पृथिवी (अपां नपात्) अग्नि हें माझें स्तोत्र ऐकोत. हे (देवाः) देव हो ! (वः परिचक्ष्याणि) तुम्हीं न ऐकण्याजोगीं (वचांसि मा वोचं) स्तोत्रें मीं बोलणार नाहीं. म्हणूनच (वः अन्तमाः सुम्नेषु इत् मदेम) तुमच्याजवळ जाऊन तुम्ही दिलेल्या सुखांमध्यें राहून आम्ही आनन्दित होऊं. ॥ ९ ॥

[६११] (द्यावा-पृथिवी) द्युलोक व पृथिवी यांचें (यशः मा) यश मला प्राप्त होवो. (इन्द्रा बृहस्पती मा यशः) इन्द्र व बृहस्पती यांच्याकडून यश मला मिळो. (भगस्य यशः मा विन्दतु) भग देवाचें यश मला प्राप्त होवो. मला (यशः) यश (मा प्रति मुच्यताम्) सोडून दूर न जावो. (अस्याः संसदः यशसा) या संसदेच्या यशापासून मीं दूर होऊं नये. (अहं प्रवदिता स्यां) मीं सभेंत भाषण करणारा होईन. ॥ १० ॥

६१२ इन्द्रस्य नु वीर्याणि प्रवोचं यानि चकार प्रथमानि वज्री ।
अहन्नहिमन्वपस्ततर्द प्र वक्षणा अभिनत्पर्वतानाम् ॥ ११ ॥ (ऋ. १।३२।१)

६१३ अग्निरस्मि जन्मना जातवेदा घृतं मे चक्षुरमृतं म आसन् ।
त्रिधातुरर्को रजसो विमानोजस्रं ज्योतिर्हविरस्मि सर्वम् ॥ १२ ॥ (ऋ. ३।२६।७)

६१४ पात्यग्निर्विपो अग्रं पदं वेः पाति यह्वश्चरण२ं सूर्यस्य ।
पाति नाभा सप्तशीर्षाणमग्निः पाति देवानामुपमादमृष्वः ॥ १३ ॥ (ऋ. ३।५।५)

इति तृतीया दशतिः ॥ ३ ॥ तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

(१-१२) वामदेवो गौतमः ३-७ नारायणः ॥ १-२ अग्निः; ३-७ पुरुषः; ८ द्यावापृथिवी; ९-११ इन्द्रः; १२ गावः ॥ अनुष्टुप्; १-२ पंक्तिः; ८, ११, १२ त्रिष्टुप् ॥

६१५ आजन्त्यग्ने समिधान दीदिवो जिह्वा चरत्यन्तरासनि ।
स त्वं नो अग्ने पयसा वसुविद्रयिं वर्चो दृशेऽदाः ॥ १ ॥

---

[६१२] (वज्री) वज्र धारण करणाऱ्या इन्द्रानें (यानि प्रथमानि) जीं मुख्य (वीर्याणि चकार) पराक्रमाचीं कार्यें केलीं, त्या (इन्द्रस्य) इन्द्राचीं तीं पराक्रमाचीं कृत्यें (नु प्रवोचं) मीं वर्णन करतों. (अहिं अहन्) अहि-मेघाला त्यानें मारलें, (अनु अपः ततर्द) नंतर त्यांतून पाणी प्रवाहित केलें आणि (पर्वतानां वक्षणाः प्र अभिनत्) पर्वतांवरील नद्या वाहण्याजोग्या केल्या. ॥ ११ ॥

[६१३] (जन्मना अग्निः अस्मि) मीं जन्मानें अग्नि आहें. मीं (जात-वेदाः) सर्वज्ञ आहें. (मे चक्षुः घृतं) माझे डोळे-प्रकाशाचें साधन तूप आहे. (अमृतं मे आसन्) अमरपण माझ्या मुखांत आहे. (त्रिधातु अर्कः) प्राण, अपान व व्यान अशा तीन स्थितींमध्यें असणारा प्राण मी आहें. (रजसः विमानः) अन्तरिक्षाचें मापन करणारा वायु मी आहें. (अ-जस्रं ज्योतिः) सतत तेजःस्वरूप सूर्य मी आहें. (सर्वं हविः अस्मि) सर्व प्रकारचें हवि मी आहें. ॥ १२ ॥

मी जन्मानें अग्नि - तेजः स्वरूप आहें, मी सर्वज्ञ आहें. घृताच्या हवनानें प्रकाश होतो तो पाहणारा नेत्र मी आहें. अमरपण देणारी वाणी माझ्या मुखांत आहे. प्राण मी आहें, वायु मी आहें, सूर्य मी आहें, हवि हें माझें रूप आहे.

अग्नि म्हणजे अग्रणी, शरीरांत अग्रणी आत्मा आहे व तोच ज्ञानस्वरूप आहे. सर्वांत तोच आहे.

[६१४] (अग्निः) अग्नि (वेः विपः) गमनशील भूमीच्या (अग्रं पदं पाति) मुख्यस्थानाचें रक्षण करतो. (यह्वः सूर्यस्य चरणं पाति) महान् अग्नि सूर्याच्या गमनमार्गाचें रक्षण करतो. (नाभा) अन्तरिक्षामध्यें (सप्त शीर्षाणं) सात गणांमध्यें राहणाऱ्या मरुतांचें (पाति) रक्षण करतो. (ऋष्वः अग्निः) दर्शनीय असा हा अग्नि (देवानां उपमादं पाति) देवांना आनंद देणाऱ्या यज्ञाचें रक्षण करतो. ॥ १३ ॥

अग्नि, भूमि, अन्तरिक्ष व द्युलोकाचें रक्षण करतो. भूमिवर अग्निरूपानें, अन्तरिक्षांत विद्युत् रूपानें व द्युलोकांत सूर्यरूपानें अग्निच या तीन रूपांत आहे. मरुत् हे वायु आहेत, तेथें विद्युद् अग्नि आहे व यज्ञ तर अग्निनेंच होतो व तो हवनानें सर्व देवांना आनंदित करतो.

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[६१५] (समिधान अग्ने) हे प्रदीप्त झालेल्या अग्नि ! तुझ्या (आजन्ती आसनि) तेजस्वी मुखामध्यें तुझी (जिह्वा) जीभ, ज्वाला (चरति) हविचें भक्षण करते. हे (अग्ने वसुवित्) धनयुक्त अग्ने ! तूं (नः) आम्हांला (पयसा) दूधरूपी अन्नानें युक्त असें (रयिं) धन व (दृशे वर्चः) दर्शनीय तेज (अदाः) दे. ॥ १ ॥

६१६ वसन्त इन्नु रन्त्यो ग्रीष्म इन्नु रन्त्यः ।
वर्षाण्यनु शरदो हेमन्तः शिशिर इन्नु रन्त्यः ॥ २ ॥

६१७ सहस्रशीर्षाः पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ।
स भूमिꣳ सर्वतो वृत्वात्यतिष्ठद्दशाङ्गुलम् ॥ ३ ॥ (ऋ. १०।९०।१)

६१८ त्रिपादूर्ध्व उदैत्पुरुषः पादोऽस्येहाभवत्पुनः ।
तथा विष्वङ् व्यक्रामदशनानशने अभि ॥ ४ ॥ (ऋ. १०।९०।४)

६१९ पुरुष एवेदꣳ सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम् ।
पादोऽस्य सर्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवि ॥ ५ ॥ (ऋ. १०।९०।२)

६२० तावानस्य महिमा ततो ज्यायाꣳश्च पूरुषः ।
उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ॥ ६ ॥ (ऋ. १०।९०।३)

६२१ ततो विराडजायत विराजो अधि पूरुषः ।
स जातो अत्यरिच्यत पश्चाद्भूमिमथो पुरः ॥ ७ ॥ (ऋ. १०।९०।५)

---

[६१६] (वसन्तः इत् नु रन्त्यः) वसंतऋतु खरोखर रमणीय आहे. (ग्रीष्मः इत् नु रन्त्यः) ग्रीष्मऋतुही खरोखर रमणीय आहे (वर्षाणि शरदः हेमन्तः शिशिरः) वर्षा, शरद्, हेमन्त व शिशिर हे ऋतुसुद्धां (इत् नु रन्त्यः) रमणीय आहेत. ॥ २ ॥

[६१७] (सहस्रशीर्षाः) हजारों मस्तकें असलेला, (सहस्र-अक्षः) हजारों नेत्र व (सहस्रपात्) हजारों पाय असलेला एक पुरुष आहे, (सः भूमिं सर्वतो वृत्वा) तो भूमिला सर्व बाजूंनीं व्यापून (दशांगुलं अत्यातिष्ठत्) दहा इंद्रियांनीं अनुभवास येणाऱ्या या जगताला व्यापून शिल्लक राहिला आहे. ॥ ३ ॥

[६१८] (त्रिपाद् पुरुषः) तीन भागांचा हा पुरुष (ऊर्ध्वः उदैत्) उच्च भागीं राहिला आहे (अस्य पादः इह पुनः अभवत्) याचा चवथा भाग या संसारामध्यें पुनः पुनः प्रकट होत असतो, (साशन-अनशने अभि) अन्न खाणारे व अन्न न खाणारे अशा (तथा विष्वङ् व्यक्रामत्) विविध रूपांनीं तो चहूंकडे व्यापला आहे. ॥ ४ ॥

[६१९] (यत् भूतं) जें झालें व (यत् च भाव्यं) जें होणार आहे (इदं सर्वं पुरुषः एव) हें सर्व हा पुरुषच आहे. (अस्य पादः सर्वा भूतानि) याचा चवथा भाग हीं सर्व भूतें आहेत व (अस्य त्रिपाद् दिवि अमृतं) याचे तीन भाग द्युलोकांत अमर स्थितीमध्यें आहेत. ॥ ५ ॥

[६२०] (अस्य तावान् महिमा) या पुरुषाचा असा हा महिमा आहे. वास्तविक तो (पुरुषः) पुरुष (ततः ज्यायान् च) त्यापेक्षांही मोठा आहे. (उत अमृतत्वस्य ईशानः) व तो अमरपणाचा स्वामीहि आहे. (यत् अन्नेन अति रोहति) जें अन्नानें वाढतें त्याचाहि तो स्वामी आहे. ॥ ६ ॥

[६२१] (ततः विराट् अजायत) त्या पुरुषापासून विराट् पुरुष उत्पन्न झाला. (विराजः अधि पूरुषः) त्या विराट् पुरुषावर देखरेख करणारा एक पुरुष आहे. (सः जातः) तो उत्पन्न होतांच (अति अरिच्यतः) सर्वांहून तो श्रेष्ठ झाला. त्यानें प्रथम (भूमिं) भूमि उत्पन्न केली व (अथो पश्चात् पुरः) नंतर शरीरें उत्पन्न केलीं. ॥ ७ ॥

६२२ मन्ये वां द्यावापृथिवी सुभोजसौ ये अप्रथेथाममितमभि योजनम् ।
द्यावापृथिवी भवतꣳ स्योने ते नो मुञ्चतमꣳहसः ॥ ८ ॥ (अथर्व. ४।२६।१)

६२३ हरी त इन्द्र श्मश्रूण्युतो ते हरितौ हरी । तं त्वा स्तुवन्ति कवयः पुरुषासो वनर्गवः ॥९॥

६२४ यद्वर्चो हिरण्यस्य यद्वा वर्चो गवामुत । सत्यस्य ब्रह्मणो वर्चस्तेन मा सꣳसृजामसि ॥१०॥

६२५ सहस्तन्न इन्द्र दद्ध्योज ईशे ह्यस्य महतो विरप्शिन् ।
क्रतुं न नृम्णꣳस्थविरं च वाजं वृत्रेषु शत्रून्त्सहना कृधी नः ॥ ११ ॥

६२६ सहर्षभाः सहवत्सा उदेत विश्वा रूपाणि बिभ्रतीर्द्व्यूध्नीः ।
उरुः पृथुरयं वो अस्तु लोक इमा आपः सुप्रपाणा इह स्त ॥ १२ ॥

इति चतुर्थी दशतिः ॥ ४ ॥ चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

---

[६२२] हे (द्यावा-पृथिवी) द्युलोक व पृथिवीलोक हो ! (वां सु-भोजसौ) तुम्ही उत्तम भोजन देणारे आहांत असें (मन्ये) मी मानीत आहें. (ये) जे हे दोन लोक आहेत ते (अमितं योजनं) अपरिमित धन आदिक (अभि अप्रथेथां) आम्हांला देवोत. हे (द्यावा-पृथिवी) द्युलोक व पृथिवीलोक हो ! (स्योने भवतं) तुम्ही आम्हांसाठीं सुखदायी व्हा. (ते नः अंहसः मुंचतं) ते आम्हांला पापापासून सोडवोत. ॥ ८ ॥

[६२३] हे (इन्द्र) इन्द्रा ! (ते श्मश्रूणि हरी) तुझ्या मिशा हिरव्या रंगाच्या झाल्या आहेत. (उत उ ते हरितौ हरी) आणि तुझे दोनही घोडे पिवळट रंगाचे आहेत. (वनर्गवः) उत्तम गाई पाळणारे (कवयः पुरुषासः) ज्ञानी पुरुष (तं त्वा स्तुवन्ति) त्या तुला स्तवितात. ॥ ९ ॥

१ ते श्मश्रूणि हरी— सोमरस हिरवट असतो. तो प्याल्यामुळें तुझ्या मिशा हिरवट रंगाच्या झाल्या आहेत.

[६२४] (हिरण्यस्य यत् वर्चः) सुवर्णाचें जें तेज आहे, (यत् वा गवां यत् वर्चः) तसेंच गाईचें जें तेज आहे, (उत) तसेंच (सत्यस्य ब्रह्मणः वर्चः) सत्यज्ञानाचें जें तेज आहे (तेन मा संसृजामसि) त्या तेजानें मी युक्त होतों. ॥ १० ॥

[६२५] हे (विरप्शिन् इन्द्र) पुष्कळ धन बाळगणाऱ्या इन्द्रा ! (तत् सहः ओजः न दद्धि) तें बल व सामर्थ्य आम्हांला दे. (हि अस्य महतः ईशे) कारण तूं या मोठ्या बलाचा स्वामी आहेस. हे इन्द्रा ! (नः) आमच्या (क्रतुं न) यज्ञाप्रमाणें (नृम्णं स्थविरं वाजं) धन व विशेष मोठें सामर्थ्य (नः कृधि) आम्हांसाठीं दे व (वृत्रेषु शत्रून् सहना कृधि) युद्धांमध्यें शत्रूंना पराभूत करणारें बल आम्हांला दे. ॥ ११ ॥

[६२६] हे (सह-ऋषभाः) बैलांसह असणाऱ्या (सह-वत्साः) वासरांसह असणाऱ्या (द्व्यूध्नीः) दुप्पट दुग्धाशय असणाऱ्या (विश्वा रूपाणि बिभ्रतीः) अनेक रूपें धारण करणाऱ्या तुम्ही गाई (उदेत) आमच्याजवळ या. (उरुः पृथुः अयं लोकः वः अस्तु) मोठा व विशाल हा लोक तुमच्यासाठीं असो. (इमाः आपः) हे जलप्रवाह (सु-प्र-पाणाः इह स्त) सुखानें पिण्याजोगे तुम्हांला येथें लाभोत. ॥ १२ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५]

(१-१४) १ शतं वैखानसाः; २ विभ्राट् सौर्यः; ३ कुत्स आंगिरसः; ४-६ सार्पराज्ञी; ७-१४ प्रस्कण्वः काण्वः ॥
सूर्यः; १ अग्निः पवमानः; ४-६ आत्मा वा ॥ गायत्री; २ जगती; ३ त्रिष्टुप् ॥

६२७ अग्न आयूꣳषि पवस आसुवोर्जमिषं च नः । आरे बाधस्व दुच्छुनाम् ॥१॥ (ऋ. ९।६६।१९)

६२८ विभ्राड् बृहत्पिबतु सोम्यं मध्वायुर्दधद्यज्ञपतावविह्रुतम् ।
वातजूतो यो अभिरक्षति त्मना प्रजाः पिपर्ति बहुधा वि राजति ॥ २ ॥ (ऋ. १०।१७०।१)

६२९ चित्रं देवानामुदगादनीकं चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः ।
आप्रा द्यावापृथिवी अन्तरिक्षꣳसूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ॥ ३ ॥ (ऋ. १।११५।१)

६३० आयं गौः पृश्निरक्रमीदसदन्मातरं पुरः । पितरं च प्रयन्त्स्वः ॥ ४ ॥
(ऋ. १०।१८९।१; वा. य. ३।६)

६३१ अन्तश्चरति रोचनास्य प्राणादपानती । व्यख्यन्महिषो दिवम् ॥ ५ ॥
(ऋ. १०।१८९।२; यजु. ३।७)

---

[५] पञ्चमः खण्डः ।

[६२७] हे (अग्ने) अग्ने ! (आयूंषि पवसे) दीर्घ आयुष्य आम्हांला दे. (नः ऊर्जं इषं च आसुव) बल व अन्न दे आणि (दुच्छुनां आरे बाधस्व) राक्षसांना दूर कर. ॥ १ ॥

१ दुच्छुनां— (दुः-शुनां) वेडे कुत्रे, राक्षस, दुर्दैव, दुःखदायक.

[६२८] (वि-भ्राट्) विशेष प्रकाशमान् सूर्य (बृहत् सोम्यं मधु पिबतु) पुष्कळ सोमरस पिवो. (यज्ञ-पतौ) यज्ञ करणाऱ्याला (अ-वि-ह्रुतं आयुः दधत्) कुटिलतारहित आयुष्य प्राप्त हो. (वात-जूतः यः) वायुनें युक्त असलेला सूर्य (त्मना प्रजाः अभिरक्षति) स्वतःच सर्व प्रजांचें रक्षण करतो, त्यांस (पिपर्ति) अन्न पुरवितो व (बहुधा विराजति) अनेक प्रकारांनीं प्रकाशतो. ॥ २ ॥

१ अ-वि-ह्रुतं आयुः— ज्यांत उपद्रव नाहींत असें आयुष्य.
२ वात-जूतः सूर्यः त्मना प्रजाः अभिरक्षति पिपर्ति— वायुसह सूर्य सर्व प्राण्यांचें रक्षण करतो व त्यांना अन्न देऊन पुष्ट करतो.

[६२९] (देवानां चित्रं अनीकं उदगात्) देवांचें विलक्षण तेज समूहरूपी सूर्यमंडळ उदय पावलें आहे. हें मित्र, वरुण व अग्नि यांचें (चक्षुः) नेत्ररूप आहे. उदय होतांच यानें (द्यावापृथिवी अन्तरिक्षं आप्राः) द्युलोक, अन्तरिक्ष व भूलोक तेजानें भरून टाकले आहेत. (जगतः तस्थुषः च आत्मा) जंगम व स्थावर जगाचा आत्मा आहे. ॥ ३ ॥

[६३०] (अयं गौः) हा गतिमान् (पृश्निः) तेजस्वी सूर्य (आ अक्रमीत्) उदय होऊन वर आला आहे. (पुरः मातरं असदत्) प्रथमतः माता पृथिवीला तो प्राप्त झाला व नंतर तो (पितरं स्वः च प्रयन्) द्युलोकरूपी आपल्या पित्याला प्राप्त होतो. ॥ ४ ॥

[६३१] (अस्य रोचना) या सूर्याचा प्रकाश (अन्तः चरन्ति) आकाशांमध्यें संचार करतो. (प्राणाद् अपानती) उदयानंतर प्रकाश वर येतो व अस्तानंतर तो विलीन होतो. (महिषः दिवं व्यख्यत्) हा महान् सूर्य द्युलोकाला विशेषेंकरून प्रकाशित करतो. ॥ ५ ॥

६३२ त्रिंꣳशद्धाम वि राजति वाक्पतङ्गाय धीयते । प्रति वस्तोरह द्युभिः ॥ ६ ॥

(ऋ. १०।१८९।३; यजु. ३।८)

६३३ अप त्ये तायवो यथा नक्षत्रा यन्त्यक्तुभिः । सूराय विश्वचक्षसे ॥ ७ ॥

(ऋ. १।५०।२; अथर्व. १३।२।१७; २०।४७।१४)

६३४ अदृश्रन्नस्य केतवो वि रश्मयो जनाꣳअनु । भ्राजन्तो अग्नयो यथा ॥ ८ ॥

(ऋ. १।५०।३; अथर्व. १३।२।१८; २०।४७।१५)

६३५ तरणिर्विश्वदर्शतो ज्योतिष्कृदसि सूर्य । विश्वमाभासि रोचनम् ॥ ९ ॥

(ऋ. १।५०।४; अथर्व. १३।२।१९; २०।४७।१६)

६३६ प्रत्यङ् देवानां विशः प्रत्यङ्ङुदेषि मानुषान् । प्रत्यङ् विश्वꣳस्वर्दृशे ॥ १० ॥

(ऋ. १।५०।५; अथर्व. १३।२।२०; २०।४७।१७)

६३७ येना पावक चक्षसा भुरण्यन्तं जनाꣳअनु । त्वं वरुण पश्यसि ॥ ११ ॥

(ऋ. १।५०।६; अथर्व. १३।२।२१; २०।४७।१८)

आत्मपक्ष— (अस्य रोचना) या आत्म्याचें तेज (अन्तः चरति) शरिराच्या आंत संचार करीत असतें. (प्राणात् अपानती) प्राण व अपान यांच्या रूपानें त्याची गति शरिरांत होत असतें. हा (महिषः) मोठा शक्तिमान् आत्मा (दिवं व्यख्यत्) मस्तकामध्यें ज्ञानाचा प्रकाश देत राहतो.

[६३२] (वस्तोः त्रिंशत् धाम विराजति) दिवसाचे तीस मुहूर्त तो सूर्य (अह) निश्चयानें (द्युभिः विराजति) आपल्या किरणांनीं प्रकाशतो. (पतङ्गाय वाक् प्रति धीयते) त्या सूर्याची स्तुति केली जाते. ॥ ६ ॥

[६३३] (विश्व-चक्षसे सूराय) सर्वांना प्रकाश देणाऱ्या सूर्याचा उदय झाल्यानंतर (नक्षत्रा अक्तुभिः अप यन्ति) नक्षत्रें रात्रीबरोबर निघून जातात. (यथा त्ये तायवः) जसे ते चोर निघून जातात. ॥ ७ ॥

[६३४] (अस्य केतवः रश्मयः) या सूर्याचे प्रकाशाचे किरण (जनान् अनु वि अदृश्रन्) लोकांना पाहतात (यथा भ्राजन्तः अग्नयः) ज्याप्रमाणें प्रज्वलित झालेले अग्निचे किरण पाहतात. ॥ ८ ॥

[६३५] हे (सूर्य) सूर्या ! तूं (तरणिः) सर्वांचें तारण करणारा (विश्व-दर्शतः) सर्वांनीं पाहण्याजोगा (ज्योतिष्कृत् असि) प्रकाश करणारा आहेस. (विश्वं रोचनं आभासि) सर्व चमकणाऱ्या पदार्थांना प्रकाशित करतोस. ॥ ९ ॥

अध्यात्मपक्ष— हे (सूर्य) सर्वांना प्रेरणा करणाऱ्या परमात्मन् ! तूं (तरणिः) सर्वांचा तारणकर्ता आहेस. (विश्व दर्शतः) सर्वांनीं साक्षात्कार करण्याजोगा (ज्योतिष्कृत् असि) तेजस्वी गोलांचा कर्ता तूं आहेस. (विश्वं रोचनं आभासि) सर्व तेजस्वी लोकांना तूंच प्रकाशित करतोस. ॥ ९ ॥

[६३६] हे सूर्या ! तूं (देवानां विशः प्रत्यङ्) देवांचे जे प्रजाजन मरुत् आहेत त्यांच्यासमोर, (मानुषान् प्रत्यङ्) मनुष्यांच्यासमोर (विश्वं स्वर्दृशे प्रत्यङ्) सर्व विश्व पाहण्यासाठीं समोर (उदेषि) उदय पावत आहेस. ॥ १० ॥

[६३७] हे (पावक वरुण) पवित्र करणाऱ्या श्रेष्ठ सूर्या ! (त्वं) तूं (जनान् भुरण्यन्तं) प्राण्यांना पोषण करणाऱ्या या लोकाला (येन चक्षसा अनुपश्यसि) ज्या प्रकाशानें पाहतोस, त्या तुझ्या प्रकाशाची आम्ही स्तुति करतों. ॥ ११ ॥

*

६३८ उद्द्यामेषि रजः पृथ्वहा मिमानो अक्तुभिः । पश्यञ्जन्मानि सूर्य ॥ १२ ॥

(ऋ. १।५०।७; अथर्व. १३।२।२२; २०।४७।१९)

६३९ अयुक्त सप्त शुन्ध्युवः सूरो रथस्य नप्त्यः । ताभिर्याति स्वयुक्तिभिः ॥ १३ ॥

(ऋ. १।५०।९; अथर्व. १३।२।२४; २०।४७।२१)

६४० सप्त त्वा हरितो रथे वहन्ति देव सूर्य । शोचिष्केशं विचक्षण ॥ १४ ॥

(ऋ. १।५०।८; अथर्व. १३।२।२३; २०।४७।२०)

इति पञ्चमी दशतिः ॥ ५ ॥ पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

इति षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ इति सामवेद-संहितायामारण्यं काण्डं पर्व वा समाप्तम् ॥

---

[६३८] हे सूर्या ! (पृथु रजः द्यां उदेषि) तूं या विस्तृत अन्तरिक्ष व द्युलोकामध्यें संचार करतोस. (अहा अक्तुभिः मिमानः) दिवसांना रात्रींबरोबर मोजीत व (जन्मानि पश्यन्) जन्म घेणाऱ्या प्राणिमात्रांना पाहत जातोस. ॥ १२ ॥

[६३९] (सूर) सूर्यानें (शुन्ध्युवः सप्त अयुक्त) शुद्ध करणाऱ्या सात घोड्या आपल्या रथाला जोडल्या आहेत. (रथस्य नप्त्यः) ज्या रथाला चालवतात. (ताभिः स्वयुक्तिभिः याति) त्यांनीं व आपल्या योजनांनीं तो सूर्य जातो. ॥ १३ ॥

१ शुन्ध्युवः— सूर्यकिरण स्वच्छता करणारे आहेत.
२ सप्त— सूर्यकिरण सात रंगाचे आहेत.
३ रथस्य नप्त्यः— रथ चालवणाऱ्या त्या किरणरूपी घोड्या आहेत.

[६४०] (वि-चक्षण देव सूर्य) हे प्रकाशका सूर्यदेवा ! (सप्त हरितः) सात घोडे - सात किरण (शोचिष्केशं त्वा) शुद्ध करणारे ज्याचे किरण आहेत अशा तुला (रथे वहन्ति) रथामधून नेतात. ॥ १४ ॥

१ शोचिष्केशः— ज्याचे किरण शुद्धता करणारे आहेत तो सूर्य.
२ सप्त हरितः— सात रंगांचे सात किरण.

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति आरण्यं काण्डम् ॥

अथ महानाम्न्यार्चिकः ।

(१-१०) प्रजापतिः ॥ इन्द्रस्त्रैलोक्यात्मा ॥ त्रिकं= [९ प्रथमं द्विपदा+ (२) ततस्त्रयः शाक्वराः पादाः + (३) तत उपसर्गौ + (३) उभयं (शाक्वरोपसर्गौ) + (५) ततः शाक्वरास्त्रयः पादाः + (६) उपसर्गः]

६४१ विदा मघवन् विदा गातुमनुशꣳसिषो दिशः । शिक्षा शचीनां पते पूर्वीणां पुरूवसो ॥१॥

६४२ आभिष्ट्वमभिष्टिभिः स्वा३ऽर्नाꣳशुः । प्रचेतन प्रचेतयेन्द्र द्युम्नाय न इषे ॥ २ ॥

६४३ एवा हि शक्रो राये वाजाय वज्रिवः ।
शविष्ठ वज्रिन्नृञ्जसे मꣳहिष्ठ वज्रिन्नृञ्जस । आ याहि पिब मत्स्व ॥ ३ ॥

६४४ विदा राये सुवीर्यं भुवो वाजानां पतिर्वशाꣳअनु ।
मꣳहिष्ठ वज्रिन्नृञ्जसे यः शविष्ठः शूराणाम् ॥ ४ ॥

६४५ यो मꣳहिष्ठो मघोनामꣳशुर्न शोचिः । चिकित्वो अभि नो नयेंद्रो विदे तमु स्तुहि ॥५॥

६४६ ईशे हि शक्रस्तमूतये हवामहे जेतारमपराजितम् ।
स नः स्वर्षदति द्विषः क्रतुश्छन्द ऋतं बृहत् ॥ ६ ॥

---

[६४१] हे (मघवन्) धनवान् परमात्मन् ! (विदाः) तूं सर्व जाणत आहेस. (गातुं विदाः) तूं योग्य मार्ग जाणत आहेस. (दिशः अनु शंसिषः) आम्ही कोणत्या दिशांनीं जावें तें तूं आम्हांस उपदेश करून सांग. हे (पूर्वीणां शचीनां पते) आदि शक्तिच्या स्वामी ! (पुरु-वसो) हे धनसम्पन्न प्रभो ! (शिक्ष) आम्हांला शिक्षण दे. ॥ १ ॥

[६४२] हे (प्रचेतन) चैतन्य देणाऱ्या ईश्वरा ! हे (इन्द्र) इन्द्रा ! (स्वः न) सूर्याप्रमाणें (अंशुः) तेजस्वी तूं (आभिः अभिष्टिभिः) या संरक्षणांनीं (इषे द्युम्नाय) अन्न व तेज प्राप्त करण्यासाठीं आम्हांस (प्र चेतय) प्रेरित कर. ॥ २ ॥

[६४३] हे (मंहिष्ठ वज्रिवः) महान् व वज्रधारी इन्द्रा ! तूं (शक्रः एव हि) सामर्थ्यवान् आहेस. यासाठीं हे (शविष्ठ) बलवान् प्रभो ! तूं आम्हांस (राये वाजाय ऋञ्जसे) धन व बल किंवा अन्न प्राप्त करण्यासाठीं समर्थ करतोस. (ऋंजसे) आम्हांस सामर्थ्यवान् कर. (आ याहि) आमच्याजवळ ये. (पिब) हा सोम पी व (मत्स्व) आनंदित हो. ॥३॥

[६४४] हे इन्द्रा ! (राये सुवीर्यं विदाः) तूं धन मिळवण्यासाठीं उत्तम सामर्थ्य प्राप्त कसें करावें तें जाणत आहेस. (यः शूराणां शविष्ठः) जो शूर पुरुषामध्यें अधिक बलवान् आहे तसा तूं आहेस. हे (मंहिष्ठ वज्रिन्) महान् वज्रधारी इन्द्रा ! तूं (वाजानां पति भव) सर्व सामर्थ्यांचा स्वामी आहेस. तूं (वशान् अनु ऋंजसे) आपल्याला वश होऊन अनुकूल झालेल्यांना सामर्थ्यवान् करतोस. ॥ ४ ॥

[६४५] (यं मघोनां मंहिष्ठः) जो मोठ्या धनिकांमध्यें अति मोठा आहे (अंशुः न) स्वयं प्रकाशितांप्रमाणें (शोचिः) प्रकाशमान् आहे तसा तूं आहेस. हे (चिकित्वः) ज्ञानवान् ! तूं (इन्द्रः) ऐश्वर्यसम्पन्न आहेस, यासाठीं (नः विदे अभिनय) आम्हांला ज्ञान प्राप्त करण्यासाठीं योग्य मार्गानें ने. (तं ऊ स्तुहि) तूं त्याचीच प्रशंसा कर जो ज्ञानमार्गानें जातो. ॥ ५ ॥

[६४६] (शक्रः ईशे हि) सामर्थ्यवान् असतो तो स्वामित्व करतो, म्हणून (ऊतये जेतारं अपराजितं हवामहे) आमच्या संरक्षणासाठीं आम्ही विजयी व पराजित न होणाऱ्या वीराला बोलावीत आहों. (सः नः द्विषः सु अर्षत्) तो आमच्या शत्रूंना दूर करतो. तोच (क्रतुः) सत्कर्मांचा कर्ता, (छन्दः) रक्षक (ऋतं) सत्यभक्त व (बृहत्) मोठा आहे. ॥ ६ ॥

६४७ इन्द्रं धनस्य सातये हवामहे जेतारमपराजितम् ।
स नः स्वर्षदति द्विषः स नः स्वर्षदति द्विषः ॥ ७ ॥

६४८ पूर्वस्य यत्ते अद्रिवोऽ५शुर्मदाय । सुम्न आ धेहि नो वसो पूर्तिः शविष्ठ शस्यते ।
वशी हि शक्रो नूनं तन्नव्य५संन्यसे ॥ ८ ॥

६४९ प्रभो जनस्य वृत्रहन् त्समर्येषु ब्रवावहै ।
शूरो यो गोषु गच्छति सखा सुशेवो अद्वयुः ॥ ९ ॥

अथ पञ्च पुरीषपदानि ॥

६५० एवाह्येऽ३ऽ३ऽ३ व । एवा ह्यग्ने । एवाहीन्द्र ।
एवा हि पूषन् । एवा हि देवाः ॐ एवाहि देवाः ॥ १० ॥

इति पञ्च पुरीषपदानि ॥

इति महानाम्न्यार्चिकः समाप्तः ॥

इति सामवेद संहितायां पूर्वार्चिकः समाप्तः ॥

पूर्वार्चिकस्य मन्त्रसंख्या

१ आग्नेयस्य	काण्डस्य	(१-११४)	११४
२ ऐन्द्रस्य	काण्डस्य	(११५-४६६)	३५२
३ पावमानस्य	काण्डस्य	(४६७-५८५)	११९
४ आरण्यकस्य	काण्डस्य	(५८६-६४०)	५५
५ महानाम्न्यार्चिकस्य		(६४१-६५०)	१०
		सर्वयोगः	६५०

[६४७] (धनस्य सातये) धनाची प्राप्ति व्हावी यासाठीं आम्ही (अपराजितं जेतारं) पराभूत न होणाऱ्या विजयी (इन्द्रं) इन्द्राला सहाय्यासाठीं (हवामहे) बोलावीत आहों. (सः नः द्विषः अति अर्षत्) तो आमच्या शत्रूंना दूर करतो. ॥ ७ ॥

[६४८] हे (अद्रिवः) वज्रधारी इन्द्रा ! (पूर्वस्य) सर्वांत आधीं असणाऱ्या तुझा (यत् अंशुः मदाय) जो प्रकाश आनंद वाढवण्यासाठीं आहे; हे (वसो) सर्वांना वसवणाऱ्या इन्द्रा ! तो (नः सुम्ने आधेहि) आमच्या सुखासाठीं आम्हांला दे. हे (शविष्ठ) बलवाना ! (पूर्तिः शस्यते) पूर्णता करण्याच्या शक्तिचीच सर्वत्र प्रशंसा होत असते. (नूनं शक्रः वशी) निश्चयानें तूं सामर्थ्यवान् व सर्वांना वश करणारा आहेस. यासाठीं (तत् नव्यं संन्यसे) मी या नवीन स्तुतियोग्य अशा तुला आपल्या पुढें ठेवीत आहें. ॥ ८ ॥

[६४९] हे (वृत्रहन् प्रभो) वृत्राला मारणाऱ्या प्रभो ! (जनस्य समर्येषु प्र ब्रवावहै) लोकांमधील श्रेष्ठांमध्यें तुझीच प्रशंसा आम्हीं करतों. (यः) जो (गोषु गच्छति) गाईंमध्यें राहतो तो (सखा) मित्र (सुशेवः) उत्तम प्रकारें सेवा करण्यास योग्य व (अ-द्रयुः) अद्वितीय श्रेष्ठ आहे. ॥ ९ ॥

[६५०] (एवा हि एव) हें असेंच आहे, हे अग्ने ! (एवा हि) आपण असे प्रकाशस्वरूप आहांत, हे इन्द्रा ! (एवा हि) आपण असे शत्रूला पराभूत करणारे आहांत, हे (पूषन्) पूषा ! (एवा हि) तुम्ही असेच पोषण करणारे आहांत, हे (देवाः) सर्व देव हो ! तुम्ही असेच (एवा हि) दिव्यगुणसम्पन्न आहांत. ॥ १० ॥

आरण्यक काण्ड

संहिता - ब्राह्मण - आरण्यक - उपनिषद् असे प्राचीन वाङ्मयाचे चार विभाग आहेत. संहितेमध्यें मन्त्रपाठ, ब्राह्मणामध्यें यज्ञकाण्ड व आरण्यक आणि उपनिषदांमध्यें वेदमंत्रांतील अध्यात्मविद्या अधिक विस्तारानें दाखवलेली असते. हें आरण्यक काण्ड शेवटच्या महानाम्नि आर्चिकाशिवाय असलेलें मंत्र अगदीं थोडया अपवादांशिवाय ऋग्वेदाचेच मंत्र आहेत. त्यांचे पत्ते प्रत्येक मंत्राच्या खालीं दिले आहेत. जे मंत्र ऋग्वेदामध्यें नाहींत, तेथें ऋग्वेदांचें स्थान दिलेलें नाहीं.

आरण्यकांचा विषय अध्यात्मज्ञानाचें स्पष्टीकरण करण्याचा आहे. त्याप्रमाणें या सामवेदीय आरण्यक काण्डाचा विषयही अध्यात्मज्ञान प्रकट करण्याचाच आहे.

वेद चार आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद हे ते चार वेद आहेत. ऋग्वेदामध्यें देवतांची स्तुति आहे. यजुर्वेदामध्यें यज्ञकाण्डाचा विषय आहे. सामवेद हा उपासना वेद आहे व अथर्ववेदामध्यें ब्रह्मज्ञान मुख्यतः आहे. मुख्यतः जरी अशी विभागणी असली, तरी प्रत्येक वेदामध्यें कोणत्या ना कोणत्या रूपानें अध्यात्माचा विषय आलेला असतोच. यजुर्वेद हा यज्ञ काण्डाचा ग्रंथ आहे तरी त्याचा शेवटचा चाळीसावा अध्याय "ईश उपनिषद्" च आहे. अथर्ववेदामध्यें ब्रह्मज्ञानाचीं अनेक सूक्तें आहेत.

त्याचप्रमाणें सामवेदाच्या या आरण्यक काण्डामध्यें अध्यात्माचा विषय आलेला आहे. यांतील मंत्र ऋग्वेदाचे असले तरी त्याचा आशय अध्यात्माच्या दृष्टीनें पाहणें अधिक योग्य आहे.

यामध्यें अग्नि, इन्द्र, वायु, उषा आदि देवतांचे मंत्र आहेत. या विभिन्न देवता आहेत, यांचा अध्यात्माशीं संबंध नाहीं असें कांहीं समजतील, तसें समजून ते शंकाही करतील, पण याचें निरसन ऋग्वेदाच्या एका मंत्रानें उत्तम रीतिनें केलेलें आहे, तो मंत्र येथें पहा—

एक सत्य वस्तु

इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुः
अथो दिव्यः सः सुपर्णो गरुत्मान् ।
एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति
अग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥

(ऋ. १।१६४।४६; अथर्व. ९।१०।२८)

'(एकं सत्) सत्य वस्तु एकच आहे, परंतु त्या एका सद्वस्तूला (विप्राः बहुधा वदन्ति) ज्ञानीलोक अनेक नांवांनीं वर्णित असतात. तिलाच अग्नि, इन्द्र, मित्र, वरुण, दिव्य सुपर्ण, गरुत्मान्, यम, मातरिश्वा आदि नांवांनीं वर्णित असतात.' अर्थात् अग्नि, इन्द्र, वरुण आदि नांवें जरी विभिन्न असलीं तरी त्या नांवांनीं दाखवली जाणारी सद्वस्तु एकच आहे असें समजलें म्हणजे अनेक देवतावादाचें उत्तम खण्डन होतें व अनेक देवतांनीं मिळून एकच देवाचें प्रतिपादन केलें आहे असें ठरतें.

या आरण्यक काण्डाचा विचार करीत असतां आपल्या दृष्टिसमोर हेंच एकात्मवादाचें तत्त्व ठेवलें पाहिजे. ही दृष्टि ठेवून या काण्डाचा वाचकांनीं विचार करावा.

१ अथ तव व्रते वयं अ-दितये अनागसः स्याम (५८९)– हे ईश्वरा ! तुझ्या नियमांमध्यें राहून, आमचा विनाश होऊं नये या साठीं, आम्ही निष्पाप होऊं. "दिति" म्हणजे खण्ड होणें, तुकडे पडणें, विभक्त होणें. "अदिति" म्हणजे अखण्डित स्थिति, स्वतंत्रता, अविनाश, मोक्षाची अवस्था. ही अवस्था प्राप्त करण्यासाठीं आम्ही निष्पाप होऊं. परमेश्वराचे जे नियम आहे, मनुष्यांच्या उन्नतिसाठीं त्यानें जे नियम केले आहेत, त्या नियमांचें पालन करून आम्ही ती पूर्ण अवस्था प्राप्त करूं. मुक्त होण्याचें वर्णन हा मंत्र उत्तम रीतिनें करीत आहे—

पाश ढिले कर

१ उत्तमं पाशं अस्मत् उत् श्रथाय ।
मध्यमं पाशं अस्मत् वि श्रथाय ।
अधमं पाशं अस्मत् अव श्रथाय ।

उत्तम, मध्यम व अधम अशा तीन पाशांनीं मनुष्य बांधले गेले आहेत. बुद्धि, मन व शरीर याठिकाणीं हे पाश आहेत. बुद्धिचा पाश हा अज्ञानानें झालेला आहे. मनाचा पाश विचारहीनतेनें बनलेला आहे व शरीराचा पाश आचार-हीनतेनें निर्माण झालेला आहे. पुष्कळ माणसें या पाशांनीं जखडून बांधलीं गेलीं आहेत. उत्तम सत्यज्ञान प्राप्त करून बुद्धिचा पाश सैल करावा. सुविचारांनीं मनाचा पाश ढिला करावा व सदाचारानें शारीरिक पाश दूर करावा. असें करून या तीनही पाशांतून मनुष्य मुक्त होऊं शकतो.

२ त्वया भरे शश्वत् कृतं वयं चिनुयाम (५९०) - हे ईश्वरा ! तुझ्या सहाय्यानें नेहेमीं करावयाचें स्पर्धेतील कर्तव्य आम्ही विशेष काळजीनें करूं - प्रमाद न करतां करूं. मनुष्य या पृथ्वीवर उत्पन्न झाला तेव्हांपासून त्याच्या जीवनांत स्पर्धा लागलेलीच आहे. लहान असते ती स्पर्धा असते व तीच मोठी झाली म्हणजे तेंच युद्ध होतें व तोच संग्राम होतो. ही स्पर्धा चालूच आहे. या स्पर्धेतील आपलें कर्तव्य न चुकतां करणें व त्या स्पर्धेत विजयी होणें हेंच मनुष्याचें कर्तव्य आहे. पाश शिथिल करण्यासाठीं, बंधनें ढिलीं करण्यासाठीं याची आवश्यकता आहे.

३ वः अन्तमाः सुम्नेषु मदेम (६१०) - हे ईश्वरा ! तुझ्याजवळ राहून तूं दिलेल्या सुखांमध्यें आनंदानें आम्ही राहूं. मनुष्यानें देवांजवळ जाऊन रहावें. देवांचे गुण कोणते आहेत तें पहावें. तसे गुण आपणामध्यें वाढवावे व देवांच्या सान्निध्यांत आनंदानें रहावें. मानवांची उन्नति होण्याचें हेंच साधन आहे.

वेदामध्यें देवांची स्तुति याचसाठीं आहे. त्या स्तुतिमध्यें जे देवांचे गुण वर्णिले आहेत, ते गुण उपासकानें आपल्यामध्यें वाढवावे. हीच मनुष्याची उन्नति आहे. " यत् देवा अकुर्वन् तत् करवाणि " (शतपथ ब्राह्मण) जें देव करतात तसें मी करीन. हा उन्नतिचा नियम आहे व देवतांची जी स्तुति आहे तिचा विचार करून, तिचें मनन करून उपासकानें देवतेचे गुण आपणांमध्यें अधिकांत अधिक कसे वाढतील हेंच पाहिलें पाहिजे. देवतांची स्तुति मानवाची उन्नति करते ती अशा रीतिनें होय. प्रथम आपल्या अंगीं देवत्व आणावें व तें शुभ गुणांच्या वृद्धीनें वाढवावें. हेंच अनुष्ठान मनुष्यांनीं करावयाचें आहे.

अनिष्ट वचन न बोलणें

प्रथम वाणीची शुद्धता केली पाहिजे. ती अशी रीति आहे-

१ हे देवाः ! वः परिचक्ष्याणि वचांसि मा वोचं (६१०) - हे देव हो ! तुम्हांला न आवडणारें भाषण मी करणार नाहीं. ही रीति वाणीच्या शुद्धीकरणाची आहे. वाणी शुद्ध झाली म्हणजे पुष्कळ काम झाल्यासारखें आहे, असें समजावें.

शुद्ध मार्गाचें ज्ञान

आपल्या आचरणाचा मार्गही शुद्ध व स्वच्छ पाहिजे. याविषयी असें वेदवचन आहे —

१ हे मघवन् ! विदाः गातुं विदाः । दिशः अनु शंसिषः । पूर्वीणां शचीनां पते, पुरुवसो ! शिक्ष । (६४१) - हे धनवान् इन्द्रा ! तूं सर्व मार्ग जाणणारा आहेस. योग्य मार्ग कोंणता आहे तें तूं जाणत आहेस. कोणत्या दिशेनें जावें तें तूं आम्हांस उपदेश करून सांग. हे आदिशक्तिच्या स्वामी ! हे धनसम्पन्न प्रभो ! योग्य शिक्षण दे व नीट मार्गानें आम्हांस चालव.

ही प्रार्थना उपासकानें करावयाची आहे. ईश्वराजवळ अनन्य भावनेनें ही अशी प्रार्थना करावी, म्हणजे देवता मार्ग सुचवितात. अशा रीतिनें निर्दोष मार्ग ध्यानीं येतो. उपासकानेंहि कोणता मार्ग उत्तम आहे व कोणता हानिकारण आहे हें स्वतः विचार करून ठरवावयाचें असतें.

मला श्रेष्ठ होणें आहे

मला मोठें व्हावयाचें आहे. ही भावना मनांत प्रथमतः असली पाहिजे. या विषयींचे आदेश असे आहेत —

१ तत् नः मित्रो वरुणो मा महन्तां अदितिः सिन्धुः पृथिवी उत द्यौः (५९०) - " यासाठीं मित्र, वरुण, अदिति, सिन्धु, पृथिवी व द्यौ मला मोठें करोत. " यामध्यें पृथिवीपासून द्युलोकापर्यंत असणाऱ्या सर्व देवता मला मोठें होण्याच्या कामीं सहाय्यक होवोत अशी प्रार्थना आहे. मनुष्य मोठा होणार असेल तर त्याला या सर्व देवतांचें सहाय्य झालेंच पाहिजे. मनुष्याच्या शरीरांत या सर्व देवता आहेत. जर एखाद्या देवतेची प्रतिकूलता असेल तर तो अवयव रुग्ण होईल व याच्या उन्नतिचा मार्ग खुंटला आहे असें दिसेल.

२ इमं एकं वृषणं कृणुत (५९१) - याला अद्वितीय शक्तिमान् करा. अद्वितीय शक्तिमान् मनुष्य झाला तरच तो मोठा झाला असें समजलें जाईल.

३ हे प्रचेतन ! आभिः अभिष्टिभिः इषे द्युम्नाय प्र चेतय (६४२) - हे प्रेरक ईश्वरा ! या तुझ्या संरक्षणांनीं अन्न व तेज प्राप्त करण्यासाठीं आम्हांला प्रेरित कर. म्हणजे आम्हीं त्या मार्गानें जाऊं व अन्नवान् आणि तेजस्वी होऊं.

४ द्यावापृथिवी, इन्द्रा-बृहस्पती, भगस्य यशः मा विन्दतु (६११) - द्यु, पृथ्वी, इन्द्र, बृहस्पति व भग या देवांपासून मला यश प्राप्त होवो.

५ यशः मा प्रति मुच्यतां (६११) - यश मला सोडून दूर न जावो. सर्वदा यश मलाच मिळत राहो. अर्थात् मी सदा यशस्वी होत असावें.

६ एना मानुषाणां विश्वानि द्युम्नानि अर्यः सिषासन्तः वनामहे (५९३) - त्याच्या योगानें मनुष्यांजवळ

असणाऱ्या सर्व तेजांना प्राप्त करून, त्यांचा उपभोग घेण्याची इच्छा करणारे आम्ही उत्तम तेज प्राप्त करूं.

७ अस्याः संसदः यशसा अहं प्रवदिता स्याम् (६११)- या संसदेच्या यशानें मी युक्त होईन व मी या सभेंत उत्तम भाषण करणारा होईन.

सर्व प्रकारें माझी उन्नति होऊन मी सभेमध्यें उत्तम प्रकारें प्रभावी भाषण करणारा होईन. राष्ट्रामध्यें असा मान प्राप्त होणें हें एक उन्नतिचें मापच आहे.

पूर्णतेची प्रशंसा

जगामध्यें पूर्णतेचीच प्रशंसा होत असते म्हणून म्हटलें आहे—

१ पूर्तिः शस्यते । नूनं शक्रः वशी (६४८)- पूर्णता नेहमींच प्रशंसित होते. खरोखर जो सामर्थ्यवान् असतो तो सर्वांना वश करून आपल्या आधीन ठेवतो.

२ शक्रः ईशे हि (६४६)- जो सामर्थ्यवान् असतो तो ईशन करतो. निर्बल शासन करूं शकत नाहीं. यासाठीं म्हटलें आहे—

३ जेतारं अपराजितं ऊतये हवामहे (६४६)- जो विजयी व जो अपराजित आहे त्या वीराला आमच्या संरक्षणासाठीं आम्ही बोलावतों.

४ वज्रिवः शविष्ठ (६४३)- हे वज्रधारी बलवान् वीरा ! आमचें सहाय्य कर.

५ राये वाजाय ऋंजसे (६४३)- धन व अन्न यांची प्राप्ति करण्यासाठीं आम्हांला समर्थ करतोस.

६ यः शूराणां शविष्ठः, वाजानां वाजपतिः, वशान् अनु ऋंजसे (६४४)- जो शूरांमध्यें अधिक बलवान् आहे, जो बलिष्ठांमध्यें अधिक बलिष्ठ आहे, तो आपणांस जे वश असतात, त्यांना सामर्थ्यवान् करतो.

असलें सामर्थ्य आपणांस प्राप्त व्हावें, अशी इच्छा मनुष्यांनीं मनामध्यें धरावी. सामर्थ्य असलें म्हणजे धन मिळतें. या धनाविषयीं अशीं वचनें आढळतात.

धन

ज्यानें मनुष्य धन्य होतो तें धन होय. धन म्हणजे रुपयेच नव्हेत तर, घर, पुत्र, गाई, घोडे आदिही धन आहे. हें जवळ असलें म्हणजे मनुष्य धन्य होतो.

१ नः सुम्ने आधेहि (६४८)- आम्हांला सुख देणाऱ्या धनामध्यें ठेव.

२ धनस्य सातये जेतारं अपराजितं हवामहे (६४७)- धनाची प्राप्ति व्हावी यासाठीं विजयी व कधींहि पराजित न होणारा जो वीर आहे त्याला आम्ही आमच्या सहाय्यासाठीं बोलावतों.

३ राये सुवीर्यं विदाः (६४४)- धन प्राप्त व्हावें यासाठीं उत्तम पराक्रम करण्याची शक्ति आपणामध्यें कशी आणावी तें तूं जाणत आहेस.

४ राये वाजाय ऋंजसे (६४३)- धन प्राप्त व्हावें यासाठीं बल प्राप्त करावें याचें तूं समर्थन करतोस.

५ नः ऊर्जं इषं च आसुव (६२७)- आम्हांला सामर्थ्य व अन्न दे.

६ हे विरप्शिन् ! तत् सहः ओजः न दद्धि । अस्य महतः ईशे । नः नृम्णं स्थविरं वाजः कृधि (६२५)- हे पुष्कळ धन जवळ बाळगणाऱ्या इन्द्रा! तें साहस व सामर्थ्य आम्हांला दे. या महान् सामर्थ्याचा तूं स्वामी आहेस. तूं आम्हांला धन व मोठें स्थायी बल दे.

७ हिरण्यस्य, गवां, सत्यस्य ब्रह्मणः, यत् वर्चः, तेन मा संसृजामसि (६२४)- सोनें, गाई व सत्य ज्ञान यांचें जें तेज आहे त्यानें मला युक्त कर.

८ अमितं योजनं अभि अप्रथेथाम् (६२२)- अपरिमित धन योजनापूर्वक आम्हांला द्या.

९ द्यावापृथिवी स्योने भवतं, ते नः अंहसः मुञ्चतम् (६२२)- द्युलोक व पृथिवी आम्हांला सुख देणारे होवोत व ते आम्हांला पापापासून बचावोत.

आम्ही निष्पाप झालों, म्हणजे आमच्याकडे धन येईल; तसेंच बल, सामर्थ्यही प्राप्त होईल. धन आदि साधन मिळालें तरी आयुष्य असलें तरच त्या धनाचा उपयोग करतां येतो, म्हणून आयुष्याची आकांक्षाही धरावी असें सांगितलें आहे.

दीर्घ आयुष्य

१ अग्ने ! आयूंषि पवसे (६२७)- हे अग्ने ! आम्हांला दीर्घ आयुष्य दे.

२ यज्ञपतौ अ-विह्रुतं आयुः दधत् (६२८)- यज्ञ करणाराला उपद्रवरहित दीर्घ आयुष्य दे. आयुष्य असें असावें ही इच्छा या वचनांत आहे.

संरक्षण

आपणांस धन, बल, तेज, आयुष्य आदि मिळावें व आपलें संरक्षण व्हावें असें वाटणें हें स्वाभाविक आहे. या विषयींचीं वचनें पहा—

१ उग्रः उग्राभिः ऊतिभिः वाजेषु सहस्रप्रधनेषु नः अव (५९८)- तूं उग्र वीर आहेस, यासाठीं तुझ्या उत्तम संरक्षणांनीं लहान युद्धांमध्यें व महासंग्रामांमध्यें आमचें संरक्षण कर.

२ वातजूतः (सूर्यः) त्मना प्रजाः अभिरक्षति, पिपर्ति बहुधा विराजति (६२८)- वायुसह सूर्य स्वतःच सर्व प्रजांचें रक्षण करतो, सर्वांस अन्न पुरवतो व विशेष रीतिनें प्रकाशतो.

३ सूर्यः जगतः तस्थुषः आत्मा (६२९)- सूर्य हा स्थावर व जंगम जगताचा आत्मा आहे.

४ सूर्यः तरणिः विश्वदर्शतः ज्योतिष्कृत् असि विश्वं रोचनं आभासि (६३५)- सूर्य हा तारण करणारा, संरक्षक आहे. तो सर्व पाहणारा, प्रकाश करणारा आहे. सर्व विश्वाला तो प्रकाशित करतो.

युद्ध

संरक्षण करावयाचें असलें तर शत्रूबरोबर युद्ध करून शत्रूला पराभूत करावेंच लागतें. त्या शिवाय नीट संरक्षण होणें शक्य नसतें. यासाठीं युद्ध करणें आवश्यकच असतें. या युद्धासंबंधीं अशीं वचनें आहेत—

१ सः नः द्विषः सु अर्षत् (६४६)- तो आमच्या शत्रूंना दूर करतो.

२ वृत्रेषु शत्रून् सहना कृधि (६२५)- युद्धांमध्यें शत्रूंना आपल्या बलानें पराजित कर.

३ अहिं अहन् (६१२)- शत्रूला तूं मारलेंस.

४ हे अपूर्व्य मघवन् ! वृत्रहत्याय जायथाः (६०१) - हे अद्वितीय धनवान् इन्द्रा ! तूं वृत्राला मारण्यासाठीं उत्पन्न झाला आहेस.

याप्रमाणें शत्रूशीं युद्ध करणें अत्यावश्यक आहे व हें केल्याशिवाय प्रजाजनांचें संरक्षण होणें शक्य नाहीं. युद्धाला उत्तम वीर असावे लागतात. ते वीर कसे असावेत हें इन्द्र देवतेच्या वर्णनानें दाखवलें आहे. यासाठीं तें इन्द्रादि देवतांचें वर्णन आतां पहा—

देवतांचे गुण

देवतांमध्यें विशेष सामर्थ्य असतें. या सामर्थ्यामुळेंच देवत्व त्यांस प्राप्त झालेलें असतें. ते देवतांचे गुण पहा—

१ वज्रहस्त (५८६)- हातांत वज्र धारण करणारा इन्द्र.

२ इन्द्रः वज्री हिरण्ययः (५९७)- इन्द्र वज्र धारण करतो व तो सुवर्णाचीं आभूषणें धारण करतो.

३ अभिमाति-षाहः (६०३)- शत्रूंचा पराभव करणारा तो आहे.

४ वज्री यानि प्रथमानि वीर्याणि चकार, नु प्रवोचं (६१२)- वज्रधारी इन्द्रानें प्रथम जे पराक्रम केले त्यांचें मी वर्णन करतों.

५ इन्द्रः जगतः चर्षणीनां राजा (५८७)-
६ अधिक्षमा विषुरूपं यत् अस्ति (५८७)-
७ दाशुषे वसूनि ददाति (५८७)-
८ उपस्तुतं राधः अर्वाक् चोदत् (५८७)-

इन्द्र स्थावर जंगम व सर्व मानवांचा राजा आहे. या पृथिवी वर अनेक रंगरूपाचें जें कांहीं आहे, त्याचाही तो राजा आहे. दात्याला तो अनेक धनें देतो. जो त्याची स्तुति करतो, त्याच्याजवळ तो धन पाठवतो.

९ ज्येष्ठं ओजिष्ठं पपुरि श्रवः नः आभर (५८६)- श्रेष्ठ, बलवर्धक, पूर्णता करणारें यश व अन्न आम्हांला भरपूर दे.

१० परमेष्ठीः प्रजापतिः मयि वर्चः अथो यशः पयः दृंहतु (६०२)- परमेष्ठी प्रजापति मला तेज, यश आणि दूध देवो.

११ हे अग्ने ! नः पयसा रयिं दृशे वर्चः अदाः (६१५)- हे अग्ने ! आम्हांला दुधासह धन व तेज दे. आम्हांस अन्न मिळूं दे व तेजही प्राप्त होऊं दे.

१२ द्यावापृथिवी सुभोजसौ (६२२)- द्युलोक व भूलोक हे आम्हांस उत्तम भोजन देवोत.

१३ वरिवोवित् (५९२)- धन आपल्याजवळ बाळगणारा.

१४ रत्नधातमं अग्निं ईडे (६०५)- रत्नें देणाऱ्या अग्निची मीं स्तुति करतों.

देवतांचे गुण असे गुण आहेत. ते पहावें व त्या गुणांना आपणामध्यें वाढवण्याचें अनुष्ठान मनुष्यांनीं करावें व देवत्वानें युक्त व्हावें.

सर्व वेळ उत्तम आहे

लोक वेळेला दूषणें देत असतात; पण सर्व वेळ सारखाच असतो. पहा—

१ वसन्तः, ग्रीष्मः, वर्षाणि, शरदः, हेमन्तः, शिशिरः रन्त्यः (६१६) - हे सर्व ऋतु रमणीय आहेत. सुख देणारे आहेत. यासाठीं कालाला दोष देणें योग्य नव्हे. आपल्या प्रयत्नांमध्यें दोष असतात. ते प्रयत्न यथायोग्य झाले पाहिजेत, यासाठीं वेदांनीं " ऋतु " हें नांव मानवाला दिलें

आहे. मानवी जीवन हें यज्ञरूप - क्रतुरूप - झालें पाहिजे. या उद्देशानें म्हटलें आहे—

क्रतु

१ सः क्रतुः छन्दः ऋतं बृहत् (६४६)- तो कर्म करणारा आहे, त्याला पुरुषार्थ करण्याचा छन्द आहे, तो सत्यनिष्ठ व सरळ व्यवहार करणारा आहे, यासाठीं तो मोठा आहे. हे चार शब्द फारच महत्त्वाचे असल्यामुळें यांचे अर्थ पुढें दिले जात आहेत—

क्रतुः- निश्चय, शक्ति, बुद्धि, यज्ञ, अन्तःप्रकाश, प्रजा.
छन्दः- आनंद, निश्चय, इच्छा, तत्परता.
ऋतं- योग्य, सत्य, सामर्थ्य, शूर, पूज्य, तेजस्वी, नियम.
बृहत्- उच्च, मोठा, विपुल, सामर्थ्यवान, महान्.

असे यांचे अनेक उच्च अर्थ आहेत व ते अर्थ साधकाचा मार्ग दाखवित आहेत.

अन्न

अन्नाचा यज्ञ केला जातो. हें अन्न देवांच्या पूर्वीं उत्पन्न झालें.

१ देवेभ्यः पूर्वं अहं अमृतस्य ऋतस्य प्रथमजा अस्मि (५९४)- देवांच्या पूर्वीं, अमरत्व देणाऱ्या यज्ञाच्या पूर्वीं, मी अन्न उत्पन्न झालें आहें. आधीं अन्न झालें व नंतर ते खाणारे उत्पन्न झाले. गवत आधीं झालें, गवत खाणारे पशु नंतर झाले, फळ झाडें आधीं झालीं व फळें खाणारे मानव मागून झाले.

गाईंमध्यें दूध

१ कृष्णासु रोहिणीषु परुष्णीषु रुशत् पयः अधारयः (५९५)- काळचा, लाल, नाना रंगांच्या गाईंमध्यें तेजस्वी दूध तूं ठेवलेस. हें देवाचें मोठें सामर्थ्य आहे.

१ सहऋषभाः सहवत्साः दुघ्यूध्नीः विश्वा रूपाणि बिभ्रतीः उदेत (६२६)- बैलांबरोबर राहणाऱ्या, वांसराबरोबर असणाऱ्या, दुप्पट दुग्धाशय असणाऱ्या नाना रंगांच्या गाई आमच्याकडे येवोत.

दानाचें महत्त्व

अन्न उत्पन्न झालें, दूध मिळूं लागलें, त्यांचे यज्ञ होऊं लागले तेव्हां दान देण्याचें महत्त्व समजून आलें. त्या संबंधाचें वचन असें आहे—

१ यः मां ददाति स आवत्। अन्नं अदन्तं अहं अन्नं अद्मि (५९४)- जो मज अन्नाला दानरूपानें दुसऱ्यांस देतो, त्याचें संरक्षण होतें; पण जो दान न देतां अन्न स्वतःच खातो, त्या कंजूष माणसाला मी स्वतः अन्नच खाऊन टाकतें. अर्थात् अन्नाचें दान करावें व मग स्वतः अन्नाचें भक्षण करावें.

खरा मित्र

१ सखा सुशेवः अद्वयुः (६४९)- तो खरा मित्र आहे, जो उत्तम सेवा करण्यास योग्य आणि जो दुटप्पी वर्तन करीत नाहीं. आंत एक व बाहेर दुसरें असें ज्याचें वर्तन असतें तो खरा मित्र नव्हे.

कल्याण करणारी रात्री

१ भद्रा युवतिः रात्री प्रागात्, अह्नः केतून् सं ईर्त्सति, विश्वस्य जगतः निवेशनी रात्री भद्रा अभूत् (६०८)- कल्याण करणारी रात्रीरूपी स्त्री आली आहे. ती दिवसाच्या प्रकाशाला प्रतिबंध करीत आहे. सर्व जगाला विश्राम देणारी ही रात्री खरोखर लोकांचें हित करणारी आहे.

कुत्यांना दूर करा

१ दुच्छुना आरे बाधस्व (६२७)- दुष्ट कुत्यांना दूर कर. दुष्टांना दूर कर, दुष्ट आमच्या कार्यांत विघ्न करणार नाहींत असें कर.

घोडे

देवांच्या रथाला घोडे जुंपलेले असत. त्यांचें वर्णन असें केलेलें आढळतें—

१ इन्द्र इत् हर्योः सचा आ संमिश्लः वचोयुजा (५९७)- खरोखर इन्द्र हा घोड्यांचा खरा मित्र, त्या घोड्यांना आपल्या रथाला जोडणारा आहे व ते घोडे शब्द बोलतांच रथाला जोडले जात असत, इतके ते सुशिक्षित होते. इतके सुशिक्षित घोडे शिकवून तयार करावें.

२ वायो! नियुत्वान् आगहि (६००)- हे वायो! तूं आपल्या नियुत नामक घोड्यांना रथाला जोडून ये.

येथें वायुचे घोडे " नियुत " आहेत. " नियुत " या शब्दाचा अर्थही रथाला उत्तम रीतिनें जोडले जाणारे असा आहे.

३ शुन्ध्युवः सप्त अयुक्त, रथस्य नप्त्यः (६३९)-
४ सप्त हरितः शोचिष्केशं त्वा रथे वहन्ति (६४०) - शुद्ध करणाऱ्या सात घोड्या, शुद्ध करणारे किरण आहेत अशा तुला रथांतून नेतात.

येथें सूर्याला " शोचिष्केशं " असें म्हटलें आहे. शुद्ध करणारे सूर्याचे किरण आहेत. सात घोडे हे प्रकाशाच्या आंत

असणारे सात रंगाचे किरण होत. अर्थात् सात घोडे अथवा घोडचा हा अलंकार आहे. वायुचे व इन्द्राचे घोडे हाही आलंकारिक प्रयोग आहे. वायु रथांत बसतो, इन्द्र व सूर्य रथांत बसतात, हा अलंकार आहे. खऱ्या घोडयांचा येथें संबंधच नाहीं. परंतु घोडे असल्याप्रमाणें वर्णन मात्र केलेलें आहे.

नक्षत्रें

रात्रीच्या वेळीं नक्षत्रें आकाशांत असतात व दिवसा सूर्य येतांच तीं जातात. जसे चोर रात्रीं हिंडतात व दिवसा पळून जातात. हें वर्णन पहा—

१ **नक्षत्रा अक्तुभिः अपयन्ति यथा त्ये तायवः** (६३३)– जसे चोर रात्र जाऊं लागली म्हणजे तिच्याबरोबर पळून जातात, त्याप्रमाणें नक्षत्रें रात्रीबरोबर निघून जातात. हें एक उत्तम आलंकारिक वर्णन आहे.

मोक्ष

मनुष्यांनीं जो प्रयत्न करावयाचा तो बंधनांतून सुटून मोक्षसुख प्राप्त व्हावें यासाठींच होय. सगळे आध्यात्मिक ज्ञान, आतांपर्यंत सांगितलेलें सर्व अनुष्ठान हें बंधननिवृत्ति व मोक्षप्राप्ति यासाठींच आहे. याविषयीं म्हटलें आहे—

१ **अमृताय आप्यायमानः दिवि उत्तमानि श्रवांसि धिष्व** (६०३)– अमरत्व प्राप्त करण्यासाठीं उच्च स्थिति प्राप्त करीत द्युलोकांतील उत्तम अन्नें प्राप्त कर. स्वर्गांतील उत्तम उपभोग प्राप्त कर.

अमरत्व प्राप्त करण्याच्या इच्छेनें जें अनुष्ठान केलें जातें, तें करीत असतांना मनुष्याची उन्नति होत राहते व त्याला उन्नतिच्या मार्गामध्यें स्वर्गभोग मिळत असल्याचे आनंद प्राप्त होत असतात. हा साधक पृथिवीवर असतो, पण याचें मन दिव्य आनंद प्राप्त करतें. हा या अनुष्ठानापासून तें करणाऱ्याला प्रत्यक्ष अनुभव येत असतो. याला द्युलोकांत जावें लागत नाहीं. पण येथेंच त्याला दिव्य सुखाची प्राप्ति होते व तो सदा आनंदप्रसन्न राहतो.

ऋषिंचें कार्य

१ **कवयः पुरुषासः त्वा स्तुवन्ति** (६२३)– कवि जे असतात ते देवतांची स्तुति करतात. ही स्तुति मनुष्यांना उन्नतिचा मार्ग दाखवते. यासाठीं ही स्तुति काळजीपूर्वक साधकांनीं वाचावी व त्यांतील अर्थ व गूढार्थ लक्ष्यांत आणावा व तो आपल्या मनांत मुरवावा.

२ **ते गोनां नाम प्रथमं अमन्वत । त्रिः सप्त परमं नाम जानन्** (६०६)– त्या ऋषींना वाणीचे शब्द प्रथम विचार करून स्तुति करण्यास योग्य आहेत असें समजलें. ही स्तुति एकवीस छंदांत होऊं शकते असें त्यांच्या अनुभवाला आलें.

भाषेच्या शब्दांत गूढ अर्थ आहे व त्या शब्दांनीं एकवीस छंदांमध्यें स्तोत्रें होतात हें त्यांना समजलें. हेंच त्या ऋषींचें मोठें ज्ञान होय. हें ज्ञान झाल्यानंतर अनेक छंदांमध्यें स्तोत्रें झालीं व मंत्र प्रकट झाले. त्या मंत्रांत गूढ अध्यात्मविद्या प्रकट झालेली आहे. ती पाहण्यासाठीं मानवजाती उत्पन्न झाली आहे. मानवांची कृतकृत्यता या ज्ञानानें व्हावयाची आहे.

वैश्वानराची कल्पना

वैश्वानर, विश्वकृष्टि, सर्व मानुष अथवा पृथिवीवरचे सर्व मनुष्य मिळून एक ' पुरुष ' आहे. पृथ्वीवरचे सर्व मनुष्य एक ' शरीर ' आहे. इतकी एकता या मनुष्य समाजामध्यें झाली पाहिजे, हें ध्येय याठिकाणीं वेदानें सांगितलें आहे. ते मंत्र आतां पहा—

१ **सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् । स भूमिं सर्वतो वृत्वात्यतिष्ठद्दशांगुलम्** (६१७)– हजारों मस्तकें, हजारों नेत्र व हजारों पाय असलेला एक पुरुष आहे. तो भूमिच्या चारही बाजूंवर व्यापून, दहा इंद्रियांनीं दिसणाऱ्या जगाला व्यापून तो राहिला आहे.

पृथ्वीवर आज दोनशें कोटी मानव आहेत असें समजलें तर त्या मानवसमाजरूपी पुरुषाचीं दोनशें कोटी मस्तकें, चारशें कोटी पाय, चारशें कोटी नेत्र, कान वगैरे अवयव व त्या मानानें पोटें वगैरे आहेत. पृथिवीवर हा चारही बाजूस आहे. हे सर्व दोनशें कोटी मिळून एका शरीराप्रमाणें यांनीं आपला व्यवहार एकोप्यानें करावा. एका शरीरांतील, शिर, हात, पोट व पाय हे जसे एकमेकांना मदत करून सुखानें राहतात, त्याप्रमाणें सर्व मानवांनीं एकोप्यानें राहून आपली उन्नति करून घ्यावी हा संदेश वेदानें येथें दिला आहे. हा संदेश व्यवहारामध्यें आणण्याची खटपट सर्वांनीं मिळून करावी हेंच येथें सुचवावयाचें आहे.

आरण्यक काण्डांतील सुभाषितें

१ **ज्येष्ठं ओजिष्ठं पपुरि श्रवः नः आभर** (५८६)– श्रेष्ठ व बल वाढवणारें, इच्छा तृप्त करणारें अन्न आम्हांला भरपूर दे.

२ **इन्द्रः जगतः चर्षणीनां राजा** (५८७)– इन्द्र-प्रभु-हा चालणाऱ्या प्राण्यांचा व मानवांचा राजा आहे.

३ **अधिक्षमा विश्वरूपं यत्, अस्य राजा** (५८७)

– या पृथिवीवर अनेक रूपें असलेलें जें कांहीं आहे, त्याचाहि तोच राजा आहे.

४ दाशुषे वसूनि ददाति (५८७)- जो दान देतो त्याला तो राजा धनें देतो.

५ उपस्तुतं राधः अर्वाक् चोदत् (५८७)- ईश्वराची स्तुति करणाऱ्याजवळ तो धन पाठवतो.

६ यस्य रजोयुजः इन्द्रस्य इदं बृहत् रन्त्यं स्वः तुजे जने वनम् (५८८)- या तेजस्वी इन्द्राचें हें मोठें रमणीय धनाचें दान दानी प्रेरणा करणाऱ्या लोकांत प्रशंसनीय आहे.

७ वरुणः! उत्तमं पाशं अस्मत् उत् श्रथाय (५८९) – हे वरुण ! उत्तम बंधन आमच्यापासून दूर कर.

अधमं पाशं अवश्रथाय (५८९)- अधम पाश ढिला कर.

मध्यमं पाशं विश्रथाय (५८९)- मध्यम पाश ढिला कर.

८ तव व्रते वयं अ-दितये अनागसः स्याम (५८९) – तुझ्या नियमांप्रमाणें वागून आम्ही स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं निष्पाप होऊं.

९ पवमानेन त्वया भरे शश्वत् कृतं वयं विचिनुयाम (५९०)- शुद्ध असणाऱ्या अशा तुझ्या सहाय्यानें युद्धांमध्यें नेहमीं करावयाचें कर्तव्य आम्हीं काळजीपूर्वक करीत राहूं.

१० तत् मा महन्तां (५९०)- त्याच्यायोगानें मला मोठेंपण प्राप्त होवो.

११ इमं एकं वृषणं कृणुत (५९१)- या एकाला तुम्ही बलवान् करा.

१२ एना मानुषाणां विश्वानि द्युम्नानि अर्यः सिषासन्तः, वनामहे (५९३) - याच्यायोगानें मानवांना इष्ट अशा सर्व धनांच्याजवळ जाऊन, त्यांना उपभोगण्याची इच्छा करणारे आम्ही, तीं धनें प्राप्त करतों.

१३ अमृतस्य ऋतस्य प्रथमजा अस्मि (५९४)- अमर यज्ञाच्या पूर्वी अन्न झालें आहे. मीहि यज्ञाच्या पूर्वी झालों आहे, म्हणून मी या अन्नाचा यज्ञ करतों.

१४ यः मां ददाति स आवत् (५९४)- जो या अन्नाचें दान करतो, तो सर्वांचें संरक्षण करतो.

१५ अन्नं अदन्तं अहं अन्नं अद्मि (५९४)–अन्नाचें दान न करतांच जो तें स्वतः खातो, त्याला तें अन्न खाऊन टाकतें.

१६ हे इन्द्र ! कृष्णासु, रोहिणीषु, परुष्णीषु रुशत् पयः अधारयः (५९५)- हे इन्द्रा ! तूं काळया, लाल व नाना रंगांच्या गाईंमध्यें तेजस्वी दूध ठेवलें आहेस.

१७ उषसः अग्रियः पृश्निः अरूरुचत् (५९६)- उषःकालानंतर प्रथम उगवणारा सूर्य प्रकाशूं लागतो.

१८ भुवनेषु वाजयुः (५९६)- प्राण्यांमध्यें अन्न खाण्याची इच्छा असते.

१९ मायाविनः अस्य मायया ममिरे (५९६)- कुशल लोक आपल्या कौशल्यानें निर्मिती करतात.

२० उग्रः उग्राभिः ऊतिभिः वाजेषु सहस्रप्रधनेषु च नः अव (५९८) - तूं शूर आहेस, म्हणून आपल्या विशेष संरक्षणांनीं लहान व मोठया संग्रामांमध्यें आमचें रक्षण कर.

२१ परमेष्ठी प्रजापतिः मयि वर्चः, यशः, पयः दृंहतु (६०२)- परमेश्वर मला तेज, बल, यश व दूध भरपूर देवो.

२२ अभिमाति-षाहः ते पयांसि वाजाः वृष्ण्यानि सं यन्तु (६०३)- तूं शत्रूंचा पराभव करणारा आहेस, म्हणून तुला, दूध, अन्न, बल यांची प्राप्ति होवो.

२३ अमृताय आप्यायमानः दिवि उत्तमानि श्रवांसि धिष्व (६०३)- मोक्षप्राप्तिसाठीं तूं आपली उन्नति करीत, द्युलोकांमध्यें उत्तम यश प्राप्त कर.

२४ त्वं तमः ज्योतिषा वि ववर्थ (६०४)- तूं अन्धकाराचा तेजानें नाश करतोस.

२५ पुरोहितं, यज्ञस्य देवं, ऋत्विजं, होतारं, रत्नधातमं अग्निं ईडे (६०५)- पुढें राहणाऱ्या, यज्ञाचा प्रवर्तक, ऋतुप्रमाणें यज्ञ करणाऱ्या, देवांना आपल्याबरोबर आणणाऱ्या व उपासकांना रत्नें देणाऱ्या अग्रणीची मी स्तुति करतों.

२६ भद्रा युवतिः रात्री आ प्रागात् (६०८)- कल्याण करणारी रात्रीरूप स्त्री आली आहे.

२७ विश्वस्य जगतः निवेशनी रात्री भद्रा अभूत् (६०८)- सर्व जगताला आराम देणारीही रात्री सर्वांचें कल्याण करणारी आहे.

२८ प्रक्षस्य वृष्णः अरुषस्य महः नः वचः (६०९) – व्यापक, बलवान् व तेजस्वी देवाच्या महान् तेजाची मी स्तुति करतों.

२९ वैश्वानराय शुचिः चारुः मतिः (६०९)- सर्व मनुष्यांचें हित करणाराची शुद्ध व सुन्दर स्तुति केली जात आहे.

३० हे देवाः ! वः परिचक्ष्याणि वचांसि मा वोचं (६१०)- हे देव हो ! तुम्हीं न ऐकण्याजोगें भाषण मी करणार नाहीं.

३१ वः अन्तमाः सुम्नेषु इत् मदेम (६१०)-

तुमच्या जवळ राहून तुम्हीं दिलेल्या सुखांमध्यें आम्ही आनंदानें राहूं.

३२ यशः मा प्रति मुच्यतां (६११)- यश मला सोडून दूर न जावो. मला यश मिळत राहो.

३३ अस्याः संसदः यशसा अहं प्रवदिता स्याम् (६११)- या सभेमध्यें यशस्वीपणानें बोलणारा मी व्हावें.

३४ वज्री यानि प्रथमानि वीर्याणि चकार, प्रवोचम् (६१२)- वज्रधारी इन्द्रानें जे प्रथम पराक्रम केले, त्यांचें वर्णन मी करतों.

३५ जन्मना जातवेदाः अग्निः अस्मि (६१३)- जन्मानें मी सर्वज्ञ अग्रणी आहें.

३६ हे वसुवित् अग्ने ! नः पयसा रयिं दृशे वर्चः अदाः (६१५)- हे धनवान् अग्ने ! आम्हांला दुधासह धन व दर्शनीय तेज दे.

३७ वसन्तः, ग्रीष्मः, वर्षाणि, शरदः, हेमन्तः, शिशिरः, रन्त्यः, (६१६)- वसन्त, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमन्त व शिशिर हे ऋतु रमणीय आहेत.

३८ सहस्रशीर्षा, सहस्राक्षः, सहस्रपात्, पुरुषः, स भूमिं विश्वतो वृत्वा, दशांगुलं अत्यतिष्ठत् (६१७) –हजारों मस्तकें, हजारों डोळे व हजारों पाय असलेला एक पुरुष आहे. तो सर्व भूमिवर चारही बाजूंनीं व्यापून, दहा अंगुलांसमान या विश्वाला व्यापून राहिला आहे.

३९ त्रिपाद् पुरुषः ऊर्ध्वः उदैत् (६१८)- तीन भागांचा हा पुरुष वर स्वर्गस्थानांत राहिला आहे.

४० अस्य पादः इह पुनः अभवत् (६१८)- याचा एक भाग या जगांत पुनः पुनः उत्पन्न होत असतो.

४१ ततः अशन–अनशने अभि विष्वङ् व्यक्रामत् (६१८)- नंतर अन्न खाणारे व न खाणारे अशा विविध रूपांनीं तो चहूंकडे प्रकट होत असतो.

४२ यत् भूतं यत् च भाव्यं, इदं सर्वं पुरुष एव (६१९)- जें झालें व जें होणार आहे, तें सर्व हा पुरुषच आहे.

४३ अस्य पादः सर्वा भूतानि (६१९)- याचा एक भाग हीं सर्व उत्पन्न झालेलीं भूतें आहेत.

अस्य त्रिपाद् दिवि अमृतं (६१९)- याचे तीन भाग द्युलोकामध्यें अमर आहेत.

४४ अस्य तावान् महिमा (६२०)- याचा असा महिमा आहे.

४५ अमृतत्वस्य ईशानः (६२०)- अमरपणाचा तो स्वामी आहे.

४६ ततः विराट् अजायत (६२१)- त्या पुरुषापासून विराट् पुरुष झाला आहे.

४७ विराजः अधि पूरुषः (६२१)- विराट् पुरुषाचा अधिष्ठाता एक पुरुष आहे.

४८ स जातः अत्यरिच्यत, भूमिं पश्चात्, पुरः (६२१)- तो झाल्यावर श्रेष्ठ झाला, प्रथम भूमि व नंतर पृथिवीवरील इतर पदार्थांच्या रूपानें तो प्रकट झाला.

४९ हे द्यावापृथिवी ! वां सुभोजसौ (६२२)- हे द्यु व पृथ्वीलोक हो ! तुम्ही उत्तम भोजन देणारे आहांत.

५० हे द्यावापृथिवी ! स्योने भवतं (६२२)- हे द्यावा पृथिवी हो ! तुम्ही आम्हांस सुख देणाऱ्या व्हा.

५१ ते नः अंहसः मुंचतम् (६२२)- तुम्ही आम्हांस पापापासून सोडवा.

५२ अमितं योजनं अभि अप्रथेथां (६२२)- आम्हांस अपरिमित धन योजनापूर्वक द्या.

५३ वनर्गवः कवयः पुरुषासः त्वा स्तुवन्ति (६२३) – गाई पाळणारे कवि पुरुष तुझी - इन्द्राची - स्तुति करतात.

५४ हिरण्यस्य, गवां, सत्यस्य ब्रह्मणः यत् वर्चः, तेन मां संसृजामसि (६२४)- सोनें, गाई व सत्यज्ञान यांत जें तेज आहे त्या तेजानें मला युक्त कर.

५५ हे विरप्शिन् ! सहः ओजः नः दद्धि (६२५)- हे पुष्कळ धनवान् ! आम्हांला सामर्थ्य व बल दे.

५६ अस्य महतः ईशे (६२५)- या मोठ्या बलाचा तूं ईश आहेस.

५७ नः नृम्णं स्थविरं वाजं कृधि (६२५)- आमच्यासाठीं धन व स्थायी मोठें बल दे.

५८ वृत्रेषु शत्रून् सहना कृधि (६२५)- लढाईमध्यें शत्रूंना पादाक्रान्त करण्याचें सामर्थ्य आम्हांला दे.

५९ सह–ऋषभाः सहवत्साः द्रुग्धनीः उदेत (६२६) – बैलांबरोबर राहणाऱ्या, वांसराबरोबर असणाऱ्या, दुप्पट मोठा दुग्धाशय असणाऱ्या गाई आमच्याजवळ येवोत.

६० उरुः पृथुः अयं लोकः (६२६)- हा भूलोक तुमच्यासाठीं मोठा विस्तृत असा होवो.

६१ अग्ने ! आयूंषि पवसे (६२७)- हे अग्ने ! तूं दीर्घ आयुष्य दे.

६२ नः ऊर्जं इषं च आसुव (६२७)- आम्हांला बल व अन्न दे.

६३ दुच्छुनां आरे बाधस्व (६२७)- दुष्टांना दूर कर.

६४ यज्ञपतौ अविह्रुतं आयुः दधत् (६२८)- यज्ञकर्त्याला उपद्रवरहित आयुष्य दे.

६५ प्रजाः अभिरक्षति, पिपर्ति (६२८)- तो प्रजाजनांचें रक्षण करतो व अन्न पुरवतो.

६६ सूर्यः जगतः तस्थुषः च आत्मा (६२९)- सूर्य हा स्थावर जंगम जगाचा आत्मा आहे.

६७ महिषः दिवं व्यख्यत् (६३१)- हा महान् सूर्य द्युलोकाला प्रकाशित करतो.

६८ यथा त्ये तायवः, विश्वचक्षसे सूराय, नक्षत्रा अक्तुभिः अपयन्ति (६३३)- जसे ते चोर, त्याप्रमाणें सर्वांना प्रकाश देणाऱ्या सूर्याचा उदय होतांच, नक्षत्रें रात्रीबरोबर निघून जातात.

६९ अस्य केतवः रश्मयः जनान् अनु व्यदृश्यन् (६३४)- या सूर्याचे किरण लोकांना पाहतात. लोकांचें निरीक्षण करतात.

७० तरणिः विश्वदर्शतः ज्योतिष्कृत् असि (६३५) - तूं सर्वांचा तारक, सर्वांनीं पाहण्याजोगा व प्रकाश करणारा आहेस.

७१ विश्वं रोचनं आभासि (६३५)- सर्व तेजस्वी पदार्थांना प्रकाशित करतोस.

७२ मानुषान् विश्वं स्वर्दृशे प्रत्यङ् उदेषि (६३६)- मानवांसमोर सर्व विश्व दिसावें म्हणून उदय पावत आहेस.

७३ मघवन् ! विदाः (६४१)- हे धनवान् परमात्मन् ! तूं सर्व जाणत आहेस.

७४ गातुं विदाः (६४१)- तूं योग्य मार्ग जाणत आहेस.

७५ दिशः अनु संशिषः (६४१)- आम्ही कोणत्या दिशांनीं जावें तें सांग.

७६ पूर्वीनां शचीनां पते ! पुरुवसो ! शिक्ष (६४१) -आदि-शक्तिच्या स्वामी ! धनवान् ! आम्हांला ज्ञान दे.

७७ प्रचेतन ! आभिः अभिष्टिभिः इषे द्युम्नाय प्र चेतय (६४२)- हे चेतना देणाऱ्या देवा ! या संरक्षणांनीं अन्न व तेज प्राप्त करण्यासाठीं आम्हांस योग्य मार्गानें प्रेरित कर.

७८ मंहिष्ठः वज्रिवः ! शक्रः एव हि (६४३)- हे महान् वज्रधारी इन्द्रा ! तूं सामर्थ्यवान् आहेस.

७९ हे शविष्ठ ! महे वाजाय ऋञ्जसे (६४३)- हे बलवान् ! मोठें धन वा बल प्राप्त करण्यासाठीं आम्हांला समर्थ करतोस.

८० ऋञ्जसे (६४३)- सामर्थ्यवान् करतोस.

८१ राये सुवीर्यं विदाः (६४४)- धन मिळविण्यासाठीं उत्तम सामर्थ्य कसें प्राप्त करावें तें तूं जाणत आहेस.

८२ शूराणां शविष्ठः (६४४)- शूरांमध्यें अधिक बलवान् तूं आहेस.

८३ वाजानां पतिः (६४४)- बलांचा स्वामी तूं आहेस.

८४ वशान् अनु ऋञ्जसे (६४४)- आपल्याला जे अनुकूल असतात, त्यांना तूं सामर्थ्यवान् करतोस.

८५ मघोनां मंहिष्ठः (६४५)- मोठ्या धनिकांहून तूं मोठा आहेस.

८६ अंशुः न शोचिः (६४५)- स्वयं प्रकाशितांप्रमाणें तूं प्रकाशमान आहेस.

८७ नः विदे अभिनय (६४५)- आम्हांला ज्ञान प्राप्त करण्यासाठीं योग्य मार्गानें ने.

८८ शक्रः ईशे (६४६)- जो सामर्थ्यवान् असतो तो स्वामी होतो.

८९ ऊतये जेतारं अपराजितं हवामहे (६४६)- संरक्षणासाठीं विजयी व अपराजित असतो, त्या वीराला आम्ही बोलावतों.

९० सः नः द्विषः सु अर्षत् (६४६)- तो आमच्या शत्रूंना दूर करतो.

९१ सः क्रतुः छन्दः ऋतं बृहत् (६४६)- तो कर्म करणारा, रक्षक, सत्यनिष्ठ व मोठा आहे.

९२ धनस्य सातये अपराजितं जेतारं इन्द्रं हवामहे (६४७)- धनाची प्राप्ति व्हावी यासाठीं अपराजित व विजयी इन्द्राला आमच्या सहाय्यासाठीं बोलावतो.

९३ पूर्तिः शस्यते (६४८)- पूर्णता करण्याच्या शक्तिची प्रशंसा होत असते.

९४ शक्रः वशी (६४८)- सामर्थ्यवान् सर्वांना वश करतो.

९५ यः सखा सुशेवः अद्वयुः (६४९)- जो उत्तम मित्र, उत्तम प्रकारें सेवा करण्यास योग्य व दुटप्पी वर्तन न करणारा असतो, तो उत्तम होय.

उपमा

१ दिवि द्यां इव (६०२)- द्युलोकांत जसें तेज असतें तसें (यज्ञस्य पयः) यज्ञाचें दूध असतें.

२ यथा त्ये तायवः (६३३)- जसे ते चोर पळून जातात, त्याप्रमाणें (नक्षत्रा अक्तुभिः अपयन्ति) नक्षत्रें रात्रीबरोबर निघून जातात. दिवसा दिसत नाहींत.

३ यथा भ्राजन्तः अग्नयः (६३४)- जसे तेजस्वी अग्नि पेटतात, त्याप्रमाणें (अस्य केतवः रश्मयः) या सूर्याचे किरण चमकतात.

या अरण्यकांडांत एवढ्याच उपमा आहेत.

आरण्यकाण्डान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
५८६	६।४६।५	शंयुर्बार्हस्पत्यः (भरद्वाजः)	इन्द्रः	बृहती
५८७	७।२७।३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	त्रिष्टुप्
५८८	—	वामदेवो गौतमः	,,	गायत्री
५८९	१।२४।१५	शुनःशेप आजीगर्तिः कृत्रिमो देवरातो वैश्वामित्रो वा	वरुणः	त्रिष्टुप्
५९०	९।९७।५८	कुत्स आंगिरसः (गृत्समदः)	पवमानः सोमः	,,
५९१	—	वामदेवो गौतमः	विश्वेदेवाः	एकपाद्जगती
५९२	९।६१।१२	अमहीयुरांगिरसः	पवमानः सोमः	गायत्री
५९३	९।६१।११	अमहीयुरांगिरसः	,,	,,
५९४	—	आत्मा	अन्नम्	त्रिष्टुप्
		(२)		
५९५	८।९३।१३	श्रुतकक्ष आंगिरसः	इन्द्रः	गायत्री
५९६	९।८३।३	पवित्र आंगिरसः	पवमानः सोमः	जगती
५९७	१।७।२	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	इन्द्रः	गायत्री
५९८	१।७।४	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
५९९	१०।१८।१२	प्रथो वासिष्ठः	विश्वेदेवाः	त्रिष्टुप्
६००	२।४१।२	गृत्समदः शौनकः	वायुः	गायत्री
६०१	८।८९।५	नृमेधपुरुमेधावांगिरसौ	इन्द्रः	अनुष्टुप्
		(३)		
६०२	—	वामदेवो गौतमः	प्रजापतिः	अनुष्टुप्
६०३	१।९१।१८	गोतमो राहूगणः	सोमः	त्रिष्टुप्
६०४	१।९१।२२	गोतमो राहूगणः	,,	,,
६०५	१।१।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	अग्निः	गायत्री
६०६	४।१।१६	वामदेवो गौतमः	,,	त्रिष्टुप्
६०७	२।३५।३	गृत्समदः शौनकः	अपांनपात्	,,
६०८	—	वामदेवो गौतमः	रात्रिः	अनुष्टुप्
६०९	६।८।१	भरद्वाजो बार्हस्पत्यः	अग्निः	जगती
६१०	६।५२।१४	ऋजिश्वा भारद्वाजः	विश्वेदेवाः	,,
६११	—	वामदेवो गौतमः	लिंगोक्ताः	महापंक्तिः
६१२	१।३२।१	हिरण्यस्तूप आंगिरसः	इन्द्रः	त्रिष्टुप्
६१३	३।२६।७	विश्वामित्रो गाथिनः (ब्रह्म)	आत्मा अग्निर्वा	,,
६१४	३।५।१	विश्वामित्रो गाथिनः (ब्रह्म)	अग्निः	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(४)		
६१५	—	वामदेवो गौतमः	अग्निः	पंक्तिः
६१६	—	वामदेवो गौतमः	"	"
६१७	१०।९०।१	नारायणः	पुरुषः	अनुष्टुप्
६१८	१०।९०।४	नारायणः	"	"
६१९	१०।९०।२	नारायणः	"	"
६२०	१०।९०।३	नारायणः	"	"
६२१	१०।९०।५	नारायणः	"	"
६२२	—	वामदेवो गौतमः	द्यावापृथिवी	त्रिष्टुप्
६२३	—	वामदेवो गौतमः	इन्द्रः	अनुष्टुप्
६२४	—	वामदेवो गौतमः	"	"
६२५	—	वामदेवो गौतमः	"	त्रिष्टुप्
६२६	—	वामदेवो गौतमः	"	"
		(५)		
६२७	९।६६।१९	शतं वैखानसाः	अग्निः पवमानः	गायत्री
६२८	१०।१७०।१	विभ्राट् सौर्यः	सूर्यः	जगती
६२९	१।११५।१	कुत्स आंगिरसः	"	त्रिष्टुप्
६३०	१०।१८९।१	सर्पराज्ञी	सूर्य आत्मा वा	गायत्री
६३१	१०।१८९।२	सर्पराज्ञी	"	"
६३२	१०।१८९।३	सर्पराज्ञी	"	"
६३३	१।५०।१	प्रस्कण्वः	सूर्यः	"
६३४	१।५०।३	प्रस्कण्वः	"	"
६३५	१।५०।४	प्रस्कण्वः	"	"
६३६	१।५०।५	प्रस्कण्वः	"	"
६३७	१।५०।६	प्रस्कण्वः	"	"
६३८	१।५०।७	प्रस्कण्वः	"	"
६३९	१।५०।९	प्रस्कण्वः	"	"
६४०	१।५०।८	प्रस्कण्वः	"	"

अथ महानाम्न्यार्चिकः ।

६४१	—	प्रजापतिः	इन्द्रस्त्रैलोक्यात्मा	
६४२	—	प्रजापतिः	"	
६४३	—	प्रजापतिः	"	
६४४	—	प्रजापतिः	"	
६४५	—	प्रजापतिः	"	
६४६	—	प्रजापतिः	"	
६४७	—	प्रजापतिः	"	
६४८	—	प्रजापतिः	"	
६४९	—	प्रजापतिः	"	
६५०	—	प्रजापतिः	लिंगोक्ताः	

